लोकलेखा समिती

(२०१५-२०१६)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या
सन २०१३-२०१४ चा महसुली जमा अहवालामधील वित्त विभागाशी संबंधित
(परिच्छेद क्र. २.४, २.५.१, २.५.२, २.५.३, २.५.४ तसेच प्रकरण VII) व
महसुल (मुद्रांक शुल्क नोंदणी) विभागाशी संबंधित
(परिच्छेद क्र. ४.३, ४.४.१, ४.४.२) यावरील

पंधरावा अहवाल

सत्यमेव जयते

(हा अहवाल विधानसभा / विधानपरिषद सभागृहास
दिनांक १३ डिसेंबर, २०१६ रोजी सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर.
डिसेंबर, २०१६

लोकलेखा समिती

२०१५-२०१६

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या
सन २०१३-२०१४ चा महसुली जमा अहवालामधील वित्त विभागाशी संबंधित
(परिच्छेद क्र. २.४, २.५.१, २.५.२, २.५.३, २.५.४ तसेच प्रकरण VII) व
महसुल (मुद्रांक शुल्क व नोंदणी) विभागाशी
संबंधित (परिच्छेद क्र. ४.३, ४.४.१, ४.४.२) यावरील

पंधरावा अहवाल

लोकलेखा समिती
२०१५-२०१६

समिती प्रमुख

१) श्री.गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य

२) श्री.शिवाजीराव नाईक, वि.स.स.
३) श्री.संजय सावकारे, वि.स.स.
४) श्री.नानाजी शामकुळे, वि.स.स.
५) श्री.हरिभाऊ जावळे, वि.स.स.
६) श्री.राजेंद्र पाटणी, वि.स.स.
७) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.
८) श्री.योगेश सागर, वि.स.स.
९) डॉ.अनिल बोंडे, वि.स.स.
१०) श्री.प्रशांत ठाकूर, वि.स.स.
११) श्री.संजय केळकर, वि.स.स.
१२) श्री.शंभुराज देसाई, वि.स.स.
१३) श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.
१४) श्री.वैभव नाईक, वि.स.स.
१५) श्री.सुरेश गोरे, वि.स.स.
१६) श्री.कालिदास कोळंबकर, वि.स.स.
(१७) श्री.वसंतराव चव्हाण, वि.स.स.
(१८) श्री.जयंत पाटील, वि.स.स.
(१९) श्री.राजेश टोपे, वि.स.स.
(२०) श्री.भास्कर जाधव, वि.स.स.
(२१) श्री.जयंत पाटील, वि.प.स.
* (२२) श्री.सुनिल तटकरे, वि.प.स.
(२३) श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स.
** (२४) श्री.माणिकराव ठाकरे, वि.प.स.
(२४ अ) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.
(२५) श्री.संजय दत्त, वि.प.स.

सदरहू समिती दिनांक १ मे, २०१५ रोजी विधानसभा व दिनांक २१ मे, २०१५ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात आली.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.

(२) श्री. यु. के. चव्हाण, सचिव.

(३) श्री. सु. सा. गायकवाड, वित्तीय सल्लागार.

(४) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

(५) श्री. ऋतुराज कुडतरकर, उप सचिव.

(६) श्री.श्री.चु.श्रीरंगम, उप सचिव तथा नि.अ.

(७) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.

(८) श्रीमती सुषमा पाठक, कक्ष अधिकारी.

(९) श्री.रविंद्र मेस्त्री, कक्ष अधिकारी

***श्री. सुनिल तटकरे, वि.प.स. यांनी दिनांक २८ सप्टेंबर, २०१६ रोजी समिती सदस्यत्वाचा राजीनामा दिलेला असल्यामुळे सदर जागा रिक्त आहे.**

****श्री.माणिकराव ठाकरे , वि.प.स. यांची दिनांक ५ ऑगस्ट, २०१६ रोजी उप सभापती , विधानपरिषद पदी निवड झाल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. यांची मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक ३१ ऑगस्ट, २०१६ रोजी समिती सदस्य म्हूणन नामनियुक्ती केली.**

प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरुन भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१३-२०१४ चा महसुली जमा अहवालामधील वित्त विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. २.४, २.५.१, २.५.२, २.५.३, २.५.४ तसेच प्रकरण VII) व महसुल मुद्रांक शुल्क व नोंदणी विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.३, ४.४.१, ४.४.२), यावर विचार करून लोकलेखा समितीचा पंधरावा अहवाल सादर करीत आहे.

समितीने दिनांक २१, जून, २०१६ रोजी सचिव, मुद्रांक शुल्क व नोंदणी विभाग, दिनांक २८ व २९ जून, २०१६ रोजी अपर मुख्य सचिव व सचिव, वित्त विभाग तसेच दिनांक ४ जुलै, २०१६ रोजी प्रधान सचिव, वित्त (वित्तीय सुधारणा) विभागाच्या सचिवांची साक्ष विधानभवन, मुंबई येथे घेण्यात आली.

प्रधान महालेखाकार, लेखापरीक्षा-एक महाराष्ट्र, मुंबई तसेच महालेखाकार, लेखापरीक्षा-दोन महाराष्ट्र, नागपूर हे समितीच्या निमंत्रणावरुन बैठकींना उपस्थित होते. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

तसेच सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे) यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांची देखील आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. बैठकीच्या कामकाजाच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेली आश्वासित माहिती व परिपत्रके परिशिष्ट "अ" मध्ये देण्यात आलेली आहेत. समितीच्या झालेल्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट "ब" मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीने दिनांक ७ डिसेंबर, २०१६ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेतला व त्यातील शिफारशींवर सुधारणा सुचवून प्रारुप अहवालाला मान्यता दिली.

विधान भवन,
मुंबई/नागपूर.
दिनांक : ७ डिसेंबर, २०१६.

गोपालदास अग्रवाल,
समिती प्रमुख,
लोकलेखा समिती.

अनुक्रमणिका

अ.क्र. (१)	विभाग व तपशील (२)	पृष्ठ क्रमांक (३)
	प्रस्तावना	
(१)	वित्त विभाग (परिच्छेद क्र. २.४, २.५.१, २.५.२) (परिच्छेद क्र. २.५.३, २.५.४)	१
(२)	महसुल (मुद्रांक शुल्क व नोंदणी) विभाग (४.३, ४.४.१, ४.४.२)	१२२
(३)	वित्त विभाग (प्रकरण क्र. VII)	१९१

वित्त विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा सन २०१३-२०१४ चा महसूली जमा अहवाल

स्पष्टीकरणात्मक ज्ञापने

परिच्छेद क्र./पृ.क्र.	प्रारुप परिच्छेद क्र./विभाग	आक्षेप
१	२	३
२.४/२.४.१ १७	२८ १३-१४	**विक्रीकर विभागातील "परतावा व परतावा लेखापरीक्षा शाखेची" लेखापरीक्षा** २.४.१ **प्रस्तावना** परताव्याचे दावे वेळेवर पूर्ण करता यावे व परताव्याच्या दाव्यांची वैधता व अचूकतेची खातरजमा करता याची यासाठी मार्च २००६ पासून विक्रीकर विभागामध्ये परतावा व परतावा लेखापरीक्षा शाखेची (RRA शाखा) निर्मिती करण्यात आली. विभागीय पातळीवर विक्रीकर सह आयुक्त (JCs) हे परतावा व परतावा लेखापरीक्षा शाखांचे प्रमुख असतात व त्यांना उपआयुक्तांचे सहाय्य लाभते व सहाय्यक आयुक्त व विक्रीकर अधिकारी उपआयुक्तांना सहाय्य करतात. नोंदणीकृ त व्यापाऱ्याने नमुना ५०१ मध्ये आवेदन दाखल केल्यावर परताव्याच्या दाव्याची प्रक्रिया सुरु होते. ऑक्टोबर २००९ पासून, परताव्याचा दावा करणाऱ्या प्रत्येक नोंदणीकृत व्यापाऱ्याने महाविकासचा वापर करुन परतावा आवेदन ऑन लाईन (नमुना ५०१) सादर करणे आवश्यक आहे. अशाप्रकारे सादर करण्यात आलेली परतावा आवेदने संगणकीय प्रणालीचा, म्हणजेच महाविकासचा वापर करुन परतावा शाखेतील वेगवेगळया निर्धारणा अधिकाऱ्यांना वाटप केली जातात. परतावा शाखेतील निर्धारणा अधिकारी ही प्रकरणे महाराष्ट्र मुल्यवर्धित कर अधिनियम,२००२ अंतर्गत निर्धारणा पूर्ण करुन, जेथे देय असेल तेथे व्याजासह परतावा देणे अपेक्षित असते. व्याजाचे दर शासनाकडून वेळोवेळी अधिसूचित केले जातात. **स्पष्टीकरणात्मक अभिप्राय.** सर्वसाधारण परिच्छेद - अभिप्राय नाही.

<table>
<tr><th>परिच्छेद क्र./पृ.क्र.</th><th>प्रारुप परिच्छेद क्र./विभाग</th><th>आक्षेप</th></tr>
<tr><td>१</td><td>२</td><td>३</td></tr>
<tr><td>२.४.२
१७</td><td>२८
१३-१४</td><td>

लेखापरीक्षेची व्याप्ती व कार्यपध्दती

विक्रीकर विभागाच्या १३ विभागांमध्ये परतावा व परतावा लेखापरीक्षेच्या ४८ शाखा आहेत. विभागाने सादर केलेल्या माहितीनुसार वर्ष २०१२-१३ दरम्यान १५,५८८ प्रकरणांमध्ये रु.३,४७७.४० कोटी परतावा देण्यात आला होता व ३१ मार्च २०१३ रोजी राज्यात ५७,२०७ प्रकरणे प्रलंबित होती. जुलै २०१३ व मार्च २०१४ मध्ये पाच विभागांमधील १९ शाखांमध्ये पूर्ण करण्यात आलेल्या सर्व परतावा प्रकरणांची लेखापरीक्षा करण्यात आली. या शाखांमध्ये २०१२-१३ दरम्यान ९,०४८ प्रकरणांमध्ये रु.२,९४६.४० कोटी परतावा मंजूर केला होता. तक्ता २.४.२ मध्ये त्यांचा तपशील देण्यात आला आहे.

तक्ता २.४.२

(रु.कोटीत)

विभाग	०१.०४.२०१२ ची प्रारंभिक शिल्लक	वर्ष २०१२-१३ मधील वाढ	वर्ष २०१२-१३ मध्ये निपटारा झालेली	३१.०३.२०१३ ची शिल्लक	वर्ष २०१२-१३ मध्ये परतावा दिला गेला अशी प्रकरणे	वर्ष २०१२-१३ दरम्यान देण्यात आलेली परताव्याची रक्कम
१	२	३	४	५	६	७
औरंगाबाद	५९०	७८	१९२	४७६	१८६	९६६.३३
मुंबई	१०,७८८	१५,६८८	६,४४२	२०,०३४	३,७२०	९६८.६३
नाशिक	१,४७५	८,९३०	७,२२४	३,१८१	२,१९६	७२.९६
पुणे	२,४९०	९,५५०	११,३२२	७१८	१,३२६	८६४.६८
ठाणे	५,१६९	२,८३४	१,६२६	६,३७७	१,६२०	७३.८०
एकूण	२०,५१२	३७,०८०	२६,८०६	३०,७८६	९,०४८	२,९४६.४०

अशाप्रकारे, परताव्याची रक्कम विचारात घेता लेखापरीक्षा व्याप्ती ८४.७३ टक्के होती व प्रकरणांची संख्या विचारात घेता ५८.०४ टक्के होती, हे दिसून येते. वरील तक्त्यावरुन असे निदर्शनास येते की, ३१ मार्च २०१३ पर्यंत निवडक विभागात ३०,७८६ प्रकरणांचा निपटारा प्रलंबीत होता.

स्पष्टीकरणात्मक अभिप्राय.

सर्वसाधारण परिच्छेद- अभिप्राय नाही.

</td></tr>
</table>

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा सन २०१३-२०१४ चा महसूली जमा अहवाल

स्पष्टीकरणात्मक ज्ञापने

परिच्छेद क्र./पृ.क्र.	प्रारुप परिच्छेद क्र./विभाग	आक्षेप
१	२	३
२.४.३ १८	२८ १३-१४	**लेखापरीक्षा निष्पत्ती** **परताव्याचे संस्करण व प्रदान करण्यातील विसंगती** महाराष्ट्र मुल्यवर्धित कर नियम,२००५ च्या नियम १७अ(२)व ६०(१)अंतर्गत परताव्याच्या दावा करणाऱ्या नोंदणीकृत व्यापाऱ्याने नमुना ५०१ मध्ये आवेदन दाखल करणे आवश्यक आहे. आवेदन प्राप्त झाल्यावर व बँक हमीची मागणी केल्यावर अठरा महिन्यांच्या आत आयुक्त महाराष्ट्र मुल्यवर्धित कर अधिनियमाच्या कलम ५१ अंतर्गत (१ मे २०११ रोजी सुधारित केलेल्या) खालील अटींवर परतावा देवू शकतात. | ३१ मार्च २०१० रोजी किंवा तत्पूर्वी संपणाऱ्या कालावधीसंबंधी | ३० सप्टेंबर २०११ रोजी किंवा त्याआधी | | १ एप्रिल २०१० रोजी सुरु होणाऱ्या व ३१ मार्च २०११ रोजी संपणाऱ्या कालावधीसंबंधी | ३० जून २०१२ रोजी किंवा त्याआधी | ज्या प्रकरणांत तात्पुरता परतावा देण्यात येतो ती प्रकरणे MVAT अधिनियमाच्या कलम २३ अंतर्गत पुर्ण करावयाची असतात व जर व्यापाऱ्यांना परतावा देय असल्याचे सिध्द झाले तर असा परतावा, MVAT अधिनियमाच्या कलम ५२ अंतर्गत प्रतिमाह ०.५ टक्के दराने व्याज परिगणित करुन त्यासह देण्यात येतो. परंतु , अधिनियमाच्या कलम ५१ अंतर्गत दिलेल्या परताव्यावर कोणतेही व्याज देय नव्हते. **स्पष्टीकरणात्मक अभिप्राय.** सर्वसाधारण परिच्छेद- अभिप्राय नाही.

नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा सन २०१३-२०१४ चा महसूली जमा अहवाल

स्पष्टीकरणात्मक ज्ञापने

परिच्छेद क्र./पृ.क्र.	प्रारुप परिच्छेद क्र./विभाग	आक्षेप
१	२	३
२.४.३.१ १८	२८ १३-१४	**लेखापरीक्षा निष्पत्ती** **परताव्याचे संस्करण व प्रदान करण्यातील विसंगती** मुंबई, पुणे आणि ठाणे विभागाच्या अभिलेख्यांच्या चाचणी तपासणी मध्ये आमच्या असे निदर्शनास आले की १०० प्रकरणांमध्ये २००५-०६ ते २००९-१० या मधील विविध कालावधींसाठीची परतावा आवेदने विभागाकडे ३१ मार्च २०११ रोजी किंवा तत्पूर्वी प्राप्त झाली होती. जरी या सर्व प्रकरणांमध्ये ३० सप्टेंबर २०११ आणि ३० जून २०१२ पूर्वी परतावा देणे आवश्यक होते तरी एक महिना ते सहा महिने एवढया विलंबाने MVAT अधिनियमाच्या कलम २३ अंतर्गत दाव्यांची पूर्तता करण्यात आली (२०१२-१३). परिणामी, MVAT अधिनियमाच्या कलम ५२ अंतर्गत रु.६८.२५ कोटीच्या परताव्यावर रु. ८.१८ कोटी व्याज दिले गेले. MVAT अधिनियमाच्या कलम ५१ अंतर्गत जर दावे वेळेवर पूर्ण करण्यात आले असते तर रु. ८.१८ कोटी व्याजाचे प्रदान टाळता आले असते. अशाप्रकारे, उपरोक्त माहितीवरुन असे दिसून येते की, महाराष्ट्रात VAT लागू होवून आठ वर्षे पूर्ण झाल्यानंतरही परताव्याची प्रकरणे वेळेवर संस्करित करण्यासाठी विभागाकडून यंत्रणा निर्माण करण्यात आलेली नाही. **स्पष्टीकरणात्मक अभिप्राय.** अ) १) विक्रीकर विभागात परतावा व परतावा लेखा परिक्षण शाखा २००५ पासून कार्यरत आहे. २)सुरवातीच्या काळात विभागाची मुल्यवर्धित कर कायदयाचे संगणकीकरण कार्यक्रम अंमलात आणण्याच्या दृष्टीने प्रारंभीक विकासाच्या टप्प्यात होते. यास्तव, व्यापाऱ्यांचा खरेदी/विक्री व्यवहार तपशील संगणकीय स्वरुपात विभागाकडे उपलब्ध नव्हता. त्यामुळे बहुतांश कार्ये उदा नोंदणी , विवरणपत्र दाखल करणे, विविध नमुने देणे, निर्धारणा, कर वजावटीची पडताळणी करणे. इ.कामे पारंपारिक पध्दतीने पार पाडण्यात येत होती. ३)मुल्यवर्धित कर कायदयाच्या रचनेमुळे परताव्यांचे दावे तसेच परताव्यांच्या रक्कमेत वाढ झाली. परतावे प्रदान करतांना, खरेदीवर भरलेल्या कराची वजावट देताना तो कर शासकीय तिजोरीत भरला गेला आहे किंवा कसे याची पुरेपूर खात्री करण्यात येते. संगणकीकरणाच्या अभावी हया सर्व करवजाबटींची पडताळणी विक्रीकर निरीक्षकाकरवी केली जात होती व ते कार्य कमी वेळेत पूर्ण करण्यास मर्यादा होत्या. हे सर्व शासनाचा महसूल संरक्षित करण्याच्या दृष्टीने व परतावा देतांना शासनाची महसूल हानी होऊ नये यासाठी आवश्यक आहे. अशाप्रकारे अयोग्य परतावा देवून शासकीय महसूल टाळण्याच्या दृष्टीने पुरेपूर काळजी घेवून कायदयाच्या कक्षेप्रमाणे वेळेत निर्धारणा आदेश पारीत करण्यात आले. आणि म्हणूनच हया प्रक्रियेमध्ये अतिशय परिश्रमपूर्वक प्रयत्न करुनही निर्धारणेकरिता काही अंशी विलंब झाला, परंतू सदर परतावा कायद्याने विहित केलेल्या समय मर्यादेमध्ये देण्यात आला. ४)परतावा प्रदान करण्याची जी पध्दत आखून दिलेली आहे त्याप्रमाणे निर्धारणा अधिकारी प्रथम अंशत: परतावा प्रदान करतात. हा अंशत: परतावा जुळणी झालेल्या तसेच पडताळणी केलेल्या कर वजावटीच्या मर्यादेअधिन असतो. त्यावर कलम ५१ नुसार व्याज देण्यात येत नाही. उर्वरीत परताव्यासाठी निर्धारणा कार्यवाही सुरु केली जाते व अशा निर्धारणेप्रमाणे येणाऱ्या उर्वरीत परताव्यावरच महाराष्ट्र मुल्यवर्धित कर कायदयाच्या कलम ५२ नुसार व्याज देण्यात येते.

		५)महाराष्ट्र मुल्यवर्धित कर कायदा कलम ५२ नुसार परतावाच्या रक्कमेवर व्याज देण्याची संवैधानिक तरतुद आहे. जेव्हा कराचा परतावा देय होतो, तेव्हा जास्तीत जास्त २४ महिन्याच्या अधिन राहून महिना अर्धा टक्का (०.५%) दराने व्याज दिले जाते. वरील संवैधानिक बाबींचा विचार करुनच लेखा आक्षेप टिप्पणीत नमुद केलेल्या प्रकरणांमध्ये परतावावर अनुषंगीक व्याज देण्यात आलेले आहे. **व्यापारी वर्ग तसेच विभागाला येणा-या वरील समस्यांवरील उपाय म्हणून तसेच परतावाचे दावे विश्वसनीय आणि जलद गतीने पारीत होण्यासाठी विभागाने खालील उपाय योजना केलेल्या आहेत.** ब) १) परतावा प्रदान करताना होणा-या मानवी चुका टाळण्यासाठी विभागाने संगणकीकृत माहिती विश्लेषण प्रणाली २००८-०९ या आर्थीक वर्षा पासुन अंमलात आणलेली आहे. ज्याचे खुपच चांगले परीणाम दिसुन येत आहेत.व्यापारी आता विक्री सहपत्र (J१) आणि खरेदी सहपत्र (J२) संगणकाव्दारे सादर करतात. त्याची तपासणी व पडताळणी महाविकास प्रणालीव्दारे सहजगत्या होते. परिणामी परतावे कमी कालावधीत देणे शक्य होत आहे. संगणकीय प्रणाली विभागात लागु केल्यापासुन उत्तम परिणाम पाहण्यास मिळत आहेत.तंत्रज्ञानाचा स्वीकार व अंगीकार केल्यामुळे परतावा अर्जावर उत्तमरीत्या वेळेचा अपव्यय न करता प्रक्रिया करणे शक्य झाले आहे. २) तथापि होणारा थोडाफार विलंब टाळण्यासाठी विभागाने सॅप (SAP) वर आधारीत नविनतम ऑटोमेशन प्रणाली अंमलात आणली आहे. ज्यामुळे परतावा प्रदान करण्याच्या कामात गती येऊन अनावश्यक व्याजापोटी द्यावयाच्या रक्कमेत बचत होईल. नवीन प्रणालीनुसार व्यापा-यास त्याच्या विवरणपत्र सादर करण्याच्या कालावधीनुसार (periodicity) परतावा देणे शक्य होणार आहे. त्यासाठी वर्ष अखेर पर्यंत थांबण्याची आवश्यकता भासणार नाही. नवीन संगणक प्रणालीमुळे कर वजावटीची पडताळणी, खरेदी / विक्री यांची मेळजुळणी वास्तविक काल आधारित होणार आहे. महाराष्ट्र राज्य हे भारतातील पहिले राज्य आहे की जेथे सॅप (SAP) वर आधारीत महसूल व्यवस्थापन (TRM) संगणक प्रणाली वापरली जाते. ३) नविन संगणक प्रणाली पध्दती मध्ये व्यापा-यास त्याने सादर केलेल्या त्याच्या व्यवसायाच्या तपशिलवार माहितीनुसार खरेदी / विक्री, आंतरराज्यीय हस्तांतरण इत्यादी वर आधारीत परतावा परिगणना करण्यास उपयुक्तता (utility) उपलब्ध होईल. परतावा अर्ज हा व्यापा-याने सादर केलेल्या करदेयकनिहाय निहाय तपशिलावरून स्वयंचलित पध्दतीने तयार होईल. ४) आज हे सांगण्यास अतिशय आनंद होत आहे की विक्रीकर विभाग पूर्णतः संगणकीकृत व स्वंयचलित झालेला आहे. व्यापारी त्याच्या खरेदी / विक्रीची पूर्ण माहिती ऑन लाईन सादर करतो. ती माहिती संगणकाव्दारे पडताळली जाते. तिचे विश्लेषण केले जाते. यामूळे परतावा प्रदान करण्यास लागणारा कालावधी कमी झाला आहे. आजकाल परतावा हा NEFT व्दारे थेट व्यापा-याच्या बँक खात्यामधे जमा केला जातो. ५) दिनांक ०१.०१.२०१६ पासून विभागाने भौगोलिक स्थान पध्दतीवर आधारीत कार्यपध्दती अंमलात आणलेली आहे. ज्यामुळे परतावा प्रदान करण्याच्या कालावधी कमी होणार आहे. या नवीन रचनेनुसार एकूण १६७२ अधिकारी परतावा प्रक्रिया व परतावा प्रदान करणे या साठी नियुक्त केलेले आहेत. या आधीच्या कार्यपध्दतीत फक्त ३९० अधिकारी नियुक्त होते. अधिका-यांच्या हया वाढीव संख्येमुळे परतावा प्रदान करण्यास होणारा विलंब खात्रीने कमी होईल. परतावे वेळच्या वेळी प्रदान करण्यासाठी शासन नेहमी पुरेसे अर्थ संकल्पीय अनुदान देत असते.

कॅग २०१३-१४ मधील परिच्छेद २.४.३.१ बाबतच्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांचे विवरणपत्र

अ.क्र.	विभाग	व्यापाऱ्याचे नांव व नों.दा.क्र.	कालावधी	अंतर्भूत रक्कम	मान्य/ अमान्य
१	२	३	४	५	६
1	मुंबई	मे.सीपीएल वीड फार्म प्रा.लि. ,२७५१०५९८०१२व्ही	२००८-०९	२७७२३२	अमान्य
२	मुंबई	मे.नवजीवन सिंथेटीक प्रा.लि., २७४३०२५८९४४व्ही	२००८-०९	२७९६४८	अमान्य
३	मुंबई	मे.पुण्य गोल्ड इंडिया लिमि., २७७५०५५८६९२व्ही	२००७-०८	८४६४६	अमान्य
४	मुंबई	मे.सॅम टेक्नो मॅक.प्रा.लि. ,२७१३०२६१६३१व्ही	२००८-०९	१४५०९२	अमान्य
५	मुंबई	मे.सिध्दार्थ ग्लोबल लि., २७८६०००३६४६व्ही	२००८-०९	२११७३०	अमान्य
६	मुंबई	मे.आला केमिकल्स प्रा.लि., २७८१०३७१७४०व्ही	२००८-०९	१५०५३०	अमान्य
७	मुंबई	मे. डेल्टा आर्यन अँड स्टील को.प्रा.लि., २७३८०००१०९७व्ही	२००७-०८	८८०५४३	अमान्य
८	मुंबई	मे. झॉनगॅस KPTL कॉनसरटिएम ,२७९७०५७२४४२व्ही	२००७-०९	६०७३९२	अमान्य
९	मुंबई	मे.नोवा होम अप्लायंन्स प्रा.लि. ,२७४३०७२५६११व्ही	२००९-१०	१६४१२७	अमान्य
१०	मुंबई	मे. प्रेशियस प्लास्टो पॅकेजिंग प्रा.लि. ,२७०७००११७९२व्ही	२००७-०८	१४०९५१	अमान्य
११	मुंबई	मे. टायटन ऑरगॅनिक प्रा.लि. ,२७८८०००१११३व्ही	२००८-०९	५७७३१६	अमान्य
१२	मुंबई	मे. लिलि ज्वेलर्स प्रा.लि. ,२७९८०२५१५१२व्ही	२००९-१०	१००४०३	अमान्य
१३	मुंबई	मे. FLS मिड प्रा.लि. ,२७१५०५८१७२०व्ही	२००८-०९	५५५७३	अमान्य
१४	मुंबई	मे. हितेश स्टील प्रा.लि. ,२७८००३५४१४०व्ही	२००८-०९	८५३८१	अमान्य
१५	मुंबई	मे. टेक्नो इकॉनॉमिक्स सर्विसेस प्रा.लि. ,२७७४०३४१९४व्ही	२००८-०९	३०१७२९	अमान्य
१६	मुंबई	मे. बेजिंग इंडिया लिमी. ,२७९७०२४४५८२व्ही	२००८-०९	३४०२९५	अमान्य
१७	मुंबई	मे. ब्लॅक रोझ ट्रेडिंग प्रा.लि. ,२७९००००१८७८व्ही	२००८-०९	१२६२३०	अमान्य
१८	मुंबई	मे. जेम मॅन्युफॅक्चर(इ)प्रा.लि. ,२७२७०३५३८९८व्ही	२००९-१०	५४७१८३	अमान्य
१९	मुंबई	मे. नितीन स्टील अॅन्ड इंजि.कं., २७७८०६०५९६३व्ही	२००८-०९	१७४२७३	अमान्य
२०	मुंबई	मे.सुरज मुल बैजनाथ प्रा.लि., २७३९०२२८७९९व्ही	२००८-०९	१५८६७७	अमान्य
२१	मुंबई	मे. महावीर एक्सट्रुशन प्रा.लि. ,२७७८०६४७३८२व्ही	२००८-०९	१८८२१५	अमान्य
२२	मुंबई	मे. कारनेशन ऑटो (इं)प्रा.लि. ,२७२००६९६५८९व्ही	२००८-०९	२६६६७८	अमान्य
२३	मुंबई	मे. बरकत फूड अँड टोबॅको प्रा.लि. ,२७६१०२४७६९०व्ही	२००८-०९	१८५३५९	अमान्य
२४	मुंबई	मे. पटेल मिशिगन Jv. , २७५४०५३१९८७व्ही	२००८-०९	२२९९४३	अमान्य
२५	मुंबई	मे. पवन इंजिनियरर्स ,२७७४०२६३१८७व्ही	२००८-०९	३१६०६	अमान्य

२६	मुंबई	मे. स्टेनमोट अलॉय CPD लिमी. , २७४४०३५५९८७व्ही	२००८-०९	५५६५०	अमान्य
२७	मुंबई	मे.व्हेरी गोल्ड फाईन ज्वेलरी प्रा.लि., २७८९०३९६३३४व्ही	२००८-०९	२२१५५५	अमान्य
२८	मुंबई	मे. MCO इंजि. , २७६००२८६९३२व्ही	२००९-१०	५३७६०	अमान्य
२९	मुंबई	मे. सागर एंटरप्रायझेस ,२७९१०१४०५३४व्ही	२००८-०९	९७८२४	अमान्य
३०	मुंबई	मे. वैष्णवी इर्सेशियल ,२७७९५०६४१९०५व्ही	२००९-१०	१००९२५	अमान्य
३१	मुंबई	मे. के. चंद्रकांत अँड कं. , २७८८०३५३२२३व्ही	२००५-०६	७५५०२	अमान्य
३२	मुंबई	मे. नाईक सी फूड प्रा.लि. ,२७४०००००४५७८व्ही	२००७-०८	७४५३३	अमान्य
३३	मुंबई	मे. इंडेप्सका ओवरसीस प्रा.लि. , २७२००३८७२५६व्ही	२००७-०८	८१४४६	अमान्य
३४	मुंबई	मे. बालाजी स्टील , २७८७०००११६७व्ही	२००७-०८	११६०२८	अमान्य
३५	मुंबई	मे. सेल जेम्स ,२७७८०३५९४८६व्ही	२००८-०९	१४८२६०	अमान्य
३६	मुंबई	मे. बैभव जेम्स , २७१७०२७७५१७व्ही	२००७-०८	१६९७४०	अमान्य
३७	मुंबई	मे. डॉल्फीन क्लॉथींग प्रा.लि. , २७४४०२६५५८३व्ही	२००८-०९	८५५४८	अमान्य
३८	मुंबई	मे. चैत्य ,२७०७०२७७५७२व्ही	२००८-०९	२१९८३०	अमान्य
३९	मुंबई	मे. टाइयो ल्युसिड प्रा.लि. , २७३५०२६६२६३व्ही	२००८-०९	४९६१४९	अमान्य
४०	मुंबई	मे. रामकृष्ण मर्केटाईल प्रा.लि. , २७८३०३८६८६१व्ही	२००८-०९	२३६९५५	अमान्य
४१	मुंबई	मे. सेनानंदन टेक्सटाईल्स , २७२००६५५३६४व्ही	२००८-०९	११२५४४	अमान्य
४२	मुंबई	मे. आर.टी. स्टार सॉलिटेयर, २७८४०४०४२६७व्ही	२००८-०९	६३०१३	अमान्य
४३	मुंबई	मे. मोहित सिंथेटिक्स प्रा.लि., २७२३०२६२१५८व्ही	२००८-०९	७९३१५	अमान्य
४४	मुंबई	मे. रिलायन्स जेम्स अँड ज्वेल लिमी. ,२७८७०६३८५५४व्ही	२००८-०९	१६३२१७	अमान्य
४५	मुंबई	मे. डी.डमास ज्वेलरी (इं)प्रा.लि.,२७०३०३६२८५७व्ही	२००८-०९	५३४३८९	अमान्य
४६	मुंबई	मे. अश्वीन RPS कंस्ट्रक्शन ,२७९८०६४९६९७व्ही	२००८-०९	१७२२३७	अमान्य
४७	मुंबई	मे. प्रिंट रेड इश्यु(इं)प्रा.लि.,२७४००००१४७४व्ही	२००८-०९	१७५४७०	अमान्य
४८	मुंबई	मे. XALइंजि.प्रा.लि.,२७६८००७९७९३व्ही	२००७-०८	१३७०६१	अमान्य
४९	मुंबई	मे. झेनिथ टिन प्रा.लि.,२७३५०२७६६४२व्ही	२००८-०९	१९९५०३	अमान्य
५०	मुंबई	मे. निहार इक्वीपमेंट प्रा.लि.,२७६१०००२९५९व्ही	२००८-०९	५३७८८७	अमान्य
५१	मुंबई	मे. मिट ल्युबस ,२७४०३५९२५३व्ही	२००८-०९	७६५०५	अमान्य
५२	मुंबई	मे. रेक्सेलो कॅस्टरर्स प्रा.लि.,२७०३०३७५२७३व्ही	२००५-०६	८४५७१	अमान्य
५३	मुंबई	मे. पॉवर मास्टर इंड इक्वीपमेंटस प्रा.लि.,२७०६०००५७३५व्ही	२००५-०६	५५०४५	अमान्य
५४	मुंबई	मे. मॅग्युमपस ,२७३२०००७४३५व्ही	२००६-०७	८६१०६	अमान्य

५५	मुंबई	मे. अंतरा ज्वेलरी प्रा.लि.,२७९३०५४५६९२व्ही	२००८-०९	१००९७९	अमान्य
५६	मुंबई	मे. मार्क JV इम्पेक्स प्रा.लि.,२७१२००१२३९५व्ही	२००८-०९	३०९२४	अमान्य
५७	मुंबई	मे. विराट ॲल्युमिनियम ,२७२८०२९२६३७व्ही	२००७-०८	६४७४४	अमान्य
५८	मुंबई	मे. भावल स्टील अँड इंजि. कं. ,२७४४०५३१२६६व्ही	२००८-०९	१३३२०५	अमान्य
५९	मुंबई	मे. हिलाब इक्वीपमेंट प्रा.लि.,२७६२०००५३६३६व्ही	२००७-०८	१४५०५३	अमान्य
६०	मुंबई	मे. वैतरणा इफ्रास्टक्चर प्रा.लि.,२७६२०३२९९८९व्ही	२००८-०९	४०५३७०	अमान्य
६१	मुंबई	मे. हिलाब इक्वीपमेंट प्रा.लि., २७६२०००५३६३६व्ही	२००६-०७	१२६७००	अमान्य
६२	मुंबई	मे. धानजी डेव्हलपर्स ,२७६३०६९२८१२व्ही	२००८-०९	३५१८००	अमान्य
६३	मुंबई	मे. सोमाटीको फार्मा ,२७३५००११३४७व्ही	२००५-०६	१२३८१२	अमान्य
६४	मुंबई	मे. युनिकॉन पेट्रोलियम इंड प्रा.लि.,२७४२०००१९४८व्ही	२००८-०९	४८३२०३	अमान्य
६५	मुंबई	मे. रिजन्सी एक्सपोर्टस प्रा.लि.,२७१९००८९०३५व्ही	२००८-०९	१५८४४३	अमान्य
६६	मुंबई	मे. चायना व्हाईट आर्ट प्रा.लि.,२७७५०५७०१३८व्ही	२००८-०९	३३८०००	अमान्य
६७	मुंबई	मे. शरयु जेम्स ,२७५७०३५४६०६व्ही	२००८-०९	४५४४१०	अमान्य
६८	मुंबई	मे. ALD ॲटोमोटीव प्रा.लि.,२७७२०२८७६४२व्ही	२००७-०८	३४०८२०३	अमान्य
६९	मुंबई	मे. फूटव्हीप इंडिया लिमी.,२७९१०२४३३३५४व्ही	२००६-०७	५२३१२७	अमान्य
७०	मुंबई	मे. रघुवीर अर्बन कंस्ट्रक्शन प्रा.लि.,२७०९०६८५३४९व्ही	२००८-०९	२७६०३०	अमान्य
७१	मुंबई	मे. भारत एंटरप्रायझेस ,२७५२०३५७१०७व्ही	२००७-०८	११४१७५	अमान्य
७२	मुंबई	मे. महाराष्ट्र स्टेट पॉवर कंस्ट्रक्शन कं.,२७७३०३३९३८६व्ही	२००८-०९	४९०२३६६७	अमान्य
७३	मुंबई	मे. सँडोज प्रा.लि.,२७६००२९८५७२व्ही	२००८-०९	५९४५६५२	अमान्य
७४	मुंबई	मे. रोईंग विंड फार्म प्रा.लि.,२७५१०५९८०१२व्ही	२००७-०८	८९४४३७	अमान्य
७५	मुंबई	मे. रिध्दी एंटरप्रायझेस प्रा.लि.,२७९३०४०१५५०व्ही	२००८-०९	१४७४६०	अमान्य
७६	मुंबई	मे. M.A.N. इंड ,२७५३०००१५४८व्ही	२००७-०८	११७२८८	अमान्य
७७	मुंबई	मे.सरोज एंटरप्रायझेस ,२७३१०००५१६१व्ही	२००८-०९	४२३४५६	अमान्य
७८	मुंबई	मे. प्रगती इंटरनॅशनल ,२७८४०३८७५८३व्ही	२००८-०९	३७३६७	अमान्य
७९	मुंबई	मे. सुमीत जेम्स ,२७८९०३५२८७८व्ही	२००८-०९	९००६०	अमान्य
८०	मुंबई	मे.वेदांत डायस्टफ इंटरमिडिएट प्रा.लि.,२७४७०३२७२१०व्ही	२००७-०८	१११७३६	अमान्य
८१	मुंबई	मे. शेषशाई बिझनेस फॉर्मस प्रा.लि.,२७६२०००१०६२व्ही	२००६-०७	२४५१५१	अमान्य
८२	मुंबई	मे. रिलायन्स हायपर मार्ट लिमी. ,२७७८५२००२७१व्ही	२००८-०९	१४५४३२६	अमान्य
८३	मुंबई	मे. मिशन फार्मास्युटिकल्स लिमी. ,२७२६००५६४५३व्ही	२००७-०८	१२२११७	अमान्य

८४	मुंबई	मे. चंदन एक्सपोर्ट ,२७७६०४०३६३२व्ही	२००५-०६	२२५५०३	अमान्य
८५	मुंबई	मे. ग्लडरमा इंडिया प्रा.लि.,२७८४०१५८५६६व्ही	२००८-०९	२२६१४९	अमान्य
८६	मुंबई	मे. युनिस्टील इंजि.कं.प्रा.लि.,२७८३०००५२६३व्ही	२००८-०९	११४६२६	अमान्य
८७	मुंबई	मे. अँकर मार्क प्रा.लि.,२७२५०३५९०५०व्ही	२००८-०९	३७२४६५	अमान्य
८८	पुणे	मे. राधीका सेल्स कॉर्प.,२७६९०००४५६४व्ही	२००७-०८	८६७५०	अमान्य
८९	पुणे	मे. पंचरत्न बॅव्हरेज प्रा.लि.,२७१२०६६५४९६व्ही	२००८-०९	५७७७७	अमान्य
९०	ठाणे	मे. दिवाना ,२७१९०६७५८८५व्ही	२००८-०९	२००७८२	अमान्य
९१	ठाणे	मे. मेल्टेक क्रेनस प्रा.लि.,२७७६०००६७०८व्ही	२००८-०९	७००००	अमान्य
९२	ठाणे	मे. जेट केमिकल्स प्रा.लि.,२७७८००४३१६९व्ही	२००७-०८	१२८४१७	अमान्य
९३	ठाणे	मे. भगवती इंजि. प्रा.लि.,२७१९०००७२६४व्ही	२००७-०८	१९५४२९	अमान्य
९४	ठाणे	मे. रिध्दी सिध्दी कंस्ट्रक्शन ,२७०५०६२९५९६व्ही	२००८-०९	१८६२३५	अमान्य
९५	पालघर	मे. हब फार्मास्युटिक्स ,२७२८०२९९८१२व्ही	२००८-०९	३८५३१६	अमान्य
९६	पालघर	मे. इनस्टेप ,२७७१०३३२६०७व्ही	२००८-०९	२४६३३४	अमान्य
९७	पालघर	मे. अलमायटी ऑटो ॲनसीलरी प्रा.लि.,२७४६०२५३९३२व्ही	२००९-१०	२६९७६२	अमान्य
९८	पालघर	मे. सपना डिटर्जंट ॲड केमि.प्रा.लि.,२७१७०३७९४६४व्ही	२००७-०८	८२४१०	अमान्य
९९	पालघर	मे. नियॉन लॅब लिमी.,२७२५०२९८५२२व्ही	२००६-०७	१११२४७१	अमान्य
१००	पालघर	मे. डिसीटेक्स फर्निशिंग लिमी.,२७२१०३४९०८१व्ही	२००८-०९	६६८७६८	अमान्य

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा सन २०१३-२०१४ चा महसूली जमा अहवाल

स्पष्टीकरणात्मक ज्ञापने

परिच्छेद क्र./पृ.क्र.	प्रारुप परिच्छेद क्र./विभाग	आक्षेप
१	२	३
२.४.३.२ १९	२८ १३-१४	**लेखापरीक्षा निष्पत्ती** **परताव्याचे संस्करण व प्रदान करण्यातील विसंगती** ठाणे व मुंबई विभागातील दस्तऐवजांच्या चाचणी तपासणी असे आढळून आले की, चार व्यापाऱ्यांना MVAT अधिनियमाच्या कलम ५१ अंतर्गत रु.६.२१ कोटीचा परतावा देण्यात आला होता. प्रकरणांचे निर्धारण केल्यावर त्यानुसार ठाण्यातील व्यापाऱ्यांना रु.२.२७ कोटीचा अतिरिक्त परतावा देय होता व मुंबईतील व्यापारी कोणताही परतावा प्राप्त करण्यास पात्र नव्हते. परंतु, अधिनियमाच्या कलम ५२ मधील तरतूदींचे उल्लंघन करुन संबंधित निर्धारण प्राधिका-यांनी परताव्याच्या संपूर्ण रक्कमेवर व्याज ग्राहय केले. परिणामी, तक्ता २.४.३.२ मध्ये दर्शविल्यानुसार परताव्यावर रु. ५१ लाख एवढे व्याज नियमबाहयरितीने देण्यात आले. **तक्ता २.४.३.२** (रु.कोटीत)

विभाग/ व्यापाऱ्यांची संख्या	कालावधी	कलम ५१ अंतर्गत निर्धारण होण्यापूर्वीचा परतावा	निर्धारण नंतरचा परतावा	एकूण परतावा	एकूण परताव्यावर दिलेले व्याज	निर्धारणा नंतर परताव्यावर देय असलेले व्याज	नियमबाहय- पणे देण्यात आलेले व्याज (स्तंभ ६-७)
१	२	३	४	५	६	७	८
ठाणे/१	२०१०-११	३.०५	१.७८	४.८३	०.४६	०.१९	०.२७
ठाणे/१	२०१०-११	२.६२	०.४९	३.११	०.२४	०.०५	०.१९
मुंबई/१	२००५-०६	०.१९	०.००	०.१९	०.०२	०.००	०.०२
	२००६-०७	०.२३	०.००	०.२३	०.०२	०.००	०.०२
मुंबई/१	२००५-०६	०.१२	०.००	०.१२	०.०१	०.००	०.०१
एकूण		६.२१	२.२७	८.४८	०.७५	०.२४	०.५१

विभागाने अभिक्षण मान्य केले (नोव्हेंबर २०१३) आणि नमूद केले की, व्याजाची वसूली करण्यासाठी सुधारात्मक कारवाई सुरु करण्यात आली आहे. पुढील प्रगतीचा अहवाल प्राप्त झाला नाही. (डिसेंबर २०१४).

स्पष्टीकरणात्मक अभिप्राय.

या परिच्छेदामध्ये महालेखापरिक्षक यांनी ४ प्रकरणांमध्ये मुल्यवर्धित कर कायदा २००२ कलम ५२ अन्वये चर्चा करण्यात आली आहे. त्यामध्ये महालेखापरिक्षक यांनी कलम ५२ चे उल्लंघन करुन व्यापाऱ्यांस परताव्यावरील व्याज दिल्याने आक्षेप घेतलेला आहे. वरील चार प्रकरणांमध्ये चुक दुरुस्ती प्रक्रिया करुन जमा महसुलाची हानी टाळण्यात आली आहे. प्रकरणनिहाय अभिप्राय व सद्यस्थिती अहवाल सोबत जोडला आहे.

कॅग २०१३-१४ मधील परिच्छेद २.४.३.२ बाबतच्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांचे विवरणपत्र

अ.क्र.	विभाग	व्यापाऱ्याचे नांव व नों.दा.क्र.	कालावधी	अंतर्भूत रक्कम	मान्य/अमान्य	वाढीव मागणी	वसूली	शेरा
१	२	३	४	५	६	७	८	९
१.	पालघर	मे. विराज प्रोफाईल लिमी. २७७००२९८४२०व्ही	२०१०-११	२७४५०००	मान्य	२७४५०००	२७४५०००	व्यापाऱ्याने दि.१७.१.२०१३ च्या निर्धारणा आदेशाविरुध्द अपिल दाखल केलेले आहे. दि.२२.११.२०१३ च्या अपिल निर्णयानुसार परताव्यावरील व्याज रु.२७,४५,०००/- कमी केले आहे. हया पहिल्या अपिल निर्णयाविरुध्द व्यापाऱ्याने मा.न्यायाधिकरणाकडे अपिल केले. मा.न्यायाधिकरणाने त्यांच्या पूर्वीच्या मे.इंडोकाउंट इंड या प्रकरणाच्या निर्णयाप्रमाणे व्यापाऱ्याच्या बाजुने निर्णय दिला. विभागास सदर निर्णय मान्य नसल्याने मा.न्यायाधिकरणाच्या निर्णयाविरुध्द विभागाने मा.मुंबई उच्च न्यायालयात अपिल दाखल केले आहे.
२.	पालघर	मे. बेबिल्ज् फ्लांजेस वर्क्स प्रा.लि. २७७५०२९९८९६व्ही	२०१०-११	१९६५१४५	मान्य	२२५९९०९	२२५९९०९	पुनर्विलोकन आदेश दि.१२.११.२०१३ रोजी पारित करताना लेखा परिक्षण मुद्दे विचारात घेतले आहेत व त्यानुसार जादा मागणी रु. २२,५९,९०९/- (पैकी मूळ कर-रु.१९,६५,१४९/- व त्यावरील व्याज रु.२,९४,६७०/-) करण्यात आली आहे. सदर पुनर्विलोकन आदेशाविरुध्द अपिल दाखल केले असून अपिल निर्णय दि.३१.३.२०१४ नुसार सदर पुनर्विलोकन आदेश कायम करण्यात आला आहे. हया पहिल्या अपिल निर्णयाविरुध्द व्यापाऱ्याने मा.न्यायाधिकरणाकडे अपिल केले. मा.न्यायाधिकरणाने त्यांच्या पूर्वीच्या मे.इंडोकाउंट इंड या प्रकरणाच्या निर्णयाप्रमाणे व्यापाऱ्याच्या बाजुने निर्णय दिला. विभागास सदर निर्णय मान्य नसल्याने मा.न्यायाधिकरणाच्या निर्णयाविरुध्द विभागाने मा.मुंबई उच्च न्यायालयात अपिल दाखल केले आहे.

३.	मुंबई	मे. गॅल्यॅटिक फार्मा इंडिया प्रा.लि. २७५००२६१०८८व्ही	२००५-०६ & २००६-०७	५०१९५६	मान्य			लेखा परिक्षणाचे मुद्दे विचारात घेऊन सन २००५-२००६ व २००६-२००७ या वर्षाकरिता सुधारित आदेश दि.१९.१०.२०१३ रोजी पारित केले असून त्यामध्ये ज्यादा व्याजाची रक्कम कमी करण्यात आली आहे. त्याविरुध्द व्यापाऱ्याने दाखल केलेले अपिल सुनावणी साठी विक्रीकर न्यायाधिकारणाकडे प्रलंबित आहे.
४.	मुंबई	मे. मेघा रबर टेक्नॉलॉजीस प्रा.लि. २७४९०२५४५४६व्ही	२००५-०६	९४९८७	मान्य	९४९८७	९४९८७	लेखा परिक्षणाच्या मुद्यानुसार व्यापाऱ्याने रु.९४,९८७/- दि.८.१०.२०१५ रोजी भरलेले आहेत.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा सन २०१३-२०१४ चा महसूली जमा अहवाल
स्पष्टीकरणात्मक ज्ञापने

परिच्छेद क्र./पृ.क्र.	प्रारुप परिच्छेद क्र./विभाग	आक्षेप
१	२	३
२.४.३.३ १९	२८ १३-१४	**लेखापरीक्षा निष्पत्ती** **परताव्याचे संस्करण व प्रदान करण्यातील विसंगती** ठाणे विभागात दस्तऐवजांच्या चाचणी तपासणीत (ऑगस्ट २०१३) असे आढळून आले की, १९९३ च्या सामूहिक प्रोत्साहने योजनेखाली (PSI) पात्रता प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या एका व्यापाऱ्यास ११ ऑक्टोबर २००२ ते १० ऑक्टोबर २०१४ दरम्यान कर प्रदानातून रु.२.४५ कोटी कमाल मर्यादेपर्यंत सूट देण्यात आली होती. वर्ष २००५-०६ दरम्यान रु. २.४५ कोटीची कमाल मर्यादा गाठली गेली. त्यानंतर, व्यापाऱ्याने त्यानंतरच्या २००६-०७ ते २००८-०९ या कालावधीत रु.१.१६ कोटी कर प्राप्त केला व तो शासकीय कोषागारात जमा केला. परंतु ही निर्धारणे अनुक्रमे ऑक्टोबर व डिसेंबर २०१२ मध्ये अंतिम करताना निर्धारण प्राधिकाऱ्यांनी रु.१.१६ कोटी एवढया कराच्या संपूर्ण रक्कमेचा चूकीच्या पध्दतीने परतावा दिला, परिणामी रु.१.१६ कोटी परताव्याचे नियमबाहय प्रदान केले. विभागाने अभिक्षण मान्य केले. (नोव्हेंबर २०१३) आणि वसूलीसाठी सुधारात्मक कारवाईस सुरुवात करण्यात आल्याचे सांगितले याबाबतीत पुढील प्रगतीचा अहवाल प्राप्त झालेला नाही (डिसेंबर २०१४). **स्पष्टीकरणात्मक अभिप्राय.** या परिच्छेदामध्ये एका प्रकरणामध्ये तीन वेगवेगळे कालावधी आहेत. महालेखापरिक्षक यांनी घेतलेल्या आक्षेपानुसार चुकदुरुस्ती प्रक्रिया केली आहे व शासनाचा महसुल संरक्षित केलेला आहे. १)कालावधी २००६-२००७ या कालावधीकरिता व्यापाऱ्याने दि.२९.१०.२०१२ रोजीच्या निर्धारणा आदेशाविरोधात अपिल दाखल केले असून त्यासंबंधी अपिल आदेश विक्रीकर उपायुक्त-ई-००१ पालघर यांनी लेखा परिक्षण मुद्दे विचारात घेऊन पारित केलेला आहे व जादा मागणी रु.२४,९७,६७४/- इतकी आहे व सदर रक्कमेचा भरणा व्यापाऱ्याने दि.१७.०६.२०१६ रोजी केलेला आहे. २)कालावधी २००७-२००८ व २००८-२००९ मध्ये पुनर्विलोकन आदेश दि.४.१२.२०१३ रोजी पारित केलेला आहे व अतिरिक्त जमा केलेला महसूल जप्तीची कारवाई करण्यात आली व जादा मागणी २००७-२००८ करिता रु.६३,२६,९८०/- व २००८-२००९ करिता रु. ५२,५६,३०७/- इतकी केलेली आहे. त्याविरुध्द व्यापाऱ्याने दाखल केलेले प्रथम अपिल निकालात काढण्यात आलेले आहे . सदर आदेशाविरुध्द व्यापाऱ्याने न्यायाधिकरण, मुंबई येथे व्दितीय अपिल दाखल केले आहे. न्यायाधिकरणाने प्रत्येक कालावधीकरिता २० लाख रुपये स्थगिती आदेशापोटी भरणा करुन घेतला आहे. अपिले अंतिम सुनावणीसाठी न्यायाधिकरणासमोर प्रलंबित आहेत.

कॅग २०१३-१४ मधील परिच्छेद २.४.३.३ बाबतच्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांचे विवरणपत्र

अ.क्र.	विभाग	व्यापाऱ्याचे नांव व नों.दा.क्र.	कालावधी	अंतर्भूत रक्कम	मान्य/अमान्य	वाढीव मागणी	वसूली	शेरा
१	२	३	४	५	६	७	८	९
१.	पालघर	मे. नारायण पॉलीयुरेथिन इंड २७५८०२९९९४१व्ही	२००६-०७,	५३६८७१२	मान्य	२४२७६७४	२४२७६७४	या परिच्छेदामध्ये एका प्रकरणामध्ये तीन वेगवेगळे कालावधी आहेत. महालेखापाल रक्षक यांनी घेतलेल्या आक्षेपानुसार चुकदुरुस्ती प्रक्रिया केली आहे व महसुल हानी टाळलेली आहे. १)कालावधी २००६-२००७ या कालावधीकरिता व्यापाऱ्याने दि.२९.१०.२०१२ रोजीच्या निर्धारणा आदेशाविरोधात अपिल दाखल केले असून त्यासंबंधी अपिल आदेश विक्रीकर उपायुक्त-ई-००१ पालघर यांनी लेखा परिक्षण मुद्दे विचारात घेऊन पारित केलेला आहे व जादा मागणी रु.२४,९७,६७४/- इतकी आहे व सदर रक्कमेचा भरणा व्यापाऱ्याने दि.१७.०६.२०१६ रोजी केलेला आहे.
			२००७-०८ २००८-०९	३४५२६९४ ३००८७७०		६३२८९८६ ५२५६३६०		२)कालावधी २००७-२००८ व २००८-२००९ मध्ये पुनर्विलोकन आदेश दि.४.१२.२०१३ रोजी पारित केलेला आहे व अतिरिक्त जमा केलेला महसूल जप्त करण्यात आला व जादा मागणी २००७-२००८ रु.६३,२६,९८०/- व २००८-२००९ करिता रु. ५२,५६,३०७/- केलेली आहे. त्याविरुध्द व्यापाऱ्याने अपिल दाखल केलेले आहे व सदर अपिल निकाली काढण्यात आले आहे. त्याविरुध्द व्यापाऱ्याने न्यायाधिकरण, मुंबई येथे अपिल दाखल केले आहे. न्यायाधिकरणाने प्रत्येक कालावधीकरिता २० लाख रुपये स्थगिती पोटी भरणा करुन घेतला आहे. अपिले अंतिम सुनावणीसाठी न्यायाधिकरणासमोर प्रलंबित आहे.

परिच्छेद क्र./पृ.क्र.	प्रारुप परिच्छेद क्र./विभाग	आक्षेप
१	२	३
२.४.३.४ २०	२८ १३-१४	**लेखापरीक्षा निष्पत्ती** **परताव्याचे संस्करण व प्रदान करण्यातील विसंगती** MVAT अधिनियमाच्या कलम ४२(३)नुसार, २० जुन २००६ पासून, जो व्यापारी एकत्रीकृत योजने अंतर्गत एकरक्कमी कराचा भरणाकरतो त्याने आंधकाम कंत्राटाच्या प्रकरणात एकूण कंत्राटमुल्याच्या पाच टक्के दराने व इतर कंत्राटामध्ये आठ टक्के दराने कर भरावा. २० जून २००६ पूर्वी, सर्व प्रकारच्या (बांधकाम व बांधकामेतर) कंत्राटांच्या प्रकरणात कार्यकंत्राटदार एकूण कंत्राटमुल्याच्या आठ टक्के इतका प्रोत्साहनाच्या रुपात एकरक्कमी कर भरण्यास बांधील होता. MVAT अधिनियमाच्या कलम २९(१०)(ब)नुसार, कलम ६० मधील तरतूदींशी विसंगत रितीने, एखाद्या व्यक्ती अथवा व्यापाऱ्याने प्राप्त केलेली कोणतीही रक्कम राज्य शासनाकडे जमा करावी. MVAT अधिनियमाच्या कलम ६०(२) अन्वये नोंदणीकृत व्यापाऱ्याने त्यांनी केलेल्या मालाच्या कोणत्याही विक्रीवर या अधिनियमातील तरतूदींच्या अंतर्गत त्याच्याकडून देय असलेल्या कराच्या रक्कमेपेक्षा अधिक प्रमाणात, कराच्या रुपात किंवा कराऐवजी इतर कोणत्याही स्वरुपात रक्कम प्राप्त करु नये. असे आढळून आले की, ज्या एका बांधकाम कंत्राटदाराने एकत्रीकृत योजने अंतर्गत कर भरण्याचा विकल्प स्वीकारला होता त्याने २००६-०७ दरम्यान रु. १.६८ कोटीच्या विक्रीच्या उलाढालीवर सुधारणापूर्व आठ टक्के दराने रु.१३.५५ लाखाचा कर जमा कला हो ता. निर्धारीत पाच टक्के दराने रु.८.४० लाख कर प्राप्त करावयाचा होता ज्यामुळे कराचे अतिरिक्त संकलन झाले. तसेच, कंत्राटदाराने कोषागारात फक्त रु.८.४० लाखाचा भरणा केला होता. परंतु, निर्धारण अधिकाऱ्यांनी या प्रकरणात निर्धारण करताना प्राप्त केलेला अतिरिक्त कर शासकीय लेख्यात जमा करण्याऐवजी त्याचा परतावा दिला. परिणामी रु.५.१५ लाख परताव्याचे चूकीचे प्रदान झाले. **स्पष्टीकरणात्मक अभिप्राय.** या परिच्छेदात एक प्रकरण आहे. या प्रकरणामध्ये विक्रेत्याने सुरवातीला ८% दराने कर गोळा केला होता व विवरणपत्रासोबत भरला होता. परंतु खरेदीदारोन त्या कर दरास आक्षेप घेतल्याने विक्रेत्याने या व्यवहारावर काय कराचा दर असावा याबद्दल विभागाकडे स्पष्टीकरण मागितले.विभागाने सदर व्यवहारावर ५% कराचा दर लागू आहे असे स्पष्टीकरण दिले. त्यानंतर खरेदीदार व विक्रेता यांनी उधार पत्र / नावे पत्र (Debit Note /Credit Note) देवून परस्पर संमतीने खाते सुधार केला. विक्रेत्याने ५% दराने कर देयता दाखवून सुधारित विवरणपत्र दाखल केले. हया वस्तुस्थितीवरुन लक्षात येते की, व्यापाऱ्याने निर्धारणा कार्यवाही सुरु होण्यापूर्वीच कराचा दर ५% लावला होता व त्याने शासकीय तिजोरीत भरणा केलेल्या अतिरिक्त भरण्याचा परतावा मिळावा असा दावा केला होता. यावरुन असे आढळून येते की, निर्धारणा आदेश पारीत करताना सदर व्यापाऱ्याने देय करापेक्षा जास्त कर वसुल केलेला नव्हता, त्यामुळे कर रक्कम जप्त करण्याची गरज नाही. उपरोक्त बाबींचा विचार करता निर्धारणा अधिकाऱ्याने प्रदान केलेला परतावा बरोबर आहे. सबब हे अनुपालन सकारात्मकरित्या ग्राहय धरण्यात यावे.

कॅग २०१३-१४ मधील परिच्छेद २.४.३.४ बाबतच्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांचे विवरणपत्र

अ.क्र.	विभाग	व्यापाऱ्याचे नांव व नों.दा.क्र.	कालावधी	अंतर्भूत रक्कम	मान्य/अमान्य	वाढीव मागणी	वसूली	शेरा
१	२	३	४	५	६	७	८	९
१.	मुंबई	मे. डेस्कॉन २७४६०००३२८४क्की	२००६-०७	५४१२९१	अमान्य			या प्रकरणामध्ये विक्रेत्याने सुरवातीला ८% दराने कर गोळा केला होता व विवरणपत्रासोबत भरला होता. परंतु खरेदीदारोन त्या कर दरास आक्षेप घेतल्याने विक्रेत्याने या व्यवहारावर काय कराचा दर असावा याबद्दल विभागाकडे स्पष्टीकरण मागितले.विभागाने सदर व्यवहारावर ५% कराचा दर लागू आहे असे स्पष्टीकरण दिले. त्यानंतर खरेदीदार व विक्रेता यांनी उधार पत्र / नावे पत्र (Debit Note /Credit Note) देवून परस्पर संमतीने खाते सुधार केला. विक्रेत्याने ५% दराने कर देयता दाखवून सुधारित विवरणपत्र दाखल केले. हया वस्तुस्थितीवरुन लक्षात येते की, व्यापाऱ्याने निर्धारणा कार्यवाही सुरु होण्यापूर्वीच कराचा दर ५% लावला होता व त्याने शासकीय तिजोरीत भरणा केलेल्या अतिरिक्त भरण्याचा परतावा मिळावा असा दावा केला होता. यावरुन असे आढळून येते की, निर्धारणा आदेश पारीत करताना सदर व्यापाऱ्याने देय करापेक्षा जास्त कर वसुल केलेला नव्हता, त्यामुळे कर रक्कम जप्त करण्याची गरज नाही. उपरोक्त बाबींचा विचार करता निर्धारणा अधिकाऱ्याने प्रदान केलेला परतावा बरोबर आहे. सबब हे अनुपालन सकारात्मकरित्या ग्राहय धरण्यात यावे.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा सन २०१३-२०१४ चा महसूली जमा अहवाल
स्पष्टीकरणात्मक ज्ञापने

परिच्छेद क्र./पृ.क्र.	प्रारुप परिच्छेद क्र./विभाग	आक्षेप
१	२	३
२.४.३.५ २०	२८ १३-१४	**लेखापरीक्षा निष्पत्ती** **परताव्याचे संस्करण व प्रदान करण्यातील विसंगती** MVAT अधिनियमाच्या कलम ४५ मधील तरतूदीनुसार जर उप कंत्राटदाराकडून कराचा भरणा करण्यात आला आहे याविषयी जर मुळ कंत्राटदाराने विक्रीकर आयुक्तांचे समाधान केले तर मुळ कंत्राटदार त्याच व्यवहारासंबंधी कर भरण्यास जबाबदार नसते. MVAT नियमांतील नियम ५० मधील तरतूदींनुसार उपकंत्राटदाराच्या विक्रीची उलाढाल व त्याने भरलेला VAT यासंबंधी प्रपत्र ४०७ मध्येएक प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असते. पुणे विभागातील दस्तऐवजांची चाचणी तपासणी केली असता (फेब्रवारी २०१४) असे आढळून आले की, बांधकाम व्यवसायातील एका मूळ कंत्राटदाराला २००९-१० कालावधीसाठी उपकंत्राटदाराने जारी केलेल्या प्रपत्र ४०७ प्रित्यर्थ रु.१६.६० कोटी मुल्याच्या उपकंत्राटासाठी वजावट देण्यात आली होती. उपकंत्राटदाराच्या दस्तऐवजांबरोबर प्रती पडताळणी केली असता असे आढळून आले की, त्याने रु.१६.६० कोटी मुल्याचे काम पूर्ण केले होते, ज्यामध्ये रु.७९.०७ लाख VAT अंतर्भुत होता. अशाप्रकारे, मुळ कंत्राटदाराला फक्त रु.१५.८१ कोटी वजावट ग्राहय होती. रु.७९.०७ लाख चुकीची वजावट देण्यात आल्यामुळे रु.३.९५ लाख कराची कमी आकारणी झाली. **स्पष्टीकरणात्मक अभिप्राय.** या परिच्छेदामध्ये एक प्रकरण समाविष्ट आहे. महालेखापरिक्षक यांनी घेतलेल्या लेखा परिक्षण मुद्दयानुसार कंत्राटदाराने नमुना ४०७ वर घेतलेली वजावट चुकीची आहे असा आक्षेप असून त्यावर दुरुस्ती आदेश पारीत करुन महसुल सुरक्षित केला आहे. दि. ६.१२.२०१४ रोजी मुल्यवर्धित कर कायदा कलम २४ नुसार सुधारित आदेश पारित करुन रु.५,७०,११५/- इतकी अतिरिक्त रक्कमेची मागणी केलेली आहे. व्यापाऱ्याने या दुरुस्ती आदेशाविरुध्द प्रथम अपिल दाखल केले असून व्यापाऱ्याला रु.८५०००/- इतक्या रक्कमेचा अंशत: भरणा केल्यावर अंतिम स्थगिती आदेश विक्रीकर सहआयुक्त (अपिले-१), पुणे यांचे कार्यालयाने दिलेला आहे व अपिल सुनावणीसाठी प्रलंबित आहे.

कॅग २०१३-१४ मधील परिच्छेद २.४.३.५ बाबतच्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांचे विवरणपत्र

अ.क्र.	विभाग	व्यापाऱ्याचे नांव व नों.दा.क्र.	कालावधी	अंतर्भूत रक्कम	मान्य/अमान्य	वाढीव मागणी	वसूली	शेरा
१	२	३	४	५	६	७	८	९
१.	पुणे	मे. पंचशील इफ्रास्टक्चर प्रा.लि. २७७२०७००३९६६व्ही	२००९-१०	३९५०००	मान्य	५७०११४		या परिच्छेदामध्ये एक प्रकरण समाविष्ट आहे. महालेखापरिक्षक यांनी घेतलेल्या लेखा परिक्षण मुद्दयानुसार कंत्राटदाराने नमुना ४०७ वर घेतलेली वजावट चुकीची आहे असा आक्षेप असून त्यावर दुरुस्ती आदेश पारीत करुन महसुल सुरक्षित केला आहे.दि. ६.१२.२०१४ रोजी मुल्यवर्धित कर कायदा कलम २४ नुसार सुधारित आदेश पारित करुन रु.५,७०,११५/- इतकी अतिरिक्त रक्कमेची मागणी केलेली आहे. व्यापाऱ्याने या दुरुस्ती आदेशाविरुध्द प्रथम अपिल दाखल केले असून व्यापाऱ्याला रु.८५०००/- इतक्या रक्कमेचा अंशत: भरणा केल्यावर अंतिम स्थगिती आदेश विक्रीकर सहआयुक्त (अपिले-१), पुणे यांचे कार्यालयाने दिलेला आहे व अपिल सुनावणीसाठी प्रलंबित आहे.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा सन २०१३-२०१४ चा महसूली जमा अहवाल
स्पष्टीकरणात्मक ज्ञापने

परिच्छेद क्र./पृ.क्र.	प्रारुप परिच्छेद क्र./विभाग	आक्षेप
१	२	३
२.४.४/ २.४.४.१ २०/२१	२८ १३-१४	**अतिरिक्त कर वजावटी (set-off) चे प्रदान** MVAT नियमाच्या नियम ५३(४) नुसार २० जून २००६ पासून ज्या बांधकाम कंत्राटदाराने तडजोड योजनेचा विकल्प स्विकारला आहे त्याला त्याच्या भांडवली मालाव्यतिरिक्त इतर मालाच्या खरेदी किंमतीच्या चार टक्के रक्कम वजा केल्यावर उर्वरीत किंमतीवर वजावट (set-off) ग्राहय असतो. पुणे विभागातील दस्तऐवजांच्या चाचणी तपासणीमध्ये (फेब्रुवारी २०१४) असे आढळून आले की, एका उप कंत्राटदाराने २००८-०९ या कालावधीत रु.११.०४ कोटी विक्री उलाढालीवर तडजोडी योजनेअंतर्गत VAT प्रदान केला होता. कंत्राटदाराने या व्यवहारासंबंधी रु.६.६५ कोटीची खरेदी केल्याचे दर्शविले होते. परंतु, निर्धारण प्राधिकाऱ्यांनी फक्त रु.३.११ कोटी खरेदी झाली असल्याचे निर्धारीत केले होते. खरेदीचे कमी निर्धारण झाल्यामुळे set-off रु.२६.६१ लाख ऐवजी रु.१२.४४ ने कमी करण्यात आला. परिणामी, चुकीच्या set-off च्या अनुषंगाने रु.१४.१६ लाख अतिरिक्त परतावा देण्यात आला. MVAT अधिनियमाच्या अंतर्गत रु.१.७० लाख व्याज भरण्यास देखिल व्यापारी बांधील होता. **स्पष्टीकरणात्मक अभिप्राय.** कार्यकंत्राट प्रकरणामध्ये व्यापारी आपसमेळ पध्दतीने किंवा नियम ५८ अन्वये कार्यकंत्राट कामामध्ये प्रत्यक्षरित्या वापरलेल्या मालाच्या प्रत्यक्ष खरेदी दरानुसार विक्रीवर कर आकारुन करदेयता भरण्याची सवलत व्यापाऱ्यास उपलब्ध आहे. त्यानुसार प्रस्तृत प्रकरणात आपसमेळ पध्दतीने करदेयतेचा विकल्प व्यापाऱ्याने घेतला होता. निर्धारणेवेळी कार्यकंत्राट कामकाजामध्ये प्रत्यक्ष वापरल्या गेलेल्या खरेदी मालाची ओळख पटवून नियम ५३ (४) अन्वये लागू असलेली कर वजावट करण्यात आली आहे व उर्वरित रक्कमेची नियम ५२ अन्वये देय कर वजावट व्यापाऱ्यास देण्यात आली. सबब प्रस्तृत प्रकरणात व्यापाऱ्यास कर वजावट (Set-off) नियमाप्रमाणे देण्यात आली असून जास्तीची कर वजावट देण्यात आलेली नाही.

कॅग २०१३-१४ मधील परिच्छेद २.४.४.१ बाबतच्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांचे विवरणपत्र

अ.क्र.	विभाग	व्यापाऱ्याचे नांव व नों.दा.क्र.	कालावधी	अंतर्भूत रक्कम	मान्य/अमान्य	वाढीव मागणी	वसूली	शेरा
१	२	३	४	५	६	७	८	९
१.	पुणे	मे. व्हीपीजी इलेक्ट्रीकल्स प्रा.लि. २७२६०६५७०७७व्ही	२००८-०९	१५८६२५४				कार्यकंत्राट प्रकरणामध्ये व्यापारी आपसमेळ पध्दतीने किंवा नियम ५८ अन्वये कार्यकंत्राट कामामध्ये प्रत्यक्षरित्या वापरलेल्या मालाच्या प्रत्यक्ष खरेदी दरानुसार विक्रीवर कर आकारुन करदेयता भरण्याची सवलत व्यापाऱ्यास उपलब्ध आहे. त्यानुसार प्रस्तृत प्रकरणात आपसमेळ पध्दतीने करदेयतेचा विकल्प व्यापाऱ्याने घेतला होता. निर्धारणेवेळी कार्यकंत्राट कामकाजामध्ये प्रत्यक्ष वापरल्या गेलेल्या खरेदी मालाची ओळख पटवून नियम ५३ (४) अन्वये लागू असलेली कर वजावट करण्यात आली आहे व उर्वरित रक्कमेची नियम ५२ अन्वये देय कर वजावट व्यापाऱ्यास देण्यात आली. सबब प्रस्तृत प्रकरणात व्यापाऱ्यास कर वजावट (Set-off) नियमाप्रमाणे देण्यात आली असून जास्तीची कर वजावट देण्यात आलेली नाही.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा सन २०१३-२०१४ चा महसूली जमा अहवाल
स्पष्टीकरणात्मक ज्ञापने

<table>
<tr><th>परिच्छेद क्र./पृ.क्र.</th><th>प्रारुप परिच्छेद क्र./विभाग</th><th>आक्षेप</th></tr>
<tr><td>१</td><td>२</td><td>३</td></tr>
<tr><td>२.४.४.२
२१</td><td>२८
१३-१४</td><td>

अतिरिक्तset-off चे प्रदान

MVAT नियमाच्या नियम ५३(४) नुसार जर एखादया व्यापाऱ्याने विक्रीव्यवतिरिक्त अन्य काही कारणाने राज्याबाहेर भारतातील कोणत्याही ठिकाणी त्याच्या व्यवसायाच्या स्थानावर किंवा त्याच्या एजंटकडे (शाखा हस्तांतरण) करपात्र माल पाठवला तर त्या अनुषंगीक करपात्र खरेदीवर, २००६-०७ दरम्यान चार टक्के दराने व २००७-०८ दरम्यान तीन टक्के दराने, व्यापाऱ्याला देय असलेल्या set-of च्या रक्कमेतून set-off वजा करावा.

औरंगाबाद व मुंबई विभागातील निर्धारण दस्तऐवजांच्या चाचणी तपासणी दरम्यान (जुलै २०१३ व मार्च २०१४) असे आढळून आले की, दोन व्यापाऱ्यांनी वर्ष २००६-०७ व २००७-०८ दरम्यान राज्याबाहेरील त्यांच्या शाखांना केलेल्या मालाच्या हस्तांतरणास नियम ५३(३) मधील तरतूदीनुसार वजा करणे आवश्यक असूनही तसे न करता संपूर्ण set-off देण्यात आला होता. परिणामी, तक्ता २.४.४.२ मध्ये दर्शविल्याप्रमाणे रु.८.६४ लाख अतिरिक्त परतावा देण्यात आला.

तक्ता २.४.४.२

विभाग	कालावधी	शाखा हस्तांतरण (रु.कोटीत)	शाखेला हस्तांतरीत केलेल्या मालाची खरेदी किंमत (रु.कोटीत)	CST अधिनियमाच्या अंतर्गत अधिसूचीत केलेला वजावटीचा दर (टक्के)	वजावट केलेली रक्कम अतिरिक्तset-off (रु.लाखात)
औरंगाबाद	२००६-०७	१.६५	१.५५	४	६.२०
	२००७-०८	०.७६	०.६९	३	२.०८
मुंबई	२००६-०७	०.१२	०.०९	४	०.३६
एकूण					**८.६४**

स्पष्टीकरणात्मक अभिप्राय.

या परिच्छेदामध्ये दोन प्रकरणे आहेत. सदर दोन्ही प्रकरणांमध्ये सुधारीत आदेश पारीत करुन मंजूर केलेली अतिरिक्त वजावटीमुळे होणारी संभाव्य महसुल हानी सुरक्षित केली आहे. एका प्रकरणामध्ये सुधारित आदेशानुसार व्यापाऱ्याने संपूर्ण रक्कम रु. ६८,०४९/- दि. १३.८.२०१५ रोजी सरकारी तिजोरीत भरलेली आहे. दुसऱ्या प्रकरणामध्ये दोन कालावधीकरिता पुनर्विलोकन आदेश दि.३१.३.२०१६ रोजी पारीत केले असून रु.२,३३,५८७/- व रु.१४,२५,५६५/- अनुक्रमे सन २००६-२००७ व २००७-२००८ करिता एवढया रक्कमेची मागणी नोटीसा दि.०८.०६.२०१६ रोजी व्यापाऱ्यावर बजावण्यात आलेल्या असून शासनाचा महसुल संरक्षित करण्यात आला आहे.

</td></tr>
</table>

कॅग २०१३-१४ मधील परिच्छेद २.४.४.२ बाबतच्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांचे विवरणपत्र

अ.क्र.	विभाग	व्यापाऱ्याचे नांव व नों.दा.क्र.	कालावधी	अंतर्भूत रक्कम	मान्य/ अमान्य	वाढीव मागणी	वसूली	शेरा
१	२	३	४	५	६	७	८	९
१.	मुंबई	मे. रोहिदास ॲरोमॅटिक्स २७३७०५२३५९३व्ही	२००६-०७	३७६०७	मान्य	६८०४९	६८०४९	सुधारित आदेश कलम २४ नुसार पारीत केला आहे. व्यापाऱ्याने सदर आदेशान्वये देय असलेली जादा मागणी रु.६८,०४९/- इतकी असून तीचा भरणा दि.१३.८.२०१५ रोजी करण्यात आला आहे.
२.	औरंगाबाद	मे. मनजीत ऑईल प्रॉडक्टस २७०२०३४१०८६व्ही	२००६-०७ २००७-०८	६१९६९२ २०८१०४	मान्य	२३३५८७ १४२५५६५		पुनर्विलोकन आदेश दि.३१.३.२०१६ रोजी पारीत केले असून रु.२,३३,५८७/- व रु.१४,२५,५६५/- अनुक्रमे सन २००६-२००७ व २००७-२००८ करिता एवढया रक्कमेची मागणी नोटीसा दि.०८.०६.२०१६ रोजी व्यापाऱ्यावर बजावण्यात आलेल्या असून शासनाचा महसुल संरक्षित करण्यात आला आहे.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा सन २०१३-२०१४ चा महसूली जमा अहवाल
स्पष्टीकरणात्मक ज्ञापने

परिच्छेद क्र./पृ.क्र.	प्रारुप परिच्छेद क्र./विभाग	आक्षेप
१	२	३
२.४.५ २१-२२	२८ १३-१४	**कार्य कंत्राटाखाली अग्राहय वजावट देणे** MVAT अधिनियमाच्या कलम ४२(३) नुसार, जर कंत्राटदाराने एकत्रीकृत योजनेचा विकल्प स्विकारला असेल तर त्याने नोंदणीकृत उप कंत्राटदाराला दिलेल्या मालासंबंधी देय असलेलया रक्कमे व्यतिरिक्त इतर कोणत्याही रक्कमवेर त्याला कोणत्याही प्रकारची वजावट देण्यात येऊ नये. मुंबई, नाशिक व पुणे विभागातील २००६-०७ ते २००८-०९ या कालावधीच्या निर्धारणाच्या दस्तऐवजांची चाचणी तपासणी केली असता (सप्टेंबर २०१३ ते मार्च २०१४) असे आढळून आले की, ज्या सहा व्यापाऱ्यांनी कर प्रदानासाठी एकत्रीकृत योजनेच्या विकल्प स्विकारला होता, त्यांना विक्री किंमत व सेवा कर यामध्ये अंतर्भुत असलेल्या करासाठी वजावट ग्राहय नसतानाही, रु.९४.९१ लाख अग्राहय वजावट देण्यात आली होती. परिणामी, रु.६.४९ लाखाचा अतिरिक्त परतावा ही दिला गेला. **स्पष्टीकरणात्मक अभिप्राय.** एकूण सहा प्रकरणे या परिच्छेदामध्ये चर्चित करण्यात आली आहे. मा.महालेखापरिक्षक यांनी मुळ कर व सेवा कर या रक्कमेची अयोग्य वजावट या विषयी मुद्दा उपस्थित केला आहे. दोन प्रकरणामध्ये सुधारीत कार्यवाही पूर्ण करण्यात आलेली आहे. व्यापाऱ्याने सुधारीत कार्यवाही प्रमाणे रक्कमेचा भरणा केला आहे. उर्वरित ४ प्रकरणांमध्ये महसुल सुरक्षित करण्यासाठी सुधारीत कार्यवाही सुरु आहे. प्रकरणनिहाय तपशील सोबत जोडलेला आहे.

कॅग २०१३-१४ मधील परिच्छेद २.४.४.५ बाबतच्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांचे विवरणपत्र

अ.क्र.	विभाग	व्यापाऱ्याचे नांव व नों.दा.क्र.	कालावधी	अंतर्भूत रक्कम	मान्य/अमान्य	वाढीव मागणी	वसूली	शेरा
१	२	३	४	५	६	७	८	९
१.	मुंबई	मे. ओम श्री एंटरप्रायझेस २७३२०५०८२४६व्ही	२००८-०९	१०४२७	अमान्य	१३६७७	१३६७७	लेखा आक्षेपाच्या अनुषंगाने कलम २५ अन्वये दि. ६.९.२०१४ रोजी पुर्नविलोकन आदेश पारीत करण्यात आला आहे. व्यापाऱ्याने सदर आदेशान्वये देय रक्कम रु.१३,६७७/- चा भरणा केला आहे .
२.	मुंबई	मे. कॉन्टीनेंटल डिझायनर २७५६००४७०७३व्ही	२००७-०८	२९७९०	अमान्य			लेखा आक्षेपाच्या अनुषंगाने सुधारीत कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.
३.	पुणे	मे. टी.जी.धामाणी २७६७०२८०५४०व्ही	२००६-०७ & २००७-०८	२१७८८४	अमान्य			लेखा आक्षेपाच्या अनुषंगाने सुधारीत कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.
४.	पुणे	मे. ओशो ॲल्युमिनियम २७८६०२१८९८६व्ही	२००७-०८	१३२०५	मान्य	२५२३६/-	२५२३६/-	लेखा आक्षेपाच्या अनुषंगाने कलम २५ अन्वये दि.२१.५.२०१४ रोजी पुर्नविलोकन आदेश पारीत करण्यात आला आहे. व्यापाऱ्याने सदर आदेशान्वये देय रक्कम रु.२५,२३६/-चा भरणा केला आहे.
५.	पुणे	मे. टी.जी.धामाणी २७६७०२८०५४०व्ही	२००८-०९	३६०५२२	अमान्य			लेखा आक्षेपाच्या अनुषंगाने सुधारीत कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.
६.	नाशिक	मे. आनंद कंस्ट्रक्शन २७४५०५०९७७५व्ही	२००८-०९	१७३७५	अमान्य			लेखा आक्षेपाच्या अनुषंगाने सुधारीत कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा सन २०१३-२०१४ चा महसूली जमा अहवाल
स्पष्टीकरणात्मक ज्ञापने

परिच्छेद क्र./पृ.क्र.	प्रारुप परिच्छेद क्र./विभाग	आक्षेप
१	२	३
२.४.६ २२	२८ १३-१४	**कर प्रदानात अतिरिक्त मुदतवाढ मिळणे** MVAT अधिनियमाच्या कलम ९२(१) नुसार, पात्रता प्रमाणपत्र (EC) प्राप्त झालेला कोणताही पात्र घटक, राज्य शासनाने विहित केलेल्या त्याच्या वार्षिक उत्पादन क्षमतेपेक्षा अधिक प्रमाणात केलेल्या उत्पादनासाठी निर्धारित वर्षानंतरच्या कोणत्याही वर्षासाठी लाभ प्राप्त करण्यास पात्र नसतो. नाशिक विभागातील RRA दस्तऐवजांच्या चाचणी तपासणीत ((डिसेंबर २०१३) असे आढळून आले की, मार्च २०१३ मध्ये अंतिम केलेल्या एका प्रकरणात एका व्यापाऱ्यास ११ जानेवारी २००२ ते १० जानेवारी २००७ या कालावधीत ४६.२७ कोटी लिटर कमाल मर्यादेपर्यंत अल्कोहोल, विपकृत स्पिरिट इत्यादीचे उत्पादन करण्यासाठी महाराष्ट्र राज्य औदयोगिक व गुंतवणूक महामंडळ लिमिटेड (SICOMलिमिटेड) यांनी E.C. जारी केले होते. सदर व्यापारी २००५-०६ कालावधीसाठी १५० लाख लिटर कमाल मर्यादेपर्यंत कर प्रदान विलंबाने करण्यास पात्र होता. परंतु निर्धारण अंतिम करताना, निर्धारण प्राधिकाऱ्यांनी १९३.९३ लाख लिटर पर्यंत कर विलंबाने भरण्याचा लाभ दिला. ४३.९३ लाख लिटर इतक्या अतिरिक्त मर्यादेपर्यंत कर प्रदान विलंबाने करण्यास मंजूरी दिल्यामुळे रु.२.१२ कोटी अतिरिक्त परतावा दिला गेला. पुढे, असेही आढळून आले की, २००६-०७ नंतरच्या कालावधीची निर्धारणे प्रलंबित होती. ही निर्धारणे पूर्ण करताना सदर कमाल मर्यादा लक्षात घेणे आवश्यक आहे. **स्पष्टीकरणात्मक अभिप्राय.** या परिच्छेदामध्ये एक प्रकरण चर्चेसाठी घेण्यात आलेले आहे. मा. महालेखापरिक्षक यांनी , सदर प्रकरणामध्ये अयोग्य कर रक्कमेच्या डेफरमेंट मुळे अतिरिक्त परतावा देण्यात आल्याचा मुद्दा उपस्थित केला आहे. सदर आक्षेपाच्या अनुषंगाने असे सादर करण्यात येते की, उद्योग सहसंचालक, नाशिक विभाग, नाशिक यांनी पात्रता प्रमाणपत्रासाठी सुधारित आदेश (ADDENDA-III) दि.२३.०९.२०१५ रोजी पूर्वलक्षी प्रभावाने (सन २००२ पासून पुढे) पारित केला आहे. सदर आदेशान्वये व्यापाऱ्यास कर सवलतीकरिता (डेफरमेंट) पात्र उत्पादन क्षमता ही १५० लाख लिटर वरुन ३०० लाख लिटर एवढी वाढवण्यात आली आहे. त्यामुळे अतिरिक्त उत्पादन हे पात्रता प्रमाणपत्रामध्ये विहित उत्पादन क्षमतेपेक्षा कमी आहे. वास्तव सदर प्रकरणी अतिरिक्त परतावा प्रदान करण्यात आलेला नाही.

कॅग २०१३-१४ मधील परिच्छेद २.४.६ बाबतच्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांचे विवरणपत्र

अ.क्र.	विभाग	व्यापाऱ्याचे नांव व नों.दा.क्र.	कालावधी	अंतर्भूत रक्कम	मान्य/अमान्य	वाढीव मागणी	वसूली	शेरा
१	२	३	४	५	६	७	८	९
१.	नाशिक	मे. सागर इंड अँड डिस्टीलरीज २७४३०३६०५०३व्ही	२००५-०६	२१२१९८४	अमान्य	१४१६१५५७		सदर प्रकरणामध्ये अयोग्य कर रक्कमेच्या डेफरमेंट मुळे अतिरिक्त परतावा देण्यात आल्याचा मुद्दा उपस्थित केला आहे. सदर आक्षेपाच्या अनुषंगाने असे सादर करण्यात येते की, उद्योग सहसंचालक, नाशिक विभाग, नाशिक यांनी पात्रता प्रमाणपत्रासाठी सुधारित आदेश (ADDENDA-III) दि.२३.०९.२०१५ रोजी पूर्वलक्षी प्रभावाने (सन २००२ पासून पुढे) पारित केला आहे. सदर आदेशान्वये व्यापाऱ्यास कर सवलतीकरिता (डेफरमेंट) पात्र उत्पादन क्षमता ही १५० लाख लिटर वरुन ३०० लाख लिटर एवढी वाढवण्यात आली आहे. त्यामुळे अतिरिक्त उत्पादन हे पात्रता प्रमाणपत्रामध्ये विहित उत्पादन क्षमतेपेक्षा कमी आहे. यास्तव सदर प्रकरणी अतिरिक्त परतावा प्रदान करण्यात आलेला नाही.

परिच्छेद क्र./पृ.क्र.	प्रारुप परिच्छेद क्र./विभाग	आक्षेप
१	२	३
२.४.७.१ २२	२८ १३-१४	**कराच्या चुकीच्या दराचा अवलंब करणे** MVAT अधिनियमाच्या तरतुदीनुसार ज्या वस्तू MVAT अधिनियमाच्या अनुसूची अ,ब,क व ड यामध्ये समाविष्ट नसतात त्या अधिनियमाच्या अनुसूची इ च्या नोंद १ मध्ये समाविष्ट असतील आणि त्यावर १२.५ टक्के दराने कर आकारणीय असेल. १ मे २००५ पासून 'micronutrients fertilizer' हे उत्पादन क-३४ या अनुसूचीच्या नोंदीमध्ये नव्याने दाखल करण्यात आले आणि चार टक्के दराने करपात्र होते. याआधी हे उत्पादन इतर कोणत्याही अनुसूचीमध्ये समाविष्ट नव्हते व ते १२.५ टक्के दराने करपात्र होते. पुणे विभागातील दस्तऐवजांच्या चाचणी तपासणीत असे आढळून आले की 'micronutrients fertilizer' च्या उत्पादकाने एप्रिल २००५ मध्ये केलेल्या रु.८४.५८ कोटी विक्रीवर चार टक्के दराने कर अकारण्यात आला होता. एप्रिल २००५ मध्ये सदर उत्पादन अनुसूचीत कोठेही समाविष्ट नसल्याने त्यावर १२.५ टक्के दराने कर आकारणे आवश्यक होते. कमी दराने कर आकारल्यामुळे रु.७.१९ लाख कराची कमी आकारणी झाली. **स्पष्टीकरणात्मक अभिप्राय.** या परिच्छेदामध्ये एक प्रकरण चर्चिले आहे ज्यात मा. महालेखापरिक्षक यांनी आक्षेप उपस्थित केला आहे की, '' सूक्ष्मपोषकघटकयुक्त खत'' (Micronutrient Fertilizers) यावर दि.०१.०४.२००५ ते ३०.०४.२००५ या कालावधीकरिता कराचा दर हा ४ टक्के ऐवजी १२.५ टक्के असा असावयास हवा. सदर आक्षेपाच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, दिनांक ०४/१०/२००५ रोजीचा शासन निर्णय व त्या अनुषंगाने विक्रीकर आयुक्त यांचे व्यापारी परिपत्रक (Trade Circular) क्र. ३४ टी दि. २६/१०/२००५ प्रस्तृत करण्यात आले. तद्नुसार ज्या व्यापा—यांनी दिनांक ०१/०४/२००५ ते ३०/०४/२००५ या कालावधीमध्ये निर्धारीत दराने (१२.५%) कर वसूल केला नसेल त्यांना प्रशासकीय सवलत देण्यात आली होती. या प्रकरणांत व्यापा—याने सदर कालावधीत सूक्ष्मपोषकघटकयुक्त खताचे विक्रीवर ४% कर गोळा केला असल्याने केलेली कर निर्धारणा योग्य दराने केलेली आहे. सबब प्रस्तृत प्रकरणात पारीत केलेला निर्धारणा आदेश योग्य आहे.

कॅग २०१३-१४ मधील परिच्छेद २.४.७.१ बाबतच्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांचे विवरणपत्र

अ.क्र.	विभाग	व्यापाऱ्याचे नांव व नों.दा.क्र.	कालावधी	अंतर्भूत रक्कम	मान्य/ अमान्य	वाढीव मागणी	वसूली	शेरा
१	२	३	४	५	६	७	८	९
५.	पुणे	मे. ग्रॅनाईट कॉर्पो. २७३००३५१९९०व्ही	२००६-०७	१७७०७८०	अमान्य			हे प्रकरण पुनर्विलोकनासाठी घेण्यात आले असून पुढील कार्यवाही सुरु आहे.
६.	नाशिक	मे. कागज पॅकेजिंग २७०६०३३६११८०व्ही	२००८-०९	१०७०१५	अमान्य			विदेशी खरेदीदाराच्या परचेस ऑर्डर व अन्य तपशील प्राप्त करुन ,पडताळणी केली असून अभिलेखावर ठेवण्यात आलेला आहे.
७.	औरंगाबाद	मे. सोमानी जिनिंग ॲंड प्रेसिंग २७१६०३७०९८२व्ही	२००५-०६	६५२३१	अमान्य			लेखा आक्षेपांच्या अनुषंगाने पुनर्विलोकन आदेश दि.२०.६.२०१६ रोजी पारीत करण्यात आला.
८.	मुंबई	मे. युरोपॅक मशिनस् व्ही	२००५-०६	९१३७५	अमान्य			विदेशी खरेदीदाराच्या परचेस ऑर्डर व अन्य तपशील प्राप्त करुन ,पडताळणी केली असून अभिलेखावर ठेवण्यात आलेला आहे.
९.	मुंबई	मे. प्रोसेज युनिल प्रा.लि. व्ही	२००८-०९	६०६१४	अमान्य			विदेशी खरेदीदाराच्या परचेस ऑर्डर व अन्य तपशील प्राप्त करुन ,पडताळणी केली असून अभिलेखावर ठेवण्यात आलेला आहे.
१०.	मुंबई	मे. सेफ्टी व्ही	२००७-०८	१०५०८३	अमान्य			विदेशी खरेदीदाराच्या परचेस ऑर्डर व अन्य तपशील प्राप्त करुन ,पडताळणी केली असून अभिलेखावर ठेवण्यात आलेला आहे.
११.	ठाणे	मे. लिब्रा इंडस्ट्रिज व्ही	२००९-१०	९५१६८०	अमान्य			विदेशी खरेदीदाराच्या परचेस ऑर्डर व अन्य तपशील प्राप्त करुन ,पडताळणी केली असून अभिलेखावर ठेवण्यात आलेला आहे.

परिच्छेद क्र./पृ.क्र.	प्रारुप परिच्छेद क्र./विभाग	आक्षेप
१	२	३
२.४.११ २६/२७	२८ १३-१४	**व्यापाऱ्यांची नोंदणी करताना परतावा व परतावा लेखापरीक्षा शाखेमध्ये उपलब्ध असलेल्या माहितीचा वापर न करणे.** MVAT अधिनियमाच्या कलम ३ नुसार, रु.५ लाख किंवा अधिक वार्षिक उलाढाल असलेला प्रत्येक व्यापारी कर भरण्यास पात्र असतो. MVAT अधिनियमातील तरतुदीनुसार त्याने नोंदणीचे वैध प्रमाणपत्र प्राप्त करणेही आवश्यक असते. MVAT अधिनियमाच्या कलम ६६(२) नुसार, सर्वेक्षणासाठी , आयुक्त सर्वसाधारण किंवा विशेष सूचनेव्दारे, एखादया व्यापाऱ्याकडून किंवा व्यापाऱ्याच्यां प्रवर्गाकडून अशा व्यक्ती किंवा व्यापाऱ्यांची नावे, पत्ते व इतर आवश्यक तपशील मागवू शकतात, ज्या व्यक्ती किंवा व्यापाऱ्यांनी अशा व्यापारी किंवा प्रवर्गाकडून सदर कालावधीत एखादा माल विकत घेतलेला असतो किंवा त्यांना माल विकला असतो. मुंबई, नाशिक, पुणे व ठाणे विभागातील RRA शाखेतील दस्तऐवजांच्या चाचणी तपासणीत असे आढळून आले की, २०८ प्रकरणात, व्यापाऱ्यांनी २००५-०६ ते २०१०-११ मधील वेगवेगळया कालावधीत त्यांच्या विवरणात/खरेदी पत्रात/प्रपत्र ७०४ मध्ये नोंदणी न झालेल्या व्यापाऱ्यांकडून एकूण रु.११९.४३ कोटीची खरेदी केल्याचे दर्शविले होते. जरी प्रत्येक व्यापाऱ्याकडून रु. पाच लाखापेक्षा अधिक रक्कमेएवढी खरेदी करण्यात आली होती तरी या अनोंदणीकृत व्यापाऱ्यांची नांवे, पत्ते व इतर माहिती प्राप्त करण्यासाठी सर्वेक्षण शाखेने कोणतेही प्रयत्न केले नव्हते. त्यांच्या नोंदणीसाठी पुढील तपासाकरीता सर्वेक्षण शाखेबरोबर संबंधित RRA शाखेने संपर्कही साधला नव्हता. परिणामी, या अनोंदणीकृत व्यापाऱ्यांनी कर बुडवला असल्याची शक्यता नाकारता येत नाही. हे निदर्शनास आणून दिल्यावर विभागाने वस्तुस्थिती पडताळल्यावर सुधारात्मक कारवाई केली जाईल असे सांगितले. परंतु, RRA शाखा व सर्वेक्षण शाखा यामध्ये व्यापाऱ्यांच्या उलाढालीच्या माहितीची देवाण घेवाण होऊन हे नोंदणी न झालेले व्यापारी कराच्या कक्षेत आणता येतील यासाठी विभागाने कोणतीही यंत्रणा योजलेली नव्हती ही वस्तुस्थिती कायम राहते. जुलै २०१४ मध्ये प्रारुप परिच्छेद विभाग/शासनाला पाठविण्यात आला. त्यांचे उत्तर प्राप्त झालेले नाही (डिसेंबर २०१४) **स्पष्टीकरणात्मक अभिप्राय.** या परिच्छेदात एकूण २०८ प्रकरणांचा उल्लेख असून प्रत्यक्षात २०७ प्रकरणे समाविष्ट आहेत. १)अनोंदीत व्यापारी शोधणे व त्यांना महाराष्ट्र मुल्यवर्धित कर कायद्याअंतर्गत नोंदणी करुन करजाळयात आणणे ही विभागामध्ये निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. २)आर्थिक बुध्दीमत्ता कक्ष, महाविकास तसेच नुकतीच अंमलात आणलेली सॅप प्रणाली यांच्या सहाय्याने वि्क्रीकर विभागाने विविध व्यावसायिक बुध्दीमत्ता माहिती प्रणाली विकसित केल्या आहेत. ज्यायोगे अनोंदीत व्यापारी शोधता येतील. विविध संस्थाकडून, विभागाकडून आणि तसेच नोंदीत व्यापाऱ्यांनी अपलोड केलेल्या माहितीचा सुध्दा अनोंदीत व्यापारी शोधण्यासाठी उपयोग केला जात आहे. ३)महालेखापरिक्षक यांनी आक्षेप घेतलेल्या २०७ प्रकरणांपैकी १८९ प्रकरणांचे अनुपालन या ज्ञापनात करण्यात आले आहेत. काही व्यापारी फक्त जॉब वर्क करतात, काहीजणांनी त्यांच्या शेवटच्या उपलब्ध पत्याची जागा सोडलेली आहे व त्यांचा ठावठिकाणा लागत नाही. बहुतांश प्रकरणात व्यापाऱ्यांची खरेदी/विक्रीची उलाढाल पात्रता मर्यादेच्या आत (रु.पांच लाखापेक्षा कमी) असल्याने नोंदणी घेण्याचे उत्तरदायित्व त्यांच्यावर नाही. प्रकरणनिहाय अनुपालन सोबत जोडले आहे.

कॅग २०१३-१४ मधील परिच्छेद २.४.११ बाबतच्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांचे विवरणपत्र

अ.क्र.	विभाग	व्यापाऱ्याचे नांव व नों.दा.क्र.	कालावधी	अंतर्भूत रक्कम (अनोंदीत व्यापाऱ्यांकडील खरेदी)
१.	मुंबई	मे.अलफ्रीड सी टॉफर (इ)प्रा.लि., २७६४०३८७५९६व्ही	२००६-०७	२५०४६५३०
२.	मुंबई	मे.अलफ्रीड सी टॉईफर (इ)प्रा.लि.,२७६४०३८७५९६व्ही	२००७-०८	४१८७८४७३
३.	मुंबई	मे. खंडेलवाल लॅबोरेटरीज प्रा.लि.,२७२४०००३८९०व्ही	२००५-०६	८०००००
४.	मुंबई	मे. टायटन ऑरगॅनिक प्रा.लि.,२७८८०००१११३व्ही	२००८-०९	१९१८७४८
५.	मुंबई	मे. धंटेक्स पॉली प्रा.लि.,२७०७०२६३०२२व्ही	२००६-०७	९८१०५८
६.	मुंबई	मे. धंटेक्स पॉली प्रा.लि.,२७२४०३४६००९व्ही	२००७-०८	२१३५१६२
७.	मुंबई	मे. गुलजार आएनसी.कॉर्पो.,२७९५००५३३१८व्ही	२००८-०९	६४३७१९
८.	मुंबई	मे. परफेक्ट ज्वेलर्स,२७२४०३४६००९ व्ही	२००८-०९	८७३८६४
९.	मुंबई	मे. भवन ज्वेलर्स ,२७६७०६६१०१व्ही	२००८-०९	९७७३५३
१०.	मुंबई	मे. सी. गांधी अँड कं.,२७०४०११००२१व्ही	२००८-०९	५९१८०१४
११.	मुंबई	मे. ट्रेड सिस्टीम कॉर्पो.,२७५५०३०६३११व्ही	२००८-०९	११०१९३१३
१२.	मुंबई	मे. कन्सेप्ट अँडव्हर्टाईजिंग,२७७१०५९०१४२व्ही	२००८-०९	४६५८७०३
१३.	मुंबई	मे. रसिकलाल शंकरचंद ज्वेलर्स,२७९८०२५१५१२व्ही	२००८-०९	२४०३६३६२
१४.	मुंबई	मे. हजारी ट्रेडर्स,२७१९००१२२११व्ही	२००८-०९	१४९४२८९
१५.	मुंबई	मे. एस.बी.डुंगारपूरवाला अँड कं.,२७८७०३७१९९८व्ही	२००८-०९	४२९६९६१३
१६.	मुंबई	मे. ए.के.जाफरभाई ,२७१०००२२४९४व्ही	२००८-०९	२३२३९६०
१७.	मुंबई	मे. मॅक्सकॉन ट्रेडिंग कं.,२७१४०२८६७९७व्ही	२००८-०९	७४०८३१
१८.	मुंबई	मे. हॉटस्पोटस रिटेल लिमि.,२७०६०५९५७८६व्ही	२००८-०९	३३९६६०५
१९.	मुंबई	मे. आरती मिरचंदानी,२७०४०५९७१५५व्ही	२००८-०९	११२५५५०
२०.	मुंबई	मे. रत्नराज,२७५७०३८४१९१व्ही	२००८-०९	१४६९६३१
२१.	मुंबई	मे. सिटी क्रॉप फायनान्स,२७१९०००४४५१व्ही	२००८-०९	१४९०५९२
२२.	मुंबई	मे. शिराज सी.लालकाका,२७११०२७६५८व्ही	२००८-०९	६९९१२३
२३.	मुंबई	मे. युरोपॅक मशीनस इंडिया प्रा.लि.,२७४८००१३२६४व्ही	२००५-०६	२४६२९३६
२४.	मुंबई	मे.सीकेटी मल्टीपल,२७१२०३८६३३०व्ही	२००५-०६	२१७९६५४
२५.	मुंबई	मे. गोल्ड पार्क,२७१६०१२२५८५व्ही	२००८-०९	२२५१५४४
२६.	मुंबई	मे. न्यु महावीर मेटल कॉर्पो.,२७२४०५०४९९२व्ही	२००८-०९	५४२९२०
२७.	मुंबई	मे. शितल ड्रेप इंडिया प्रा.लि.,२७५३०२३९१९८व्ही	२००७-०८	११३६४९१
२८.	मुंबई	मे. अनीशा इंजि.,२७५०००८३२८७व्ही	२००८-०९	७२५०५०
२९.	मुंबई	मे. पाउलाईन सिस्टर बॉम्बे सोसा.,२७६४०३७५८५९व्ही	२००८-०९	५१४९८५

३०.	मुंबई	मे. प्रेमचंद ट्रेडिंग कं.,२७५८०२६२८८७व्ही	२००८-०९	११५२७०७
३१.	मुंबई	मे. एस.के.आर्ट,२७१६०३५५८५०व्ही	२००५-०६	६००३७५
३२.	मुंबई	मे. निलम ट्रेडिंग कॉर्पो.,२७४४०६६०१७९व्ही	२००८-०९	३७१२३६४
३३.	मुंबई	मे. युनिक रॉक अँड मिनरल,२७९६०६०२८५७व्ही	२००८-०९	७०७४६६९
३४.	मुंबई	मे. केडीआर इंड,२७७२००७६३७६व्ही	२००६-०७	२३०९७११३
३५.	मुंबई	मे. इंदू फोटो फ्रेम प्रा.लि.,२७५०००८८८८व्ही	२००७-०८	४९१६५६०
३६.	मुंबई	मे. तरुण गोल्ड,२७२७०१०७७१२व्ही,	२००८-०९	९९९७३३१
३७.	मुंबई	मे. भंडारी गोल्ड अँड ज्वेलर्स प्रा.लि.,२७४७०६१४८१५व्ही	२००८-०९	५१७४०००
३८.	मुंबई	मे. इलेगॅन्झा इंड इस्टेट,२७३७०३६१७००व्ही	२००८-०९	३२८३२६७
३९.	मुंबई	मे. नोबेल स्टोर,२७९६०३९०६२१व्ही	२००८-०९	२४८९०७९
४०.	मुंबई	मे. सिलेक्ट मार्केटींग प्रा.लि.,२७४०१४७९३८व्ही	२००८-०९	३६०९६७०
४१.	मुंबई	मे. सिनिक एक्सपोर्ट (इं)लिमि.,२७७३०३२८२३१व्ही	२००७-०८	३३७०४३९९
४२.	मुंबई	मे. टायमेक्स बेल्टींग कं.,२७४१००१९१७१व्ही	२००८-०९	८३८३२२१
४३.	मुंबई	मे. डॉल्फीन क्लॉथिंग,२७४४०२६५५८३व्ही	२००८-०९	११८६७८०८७
४४.	मुंबई	मे. सेंटॉर केमिकल्स प्रा.लि.,२७३१०२४८४३७व्ही	२००६-०७	११२२३७४
४५.	मुंबई	मे. हीना जेमस,२७९३००४१२९२व्ही	२०१०-११	७४९०९३
४६.	मुंबई	मे. स्टेटस क्लॉथिंग कं.,२७१६०३७१६६१व्ही	२००८-०९	५९४६२१
४७.	मुंबई	मे. ए.हिमांशू अँड कं.,२७२८०१८१५७२व्ही	२००९-१०	४३९२७५२
४८.	मुंबई	मे. रेडिओ कॉम्प्यूटिंग सर्विसेस (इं)प्रा.लि.,२७९५००४३९९७व्ही	२००८-०९	७६४६६८
४९.	मुंबई	मे. रेनबो इंजि.कं.,२७६१०५६५४६२व्ही	२००८-०९	११६३५०८
५०.	मुंबई	मे. श्री ओम शर्टींग प्रा.लि.,२७१६०२५४४८५व्ही	२००८-०९	२२६०६४५
५१.	मुंबई	मे. फ्रेंडस गार्मेट,२७९००२६०४८०व्ही	२००८-०९	२२४१९२८१
५२.	मुंबई	मे. तह एंटरप्रायझेस,२७६९०३६६६६५व्ही	२००८-०९	४४४५७९३
५३.	मुंबई	मे. लक्ष्मी ज्वेलर्स,२७३१०६८७१६८व्ही	२००८-०९	६७४५९६
५४.	मुंबई	मे. भारत स्टोन सप्लाय,२७०६०१७७२३१व्ही	२००६-०७	९३०७८२
५५.	मुंबई	मे. भारत स्टोन सप्लाय,२७०६०१७७२३१व्ही	२००७-०८	२६१६४१४
५६.	मुंबई	मे. ओबेरॉय ग्लास हाउस,२७२०००२०७९०व्ही	२००८-०९	६०५५७५
५७.	मुंबई	मे. बुलकन कम्पोनंट(इं)प्रा.लि.,२७५५०५०४३८५व्ही	२००७-०८	५७८३८३
५८.	मुंबई	मे. वैशाली गार्मेट प्रा.लि.,२७४८०५०३८९०व्ही	२००७-०८	१५४८३६९
५९.	मुंबई	मे. परसिल एम्ब्रायडरी प्रा.लि.,२७९४०३५६१९७व्ही	२००८-०९	२८७५५६४
६०.	मुंबई	मे. रिध्दी सिध्दी बुलियन लिमी.,२७५३००१३२८५व्ही	२००५-०६	१८७८२८७४
६१.	मुंबई	मे. रिध्दी सिध्दी बुलियन लिमी.,२७५३००१३२८५व्ही	२००६-०७	४११९८५०
६२.	मुंबई	मे. रिध्दी सिध्दी बुलियन लिमी.,२७५३००१३२८५व्ही	२००७-०८	२३६७५५००

६३.	मुंबई	मे. रिध्दी सिध्दी बुलियन लिमी.,२७५३००१३२८५व्ही	२००८-०९	७७०५८००
६४.	मुंबई	मे.व्हीयुबी इंजि.प्रा.लि. ,२७४४०३४४१५३व्ही	२००८-०९	२७७५४५४
६५.	मुंबई	मे. रेक्सेलो कास्टर्स प्रालि.,२७३०३७५२७३व्ही	२००५-०६	६६८३४०
६६.	मुंबई	मे. टॅक्सपोर्ट सिंडीकेट इंडीया लिमि.,२७६१०३७५०५१व्ही	२००८-०९	७२००७९
६७.	मुंबई	मे. रेक्सेलो कास्टर्स प्रालि.,२७३०३७५२७३व्ही	२००७-०८	१०६४८२६
६८.	मुंबई	मे. कुलक्राफ्ट रेफ्रिजरेशन सिस्टीम प्रालि.,२७४७०१३६३१४व्ही	२००६-०७	७०८५१५
६९.	मुंबई	मे. रेक्सेलो कास्टर्स प्रालि.,२७३०३७५२७३व्ही	२००६-०७	१०४३९२८
७०.	मुंबई	मे. क्विक इंडसप्लायर्स ,२७५०००० ६८५१व्ही	२००५-०६	८७९७९८
७१.	मुंबई	मे. अल्फा बॅटरीज ,२७५२०५०४१५९व्ही	२००८-०९	५८१०२८
७२.	मुंबई	मे. नोहा एक्सपोर्टस,२७३१०३८२४९१व्ही	२००७-०८	१९८८३५७
७३.	मुंबई	मे. एम.ए.ज्वेलर्स,२७५९०३८७५७५व्ही	२००८-०९	७९९५९४
७४.	मुंबई	मे. एक्सीस इंटरनॅशनल,२७४३०२८३८७३व्ही	२००५-०६	२५००८४६९
७५.	मुंबई	मे. स्किल्ड फॅब्रिकेटर्स प्रालि.,२७३१००१९५१७व्ही,	२००७-०८	९२२४४८
७६.	मुंबई	मे. महालाश एंटरप्रायझेस प्रालि.,२७१२०३६२१७७व्ही	२००८-०९	५९९६५०
७७.	मुंबई	मे. मिनल ट्रेडर्स ,२७१७०५७८८९६व्ही	२००८-०९	७८८९७८
७८.	मुंबई	मे. उदय एक्सपोर्ट प्रा.लि.,२७५४०२७७७५०व्ही	२००८-०९	६६४७६५
७९.	मुंबई	मे. जलराम पॉलिप्रिंट ,२७७२०४०१५२०व्ही	२००७-०८	१२८३५४९
८०.	मुंबई	मे. एफ. डी. फूटवेअर,२७८९०३७१७९३व्ही	२००६-०७	१६६४७१५
८१.	मुंबई	मे. चायना व्हाईट आर्ट प्रालि.,२७७५०५७०१३८व्ही	२००८-०९	७२५००००
८२.	मुंबई	मे. एएलडी ऑटोमोटीव्ह प्रालि.,२७७२०२८७६४२व्ही	२००७-०८	१०५१२१८३
८३.	मुंबई	मे. छोरॉन इंडिया प्रालि.,२७०३०३१७९४६व्ही	२००८-०९	१२७५९६१३
८४.	मुंबई	मे. मेळघाट कोल्डचेन प्रालि.,२७१९५२१६७४६व्ही	२००९-१०	५६५११४३
८५.	मुंबई	मे. राज केमोटेक्स अँड अलाईड एजन्सी,२७४३०२५३४१५व्ही	२००८-०९	१६३६३३५
८६.	मुंबई	मे. इंडियन प्युमेटीक अँड हायड्रोलिक कं.प्रालि.,२७५३०५२६६०९व्ही	२००८-०९	८६६८६१
८७.	मुंबई	मे. शार्प एंटरप्रायझेस,२७०९०१५७५७२व्ही	२००८-०९	९१७२९५
८८.	मुंबई	मे. पंत हाउस,२७०४०१६३९५३व्ही	२००८-०९	१८८५३२०
८९.	मुंबई	मे. गॅलरी ७,२७११०२८६६६८व्ही	२००८-०९	१७०१७८९
९०.	मुंबई	मे. एक्सिस इले.कंपोनंट इंडिया प्रालि.,२७३००२५५९६०व्ही	२००८-०९	१७५९५९०
९१.	मुंबई	मे. ऐविस मोटार प्रालि.,२७८४०६४९४८३व्ही	२००८-०९	२२८१२६१
९२.	मुंबई	मे. .नरेंद्र कंस्ट्रक्शन कं.,२७२३००१६३६०व्ही	२००८-०९	६७८६०२२
९३.	मुंबई	मे. अंबिका ट्रेडिंग कं.,२७२२००७५६८१व्ही	२००६-०७	११५१६०८
९४.	मुंबई	मे. ए-वन शबाब इले.एक्झिबिशन,२७२१०३८५९४१व्ही	२००७-०८	१३५३२६८८
९५.	मुंबई	मे. अल शबाब इले.एक्झिबिशन,२७२१०३८५९४१व्ही	२००६-०७	५७९८८५६४

९६.	मुंबई	मे.एफ.डी.फूटवेअर,२७८९०३७१७९३व्ही	२००८-०९	१०४०१९०
९७.	मुंबई	मे. रेलिशा एक्सपोर्ट.,२७८३०००१८९६८व्ही	२००७-०८	२०७९९६९
९८.	मुंबई	मे. तह एंटरप्रायझेस ,२७६९०३६६६६५व्ही	२००५-०६	१६४३६६६
९९.	मुंबई	मे. तह एंटरप्रायझेस ,२७६९०३६६६६५व्ही	२००६-०७	७०७०९७
१००.	मुंबई	मे. संतोष ड्रग हाउस,,२७५७०३५३८३०व्ही	२००७-०८	८०२४१९
१०१.	मुंबई	मे. संतोष ड्रग हाउस,२७५७०३५३८३०व्ही	२००६-०७	५२८८४१
१०२.	मुंबई	मे. टाटा स्काय लिमि.,२७२९०५०२२९७व्ही	२००५-०६	१७५९८१५८
१०३.	मुंबई	मे. पारस सायंटिफिक (इं) प्रालि.,२७८६०३८६९९०व्ही	२००६-०७	८५४३९५
१०४.	मुंबई	मे. जेमिनी मोटर.,२७३८०३७७४५व्ही	२००५-०६	७९९३७६
१०५.	मुंबई	मे. सगा डिपार्टमेंट स्टोअर लिमी.,२७६७०३५९८८६व्ही,	२००६-०७	५४०७९२०
१०६.	मुंबई	मे. स्वाती विनायक सिंथेटिक्स लिमी.,२७५४००१९७३०व्ही	२००५-०६	१८००४७०
१०७.	मुंबई	मे. स्वाती विनायक सिंथेटिक्स लिमी.,२७५४००१९७३०व्ही	२००७-०८	१००१०२८
१०८.	मुंबई	मे. केंब्रिज टाईम स्पेअर.,२७७४०२९९७५६व्ही	२००८-०९	८३८०८९
१०९.	मुंबई	मे. एम.व्ही पेंडूरकर अँड कं.,२७२९००६४८२७व्ही	२००६-०७	१६५६१०१
११०.	मुंबई	मे. वेदांत डायस्टफ इंटरमिडीएट प्रा.लिमि.,२७४७०३२७२१०व्ही	२००६-०७	१७२६६११
१११.	मुंबई	मे. निर्माण इम्प्रेस प्रा.लिमि.,२७०२००३११८९व्ही	२००८-०९	९०३८१९
११२.	मुंबई	मे. डिपी डिझाइन प्रा.लिमि.,२७७९०३८३३९१व्ही	२००७-०८	६९७४००
११३.	मुंबई	मे. कामत अँड कं.,२७०५०५०२२३५व्ही	२००५-०६	१२८३६७२
११४.	मुंबई	मे. कामत अँड कं.,२७०५०५०२२३५व्ही	२००७-०८	४९९४०६६
११५.	मुंबई	मे. महावीर ट्रेडर्स,२७८७०४११०८९व्ही	२००८-०९	९३७२८८
११६.	मुंबई	मे. भारमल एंटरप्रायझेस,२७२२०२४७९५३व्ही	२००८-०९	६०८१४६
११७.	मुंबई	मे. गजसिध्दी ग्लोबल,२७६२०२६१९९२व्ही	२००८-०९	५६२५००
११८.	मुंबई	मे. रिलायन्स हायपर मार्ट लिमि.,२७७८५२००२७१व्ही	२००८-०९	१८०५११४६
११९.	मुंबई	मे. हवा वेव इंडिया प्रा.लिमि.,२७६५०१९९४५९व्ही	२००८-०९	७७०२५५०७
१२०.	मुंबई	मे. नहार टेक्सटाईल प्रा.लिमि.,२७०४०००४४८५व्ही	२००८-०९	१५४४७८७१
१२१.	पुणे	मे. सत्यम ज्वेलर्स.,२७७८००१५३३०व्ही	२००७-०८	४१७८४७७६
१२२.	पुणे	मे. हसिया पॅकेजिंग.,२७२१०४१०४८२व्ही	२००८-०९	४४४७५८०
१२३.	पुणे	मे. भाग्यलक्ष्मी स्टोन इंड.,२७९५०३५१२९३व्ही	२००७-०८	२४१५४७९
१२४.	पुणे	मे. फर्निटेक सेटिंग सिस्टीम इं.प्रा.लिमि.,२७८७००१५५२३व्ही	२००५-०६	६६९७६२
१२५.	पुणे	मे. अरिहंत फॉलिकेम .,२७९५०६३९१८९व्ही	२००७-०८	५८८०००
१२६.	पुणे	मे. इंट्रा इंडप्रा.लिमि.अँड इंट्रा इलेक्ट्रॉनिक,२७३४००२३५२६व्ही	२००८-०९	३३९१५२६

१२७.	पुणे	मे. एस.पी.इंजि.,२७८६००२५८५९व्ही	२००५-०६	८४०४०१
१२८.	पुणे	मे. एस.पी.इंजि.,२७८६००२५८५९व्ही	२००७-०८	२३०३७४२
१२९.	पुणे	मे. गीता बिल्डर्स.,२७६५०५९२५०३व्ही	२००७-०८	२०६९३८१
१३०.	पुणे	मे. मनोज ट्रेडिंग कं.,२७१२००४७९९४व्ही	२००६-०७	७७८२५२१
१३१.	पुणे	मे. सुयोग कंस्ट्रक्शन,२७२०००३६३१०व्ही	२००८-०९	१०१३३६१
१३२.	पुणे	मे.सी.सी. इंजि.प्रा. लिमि.,२७७६०००२६२४व्ही	२००५-०६	१५०६५२४
१३३.	पुणे	मे. क्वीन ट्रीट सॉफ्टवेअर प्रा.लिमि.,२७८३०३०८०००व्ही	२००६-०७	९०१५१०
१३४.	पुणे	मे. क्वीन ट्रीट सॉफ्टवेअर(I) प्रा.लिमि.,२७८३०३०८०००व्ही	२००७-०८	१५२८४९३
१३५.	पुणे	मे. आय.एस.भुतडा.,२७४२०२१०८८६व्ही	२००७-०८	७९४२७३
१३६.	पुणे	मे. हार्डरॉक कॉन्क्रेट प्रा.लिमि.,२७०७०६४२३८९व्ही	२००८-०९	७२३१४२
१३७.	पुणे	मे. जी.जी. एंटरप्रायझेस,२७८६००२१८८२व्ही	२००८-०९	१७०६६३३
१३८.	पुणे	मे. भुशिल्पा केमिकल्स प्रा.लिमि.,२७२९००१००२२व्ही	२००७-०८	९३२२५८
१३९.	पुणे	मे. भुशिल्पा केमिकल्स प्रा.लिमि.,२७२९००१००२२व्ही	२००६-०७	३३१११९१
१४०.	पुणे	मे. मॉन्टेनरी लिफ्ट कॉम्पोनंट प्रा.लिमि.,२७०५५२१३१३७व्ही	२००८-०९	३८८७६८५
१४१.	पुणे	मे. व्ही.एम.मातेरे इन्फ्रास्ट्रक्चर (इं)प्रा.लिमि.,२७७७०६४५०११व्ही	२००८-०९	२११४१५९
१४२.	पुणे	मे. देसाई इन्फ्रा प्रोजेक्ट इंडिया प्रा.लिमि.,२७९५०६९०६९६व्ही	२०१०-११	७४६१९८६
१४३.	पुणे	मे. ट्रान्सपरन्ट एनर्जी सिटीम प्रा.लिमि.,२७१९०४०४०९१व्ही	२००८-०९	९०१०५५
१४४.	पुणे	मे. टी.जी.धमनी ,२७६७०२८०५४०व्ही	२००८-०९	१९०६१०६९
१४५.	पुणे	मे. युनाटेड क्रेन कंम्पोनंट प्रा.लिमि.,२७७५०३०७८५०व्ही	२००८-०९	५८४५८२
१४६.	पुणे	मे. श्री एंटरप्रायझेस ,२७१७०६०८३८४व्ही	२००८-०९	२०८२८५१
१४७.	पुणे	मे. भारत कंस्ट्रक्शन .,२७१९००५६३४६व्ही	२००७-०८	१७३५७५८१
१४८.	पुणे	मे. ईंडिकॉन कंस्ट्रक्शन प्रा.लिमि.,२७१२०४०६९९१व्ही	२००८-०९	४६४३४१५
१४९.	पुणे	मे. राजलक्ष्मी स्टोन अँड सँड.,२७८७०६४५७३२व्ही	२००८-०९	२८०८८२२
१५०.	पुणे	मे. स्टेपॅक पॉलिफॉम प्रा.लिमि.,२७३२०४१००८२व्ही	२००५-०६	२०९५६४७
१५१.	पुणे	मे. गोदावरी पल्प अँड पेपर मिल्स.,२७४४०३२४८५०व्ही	२००८-०९	४०७०४४३६
१५२.	पुणे	मे. एस.एन.रावलेकर .,२७८७००५४७११व्ही	२००८-०९	२४७४८२३
१५३.	पुणे	मे. संजय शांताराम धनकवडे.,२७९५०४०९५९०व्ही	२००५-०६	१३४२३८१
१५४.	पुणे	मे. संजय शांताराम धनकवडे.,२७९५०४०९५९०व्ही	२००६-०७	६०८६०३
१५५.	पुणे	मे. संजय शांताराम धनकवडे.,२७९५०४०९५९०व्ही	२००७-०८	६०२६९२
१५६.	पुणे	मे. के.डी.सोनावणे.२७१०००१९८७५व्ही.	२००८-०९	६९८४९७
१५७.	नाशिक	मे. रॉयल कंस्ट्रोवेल ,२७१८००१६०४८व्ही	२००८-०९	२९३०६७०

१५८.	नाशिक	मे. पपया नर्सरी ,२७३६०१२४६८६व्ही	२००८-०९	६४७४२५
१५९.	नाशिक	मे.फिनोटेक्स फायबरकास्ट,२७५६०२२८९४८व्ही	२००८-०९	१३३१३९२
१६०.	नाशिक	मे.मोहमद खान मेहबुब खान,२७९६०६४४८५८व्ही	२००८-०९	६८१४५४५
१६१.	नाशिक	मे.बालकृष्ण तुकाराम टकटे २७९१०३६५४७७व्ही	२००८-०९	३६३५५५५
१६२.	नाशिक	मे.जगोटा अँड सन्स,२७५९००७५४२९व्ही	२००८-०९	५९८५३६
१६३.	नाशिक	मे.महालक्ष्मी बांधकाम मजदूर,२७१३००२६५०३व्ही,	२००९-१०	३७६७२४१
१६४.	नाशिक	मे.कागझ पॅकेजिग लिमि.,२७०६०३६३१८०व्ही	२००८-०९	६८६४५५
१६५.	नाशिक	मे.गुरुकृपा एंटरप्रायझेस लिमि.,२७६३०२११७८९व्ही	२००८-०९	३०३४६१४
१६६.	नाशिक	मे.अदिप एंटरप्रायझेस ,२७६८००१४८०३व्ही	२००६-०७	११८३३६३
१६७.	नाशिक	मे.आर.आय.लाल,२७१४००३२९४८व्ही	२००८-०९	५५४६००
१६८.	नाशिक	मे.गायकवाड बिल्डींग मेटेरियल सप्लायर्स,२७२६०६४३१०९व्ही	२००६-०७	५९८७३०
१६९.	नाशिक	मे.के.आर.इलेक्ट्रिकल्स,२७१३००१५४४५व्ही	२००६-०७	१५९६२७६
१७०.	नाशिक	मे.तरुस बायो एनर्जी ,२७३६०६८४५७०व्ही	२००८-०९	१८०२४०३
१७१.	नाशिक	मे.भाग्यलक्ष्मी इलेक्ट्रिकल,२७७९००६६७८३व्ही	२००६-०७	१४०५५३९
१७२.	नाशिक	मे.श्री दत्तकृपा बिल्डींग मेटेरियल सप्लायर्स ,२७६६०६६९८५५व्ही	२००८-०९	१२२७०१०
१७३.	नाशिक	मे.ऋषीराज एंटरप्रायझेस ,२७९२०५८६३८९व्ही	२००६-०७	९२९८७३
१७४.	नाशिक	मे.ऋषीराज एंटरप्रायझेस ,२७९२०५८६३८९व्ही	२००७-०८	३३५४०२०
१७५.	नाशिक	मे.पॅसिफीक मार्केटिंग,२७५१००३३३७५व्ही	२००८-०९	५१७७०१
१७६.	नाशिक	मे.सिमेंट ग्राडक्ट,२७३१०६५६०३१व्ही	२००८-०९	१७७३१७४
१७७.	नाशिक	मे.सुमन कंस्ट्रक्शन कं.,२७१२०६६२५८६व्ही	२००८-०९	२९०६३७६
१७८.	नाशिक	मे.एस.बी.कंस्ट्रक्शन,२७०९०५०९५८५व्ही	२००८-०९	३४०६३५६
१७९.	नाशिक	मे.सिल्वर हाउस,२७७७०७०६६०६व्ही	२००८-०९	१३६६८८३
१८०.	नाशिक	मे.मेघा फॅब्रिकेटर्स प्रा.लि.,२७२७०३६३११३व्ही	२००६-०७	५०५३५०
१८१.	नाशिक	मे. स्पेक्ट्रम इर इथर्स लिमि.,२७५७०३०००९२व्ही	२०१०-११	२७८१२१५
१८२.	नाशिक	मे.ॲक्युरा वॉल्वस ,२७८२०५९९९२७व्ही	२००७-०८	२२०१५३३
१८३.	नाशिक	मे.ॲक्युरा वॉल्वस ,२७८२०५९९९२७व्ही	२००७-०८	८६५५८७
१८४.	नाशिक	मे.रिगल रोलिंग मिल्स,२७६३०३९६३८०व्ही	२००५-०६	२४६०७१६
१८५.	नाशिक	मे.रिगल रोलिंग मिल्स,२७६३०३९६३८०व्ही	२००६-०७	३९६६५३४
१८६.	नाशिक	मे.श्रीराज राजेश्वरी पॉप केमि.इंडप्रा.लिमि.,२७०००००४००व्ही	२००५-०६	२५७४७०९
१८७.	नाशिक	मे.गोदावरी पल्प अँड पेपर मिल्स प्रा.लिमि.,२७४४०३२४८५०व्ही	२००९-१०	१५४७१७६९
१८८.	नाशिक	मे.गोदावरी पल्प अँड पेपर मिल्स प्रा.लिमि.,२७४४०३२४८५०व्ही	२०१०-११	३०३५०१२९
१८९.	नाशिक	मे.प्रिमियम टुल्स प्रा.लिमि.,२७५७०३०००९२व्ही	२००६-०७	१०९१७५८

१९०.	ठाणे	मे. ओम जय श्री ट्रेडर्स ,२७६२०३५०६५०व्हो	२००८-०९	९४४३११
१९१.	ठाणे	मे.निखील एंटरप्रायझेस,,२७६२०३३२०२६व्हो	२००८-०९	१५८७६२९
१९२.	ठाणे	मे.राहूल एंटरप्रायझेस,२७०९०३५०११७व्हो	२००७-०८	५१७५३१६०
१९३.	ठाणे	मे.व्हेन एजन्सीज,२७४९०३५०६७३व्हो	२००८-०९	६९२२१२
१९४.	ठाणे	मे.एम.जे.एंटरप्रायझेस,२७६६०३३१९०७व्हो	२००५-०६	८२९४२७३
१९५.	पालघर	मे.सुकेतू ऑरगॅनिक प्रा.लिमि.,२७०५०५२९४९२व्हो	२००८-०९	६०८३१५६
१९६.	पालघर	मे.हुमा पॉलीप्लास्ट लिमि.,२७६३६२९८५०७व्हो	२००६-०७	१४९४४३०
१९७.	पालघर	मे.इनस्टेप ,२७७१०३३२६०७व्हो	२००५-०६	८२७७०१
१९८.	पालघर	मे.अलमेटी ऑटो एनसिलेरी प्रा.लिमि.,२७४६०२५३९३२व्हो	२००९-१०	८१४५४१
१९९.	पालघर	मे.गाला इक्विपमेंट,२७०६०४११०९८व्हो	२००५-०६	९०५४०२
२००.	पालघर	मे.रिपल पॅकेजिंग,२७६२००२९९१९व्हो	२००५-०६	२२६७०७२
२०१.	पालघर	मे.मनुदिप मेटाकेम,२७९५०३४३२४२व्हो	२०१०-११	२७६७८९५
२०२.	पालघर	मे.सॅटेलाइट इंजि.,२७२३००१४७११व्हो	२००५-०६	८५४०३७
२०३.	पालघर	मे.डिसीटेक फर्निशिंग लिमि.,२७२१०३४९०८१व्हो	२००८-०९	८७४५१८
२०४.	पालघर	मे. सुरज फूड,२७०५०३४३२५२व्हो	२००८-०९	६३७१५०
२०५.	पालघर	मे. सुरज फूड,२७०५०३४३२५२व्हो	२००७-०८	७४५७६२
२०६.	पालघर	मे. सुरज फूड,२७०५०३४३२५२व्हो	२००६-०७	५०९३७०
२०७.	पालघर	मे. स्टायरोमोडल्डर्स इंडिया,२७९२००११८५८व्हो	२००५-०६	१२५३२१३

परिच्छेद क्र./पृ.क्र.	प्रारुप परिच्छेद क्र./विभाग	आक्षेप
१	२	३
२.४.१२ २७	२८ १३-१४	**निष्कर्ष व शिफारशी** अशाप्रकारे, उपरोक्त तपशिलावरुन असे निदर्शनास येते की, परताव्याची १०० प्रकरणे पूर्ण करण्यात विलंब झाल्यामुळे विभागाला व्याजापोटी रु.८.१८ कोटीचे प्रदान करावे लागले होते, जे टाळता आले असते, निर्धारणा अचूकपणे काळजीपूर्वक करण्यात आली नव्हती, अन्यथा रु.४.३८ कोटीचा चूकीचा, नियमबाहय व अतिरिक्त परतावा देणे थांबविता आले असते, रु.८.८२ कोटी कर प्रभावाच्या आंतरराज्य व निर्यात व्यवहारांमध्ये कर प्रदानात सूट प्राप्त करण्यासाठी सादर करावयाची काही कागदपत्रे अभिलेखात सापडली नाहीत व सापडलेली कागदपत्रे अपूर्ण होती. मागणी करण्यात आलेल्या रक्कमेच्या वसूलीच्या वेळी संबंधित तरतूदींचे पालन करण्यात आले नव्हते ज्यामुळे रु. ३३.२८ कोटी रक्कमेची वसूली होऊ शकली नव्हती. तसेच, रु.१७.७४ कोटींची मागणी करण्यात चार ते नऊमहिन्यांचा विलंब झाला होता, परिणामी, त्या रक्कमेची वसूली करण्यात विलंब झाला. वरील परिस्थिती लक्षात घेता, अशी शिफारस केली जात आहे की, विक्रीकर विभागाने: • परतावा प्रकरणे वेळेवर अंतीम करुन त्याव्दारे विलंबीत परताव्यांवर व्याजाचे प्रदान टाळण्यासाठी परतावा व परतावा शाखेने सूचना जारी कराव्या; • पर्याप्त कालमर्यादेत मागणी उपस्थित करण्यासाठी आणि उपस्थित केलेल्या मागणीमध्ये त्वरीत वसुली होण्याची खात्री करण्यासाठी योग्य कार्यतंत्र योजावे; आणि • परतावा प्रकरणांचे निर्धारण अचूकतेने होईल आणि सर्व आवश्यक दस्तऐवज प्राप्त करुन ते अभिलेख्यांमध्ये ठेवले जातील याची खात्री करावी. **स्पष्टीकरणात्मक अभिप्राय.** • व्यापाऱ्याच्या लेखा पुस्तकांची पडताळणी व तपासणी करुन त्यास वेळीच देय परतावा रक्कम देणे यास विभाग नेहमी प्राधान्य देत आहे.मुल्यवर्धित कर कायदयाच्या प्रारंभिक काळात परतावे देण्यास काहीसा विलंब झाला,परंतु आता आर्थिक वर्ष २०११—१२ पर्यंतच्या प्रकरणात परतावा प्रदान करण्याचे काम पूर्ण झाले आहे.परतावा प्रदान प्रक्रिया जलद होण्यासाठी व्यापारी आता इलेक्ट्रॉनिक स्वरुपात J1-J2 ॲनेक्चर सादर करीत आहेत. विक्री आणि खरेदी यातील पडताळणी आता संगणकाव्दारे केली जात आहे. तसेच वजावटीची जुळणारी व न जुळणारी उलाढाल रक्कम सध्याच्या प्रणालीमध्ये तात्काळ उपलब्ध होते. अशा प्रकारे महसूल संरक्षित करण्याची यंत्रणा आता विभागात उपलब्ध आहे. प्रत्यक्ष परतावा रक्कम दावा करणा—यास मिळण्यास गती येण्यासाठी, परताव्याची

		रक्कम थेट परताव्याचा दावा करणा--याच्या बँक खात्यात नॅशनल इलेक्ट्रॉनिक फंड ट्रांसफर (NEFT) माध्यमातून देण्याची सुविधा विभागाने सुरु केली आहे.अशाप्रकारे व्यापाऱ्यास लवकरात लवकर देय परतावा देण्यात येत आहे. तसेच माहे जानेवारी २०१६पासून विभागाने भौगोलिक क्षेत्रनिहाय कार्यपध्दतीचा अवलंब केला आहे.त्यामुळे परतावा प्रकरणे निकाली काढण्याकरिता पूर्वीच्या ३९० अधिकाऱ्यांच्या तुलनेत १६७२ अधिकारी उपलब्ध झाले आहेत. सबब व्यापाऱ्यास देय परतावा लवकरात लवकर देण्याकरिता विभागाचे प्रयत्न आहेत. • विभागाने सर्व प्रकारच्या निर्धारणा संगणक प्रणालीवर करण्याबाबत उपाय योजना केली आहे. तसेच निर्धारणा आदेश, मागणी सूचना पत्र इत्यादी आदेश व्यापाऱ्यास यापुढे ई-मेल व्दारे आदेश पारीत होताच बजावण्यात येणार आहेत. सबब पर्याप्त कालमर्यादेत मागणी उपस्थित करण्यासाठी आणि उपस्थित केलेल्या मागणीमध्ये त्वरीत वसुली होण्याकरिता योजना आखण्यात आली आहे. परतावा प्रकरणांचे निर्धारण अचूकतेने होईल आणि सर्व आवश्यक दस्तऐवज प्राप्त करुन ते अभिलेख्यांमध्ये ठेवले जातील यासंबंधी सर्व निर्धारणा अधिकाऱ्यांना वेळोवेळी निर्देश देण्यात आले असून त्याची अंमलबजावणी करण्याच्या सूचना वेळोवेळी घेण्यात येणा--या बैठकांमधून देण्यात आल्या आहेत.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा सन २०१३-२०१४ चा महसूली जमा अहवाल
स्पष्टीकरणात्मक ज्ञापने

परिच्छेद क्र./पृ.क्र.	प्रारुप परिच्छेद क्र./विभाग	आक्षेप
१	२	३
२.५ २८	१३-१४	**इतर लेखापरीक्षा अभिक्षणे** मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९ (BSTअधिनियम)महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर अधिनियम, २००२ (MVATअधिनियम), केंद्रिय विक्रीकर अधिनियम , १९५६(CST अधिनियम) अंतर्गत विक्रीकर विभागात अंतिम करण्यात आलेल्या निर्धारणा दस्तऐवजांच्या तपासणीत बऱ्याच प्रकरणांमध्ये या प्रकरणांच्या पुढील परिच्छेदांमध्ये नमूद केल्याप्रमाणे अधिनियम / नियम मधील तरतूदींचे पालन होणे, कराची आकारणी न/कमी होणे, सूटीचे नियमबाहय प्रदान आणि इतर प्रकरणे निदर्शनास आली होती. ही प्रकरणे उदाहरणादाखल दिली आहेत व ती चाचणी तपासणीवर आधारित आहेत. प्रत्येक वर्षी लेखापरीक्षेमध्ये निर्धारण प्राधिकाऱ्यांकडून झालेली ही लोपने निदर्शनास आणून दिली जातात, परंतु, या अनियमितता सातत्याने घडत आहेत व लेखापरीक्षा करेपर्यंत त्यांचा तपासही लागत नाही. अंतर्गत लेखापरीक्षा बळकट करण्याबरोबरच शासनाने अंतर्गत नियंत्रण यंत्रणा सुधारण्याची गरज आहे. **स्पष्टीकरणात्मक अभिप्राय.** सर्वसाधारण परिच्छेद. अभिप्राय नाही.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा सन २०१३-२०१४ चा महसूली जमा अहवाल

स्पष्टीकरणात्मक ज्ञापने

परिच्छेद क्र./पृ.क्र.	प्रारुप परिच्छेद क्र./ विभाग	आक्षेप
१	२	३
२.५.१ २८	१३-१४	**महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर अधिनियम, २००२ (MVAT अधिनियम)अंतर्गत अंतिम केलेल्या प्रकरणांमध्ये निदर्शनास आलेल्या विसंगती** **हवाला व्यापाऱ्यांकडून केलेल्या खरेदीवर नियमबाहय रितीने set-off चे प्रदान** विक्रीकर उपायुक्त, LTU-E-६२६,माझगांव विभाग, मुंबई विक्रीकर आयुक्तांनी जुन २०१२ मध्ये जारी केलेल्या ८T क्रमांकाच्या व्यापार परिपत्रकात असे विनिर्दिष्ट करण्यात आले आहे की, हवाला व्यापाऱ्याकडून करण्यात आलेले खरेदीचे व्यवहार वैध व्यवहार नसल्याने जरी अशा खरेदीवर हवाला व्यापाऱ्याने अंशत: किंवा पूर्णपणे कर भरला असेल तरी अशा खरेदीवर ITC चा दावा धरु नये. विक्रीकर विभागाच्या चौकशी शाखेने अशा हवाला व्यापाऱ्यांची एक यादी तयार केली आहे. निर्धारण दस्तऐवजांची, विभागाने तयार केलेल्या हवाला व्यापाऱ्यांच्या यादीबरोबर प्रति पडताळणी केली असता (ऑगस्ट २०१३) असे आढळून आले की, २००८-०९ या कालावधीत लोहिय व अलोहीय धातूचा आयातदार व पुनर्विक्रेता असलेल्या व्यापाऱ्याने तीन व्यापाऱ्यांकडून केलेल्या खरेदीवर रु.१४.७३ लाख set-off ची मागणी केली होती. विभागाने हे तीन व्यापारी हवाला व्यापारी असल्याचे घोषीत केले होते, म्हणूनच जुन २०१२ मधील परिपत्रकांचा संदर्भ घेतल्यास व्यापाऱ्याने केलेला set-off चा दावा फेटाळणे आवश्यक होते. अशाप्रकारे चुकीच्या पध्दतीने set-off देण्यामुळे व्याज व शास्तीसह रु.३८.१२ लाख कराचे न्यून निर्धारण झाले. हे निदर्शनास आणून दिल्यावर (सप्टेंबर २०१३) विभागाने अभिक्षण मान्य केले व व्यापाऱ्याने निर्धारण आदेशाविरोधात अपील दाखल केल्यामुळे सुधारात्मक कारवाई करण्यासाठी ते विक्रीकर सह आयुक्त (अपील) यांना कळविले(ऑक्टोबर २०१३) पुढील प्रगतीचा अहवाल प्राप्त झालेला नाही. मे २०१४ मध्ये ही बाब शासनाला कळविण्यात आली. त्यांचे उत्तर प्राप्त झाले नाही (डिसेंबर २०१४). **स्पष्टीकरणात्मक अभिप्राय.** या परिच्छेदात एका प्रकरणाचा समावेश आहे. मा. महालेखापरिक्षक यांनी हवाला व्यापा–यांकडून केलेल्या खरेदीवरील कर वजावटीबाबत आक्षेप घेतला आहे. या प्रकरणात सुधारीत कारवाई करून संभाव्य महसूल हानी संरक्षित करण्यात आलेली आहे. प्रकरणाचा तपशिल सोबत जोडला आहे. विभागाने हवाला व्यापा–यांच्या बाबत शून्य सहनशिलता हे धोरण अवलंबिले आहे. त्या अनुषंगाने सर्व हवाला व्यापा–यांविरुध्द एफ.आय.आर.(F.I.R.)दाखल करण्यात आले आहेत. ज्या व्यापा–यांनी देय नसणाऱ्या करवजावटीचा लाभ हवाला बिलांवर घेतला आहे. अशा व्यापा–यांवर तत्पर करवसुलीची सक्त कारवाई केली आहे. हया धोरणाचे सकारात्मक परिणाम दिसून येत आहेत. त्यामुळे हवाला व्यापा–यांची तसेच त्यांच्याकडील खरेदीपोटी घेण्यात येणाऱ्या कर वजावटीच्या दाव्यांची संख्या कमी झाली आहे. सदर प्रकरणाबाबतचे सविस्तर अभिप्राय सोबत जोडलेले आहेत.

परिच्छेद क्र./पृ.क्र.	प्रारुप परिच्छेद क्र./विभाग	आक्षेप	स्पष्टीकरणात्मक अभिप्राय.
१	२	३	४
२.५.१ २८	१७ १३-१४ विउआ (मोठेकरदाते) इ-६२६ मुंबई	आक्षेपाचा मतितार्थ :- हवाला व्यापाऱ्यांकडून केलेल्या खरेदीवर नियमबाहय रितीने करवजावटीचे प्रदान.	**व्यापाऱ्याचे नांव** :- मे.ट्रायसन इम्पेक्स **नों. दा. क्र.** :- २७०४०००८४६२व्ही **कालावधी** :- २००८-०९ **निर्धारणा दिनांक** :- २८.०२.२०१३ **अंतर्भुत आक्षेपित रक्कम** :- ३८.१२ लाख **वाढीव मागणी** :- **लेखा आक्षेप** :- अमान्य **दुरुस्ती कार्यवाही** :- व्यापाऱ्याने निर्धारणा आदेशाविरुध्द प्रथम अपिल दाखल केले होते. महालेखाकारांचा लेखा आक्षेप विसआ(अपिल) यांना कळविण्यात आला होता. दि.२३.०३.२०१६ रोजी प्रथम अपिल निकाली काढण्यात आले असून रु.१४७३३७६/-इतका करवजावटीचा दावा नामंजूर करण्यात आला आहे व प्रथम अपिल आदेशानुसार रु.३७००३३४/- इतकी मागणी करण्यात आली. व्यापाऱ्याने दि.०९.०६.२०१६ रोजी विक्रीकर न्यायाधिकरणाकडे प्रथम अपिल आदेशाविरुध्द दिव्तीय अपिल (SA307-308/16) दाखल केले असून ते सुनावणीसाठी प्रलंबित आहे. **वसुली** :- **खात्याअंतर्गत लेखापरीक्षण करण्यात आले का ?** :- नाही

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा सन २०१३-२०१४ चा महसूली जमा अहवाल

स्पष्टीकरणात्मक ज्ञापने

परिच्छेद क्र./पृ.क्र.	प्रारुप परिच्छेद क्र./ विभाग	आक्षेप
१	२	३
२.५.२ २९	०८ १३-१४	**महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर अधिनियम, २००२ (MVAT अधिनियम)अंतर्गत अंतिम केलेल्या प्रकरणांमध्ये निदर्शनास आलेल्या विसंगती** **हवाला व्यवहारांवर शास्ती न आकारणे** विक्रीकर उपायुक्त, E-८१८, लेखा परीक्षा माझगांव , मुंबई MVAT अधिनियमाच्या कलम २९(४)नुसार, जर एखादया व्यक्ती किंवा व्यापाऱ्याने जाणून बुजून बनावट देयक, रोकड पावती, प्रमाणके घोषणापत्र किंवा प्रमाणपत्र यासारखे कुठलेही कागदपत्र जारी किंवा सादर केले असेल, ज्यामुळे त्याने किंवा इतर कोणत्याही व्यक्तीने किंवा व्यापाऱ्याने केलेला खरेदी किंवा विक्रीचा व्यवहार करपात्र ठरत नसेल किंवा कमी दराने करपात्र ठरत असेल किंवा त्यावर चुकीचा set-off देय ठरत असेल, तर आयुक्तांनी त्याच्याकडून देय असलेल्या कराच्या रक्कमे व्यतिरिक्त, उपरोक्त व्यवहार केल्यामुळे किंवा न केल्यामुळे देय ठरलेल्या कराच्या रक्कमेइतकी शास्ती आकारावी. नलिका व नलिका जोडण्यांच्या पुनर्विक्रेत्याच्या २००५-०६, २००६-०७, २००८-०९ व २००९-२०१० या वर्षीच्या व्यापार लेखापरीक्षेशी संबंधीत दस्तऐवजांची तपासणी करताना ((एप्रिल २०१०) असे आढळून आले की, हवाला व्यापाऱ्याकडून करण्यात आलेल्या खरेदीवरील रु.१०.२१ लाखाचा set-off निर्धारण अधिकाऱ्याने अग्राहय ठरविला होता, परंतू अग्राहय ठरविण्यात आलेल्या रु. १०.२१ लाख set-off इतकी शास्ती निर्धारणा प्राधिकाऱ्यांनी आकारली नव्हती. मे २०१३ मध्ये हे प्रकरण निदर्शनास आणून दिल्यावर, विभागाने सांगितले की २००९ च्या २२T या व्यापार परिपत्रकानुसार , जर व्यापाऱ्याने कलम ३०(४) अंतर्गत देय असलेल्या २५ टक्के व्याजासह सुधारित विवरण सादर केले, जे या प्रकरणात केले गेले होते, तर कलम २९(३) अंतर्गत शास्ती आकारणीय नसते. विभागाचे हे उत्तर अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नाही कारण या प्रकरणात अधिनियमाच्या कलम २९(३) ऐवजी २९(४) नुसार शास्ती आकारणीय आहे. २००९ चे व्यापार परिपत्रक कलम २९(३) शी संबंधित आहे ज्याचे विवेचन अधिनियमाच्या कलम२९खालील टिपांमध्ये केले आहे. त्यामध्ये असे निर्दिष्ट केले आहे की, जर एखादया व्यापाऱ्याने बनावट देयकासारखे खोटे कागदपत्र सादर केले तर कलम २९(४) अंतर्गत शास्ती आकारणीय असते. तसेच, निर्धारण प्राधिकाऱ्यांनी निर्धारण आदेशात शास्तीची आकासणी करण्याविषयीची तरतुद असल्याचे दर्शविणारी कोणतीही नोंद दस्तऐवजात नव्हती. मे २०१४ मध्ये ही बाब शासनाला कळविण्यात आली. त्यांचे उत्तर प्राप्त झाले नाही (डिसेंबर २०१४). **स्पष्टीकरणात्मक अभिप्राय.** आर्थिक वर्ष २००५—०६, २००६—०७, २००८—०९ आणि २००९—१० या कालावधीसाठी व्यापा—याचे कलम २२ अन्वये लेखा परिक्षण करण्यात आलेले आहे. या पैकी कोणत्याही कालावधी साठी कलम २३ अन्वये निर्धारणा आदेश पारित करण्यात आलेले नाहीत. कायदयाने विहित केलेल्या तरतुदीप्रमाणे व्यापाऱ्याने लेखापरिक्षणाचे निष्कर्ष मान्य करुन सुधारित विवरणपत्र दाखल करुन भरण्याचे मान्य केले होते. व्यापा—याने सर्व कालावधींच्या नमुना ७०४ मध्ये परतावयाचा दावा केलेला आहे. लेखापरिक्षणानुसार सर्व कालावधींसाठी व्यापा—यास करदेयता येत नाही. सबब महाराष्ट्र मुल्यवर्धित कर कायदयाच्या कलम २९(४) खालील शास्ती लावण्यात आलेली नाही. व्यापा—याने केंद्रिय विक्रीकर कायदयाखाली २००६—०७, २००८—०९ आणि २००९—१० या कालावधीसाठी आलेली फरकाची रक्कम केंद्रिय विक्रीकर कायदा कलम ९(२) चे महाराष्ट्र मुल्यवर्धित कर कायदयाचे कलम ३०(४) सोबत वाचन केले असताना येणारी व्याजाची २५% रक्कम भरलेली आहे.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा सन २०१३-२०१४ चा महसूली जमा अहवाल

स्पष्टीकरणात्मक ज्ञापने

परिच्छेद क्र./पृ.क्र.	प्रारुप परिच्छेद क्र./ विभाग	आक्षेप
१	२	३
२.५.२ २९	०८ १३-१४	**महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर अधिनियम, २००२ (MVAT अधिनियम)अंतर्गत अंतिम केलेल्या प्रकरणांमध्ये निदर्शनास आलेल्या विसंगती** **हवाला व्यवहारांवर शास्ती न आकारणे** विक्रीकर उपायुक्त, E-८१८, लेखा परीक्षा माझगांव , मुंबई MVAT अधिनियमाच्या कलम २९(४)नुसार, जर एखादया व्यक्ती किंवा व्यापाऱ्याने जाणून बुजून बनावट देयक, रोकड पावती, प्रमाणके घोषणापत्र किंवा प्रमाणपत्र यासारखे कुठलेही कागदपत्र जारी किंवा सादर केले असेल, ज्यामुळे त्याने किंवा इतर कोणत्याही व्यक्तीने किंवा व्यापाऱ्याने केलेला खरेदी किंवा विक्रीचा व्यवहार करपात्र ठरत नसेल किंवा कमी दराने करपात्र ठरत असेल किंवा त्यावर चुकीचा set-off देय ठरत असेल, तर आयुक्तांनी त्याच्याकडून देय असलेल्या कराच्या रक्कमे व्यतिरिक्त, उपरोक्त व्यवहार केल्यामुळे किंवा न केल्यामुळे देय ठरलेल्या कराच्या रक्कमेइतकी शास्ती आकारावी. नलिका व नलिका जोडण्यांच्या पुनर्विक्रेत्याच्या २००५-०६, २००६-०७, २००८-०९ व २००९-२०१० या वर्षांच्या व्यापार लेखापरीक्षेशी संबंधीत दस्तऐवजांची तपासणी करताना ((एप्रिल २०१०) असे आढळून आले की, हवाला व्यापाऱ्याकडून करण्यात आलेल्या खरेदीवरील रु.१०.२१ लाखाचा set-off निर्धारण अधिकाऱ्याने अग्राहय ठरविला होता. परंतू अग्राहय ठरविण्यात आलेल्या रु. १०.२१ लाख set-off इतकी शास्ती निर्धारणा प्राधिकाऱ्यांनी आकारली नव्हती. मे २०१३ मध्ये हे प्रकरण निदर्शनास आणून दिल्यावर, विभागाने सांगितले की २००९ च्या २२T या व्यापार परिपत्रकानुसार , जर व्यापाऱ्याने कलम ३०(४) अंतर्गत देय असलेल्या २५ टक्के व्याजासह सुधारित विवरण सादर केले, जे या प्रकरणात केले गेले होते, तर कलम २९(३) अंतर्गत शास्ती आकारणीय नसते. विभागाचे हे उत्तर अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नाही कारण या प्रकरणात अधिनियमाच्या कलम २९(३) ऐवजी २९(४) नुसार शास्ती आकारणीय आहे. २००९ चे व्यापार परिपत्रक कलम २९(३) शी संबंधित आहे ज्याचे विवेचन अधिनियमाच्या कलम२९खालील टिपांमध्ये केले आहे. त्यामध्ये असे निर्दिष्ट केले आहे की, जर एखादया व्यापाऱ्याने बनावट देयकासारखे खोटे कागदपत्र सादर केले तर कलम २९(४) अंतर्गत शास्ती आकारणीय असते. तसेच, निर्धारण प्राधिकाऱ्यांनी निर्धारण आदेशात शास्तीची आकासणी करण्याविषयीची तरतुद असल्याचे दर्शविणारी कोणतीही नोंद दस्तऐवजात नव्हती. मे २०१४ मध्ये ही बाब शासनाला कळविण्यात आली. त्यांचे उत्तर प्राप्त झाले नाही (डिसेंबर २०१४). **स्पष्टीकरणात्मक अभिप्राय.** आर्थिक वर्ष २००५—०६, २००६—०७, २००८—०९ आणि २००९—१० या कालावधीसाठी व्यापा—याचे कलम २२ अन्वये लेखा परिक्षण करण्यात आलेले आहे. या पैकी कोणत्याही कालावधी साठी कलम २३ अन्वये निर्धारणा आदेश पारित करण्यात आलेले नाहीत. कायदयाने विहित केलेल्या तरतुदीप्रमाणे व्यापाऱ्याने लेखापरिक्षणाचे निष्कर्ष मान्य करुन सुधारित विवरणपत्र दाखल करुन भरण्याचे मान्य केले होते. व्यापा—याने सर्व कालावधींच्या नमुना ७०४ मध्ये परताव्याचा दावा केलेला आहे. लेखापरिक्षणानुसार सर्व कालावधींसाठी व्यापा—यास करदेयता येत नाही. सबब महाराष्ट्र मुल्यवर्धित कर कायदयाच्या कलम २९(४) खालील शास्ती लावण्यात आलेली नाही. व्यापा—याने केंद्रिय विकीकर कायदयाखाली २००६—०७, २००८—०९ आणि २००९—१० या कालावधीसाठी आलेली फरकाची रक्कम केंद्रिय विक्रीकर कायदा कलम ९(२) चे महाराष्ट्र मुल्यवर्धित कर कायदयाचे कलम ३०(४) सोबत वाचन केले असताना येणारी व्याजाची २५% रक्कम भरलेली आहे.

साक्ष :-

१.१ विभागाने पुरविलेल्या उपरोक्त माहितीच्या आधारे समितीने अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २८ व २९ जून, २०१६ तसेच ११ जुलै, २०१६ रोजी वित्त विभागाचे प्रधान सचिव व इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी वित्त विभागाच्या सचिवांनी समितीस अशी माहिती दिली की, राज्य शासनाच्या अनेक विभागांपैकी विक्रीकर विभाग हा महसुलाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा विभाग आहे. या विभागामार्फत व्यापा-यांना व्यापार करताना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये आणि शासनाला देखील मालाच्या विक्रीतून महसूल मिळावा या दृष्टीने वित्त विभाग आणि विक्रीकर विभागाचे प्रयत्न असतात. व्यापा-यांना त्यांचा व्यापार करणे सोयीचे जावे आणि त्यांना काही अडचणी येऊ नयेत या हेतूने विक्रीकर विभागाने ऑटोमेशन हा अतिशय महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला असून त्यामध्ये व्यापा-यांना आवश्यक असलेली सर्व प्रकारची नोंदणी, परतावा, निर्धारण आणि विवरणपत्र सादर करणे ही पध्दती समाविष्ट आहे. यामध्ये मानवी हस्तक्षेप कमीत कमी राहील या दृष्टीने विक्रीकर विभागाचे प्रयत्न सुरू आहेत. यासंबंधी काही अंशी यश मिळाले असले तरी यात आणखी काही सुधारणा करणे आवश्यक आहे आणि त्या दृष्टीने विभाग प्रयत्नशील आहे.

लेखा परीक्षेची व्याप्ती व कार्य पध्दती या सदराखाली प्रधान महालेखाकार यांच्या मुद्दा क्रमांक २.४.२ मध्ये नमूद केल्यानुसार मार्च २०१३ पर्यंत जी परताव्याची प्रकरणे प्रलंबित दिसतात त्यामध्ये २०१२ अखेर जी शिल्लक प्रकरणे होती त्यामध्ये आणखी काही प्रकरणांची वाढ झाली आणि त्यानुसार ही संख्या आणखी वाढून ३० हजार पोहोचली आहे. त्या दृष्टीने ३१ मार्च २०१५ अखेरपर्यंतची सद्यःस्थिती काय आहे ? मार्च २०१२ अखेर प्रलंबित प्रकरणांमधील यामध्ये २०५१२ इतकी प्रकरणे परताव्याची होती. ३१ मार्च २०१३ अखेरपर्यंत एकूण ९००० प्रकरणांच्या व्यतिरिक्त शेवटची शिल्लक ३०७८६ इतकी प्रकरणे होती. त्यासंबंधी ३१ मार्च २०१५ चा किंवा सन २०१६चा काही अहवाल असेल तर त्यानुसार सद्यःस्थितीबद्दलचे चित्र व सुधारणा काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, जून, २०१६ मध्ये आढावा घेतला असता सन २०१२-१३ मध्ये ५४८७ प्रकरणांमध्ये ८१९ कोटी रुपये समाविष्ट आहेत. सन २०१३-१४ मध्ये ९९८७ प्रकरणे, सन २०१४-१५ मध्ये ६९२२ प्रकरणे आणि सन २०१५-१६ मध्ये ९२२ प्रकरणे अशा प्रकारे एकूण २३३१८ प्रकरणे परतावा देण्यासाठी शिल्लक आहेत. ३१ मार्च २०१३ अखेर जे ३०७८६ परतावे शिल्लक आहेत त्यानंतर मागील तीन वर्षाच्या कालखंडामध्ये शेवटच्या ३० हजार प्रकरणांमध्ये ही २३ हजार परताव्याची प्रकरणे समाविष्ट आहेत. यामध्ये एस.टी.आर.ए.ने लेखापरिक्षण केले होते. त्यामध्ये मुंबई, औरंगाबाद, नाशिक, ठाणे, पुणे एवढ्या जिल्ह्यापुरतीच माहिती घेतली होती. आता जी आकडेवारी देण्यात आली आहे ती संपूर्ण महाराष्ट्र राज्याची आहे. संपूर्ण राज्यामधील एकूण अर्ज २३७१८ सन २०१२-१३ पासून प्रलंबित आहेत. ही प्रकरणे सन २०१२-१३ पूर्वीपासूनची आहेत. यामध्ये सन २०१२-१३ मध्ये जी प्रकरणे प्रलंबित असतील ती प्रामुख्याने अपिल प्रकरणे असल्यामुळे प्रलंबित आहेत.

सन २०१२-१३ पासून परताव्याची जी २३ हजार प्रकरणे आहेत, त्यानंतर सन २०१२-१३ अखेरपर्यंत, विभागाकडे ३० हजार परताव्याची प्रकरणे प्रलंबित होती. त्यापैकी किती प्रकरणे कोणत्या कारणास्तव प्रलंबित आहेत अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी विदित केले की, त्या ३० हजार प्रकरणांपैकी त्या संबंधित आकडेवारी आता उपलब्ध नसल्यामुळे माहिती देणे अवघड आहे. मात्र ती नंतर देण्यात येईल.

तीन वित्तीय वर्षे पूर्ण झाली आहेत तरी देखील अशी प्रकरणे का प्रलंबित आहेत, ज्या केसेस अपिलामध्ये असतील ते योग्य आहे. पण जी इतर प्रकरणे प्रलंबित आहेत त्यांची कारणे काय आहेत. एका बाजूला ॲटोमायझेशन यंत्रणा राबविण्यापत येणार असे सांगण्यात येते तर दुस-या बाजूला हा अनुशेष संपला पाहिजे, या दृष्टीने विचार केला पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले तसेच हा सर्वसाधारण विषय आहे असे समजू नये. कारण अलिकडेच माननीय पंतप्रधानांनी अधिका-यांना सांगितले आहे की, आपण व्यापा-यांना चोर समजू नका. ही परताव्याची रक्कम हजारो कोटींमध्ये असते व ती परत करण्यात येते. ज्याप्रमाणे वसुली करावयाची असते त्यावेळी मार्च अखेरला सक्ती करण्यात येते किंवा सप्टेंबरपासून म्हणजे सेकन्ड हाफपासून वसुलीची घाई करण्यात येते. आता तर अशी घाई प्रत्येक महिन्याला करण्यात येते. पूर्वीसारखे ३-३ महिन्यांना रिटर्न भरावयाचे असे राहिलेले नाही तर आता प्रत्येक महिन्याला प्रकरणांचा निपटारा झाला पाहिजे. परताव्याच्या संदर्भात २३ हजाराहून अधिक व्यापा-यांना ऑन रेकॉर्ड माहिती देण्यात येते की, सन २०१२-१३ पासूनचे त्यांचे परतावे देणे बाकी आहे. वसुली करताना एक महिना उशीर झाला तर विभाग त्यांना दंड लावतो आणि व्याज लावण्यात येते. नेमके किती लावण्यात येते ते माहिती नाही पण ते लावण्यात येते. परतावा हा अधिकचा केलेला भरणा म्हणून ती रक्कम त्यांना परत करण्यात येते. त्यांनी काही गहाण ठेवलेले असते. नंतर

ते त्या त्या वर्षानुसार समायोजित करण्यात येते. अशा अनेक विषयांच्या बाबतीत विभागाने एक ऑटोमायझेशन यंत्रणा तयार करायला पाहिजे. ज्यामध्ये संबंधित व्यापा-याची नोंदणी होईल, त्याला वेगळा पिन कोड देण्यात यावा. संगणकामध्ये अशी यंत्रणा तयार करण्याची आवश्यकता असून त्याला त्याच्या कोड दाबल्यानंतर त्याच्यासंबंधी संपूर्ण माहिती व त्याला त्याच्या परताव्याची किती रक्कम परत येणे बाकी आहे हे दिसू शकेल. त्या रकमेतून १० टक्के रक्कम राखून ठेऊन इतर रक्कम त्याला परत करता येईल व राखीव रक्कम पुढील वर्षामध्ये समायोजित करता येईल. हे पैसे सरकारकडे जमा राहतात. हे ४-४, ५-५ हजार कोटी रुपये चलनामध्ये राहिले तर महाराष्ट्रालाच त्याचा फायदा होणार आहे. परताव्याच्या संदर्भात निर्धारित वेळेत म्हणजे ज्यानुसार चलन भरणा करण्यात येते त्यानुसार किमान ३० दिवसांच्या आत भरणा केलेल्या अधिकच्या रकमेचा परतावा केला जाणार आहे किंवा नाही, आणि केला जाणार असेल तर कधीपासून करण्यात येईल व त्यासाठी विभाग कोणती यंत्रणा स्वीकारणार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी असे विदित केले की, परतावा करताना संबंधित डिलरने जे इनपूट क्रेडीट टॅक्स घेतले असेल तर त्याची तपासणी करणे आवश्यक असते आणि सदरचे काम व्यापक स्वरुपाचे असून त्यासाठी मोठ्या प्रमाणात मनुष्यबळाची आवश्यकता आहे. या कामासाठी सक्षम कर्मचारी/अधिकारी पाठवून तपासणी करणे शक्य होणार नाही. म्हणून यामध्ये विलंब होतो आहे. ही अतिशय अद्ययावत पध्दती आहे की, ज्यामध्ये व्यापा-याने खरेदी केलेली वस्तू आणि विक्री केलेली वस्तू याची संपूर्ण माहिती असेल. ही माहिती ऑनलाईन विभागाकडे उपलब्ध असेल. पध्द्तीमध्ये जे इनपूट टॅक्स क्रेडीट क्लेम केलेली रक्कम असेल ती ही यंत्रणाच करेल आणि आपोआप परताव्याची रक्कम देखील परिगणित करण्याचे काम ही यंत्रणाच करील.

ज्याप्रमाणे टॅक्स वसुली करताना दंड आकारण्यात येतो त्याप्रमाणे ही परताव्याची रक्कम देताना त्यांना मासिक किंवा त्रैमासिक किंवा सहामाही व्याज देण्यासंबंधी काही कार्यपद्धती विकसीत केली आहे किंवा नाही, की पूर्ण वर्षाचे निर्धाश्रण झाल्यानंतरच ते देता येईल अशी विचारणा समितीने केली असता यासंदर्भात विभागीय सचिवांनी खुलासा केला की, व्यापा-यांना त्यांची परताव्याची रक्कम वेळच्या वेळी मिळालीच पाहिजे. आज जी संगणकप्रणाली विभागाकडे कार्यरत होण्याच्या अंतिम टप्प्यावर आहे त्यामध्ये डिलर जो ऑडीट रिपोर्ट ७०४ क्रमांकाचा भरतो त्याच्यामध्ये ज्याच्याकडून त्याने वस्तू खरेदी केली त्यासंबंधी डिलरनिहाय विभागाकडे गोषवारा असतो. पण जे एसीपी प्रणालीचे नवीन पध्द ती विभागाकडे कार्यरत आहे त्यामध्ये नोंदणीचे काम २५ मे पासून सुरू केले आहे. विरणपत्र आणि प्रदानाचे काम कदाचित पुढील २ महिन्यांमध्ये सुरू होणार आहे आणि ती पध्द ती अशाप्रकारे बनविली आहे की, डिलर्स त्यांची प्रत्येक वस्तुची खरेदी आणि विक्री इनव्हाईसवाईज त्यामध्ये नोंदविणार आहेत. हे मॉडेल पध्दतती अशा पध्दतीने बनविले आहे की, त्याचे मॅचिंग देखील पध्दमतीमध्ये दिसणार आहे. ज्या डिलर्सकडून खरेदी केलेला माल त्या डिलर्सने त्याच्या रिटर्न्समध्ये दाखविला आहे की नाही हे देखील त्याला डिलर लेजर म्हणून दिसणार आहे. त्यामुळे अशा प्रकारची प्रणाली भारतामध्ये कोठेही विकसित नाही. त्यासंबंधी विभाग आता प्रयत्न करीत आहे आणि या पायलट प्रोजेक्टमध्ये विभागाला यशस्वी निकाल मिळत आहेत. ही प्रणाली जर यशस्वी झाली तर असे होईल की, एका महिन्याचे जर रिटर्न भरले तर त्याच्या दुस-या महिन्यात विभाग मुभा देणार आहे की, मधल्या एक महिन्यात ग्राहकाने पडताळणी करुन घ्यावी की, तुमच्या विक्रेत्याने त्यासंबंधीचे इनव्हाईसेस आहेत ते दाखविले आहेत की नाहीत. दुस-या महिन्यापर्यंत ते दाखविले नसतील तर तेवढी रक्कम विभाग परत करणार आहे. शिल्लकची रक्कम मॅच होणार असल्यामुळे नियमामध्ये विभागाला त्यासंबंधी निर्णय घ्यावा लागेल की, विभागास ते लवकरात लवकर ॲटोमॅटिक देता येईल. कारण आज रोजी यासंबंधी नियम ५०१ नुसार संबंधित व्यापा-याने अर्ज करावयाचा असतो आणि त्यावर छाननी करुन तो अर्ज विभाग निकाली काढू शकतो. पण ही नवीन प्रणाली जर मार्च अखेरपर्यंत यशस्वीपणे चालली तर विभागाला त्याप्रमाणे पुढे कार्यवाही करणे शक्य आहे.

या यंत्रणेमध्ये विभागाला ती सुधारणा करता येते. आता १५ ऑक्टोबरपासून व्यापा-यांच्या खात्यावर डायरेक्ट एनईएफटीद्वारे परताव्याची रक्कम पाठविण्यास सुरूवात केली आहे. ही नवीन प्रणाली सुरू करताना बहूतेक आता असे दिसते की, आता जीएसटी येणार आहे. जीएसटीमध्ये सुध्दा डिलरकडून सेल आणि पर्चेसच्या बाबतीत अशाच प्रकारे डाटा इनव्हाईसमध्ये घेतला जाणार आहे. देशातील ७ राज्यांमध्ये अशा प्रकारचा डाटा इनव्हासईसमध्ये घेण्याचे काम गेल्या एक, दोन वर्षभरापासून सुरू झालेले आहे. डिलरच्या बाबतीत इनव्हासईचा विक्री आणि खरेदीची आकडेवारी विभागाकडे देण्यासंबंधी हा फार मोठा बदल आहे. ती माहिती आल्यावर अशी आशा आहे की, परताव्याच्या बाबतीत बहूतेक योग्य वेळी ते करणे शक्य होईल. सन २०१२-१३, २०१३-१४ आणि २०१४-१५ चे जी अनेक परताव्याची प्रकरणे प्रलंबित आहेत. या बाबतीत काही परतावा विभाग त्यांना देतो आणि १० टक्के रक्कम राखून ठेवण्यात येते. मागच्या वर्षी २०११-१२ या वर्षाचा निर्धारणाचा काळ संपला आहे. या वर्षी २०१२-१३ या वर्षाचा आहे. पुढच्या वर्षी २०१३-१४ टाईमबारींग होणार आहे. त्या त्या वर्षी जो निर्धारण घेतो त्यामध्ये राहिलेला तो १० टक्के

परतावा किंवा जे निर्यातदार आहेत त्यांना ९५ टक्के देण्यात येते आणि जे ५ टक्के राहतात त्यामुळे ती राहिलेली रक्कम निर्धारण पूर्ण केल्यानंतरच त्यांना द्यावा लागतो.

समितीने विचारणा केली की, आता ही २३ हजार प्रलंबित परताव्याची प्रकरणे आहेत ती १० टक्के आणि ५ टक्क्यांची आहेत काय ? याबाबत सचिवांनी सांगितले की, यामध्ये सर्व प्रकरणांचा समावेश आहे.

यासंदर्भात समितीने असे मत व्यक्त केले की, यामध्ये ९० टक्के रक्कम मिळण्यासाठी आता ४ वर्षे तर गेली आहेत. आणि आता १० टक्के रक्कम मिळण्यास आणखी किती वर्षे लागतील ते माहिती नाही. यामध्ये विभागाकडून व्यक्तिशः तपासनीस पाठवून त्याची शहानिशा करणे शक्य नाही. याचाच अर्थ यावर विश्वास ठेवावा लागेल आणि अशी कार्यपध्दती आहे की, जर अशा प्रकारे कोणी फसवणूक केली तर त्याला क्रिमिनल प्रोसिजरप्रमाणे दंडीत करण्यात येते अशी कायद्यामध्ये व्यवस्था आहे. असे असताना ज्याला चोरी करावयाची आहे तो कर भरणारच नाही तर बोगस बिले देईल आणि बोगस बिलांच्या प्रकरणांच्या बाबतीत विभागीय सचिवांना वेगळे सांगण्याची गरज नाही. कारण त्यांनी हा विषय भरपूर चांगल्या पध्दतीने हाताळला आहे. अशी कामे आजही मुंबई शहरात सुरु आहेत आणि बाकीच्या ठिकाणीही सुरु असतील. जो व्यापारी इमानदारीने कर भरतो आणि त्याला त्याची परताव्याची रक्कम परत मिळाली पाहिजे त्याच्यावर अविश्वास दाखविला जात आहे. ही २३ हजार प्रकरणे तेव्हापासून प्रलंबित असल्यामुळे त्यांचा निपटारा करण्याची आवश्यकता आहे. अन्यथा आता २०११-१२ या वर्षाचे सेटलमेंट आज करण्यात येऊन ९० टक्के रक्कम देण्यात येत आहे आणि २०१२-१३ या वर्षाची रक्कम पुढच्या वर्षी देण्यात येणार आहे. म्हणजे त्यांची परताव्याची रक्कम २-२, ३-३ वर्षे उशिराने निकाली काढण्यात येतात तर अशी प्रकरणे लवकर निकाली काढण्याची सुविधा नसेल तर त्यांना व्याज दिले पाहिजे. जेवढे व्याज वसूल करण्यात येते तेवढे व्याज द्यावे, हे तर योग्य विभागाकडून नाममात्र व्याज देण्यात येते. घेताना विभाग व्याज आकारतो ते २१ टक्के असते असे मत समितीने व्यक्त केले यासंदर्भात विभागीय सचिवांनी खुलासा केला की, पहिल्या महिन्यासाठी १५ टक्के व्याज आकारण्यात येते. त्यानंतर पहिल्या महिन्यापासून पुढील ३ महिन्यांपर्यंत १८ टक्के व्याज आकारण्यात येते आणि त्यापुढील कालावधी असेल तर २१ टक्के व्याज आकारण्यात येते.

म्हणजे तीन महिन्यांच्या वरचा कालावधी असेल तर २१ टक्के व्याज आकारणी करण्यात येते आणि दुस-या बाजूला विभागाकडून ४-४ वर्षे त्यांचे पैसे वापरण्यात येतात तर त्यांना २१ टक्के व्याज दिले पाहिजे. व्यापा-याने जो माल खरेदी केला असेल त्याबाबत जर तो माल विक्री केला असेल त्याला विक्रेता म्हणून आणि खरेदीदार म्हणून यंत्रणेद्वारे कोडवर दाखविण्यात येणार कि नाही त्यानंतर विभाग ठरविणार की, यापुढील काळामध्ये त्याला परतावा द्यावयाचा आहे किंवा नाही. विभागाने कोड यंत्रणा लागू करावी की, ज्याच्याकडून माल घेतला असेल त्याचा कोड खरेदीदारास माहिती असेल. ज्याप्रमाणे पॅन कार्डला नंबर दिले आहेत तसे यासंबंधी कोड नंबर निर्माण करावेत. विक्रेता आणि खरेदीदार यांना एकमेकांचे कोड माहिती असले पाहिजेत आणि त्यांनी एकमेकांचे कोड टाकल्यानंतरही क्रॉस टॅली होत नसेल तर त्यासंबंधी कॉम्प्यूटरवर तपासण्याची सर्व व्यवस्था आहे. ज्याच्याकडून माल खरेदी केला असेल आणि जो विक्रेता असेल आणि खरेदीदार म्हणून त्याची नोंदणी केली असेल तर ते खात्री करणार आहेत आणि त्यासाठी ते एक महिन्याचा वेळ घेणार आहेत. त्यांना एक महिन्याचा वेळ विभागाकडून देण्यात येईल आणि त्या कालावधीत त्यांनी पडताळणी करुन घ्यावी. त्यासाठी सोपा मार्ग असा आहे की, व्यापा-यांना कोड नंबर दिले पाहिजेत. विक्रेत्याच्या कोड नंतर खरेदीदार टाकेल आणि खरेदीदाराचा कोड नंबर विक्रेता टाकेल असे समितीने सुचविले.

समितीने केलेली सूचना योग्य आहे. याबाबत जो टॅन नंबर असतो तो युनिक आहे आणि त्या टॅन नंबरप्रमाणे मॅचिंग होते असे विभागीय सचिवांनी विदित केले.

हे माननीय मुख्यमंत्र्यांना सांगून समाविष्ट करण्यासाठी सांगावे की, विक्रेत्याचे आणि खरेदीदाराचे कोड नंबर त्याबरोबर करावेत. या एका वर्षामध्ये ती पध्दती देखील विभाग आणणार आहे की, जेणेकरुन ह्या सर्व अडचणी दूर होतील. आता विभाग सेफच्या अंतर्गत इथपर्यंत आला आहे आणि २३ हजारहून अधिक परताव्या प्रकरणांची त्यांनी काळजी घेतली आहे. असे मत समितीने व्यक्त करून मात्र जे सन २०१३ पूर्वीचे परतावे असतील आणि जी ५-५, ७-७, आणि ८-८ वर्षांपूर्वीची प्रकरणे असतील, अशा सर्व प्रकरणांचा निपटारा विभाग किती दिवसात करणार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी विदित केले की, अशी प्रकरणे फार कमी आहेत. तुरळक प्रमाणामध्ये परतावे राहिले आहेत. कारण त्यांची निर्धारणाची मुदत संपलेली आहे आणि ज्यांना देय होते त्यांचे परतावे विभागाने दिलेले आहेत. फक्त आता अपिल आणि तशी जी प्रकरणे आहेत तेवढीच राहिली आहेत. यावर समितीने सूचित केले की, विभागाने सन २०१३ पूर्वीच्या सर्व प्रकरणांना पुढील तीन महिन्यांच्या आत मार्गी लावण्याची कार्यवाही करावी.

लेखा परीक्षा निष्पत्ती, परताव्याचे संस्करण व प्रदान करण्यातील विसंगती :

१०० प्रकरणांमध्ये २००५-२००६ ते २००९-१० या मधील विविध कालावधीसाठी परतावा आवेदने विभागाकडे ३१ मार्च २०११ रोजी किंवा तत्पूर्वी प्राप्त झाली होती. या सर्व प्रकरणांमध्ये ३० सप्टेंबर २०११ आणि ३० जून २०१२ पूर्वी परतावा देणे आवश्यक होते. परंतु सदरचा परतावा सहा महिने विलंबाने दिला गेल्यामुळे शासनाचे ८.१८ कोटी रुपयांचे नुकसान झाले, याबद्दल खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, महालेखाकारांच्या परिच्छेदामध्ये जी उदाहरणे दिली आहेत त्यासंदर्भात काही प्रकरणांमध्ये खोलवर चौकशी केली असता असे कळले की, चुकीचा इनपूट टॅक्स क्रेडीट क्लेम केलेला होता. विहित मुदतीत ३० सप्टेंबर, २०११ पर्यंत परतावा दिला असता तर शासनाचे मोठे नुकसान झाले असते. मे. सॅम टेक्नो मॅक प्रा.लि., या कंपनीच्या व्यापा-याने १२ लाख ५२ हजार रुपयांचा परताव्याचा दावा दाखल केला होता. त्यानंतर पडताळणी केले असता १५ लाख ४५ हजार ७७१ रुपये व्यापा-यांकडे वसुली निघाली आहे. इनपुट टॅक्स क्रेडिटचा पडताळणीशी संबंध येतो तेव्हा क्रॉस व्हेरिफिकेशन व्यक्तीशः करायचे की पध्दतीने करायचे हे ठरविणे आवश्यक आहे. इनपुट टॅक्स क्रेडिट व्हेरिफिकेशन करणे अत्यंत आवश्यक आहे अन्यथा यामध्ये शासनाच्या महसुलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ शकते.

विभागाने ८ वर्षे परतावा केलेला नाही, तसेच त्यांचे निर्धारण केलेले नाही. जास्तीत जास्त २४ महिन्याचे व्याज दिलेले आहे कारण जास्तीत जास्त २४ महिन्यांची मर्यादा आहे. त्यामुळे करदात्याचे नुकसान झालेले आहे. विभागाकडे अशी एखादी नवीन पद्धती असती तर विभागाला व्याज देणे टाळता आले असते. विभागाकडून कितीही विलंब झाला तरी करदात्याला केवळ २४ महिन्यांचेच व्याज मिळणार आहे. हा चुकीचा पायंडा आहे, असे विभागाला वाटत नाही काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, २४ महिन्यांची अट विक्रीकर कायद्यामध्ये दिलेली आहे.

एका बाजूला व्यापा-यांना १५, १८, २१ टक्के व्याज आकारण्यात येते आणि दुस-या बाजूला परताव्याच्या रकमेसाठी दोन वर्षाच्या पुढील व्याज दिले जात नाही. अशा परिस्थितीत दोन वर्षाच्या आत निर्धारण झाले पाहिजे, यादृष्टीने कार्यपध्दतीत सुधारणा केली पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता यासंदर्भात विभागीय सचिवांनी खुलासा केला की, सॅपची (SAP) अंमलबजावणी केली तर यामध्ये निश्चितपणे सुधारणा होईल. ही परिस्थिती यानंतर राहणार नाही. इनपुट टॅक्स क्रेडिट पडताळणी वेळेचा अपव्यय होत असतो, परंतु नवीन पध्द्तीमध्ये ते तपासण्याची आवश्यकता राहणार नाही. पध्दचती स्वतःच व्हेरिफॉय करुन देईल त्यामुळे निर्धारण आदेशामध्ये कोठल्याही प्रकारचा विलंब होणार नाही.

२४ महिन्याच्या आत अधिका-यांनी परताव्याची प्रकरणे निकालात काढली पाहिजेत, यासाठी ही अट घालून दिली होती. विभाग व्याज देण्यासाठी २४ महिन्याची अट घालणार, परंतु परतावा देण्यासाठी ४८ महिने लागणार, यामध्ये काही सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. सॅप प्रणाली लागू झाल्यानंतरही सन २०१३ पूर्वीची हजारो प्रकरणे प्रलंबित आहेत, ती अद्याप निकाली निघालेली नाहीत. सॅप प्रणाली लागु झाल्यानंतर सुध्दा अगोदरची हजारो प्रकरणे प्रलंबित राहतील. यासाठी व्यापा-यावर विश्वास ठेवायला पाहिजे. व्यापारी चोर आहेत, हा दृष्टीकोन काढून टाकला पाहिजे. वैयक्तिक पडताळणी करण्यासाठी कोठलीही पध्दुती नाही त्यामुळे परतावा देण्यासाठी ४-४ वर्षे लागतात.विभागाने आता परतावा देण्यासाठी १५०० लोकांची नियुक्ती केलेली आहे. पूर्वी ३५० अधिकारी होते. आता १८०० अधिकारी आहेत असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी याबाबत अधिक माहिती देताना सांगितले की, सन २०१६ पासून वित्त विभाग फंगशन्ल बेसवर होता, तो आता जॉग्राफिकल बेसवर केलेला आहे. एका अधिका-याकडे डिलर राहणार आहे. तोच अधिकारी परताव्याची प्रकरणे हाताळणार आहे. आता ३९० अधिका-यांऐवजी १६७२ अधिकारी उपलब्ध झालेले आहेत त्यामुळे परताव्याची प्रक्रिया आणखी जलद गतीने होणार आहे. यामुळे ॲटोमोशनचा तसेच प्रशासकीय बदलाचा चांगला फायदा होणार आहे.

आता केंद्र सरकार जीएसटी लागू करणार आहे, त्यामुळे त्यासंबंधी राज्य सरकारची कोठली भूमिका राहणार आहे? जीएसटीची पध्दती अद्यापपर्यंत आपल्याला कळलेली नाही, परंतु अधिकारी स्तरावर याची चर्चा होत असेल की, कुठल्या पध्दतीने लागू होणार आहे. त्याची अगाऊ तयारी सरकारने सुरु केली आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी असे विदित केले की, जीएसटीमध्ये राज्य शासनाचा मूल्य विध्रित कर, एन्ट्री टॅक्स, केंद्र सरकारचा सर्व्हिस एक्साईज टॅक्स, केंद्र शासनाची सेंट्रल एक्साईज ड्युट्टी, राज्य सरकारचा शुगर केन परचेस टॅक्स हे सर्व एकत्रित होणार आहे. यासंदर्भात केंद्र सरकारतर्फे जी कार्यवाही सुरु आहे त्यामध्ये राज्य शासन प्रत्येक समितीमध्ये सदस्य आहे. केंद्र सरकारने वस्तुसेवा कराचे (जीएसटी) अधिनियमाचे प्रारुप तयार केले आहे, त्यावर राज्य शासन एक वर्षे काम करीत होते. ते आता हरकती मागविण्यासाठी पब्लिक डोमेनमध्ये आणले आहे. नोंदणी, विवरण प्रदान आणि परतावा ही चार क्लॉजेस जीएसटीमध्ये

राहणार आहेत. या कार्यपध्दतीचे प्रारुप तयार करुन पब्लिक डोमेनमध्ये टाकले आहे. पूर्व, पश्चिम, उत्तर आणि दक्षिण या चार ठिकाणी मोठ्या कार्यशाळा झालेल्या आहेत. त्याच्यामध्ये ज्या सूचना आल्या, त्या अंतर्भूत करुन एम्पॉवर कमिटी ऑफ फायनान्स मिनिस्ट्रीने त्याला मंजुरी दिली आहे. आता वस्तुसेवा कायद्याचे नियम तयार करण्याचे काम सुरु असून त्याचे प्रारुप सुध्दा महिना दीड महिन्यात पब्लिक डोमेनमध्ये टाकण्यात येणार आहे. या व्यतिरिक्त आणखी काही मुद्दे केंद्र सरकार आणि राज्य सरकारचे आहेत. राज्य सरकारचा व्यापा-यांवर नियंत्रण कसे राहणार, कसे निर्णय दिले जातील, निर्धारण कसे होईल, यासंबंधी काही मुद्यांवर चर्चा चालू आहे. एक दोन महिन्यात ते अंतिम होईल. या व्यतिरिक्त केंद्र सरकार आणि राज्य सरकारने मिळून एक जीएसटीएन कंपनी स्थापन केली आहे. या कंपनीचे काम चालू झालेले असून त्यांनी सॉफट्वेअर तयार करण्यासाठी इन्फोसीस कंपनीला नेमलेले आहे. संपूर्ण भारत देशामध्ये एकच सॉफ्टवेअर राहणार आहे. यामध्ये डिलर नोंदणी, प्रदान आणि विवरण या तीन गोष्टी करणार आहे. केंद्र सरकार आणि राज्य सरकारने जीएसटीएनला नेमून सहा महिने झालेले आहेत. काही राज्ये अशी आहेत की, नोंदणी, विवरण आणि प्रदानासंदर्भात तेथील व्यापा-यांना थोडी तोंड ओळख होणार आहे. विवरण, लेखापरिक्षण, निर्धारण हे सर्व नंतर मागाहून आपल्याला पाठीमागून करावी लागणार आहेत. यासाठी राज्याला मुभा होती की, आपण स्वतःचा सॉफ्टवेअर तयार करावे किंवा जीएसटीएनने शासनाला सॉफ्टवेअर तयार करुन द्यावे. महाराष्ट्र मॉडेल एक राज्यामध्ये आहे. शासनाला त्यांच्या सॉफ्टवेअरमध्ये फार बदल करावे लागले असते. सॅपमध्ये जो विक्रेता काम करणार आहे, त्याच्याकडे ही जबाबदारी दिलेली आहे. जीएसटीएन मध्ये जे बदल होणार आहेत, त्याप्रमाणे विभागाच्या सॉफ्टवेअरमध्ये बदल करावे लागणार आहेत. हे विभागाने कामाच्या स्वरुपाबाबतच्या माहितीमध्ये दिलेले आहे. जीएसटीएन कंपनी एक एक अशी मागणी विभागाकडे पाठवित आहे. त्यांच्याकडून अंतिम गोष्टी सप्टेंबरपर्यंत मिळतील. ३१ मार्च २०१७ पर्यंत विभाग आपली तयारी करुन ठेवणार आहे. पुढील चार महिन्यांत देशामध्ये ट्रेनिंग देण्याचे काम मोठ्या प्रमाणावर सुरु करावे लागणार आहे. जीएसटी बद्दल केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांना मोठ्या प्रमाणावर प्रशिक्षण द्यावे लागणार आहे. केंद्राने उत्पादन शुल्क कायद्याची अंमलबजावणी कधी केली नाही. त्यांचेसोबत कधी व्यापारी आले नाहीत आणि सेवा कराची अंमलबजावणी राज्याने कधी केली नाही. हे विभागासाठी नवीन असणार आहे. जीएसटीमध्ये केंद्र आणि राज्य सरकारचे मिळून प्राविण्या मिळविलेले प्रशिक्षणार्थी निश्चित झाले आहेत. हे प्राविण्या मिळविणारे प्रशिक्षणार्थी दुस-यांना प्रशिक्षण देणार आहेत. संपूर्ण देशभरामध्ये सात हजार अधिका-यांना ट्रेनिंग मिळणार आहे. येत्या फेब्रुवारी २०१७ अखेरपर्यंत हे प्रशिक्षणाचे काम पूर्ण होणार आहे. जीएसटीच्या कायद्याची माहिती देण्यासाठी व्यापा-यांनी अभ्यासवर्ग सुरु झालेले आहेत. केंद्र आणि राज्य सरकारकडून अशा प्रकारची तयारी सुरु आहे. प्रशिक्षण सुध्दा सोबत सुरु राहणार आहे.

महाराष्ट्र स्टेट पॉवर कंपनी ही सरकारची कंपनी आहे. या कंपनीचाही परतावा अमान्य केलेला आहे. महालेखापालांचा जो आक्षेप होता तो त्यांनी अमान्य केला आहे. यासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, त्या कंपनीचा कारभार फार मोठा आहे. एका वर्षात १६९ कोटी रुपयांची इनपुट टॅक्स क्रेडिटची छाननी करायची होती. कंपनीने दिलेल्या नमुन्यात ६१ कोटी ६१ लाख रुपये परतावा मागितला होता. त्यामध्ये कंपनीने खरेदीचा तपशील दिलेला नव्हता त्यामुळे विभागाने तो छाननीमध्ये घेतला. तो ६१ कोटी ५७ लाख रुपयापर्यंत आला. पुन्हा सुधारित आदेश पारित केली त्यामध्ये अंतिमतः ४० कोटी ८५ लाख रुपये एवढा परतावा अंतिम दिलेला आहे. अशा प्रकाराची मोठी प्रकरणे आहेत, याला वेळ लागतो. हे अवघड काम आहे.

२.४.३.२ लेखा परीक्षा निष्पत्ती

परताव्याचे संस्करण व प्रदान करण्यातील विसंगती :

विभागाच्या निर्धारण आणि परताव्यामध्ये खूप चुका असल्यामुळे ५१ लक्ष रुपये जास्तीचे गेले आहेत. यातील चार प्रकरणांमध्ये चूक दुरुस्ती प्रक्रिया करुन जमा महसुलाची हानी टाळण्यात आली आहे. या चार केसेसपैकी तीन केसेसमध्ये संबंधित व्यापारी अपिल मध्ये गेले. विभागाने सांगितले की वसुली झाली, परंतु वसुली झालीच नाही. एका प्रकरणात संबंधित व्यापारी उच्च न्यायालयात गेले तर एका प्रकरणी राज्य सरकार उच्च न्यायालयात गेले. तिस-या प्रकरणांमध्ये विक्रीकर प्राधिकरणाकडे प्रकरण आहे. यासंदर्भात माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, इंडोकाउंटची एक निवाडा आहे. मे.विराज प्रोफाईल लिमिटेड या कंपनीने मे.इंडोकाउंट इंड या प्रकरणाच्या निर्णयाप्रमाणे व्यापा-याच्या बाजूने निर्णय दिला. विभागास सदर निर्णय मान्य नसल्याने माननीय न्यायाधिकरणाच्या निर्णयाविरुध्द विभागाने माननीय मुंबई उच्च न्यायालयात अपिल दाखल केले आहे. मे.मेघा रबर टेक्नॉलॉजीस प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने लेखा परिक्षणाच्या मुद्यानुसार व्यापा-याने रु.९४,९८७, दिनांक ८-१०-२०१५ रोजी भरलेले आहेत.

विभागाने १७ जून, २०१६ पर्यंतची माहिती दिलेली असून या तीन प्रकरणांमधील सद्यःस्थिती संबंधी माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, मे.विराज प्रोफाईल मध्ये तसेच मे.बेबिल्ज फ्लांजेस वर्क्स प्रा.लि. मध्ये दिनांक १७ जून रोजी विभागाने नोटीस ऑफ मोशन उच्च न्यायालयात दाखल केलेले आहे. यामध्ये प्राधिकरणाकडे विभागाच्या विरोधात निर्णय दिला आहे. १-७-२०१४ चा इंडोकाउंटचा प्राधिकरणाचा एक निर्णय होता. त्यामध्ये असा उल्लेख होता की, पार्ट रिफंड कलम५१ खाली दिला असेल आणि राहिलेला नंतर दिला तर पूर्वी जो दिलेला आहे, त्यावर व्याज द्यावे. याचा चुकीचा अर्थ काढला गेला आहे. असे झाले तर शासनावर भूर्दंड बसू शकतो. विभाग त्या प्रकरणी उच्च न्यायालयात गेला आहे. त्यामध्ये विभागाला थोडीशी दुरुस्ती करायची गरज आहे. या प्रकरणी विभागास न्याय मिळेल. अन्यथा असे बरेच लोक न्यायालयात जातील की, पूर्वी जी रक्कम दिलेली आहे, त्यावर व्याज देण्यात यावे, असा त्याचा अर्थ होऊ शकतो.

मे.इंडोकाउंट इंड संदर्भात न्यायाधिकरणाकडे एक निवाडा दिला होता. हे व्यापारी त्याला प्रेसिडेंट केस बनवित आहेत. व्यापारी वारंवार त्या ट्रॉयब्युनलकडे जातात. ही केस चाटर्ड अकाउंटटच्या लक्षात आली आहे. आता व्यापारी हा संदर्भ घेऊन त्याच न्यायाधिकरणाकडे जातात. राज्य सरकारने उच्च न्यायालयात जाऊन आपली बाजू भक्कम केली पाहिजे. प्रत्येक प्रकरणामध्ये याचा संदर्भ म्हणून घेतले तर ते अडचणीचे होईल. प्रतिनिधींनी हे आता विभागाच्या लक्षात आणून दिले आहे. अन्यथा सरकारला परताव्याची कोट्यवधीची रक्कम द्यावी लागेल. सरकारने ही बाब न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्याची गरज आहे असे मत समितीने व्यक्त केले. तसेच दोन प्रकरणे उच्च न्यायालयात असून एक केस प्राधिकरणाकडे आहे. ५० लाख रुपये जास्तीचे गेले आहेत. याला काहीतरी पध्दती असली पाहिजे. त्यांनी कोर्टाकडे जाण्याअगोदर विभागाकडे परताव्यासाठी यावे, अशी कोठेतरी पध्दती असली पाहिजे. विभागाने त्यांना ५०, ५१ लाख रुपये जास्तीचे देऊन टाकले आणि विभागच त्यांच्या पाठीमागे फिरतो आहे. यात शासनाचे पैसे अडकले, याला कोठेतरी पुन्हा तपासले पाहिजे. यादृष्टीने विभागाने काही कारवाई केलेली आहे का? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, विभागामध्ये दोन गोष्टी करण्यात येत आहेत. विभागाचा एक अंतर्गत लेखापरीक्षण कक्ष आहे. सन २००७ मध्ये विभागाचे पुनर्रचना झालेली आहे. आता कामाचा व्याप आणखी वाढलेला आहे. आता जीएसटी लागू होणार आहे. त्या अनुषंगाने पुनर्रचना समिती बसलेली आहे. विभागाने पुनर्रचना समितीमध्ये अंतर्गत लेखापरीक्षण भक्कम करण्याचा निर्णय घेतलेला आहे. ज्यावेळेस बॉम्बे सेल्स टॅक्स होता, त्यावेळेला काही अधिकारी ऑर्डरचे स्कॅनिंग करायचे. काही ऑफिसरची टेस्ट करण्यासाठी काही काही प्रकरणे बाजूला काढण्यात येत होत्या, त्याचप्रमाणे काही अपिल बाजूला काढण्यात येत होते व ते स्कॅन करण्यात येत होते, ही कामे बरोबर झाली किंवा नाहीत ते पाहून ती कामे नंतर बरोबर केली जात होती.आता ही स्कॅनिंगची पध्दत पुन्हा सुरु करण्यात येणार आहे. या पुनर्रचनेच्या कामासाठी काही अधिकारी वेगळे देण्यात येणार आहेत. असे केल्यामुळे विभागाच्या इंटरनल चेक्स ॲन्ड बॅलन्समध्ये वाढ होईल. महालेखापाल कार्यालयाने ही चूक निदर्शनास आणली आहे. विभागाचे इंटरनल ऑडिट काही प्रमाणात कामे करते. परंतु ती कामे अपूर्ण पडत आहेत. या दृष्टीने या दोन्ही गोष्टी विभाग करीत आहे. येत्या चार ते पाच महिन्यांत या कामात निश्चितपणे प्रगती दिसून येईल.

या विषयाबाबत सचिव, वित्त विभाग, विक्रीकर आयुक्त यांच्याबरोबर चर्चा झाली आहे. पेअर रिव्हू होऊ शकतो काय यासंदर्भात विभाग विचार करीत आहे. पेअर रिव्हू झाला तर एका अधिका-याने पास केलेल्या निर्धारण आदेश दुस-या अधिका-याला तपासता येतील तसेच काही ठराविक निर्धारण अधिकारी असे आहेत की, काही कारणाने यात कॉम्पिडिशनचे प्रश्न असू शकतील किंवा दुसरे काही कारण असू शकते. जे अधिकारी नेहमी अशा प्रकारच्या चुका करतात त्यासाठी विभागाकडून अशी पध्दती तयार करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. अशा अधिका-यांना इयर मार्क करुन त्यांच्याकडून असेसमेंटची कामे काढून घेण्यात येतील. त्यांना इतर कामे द्यावीत असा विभागाचा विचार चालू आहे. विभागीय सचिवांनी सांगितले.

महालेखापाल यांनी सांगितले की, ५१ लाख रुपयांचे व्याज नियमबाह्य रितीने देण्यात आले. ही बाब विभागाने कबूल केली व विभागाकडून न्यायालयात बाजू मांडण्यात येत आहे. ही रक्कम चुकीने दिली गेली. ज्यांनी चूक केली त्यांच्यावर जबाबदारी निश्चित केली पाहिजे. ही चूक छोटी नाही, अशी जबाबदारी निश्चित केली असेल तर ती कोणत्या अधिका-यावर केली व त्या अधिका-यावर काय कारवाई करण्यात आली. कारवाई केली नसेल तर आता कारवाई प्रस्तावित करण्यात येईल काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, ज्या अधिका-यांकडून चूक घडली, त्याक अधिका-यांकडून जबाब घेण्यात आलेला आहे, त्यानंतर पुढील कार्यवाही निश्चित करण्यात येईल.

समितीने पुढे विचारणा केली की, यामध्ये जो गुन्हेगार आहे तो विभागास मान्य आहे. महालेखापाल यांनी सांगितलेला आक्षेप विभागाने मान्य केला आहे. ५१ लाख रुपये चुकून दिले. यामुळे शासनाच्या ५१ लाख रुपयांचे नुकसान झाले हे विभागाला मान्य आहे. त्या अधिका-याने व्यापा-याशी काय संधान बांधले असेल त्याचा हेतू काय असेल, हा भाग वेगळा आहे. त्या अधिका-यांवर नुसती जबाबदारी निश्चित करुन हे काम होणार नाही, त्या अधिका-याला निलंबित करुन त्यांच्याकडील सर्व अधिकार काढून ही रक्कम वसूल करण्याची कारवाई केली आहे काय ? या पेक्षा जास्त रकमा असू शकतात. या अधिका-याने अशा किती प्रकरणामध्ये व्याज जास्त दिले आहे ? महालेखापाल यांनी निवडक प्रकरणे तपासली असून ही चूक लक्षात आली आहे.

ही बाब महालेखापाल यांनी विभागाच्या लक्षात आणली आहे, याबाबत विभागाने पुनर्विलोकन केले व त्यानंतर हे प्रकरण समोर आली आहे. हे प्रकरण खूप जुने म्हणजे २००७-२००८ व २००९ मधील आहे. त्यावेळी झालेल्या निर्धारणामध्ये जे अधिकारी दोषी आहेत, त्यांच्याकडून स्पष्टीकरण घेण्यात आले आहे काय ? आता शासनाचे ५१ लाख रुपये अडकले आहेत, सन २०१३ मध्ये पुनर्विलोकन आदेश काढला आहे, तरी देखील आजच्या तारखेला ते पूर्ण पैसे अडकलेले आहेत, या दृष्टीने विभागाच्या माध्यमातून त्यांची वेतनवाढ थांबविण्यात कारवाई केली आहे काय, त्यांची पदोन्नती थांबविण्याची कारवाई केली आहे काय ? अशा अधिका-यांना निलंबित करुन त्यांनी जितके असेसमेंट केले त्याची संपूर्ण चौकशी झाली पाहिजे. जे ५१ लाख रुपये दिले आहेत ते त्यांच्याकडून वसूल झाले पाहिजे, याबाबत विभाग कारवाई करणार आहे काय ? याबाबत विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, या प्रकरणात संबंधितांना कारणे दाखवा नोटीस देऊन त्यांच्याकडून खुलासा मागविण्यात येत आहे.

संबंधित अधिका-यांनी चूक मान्य केली तरी आतापर्यंत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली नाही ? म्हणजे त्या अधिका-याला पाठीशी घालण्यात येत आहे. त्यांनी निर्धारण केलेली प्रत्येक प्रकरणे तपासली पाहिजे. कारण त्यांनी साटेलोटे करुन पैसे परत दिले असावेत. हा विषय आता लोकलेखा समिती समोर आला म्हणून विभागाकडून कारवाईची सुरुवात होणार आहे. या बाबीला आता सात ते आठ वर्षांचा कालावधी झालेला आहे, सचिवांनी असे सांगितले की, एखादा अधिकारी वारंवार चुका करीत असेल तर त्याचा ते तपास करतील तर त्यांनी उदाहरण म्हणून हे प्रकरण घ्यावे. अशा प्रकरणी नागरी सेवा नियमानुसार कोणती कारवाई करण्यात येते. अशा प्रकरणात फक्त कारणे दाखवा नोटीस देणे योग्य वाटत नाही असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी आश्वासित केले की, या प्रकरणी शेवटपर्यंत कार्यवाही करण्यात येईल, या संदर्भातील सविस्तर माहिती नंतर येईल, या प्रकरणामध्ये असे जाणवले आहे की, यात न्यायीक मुद्दा आहे, न्यायालयाचे काही आदेश आहेत, मागील पतराव्याच्या संदर्भात संबंधिताना व्याज देता येईल. या प्रकरणामध्ये अशी थोडी संदिग्धता आहे. त्या संदर्भातील उत्तर आल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

विभागाच्या नियमानुसार २४ महिन्याच्यावर व्याज देता येणार नाही. नियमानुसार अर्धा टक्क्याच्यावर व्याज देता येत नाही असे समितीने निदर्शनास आणले असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, पार्ट पेमेंट पूर्वी दिले गेले होते, त्या पार्ट पेमेंटवर व्याज देण्यात आले.

या प्रकरणात आयुक्तांनी असे लिहिले आहे की, वरील चार प्रकरणामध्ये चूक दुरुस्ती प्रक्रिया करुन जमा महसुलाची हानी टाळण्यात आली आहे, चूक झाली हे विभागाने मान्य केले आहे, चूक विभागाकडून दुरुस्त करण्यात येत आहे. तथापि, प्रतिनिधीच सांगतात की, यामध्ये न्यायिक मुद्दा आहे.

यामध्ये न्यायिक मुद्दा आहे हे मान्य आहे पण अल्टीमेटली ५१ लाख रुपये जास्त गेले आहेत हे विभागास मान्य आहे, म्हणून तर विभागाने पुन्हा निर्धारण केले आहे, न्यायिक मुद्दा नंतर उपस्थित केला उपस्थित केला आहे, परंतु प्रथमदर्शनी त्यांच्याकडून चूक झाली असून आता त्याला सात ते आठ वर्षे झाली आहेत, अशा अधिका-यांवर विभागाच्या माध्यमातून आतापर्यंत कोणतीही कारवाई झालेली नाही असे स्पष्ट दिसत आहे. याबाबत विभागाची काही तरी सिस्टिम असायला पाहिजे. अशा अधिका-यांनी केलेल्या सर्व निर्धारणाची तपासणी केली पाहिजे. त्यानंतर त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. त्यामुळे विभाग संबंधित अधिका-यांवर काय कारवाई करणार ? कारवाई करण्यासाठी कारणे दाखवा नोटीस दयावीच लागेल. कारणे दाखवा नोटीस देण्यात इतका उशीर का झाला आहे ? आज देखील तो अधिकारी कार्यकारी पदावर असून असेसमेंट करीत असेल तर ते योग्य नाही. त्यामुळे त्या अधिका-याला प्रथम निलंबित करण्यात येईल काय ? त्यांनी केलेले सर्व असेसमेंट तपासले पाहिजेत. त्यांच्याकडून ही रक्कम व न्यायालयाचा खर्च वसूल करण्याची कारवाई केली पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, हे अधिकारी कायदयाचे इंटरपिटिशन कॉसीज्युडिशिअल अथॉरिटी म्हणून करतात. या प्रकरणामध्ये न्यायाधिकरणाची

स्थगिती आहे, अपिलाचा आढावा घेतांना विभागाने आदेश पारित केला आहे, त्याला न्यायाधिकरणाने स्थगिती दिलेली आहे. या अधिका-याला कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे. त्या चे उत्तर असे असेल की, त्यांनी जी भूमिका घेतली होती किंवा असेसमेंट ऑर्डर मध्ये त्यांनी जो आढावा घेतला होता, तो न्यायाधिकरणाने मान्य केला आहे. विभागाने या अधिका-याविरोधात कारवाई केली तर ती कायदेशीर होणार नाही. जोपर्यंत या प्रकरणी निकाल लागत नाही तोपर्यंत तो अधिकारी दोषी आहे असे म्हणता येणार नाही. अशा अधिका-यांनी पास केलेल्या निर्धारण आदेशाचा आढावा घेतला पाहिजे व ती कार्यवाही विभाग करणार आहे.

त्या अधिका-यांनी दिलेल्या आदेशाला न्यायाधिकरणाने मान्यता दिली आहे. याचा आधार घेऊन इतर व्यक्ती कार्यवाही करीत असतील, ही बाब आता महालेखापाल यांनी लक्षात आणून दिली आहे. या प्रकरणाला पुर्वोदाहरण समजण्यात तर आले तसे आदेश मंजूर करण्यात येतील. यासंदर्भात सरकारचे म्हणणे काय आहे याबाबत उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर केले आहे काय ? ते अधिकारी आता देखील कार्यकारी पदावर आहेत, यासंदर्भात माहिती अशी आहे की, एक अधिकारी चार ते सात वर्षे एकाच सर्कलला काम करीत असतो. हे अधिकारी आलटून पालटून त्याच सर्कलमध्ये काम करतात. त्यांची बदली अडीच ते तीन वर्षानंतर केली तरी कामाचा ताबा घेतल्यावर सात ते आठ महिन्यात ते परत त्या सर्कलमध्ये काम करण्यासाठी येतात. अशा प्रकारची यादी विभागाने तपासली पाहिजे. असे लक्षात येईल की, एक अधिकारी एका सर्कलमध्ये किती वर्षे काम करतो. हे सर्व तपासले तर त्यांचे सर्व साटेलोटे कळतील. महालेखाकार कार्यालयाने फक्त चार प्रकरणांमध्ये कार्यवाही केली आहे ही बाब अतिशय सोपी आहे, या विभागाचे सचिव म्हणून वित्त विभागाच्या अखत्यारित ते काम करीत आहेत, यासाठी सह सचिव दर्जाचा अधिकारी किंवा वित्त विभागाच्या वरिष्ठ अधिका-यांची नियुक्ती करुन तीन किंवा चार वर्षाच्या कालावधीत अशा प्रकारे जे पार्ट पेमेंट झाले आहेत अशा सर्व प्रकरणांची प्रकरणपरत्वे तपासणी किती दिवसात करण्यात येईल ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, अशी एकूण किती प्रकरणे निघतील याचा आढावा घेऊन त्याबाबतची माहिती समितीसमोर नंतर देण्यात येईल.

वित्त विभागाकडे अंतर्गत लेखापरीक्षण पद्धती नाही काय ? त्यामध्ये अशा प्रकारची प्रकरणे मिळत नाहीत काय ? महालेखापाल यांना चार सामान्य प्रकरणी सापडली आहेत. एका प्रकरणांमध्ये ९४ हजार रुपयांची वसुली झाली आहे. बाकी प्रकरणामध्ये त्या अधिका-यांनी विभागाला अडकवून ठेवले आहे. अशा प्रकारे विभागाकडील अंतर्गत लेखापरीक्षण दुबळे आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी विदित केले की, अंतर्गत लेखापरीक्षण भक्कम करावयाचा आहे. यासाठी जास्त अधिकारी लागणार आहेत.

या प्रकरणी दोषी अधिका-याला अधिकारी पदावरुन दुसरीकडे प्रशासकीय कामासाठी पाठविले पाहिजे हा अधिकारी न्यायाधिकरणाचा प्राधिकृत अधिकारी असला तरी त्याने अशी चूक केली तर महाराष्ट्र शासनाच्या नागरी सेवा नियमाप्रमाणे त्याच्यावर काय कारवाई करता येते ? अशी विचारणा असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, त्या अधिका-याने चूक केली हे सिध्द झाले तर कारवाई करता येते. न्यायाधिकरणाचे म्हणणे असे आहे की, त्यांनी दिलेला आदेश बरोबर आहे. त्यांनी चूक केली हे सिध्द करता आली तर त्यांच्यावर सर्व प्रकारची कारवाई करता येते.

यामुळे हा अधिकारी उच्च न्यायालयात सदर प्रकरणी दोष सिध्द होऊ देणार नाही. हा अधिकारी कोण आहे तो आता कोणत्या पदावर आहे. विभागाकडे या विषयाची तपासणी करण्यासाठी वेगळी यंत्रणा आहे काय ? जेणेकरुन हे सर्व चुकीचे आहे किंवा नाही हे त्या यंत्रणेमध्ये बसविता येईल. महालेखापाल यांनी सांगितले व विभागाने देखील मान्य केले की, ५१ लाख रुपये जास्तीचे गेले आहेत. महालेखापाल यांनी चुकीचे सांगितले तर विभाग मान्य करणार नाही. हा विषय विभागाने मान्य केला आहे, अनेक विषय विभागाने अमान्य केले आहेत, परंतु ५१ लाख रुपये जास्त गेले हे विभागाने मान्य केले आहे, मान्य केल्यावर न्यायिक विभाग उच्च न्यायालयापर्यंत जाणार आहे. विभागाला असे वाटते काय की, ५१ लाख रुपये दिले ते योग्य आहेत. विभागाला हे योग्य वाटत नसेल तर त्या अधिका-याच्या विरोधात विभागाने कारवाई सुरु केली पाहिजे. शासन अपिलात गेले आहे, परंतु त्या अधिका-याला न्यायाधिकारणाच्या निकालामुळे बळ मिळाले आहे, विभाग न्यायाधिकारणामध्ये हारण्यासाठी तोच अधिकारी कारणीभूत असेल.त्या अधिका-याला बाजूला ठेऊन कार्यवाही केली पाहिजे. त्या अधिका-यांच्या कालखंडात जी निर्धारणा झाली आहेत, त्याबाबत वरिष्ठ अधिका-यांची समिती तयार करुन ते सर्व तपासून घ्यावे. त्यामध्ये चूका असतील तर त्या अधिका-याला कार्यकारी पदाव्यतिरिक्त पद देण्यात यावे. हा अधिकारी त्याच पदावर आहे काय ? कारण १० वर्षे अनेक अधिकारी एकाच पदावर कार्यरत राहतात असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, तो अधिकारी आता कोणत्या पदावर आहे याची माहिती नाही. कारण दर तीन वर्षांनी वित्त विभागात हमखास बदली होत असते.

हा अधिकारी तीन ते चार वर्षापूर्वी डेप्युटी कमिशनर झालेला आहे. त्याला हे पद दहा वर्षांपूर्वी मिळायला पाहिजे होते. त्यावेळी असिसटंट कमिशनर म्हणून त्यांची आदेश काढण्यात आलेला आहे. त्या अधिका-याचे नांव रुपचंद ममंदेकर आहे. मे.विरज प्रोफाईलचे आदेश पारीत करणारा हा अधिकारी आहे. बेबिल्ज फलाजेस वर्क्स प्रा.लि., या दुस-या प्रकरणामध्ये ही तोच अधिकारी आहे. याबाबत या अधिका-यांनी मागील तीन ते चार वर्षांत जे कर निर्धारण केले त्याची सखोल चौकशी करण्यात यावी व अशा प्रकारची चूक केली असेल तर त्यांना साईड पोस्टिंग देण्यात यावी अशी सूचना समितीने केली. याबाबत कार्यवाही करण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी आश्वासित केले.

परि.क्र.पृ.क्र.२.४.३.३

ठाणे विभागात १९९३ च्या सामुहिक प्रोत्साहने योजनेखाली (PSI) पात्रता प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या एका व्यापा-यास ११ ऑक्टोबर, २००२ ते ऑक्टोबर, २०१४ दरम्यान कर परताव्याबाबत नियम पाळल्याचे दिसत नाही, या प्रकरणात सामुहिक प्रोत्साहन योजना संपली तरी पण १ कोटी १६ लाख रुपये देण्यात आले आहेत. या योजनेअंतर्गत २.४५ कोटी रुपयांची मर्यादा होती. त्यांना जास्तीचे १ कोटी १६ लाख रुपये जास्त देऊन टाकले आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी माहिती दिली की, या प्रकरणी जो चुकीचा परतावा देण्यात आला आहे, त्यामध्ये सन २००६-०७ मध्ये यासंदर्भात सुधा काढून २४ लाख ९७ हजार रुपयांचा भरणा व्यापा-यांनी केलेला आहे. २००७-०८ व २००८-०९ च्या संदर्भात पुनर्विलोकन आदेश दिनांक ४-१२-२०१३ रोजी पारित केला होता. ६३,२६,९८०/- रुपयांची जास्त मागणी व २००८-२००९ साठी ५२,५६,३०७/- रुपये इतकी मागणी करण्यात आली होती. यामध्ये पहिला अपिल दाखल झाला होता तो व्यापा-याच्या विरोधात गेला आहे. तो व्यापारी आता न्यायाधिकरणामध्ये द्वितीय अपिलात आहे, न्यायाधिकरणाने त्यांना असे आदेश दिले आहेत की, या दोन्ही प्रकरणामध्ये न्यायाधिकरणाने प्रत्येकी २०-२० लाख रुपयांचा पार्ट पेमेंट भरुन घेतले आहेत. राहिलेल्या रकमेसाठी त्याची सुनावणी न्यायाधिकरणा समोर सुरु आहे.

ही केस अत्यंत स्पष्ट आहे, यामध्ये एकूण भांडवली गुंतवणुकीच्या मर्यादेपर्यंत त्याला कर लाभ मिळणार होते. २ कोटी ४५ लाख संपल्यामुळे हा विषय संपला होता. त्या व्यापा-याला विभागाने आणखी १ कोटी १६ लाख रुपये दिले आहेत व आता विभाग न्यायालयात फसला आहे. अशी परिस्थिती आहे किंवा नाही. हा परिच्छेद महालेखापालांनी काढलेला आहे. ही जाणीवपूर्वक केलेली चूक आहे असे वाटते. त्याच्या बॅलन्शीटमध्ये भांडवली गुंतवणुकपेक्षाही जास्त रक्कम भरली होती त्याच्यावर परतावा दिला. म्हणजे जे नजरचुकीचे झाले असे म्हणता येणार नाही. हा ठरवून केलेला व्यवहार आहे. जो परतावा दिला जातो त्यावर वित्त विभागाची देखील मंजुरी असते. वित्त विभागामध्ये ही प्रकरणे तपासली जात नाहीत काय ? नियोजन आणि वित्त विभागामध्ये तशी तरतूद केली जाते म्हणून अशी प्रकरणे नियोजन आणि वित्त विभागाकडे जातात असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, तो इंडस्ट्रीयल प्रमोशन सबसिडीचा विषय आहे. ती सबसिडी उद्योग विभागामार्फत दिली जाते. ती पॅकेज स्कीम असते त्यासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद केली जाते. सद्यःप्रकरणी त्यांनी कर भरलेला आहे त्यावर विभागाकडून सही करुन देण्यात येते त्यानंतर ते त्यांना सबसिडी देतात.

त्या अधिका-यावर कारवाई केली काय ? It is very crystal clear case. तेव्हा विक्रीकर विभाग कोणतीही कारवाई करीत नसेल तर ते योग्य नाही. महालेखापालांनी ही सॅम्पल केस काढलेली आहे. अशाप्रकारच्या अनेक केसेस असतील. अशा केसेससारख्या किती केसेस त्या अधिका-याने केल्या ? त्या अधिका-याचे नाव जाहीर केले पाहिजे. ते सध्या कोणत्या पदावर आहेत हे देखील जाहीर करावे. जर तो अधिकारी संशयित असेल तर त्याला निलंबित करुन त्याची चौकशी करणार काय ? या प्रकरणी न्यायाधिकरणाने २०-२० लाख रुपयांचा भरणा करण्यास सांगितले आहे याचा अर्थ न्यायाधिकरणाला विभागाचे म्हणणे पटलेले आहे. असे असताना त्या अधिका-याला कशासाठी पाठीशी घालण्यात येत आहे ? अधिका-यावर कारवाई का केली नाही ? कारवाई न करणे हे संरक्षण देण्यासारखेच आहे. न्यायाधिकारणाकडे ५ लाख जमा केले की २० लाख रुपये जमा केले ? कारण समितीला दिलेल्या एका पुस्तिकेमध्ये ५ लाख रुपयांचा उल्लेख आहे आणि दुस-या पुस्तिकेमध्ये २० लाख रुपयांचा उल्लेख आहे. याबाबत विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, विभाग कोणताही संरक्षण देत नाही. दोन्ही वर्षांमध्ये २०-२० लाख रुपये भरले आहेत.

अधिकारी कोण आहेत, त्यावेळी ते कोणत्या पदावर कार्यरत होते, आता ते कोणत्या पदावर कार्यरत आहेत, त्यांच्यावर कारवाई केली की, नसेल तर किती दिवसांत आणि कोणती कारवाई करणार ? त्यांना याच केसमध्ये निलंबित करावे. तसेच त्यांची एसीबी आणि ई.डी.मार्फत चौकशी करावी. त्याची प्रॉपर्टी किती आहे हे देखील पहावे अशी सूचना समितीने केली असता

विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, या विशिष्ट प्रकरणामध्येही तोच अधिकारी आहे. श्री.रुपचंद असे त्यांचे नाव आहे. त्यावेळी ते असिस्टंट कमिशनर म्हणून कार्यरत होते. आता ते ठाणे विभागामध्ये डेप्युटी कमिशनर म्हणून कार्यरत आहेत.

मागील प्रकरणामध्ये he was having partial protection, now the Tribunal has also accepted, त्यांची चूक झालेली आहे हे न्यायालयाने मान्य केलेले आहे. तेव्हा त्यास निलंबित करुन त्यांची एसीबी आणि ईडीमार्फत चौकशी करणार काय ? त्यांना निलंबित करुन त्यांच्यावर कायदेशीर करवाई करावी असे समितीने सूचविले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, विभागाने संबधित अधिका-यास निलंबित करण्यासंदर्भातील फाईल सादर केली. परंतु निलंबनाचे अधिकार विभागाकडे नाहीत.

संबंधित अधिका-याने चूक केलेली आहे या समितीच्या मताशी विभाग सहमत आहे काय, he is habitual defaulter, he is not a one time defaulter. कारण मागील प्रकरणामध्ये देखील तेच होते आणि आताच्या प्रकरणामध्ये देखील तेच आहेत. विभागाकडे सक्षम अधिकारी असताना त्यांच्यावर कारवाई झाली नाही याबाबत समितीने आश्चर्य व्यक्त केले. विभाग अशा अधिका-याला संरक्षण देतो असे म्हटले तर ते वाईट वाटेल. पण असे म्हणण्याचा समितीला अधिकार आहे. अधिकारी असे बिनधास्तपणे वागत असतील तर ही यंत्रणा, समिती, आयएएस अधिकारी कशासाठी आहेत ? त्या अधिका-याने हे सर्व केले म्हणून त्याची असिस्टंट कमिशनर पासून डेप्युटी कमिशनरपर्यंत पदोन्नती झाली आणि पुढे कमिशनर म्हणून पदोन्नती होईल. विभागाने संबंधित अधिका-यांवर कारवाई केली नाही तर काहीही केले तरी कारवाई होत नाही आणि पदोन्नती देखील मिळते असा संदेश अन्य अधिका-यांमध्ये जातो. तेव्हा त्या अधिका-यावर कारवाई झाली पाहिजे आणि जे जास्तीचे पैसे गेले आहेत ते व्याजासह वसूल झाले पाहिजे असे मत व्यक्त करुन समितीने पुन्हा विचारणा केली की, त्या अधिका-यावर कोणती कारवाई करणार ? त्या अधिका-यास निलंबित करण्याचे अधिकार सचिवांना नाहीत काय ? किती दिवसांत कारवाई करण्यात येईल ? याबाबत विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, त्या अधिका-यास निलंबित करण्याचा प्रस्ताव माननीय वित्त मंत्र्यांकडे सादर करण्यात येईल. तसेच महाराष्ट्र नागरी सेवा नियमाप्रमाणे देखील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. लगेच कारवाईस सुरुवात करण्यात येईल त्यासाठी दोन-तीन दिवसांची मुदत देण्यात यावी.

जर एखादा अधिकारी अशा चुका वारंवार करीत असेल तर त्या अधिका-यांनी हाताळलेल्या प्रकरणांचे विश्लेषण करुन कारवाई करण्यात येईल. विभागाकडून नमुन्या दाखल त्याच अधिका-याचे प्रकरण घेण्यात येणार काय ? आता तर त्याच अधिका-याचे हे दुसरे का तिसरे प्रकरण दिसत आहे. तेव्हा या अधिका-याने असिस्टंट कमिशनरपासून डेप्युटी कमिशनर होईपर्यंतच्या काळात हाताळल्या त्या सर्व केसेसची तपासणी करण्यात यावी व आवश्यकता वाटल्यास पुढील कारवाई करावी. त्या अधिका-यास प्रथम निलंबित करावे. नंतर त्या अधिका-याच्या नमुन्यादाखलची प्रकरणे काढाव्यात. या अधिका-याच्या बाबतीत सर्व गोष्टी खुल्या आहेत. तेव्हा त्यांच्या प्रकरणात सचिव कारवाई करीत आहेत. तेव्हा ती बाब प्रथम करु द्यावी बाकीच्या गोष्टी नंतर होतील. त्या अधिका-याची मागील सर्व प्रकरणे काढावीत. असे समितीने सुचविले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, त्या अधिका-याच्या सर्व केसेस तपासण्यात येणार आहेत. कारण हेच अधिकारी आधीच्या प्रकरणामध्ये देखील आहेत. त्या प्रकरणी त्यांनी हाताळल्या सर्व गोष्टींची तपासणी करुन पुढील कारवाई करण्यात येणार आहे.

परिच्छेद क्रमांक २.४.३.४. " परताव्याचे संस्करण व प्रदान करण्यातील विसंगती "

एका बांधकाम कंत्राटदाराने एकत्रीकृत योजनेअंतर्गत कर भरण्याचा विकल्प स्वीकारला होता त्याने २००६-०७ दरम्यान रु.१.६८ कोटीच्या विक्रीच्या उलाढालीवर सुधारणापूर्व आठ टक्के दराने रु.१३.५५ लाखाचा कर जमा केला होता. निर्धारीत पाच टक्के दराने रु.८.४० लाख कर प्राप्त करावयाचा होता ज्यामुळे कराचे अतिरिक्त संकलन झाले. तसेच, कंत्राटदाराने कोषागारात फक्त रु.८.४० लाखाचा भरणा केला होता. परंतु निर्धारण अधिका-यांनी या प्रकरणात निर्धारण करताना प्राप्त केलेला अतिरिक्त कर शासकीय लेख्यात जमा करण्याऐवजी त्याचा परतावा दिला. परिणामी रु.५.१५ लाख परताव्याचे चूकीचे प्रदान झाले. या प्रकरणी विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, या प्रकरणामध्ये डेबीट आणि क्रेडीट नोट देऊन व्यापा-यांनी आपसात सेटलमेंट केली आणि ॲक्टमध्ये ही पद्धत बरोबर आहे. त्यामुळे या प्रकरणामध्ये जी मागणी काढण्यात आलेली आहे ती निघत नाही. तो परतावा बरोबर आहे. जो ५.१५ लक्ष रुपयांचा परतावा केला तो योग्य आहे.

महालेखापालांकडे विभागाने स्पष्टीकरण दिलेले आहे त्यावर महालेखापालांनी सांगितले की, we received the reply last Friday. Therefore, we could not go through it.

यावर समितीने विचारणा केली की, On what grounds this point was raised? What is the view of A.G. regarding the reply of the department? या प्रकरणामध्ये विक्रेत्याने सुरुवातीला ८ टक्के दराने कर गोळा केला होता व विवरणपत्रासोबत

भरला होता. परंतु खरेदीदाराने त्या कर दरास आक्षेप घेतला, ही रिव्हर्स केस आहे. नेमके काय प्रकरण आहे ? यासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, ही वर्क्स कॉन्ट्रॅक्टची केस आहे. सिव्हील कन्स्ट्रक्शन कॉन्ट्रॅक्टमध्ये ५ टक्के घेतले जातात आणि नॉन सिव्हील कॉन्ट्रॅक्टमध्ये ८ टक्के घेतले जातात. यामध्ये कधी कधी तफावत होते. कधी कधी कॉन्ट्रॅक्टर कॅपोझीशन स्कीममध्ये जातो.नॉन कंपोझीशनची स्कीम वेगळी आहे. त्यामुळे लोकांमध्ये थोडा संभ्रम असतो. व्यापा-यांनी अधिका-यांकडे विचारणा केली असता त्यांची चूक झालेली आहे असे त्यांना समजले. मग त्यांनी आपसात डेबीट आणि क्रेडीट नोट दिली. अशाप्रकारे त्यांनी ॲडजेस्ट केले. यामध्ये शासनाचे नुकसान झालेले नाही. त्यांनी जादा रक्कम प्रदान केली आणि विभागाने त्यास ती परत केली असा लेखा परिक्षण आक्षेप होता.

परिच्छेद क्रमांक २.४.३.५ 'परताव्याचे संस्करण व प्रदान करण्यातील विसंगती'

पुणे विभागातील बांधकाम व्यवसायातील एका मूळ कंत्राटदाराला २००९-१० कालावधीसाठी उपकंत्राटदाराने जारी केलेल्या प्रपत्र ४०७ प्रित्यर्थ रु.१६.६० कोटी मूल्याच्या उपकंत्राटासाठी वजावट देण्यात आली होती. उपकंत्राटदाराच्या दस्तऐवजांबरोबर प्रती पडताळणी केली असता असे आढळून आले की, त्याने रु.१६.६० कोटी मूल्याचे काम पूर्ण केले होते, ज्यामध्ये रु.७९.०७ लाख VAT अंतर्भूत होता. अशाप्रकारे, मूळ कंत्राटदाराला फक्त रु.१५.८१ कोटी वजावट ग्राह्य होती.रु.७९.०७ लाख चुकीची वजावट देण्यात आल्यामुळे रु.३.९५ लाख कराची कमी आकारणी झाली. यासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, ही देखील वर्क्स कॉन्ट्रक्टची प्रकरणे होती. यामध्ये उप कंत्राटदारास कंत्राट दिले होते. उप कंत्राटदारास एकूण रु.१६.६० कोटी रकमेचे काम देण्यात आले असे गृहीत धरण्यात आले होते. त्यामध्ये एकूण ७९.०७ लाख रुपये मूल्यरविध्रित कर होता. आदेश देताना चुकून मूल्याविध्रित करवर देखील वजावट देण्यात आली. ती वजावट द्यायची नव्हती. चुकीची वजावट केल्यामुळे ३ लाख ९५ लक्ष रुपयांची जास्तीची वजावट गेली, तेवढा टॅक्स शासनास मिळावयास पाहिजे होता. ही रक्कम वसूल करण्यासंदर्भात विभागाने आदेश पारीत केलेला आहे.

जो वर्क कंत्राट एका कंत्राटदाराकडून दुस-या कंत्राटदारांकडे सोपविण्यात येते त्याची कराराची प्रत जोडण्यात येत नाही काय ? जर ती प्रत जोडली असेल तर ती पाहणे आवश्यक आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, हे सध्या रिटर्नसोबत तर येत नाही. पण ज्या केसेस पडताळणीमध्ये निर्धारणासाठी घेतल्या जातात त्यावेळी ही कागदपत्रे घेणे आवश्यकच आहे.

महालेखापालांनी घेतलेला आक्षेप आहे आणि त्यांच्या लक्षात आले की, ज्यावेळी त्या कंत्राटदाराने ७९ लाख रुपये हे त्या वर्क कंत्राटाच्या १६.१६ कोटी रुपये इनकार्पोरेट आहेत त्यामुळे त्यामध्ये वजावाट देण्याची आवश्यकता नव्हती असा आक्षेप महालेखापालांने घेतला आहे तर त्याचा अर्थ असा आहे की, जीएसटी येईल तेव्हा येईल पण यापुढे जेवढी वर्क कंत्राटे आहेत त्यांची करारनामे आणि कागदपत्रे मागविली पाहिजेत. ही त्याची आवश्यक कागदपत्रे आहेत. कारण हे तर १६ कोटी रुपयांची छोटे कंत्राट आहे. काही कोट्यवधी रुपयांची कंत्राटे आहेत. त्याच्यावर त्यांना परतावा दिला एखादी बिल्डींग किंवा कॉम्प्लेक्ससारखा हे तर छोटे कंत्राट आहे. याचा परतावा तर ते मोठ्या प्रमाणात घेत असतील. या ठिकाणी महालेखापालांनी सांगितले आहे. त्यामुळे विभागाच्या अंतर्गत लेखापरिक्षकाकडून आयुक्त म्हणून वेगवेगळ्या डिव्हीजनच्या अशा प्रकारच्या ५० केसेस तपासाव्यात आणि खास करुन पुण्याच्या केसेस घ्याव्यात असे समितीने सूचविले.

याबाबत महालेखापालांनी सदर प्रकरण तपासण्याची आवश्यकता आहे असे सांगितले.

समितीने असे मत व्यक्त केले की, आक्षेप कोठे आहे ते महालेखापालांनी सांगितले पाहिजे. महालेखापालांनी घेतलेल्या आक्षेपावर विभागाने स्पष्टीकरण दिले आहे तर ते योग्य आहे किंवा कसे यावर महालेखापालांनी भाष्य केले पाहिजे. जो मुद्दा उपस्थित केला आहे तो स्पष्ट झाला आहे की नाही ते सांगण्यात यावे. समितीला हे दोन्ही परिच्छेदांचे स्पष्टीकरण योग्य वाटते तरी पण विभागाने महालेखापालांकडून ते दोन्ही परिच्छेद तपासणी करुन घ्यावेत.

यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, याबाबत साक्षीला येण्यापूर्वी हा विषय आणखी तपासून घेतला. कारण विभागाचे उत्तर समितीसमोर बरोबर गेले पाहिजे असे विभागाचे मत आहे. यामध्ये दुरुस्ती नाही. पण विभागास थोडेसे असे वाटते की, महालेखापालांनी पाहिल्यानंतर यासंबंधी संपूर्ण रकमेवर हे लागू झाले पाहिजे तर त्यामध्ये त्यांचे एक चूकले आहे किंवा नजरेतून गेले असावे की, एकूण खरेदी ८.११ लक्ष रकमेची खरेदी आहे. त्यापैकी ५ कोटीची खरेदी महाराष्ट्राबाहेरची आहे. त्यावर कर लागणार नाही. त्यामुळे ३.११ कोटी रकमेवर विभागाने कर लावला आहे ते बरोबर केले आहे.

परिच्छेद क्र.२.४.४.२ संदर्भात मे. मणजित ऑईल प्रॉडक्ट याबाबत विभागीय प्रतिनिधींनी माहिती दिली की, मे. मणजित ऑईल प्रॉडक्ट हे ब्रॅन्च ट्रान्स्फरचे प्रकरण आहे. सन २००६-०७ मध्ये ४ टक्के रिटेन्शन आहे, कारण त्यावेळी त्यांचा माल बाहेर गेला तर सन २००७-०८ मध्ये ३ टक्के रिटेन्शन होते. त्यावेळी या रिटेन्शनचा समावेश न करता ठरविण्यात आले आणि महसूल संरक्षित करण्यात आला. त्यामुळे या प्रकरणी २९ जानेवारी २०१६ मध्ये डेप्युटी कमिशनरच्या आदेशान्वये असिस्टंट कमिशनर यांनी या प्रकरणी आढावा घेतला. त्यासंबंधी आदेश मार्च २०१६ मध्ये पारीत केला. आता त्या आदेशाविरुध्द संबंधित व्यापारी अपिलामध्ये गेलेला आहे. पण त्याला याची जाणीव होती की, आपल्याला हा टॅक्स भरावा लागेल म्हणून त्याने २७ जून २०१६ ला सन २००६-०७ ची जी टॅक्सची रक्कम ९८,१४६/- आणि सन २००७-०८ वर्षासाठी ७,४३,३०१/- ही भरलेले आहे. एवढी रक्कम विभागाला मिळालेली आहे.

मागणीची रक्कम तर यापेक्षा जास्त होती पण आता त्याने मूळ कराची रक्कम भरणा केली आहे. विभागाने आकारलेली दंडाची व व्याजाची रक्कम अद्याप शिल्लक आहे. आता अपीलामध्ये यासंबंधी निर्णय होईल. त्याने मूळ रक्कमेचा भरणा केला आहे तर सन २००६-०७ वर्षाची कराची मूळ रक्कम ९८,१४६/- आणि सन २००७-०८ वर्षासाठी मूळ रक्कम ७,४३,३०१/- भरणा केली आहे. त्याने साधारणपणे साडे आठ लाख रुपये भरले आहेत आणि २ लाख ३४ हजार आणि १४ लाख २५ हजार रुपये एवढी विभागाची मागणी आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, आता ही शिल्लक रक्कम अपिल निर्णयानंतर विभागाला मिळेल.

परिच्छेद क्र.२.४.४.५ " कार्यक्रमाखाली अग्राह्य वजावट देणे " याबाबत माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, या मुद्यासंबंधी एकूण ६ प्रकरणे होती आणि त्यापैकी २ प्रकरणी वसुली झालेली आहे.

समितीने विभागाला दिलेल्या चार्टमध्ये महालेखापालांनी काढलेले सर्व आक्षेप अमान्य असल्याचे मानतो आणि दुसरीकडे या संपूर्ण ६ प्रकरणामध्ये कार्यवाही सुध्दा केलेली आहे. याबाबत विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, यासंबंधी असे झाले असेल की, बहूतेक ज्यावेळी सुरूवातीला अशा प्रकारचे शेरे काढले जातात आणि त्यावेळी जे अधिकारी लिहितात तेच शेरे शेवटपर्यंत तसेच राहतात.

याबाबत नाराजी व्यक्त करुन समितीने असे मत व्यक्त केले की, विभागीय प्रतिनिधी लोकलेखा समितीसमोर साक्ष देत असल्याने त्यांनी जबाबदारीने विधाने केली पाहिजेत, चुकीची माहिती दिल्याने समितीचा वेळ वाया जातो.

सुरूवातीला महालेखापालांचे शेरे आल्यानंतर जी नोंद होते त्यानुसार हे शेरे येतात. याचा अर्थ असा आहे की, महालेखापांलानी केलेली नोंद व शेरे विभागीय अधिकारी न पाहता किंवा तपासता जसेच्या तसे लिहून टाकतात. म्हणजेच याचा अर्थ असा आहे की, विभागीय अधिकारी त्यावर काहीच शेरे देत नाही, जोपर्यंत लोकलेखा समिती समोर सुनावणी होत नाही. म्हणून विभाग महालेखापाला ते अमान्य असल्याचे सरसकट लिहून देतो. हा विषय लोकलेखा समितीच्या समोर आला तर छापूनच येतो पण विभागाची पध्दत अशी असेल की, ते सुरूवातीला लिहिले आहे म्हणून ते तसेच ठेवण्यात येते तर ते फार गंभीर आहे. म्हणजे जर आक्षेप अमान्यच असल्याचे लिहित असतील तर ते कशाचा तपास करणार आहेत. असे मत समितीने नापसंतीने व्यक्त केले असता यासंदर्भात खुलासा करताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, हे जाणुनबुजून केलेले नाही. यामध्ये सुरूवातीला जेव्हा पहिल्यांदा त्या संबंधित विशिष्ट अधिका-याकडून शेरा मारला जातो त्यावेळपासून तसाच राहतो. कारण महालेखापाल लिहून घेतात की, त्यांना हे मान्य नाही आणि तो शेरा तसाच राहतो आणि तो विभागाकडून बदलण्यात येत नाही. यासंबंधी विभागाचा महालेखापालांसोबत ३-४ वेळा पत्रव्यवहार होतो. तरी सुध्दा विभाग हे शेरे बदलत नाही. यासंबंधी समितीला काही वाटत असेल तर यापुढे विभाग ते बदलत जाणार आहे. म्हणजे आयुक्त कार्यालयापासून बदल करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. यामध्ये जे गृहित धरेल त्यानुसार नंतर पध्दत पाळता येईल. त्यामुळे हे सुरूवातीचे शेरे विभागाने बदललेले नाहीत. त्यामध्ये काही संदिग्धता असते आणि काही मुद्दे असतात. त्यामुळे साधारणतः असे शेरे असतात.

यामध्ये एक न्यायिक मुद्दा असून तो न्यायालयामध्ये सुरू आहे. कार्यकंत्राटाच्या रकमेत ग्रॉस कंत्राटाची रक्कम सेवा कर समाविष्ट होईल की नाही असा मुद्दा आहे. यावर विभागाचे म्हणणे असे आहे की, ग्रॉस कंत्राटावर सेवा कर लागू होणार आणि त्याच्यावर मूल्यवर्धित कर लागणार आहे. यासंबंधी मे. निखिल कम्फट्र्स या कंपनीच्या बाबतीत न्यायाधिकरणाने एक जुना निकाल दिला आहे त्यानुसार वजावट मान्य केली आहे. आता अलिकडे मे. टेक्नोक्राफ्टमध्ये दिनांक ३.११.२०१५ रोजी न्यायाधिकारणाने निकाल दिला आहे की, सेवा कर ग्रॉस टर्नओव्हरवर लावता येणार नाही. हा मुद्दा सध्या वादातीत असून त्यावर अंतिम निर्णय अद्यापी झालेला नाही. असाही खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

मूल्यवर्धित कर हा मूळात विक्री कराचा परिवर्तीत केलेला आणि त्याची व्याप्ती वाढविलेला टॅक्स आहे. ज्यामध्ये डिलिव्हरी ऑफ गुड्स आहे. मग त्यामध्ये उत्पादन करो, पुरवठा करो किंवा पुर्न व्यापार करो, त्यासंबंधी मूल्यवर्धित कर लागू असणे अपेक्षित आहे. त्याच्यावर ज्या सर्व्हीस केल्या जातात किंवा सर्व्हीस लावल्या जात असतील तर ते अमान्यच होईल. सर्व्हीसवर मूल्यवर्धित कर कसा लागणार. गुड्स डिलिव्हरीवर मूल्येवर्धित कर लागतो. सेवा कर वसूल करणारी एजन्सी वेगळी असून ती सेंट्रल गव्हर्नमेंटची आहे. जो ती कर रुपाने वसूल करते. करावर पुन्हा मूल्यावर्धित कर कसा लावणार, करा वर कर कसा लावणार. जसे आयकरावर कर लावला जात होता तर त्याला नाव देण्यात आले की, सरचार्ज. अतिरिक्त उत्पान्नावर अधिभार असे नाव लावले गेले असे मत समितीने व्यक्त केले व यासंदर्भात विभागाचे मत विचारले असता वित्त विभागाच्या विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, हा विषय ब-याच वर्षापासून सुरू आहे. विभागाकडून हॉटेल्स आणि रेस्टॉरन्टवर जो सेवा कर होता त्यावर देखील मूल्य वर्धित कर लावण्यात येत होता. त्या प्रकरणामध्ये न्यायालयाने देखील विभागाच्या बाजूने निकाल दिला आहे. पण विभागाने १-४-२०१५ पासून सुधारणा केली की, हॉटेल्सवर जो सेवा कर लागतो त्यावर मूल्यहवर्धित कर लागू करु नये. त्यानुसार हॉटेल्सवर लावण्यात येणा-या सेवाकरावर आता मूल्यविधधित कर लावण्यात येत नाही. अशी नियमामध्ये दुरुस्ती केली आहे. पण यासंबंधी नियमानुसार ग्रॉस टर्नओव्हरमधून सेवाकर कमी केला जात नाही म्हणून मूल्यरवर्धित करमधून माफी देता येत नाही.

परिच्छेद क्रमांक २.४.४.६ - 'करप्रदानात अतिरिक्त मुदतवाढ मिळणे'

कर प्रदानात अतिरिक्त मुदतवाढ मिळणे या परिच्छेदाबाबत समितीने असे मत व्यक्त केले की, ही तर खूपच भयानक केस आहे. या प्रकरणी नंतर पुर्वलक्षी प्रभावाने निर्णय घेतला आहे. याबाबत स्पष्टीकरण देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, जी सागर डिस्टीलरी कंपनी आहे त्या कंपनीस सिकॉमकडून इनटायटल सर्टिफिकेट्स मिळालेले होते. त्यामध्ये त्यांना १५० लाख लिट्र्स कमाल मर्यादा दर वर्षासाठी होती. एकूण ४६.२७ कोटी रुपयांसाठी त्यांना मान्यता दिली होती. पण त्यांनी १९३.९३ लाख लिटर्स अधिकचे काम केले होते. त्यामुळे अधिकच्या ४३.९३ लाख लिटर्सवर त्यांनी कर प्रदान केला नाही. पण ज्यावेळी या प्रकरणी आढावा घेतला गेला त्यावेळी त्यांनी उद्योग विभागाकडून २००२ पासून पूर्वलक्षी प्रभावाने सुधारीत आदेश आणले. त्यानुसार त्यांनी १५० लाख लिटर्सऐवजी ३०० लाख लिटर्स अशी कमाल मर्यादा केली. त्यामुळे विभागाला ही रक्कम परत देणे भाग पडले आहे.

याबाबत समितीने विचारणा केली की, पण त्यांना असे आदेश देता येतात काय ? आता २ कोटी १२ लाख रुपये कंपनीने उद्योग विभागाकडून पूर्वलक्षी प्रभावाने लागू करणारे आदेश आणल्यामुळे द्यावे लागले. त्यामुळे सुमारे १२-१३ वर्षानंतर सुध्दा अशा प्रकारे पूर्वलक्षी प्रभावाने मान्यता देता येऊ शकते काय, अशी पूर्वलक्षी प्रभावाने मान्यता देणे नियमबाह्य होते किंवा नाही, की उद्योग विभागाने दिले म्हणून विक्रीकर विभागाने रक्कम परत केली.

याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाच्या चूक निदर्शनास आल्यानंतर विभागाने आढावा घेतला आणि ही चूक दुरुस्त करण्यासाठी नोटीस काढली आहे. आणि नोटीस काढल्यानंतर सुधारीत आदेश आणून दिले याबाबत समितीने हे योग्य नाही असे मत नाराजीने व्यक्त केले.

यासंबंधी विभागीय वित्त सचिवांचे उद्योग सचिवांशी बोलणे झाले आहे किंवा कसे ? ही चूक महालेखापालांना आढळली आणि त्यांनी विभागाच्या निदर्शनास आणून दिली. त्यानंतर सन २०१५ मध्ये त्यांनी पूर्वलक्षी प्रभावाने मान्यता मिळाल्याचे आदेश आणून दिले आहेत. त्यामुळे शासनाचे २ कोटी १२ लाख रुपयांचे शासनाचे नुकसान झाले आहे. विभागाने त्यांना ही रक्कम परत केली आहे. यामध्ये त्यांना उत्पन्न क्षमता वाढवून दिली हे सुध्दा चुकीचे केले आहे. कारण त्या दिवशी त्याच्याकडे तेवढी क्षमता नव्हती. विभागाने त्याच्याकडून कर घ्यायलाच पाहिजे होता. यामध्ये सन २००२ च्या कार्यवाहीसंबंधी २०१५ मध्ये पूर्वलक्षी प्रभावाने मान्यता देण्यात आली. म्हणजे तब्बल १३ वर्षांनंतर ही मान्यता मिळाली आहे. असे मत समितीने व्यक्त केले.

यामध्ये स्पष्टपणे दिसते की, महालेखापालांनी हे लक्षात आणून दिले त्यावेळी २.१२ कोटी रुपयांचा अतिरिक्त परतावा दिला होता. हा परतावा अगोदरच दिला होता आणि त्यानंतर महालेखापालांनी हे निदर्शनास आणून दिल्यानंतर विभागाने त्यांचे प्रकरण सुरू केले. त्यानंतर कंपनी मालकाने १५० लाख लिटर्सवरुन ३०० लाख लिटर्सचे प्रमाणपत्र आणले. पण महालेखापालांनी जेव्हा लक्षात आणून दिले त्यावेळी त्याच्याजवळ प्रमाणपत्र नव्हते. म्हणजे कंपनी मालकास ती संधी विभागाकडून दिली गेली आहे काय, की त्याने सन २०१५ मध्ये ते प्रमाणपत्र घेऊन यावे. त्यामुळे असे वाटते की, विभागाने जे परताव्याचे पैसे त्याला दिले ते चुकीने दिले आहेत म्हणून त्यांचे समर्थन करण्यासाठी मान्यता घेऊन येण्यासाठी अशी संधी दिली आहे काय? जे जास्तीचे पैसे दिले

ते चुकीने दिले आहेत म्हणून त्याचे समर्थन करण्यासाठी त्याला वेळ दिला आहे काय? कारण महालेखापालांनी आक्षेप घेतला आहे त्यामुळे या आक्षेपांचे निराकरण करण्यासाठी सदर व्यापा-याने जादाच्या कॅपॅसिटीचे प्रमाणपत्र घेऊन यावे. यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, यामध्ये महालेखापालांनी लक्षात आणून दिल्यानंतर विभागाने आढावा घेणे सुरू केले आहे. त्यामुळे इतर कार्यवाही केलेली नाही.

त्याचे प्रमाणपत्र २०१५ मध्ये कसे मान्य करता येईल अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, ते बरोबर आहे आणि ही चूक महालेखापालांनी लक्षात आणून दिलेली आहे.

ही चूक महालेखापालांनी अगोदरच लक्षात आणून दिल्यानंतर विभागाने हा परतावा कसा परत केला. कोणत्या आधारावर विभागाने परतावा देणे योग्य आहे असे मान्य केले. योग्य आहे असे मान्य केले सन २०१५ मध्ये पूर्वलक्षी प्रभावाने. मग विभागाला त्या आधीच महालेखापालांनी लक्षात आणून दिल्यानंतर विभागाने हा परतावा कसा काय दिला आहे. दिडशे लक्ष लिटर्सची परवानगी असताना विभागाने १९३ लिटर्सच्या बाबतीत कशी काय परताव्याची रक्कम दिली याबाबत विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, यामध्ये जो निर्धारण आदेश पारीत झाला आहे तो २५-९-२०१३ रोजी पारीत झाला होता. त्यावेळी त्यांनी १९३ लक्ष लिट्र्स गृहित धरुन आदेश दिलेले आहेत. तेही आदेश चुकीचे आहेत. म्हणूनच हे प्रकरण महालेखापालांनी आक्षेप घेतल्यानंतर दिनांक ४-८-२०१५ रोजी पुनर्विलोकनासाठी घेण्यात आले आहे.

तेव्हा १९३ लाख लिटर्स धरुन दिलेला परतावा चुकीचा होता. विभागाच्या अधिका-यांनी केलेल्या चुकीबद्दल त्यांच्याकडून स्पष्टीकरण वगैरे मागविण्यात आले आहे काय ? हा परतावा देणारा अधिकारी कोण होता, अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, या विशिष्ट प्रकरणांमध्ये ई-०१२ म्हणजे डॉ. एन.टी. डाके नावाचे नाशिकचे अधिकारी आहेत. ते सध्या नाशिकलाच आहेत. पण कोणत्या पदावर कार्यरत आहेत ते नेमके माहित नाही.

समितीने यासंदर्भात आणखी विचारणा केली की, यामध्ये जे २ कोटी १२ लाख रुपये परतावा केलेले आहेत त्यावरुन हे प्रकरण सरळ सरळ फिक्सिंगचे आहे. यामध्ये असे दिसते की, विभागाचे चूकीचे काम विभागाकडून मान्य करुन घेण्यात आले असे या प्रकरणी दिसते. या संबंधित अधिका-यावर कोणती कार्यवाही केलेली आहे? किंवा करण्यात येणार आहे, किंवा हा अधिकारी निवृत्तीस आलेला आहे काय? कारण अशा परिस्थितीत वयोमर्यादेनुसार तो निवृत्त होईल व सुटून जाईल ? हे प्रकरण लिटीगेशनची आहे. यामध्ये कमाल मर्यादा १५० लाख लिटर्सची होती त्यावेळी त्यास १९३ लाख लिटर्सप्रमाणे परतावा दिला. त्यानंतर त्याने ३०० लाख लिटर्सचे पूर्वलक्षी प्रभावाचे प्रमाणपत्र आणून दिले आहे. त्याने हा परवाना सन २०१५ ला आणला आहे. कारण त्याने पूर्वलक्षी प्रभावाने निर्धारणामध्ये लाभ घेतला असेल. ज्यावेळी विरोधी पक्षाच्या बाजूने न्यायाधिकरणामध्ये निकाल लागतो तर विभाग अपिलात जातो तर या प्रकरणी विभाग अपिलामध्ये जाणार आहे काय. हे प्रकरण विभागा विभागामध्ये असले तरी चालेल. उद्योग विभागाचे आदेश मान्य करायचे किंवा नाहीत हे विभागाचे अधिकार आहेत. त्यांनी जर ही मान्यता २००२ पासून पूर्वलक्षी प्रभावाने दिले असेल तर त्याचे आदेश सर्व संबंधित विभागांना कळविले पाहिजेत. हे आदेश त्यांना पर्यावरण विभाग, संबंधित महापालिका, नगरपालिका किंवा ग्रामपंचायत असेल त्यांना कळवावे लागतील. म्हणजे त्याची क्षमता दुप्पट करावयाची असेल तर त्यासंबंधीचे निकष उत्पादकाने पूर्ण करावे लागतील. हे केवळ उत्पादकाला सुरक्षित करण्यासाठी दिलेले आहेत असे दिसते. उद्योग विभागाच्या प्रतिनिधींना बोलावून साक्ष घेण्यात यावी पण त्याची कॅपॅसिटी १५० लाख लिट्र्सची असताना विभागाने त्यास १९३ लाख लिटर्सप्रमाणे परतावा दिलेला आहे. या प्रकरणी पूर्वलक्षी प्रभावाने परवाना असल्याने परतावा केल्या. त्यामुळे वित्त विभागाचे नुकसान झालेले असल्यामुळे विभाग त्याविरुध्द अपिल करणार आहे काय ?

यावर विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, उद्योग विभागाने सुधारित केलेला हा शासन निर्णय आहे. विभागाने दिलेल्या माहितीने समितीचे समाधान न झाल्याने समितीने या प्रकरणाशी संबंधित विभागाच्या सचिवांना साक्षीसाठी बोलविण्याचा निर्णय घेतला व दिनांक ११ ऑगस्ट, २०१६ रोजी प्रधान सचिव, वित्त व प्रधान सचिव, उद्योग यांची एकत्रित साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने मुद्दा उपस्थित केला की, विक्रीकराच्या माध्यमातून २.१२ कोटी मिळणार होते. उद्योग विभागाने पूर्वलक्षी प्रभावाने आदेश दिल्यामुळे दिनांक २३-०९-२०१५ रोजी संबंधितांनी पैसे मिळणार नाहीत, असे सांगितले. एवढ्या वर्षाने पूर्वलक्षी प्रभावाने कशी अंमलबजावणी केली ? आणि त्यासंदर्भातील निर्णय कसा घेतला? सन २०१५ मध्ये पूर्वलक्षी प्रभावाने अंमलबजावणी करण्याची कारणे काय आहेत, आदेश कोणत्या आधारे दिला आणि असे करता येते किंवा कसे ? अशी विचारणा समितीने केली.

यासंदर्भात उद्योग विभागाच्या सचिवांनी माहिती दिली की, मूळ मुद्दा सागर उद्योग डिस्टलेरीच्या संदर्भातील आहे. नाशिकमध्ये युनिट होते. १९९३ मध्ये ईएसआय इन्सेन्टीव्ह देण्यात आले होते. दिनांक १०-१२-२००१ रोजी सदरहू युनिट

उत्पादनामध्ये अंतर्भूत झाले होते. गुंतवणूकीचा कालावधी हा १०-१२-२००४ असा होता. म्हणजे उत्पादनापासून ३ वर्षांपर्यंत असा कालावधी होता. दिनांक ११-०१-२००२ पासून ते दिनांक १०-०१-२०१७ पर्यंत इन्सेन्टीव्ह कालावधी होता. त्यावेळी केंद्र शासनाकडून आयएएम मिळत होता. आयआयएम म्हणजे इंडस्ट्रिअल इंटरप्रिटर ऑफ मेमोरंडम, यामध्ये उद्योगाची आणि क्षमतेची नोंदणी होत असते. त्यावेळी म्हणजे दिनांक १९-१०-१९९७ रोजी १५० लाख लिटर क्षमता घेतले होते. त्यानंतर दिनांक १५-०८-२००२ रोजी केंद्र शासनाने ३०० लाख लिटरपर्यंत क्षमता वाढवून दिली. यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाची परवानगी हवी असते. दिनांक ११ नोव्हेंबर, २००३ रोजी राज्य उत्पादन शुल्क विभागाने ३०० लाख लिटरपर्यंत क्षमता वाढवून देण्यास परवानगी दिली होती. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून १५० लाख लिटरची परवानगी घेतली होती. तसेच दिनांक ०६-०७-२०१२ रोजी नूतनीकरणासाठी ३०० लाख लिटरची परवानगी घेतलेली आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने कोणत्या तारखेला ३०० लाख लिटरची परवानगी दिलेली आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, दिनांक ०६-०७-२०१२ रोजी नूतनीकरणासाठी ३०० लाख लिटरची परवानगी घेतलेली आहे. तसेच यापूर्वी त्यांनी केव्हा परवानगी घेतली त्याची माहिती घेऊन ती समितीला अवगत करण्यात येईल. दिनांक ११ नोव्हेंबर, २००३ रोजी राज्य उत्पादन शुल्क विभागाने ३०० लाख लिटरपर्यंत क्षमता वाढवून देण्यास परवानगी दिली होती.

याबाबत ज्या दिवशी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ ३०० लाख लिटरचा दाखला देणार आहे, त्यादिवसानंतर उद्योजकाला काम करता येणार होते. यापूर्वी उत्पादकाला काम करता येणार नाही. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने कोणत्या तारखेला ३०० लाख लिटरची परवानगी दिलेली असून ती महत्वाची आहे असे मत समितीने व्यक्त केले.

साखर कारखान्यांना केंद्र शासनाकडून जसा परवाना दिला जातो त्याच धर्तीवर या प्रकल्पासाठी देखील परवाना दिला जातो काय ? साखर कारखान्यांसाठी या सारखीच कार्यपध्दती आहे. केंद्र शासनाने परवानगी दिल्यानंतर किती दिवसानंतर उत्पादन सुरु झाले ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, केंद्रामध्ये आयएएम असतो. उत्पादनाची तारीख १०-१२-२००१ अशी आहे. आयएएम हा १९-१०-१९९९ चा आहे. त्यांना १० वर्षांपेक्षा अधिक उत्पादन करण्याचा अधिकार नाही. ५ वर्षांपर्यंत नूतनीकरण करावे लागते आणि त्यानंतर जास्तीत जास्त १० वर्षे अशी मर्यादा असते. १० वर्षांनंतर लॅप्स होते. यासाठी त्यांनी केंद्र शासनाकडून आयएएमसाठी आवश्यक ती परवानगी घेतली होती काय ? आयएएम म्हणजे काय ? याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, केंद्र शासनाच्या उत्पादन शुल्क विभागाची सदरहू प्रकल्पासाठी परवानगी लागत नाही. केंद्रामध्ये फक्त नोंदणी केली जाते. आयएएम म्हणजे ॲप्लिकेशन केल्यानंतर, उद्योग सुरु करण्यात येतो.

आयएएममध्ये साखर कारखान्यासाठी २५ किलो लिटरसाठी मर्यादा आहे. ती १५ किलो लिटरपर्यंत आणण्यासाठी प्रयत्न केला जात आहे. आयएएमची परवानगी अशा त-हेरने देता येत नाही. ५ वर्षांपर्यंत नूतनीकरण करावे लागते आणि त्यानंतर जास्तीत जास्त १० वर्षे अशी मर्यादा असते. १० वर्षानंतर ती व्यपगत होते. यासाठी वेगळे निकष होते, म्हणजे साखर कारखान्यासाठी वेगळे निकष आणि प्रकल्पासाठी वेगळे निकष होते. सुरुवातीला दीड लाख कसे दिले ? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, यामध्ये १९५७ चा अधिनियम आहे. यासाठी उद्योगांना परवान्याची आवश्यकता लागते. साखर कारखान्यांसाठी वेगळे परवाना आहे. यासाठी साखर आयुक्तांकडून परवाना दिला जातो. केंद्र शासनाकडून डिफेन्स आणि न्युक्लिअरच्या उद्योगासाठी परवाना दिला जातो आणि इतर उद्योगासाठी परवाना दिले जात नाही. फक्त आयएएम लागतो. सन २००२ मध्ये उद्योगासाठी परवाना नव्हता.

पूर्वी दीड लाख लिटरपर्यंत नोंदणी झाले होते. त्यानंतर ३ लाख लिटरपर्यंत परवानगी घेण्यासाठी उत्पादकाला केंद्र शासनाकडे जाण्याची कोणतीही आवश्यकता नव्हती. याचा अर्थ त्यांना दीड लाख लिटरपर्यंत उत्पादन करण्यासाठी परवानगी होती. अशी परवानगी केंद्र शासनाने दिली होती काय ? याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, त्यांनी सन २००२ मध्ये ३०० लाख लिटरची परवानगी घेतली होती.

त्यांना १५० लाख लिटरची परवानगी असताना ३०० लाख लिटरची परवानगी कशी मिळाली? सन २०१५ मध्ये पूर्वलक्षी प्रभावाने उद्योग विभागाने दीड लाख लिटरपासून ३०० लक्ष लिटरपर्यंत परवानगी दिली होती. त्यामुळे विक्रीकर विभागाला २ कोटी रुपयांचे नुकसान सोसावे लागले. त्यांनी सन २००३ मध्ये परवानगी मिळविली होती. सन २००३ ते सन २०१५ पर्यंत शासनाचे पैसे त्यांनी रोखून ठेवले. उद्योग विभागाने पत्रात भूतलक्षी प्रभावाची अंमलबजावणी केल्यामुळे शासनाचे खूप मोठे

नुकसान झालेले आहे असे नमूद केले आहे. महालेखाकारांनी त्यांच्या अहवालात २ कोटी १२ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा उल्लेख केलेला आहे. त्यांचा आयएएम ३०० लाख लिटर एवढा होता. असे मत समितीने व्यक्त केले.

यासंदर्भात विभागीय सचिवांनी खुलासा केला की, आयएएम ३०० लाख लिटर होता. त्या आधारे पुढील कार्यवाही केलेली आहे. आयएएम सन २०१५ मध्ये दिला होता. सन २००३ मध्ये त्यांच्याकडे तो परवाना होताच.

भांडवली गुंतवणुकीवर कर लाभ होतो काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाची गुंतवणूक कॅपिटल इन्व्हेस्टमेंटवर असते. त्यांचा गुंतवणूक कालावधी सन २००१ पासून सन २००४ पर्यंत होता. म्हणजे त्या काळात १५० लाख लिटरचे ३०० लाख लिटर केले तरी ते ग्राह्य धरले जाते. मेगा प्रोजेक्टसाठी ५ वर्षांची मुदत देण्यात येते. सुरुवातील १५० लाख लिटरची गुंतवणूक करणार म्हणून उत्पादकाने २०० लाख लिटरपर्यंत केले तर अशा वेळी विभागाकडून त्यांना १५० लाख लिटर गुंतवणूक करा असे म्हणता येऊ शकत नाही. विभाग महाराष्ट्रात अधिकाअधिक गुंतवणूक व्हावी यासाठी प्रयत्नशील आहे.

एक कारखाना १०० कोटी रुपयांचा असूनही जर उत्पादकाने ५०० कोटी रुपयांची गुंतवणूक दाखविली व त्याआधारे कर प्रदानामध्ये सुट घेतली हे योग्य नाही. एखाद्या कारखान्याचे मूल्यांकन किती आहे, याबाबतची माहिती उद्योग विभागाकडे उपलब्ध आहे. कर लाभ घेऊन परतावा घ्यावयाचा, हेच यामध्ये आहे. कारखान्याचे सन २००१ मध्ये मूळ अंदाजपत्रक किती होते? सन २००१ मध्ये किती गुंतवणुक होती आणि त्यानंतर ती किती वाढविली ? कारखान्याच्या उत्पादन क्षमतेबाबत आक्षेप नाही. परंतु करप्रदानामध्ये चोरी झालेली आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, दिनांक ३०-११-२०११ उत्पादकाची २२ कोटी ५६ लाख अशी गुंतवणुक होती. त्यानंतर दिनांक २०-११-२००२ त्यांची २८ कोटी ४७ लाख अशी गुंतवणूक झाली. त्यानंतर सन २००३ मध्ये ३५ कोटी ५९ लाख रुपयांची गुंतवणूक ग्राह्य धरण्यात आली. विक्रीकर इन्टेन्सीव्ह २९ कोटी ३३ लाख, ३७ कोटी आणि ४७ कोटी ही सन २००३ मधील होती. यामध्ये कोणताही बदल नाही. भांडवलदारी प्रॉपर्टीमधील वाढवलेली नसून प्लान्ट मशिनरीमध्ये त्याची गुंतवणूक आहे. त्यांनी गुंतवणूक वाढविली. त्यामुळे उत्पादन क्षमता वाढली की फक्त गोडाऊन बांधले ? गुंतवणूक ३५ कोटी रुपयांपर्यंत गेलेली आहे. त्याबाबत शंका आहे. ती २२ ते ३५ कोटी रुपयांपर्यंत गेली. प्रकल्प कार्यान्वित केला गेला. १५० लाख लिटरची क्षमता होती ती त्यांनी ३०० लाख लिटरपर्यंत केली. समितीला त्यांचे विद्युत देयकाची प्रत देण्यात यावी. त्यामध्ये सन २००१ मध्ये आणि सन २००३ मध्ये विजेचा वापर किती होता, क्षमतेने वाढविले की, व्हॉवचर सादर केले वगैरे माहिती दिल्यानंतर समितीला पुढील कार्यवाही करणे शक्य होणार आहे असे मत समितीने व्यक्त केले यास विभागीय सचिवांनी मान्यता दर्शविली.

या कंपनीचे संचालक कोण आहेत ? विभागाने किती रुपयांची ईसी दिलेली आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, यासंदर्भात संचालक कोण होते याची माहिती माहिती घेऊन देण्यात येईल तसेच विभागाने ३५ कोटी ५९ लाख सन २००३ मध्ये दिलेले आहेत. दिनांक १०-०५-२००७ रोजी ३५ कोटी ५९ लाख रुपये धरुन ईसी दिलेली आहे.

ही अतिशय गंभीर बाब आहे. समितीकडे सन २०१३-२०१४ मधील अहवाल आहे. सन २०१५ मध्ये भूतलक्षी प्रभावाने दिल्यामुळे २ कोटी १२ लाख रुपयांचे विभागाला नुकसान झालेले आहे. सन २०१७ पर्यंत त्यांना ३०० लाख लिटरपर्यंत सुट दिली जाणार आहे, याबाबत सचिवांचे काय म्हणणे आहे ? अशी विचारणा समितीने केली. असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, इन्सेंटिव्ह पिरियड हा दिनांक १०-१२-२००४ असा होता. ईसी त्याच वेळी दिलेली असून, त्यामध्ये बदल होत नाही. त्यावेळी जी गुंतवणूक केली त्यामध्ये आज ती वाढविणे शक्य नाही. दिनांक १०-०५-२००७ रोजी ३५ कोटी ५९ लाख रुपये धरुन ईसी दिलेली आहे. आयएएम हा सन २००२ मधीलच आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाची सन २००३ मधील परवानगी ३०० लाख लिटरसाठी आहे.

उत्पादन क्षमता दीड लाख लिटर होती ती आता आयएएमच्या आधारे ३ लाख लिटर केलेली आहे. उत्पादकाला ती सन २००२ पासून भूतलक्षी प्रभावाने दिलेली आहे. एवढी वर्षे विभागाने काय केले? सन २००२ ते सन २०१५ पर्यंत उद्योग विभागाला पूर्वलक्षी कर देण्याबाबतची परवानगी विक्रीकर विभागाने देण्याची आवश्यकता १३ वर्षांनंतर का पडली. याचा अर्थ विक्रीकराच्या परताव्याची मागणी कंपनीने केली होती. उद्योग विभागाने ती मागणी थांबवून ठेवली होती. त्यांना उद्योग विभागाचे भूतलक्षी प्रभावाने परवानगी देण्याबाबतचे पत्र हवे होते. असे पत्र विक्रीकर विभागाने १३ वर्षांनंतर दिलेले आहे. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता उद्योग विभागाच्या सचिवांनी सांगितले की, सेल्स टॅक्स विभागाचा रुल ८८(२) आहे. त्यामध्ये

९३ ची स्कीम आहे. इंग्रजी रुलमध्ये कोणतीही सिलींग नाही. सदरहू मुद्दा विक्रीकर विभाग किंवा महालेखापालांनी काढण्याची काहीच आवश्यकता नव्हती. कारण त्यांच्या उत्पादन क्षमतेशी हा मुद्दा जोडलेला नाही.

उत्पादकाला २००२ मध्ये परवानगी मिळाल्यामुळे त्यांनी उत्पादन सुरु केले होते. कंपनीने उद्योग विभागाला भूतलक्षी प्रभावाने परवानगी देण्याबाबतचा आदेश काढण्यासाठी सांगितले होते काय ? याबाबत विक्रीकर आयुक्तांना त्यांची उत्पादन क्षमता २००२-२००३ मध्ये वाढवून घेतल्याचे माहित होते काय ? अशी विचारणा समितीने केली असता वित्त विभागाच्या प्रतिनिधींनी सांगितले की, उद्योग सचिवांनी सांगितले की, ती १९९३ ची स्कीम आहे. त्या स्कीममध्ये उत्पादन क्षमतेचे बंधन नाही. १९७९, १९८३ आणि १९८८ ची स्कीम होती. त्यामध्ये विक्रीकरामध्ये उत्पादन क्षमता किती आहे हा विषयच नव्हता. त्यामुळे त्यांना सूट देण्यासाठी काहीच अर्थ नव्हता. महालेखापालांनी मुद्दा काढल्यानंतर उद्योग विभागाला आवश्यक ती माहिती दिली होती. उद्योग विभागाला सांगण्यात आले की, उत्पादन क्षमतेचा मुद्दा निघालेला आहे. त्यावेळी त्यांनी सुधारित ग्राह्यतेचे प्रमाणपत्र पुर्वलक्षीप्रभावाने दुरुस्त करुन पाठविले. यापूर्वी साक्षीमध्ये हाच प्रश्न विचारण्यात आला होता की, उद्योग विभागाला ग्राह्यता प्रमाणपत्र पुर्वलक्षी प्रभावाने (मागील तारखेचे) देण्याचा अधिकार आहे काय ? यासंदर्भात केंद्र शासन आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाने त्या तारखेपासून परवानगी दिलेली असल्यामुळे ते उद्योग विभागाने सुधारित करुन दिलेली आहे. यामध्ये विक्रीकर विभागाचे नुकसान झाल्याबाबतचा मुद्दा आहे. १९९३ च्या स्कीममध्ये उत्पादन क्षमतेला मर्यादा नाही.

सदर मुद्याबाबत समितीने शंका उपस्थित केली की, कंपनीने जी सूट घेतली आहे त्या तुलनेत त्यांनी उत्पादन केलेले नाही. त्या कंपनीने १५० लाख लिटरची उत्पादन क्षमता ३०० लाख लिटर केली आहे. ही क्षमता वाढविल्यानंतर कंपनीला तेवढ्या क्षमतेचे ट्रान्सफॉर्मर बसवावे लागतात. ही क्षमता वाढविण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (MSEB) कडे आवश्यक ती कागदपत्रे सादर करावी लागतात तसेच आवश्यक ती रक्कम भरावी लागते. त्यामुळे सदरहू कंपनीने उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (MSEB) कडे सादर केलेली कागदपत्रे व विहित रक्कम जमा केल्यासंदर्भातील पुरावे समितीकडे सादर करावीत. जेणेकरुन समितीला वस्तुस्थिती लक्षात येईल. त्यांनी खरोखरच ही क्षमता वाढविली की केवळ कागदोपत्री क्षमता वाढविल्याचे दाखविले, हे समितीला समजले पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले.

यासंदर्भात विभागाला संबंधितांकडे जो पाठपुरावा करावा लागेल तो विभागाकडून करण्यात येईल. तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (MSEB) कडे सादर केलेले पुरावे सुध्दा समितीला देण्यात येतील. या बरोबरच राज्य उत्पादन शुल्क विभागाची एक्झिट पास, परमीट सुध्दा महत्त्वाचे आहे असे उद्योग विभागाच्या सचिवांनी सांगितले.

राज्य उत्पादन शुल्क विभाग त्या कंपनीने खरोखरच उत्पादन क्षमता वाढविली आहे किंवा नाही, हे न तपासता सुध्दा परवाना देऊ शकतो. ज्यावेळी कंपनीची उत्पादन क्षमता १५० लाख लिटर होती त्यावेळी त्यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (MSEB) किती युनिट वीज मंजूर करुन घेतली होती आणि दुप्पट क्षमता केल्यानंतर त्यांना महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून (MSEB) किती युनिट वीज पुरविण्यात येत आहे, हे समजले पाहिजे. त्यामुळे युनिटचा वापर आणि उत्पादन क्षमता या संदर्भातील सर्व आकडेवारी समितीकडे सादर करावा असे समितीने सूचविले असता सदरहू माहिती समितीकडे सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी आश्वासित केले.

सदरहू कंपनीने पूर्वलक्षीप्रभावाने फायदा मिळण्यासाठी मागणी केली होती काय, असल्यास, त्यांनी कोणत्या आधारावर मागणी केली होती, उद्योग विभागाने स्वतःहून कंपनीला फायदा दिला का ? अशी विचारणा समितीने केली असता उद्योग विभागाच्या सचिवांनी सांगितले की, विक्रीकर विभागाकडून वसूली होते, असा मुद्दा उपस्थित झाला होता. राज्य उत्पादन शुल्क विभागाने १५० लाख लिटर उत्पादन क्षमतेची मान्यता दिल्याचे नमूद केलेले होते. परंतु पूर्वी त्यांचा आयईएफ ३०० लाख लिटरचा झालेला आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागानेसुध्दा ३०० लाख लिटर क्षमतेचा परवाना वितरीत केला आणि ते सुध्दा त्याच तारखेला केले होते. कंपनीने तशा प्रकारचे पत्र दिनांक १६ सप्टेंबर, २०१५ रोजी दिले होते. त्या पत्रामध्ये नमूद केले होते की, This increase in our installed manufacturing capacities of Alcohol from Molasses is properly informed to Secretariat of Industrial Approvals (SIA) of Department of Industries New Delhi and acknowledgement of Industrial Entrepreneurs Memorandum (IEM) form them bearing Serial No.1845/SIA/IMO/2002 dated 05.08.2002 is received by us (copy enclosed).

However, we forgot to inform you about this increase in our installed manufacturing capacities, inadvertently for which, we tender our unconditional apologies.

Now when, our case has come up for assessment before the Sales Tax Officer, he instructed us to get our EC modified by you and as such, we pray for the said Amendment.

कंपनीने दिनांक १६ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या पत्रान्वये मागणी केल्यानंतर उद्योग विभागाने त्यांना ७-८ दिवसांच्या आत तातडीने आदेश दिल्याचे समितीने नमूद केले व यासंदर्भात कंपनीने उद्योग विभागास दिलेल्या पत्राची आणि त्या पत्राच्या अनुषंगाने उद्योग विभागाने काढलेल्या आदेशाची प्रत उपलब्ध करुन देण्यास सांगितले. तसेच उत्पादन क्षमतेत वाढ झाल्यानंतरची विज वापराबाबतची माहिती व सदरहू कंपनीचे संचालक यांची सुध्दा नावे समितीला देण्याबाबत आणि सदर माहिती केवळ उद्योग विभागाकडून न घेता महाराष्ट्र राज्य मंडळाकडूनही घेण्याबाबत समितीने सूचित केले व उर्वरित माहिती १५ दिवसांत समितीला सादर करण्याबाबत समितीने सूचित केले व उद्योग विभागाच्या सचिवांनी त्यास मान्यता दर्शविली माहिती सोबत विवरणपत्र-अ मध्ये जोडली आहे.

२.४.७.१ कराच्या चुकीच्या दराचा अवलंब करणे

Micronutrients fertilizer च्या उत्पादकाने एप्रिल २००५ मध्ये केलेल्या रुपये ८४.५८ कोटी विक्रीवर चार टक्के दराने कर आकारण्यात आला होता. एप्रिल, २००५ मध्ये सदर उत्पादन अनुसूचित कोठेही समाविष्ट नसल्याने त्यावर १२.५ टक्के दराने कर आकारणे आवश्यक होते. कमी दराने कर आकारल्यामुळे रु.७.१९ लाख रुपये कराची कमी आकारणी झाली असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, दिनांक १/५/२००५ पासून विभागाने ते दर बदलले. विभाग उत्पादकांना एक महिन्याची संधी देतो. व्यापारात अडचण होऊ नये म्हणून शासनाने यासंदर्भात एक सविस्तर परिपत्रक काढलेले आहे. त्यामुळे कोणालाही जाणुनबुजून फायदा दिला गेलेला आहे असे वाटत नाही.

२.४.७.२ कराच्या चुकीच्या दराचा अवलंब करणे

अभिप्राय नाही.

२.४.८.१ थकबाकीची वसुली मागणी सूचना जारी करण्यात कालमर्यादेचा अभाव

कालमर्यादेच्या अभावामुळे एकूण ४६ प्रकरणे प्रलंबित होती, याबाबत खुलासा करताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, काही अधिका-यांची बदली होते त्यामुळे प्रकरणे प्रलंबित राहतात. ही त्रुटी नवीन पध्द तीमुळे टाळता येणार आहे. यामध्ये लेखापरिक्षकाने मागणीच्या सूचना आदेश दिल्याबरोबर या सर्व बाबी आपोआप बंद होतील.

यावर समितीने सूचना केली की, सन २००६-२००७ ची जी यादी आहे त्यामध्ये खूप उशीर झालेला आहे. यामुळे व्याजाचे नुकसान झालेले आहे. शासनाची मोठ्या प्रमाणात रक्कम अडकलेली आहे, याकडे लक्ष देण्याची गरज आहे, यास विभागीय प्रतिनिधींनी सहमती दर्शविली.

२.४.८.२ प्रलंबित रक्कमांची वसुली न होणे

मुंबई विभागातील (सप्टेंबर, २०१३ ते जानेवारी, २०१४) या कालावधीतील ४५ व्यापा-यांच्या बाबतीत वेगवेगळ्या कालावधीत (२००५-२००६ ते २००६-२००९) कालखडात MVAT अधिनियमाच्या कलम २३ (२) अंतर्गत एकतर्फी निर्धारण आदेश पारीत केले होते. आणि ऑगस्ट, २०१२ ते जुलै, २०१३ दरम्यान एकूण रु.३३.२८ कोटीसाठी मागणी सूचना जारी करण्यात आल्या होत्या परंतु वसूली करण्यात आली नाही. याबाबत मोठ्या प्रमाणात रकमा प्रलंबित आहेत, याची कारणे काय आहेत? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, एक्स पार्टी आदेश पारित करण्यात आली आहे. त्याच्याविरुध्द जे अपिल दाखल झाले त्यासंदर्भात निर्धारित आदेश पारित करुन ६ प्रकरणांमध्ये परतावा दिला आहे. ८ प्रकरणी आदेश असून एक प्रकरणामध्ये वसूली झालेली आहे. अशा एकूण ४६ केसेस आहेत. व्यापा-यांनी अपिल दाखल केले आहे. सहा व्यापारी तेथे सापडत नाहीत. यासंदर्भात समितीने अशी विचारणा केली की, ते व्यापारी शेअरहोल्डर आहेत काय, त्यांचे अकाऊंटस कोणत्या बँकेत आहेत? त्यांचे काही व्यवहार झाले आहेत काय, या बाबींची संपूर्ण तपासणी केली पाहिजे.याबाबत विभागीय सचिवांनी विदित केले की, विभागाने एक परिपत्रक काढलेले आहे त्याप्रमाणे ते अधिकारी कारवाई करित आहेत.

अपिल करणारांची संख्या जास्त आहे. अपिल प्रलंबित राहिल्यामुळे मोठ्या प्रमाणावर रक्कमा प्रलंबित राहतात आणि दुस-या बाजूला मनुष्यबळ कमी आहे. नवीन अपिल निकाली काढण्यासाठी शासनाने नवीन यंत्रणा निर्माण केली आहे काय? सहा फॉमर्स सापडत नाहीत. बोगस फोर्मची नोंद करु नये यासाठी विभागाने काही उपाययोजना केली आहे काय? अशी

विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, आता नवीन पध्दाती तयार होईल त्यामुळे अपिलांची संख्या कमी होत जाईल. जेव्हा मूल्यवर्धित कर आला तेव्हा सुरुवातीच्या काळामध्ये मोठया प्रमाणावर निर्धारण करावी लागली. अपिलांची संख्या जास्त वाढलेली आहे. काही पदे विभाग वाढविणार आहे जेणेकरुन अपिलांचा निपटारा लवकर होईल. अपिलासंदर्भात अधिका-यांचा बोजा कसा कमी करता येईल यासंदर्भात इतर राज्यात सहा पथके पाठविली होती. पार्ट पेमेंट, अपिल, यामुळे मोठ्या प्रमाणात महसूल अडकून राहतो. व्यापारी अडकून पडतात. Is doing Business या केंद्र सरकारच्या जाहिरातीनुसार लगेचच नोंदणी करुन द्यावयाची आहे. तशी विभागाने सुरुवात केली आहे. डीलर कोण आहे, हे समजले की, त्यावर एक बंधन आणावयाचे आहे. जो नवीन नोंदणी करणार आहे त्याला दर महिन्याला विवरणपत्र भरावयाचे आहे. त्याचे तीन चार महिलेने एकसारखे नोंदणी झाली नसेल तर अशा बाबींना आळा बसेल. म्हणून जाणुनबुजून हा निर्णय घेतला आहे.

२.४.९. शास्तीची आकारणी न करणे

१.२८ कोटी इनपूट टॅक्स क्रेडिट (ITC) ची मागणी विभागाने मान्य केली नव्हती, परंतु कलम २९(४) अंतर्गत हवाला खरेदीवर मागणी केलेल्या set off च्या रक्कमे इतकी शास्ती आकारण्यात आली नाही. अनुक्रमांक ५१ ते अनुक्रमांक ६५ पर्यंत उदा. ट्रायकेम लॅब बॉम्बे प्रा.लि., मे.गढवी मेटल इंडिया अशा कंपन्यांच्या केसमध्ये टक्केवारी बरीच कमी असलयामुळे तसेच त्या एक टक्क्याच्या खाली येत असल्यामुळे योग्य आहे. परंतु अनुक्रमांक ६१ वरील मे.मेरु केम ४.५. टक्के आहे. गढवी मेटल्स ७ टक्के आहे, यांना शास्ती का लावण्यात आली नाही? एका बाजूला एक रक्कमेच्या पेक्षा कमी असल्यामुळे त्यांना सोडून दिले आणि आणि दुस-या दोन प्रकरणामध्ये अनुक्रमांक ६१ आणि ६४ वर तशी जास्त रक्कम आहे. अनुक्रमांक ६१ वर ५ कोटी २८ लाख रुपयांच्या तुलनेते २२ लाख ३९ हजार रुपये होतात म्हणजे साडेचार टक्के आहे. गढवी मेटल इंडियाचे ३६ लाख ३३ हजार रुपयांच्या तुलनेत २ लाख रुपये होतात. ही टक्केवारी काही कमी नाही असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी स्पष्टीकरण दिले की, दिनांक २९/३ आणि २९/४ मध्ये स्पष्ट उल्लेख केला आहे. मुव्हींगली केले असेल तर शास्ती बसविता येत नाही. यामध्ये टॅक्स आणि व्याज वसूल झालेले आहे त्यामुळे शास्ती लावणे योग्य होणार नाही.

समितीने असे मत व्यक्त केले की, महालेखापालांचा आक्षेप आहे की, आयटीसीने अमान्य केलेले आहे.यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, त्यांना भूर्दंड बसलेला आहे.पाच ते सहा टक्क्याच्या वर रक्कम आहे. उपरोक्त दोन्ही प्रकरणी याचा आढावा घेण्यात येईल.

ज्या प्रकरणामध्ये चार टक्के, पाच टक्केच्या वर असेल अशा केसेसना बाकीच्यांप्रमाणे निष्काळजीपणे न्याय देण्यात येऊ नये त्यांना शास्ती लावली पाहिजे, यादृष्टीने विचार करावा असे समितीने सूचित केले व विभागीय सचिवांनी त्यास मान्यता दर्शविली.

२.४.१०.१

CST अधिनियमांतर्गत अंतिम केलेल्या प्रकरणांत आढळलेल्या विसंगती चुकीच्या व अपूर्ण प्रपत्रावर कर प्रदानातून दिलेली चुकीची सूट यासंदर्भात दोन प्रकरणामध्ये आदेश पारीत केलेले आहेत. एका प्रकरणामध्ये म्हटले आहे की, योग्य आहे. ६ लाख ५० हजार आणि ४ लाख ७९ हजार या दोन्ही केसमध्ये अपिल सुनावणीसाठी प्रलंबित आहे याबाबत विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, मे.प्लासमिक इंजिनिअरिंग मध्ये अपिल दाखल झाले आहे, त्याची प्राथमिक सुनावणी ८ जुलै, २०१६ रोजी मिळाली, मे.हसिया पॅकेजिंगमध्ये त्यांनी २५ हजार रुपयांचे अंशतःभरणा केले आहे, अंतिम स्थगिती दिनांक ११/३/२०१६ रोजी मिळाली आहे. अंतिम स्थगिती आदेश झाल्यामुळे यासंदर्भात अंतिम सुनावणी घेऊन प्रकरण निकाली काढण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

परिच्छेद क्र. २.४.१०.२ : CST अधिनियमांतर्गत अंतिम केलेल्या प्रकरणांत आढळलेल्या विसंगती.

२५ प्रकरणाबाबत सीएसटी अधिनियमांतर्गत अंतिम केलेल्या प्रकरणात आढळलेल्या विसंगती, अपूर्ण प्रपत्र यासंदर्भात माहिती देताना वित्त विभागाच्या प्रतिनिधींनी सांगितले की, या परिच्छेदामध्ये महालेखाकारांनी असा मुद्दा उपस्थित केलेला आहे की, जे आयफॉर्म्स स्पेशल इकॉनॉमिक झोनचे आयुक्त वितरित करतात, ज्यावर केंद्रीय विक्रीकर लावता येत नाही, त्या आयफॉर्म्समध्ये दिलेली माहिती अपुरी होती. ती माहिती अपुरी असल्याने ते आयफॉर्म्स मान्य करायला नको होते आणि त्यावर कर बसविला पाहिजे होता. या २५ प्रकरणांसंदर्भात काही माहिती त्यामध्ये दिली गेली नव्हती किंवा रेकॉर्डवर उपलब्ध नव्हती. परंतु, नंतर जेव्हा याची तपासणी केली, तेव्हा २५ पैकी २४ केसेसमध्ये आवश्यक बाबींची पूर्तता झालेली असून ते अभिलेखे आता

तपासणीसाठी उपलब्ध आहेत. फक्त अनुक्रमांक ३ च्या प्रकरणामध्ये डिलरला नोटिस दिल्यानंतरही त्यांनी ती माहिती दिलेली नाही, त्यांनी अपिल दाखल केलेले आहे. रू. १,२६,८०८ एवढया रक्कमेची मागणी योग्यच आहे.

ही मागणी नियमानुकुल असून यामध्ये कोणतेही नुकसान झालेले नाही. बाकीच्या २४ केसेसमध्ये शासकीय महसूलाचे नुकसान झालेले नाही.

परिच्छेद क्र. २.४.१०.३ : CST अधिनियमांतर्गत अंतिम केलेल्या प्रकरणात आढळलेल्या विसंगती दस्ताऐवज पुरावा उपलब्ध नसणे.

यासंदर्भात माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, हे देखील तशाच प्रकारची निर्यातीच्या संदर्भातील प्रकरण आहे. या निर्यातीच्या संदर्भात विभागाने एक चेकलिस्ट तयार केलेली आहे. त्या चेकलिस्ट मधील कागदपत्रे उपलब्ध असतील तर तो व्यवहार निर्यात म्हणून ग्राह्य धरला जातो. त्या अनुषंगाने या पाचही प्रकरणामध्ये सर्व कागदपत्रांचे अभिलेखे आहेत व यामध्येही कोणत्याही प्रकारचे नुकसान झालेले नाही.

सर्व प्रक्रिया करण्याकरिता विभाग १०० टक्के ऑनलाईन पध्दती का सुरु करीत नाही ? एक्सपोर्ट ओरिएंटेड जे युनिट्स आहेत, अजूनही तेथे मध्यस्थ लागतो. संबंधित विभागाचे काम करण्यासाठीचे सल्लागार लागतात. ही सर्व कार्यपध्दती फार क्लिष्ट आहे. यासाठी निर्यात व्यवसाय करणा-या लोकांसमेवत चर्चा करणे आवश्यक आहे. विभाग जे एक्सपोर्ट ओरिएंटेड युनिट चालविता ते युनिट सेस किंवा निर्यात करण्यासाठी नेमून दिलेल्या युनिट व्यतिरिक्त असेल तर खूप अडचणी येतात. हे सोपे नाही. शेवटी माणूस कंटाळून जातो आणि तो छोट्या-मोठ्या प्रमाणातील पुढची एक्सपोर्टची ऑर्डर घेणे बंद करतो, एवढी क्लिष्ट पध्दत तेथे आहे. लघुउद्योगांकडून होणारी निर्यात आता फार मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. त्यांच्या अडचणी समजून घेणे गरजेचे आहे.

एक्सपोर्ट ओरिएंटेड युनिटबाबत लघु उद्योग किंवा मध्यम उद्योजक आहेत त्यांच्या बरोबर सुध्दा विक्रीकर विभागाच्या माध्यमातून सुसंवाद साधला गेला पाहिजे. त्यांच्या अडीअडचणी समजून घेतल्या पाहिजेत. देशातील निर्यातीचे प्रमाण वाढावे या दृष्टीने विक्रीकर विभागाचे सहकार्यही त्यांना मिळाले पाहिजे. तसेच क्लिष्ट पध्दती विभागाने दुरुस्त करणे आवश्यक असल्याचे मत समितीने व्यक्त केले.

२.४.१०.४ :

CST अधिनियमांतर्गत अंतिम केलेल्या प्रकरणात आढळलेल्या विसंगती अपूर्ण प्रपत्र या परिच्छेदाच्या अनुषंगाने औरंगाबाद, मुंबई, नाशिक, पुणे व ठाणे विभागातील ११ व्यापा-यांच्या प्रकरणांतील अनुक्रमांक २ वरील इलेक्ट्रो ट्रेक इंडस्ट्रीज यामध्ये सुध्दा अपिलाला स्थगिती आणि नंतर स्थगनादेश असे नमूद केलेले आहे, याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, इलेक्ट्रो ट्रेक इंडस्ट्रीज मध्ये जे निर्धारणा आदेश पारीत करण्यात आले होते त्याच्या विरोधात व्यापा-यांनी अगोदरच अपिल दाखल केले होते. लेखापरिक्षणात हा मुद्दा काढल्यानंतर तो अपिल ऑफिसरला कळविलेला असून त्यांचा यावरील अंतिम निर्णय झालेला नाही.

लेखापरिक्षकांनी हा परिच्छेद काढलेला आहे, यावर विभागाची भूमिका काय आहे ? विभागाने आक्षेप अमान्य केलेला आहे. लेखापरिक्षणाचा परिच्छेद विभागास मान्य आहे की नाही अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, या सर्व प्रकरणांमध्ये फॉर्म मध्ये काही गोष्टी राहून गेल्या होत्या. ही बाब महालेखाकारांनी आता निदर्शनास आणली. त्यानुसार काही प्रकरणांमध्ये विभागाने पूर्तता करुन घेतलेली आहे. जेव्हा अपिल अधिका-यांकडून त्यांना नोटिस काढण्यात येईल तेव्हा त्याच्या समोर कदाचित ती कागदपत्रे दाखविण्यात येतील.

आजच्या घडीला जी काही कागदपत्रे विभागाकडे उपलब्ध आहेत, त्या कागदपत्रांच्या आधारावर महालेखाकारांनी काढलेला मुद्दा जर योग्य असेल तर विभागाची भूमिका ठाम असली पाहिजे. हे सन २००५-२००६ मधील प्रकरण आहे त्याला आता १० वर्षे झालेली आहेत. ती कागदपत्रे सादर करतील, विभागाकडे कागदपत्रे नाहीत मग हा विषय संपला. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, विक्रीकर विभागाच्या अंतर्गत परिपत्रकामध्ये बिल ऑफ लेडिंग हे सर्वात महत्त्वाचे दस्तऐवज आहे. याचा अर्थ माल आपल्या देशातून बाहेर गेला, हे पाहणे फार गरजेचे आहे. बिल ऑफ लेडिंग हे आजही रेकॉर्डवर उपलब्ध आहे. महालेखाकार कार्यालय हे कस्टम डिपार्टमेंट व यांचेही लेखापरीक्षण करीत असतात. त्यामुळे त्यांनी इतर सर्व कागदपत्रांची पूर्तता करावी, असा मुद्दा नमूद केलेला आहे. त्यामुळे या ९ प्रकरणांमध्ये ती कागदपत्रेही मागवून

घेतले व ते मिळाले देखील. मात्र २-३ प्रकरणांमध्ये मागितलेले अतिरिक्त कागदपत्रे सध्या रेकॉर्डवर आले नव्हते. ते दिले तर आक्षेपाचे निराकरण होईल.

२ प्रकरणांमध्ये मध्ये आढावा घेण्यात येत आहे. परंतु एका प्रकारणामध्ये विभागाकडून आदेश पारित करण्यात आले आहेत. असे समितीने मत व्यक्त केले असता विभागाच्या सचिवांनी खुलासा केली की, निर्धारण आदेश तर अगोदरच पारीत झालेली होती. कर निर्धारण मध्येच ही चूक होती म्हणूनच महालेखाकारांनी लेखापरिक्षणाचा मुद्दा काढला आहे की, निर्धारण करताना विभागाने हे कागदपत्र रेकॉर्डवर असल्याचे पाहिले नाही.

यावर समितीने विचारणा केली की, त्यानंतर विभागाने पुनर्निर्धारण केली काय? लेखापरिक्षण परिच्छेद काढल्यानंतर २ वर्षांचा कालावधी उलटलेला आहे, याबाबत विभागाचे काय म्हणणे आहे ? यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाकडून उर्वरित कागदपत्र तपासण्यात आले त्यामुळे ८ प्रकरणामध्ये हे स्पष्ट झाले की, या प्रकरणांमध्ये पुर्तता झालेली असून आता काहीच राहिलेले नाही व १ प्रकरण अपिलमध्ये आहे. त्याबाबत अपिल ऑफिसर यांना कळविले असून ते याबाबत अंतिम निर्णय घेतील व आदेश पारीत करताना हे काय आहे ते विचारात घेतील. या दोन प्रकरणी विभागाने आढावा घेतला आहे. या प्रकरणी उशीर झालेला आहे.

महालेखाकारांनी विभागास हे कळविले आहे की, विभागाने जहाज वाहतुकीची कागदपत्रे व विभागाकडील कागदपत्रांची पडताळणी करावी. एका बाजूला मालवाहक जहाजे लागलेली असतात. आयात-निर्यात या व्यवसायातील लोकांच्या अडी-अडचणी असतात. एका बाजूला शिपिंगची तारीख असते आणि दुस-या बाजूला हा सर्व निपटारा चालतो. विभागाने एच फॉर्म ऑनलाईन करावा, तो अपूर्ण भरला असल्यास त्यामध्ये काही त्रुटी किंवा कमतरता असेल तर ते तेथेच लक्षात येणे आवश्यक आहे व संबंधितांना लक्षात आणून दिले पाहिजे की त्यांना हे पूर्ण केलेले नाही. असे झाल्यास या सर्व परिश्रम थांबतील असे समितीने सूचविले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, तो फॉर्म ऑनलाईन आहे. तसेच याकरिता एच फॉर्मची आवश्यकता नाही. एक्सपोर्ट झाले की, विभागाच्या विक्रीकराची जबाबदारी संपते. एच फॉर्ममधील तपशील या केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या आहेत. त्यामुळे राज्य शासनास त्यात काही बदल करता येत नाही. एच फॉर्म मध्ये मागितलेली माहिती आजच्या युगात आवश्यकही नाही. सेल्स टॅक्सच्या दृष्टीने कंपन्यांनी निर्यात केली की, विक्रीकर विभागाने त्याला मान्यता दिली पाहिजे व त्याच्यावर विक्रीकराचा वजावट केला पाहिजे. परंतु, केंद्र शासनाने हा फॉर्म ठरवून दिलेला असल्यामुळे त्यामध्ये जर एखादी तांत्रिक माहिती राहून गेली असेल तर, ती निर्यात नाकारणे योग्य होणार नाही. ३८ हजार रुपयांसाठी कोणताही व्यापारी अपिलामध्ये जाणार नाही. परंतु, प्रश्न ३८ हजार रुपयांचा नाही. तो तिकडे सूचीबध्द होतो की, हा चुकीच्या नावाने निर्यात करतो किंवा चुकीचे निर्यात दाखवून कर वाचवितो त्यामुळे तो व्यापारी स्वतःचा प्रामाणकिपणा सिध्द करण्यासाठी अपिलात जातो असे मत समितीने व्यक्त केले.

या विषयाचा शेवट झाला पाहिजे. २ प्रकरणाबाबत २ वर्षे झाली तरी त्याबाबत पुनरावलोकन चालू आहे. विभागाने या विषयावर जो काही निर्णय घ्यायचा आहे तो घेऊन लेखापरिक्षणाचा परिच्छेद संपवावा. व एक महिन्याच्या आत तिन्ही प्रकरणांचे पुनरावलोकन करुन समितीला माहिती द्यावी असे समितीने सूचित केले.

२.४.११ :

व्यापा-यांची नोंदणी करताना परतावा व परतावा लेखापरिक्षा शाखेमध्ये असलेल्या माहितीचा वापर न करणे यासंदर्भात समितीने असे मत व्यक्त केलेली की, हा युआरडी करुन खरेदी केल्याचा विषय आहे. २०७ प्रकरणांपैकी आपण १८९ चा चार्ट दिलेला आहे. उर्वरित १८ प्रकरणाची काय परिस्थिती आहे ? अशी विचारणा समितीने केली असता याबाबत अद्ययावत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, २०७ पैकी १९४ प्रकरणांमध्ये विभागाने आता पडताळणी पूर्ण केलेली आहे.

या पडताळणीमध्ये असे आढळून आले आहे की, १६ प्रकरणांमध्ये आंतरराज्य खरेदी आहे. त्यामध्ये ३६ युआरडी डिलर्स सामील होते. जॉबवर्क लेबर चार्जेसच्या ५ केसेस होत्या. ३७ प्रकरणामध्ये करमुक्त खरेदी आहे. कमी उलाढालीची अशा ४४ प्रकरणे आहेत, त्यामध्ये २२३४ युआरडी डिलर्स सामील आहेत, त्यांची उलाढाल थ्रेशोल्ड पेक्षा खाली आहे. नंतर सोन्याचे दागिने, वैयक्तिक जुने दागिने, सोन्याच्या दागिन्यामध्ये १५ प्रकरणे आहेत आणि एकूण ६८ युआरडी आहेत.

काही लोक आपले जुने दागिने व्यापा-यांकडे दुरूस्ती करण्यासाठी देतात. त्यावर कर लागत नाही. त्यामुळे खरेदीच्या उलाढालीमध्ये तो व्यापारी दाखवितो की, त्याचा एवढा उलाढाल युआरडीमध्ये आहे. ७०४ लेखापरिक्षण अहवालामध्ये युआरडीचा

कॉलम एकत्र आहे. त्यामुळे सर्व मिळून एकत्रित माहिती येते. त्यामुळे आता हे १-१ करुन तपासावे लागत आहे. त्यानंतर नोंदणीकृत डिलर शोन ॲज अनोंदणीकृत म्हणजे त्या डिलरची अगोदर पासून नोंदणीकृत होता परंतु, त्याने खरेदी दाखविताना ७०४ मध्ये अनोंदणीकृत दाखविले अशी २० प्रकरणे होती. त्यामध्ये ५० डिलर्स सामील होते. त्यानंतर २८ प्रकरणांमध्ये ५१ डिलर्स खरोखरच युआरडी मिळाले जे थ्रेशोल्डच्यावर होते. त्यांची नोंदणी करुन घेण्यात आली आहे.

नोंदणी केल्यानंतर त्यांच्याकडून विभागास कर मिळणार आहे . ते विभागाच्या कर जाळ्यामध्ये आले आहेत. जुन्या व्यवहाराबाबतची प्रकरणे सुध्दा कर जाळ्यामध्ये येणार आहेत. त्याबाबत अधिनियम मध्येच तरतूद आहे. संपूर्ण पडताळणीमध्ये अजून २९ प्रकरणे आहेत. त्यामध्ये २८४ व्यापारी सामील आहेत. त्याकरिता अजून ३ महिने लागतील. हे मोठे काम असते. प्रत्येक व्यापा-यापर्यंत पोहोचावे लागते, हे काम शिल्लक राहिलेले आहे.

ही २९ प्रकरणे, तसेच २०७ पैकी शिल्लक असलेली जी १३ प्रकरणे आहेत. २९ + १३ अशाप्रकारे ४२ व्यापा-यांचे सर्व्हेक्षण ३ महिन्यांत करुन त्याबाबतची माहिती समितीला देण्यात यावी असे समितीने सूचविले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, त्याबाबतची माहिती समितीकडे पाठविण्यात येईल.

२.४.१२ :

रिफॉर्मबाबत चर्चेच्या वेळेस वेळोवळी सांगितलेले आहे. परंतु, शेवटी महालेखापाल खूप नमुन्यांचे सर्व्हेक्षण करीत असतात. त्याच बरोबर विक्रीकर विभागाची अंतर्गत लेखापरिक्षणाची पध्दतही खूप ठोस असली पाहिजे. ते केवळ मध्यवर्ती स्तरावर नाही तर विभागीय स्तरावरही असले पाहिजे.

तसेच, एकदा डेप्युटी किंवा ॲडिशनल कमिशनर यांनी आदेश पारीत केला तर त्याचा पडताळा घेतला असला पाहिजे. कारण महालेखापाल काही नमुना प्रकरणे पाहतात. परंतु, पूर्ण लेखापरिक्षण काही होत नाही. यादृष्टीने विक्रीकर विभागाने काही उपाययोजना केली आहे काय ? त्याच बरोबर पूर्ण देशात महाराष्ट्र राज्य हे नवीन तंत्रज्ञानाच्या वापरात अग्रेसर आहे. याबाबतही माहिती देण्यास समितीने सांगितले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, आज रोजी जे अंतर्गत लेखापरीक्षण कक्ष कार्यरत आहे ते मुंबई शिवाय विभागीय स्तरावर देखील कार्यरत आहे. १८ डेप्युटी कमिशनर, १९ असिस्टंट कमिशनर, २० सेल्स टॅक्स ऑफिसर, ८१ सेल्स टॅक्स इन्सपेक्टर्स असे सर्व काम करीत आहेत. परंतु, हे अपुरे पडत आहेत. याकरिता गेल्या काही महिन्यांपासून विभागाच्या पुनर्रचनेकरिता एक समिती तयार करण्यात आलेली आहे. लवकरच तिचा अहवाल अपेक्षित आहे. त्यामध्ये अंतर्गत लेखापरिक्षण शाखा आणखी बळकट करण्याचा प्रस्ताव विभाग शासनापुढे सादर करणार आहे. तसेच अतिरिक्त मनुष्यबळही घेण्यात येणार आहे.

स्कॅनिंगची प्रक्रिया बॉम्बे सेल्स टॅक्स ॲक्टच्या काळामध्ये होती, त्यामध्ये वरिष्ठ अधिकारी मधून मधून ऑर्डर्स काढून स्कॅन करायचे. ती स्कॅनिंगची प्रक्रियाही करण्यात येत आहे आणि त्यासाठी विभागाच्या पुनर्रचनेमध्ये काही वरिष्ठ अधिका-यांची पदे निर्माण करण्यात येणार आहेत. या दोन गोष्टी अंतर्गतपणे करण्यात येणार आहेत. तूर्त आज जे स्कॅनिंगचे अधिकारी उपलब्ध आहेत, त्यांच्यामध्ये स्कॅनिंग वाढविण्यासाठी अंतर्गत आदेश आता प्रसारित करण्यात येत आहेत. समितीकडून प्रश्नावली आल्यानंतर हे काम काही मर्यादेमध्ये हाती घेतले आहे. कारण लोकांकडे भरपूर काम आहे. ही स्कॅनिंग ऑर्डर सुरु करण्यात येणार आहे.

या शिवाय आता विक्रीकर विभागाची जी सॅप यंत्रणा सुरु होणार आहे, त्यामध्ये इनव्हॉईस वाईज रिटर्न येणार आहेत. यामुळे जवळजवळ ८० टक्के काम सोपे होणार आहे. कारण इनव्हॉईस वाईज मॅचिंग अगोदरच होऊन जाणार आहे आणि ज्याचे मॅच होणार नाही त्या व्यापा-याला त्याचवेळी हे कळविण्यात येणार आहे की, विभाग विवरणपत्र परत करीत आहे. मग तो त्याच्या विक्रेत्याच्या मागे लागून ते ठीक करण्याचे काम हाती घेईल. सेल्फ करेक्टिंतग मॅकेनिझम सारखे हे होणार आहे. याकरिता असे वाटते की, सॅप आल्यानंतर विक्रीकर विभागाच्या कामाचा बोजाही ब-यापैकी कमी होईल. मग विक्रीकर विभाग आणखी चांगल्यारितीने लेखापरिक्षणाचे काम करु शकेल.

महालेखाकार कार्यालयाकडूनही जर विक्रीकर विभागाला मदत मिळाली तर महालेखापालांना विनंती करुन त्यांच्याकडून लेखापरिक्षणाच्या अधिका-यांसाठी काही प्रशिक्षणाची व्यवस्था करुन घेता येईल. मुंबई महानगरपालिकेकडून देखील महालेखापाल कार्यालयास लेखापरिक्षणासंदर्भात प्रशिक्षण देण्याची विनंती करण्यात आली होती. त्याचप्रमाणे महालेखापाल कार्यालयात लेखापरिक्षणाची पध्दती चांगली विकसित झालेली आहे त्यामुळे त्यांचेकडून प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करुन घेतली तर अधिका-यांची गुणवत्ता आणखी चांगली वाढविता येईल.

कार्यपध्दती अद्ययावत करण्यासाठी विक्रीकर विभाग मॉनिटरिंग कसे करतो हे महत्वाचे आहे. महानगरपालिकेचा सॅपचा अनुभव संबंधित अधिका-यांना माहित आहे. सॅप चालू केल्यानंतर किती अडचणी येतात हे बघणे गरजेचे आहे. आजही पूर्ण यंत्रणा सॅपमध्ये काम करीत नाही. काही ठिकाणी व्यक्तिशः काम केले जाते त्यामुळे हे काम पूर्ण करण्यासाठी विक्रीकर विभागास वेगळी व्यवस्था करुन घ्यावी लागेल असे समितीने सूचविले.

यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, सॅपची प्रणाली मुंबई महानगरपालिकेमध्ये लेखा पध्दती (Account System) सुरु आहे. या पध्दुतीमध्ये कोणी गडबड करु शकत नाही. सॅप प्रणालीमध्ये प्रत्येक गोष्टींसाठी लेखापरीक्षणाचे काम असतो. कराधान विभागामध्ये हार्ड वॅट सिस्टिम आली तर निश्चितच चांगली गोष्ट आहे. यामध्ये कधी बदल करण्याबाबत विनंती करावी लागते त्यासाठी वेळ लागतो. मॅचिंगची पध्दाती व्यवस्थित चालू झाली तर बरे होईल. हे फार मोठे काम आहे. त्यामध्ये विक्रेत्यांचे खातेवही बनविला जाणार आहे. भारतात पहिल्यांदा ही पध्दती सुरु होणार आहे. ही पध्दती यशस्वी झाली तर विक्रेत्यांना चांगली सेवा देणे शक्यत आहे. मिस मॅचेसचे जे प्रकार आहेत ते अगोदर विक्रेत्याला कळतील. बरेचशा विक्रेत्यांना माहितीच नसते की, त्यांनी ज्या माणसांकडून वस्तू खरेदी केली आहे त्यांने टॅक्स भरला आहे किंवा नाही. विक्रीकर विभाग दोन तीन वर्षांनी त्याला पकडतो. ते सुध्दा जाचक आहे, परंतु याबाबत व्यवस्था केली जाईल.

समितीने अशी विचारणा केली की, सॅप प्रणालीमध्ये पदसिध्द अधिकार हे अधिकारी म्हणून देणार की, वैयक्तिक देण्यात येणार आहेत? महापालिकेचा अनुभव फार वेगळा आहे. एक सहाय्यक आयुक्त, उप म्युनिसिपल आयुक्तांना पध्दततीमध्ये प्रवेश करावयाचा असेल, ॲक्सेस द्यावयाचा असेल तर त्यासाठी पासवर्ड दिले होते. या सॉफ्टवेअरसाठी अधिका-यांना प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे. सन २०११ ते २०१२ पर्यंतचा रिफंड पूर्ण केलेला दिसतो आहे. आता सध्याची काय स्थिती आहे, विक्रीकर विभागाकडे मनुष्यबळ उपलब्ध असून संगणकीकरणामुळे व्यापारी उत्सुक असतात की प्रकरणांचे निकाल लवकर लागून परतावा लवकर मिळाला पाहिजे. हे सर्व अद्ययावत व्हायला किती दिवस लागतील? याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, मुंबई महानगरपालिकेच्या पध्द तीमध्ये लिपीक स्तरापासून सर्वांना ॲक्सेस दिले होते. यासंदर्भात परताव्यासंबंधी माहिती देण्यात आली आहे. विक्रीकर विभागाकडे कर परताव्याच्या सन २०१२ ते २०१६ पर्यंत २३३१८ केसेस प्रलंबित आहेत. त्यामध्ये ६१७० कोटी रुपयांचा परतावा द्यावयाचा आहे. गेल्या दोन तीन वर्षात शासनाकडून चांगले अनुदान मिळाले आहे त्यामुळे बराचसा अनुशेष दूर झालेला आहे. यावर्षी लहान व्यापा-यांचा पाच लाख रुपयापर्यंतचा परतावा लवकरात लवकर कसा काढता येईल याबाबत प्रयत्न करण्यात येतील. या एकूण प्रलंबित प्रकरणांमध्ये ५ लाखापर्यंतची संख्या ५० टक्क्यांच्या वर आहे.

महाराष्ट्र राज्यात वर्षाला किती विक्रीकर गोळा होतो? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, मागील वर्षी ७९१२४ कोटी रुपये एवढा विक्रीकर जमा झाला होता.

यावर्षी जवळपास ८० ते ९० हजार कोटी रुपये गोळा होतील अशी अपेक्षा आहे. जेणेकरुन राज्याच्या विकासासाठी निधिची कमतरता पडणार नाही. इन्कमटॅक्स विभागाच्या अंतर्गत काही प्रकरणे ५ टक्के खोलवर छाननी आयुक्त स्तरावर केली जाते. अशा प्रकारची पध्दाती विक्रीकर विभागाच्या निर्धारणा पध्दतीमध्ये आहे काय, अशी विचारणा समितीने केली असता याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, विक्रीकर विभागामध्ये आर्थिक बुध्दी संपदा कक्ष गेल्या काही वर्षापासून कार्यरत केलेला आहे. त्यामध्ये डेटा वेअर हाऊसिंग आणि बिझिनेस इंटेलिजन्स सॉफ्टवेअर घेतलेले आहे. त्यामध्ये एक प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार काम करीत आहेत. या आर्थिक बुध्दीसंपदा कक्षामध्ये राज्य शासनाकडून तसेच सांख्यिकी विभागातून काही अधिकारी प्रतिनियुक्तीवर आहेत. या अधिका-यांना या आर्थिक बुध्दीसंपदा कक्षामध्ये मोठ्या प्रमाणावर ट्रेनिंग दिलेले आहे. जेव्हा त्यांची बदली होते तेव्हा नव्याने बदलून आलेल्या अधिका-याला अगोदर ट्रेनिंग देण्यात येते. मग तो काम करण्यास सुरुवात करतो. बिझीनेस इंटेलिजन्स पध्देतीमधून रिस्क बेस्ड ॲनॉलिसिस करण्यात येते. कशा प्रकारच्या प्रकरणांमध्ये कशा प्रकारची जोखीम राहणार आहे हे काढून मग डेटा चर्निंग करण्यात येतो. त्यातून दर वर्षी दीड लाख प्रकरणे काढण्यात येतात. त्यामध्ये कोण कोणत्या प्रकारची जोखीम अंतर्भूत आहे, ही यादी कॉम्प्युटराईज्ड डेस्क पध्दातीवर तयार केलेली आहे. त्यासाठी केंद्राकडून वेगवेगळी पारितोषके मिळालेले आहेत. याचे कारण असे की, ही पध्दती फक्त महाराष्ट्र राज्यात पहिल्यांदा विक्रीकर विभागात अंमलात आणलेली असल्यामुळे केंद्राकडून वेगवेगळे प्रकारचे पुरस्कार महाराष्ट्र राज्याला मिळालेले आहेत. कॉम्प्युटराईज्ड डेस्क जे अनॉलिसिस करतो ते वेबसाईटवर टाकण्यात येते. विक्रेत्याला मान्य असेल की ही त्याची चूक आहे, तर ती तो मंजूर करतो त्यामुळे तेथे अधिकारी समोर येण्याची गरज नाही. त्याला वेबसाईटवर पूर्तता करता येते. त्याने पैसे भरले तर त्याला

अंतिम आदेश मिळतात. दरवर्षी अशी ३० हजार प्रकरणे निकाली काढण्यात येतात. अशा प्रकरणांचे अधिका-यांमध्ये वाटप केले जाते. ते त्यांचे निर्धारण करतात. या रिस्क बेस्डमध्ये कोणत्या व्यापा-याने खरेदी जास्त केली, परंतु कर कमी भरला, कोणत्या व्यापा-याने जास्त परताव्याची मागणी केलेली आहे, ही माहिती डेटामधून काढता येणे शक्य होते.

आयकरमधून ५.५० लाख रुपयांचे १२.५० लाख रुपये मिळाले. त्यांच्याकडे आले असते तर ते बंद केले असते. कारण ३० हजार प्रमाणे वर्षाचा टॅक्स दिला असता. त्यानंतर ते मिळालेच नसते. याबाबत शासनाने पुनर्विचार केला केला पाहिजे, विभागाने देखील त्यासाठी योग्य तो प्रयत्न करावा. असे समितीने सूचित केले.

२.५ इतर लेखापरिक्षण अभिक्षणे

मुंबई विक्रीकर अधिनियम १९५९ महाराष्ट्र मूल्यवर्धीत कर अधिनियम २००२, केंद्रीय विक्रीकर अधिनियम १९५६ अंतर्गत विक्रीकर विभागात अंतिम करण्यात आलेल्या निर्धारणा दस्तावेज तपासणीमधील अनेक प्रकरणांमध्ये नमूद केल्याप्रमाणे अधिनियम नियमातील तरतुदींचे पालन न होणे, कराची आकारणी न होणे किंवा कमी होणे, नियमबाह्य प्रकरणे निदर्शनास आली आहेत, या अनियमितता सातत्याने घडतात, लेखापरीक्षा करेपर्यंत त्यांचा तपासही लागत नाही, अंतर्गत लेखापरीक्षा बळकट करण्याबरोबर शासनाने अंतर्गत नियंत्रण यंत्रणा सुधारण्याची गरज आहे असा आक्षेप महालेखापालांनी नोंदविलेला आहे.

सदरहू आक्षेपाच्या अनुषंगाने अधिका-यांकडून चूक झाली असे लक्षात आल्यानंतर अशा संबंधित अधिका-यांकडून माहिती मागवून ३ महिन्याच्या आत अहवाल सादर केला पाहिजे. तसेच संबंधित अधिका-यावर शिक्षेची कारवाई केली पाहिजे. यासंदर्भात पुर्णपणे विकसित करण्याची जबाबदारी ही समितीची आहे. अधिका-यांवर काही तरी दडपण असलेच पाहिजे. सी फॉर्ममध्ये अतिशय मोठ्या प्रमाणात घोळ होत आहे. अशी अनेक प्रकरणे आढळून आलेली आहेत असे मत समितीने व्यक्त केले.

संबंधित अधिका-यांनी एकदा चूक केली तर कोणती शिक्षा आणि तीच चूक दुस-यांदा किंवा तिस-यांदा केलेली असेल तर कोणती शिक्षा द्यावयाची याबाबत काही तरी कार्यपध्दती निश्चित करणे आवश्यक आहे. आपण करे सो कायदा असे होऊ नये अशी समितीची प्रामाणिक इच्छा आहे. साक्षीमध्ये एका विषयावर चर्चा झाली होती. संबंधित अधिकारी वारंवार एकच चूक करतो. अशा अधिका-याला पदोन्नती देण्याचे सुरुच आहे. अशा प्रकारच्या प्रकरणामध्ये काही तरी दुरुस्ती करण्यासाठी एक पध्दती निश्चित करण्याची आवश्यकता आहे. या दृष्टीकोनातून विभागाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. विभागाने त्रयस्थ लेखापरिक्षक पथकाची सेवा घेऊन पुढील कार्यवाही करावी. विभागाचे बजेट ८० हजार कोटी रुपयांचे आहे. झोनवाईज वर्षाला थर्ड पाटीद्वारे ऑडिट करण्यासाठी ५ ते १० कोटी द्यायला लागले तरी हरकत नाही. या परिच्छेदाच्या माध्यमातून कोणता मार्ग काढावयाचा अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, त्रयस्थ लेखापरिक्षण पथकाच्यासंदर्भात विभागाने विचार केलेला होता. यामध्ये थोडीशी कायदेशीर अडचण आहे. कारण अधिनियमानुसार व्यापा-यांनी दाखल केलेली माहिती हे विक्रीकर विभागाच्या बाहेर देता येत नाही. त्यासंदर्भात विधी व न्याय विभागाकडून मत मागविल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

आपल्या राज्यातील किंवा इतर राज्यातील जे लेखापरिक्षक सेवानिवृत्त होतात अशा लेखापरिक्षकांची सेवा घेण्यासाठी विभागाने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे अशी सूचना समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, त्रयस्थ लेखापरिक्षण पथकाच्या संदर्भात विभागाने विचार केलेला होता. यामध्ये थोडीशी कायदेशीर अडचण आहे. कारण अधिनियमानुसार व्यापा-यांनी दाखल केलेली माहिती ही विक्रीकर विभागाच्या बाहेर देता येत नाही. त्यासंदर्भात विधी व न्याय विभागाचे मत मागविल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. कारण यासंदर्भातील डेटा हा इतरांशी शेअर करता येत नाही, ही एक अडचण आहे. समितीसमोर यापूर्वीच दिल्याला माहितीनुसार अंतर्गत लेखापक्षिण सक्षम करणे आणि निर्धारणा अधिका-याची तपासणी करण्याबाबतचा विचार सुरु आहे. त्यांनी केलेल्या निर्धारणा आदेशांची छाननी करुन कोठे आणि कोणत्या प्रकारच्या चुका केलेल्या आहेत, मुद्दाम केल्या किंवा तांत्रिक क्षमता नव्हती, या सर्व बाबींचा विचार आणि तपासणी केल्यानंतर दर्जाच्या आधारे निर्धारणा करण्याचे काम द्यावे किंवा कसे अशा प्रकारची सिस्टिम लवकरच कार्यान्वित करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत.

१० ते १५ दिवसांमध्ये सदरहू परिच्छेदाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही केली जाईल काय ? रिफॉर्म किती दिवसांमध्ये केले जाणार अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाच्या पुनर्रचनेसाठी समिती गठीत केलेली आहे. त्यांचा अहवाल दोन ते अडीच महिन्यांमध्ये येणे अपेक्षित आहे. यानंतर सदरहू अहवाल शासनाकडे सादर केला

जाणार आहे. त्यानंतर पदनिर्मिती केल्यानंतर पदभरती केली जाणार आहे. सध्याच्या अधिका-यांकडे स्कॅनिंगचे काम देऊन आणि विभागाच्या विंगमधील अधिका-यांना अंतर्गत लेखापरिक्षणासाठी अधिक प्रशिक्षण देऊन त्यांची क्षमता अधिक कशी मजबूत होईल या दृष्टिने प्रयत्न करण्यात येणार आहेत ही कामे कमी कालावधीत करण्यात येणार आहेत. परंतु, अतिरिक्त पदे मिळविण्यासाठी वेळ लागणार आहे.

२.५.१ :- हवाला व्यापा-यांकडून केलेल्या खरेदीवर नियमबाह्य प्रदान. सदर परिच्छेदाबाबत विभागाने सुरुवातीला लेखा आक्षेप अमान्य केलेला आहे. त्यानंतर दुरुस्तीची कारवाई करुन संबंधितांवर ३७ लाख रुपयांची मागणी केलेली आहे. आता व्यापा-यांनी याच महिन्यामध्ये अपील दाखल केलेले आहे. विक्रीकर किंवा मूल्यअवर्धित कर लागू होतो त्यावेळी हवालाचा कोणता संबंध असतो ? व्यापा-यांच्या भाषेत एकाकडून दुसरीकडे पैसा फिरविणा-या व्यवहाराला हवाला असे म्हटले जाते असे मत समितीने व्यक्त केले असता याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, विक्रीकर, आयकरामध्ये हवाला शब्द वापरला जातो. खरेदीदाराला बिल दिल्यानंतर कर वसूल केला असे दाखविले जाते. परंतु, असा कर शासनाच्या तिजोरीत जमा होत नाही. यास हवाला असे संबोधले जाते. असा प्रकार अनेक वर्षापासून सुरु आहे. अशा प्रकारची हजारो कोटी रुपयांची प्रकरणे विभागाकडे प्रलंबित असून परताव्याची प्रकरणे अशा प्रकारच्या प्रकरणांमध्ये आहेत. परताव्याच्या मागणीमध्ये उलट तपासणी करण्याची आवश्यकता आहे.

याबाबतची मोडस ऑपरेंडी अशी असते की, वाहनचालक किंवा माळ्याच्या नावे कंपनी ची स्थापना करण्यात येते. त्यानंतर बिल आकारुन त्या कंपन्या नंतर बंद केल्या जातात. विभागाला अशा कंपन्या मिळतच नाही. विभागाने लेखापरिक्षण परिच्छेद आल्यानंतर मार्च, २०१६ मध्ये या विषयाच्या अनुषंगाने काळजी घेतलेली आहे. पूर्वी विभागाने लेखापरिक्षण परिच्छेद अमान्य केले होते. त्यानंतर विभागाने आदेश पारित केला. आता ते व्यापारी न्यायाधिकरणामध्ये गेले. याबाबत विभागाने तातडीने पुढील कार्यवाही करुन आपल्या बाजूने निकाल कसा लागेल त्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, न्यायाधिकरणाला हे प्रकरण लवकर निकाली काढण्याबाबत विनंती करण्यात येणार आहे.

आतापर्यंत किती हवाला व्यापा-यांवर कारवाई केलेली आहे ? यासंदर्भात माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सॉफ्टवेअर सिस्टिमद्वारे माहिती काढली आहे. त्यानंतर काही हवाला व्यापारी निदर्शनास आले होते. त्यानंतर २०६५ हवाला व्यापा-यांचा शोध घेतल्यानंतर पोलीस स्टेशनमध्ये तक्रारी दाखल केलेल्या आहेत. यापैकी ३३ हवाला व्यापा-यांना अटक देखील झालेली आहे. अशा प्रकारची कारवाई केल्यानंतर १०५१ कोटी रुपये वसूल करण्यामध्ये विभागाला यश मिळालेले आहे.

एफआयआर दाखल झाल्यानंतर किती लोकांवर दोषारोप सिध्द करणे शक्य झाले. एफआयआर दाखल झाला म्हणजे फौजदारी गुन्हा दाखल होतो. विक्रीकर विभागाचा अपराधसिध्दीचा दर किती आहे ? हवाला व्यापा-याच्या विरुध्द एफआयआर दाखल केलेला असल्यामुळे किती लोकांना अपराध सिध्द ठरविण्यात आले ? एफआयआर दाखल केल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यासाठी वित्त विभागाकडे न्यायिक विभाग आहे काय ? जोपर्यंत फिर्यादी स्वतः पाठपुरावा करत नाही, तोपर्यंत कोणताही न्याय मिळणार नाही. कोणत्या गुन्ह्यांतर्गत एफआयआर दाखल झालेला आहे ? संबंधित व्यापा-यांवर कोणते गुन्हे दाखल झालेले आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, अशा प्रकरणे पोलिसांकडे जातात. याबाबत कोणते कलम लावले याबाबतची माहिती नंतर देण्यात येईल.

अपराध सिध्द झाले तर किती कालावधीपर्यंत शिक्षा होते ? याबाबतची माहिती विक्रीकर विभागाच्या कार्यालयात असली पाहिजे. विक्रीकर विभागाने फक्त एफआयआर दाखल करुन पुढे कोणताही फायदा होणार नाही. कर चुकविणा-या व्यापा-यांना विभागाची भिती वाटली पाहिजे यासाठी विभागाने न्यायिक विभागाबाबत प्रयत्न केले पाहिजेत असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, पोलिसांचे आर्थिक गुन्हे कक्ष तयार केलेला आहे. अशा प्रकारची कक्ष असल्यामुळे विभागामध्ये पुन्हा तशा प्रकारची स्वतंत्र कक्ष उभी करणे योग्य होणार नाही. फिर्यादीने पाठपुरावा करण्याची आहे. असे केले नाही तर प्रत्येक असेसींग ऑफिसरला ते काम करावे लागणार आहे. विभागीय स्तरावर एखादा कायदेतज्ञ असण्याची आवश्यकता आहे. त्यांनी असे प्रकार होऊ नये म्हणून योग्य ती काळजी घेण्याची आवश्यकता आहे. किती लोकांवर कोणत्या कलमान्वये हवालाच्या केसेस दाखल झाल्या आता सद्यःपरिस्थती काय आहे आणि किती लोकांवर गुन्हे सिध्द झाले आणि अपराध सिध्दीचा दर काय आहे ? अन्यथा एफआयआर दाखल केल्यानंतर सर्व मोकळे सुटून जाणार आहेत. विभागात आयपीएस अधिका-याची मुख्य दक्षता अधिकरी म्हणून नेमणुक केलेली आहे. यांच्यामार्फत संबंधित केसेसबाबत पोलिसांकडे पाठपुरावा

केला जात आहे. मुल्यवर्धित कर आल्यानंतर मुख्य दक्षता अधिका-याचे एक पद निर्माण केलेले आहे. विक्रीकर विभागामध्ये अंतर्गत दक्षता देखील बघतात आणि पोलिसांबरोबर समन्वय साधून पुढील कार्यवाही करीत असतात. त्यांच्याकडून माहिती घेऊन ती समितीला सादर करावी असे समितीने सूचित केले.

परिच्छेद क्र. २.५.२ -

१०.२१ लाख रुपयांचे सेटअप दिलेले आहे. विभागाचे असे म्हणणे आहे ??, डिक्लेरेशन दिल्यामुळे २५ टक्के मुल्यवर्धित कर घेऊन नियमित केलेले आहे. परंतु, महालेखापालांचे आक्षेपानुसार, त्यांना १०० टक्के पेनल्टी लावली पाहिजे. याबाबत स्पष्टीकरण देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, त्यांची जेवढी खरेदी होती, ती अमान्य केलेली आहे. त्यामुळे कर आणि त्यावरील व्याज आलेलेच नाही. जेव्हा व्यापारी आपली चूक मान्य करतो त्यावेळी तो सुधारित विवरणपत्र दाखल करतो आणि त्यानंतर ३०(४) अंतर्गत व्याज लागते हे त्यांनी भरलेले आहे. या विषयाबाबत समितीच्या साक्षीच्या वेळी चर्चा झाली होती. त्यांनी विलफुल कन्सीलमेंट केलेले आहे, जाणुनबूजुन कन्सीलमेंट केलेली आहे काय ? कारण ज्या व्यक्तीकडून खरेदी केलेली आहे, त्या व्यक्तीने कर भरलेला नसल्यामुळे तो हवाला निघाला.

ज्यावेळी विभागाच्या लक्षात ही बाब आली त्यावेळी त्यांनी २५ टक्के भरण्याचे मान्य केले होते. महालेखापालांचे असे म्हणणे आहे की, "In this case the penalty was leviable under Section 29(4). You have applied 29(3) of the Act as the dealer has knowingly produced false document."

एकदा त्यांनी बोगस कागदपत्रे सादर केल्यानंतर जाणूनबूजून समर्पण केले असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, कलम २९(?) मध्ये 'knowingly' या शब्दाचा उपयोग करण्यात आलेला आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, He has put false document. On his own, without you pointing it out. On his own he has withdrawn?

विभागाने लक्षात आणून दिलेले आहे. हवाला विभागाने जाहीर केलेला आहे. ही कार्यवाही विभागाने केलेली आहे. म्हणून त्यांच्यावर भूर्दंड बसलेला आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभागाने सदर व्यापा-याला शोधल्यानंतर केल्यानंतर ही बोगस कागदपत्रे सादर केलेली आहेत, हे त्यांनी मान्य केल्यानंतर त्यांनी स्वाधिकार प्रतिज्ञापत्र देऊन १०० टकके ऐवजी २५ टक्के एवढी शाश्वती घेतल्यानंतर व्याज देऊन आपली सुटका करुन घेतलेली आहे. कारण ही १० लाख रुपयांचे प्रकरण नाही. अशी अनेक प्रकरणे असणार आहेत. महालेखापालांचे असे म्हणणे आहे की, when it has been not declared before your searching हा लेखापाल यांचे म्हणणे असे आहे की, ही दहा लाखाची केस एकच आहे असे नाही कारण अशा अनेक केसेस असतील. विभागाने माहिती काढली की, हा पेपर फार्स आहे. त्यांनी एकदा चूक करुन ती सादर केलेली आहे. कलम २९ च्या मुद्दयाचा येथे उल्लेख केला गेला. त्यामध्ये लिहिलेले आहे की, विभागाचे उत्तर अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नाही. कारण या प्रकरणात अधिनियमाच्या कलम २९/३ एवजी २९/४ नुसार शास्ती आकारणीय आहे. २००९ चे व्यापारी परिपत्रक कलम २९/३ शी संबंधित आहे की, ज्याचे विवेचन अधिनियमाच्या कलम २९ खाली टिप्पणीमध्ये केलेले आहे. त्यामध्ये या संदर्भात स्पष्टपणे निर्दिष्ट केले आहे. जर एखादया व्यापा-याने बनावट देयकासारखे खोटे कागदपत्र सादर केले तर त्याला कलम २९/४ अंतर्गत शास्ती आकारणीय असते. असे असतानाही व्यापा-याने कर भरण्यास विलंब झाला असे जाहीर केले म्हणून व्यापा-यांना १०० च्या ऐवजी २५ टक्के शास्ती देऊन व व्याज घेऊन विषय संपविला. हे योग्य नाही. यावर महालेखापाल यांचा आक्षेप आहे असे मत समितीने व्यक्त केले.

याबाबत माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, या प्रकरणांचा असेसिंग ऑफिसर क्वासि-ज्युडिशियल ऑथॉरिटी म्हणून काम करीत आहे, त्याच्याकडे यादी आली. हे हवाले व्यापा-याचे होते. ज्या व्यापा-याने रिटर्न भरलेला आहे, त्याने त्याच्यामध्ये इनपूट ॲस स्टडीड असा क्लेम केलेला आहे, पण हवाला यादी आल्यामुळे विशिष्ट व्यापा-याने शासनाकडे कर भरलेला नाही, असे समजून आले. म्हणून त्यांनी जी आयटीसी क्लेम केलेली आहे, ती अमान्य होईल. ही आयटीसी अमान्य झाल्यानंतर त्याच्या वरचे जे नियमित व्याज आहे, ते ही भरले गेले पाहिजे, कलम ३०/४ ची तरतुद याकरिता आणली गेली होती. यामुळे ब-याचशा डिलर्सवर फार मोठा भुर्दंड बसत होता, कारण हवाला मोठया प्रमाणावर निघत होते. ब-याचशा डिलर्सला माहितही नव्हते. कारण तीन-चार वर्षानंतर हे शोधले जात होते. म्हणून ३०/४ च्या तरतुदीनुसार २५ टक्के दंडनीय व्याज भरण्यात यावे, असे अपेक्षित आहे. कराचा भुर्दंड भरणा-यांनी कर भरलेला आहे, परंतु ज्यांनी कर भरलेला आहे, त्यांच्याकरिता

२५ टक्के भुर्दंड भरण्याची तरतूद केली गेली होती. काही व्यापा-यांनी हवाला यादीमुळे २५ टक्के दंडनीय व्याज व व्याज भरलेले आहे, या प्रकरणामध्ये जर अधिका-याला वाटत असेल की, हे जाणूनबूजून केले नाही, तरीपण त्याला तसे गृहित धरुन परत त्याला १०० टक्के शास्ती करण्यात यावी ? असे जर धोरण असेल तर हे महाराष्ट्रामध्ये व्यापा-याकरिता अडचणीचे होणार आहे, जर अशा प्रकारे घडले तर टॅक्स टेरिरोटिझम होऊ शकेल. यामध्ये कृती करुन पण हे गंभीर होऊन जाईल, कारण हा जर एकदा परिपत्रक काढले तर हे राज्यभरामध्ये पसरणार आहे.

यामुळे व्यापा-यांच्या या कृतीला समर्थन केल्यासारखे होईल. असे केले नाही तर त्याचा अर्थ तसाच होईल. विलफुली किंवा अननोईंगली म्हणा व्यापारी जे करीत आहेत, त्याला समर्थन द्यावयाचे का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, समजा एक व्यापारी आहे, त्याने रिटर्न भरलेले आहे. त्याने संबंधित माणसाकडून माल घेतलेला आहे, त्याची केस ज्यावेळी निर्धारणामध्ये आली त्यावेळी त्याच्या असेसिंग ऑफिसरने सांगितले की, हा हवाला आहे, तुम्हाला कर भरावा लागेल, तो मान्य करतो की, असेसिंग ऑफिसर म्हणतो त्याप्रमाणे हवाला आहे , तो मान्य करतो की, हवाला आहे, तो टॅक्स भरतो, त्याच्यावर तो व्याजही भरतो. आता असेसिंग ऑफिसरने जर त्याच्यावर पेनल्टीदेखील बसविली तर ते योग्य होणार नाही. कारण त्याला कुठे माहिती आहे की, या मालावर हवाला आहे, ही तशी केस आहे. हवालावाल्यावर विभागाकडून वेगळी कारवाई करण्यात येते.

विलफुल आणि इंटेन्शनली याबद्दल शासन काही समर्थन करु शकणार आहेत का? विलफुल नाही हे मान्य आहे. विलफुल असेल आणि त्या व्यापा-याला माहिती नाही की, हा हवाला आहे की, नॉन-हवाला आहे, केवळ विलफुल आणि इंटेन्शनली यामध्ये जो फरक आहे, तो समजावून सांगण्यात यावा. विलफुलला समिती मान्यता देते की, हे विलफुली नव्हते. ज्याने इंटेन्शनली असे केलेले आहे, आणि त्याबाबत विभागाला वाटले की कलम २९/३ वापरावे तर ते वापरण्यात येते का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, हवाला व्यापा-यांवर कारवाई सुरु केलेली आहे. त्याच्यामध्ये विभागाच्या लक्षात आले की, काही प्रकरणांमध्ये संगनमत होते. ३७ लाभार्थी व्यापारी ज्यांनी हवाला कडून खरेदी केली होती, त्यांवच्यावरही पोलीस कारवाई करण्यात आली होती.हवालाकडून खरेदी करणारे ३७ लाभार्थी व्यापारी होते. त्यांचे संगनमत होते. हा हंटर फार्स आहे. कलम २९/३ आणि २९/४ मध्ये फरक आहे. २९/३ त्यांना लागू होतो की, ज्याच्या केसमध्ये ऑर्डर पारित केली जाते. २९/४ कलम अशा केसमध्ये लागू होतो की, ज्याच्यामध्ये ऑर्डर पारित करीत नाही, व्यापारी सुधारित विवरणपत्र भरतो. आदेश पारित न करता प्रकरण निकाली निघते त्याला बिझनेस ऑर्डर म्हणतात. निर्धारणा आदेशामध्ये व्यापा-याला २९/३ लागू होतो. दोन्ही केसमध्ये कन्सीलमेंट आहे.

जेथे खरेदी करणा-या व्यापा-याविरुध्द एफआयआर दाखल केली तेथे कलम २९/४ लावण्यात यावा. जेथे व्यापा-याला माहिती नाही, अशा केसमध्ये देखील २९/३ कलम लावण्यात यावा. कलम २९/३ अंतर्गत व्यापा-याला २५ टक्के व्याज भरावे लागते. कलम २९/३ प्रमाणे व्याजाची वसूली करणे आवश्यक आहे असे मत समितीने व्यक्त केले.

यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, दंडनीय व्याजाचे कलम आहे, ते ३०/४ आहे. त्यामध्ये २५ टक्के दंडनीय व्याज लागू होतो. जेवढी रक्कम अतिरिक्त आहे, त्या रक्कमेवरील दंडनीय व्याज संबंधित व्यापा-याला लागू होतो. त्याच्याशिवाय हे दंडनीय व्याज अतिरिक्त आहे. नियमित व्याज आणि दंडनीय शास्ती लावणे योग्य नाही.

राज्यामध्ये हवालाचा उद्योग अजूनही मोठ्या प्रमाणात चालू आहे. विक्रीकर विभागाचे निवृत्त अधिकारी यामध्ये सहभागी आहेत. ही मोडस ऑपरेंडी दाखविणारे लोकच तेथे बसलेले आहेत. केवळ एफआयआर दाखल केल्याने की हा संपूर्ण विषय संपला असे नाही. पोलिसांना याची गंभीरता बाकीच्या पध्दतीने कळत नाही. पोलिसांची काम करण्याची वेगळी पध्दत असते. हा गुन्हा नाही. कोणाला चाकू मारला, मर्डर झाला तर त्याचा अहवाल द्यावा लागतो. पाच कोटीपेक्षा मोठी रक्कम असेल किंवा तरच आर्थिक गुन्हे विभागाकडे बाब जाते. सर्वांनी मिळून केलेल्या मोठ्या आर्थिक गुन्ह्यामधील गंभीरता जाते. हे जे एक-एक कंपनीमध्ये दहा-पन्नास कोटी रुपये बिल करुन जातात, त्याच्या संदर्भामध्ये वेगळी यंत्रणा बसवून विचार करण्याची आवश्यकता आहे. या संदर्भात काही विशेष योजना आखण्याची आवश्यकता आहे, आणि यासंदर्भात इमानदारीने टॅक्स भरला, त्याच्याकडून टॅक्स आणि पेनाल्टी मागितल्यावर तो बिचारा इमानदारीने भरणार हे जे ३७ व्यापारी पकडलेले आहेत. त्यांना साक्षीदार करण्यात यावे जेणेकरुन विभागाला आणखी कर न भरणारे सापडतील असे मत व्यक्त करुन समितीने याबाबत शासनाची भूमिका काय आहे ? अशी विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, हवालाच्या गैरफायदा कमीत कमी घेतलेला आहे. हवाला एक मार्केटचा वेगळा विषय आहे, कारण काही ठराविक सेक्टर्समध्ये आयर्न आणि स्टीलमध्ये हे हवाला

जास्त होतो. नवीन ऑटोमेशन सिस्टममध्ये ज्यावेळी अमान्य करण्यात येणार आहे, खरेदीदाराने सेलरकडून खरेदी केल्यावर टॅक्स भरला. विक्रेत्याने शासनाकडे कर भरला नाही तर ज्याने खोटे बिल ग्राहकाला दिले पण दुस-या महिन्यामध्ये जेव्हा खरेदीदाराकडून विभागाकडे कर येणार नाही, तेव्हा ही आयटी सिस्टम माहिती देणार आहे. मग ज्यांनी जो कराचा फायदा घेतलेला आहे, त्याला रिव्हर्स केले जाणार आहे. सिस्टममध्ये आपोआप दुरूस्ती होणार आहे. पुढील कालावधीमध्ये नवीन विवरणपत्र चालू होणार आहेत, त्यामुळे या प्रकाराचा गैरफायदा घेणे आपोआप बंद होईल. त्याच्याशिवाय आता कोणाला बिलाशिवाय खरेदी विक्री करावयाची असेल तर तो विषय वेगळा आहे. बिल देऊन आणि कराची चोरी करणे हे आपोआप नवीन सिस्टममध्ये बंद होणार आहे.

परिच्छेद क्रमांक २.५.३./२.५.४ बाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, २.५.३.मध्ये सेवा कराचा जो घटक आहे, तो ग्रॉस टर्नओव्हरमध्ये घ्यावयाचे की नाही, हा यामध्ये मुद्दा आहे. यामध्ये एक ॲपेक्स इंजिनियरिंग सर्व्हिस म्हणून प्रकरण होते त्या प्रकरणामध्ये निर्धारणा अधिका-यांनी निर्धारणा आदेश पारित केले होते. त्यांचेवर कर आकारला होता. पण शेवटी जे अंतिम आदेश होते, त्याच्यामध्ये परतावा होता. ॲपेक्स इंजिनियरिंगमध्ये व तत्सम केसेसमध्ये ज्याच्यामध्ये परतावा असतो, त्यामध्ये शास्ती लावता येत नाही, म्हणून त्यामध्ये शास्ती लावली नव्हती. मूळ रकमेबाबत सेवा कर गृहित धरुन त्यावर अतिरिक्त कर बसवून तो वसूल केलेला आहे. एलुप्रो बिल्डींगच्या केसमध्ये पारित केलेला आदेश आणि विक्रीकर न्यायाधिकरणापुढे २१.१२.२०१५ रोजी सुनावणी झाली आणि त्यांनी यामध्ये अंतिम स्थगिती दिलेली आहे. निखील कंफर्टमध्ये न्यायाधिकरणाचे आदेश होते, सेवा कर चा समावेश करून कर घेता येतो. नोव्हेंबर, २०१५ मध्ये एका टेक्नो-क्राफट इंडस्ट्रीजमध्ये एक दुसरा आदेश पारित केलेला आहे. निखिल कंफर्ट कंपनीचे प्रतिनिधी याकरिता उच्च न्यायालयामध्ये गेलेले आहेत. टेक्नो-क्राफटमध्ये शासन हायकोर्टात गेलेले आहे. उच्च न्यायालयात याचा निर्णय अंतिमतः एकत्र देईल, त्यावेळी अंतिम निर्णय होईल की, सेवा करावर मुल्यवर्धित कर घेता येणार नाही. असे याचे लिगल कॉम्प्लिकेशन्स चालू राहणार आहेत. एलुप्रो बिल्डींग बाबत हीच सिस्टिम लागू होईल. शासनाचा स्टॅण्ड निखिल कंफर्ट कंपनीमध्ये विभागाच्या बाजूने केसचा निकाल लागलेला आहे. सेवा करावर टॅक्स लावलेला आहे. विभागामध्ये या संदर्भातील कर लावणे बाकी आहे.

२.५.४

२.५.४.मध्ये २.५.४.१ व २.५.४.२. हे दोन्ही मुद्दे व्यापारी सन सिस्टमबाबत आहे. जो व्यापारी पॉवर इन्व्हर्टर विकतो. पॉवर इन्व्हर्टर यु.पी.एस.म्हणून आय.टी.प्रॉडक्ट आहे की नाही, तो आय.टी.प्रॉडक्ट असला असता तर त्या काळामध्ये त्याच्यावर चार टक्के टॅक्स होता आणि जर आयटी प्रॉडक्ट नसेल तर हेझिटयूअल एन्ट्री-ई मध्ये त्याला साडे बारा टक्के टॅक्स लागेल. याबाबत जर आयुक्तांनी एक डीडीक्यू पूर्वी दिला होता, त्या डीडीक्यूमध्ये दिले होते की, हे साडे-बारा टक्के कर लागेल, या सन सिस्टमने डीडीक्यू मागितला होता, त्याच्या विरूध्द डीडीक्यू केला होता. न्यायाधिकरणाने २६.२.२०१५ रोजी आदेश पारित केला की, याला चार टक्के कर लागणार आहे. हा आयटी प्रॉडक्ट म्हणून आहे की युपीएस आहे. विभाग या संदर्भात उच्च न्यायालयामध्ये न्यायाधिकरणाच्या आदेशा विरूध्द ऑर्डरच्या अगेन्स्ट गेले होते. नोव्हेंबर, २०१५ मध्ये मा. उच्च न्यायालयाने आदेश दिले की, हा जो प्रॉडक्ट आहे, तो आयटी प्रॉडक्ट आहे, यामुळे यामध्ये चार टक्के टॅक्स अधिक लागणार आहे. विभागाने तो आदेश स्वीकारलेला आहे. या जुन्या केसेसमध्ये याकरिता आणखी पुढे किती भांडणार ? आता असा निर्णय शासनाला घ्यावा लागेल, पॉवर इन्व्हर्टरला कसे ट्रीट करावे ? सध्या तो चार टक्क्यातच आहे.

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पॉवर इन्व्हर्टर हे आय.टी.सपोर्ट इन्स्ट्रुमेंट आहे. आयटी इन्स्ट्रुमेंटचा वापर केला जातो, त्याकरिता हा सपोर्टिंग पार्ट म्हणून वापरला जातो. इन्व्हर्टरचा बिझनेस खूप मोठा आहे. राज्याने विचार केला तर या बिझनेसने वर्षाला कमीत कमी चारशे पाचशे कोटी रुपयांचा टर्न ओव्हर दिलेला आहे.

आम्ही त्यातील हा विषय शासनासमोर मांडणार आहोत की, पॉवर इन्व्हर्टर या प्रॉडक्टची वेगळ्या प्रकारे एन्ट्री करुन त्याला आयटीमधून बाहेर काढून त्यावर जास्तीचे टॅक्स लावायचे की नाही तो विषय आहे. शासनाचा विषय आहे. हा फार मोठा निर्णय आहे. पण याला कसे हॅण्डल करावयाचे ?

परिच्छेद क्रमांक २.४.६ याबाबत अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक ११ जुलै, २०१६ रोजीच्या बैठकीत सदर मुद्दा उपस्थित केला. सेल्स टॅक्सच्या माध्यमातून २.१२ कोटी मिळणार होते. उद्योग विभागाने पूर्वलक्षी प्रभावाने आदेश दिल्यामुळे दिनांक २३-०९-२०१५ रोजी संबंधितांनी पैसे मिळणार नाहीत, असे सांगितले. एवढ्या वर्षाने पूर्वलक्षी प्रभावाने कशी अंमलबजावणी केली आणि त्यासंदर्भातील निर्णय कसा घेतला ? सन २०१५ मध्ये पूर्वलक्षी प्रभावाने अंमलबजावणी करण्याची कारणे काय आहेत, कोणत्या आधारे दिला आणि असे करता येते किंवा कसे ? अशी विचारणा समितीने केली.

यासंदर्भात उद्योग विभागाच्या सचिवांनी माहिती दिली की, मूळ मुद्दा सागर उद्योग डिस्टलेरीच्या संदर्भातील आहे. नाशिकमध्ये युनिट होते. १९९३ मध्ये ईएसआय इन्सेन्टीव्ह देण्यात आले होते. दिनांक १०-१२-२००१ रोजी सदरहू युनिट प्रोडक्शनमध्ये अंतर्भूत झाले होते. गुंतवणूकीचा कालावधी हा १०-१२-२००४ असा होता. म्हणजे प्रोडक्शनपासून ३ वर्षापर्यंत असा कालावधी होता. दिनांक ११-०१-२००२ पासून ते दिनांक १०-०१-२०१७ पर्यंत इन्सेन्टीव्ह कालावधी होता. त्यावेळी केंद्र शासनाकडून आयएएम मिळत होता. आयआयएम म्हणजे इंडस्ट्रिअल इंटरप्रिटर ऑफ मेमोरंडम, यामध्ये उद्योगाची आणि कॅपेसिटीची नोंदणी होत असते. त्यावेळी म्हणजे दिनांक १९-१०-१९९७ रोजी १५० लाख लिटर क्षमता घेतले होते. त्यानंतर दिनांक १५-०८-२००२ रोजी केंद्र शासनाने ३०० लाख लिटरपर्यंत क्षमता वाढवून दिली. यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाची परवानगी हवी असते. दिनांक ११ नोव्हेंबर, २००३ रोजी राज्य उत्पादन शुल्क विभागाने कॅपेसिटी ३०० लाख लिटरपर्यंत क्षमता वाढवून देण्यास परवानगी दिली होती. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने १५० लाख लिटरची परवानगी घेतली होती. तसेच दिनांक ०६-०७-२०१२ रोजी नूतनीकरणासाठी ३०० लाख लिटरची परवानगी घेतलेली आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने कोणत्या तारखेला ३०० लाख लिटरची परवानगी दिलेली आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, दिनांक ०६-०७-२०१२ रोजी नूतनीकरणासाठी ३०० लाख लिटरची परवानगी घेतलेली आहे. तसेच यापूर्वी त्यांनी केव्हा परवानगी घेतली त्याची माहिती घेऊन ती समितीला अवगत करण्यात येईल. दिनांक ११ नोव्हेंबर, २००३ रोजी राज्य उत्पादन शुल्क विभागाने ३०० लाख लिटरपर्यंत क्षमता वाढवून देण्यास परवानगी दिली होती.

याबाबत ज्या दिवशी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ ३०० लाख लिटरचा दाखला देणार आहे, त्यादिवसानंतर उद्योजकाला काम करता येणार आहे. यापूर्वी त्याला काम करता येणार नाही. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने कोणत्या तारखेला ३०० लाख लिटरची परवानगी दिलेली असून ती महत्वाची आहे असे मत समितीने व्यक्त केले.

साखर कारखान्यांना केंद्र शासनाकडून जसे लायसन्स दिले जाते, त्याच धर्तीवर या प्रोजेक्टसाठी देखील लायसन्स दिले जाते काय ? साखर कारखान्यांसाठी सेम प्रोसिजर आहे. केंद्र शासनाने परवानगी दिल्यानंतर किती दिवसानंतर प्रोडक्शन सुरु झाले ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, केंद्रामध्ये आयएएम असतो. प्रोडक्शनची तारीख १०-१२-२००१ अशी आहे. आयएएम हा १९-१०-१९९९ चा आहे. त्यांना १० वर्षापेक्षा अधिक उत्पादन करण्याचा अधिकार नाही. ५ वर्षापर्यंत नूतनीकरण करावे लागते आणि त्यानंतर जास्तीत जास्त १० वर्षे अशी मर्यादा असते. १० वर्षानंतर लॅप्स होते. यासाठी त्यांनी केंद्र शासनाकडून आयएएमसाठी आवश्यक ती परवानगी घेतली होती काय ? आयएएम म्हणजे काय ? याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, केंद्र शासनाच्या एक्साईज विभागाची सदरहू प्रोजेक्टसाठी परवानगी लागत असून केंद्रामध्ये फक्त नोंदणी केली जाते. आयएएम म्हणजे ॲप्लिकेशन केल्यानंतर, उद्योग सुरु करण्यात येतो.

आयएएममध्ये साखर कारखान्यासाठी २५ किलो लिटरसाठी मर्यादा आहे. ती १५ किलो लिटरपर्यंत आणण्यासाठी प्रयत्न केला जात आहे. आयएएमची परवानगी अशा त-हे ने देता येत नाही. ५ वर्षापर्यंत नूतनीकरण करावे लागते आणि त्यानंतर जास्तीत जास्त १० वर्षे अशी मर्यादा असते. १० वर्षानंतर ती व्यपगत होते. यासाठी वेगळे निकष होते, म्हणजे साखर कारखान्यासाठी वेगळे निकष आणि प्रोजेक्टसाठी वेगळे निकष होते. सुरुवातीला दीड लाख कसे दिले ? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, यामध्ये एक ॲक्ट असून तो १९५७चा आहे. यासाठी उद्योगांना लायसन्सची आवश्यकता लागते. साखर कारखान्यांसाठी वेगळे परवाना आहे. यासाठी साखर आयुक्तांकडून लायसन्स दिले जाते. केंद्र शासनाकडून डिफेन्स आणि न्युक्लिअरच्या उद्योगासाठी परवाना दिला जातो आणि इतर उद्योगासाठी परवाना दिले जात नाही. फक्त आयएएम लागतो. सन २००२ मध्ये उद्योगासाठी परवाना नव्हता.

पूर्वी दीड लाख लिटरपर्यंत रजिस्ट्रेशन झाले होते. त्यानंतर ३ लाख लिटरपर्यंत परवानगी घेण्यासाठी त्यांना केंद्र शासनाकडे जाण्याची कोणतीही आवश्यकता नव्हती. याचा अर्थ त्यांना दीड लाख लिटरपर्यंत प्रोडक्शन करण्यासाठी परवानगी होती. अशी परवानगी केंद्र शासनाने दिली होती काय ? याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, त्यांनी सन २००२ मध्ये ३०० लाख लिटरची परवानगी घेतली होती.

त्यांना १५० लाख लिटरची परवानगी असताना ३०० लाख लिटरची परवानगी कशी मिळाली ? सन २०१५ मध्ये पूर्वलक्षी प्रभावाने उद्योग विभागाने दीड लाख लिटरपासून ३०० लक्ष लिटरपर्यंत परवानगी दिली होती. त्यामुळे सेल्स टॅक्स विभागाला २ कोटी रुपयांचे नुकसान सोसावे लागले. त्यांनी सन २००३ मध्ये परवानगी मिळविली होती. सन २००३ ते सन २०१५ पर्यंत

शासनाचे पैसे त्यांनी रोखून ठेवलेले आहेत. उद्योग विभागाने पत्रात भूतलक्षी प्रभावाची अंमलबजावणी केल्यामुळे शासनाचे खूप मोठे नुकसान झालेले आहे. महालेखाकारांनी त्यांच्या अहवालात २ कोटी १२ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा उल्लेख केलेला आहे. त्यांचा आयएएम ३०० लाख लिटर एवढा होता. असे मत समितीने व्यक्त केले .

यासंदर्भात विभागीय सचिवांनी खुलासा केला की, आयएएम ३०० लाख लिटर होता. त्या आधारे पुढील कार्यवाही केलेली आहे. आयएएम सन २०१५ मध्ये दिला होता. सन २००३ मध्ये त्यांच्याकडे तो परवाना होताच.

भांडवली गुंतवणुकीवर टॅक्स बेनिफिट होते काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाची गुंतवणुक कॅपिटल इन्व्हेस्टमेंटवर असते. त्यांचा गुंतवणूक कालावधी सन २००१ पासून सन २००४ पर्यंत होता. म्हणजे त्या काळात १५० लाख लिटरचे ३०० लाख लिटर केले तरी ते ग्राह्य धरले जाते. मेगा प्रोजेक्टसाठी ५ वर्षाची मुदत देण्यात येते. सुरुवातील १५० लाख लिटरची गुंतवणूक करणार म्हणून उत्पादकाने २०० लाख लिटरपर्यंत केले तर अशा वेळी विभागाकडून त्यांना १५० लाख लिटर गुंतवणूक करा असे म्हणता येऊ शकत नाही. विभाग महाराष्ट्रात अधिकाअधिक गुंतवणुक व्हावी यासाठी प्रयत्नशील आहे.

एक कारखाना १०० कोटी रुपयांचा आहे असूनही जर उत्पादकाने ५०० कोटी रुपयांची गुंतवणुक दाखविली व त्याआधारे कर प्रदानामध्ये सुट घेतली हे योग्य नाही. एखाद्या कारखान्याचे मूल्यांकन किती आहे, याबाबतची माहिती उद्योग विभागाकडे उपलब्ध आहे. टॅक्स बेनिफिट घेऊन परतावा घ्यावयाचा, हेच यामध्ये आहे. कारखान्याचे सन २००१ मध्ये मूळ अंदाजपत्रक किती होते ? सन २००१ मध्ये किती गुंतवणुक होती आणि त्यानंतर ती किती वाढविली ? कारखान्याच्या उत्पादन क्षमतेबाबत समितीला काही म्हणावयाचे नाही. परंतु करप्रदानामध्ये चोरी झालेली आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, दिनांक ३०-११-२०११ उत्पादकाची २२ कोटी ५६ लाख अशी गुंतवणुक होती. त्यानंतर दिनांक २०-११-२००२ त्यांची २८ कोटी ४७ लाख अशी गुंतवणुक झाली. त्यानंतर सन २००३ मध्ये ३५ कोटी ५९ लाख रुपयांची गुंतवणुक ग्राह्य धरण्यात आली. सेल्स टॅक्स इन्टेन्सीव्ह २९ कोटी ३३ लाख, ३७ कोटी आणि ४७ कोटी ही सन २००३ मधील होती. यामध्ये कोणताही बदल करीत नाही. भांडवलदारी प्रॉपर्टीमधील वाढवलेली नसून प्लान्ट मशिनरीमध्ये त्याची गुंतवणुक आहे. त्यांनी गुंतवणुक वाढविली. त्यामुळे प्रोडक्शन कॅपेसिटी वाढली की फक्त गोडाऊन बांधले ? गुंतवणुक ३५ कोटी रुपयांपर्यंत गेलेली आहे. त्याबाबत शंका आहे. ती २२ ते ३५ कोटी रुपयांपर्यंत गेली. प्रोजेक्ट कार्यान्वित केला गेला. १५० लाख लिटरची कॅपेसिटी होती ती त्यांनी ३०० लाख लिटरपर्यंत केली. समितीला त्यांचे विद्युत देयकाची प्रत देण्यात यावी. त्यामध्ये सन २००१ मध्ये आणि सन २००३ मध्ये विजेचा वापर किती होतो, क्षमतेने वाढविले की, व्हॉवचर सादर केले वगैरे माहिती दिल्यानंतर समितीला पुढील कार्यवाही करणे शक्य होणार आहे असे मत समितीने व्यक्त केले यास विभागीय सचिवांनी मान्यता दर्शविली.

या कंपनीचे डायरेक्टर कोण आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाने किती रुपयांची ईसी दिलेली आहे ? यासंदर्भात डायरेक्टर कोण होते याची माहिती देण्यात येईल तसेच विभागाने ३५ कोटी ५९ लाख सन २००३ मध्ये दिलेले आहेत. दिनांक १०-०५-२००७ रोजी ३५ कोटी ५९ लाख रुपये धरुन ईसी दिलेली आहे असे विभागीय सचिवांनी विदित केले.

ही अतिशय गंभीर बाब आहे. समितीकडे सन २०१३-२०१४ मधील अहवाल आहे. सन २०१५ मध्ये भूतलक्षी प्रभाव दिल्यामुळे २ कोटी १२ लाख रुपयांचे विभागाला नुकसान झालेले आहे. सन २०१७ पर्यंत त्यांना ३०० लाख लिटरपर्यंत सुट दिली जाणार आहे, याबाबत सचिवांचे काय म्हणणे आहे ? अशी विचारणा समितीने केली. असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, इन्सेंटिव्ह पिरियड हा दिनांक १०-१२-२००४ असा होता. ईसी त्याच वेळी दिलेली असून, त्यामध्ये बदल होत नाही. त्यावेळी जी गुंतवणुक केली त्यामध्ये आज ती वाढविणे शक्य नाही. दिनांक १०-०५-२००७ रोजी ३५ कोटी ५९ लाख रुपये धरुन ईसी दिलेली आहे. आयएएम हा सन २००२ मधीलच आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाची सन २००३ मधील परवानगी ३ लाख लिटरसाठी आहे.

उत्पादन क्षमता दीड लाख लिटर होती ती आता आयएएमच्या आधारे ३ लाख लिटर केलेली आहे. उत्पादकाला ती सन २००२ पासून भूतलक्षी प्रभावाने दिलेली आहे. एवढी वर्षे विभागाने काय केले? सन २००२ ते सन २०१५ पर्यंत उद्योग विभागाला पूर्वलक्षी कर देण्याबाबतची परवानगी विक्रीकर विभागाने देण्याची आवश्यकता १३ वर्षानंतर का पडली. याचा अर्थ विक्रीकराच्या परताव्याची मागणी कंपनीने केली होती. उद्योग विभागाने ती मागणी थांबवून ठेवली होती. त्यांना उद्योग विभागाचे भूतलक्षी प्रभावाने परवानगी देण्याबाबतचे पत्र हवे होते. असे पत्र विक्रीकर विभागाने १३ वर्षानंतर दिलेले आहे.

ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता उद्योग विभागाच्या सचिवांनी सांगितले की, सेल्स टॅक्स विभागाचा रुल ८८(२) आहे. त्यामध्ये ९३ ची स्कीम आहे. इंग्रजी .....२०.५४ रुलमध्ये कोणतीही सिलींग नाही. सदरहू मुद्दा सेल्स टॅक्सने किंवा सीएजीने काढण्याची काहीच आवश्यकता नव्हती. कारण त्यांचे उत्पादन क्षमतेशी हा मुद्दा जोडलेला नाही.

उत्पादकाला २००२ मध्ये परवानगी मिळाल्यामुळे त्यांनी उत्पादन सुरु केले होते. कंपनीने उद्योग विभागाला भूतलक्षी प्रभावाने परवानगी देण्याबाबतचा आदेश काढण्यासाठी सांगितले होते काय ? याबाबत विक्रीय आयुक्तांना त्यांची क्षमता २००२-२००३ मध्ये कॅपेसिटी वाढवून घेतल्याचे माहित होते काय ? अशी विचारणा समितीने केली असता वित्त विभागाच्या प्रतिनिधींनी सांगितले की, उद्योग सचिवांनी सांगितले की, ती १९९३ ची स्कीम आहे. त्या स्कीममध्ये उत्पादन क्षमतेचे बंधन नाही. १९७९, १९८३ आणि १९८८ ची स्कीम होती. त्यामध्ये विक्रीकरामध्ये उत्पादन क्षमता किती आहे हा विषयच नव्हता. त्यांना सूट देण्यासाठी काहीच अर्थ नव्हता. महालेखापालांनी मुद्दा काढल्यानंतर उद्योग विभागाला आवश्यक ती माहिती दिली होती. उद्योग विभागाला सांगण्यात आले की, उत्पादन क्षमतेचा मुद्दा निघालेला आहे. त्यावेळी त्यांनी सुधारित एलिजिबिलीटी सर्टिफिकेट पुर्वलक्षीप्रभावाने दुरुस्त करुन पाठविले. यापूर्वी साक्षीमध्ये हाच प्रश्न विचारण्यात आला होता की, उद्योग विभागाला एलिजिबिलीटी सर्टिफिकेट पुर्वलक्षी प्रभावाने (मागील तारखेचे) देण्याचा अधिकार आहे काय ? यासंदर्भात केंद्र शासन आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाने त्या तारखेपासून परवानगी दिलेली असल्यामुळे ती उद्योग विभागाने सुधारित करुन दिलेला आहे. यामध्ये विक्रीकर विभागाचे नुकसान झाल्याबाबतचा मुद्दा आहे. १९९३ च्या स्कीममध्ये उत्पादन क्षमतेला मर्यादा नाही.

सदर मुद्दयाबाबत समितीने शंका उपस्थित केली की, कंपनीने जी सूट घेतली आहे त्या तुलनेत त्यांनी उत्पादन केलेले नाही. त्या कंपनीने १५० लाख लिटरची उत्पादन क्षमता ३०० लाख लिटर केली आहे. ही क्षमता वाढविल्यानंतर कंपनीला तेवढ्या क्षमतेचे ट्रान्सफॉर्मर बसवावे लागतात. ही क्षमता वाढविण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (MSEB) कडे आवश्यक ती कागदपत्रे सादर करावी लागतात तसेच आवश्यक ती रक्कम भरावी लागते. त्यामुळे सदरहू कंपनीने उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (MSEB) कडे सादर केलेली कागदपत्रे व विहित रक्कम जमा केल्यासंदर्भातील पुरावे समितीकडे सादर करावीत. जेणेकरुन समितीला वस्तुस्थिती लक्षात येईल. त्यांनी खरोखरच ही क्षमता वाढविली की केवळ कागदोपत्री क्षमता वाढविल्याचे दाखविले, हे समितीला समजले पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले.

यासंदर्भात विभागाला संबंधितांकडे जो पाठपुरावा करावा लागेल तो विभागाकडून करण्यात येईल. तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (MSEB) कडे सादर केलेले पुरावे सुध्दा समितीला देण्यात येतील. या बरोबरच राज्य उत्पादन शुल्क विभागाची एक्झिट पास, परमीट सुध्दा महत्त्वाचे आहे असे उद्योग विभागाच्या सचिवांनी सांगितले.

राज्य उत्पादन शुल्क विभाग त्या कंपनीने खरोखरच उत्पादन क्षमता वाढविली आहे किंवा नाही, हे न तपासता सुध्दा परवाना देऊ शकते. ज्यावेळी कंपनीची उत्पादन क्षमता १५० लाख लिटर होती त्यावेळी त्यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (MSEB) किती युनिट वीज मंजूर करुन घेतली होती आणि दुप्पट क्षमता केल्यानंतर त्यांना महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (MSEB) किती युनिट वीज पुरवित आहे, हे समजले पाहिजे. त्यामुळे युनिट कन्झम्पशन आणि उत्पादन क्षमता या संदर्भातील सर्व डेटा समितीकडे सादर करावा असे समितीने सूचविले असता सदरहू माहिती समितीकडे सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी आश्वासित केले.

सदरहू कंपनीने पूर्वलक्षीप्रभावाने फायदा मिळण्यासाठी मागणी केली होती काय, असल्यास, त्यांनी कोणत्या आधारावर मागणी केली होती, उद्योग विभागाने स्वतःहून कंपनीला फायदा दिला का ? अशी विचारणा समितीने केली असता उद्योग विभागाच्या विभागीय सचिवांनी सांगितले की, विक्रीकर विभागाकडून वसूली होते, असा मुद्दा उपस्थित झाला होता. राज्य उत्पादन शुल्क विभागाने १५० लाख लिटर उत्पादन क्षमतेची मान्यता दिल्याचे नमूद केलेले होते. परंतु पूर्वी त्यांचा आयईएफ ३०० लाख लिटरचा झालेला आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागानेसुध्दा ३०० लाख लिटर क्षमतेचा परवाना वितरीत केला आणि ते सुध्दा तारखेला केले होते. कंपनीने तशा प्रकारचे पत्र दिनांक १६ सप्टेंबर २०१५ रोजी दिले होते. त्या पत्रामध्ये नमूद केले होते की, This increase in our installed manufacturing capacities of Alcohol from Molasses is properly informed to Secretariat of Industrial Approvals (SIA) of Department of Industries New Delhi and acknowledgement of Industrial Entrepreneurs Memorandum (IEM) form them bearing Serial No.1845/SIA/IMO/2002 dated 05.08.2002 is received by us (copy enclosed).

However, we forgot to inform you about this increase in our installed manufacturing capacities, inadvertently for which, we tender our unconditional apologies.

Now when, our case has come up for assessment before the Sales Tax Officer, he instructed us to get our EC modified by you and as such, we pray for the said Amendment.

कंपनीने दिनांक १६ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या पत्रान्वये मागणी केल्यानंतर उद्योग विभागाने त्यांना ७-८ दिवसांच्या आत तातडीने आदेश दिल्याचे समितीने नमूद केले व यासंदर्भात कंपनीने उद्योग विभागास दिलेल्या पत्राची आणि त्या पत्राच्या अनुषंगाने उद्योग विभागाने काढलेल्या ऑर्डरची प्रत उपलब्ध करुन देण्यास सांगितले. तसेच उत्पादन समतेत वाढ झाल्यानंतरची विज वापराबाबतची माहिती व सदरहू कंपनीचे संचालक यांची सुद्धा नावे समितीला देण्याबाबत आणि सदर माहिती केवळ उद्योग विभागाकडून न घेता महाराष्ट्र राज्य मंडळाकडूनही घेण्याबाबत विभागाच्या सचिवांनी त्यास मान्यता दर्शविली (तथापि अद्याप माहिती अप्राप्त आहे)

अभिप्राय व शिफारशी

लेखापरिक्षेची व्याप्ती व कार्यपध्दती

१.२ महालेखापालांनी विक्रीकर विभागाच्या १३ विभागांमध्ये परतावा व परतावा लेखा परिक्षेच्या ४८ शाखांमधील विभागाने सादर केलेल्या माहितीनुसार सन २०१२-१३ दरम्यान १५५८८ प्रकरणांमध्ये रु. ३७७७ कोटी परतावा देण्यात आला होता व दि.३१/३/२०१३ रोजी राज्यात ५७२०७ प्रकरणे प्रलंबित होती. माहे जुलै, २०१३ व माहे मार्च, २०१४ मध्ये ५ विभागांमधील १९ शाखांमध्ये पूर्ण करण्यात आलेल्या सर्व परतावा प्रकरणांचे लेखा परिक्षण करण्यात आले. या शाखांमध्ये सन २०१२-१३ दरम्यान ९०४८ प्रकरणांमध्ये रु. २९४६.४० कोटी परतावा मंजूर केला होता. महालेखापालांनी नोंदविलेल्या सदर आक्षेपाबाबत समितीसमोर विभागीय सचिवांना सद्यःस्थितीबाबत विचारणा केली असता त्यांनी स्पष्ट केले की, माहे जून,२०१६ मध्ये आढावा घेतला असता सन २०१२-१३ मधील ५४८७ प्रकरणांमध्ये ८१९ प्रकरणे समाविष्ट होती. सन २०१३-१४ मध्ये ९९८७ प्रकरणे, सन २०१४-१५ मध्ये ६९२२ प्रकरणे, सन २०१५-१६ मध्ये ९२२ प्रकरणे अशी एकूण २३३१८ प्रकरणे परतावा देण्यासाठी शिल्लक आहेत. दि.३१/३/२०१३ अखेर ३०७८६ प्रकरणांचा परतावा शिल्लक होता. त्यानंतर मागील ३ वर्षाच्या कालखंडामध्ये शेवटच्या ३०००० प्रकरणांमध्ये ही २३००० प्रकरणे समाविष्ट आहेत. प्रलंबित प्रकरणांबाबत समितीने नाराजी व्यक्त करीत असे नमूद केले की, वसुली करताना १ महिना उशिर झाला तर विभाग दंड लावतो आणि व्याजही लावण्यात येते. परतावा हा अधिकचा केलेला भरणा म्हणून ती रक्कम तातडीने परत करणे आवश्यक असताना ४००० ते ५००० कोटी रक्कम थकीत राहिल्यामुळे सदर निधी चलनामध्ये येवू शकला नाही. राज्याच्या अंदाजपत्रकामध्ये या रकमेचा समावेश होत असल्यामुळे ती रक्कम देखील मोठी दिसते. तीन वित्तीय वर्षे पूर्ण झाली आहेत तरीही अशी प्रकरणे प्रलंबित असणे ही बाब योग्य नाही. प्रलंबित प्रकरणांतील अपिलामध्ये असलेली प्रकरणे वगळता अन्य प्रकरणातील तातडीने परत करणे आवश्यक होते. परताव्याच्या रकमेवर व्याजही दिले जात नाही. तथापि, व्यापा-यांकडून देय रकमेवर १ महिन्यासाठी १५% व्याज आकारण्यात येते. त्यानंतर पुढील ३ महिन्यापर्यंत १८% आणि त्या पुढील कालावधीसाठी २१% व्याज आकारण्यात येते. दुस-या बाजूला विभागाकडून व्यापा-यांचे ४-४ वर्षे पैसे वापरण्यात येतात. परंतु त्यावर व्याज दिले जात नाही ही बाब योग्य वाटत नाही. विभागाकडून ज्याप्रमाणे विलंबाने भरलेल्या रक्कमेवर व्याज आकारले जाते त्याचप्रमाणे व्यापा-यांना देय असलेल्या परताव्याच्या रकमेवर देखील आयकरच्या धर्तीवर विभागाने व्याज देण्याची तरतूद करावी अशी समीतीची शिफारस आहे त्यासाठी विभागाने अशा परताव्याची रक्कम परत करण्यासाठी एक Atomization यंत्रणा उभारावी. त्यामध्ये व्यापा-यांची नोंदणी होईल, प्रत्येक व्यापा-याला वेगळा कोड देण्यात यावा, सदर कोडनुसार व्यापा-यांना परताव्याची येणे रक्कम दिसू शकेल, सदर रक्कमेमधून १०% रक्कम विभागाने राखून ठेवावी व ९०% रक्कम परत करता येईल व राखीव रक्कम पुढील वर्षामध्ये समायोजित करता येईल. विक्रेता आणि खरेदीदार यांना एकमेकांचे कोड माहित असले पाहिजेत आणि त्यांनी एकमेकांचे कोड टाकल्यानंतर cross tally होत नसेल तर त्यासंबंधी संगणकावर तपासणीची व्यवस्था असावी. सन २०१३ पूर्वीची प्रलंबित सर्व प्रकरणे पुढील ३ महिन्यात निकाली काढण्यात यावीत असे निर्देश माहे जून, २०१६ रोजीच्या बैठकीमध्ये देण्यात आले होते. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे. विभागाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विलंबाच्या कारणासह समितीस १ महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

'परताव्याचे संस्करण व प्रदान करण्यातील विसंगती'

१.३ मुंबई, पुणे, ठाणे विभागाच्या अभिलेखांच्या चाचणी तपासणीमध्ये महालेखापालांच्या असे निदर्शनास आले की, १०० प्रकरणांमध्ये सन २००५-०६ ते सन २००९-१० या मधील विविध कालावधीची परतावा आवेदने विभागाकडे दि.३१/३/२०११ रोजी किंवा तत्पूर्वी प्राप्त झाली होती. जर या सर्व प्रकरणांमध्ये दि.३०/९/२०११ आणि दि.३०/६/२०१२ पूर्वी परतावा देणे आवश्यक

होते, तरीही १ महिना ते ६ महिने एवढ्या विलंबाने MVAT अधिनियमाच्या कलम २३ अंतर्गत दाव्याची पूर्तता करण्यात आली. परिणामी MVAT अधिनियमाच्या कलम ५३ अंतर्गत रु. ६८.२५ कोटी परताव्यावर रु. ८.१८ कोटी व्याज दिले गेले. MVAT अधिनियमाच्या कलम ७१ अंतर्गत जर दावे वेळेवर पूर्ण करण्यात आले असते तर ८.१८ कोटी व्याजाचे प्रदान टाळता आले असते असा आक्षेप महालेखापालांनी नोंदविला आहे. या संदर्भात खुलासा सादर करताना विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, व्यापा-यांकडून हवी असलेली माहिती मोठ्या प्रमाणावर सादर करणे आवश्यक असता सदर माहिती वेळीच प्राप्त होत नाही. कंपनी/व्यापारी यांनी खर्चाचा तपशिल दिला नाही तर छाननीमध्ये अडचणी येतात. काही प्रकरणांमध्ये व्यापा-यांनी सादर केलेल्या दाव्या पेक्षा कमी रक्कम देय असल्याचेही दिसून आले आहे. कामाचे स्वरुप व्यापक असल्यामुळे सदर कार्यालयास विलंब होत असल्याचे स्पष्ट केले. याबाबत विभागाने सुटसुटीत कार्यपध्दतीचा वापर करावा, व्यापा-यांकडून हवी असलेली माहिती आगाऊ स्वरुपात घेण्यात यावी, व्यापा-यांनी दावा केलेल्या रकमेची योग्य पध्दतीने छाननी करुन देय रक्कम वेळीच अदा करावी. जेणेकरुन भविष्यात शासनाला परताव्यापोटी विलंब शुल्क द्यावे लागणार नाही तसेच व्यापा-यांनादेखील परताव्याची रक्कम विहित मुदतीत परत मिळू शकेल, याची विभागाने दक्षता घेवून याबाबत केलेल्या उपाययोजनांचा अहवाल समितीस ३ महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

'परताव्याचे संस्करण व प्रदान करण्यातील विसंगती'

१.४ ठाणे व मुंबई विभागातील दस्तऐवजाच्या चाचणी लेखापरिक्षणात महालेखापालांना असे आढळून आले की, ४ व्यापा-यांना MVAT अधिनियमाच्या कलम ५१ अंतर्गत ६.२१ कोटीचा परतावा देण्यात आला होता. प्रकरणांचे निर्धारण केल्यावर त्यानुसार ठाण्यातील व्यापा-यांना २.२७ कोटीचा अतिरिक्त परतावा देय होता व मुंबईतील व्यापारी कोणताही परतावा परत करण्यास पात्र नव्हते. परंतु MVAT अधिनियमाच्या कलम ५२ मधील तरतूदींचे उल्लंघन करुन संबंधित निर्धारण प्राधिका-यांनी संपूर्ण रकमेवर व्याज ग्राह्य केले. परिणामी ठाणे व मुंबई येथील परताव्यावर ५१ लक्ष एवढे व्याज नियमबाह्यरित्या देण्यात आले. सदर आक्षेपाबाबत खुलासा सादर करताना विभागीय सचिवांनी सादर केले की, M/s. Indo Count Ind या कंपनीच्या संदर्भात न्यायाधिकरणाने एक निकाल दिला होता. सदर निकालास व्यापारी पूर्वोदाहरण बनवित आहेत व त्याद्वारे ते व्यापारी वारंवार न्यायाधिकरणाकडे जात आहेत. याबाबत समितीने सूचित केले की, सरकारला ही बाब न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्याची गरज आहे. व्यापा-यांनी न्यायालयात प्रकरण सादर करण्यापूर्वी विभागाकडे परताव्याची मागणी करणे आवश्यक आहे अशी कार्यपध्दती असावी. याशिवाय विभागाचे अंतर्गत लेखापरिक्षण सुध्दा सक्षम करण्यात यावे. त्यामुळे Internal cheques आणि Balances मध्ये वाढ होईल. ज्या अधिका-यांनी व्याज देण्यासंदर्भात चुकीची कार्यवाही केलेली आहे त्यांना केवळ कारणे दाखवा नोटीस देण्याइतपत केलेल्या कार्यवाहीबाबत समितीने नाराजी व्यक्त केली. मे.विराज प्रोफाईल लिमिटेडबाबत मा.न्यायाधिकरणाने व्यापा-यांच्या बाजूने निकाल दिला त्याविरोधात विभागाने मा.मुंबई उच्च न्यायालयात अपील दाखल केले आहे. विभागाने उच्च न्यायालयात शासनाची बाजू भक्कमपणे मांडावी व निर्णय लवकर मिळवून घ्यावा. मुबंई उच्च न्यायालयाच्या निकालानुसार आक्षेपाधीन या तीन व अशा सर्व प्रकरणाचा आढावा घ्यावा व नियमबाहय परताव्याच्या रकमा संबंधित व्यापा-याकडून वसुल कराव्यात तसेच ज्या अधिका-यांनी नियमबाहय परतावा मंजूर केल्याचे दिसून आले अशा सर्व अधिका-यांची विभागीय चौकशी करुन दोषी अधिका-यांवर कठोर कारवाई करावी, मुबंई उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार दोषी आढळणा-या अधिका-यांना नियमित पदावर पदस्थापना न देता त्यांची अकार्यकारी पदावर पदस्थापना करावी याप्रकरणात ५१ लाख व्याज नियमबाह्य दिले त्याबाबतच्या कार्यवाहीचा अहवाल समितीस ३ महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

लेखापरिक्षण निष्पत्ती

परताव्याचे संस्करण व प्रदान करण्यातील विसंगती

१.५ ठाणे विभागातील दस्त ऐवजाच्या चाचणी तपासणीत असे आढळून आले की, १९९३ च्या सामूहिक प्रोत्साहने योजनेखाली (PSI) पात्रता प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या एका व्यापा-याने दिनांक ११ ऑक्टोबर, २०१२ ते १० ऑक्टोबर, २०१४ दरम्यान २.४५ कोटीची कमाल मर्यादा गाठली तसेच त्यानंतरच्या २००६-०७ ते २००८-०९ या कालावधीत रु.१.१६ कोटी कर प्राप्त केला व तो शासकीय कोषागारात जमा केला परंतु या कराच्या निर्धारणेत विभागाकडून चूक झाल्याने व्यापा-यास १.१६ कोटी रुपयांचे नियमबाह्य प्रदान केले गेले, तथापि, विभागाने आरोप मान्य करून वसूली सुरु असल्याचे नमूद केले. साक्षीदरम्यान विभागीय सचिवांनी माहिती दिली की सन २००६-२००७ ची जादा मागणी रु.२,९७,६७४ एवढी रक्कम व्यापा-याने १७/६/२००६ रोजी भरणा केली आहे. २००७-२००८ची ६३,२६,९८० व २००८-२००९ साठी रु.५२,५६,३०७/- एवढ्या रकमेची मागणी

करण्यात आली याविरुध्द व्यापारी अपिलात गेला. पहिले अपिल व्यापा-याच्या विरुध्द गेले त्यानंतर व्यापारी न्यायाधिकरणाकडे द्वितीय अपिलात आहे. सदर अपिलाबाबत तातडीने निर्णय घेण्यात यावा व दोन्ही वर्षाची शासनास येणे असलेली रक्कम तातडीने वसूल करावी. सदर प्रकरणी चूकीच्या पध्दतीने व्यापा-यास परतावा देण्यास जबाबदार सर्व अधिकारी व कर्मचा-यांची चौकशी करुन दोषी अधिका-यांवर कारवाई करण्यात यावी. विभागाने अशाप्रकारे परताव्याच्या अन्य प्रकरणांचाही आढावा घ्यावा व चुकीच्या पध्दतीने जर परतावा दिला असेल तर तो वसूल करण्यात यावा. प्रस्तुत प्रकरणी वसुलीला व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्यात समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे तसेच या प्रकरणी निर्धारणा अधिका-यांची चौकशी करुन जबाबदारी निश्चित करण्यात यावी तसेच अधिका-यांनी केलेली अशा प्रकारची प्रकरणे पुन्हा पडताळणी करुन घेण्यात यावी व त्याबाबतचा अहवाल समितीस सादर करण्यात यावा.

१.६ पुणे विभागातील बांधकाम व्यवसायातील एका मूळ कंत्राटदाराला २००९-१० कालावधीसाठी उप कंत्राटदाराने जारी केलेल्या प्रपत्र ४०७ वर रु.१६.६० कोटी मुल्याच्या उपकंत्राटासाठी वजावट देण्यात आली होती. उपकंत्राटदाराच्या दस्तऐवजाबरोबर प्रति पडताळणी केली असता असे आढळून आले की, कंत्राटदाराने १६.६० कोटी मुल्याचे काम पूर्ण केले होते. ज्यामध्ये ७९.०७ लाख VAT अंतर्भूत होता. त्यामुळे रु.१५.८१ कोटी वजाहट ग्राह्य होती. रु.७९.०७ लाख चूकीची वजावट दिल्यामुळे ३.९५ लाख कराची कमी आकारणी झाली. वजावट आदेश देताना चुकून व्हॅटवर देखील वजावट देण्यात आली व रु.३.९५ लक्ष रुपये जास्तीची वजावट होती. सदर कर वसूल करण्यासाठी विभागाने आदेश काढले आहेत. व ५,७०,११५ इतकी अतिरिक्त रकमेची मागणी केली आहे. परंतु व्यापा-याने या आदेशाविरुध्द प्रथम अपिल दाखल केला असून रु.८५,०००/- एवढ्या रकमेचा अंशतः भरणा केल्यावर अंतिम स्थगिती आदेश विक्रीकर सह आयुक्त (अपिले-१) पुणे यांच्या कार्यालयाने दिला आहे व अपिल सूनावणीसाठी प्रलंबित आहे असे विभागीय प्रतिनिधींनी साक्षीदरम्यान सांगितले.

१.७ साक्षीदरम्यान समितीने सूचविले की, कंत्राटदाराकडून उपकंत्राटदाराकडे काम सोपविण्यात येते त्यावेळी कराराची प्रत जोडण्यात येते. प्रकरणे पडताळणीसाठी, निर्धारणासाठी घेतली जातात त्यावेळी ही कागदपत्रे पहाणे आवश्यक आहे. ज्यावेळी कंत्राटदाराचे ७९ लाख रुपये हे त्या कंत्राटाच्या १६.१६ कोटी रुपयांमध्ये समाविष्ट आहेत त्यामुळे त्यामध्ये वजावट देण्याची आवश्यकता नव्हती. त्यामुळे अशा चुका टाळण्यासाठी वर्क कंत्राटाच्या कामांची कर तपासणी करताना संबंधित कंत्राटदाराची करारपत्रे व कागदपत्रे मागविणे आवश्यक आहे. अशा प्रकारच्या चुका इतरही प्रकरणात झाल्या असल्याची शक्यता गृहीत धरुन विभागाच्या अंतर्गत लेखापरिक्षकांकडून आयुक्त या नात्याने वेगवेगळ्या विभागाची अशा प्रकारची ५० प्रकरणे तपासावीत तसेच तपासणीअंती वसूल पात्र रकमेची वसूली करण्यात यावी. याबाबत विभागाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

१.८ अतिरिक्त कर (Set-off) चे प्रदान MVAT नियमाच्या नियम ५३ (४) नुसार जर एखाद्या व्यापा-याने विक्रीकराव्यतिरिक्त अन्य काही कारणामुळे राज्याबाहेरील भारतात कोणत्याही ठिकाणी व्यवसायाच्या स्थानावर किंवा त्याच्या एजंटकडे (शाखा हस्तांतरण) करण्यात माल पाठविला तर त्या अनुषंगिक करपात्र खरेदीवर २००६-२००७ दरम्यान चार टक्के दराने व सन २००७-२००८ मध्ये तीन टक्के दराने व्यापा-याला देय असलेल्या Set-off वजा करावेत अशी तरतूद आहे.

१.९ औरंगाबाद व मुंबई विभागातील निर्धारणा दस्तऐवजाच्या चाचणी तपासणी दरम्यान (जुलै २०१३ व मार्च २०१४) असे आढळून आले की, दोन व्यापा-यांनी वर्ष २००६-२००७ व २००७-२००८ दरम्यान राज्याबाहेरील त्यांच्या शाखांनी केलेल्या मालाच्या हस्तांतरणास नियम ५३ (३) मधील तरतूदीनुसार वजा करणे आवश्यक असूनही तसे न करता सपूर्ण set off देण्यात आला. परिणामी, ८.६४ लाख अतिरिक्त परतावा देण्यात आला. असे महालेखापालांच्या आक्षेपात नमूद आहे याबाबत सदर दोन्ही प्रकरणात सुधारीत आदेश पारित करण्यात आले असून एका प्रकरणात व्यापा-याने ६८.०४९/- एवढी रक्कम सरकारी तिजोरीत भरली आहे. तर दुस-या प्रकरणी दोन कालावधीकरता मार्च, २०१६ मध्ये सन २००६-२००७ या वर्षाकरिता २,३३,५८७ व २००७-२००८ करिता १४,२५,५६५ एवढ्या रक्कमेच्या मागणी नोटीसा दिनांक ८ जून,२०१६ रोजी बजावण्यात आल्या आहेत. साक्षीच्यावेळी विभागीय सचिवांनी माहिती दिली की, या संदर्भात अपिल दाखल करण्यात आले असून सन २००६-२००७ वर्षाची रक्कम रु.९८,१४६ व २००७-२००८ वर्षासाठी मूळ कराची रु.७,४३,३०१ एवढी रक्कम भरली आहे. परंतु व्याजाची व दंडाची रक्कम अद्याप शिल्लक आहे. सदर प्रकरणी विभागाने प्रलंबित अपिलाबाबत अपिल प्राधिका-याकडे पाठपुरावा करावा व अपिलाचा निकाल प्राप्त करुन प्राधिकरणाच्या निर्णयानुसार व्यापा-यांकडून थकीत व्याज व दंडाची वसूल पात्र रक्कम वसूल करावी व वसुलीचा अहवाल समितीस तीन महिन्यांत सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

कार्य कंत्राटाखाली अग्राह्य वजावट देणे :-

१.१० MVAT अधिनियमाच्या कलम ८२(३) मध्ये एकत्रिकृत योजनेचा विकल्प स्विकारलेल्या कंत्राटदाराने नोंदणीकृत उप कंत्राटदाराला दिलेल्या मालासंबंधी देय असलेल्या रकमेव्यतिरिक्त इतर कोणत्याही रकमेवर त्या कोणत्याही प्रकारची वजावट देण्यात येऊ नये अशी तरतूद आहे.

१.११ मुंबई, नाशिक व पुणे विभागातील २००६-२००७ ते २००८-०९ या कालावधीतील दस्त ऐवजाच्या तपासणीत असे आढळून आले की, ज्या सहा व्यापा-यांनी कर प्रदानासाठी एकत्रित योजनेचा विकल्प स्वीकारला होता त्यांना विक्री किंमत व सेवा कर यामध्ये अंतर्भूत असलेल्या करासाठी वजावट ग्राह्य नसतानाही रु.९४.९१ लाख अग्राह्य वजावट देण्यात आली. परिणामी रु.६.४९ लाखाचा अतिरिक्त परतावाही दिला गेला असा आक्षेप महालेखापालांनी नोंदविला आहे.याबाबत खुलासा सादर करताना विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, आक्षेपाधीन सहा प्रकरणांपैकी दोन प्रकरणांमध्ये पुनर्विलोकन आदेश पारित करण्यात आले असून रु.१३.६७७ व रु.२५.२३६ अशी एकूण रु.३८,९१३ एवढी रक्कम दोन प्रकरणांमध्ये वसूल करण्यात आलेली आहे व अन्य चार प्रकरणी सुधारित कार्यवाही सुरु असल्याचे स्पष्ट केले.

१.१२ विभागाने अन्य चार प्रकरणांतील कार्यवाही तातडीने पूर्ण करुन अतिरिक्त परताव्याची वसूल पात्र रक्कम वसूल करावी तसेच अतिरिक्त परताव्याच्या अन्य प्रकरणांचा आढावा घ्यावा व त्यातील वसूलपात्र रक्कम सुध्दा वसूल करण्यात यावी. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्यात समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

कर प्रदानात अतिरिक्त मुदतवाढ मिळणे

१.१३ MVAT अधिनियमाच्या कलम ९२ (१) नुसार पात्रता प्रमाणपत्र (EC) प्राप्त झालेला कोणताही पात्र घटक, राज्य शासनाने विहित केलेल्या त्याच्या वार्षिक उत्पादन क्षमतेपेक्षा अधिक प्रमाणात केलेल्या उत्पादनासाठी निर्धारीत वर्षानंतरच्या कोणत्याही वर्षासाठी लाभ प्राप्त करण्यास पात्र नसतो.

१.१४ नाशिक विभागातील (RRA) दस्त ऐवजांच्या चाचणी तपासणीत एका व्यापा-यास ११ जानेवारी, २००२ ते १० जानेवारी, २००७ या कालावधीत ४६.२७ लीटर कमाल मर्यादेपर्यंत अल्कोहोल विपकृत स्पीरीट इत्यादीचे उत्पादन करण्यासाठी महाराष्ट्र राज्य औद्योगिक व गुंतवणुक महामंडळ लिमिटेड (SICOM) यांनी पात्रता प्रमाणपत्र दिले होते. सदर व्यापारी २००५ ते २००६ या कालावधीत १५० लाख लीटर मर्यादेपर्यंत विलंबाने कर प्रदान करण्यास पात्र असताना अंतिम निर्धारण करताना निर्धारणा प्राधिका-यांनी १९३.९३ लाख लीटर पर्यंत कर विलंबाने भरण्याचा लाभ दिला. ४३.९३ लाख लीटर इतक्या अतिरिक्त मर्यादेपर्यंत कर प्रदान विलंबाने करण्यास मंजूरी दिल्याने रु.२.१२ कोटी अतिरिक्त परतावा दिला गेला. तसेच २००६ ते २००७ ची निर्धारणे प्रलंबित होती. विभागाने स्पष्टीकरणात नमूद केले आहे की, उद्योग सह संचालक, नाशिक विभाग, नाशिक यांनी पात्रता प्रमाणपत्रासाठी सुधारित आदेश २३ सप्टेंबर, २०१५ रोजी पूर्वलक्षी प्रभावाने (सन २००२ पासून पुढे) पारीत केला असून त्यान्वये व्यापा-यास कर सवलतीकरीता (डेफरमेट) पात्र उत्पादन क्षमता ही १५० लाख लीटर वरुन ३०० लाख मीटरपर्यंत वाढविण्यात आली आहे. ज्यामुळे अतिरिक्त उत्पादन हे पात्रता प्रमाणपत्रामध्ये विहीत केलेल्या क्षमतेपेक्षा कमी असल्याने अतिरिक्त परतावा प्रदान करण्यात आलेला नाही.

१.१५ समितीने या संदर्भात विक्री कर विभाग तसेच उद्योग विभागाची साक्ष घेतली साक्षी दरम्यान उद्योग विभागाच्या सचिवांनी सांगितले की, मे.सागर इंडस्ट्रिज ॲन्ड डिस्टलरी प्रा. लि. नाशिक या कंपनीस १५० लाख लीटर मर्यादा दर वर्षासाठी होती. एकूण ४८.२७ कोटी रुपयांसाठी त्यांनी मान्यता दिली होती. पण त्यांनी १९३.९३ लाख लीटर अधिक काम केले व त्यावरील कर प्रदान केला नाही.परंतु वित्त विभागाने यासंदर्भात आढावा घेतला तेव्हा कंपनीने उद्योग विभागाकडून पूर्व लक्षी प्रभावाने, सन २००२ पासून सुधारीत आदेश आणले त्यानुसार उद्योग विभागाने १५० लीटर्स ऐवजी ३०० लाख लीटर एवढ्या कमाल मर्यादेस परवानगी दिली. व त्याबाबतचे प्रमाणपत्र सन २०१५ मध्ये दिले. त्यावर समितीने याबाबत नाराजी व्यक्त करुन मर्यादा वाढवून देण्याबाबतचे प्रमाणपत्र एवढ्या विलंबाने देण्याचे कारण विचारले तसेच विभागाने जे परताव्याचे पैसे उत्पादकाला दिले ते चुकीने दिले आहेत. म्हणून त्याचे समर्थन करण्यासाठी मान्यता घेऊन येण्यासाठी संधी दिली काय? अशीही विचारणा केली

१.१६ या प्रकरणी वित्त विभाग व व्यापारी व उद्योग विभाग यांनी संगनमताने व्यवहार केला आहे व शासनाचे रु. २ कोटी १२ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. प्रस्तुत प्रकरणी तब्बल १३ वर्षानंतर पूर्वलक्षी प्रभावाने मान्यता दिल्यामुळे शासनाचे नुकसान झालेले आहे अशी मान्यता देण्यास जबाबदार अधिका-यांवर कार्यवाही करण्यात यावी. मे.सागर डिस्टलरी या कंपनीने दिनांक ३०/११/२००१ मध्ये रुपये २२ कोटी ५६ लाख, दिनांक २०/११/२००२ रोजी २८ कोटी ४७ लाख व सन २००३ मध्ये ३५ कोटी

६९ लाख इतकी गुंतवणूक केल्याचे विभागाने ग्राह्य धरले आहे. परंतु ही गुंतवणूक कंपनीत प्लॉट व मशिन खरेदीमधील आहे. त्यामुळे उत्पादन क्षमता कशी वाढली याची चौकशी करावी. सदर कंपनीने किती विजेचा वापर केला, आवश्यक क्षमतेचे ट्रान्सफॉर्मर बसविले होते काय याची खात्री लेखी स्वरुपात महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून (MACB) करण्यात यावी. याशिवाय राज्य उत्पादन शुल्क विभागाचा परवाना, एक्झीट पास तपासण्यात यावेत व कंपनीने चुकीची माहिती उत्पादनाची आकडेवारी विभागास सादर करुन विभागाची दिशाभूल करुन शासनाचे नुकसान केल्याबाबत संबंधित कंपनीवर कार्यवाही करण्यात यावी तसेच या प्रकरणी जे जे अधिकारी शासनाच्या महसूलाच्या नुकसानीस जबाबदार आहेत त्यांची चौकशी करुन जबाबदारी निश्चित करावी व दोषी अधिका-यांवर कार्यवाही करण्यात यावी. तसेच विभागाने कंपनीकडून वसूल करावयाच्या रक्कमेबाबत सुधारित आदेश काढून थकीत विक्रीकराची वसूली करावी व समितीच्या उपरोक्त सूचनेनुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस ३ महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

थकबाकीची वसूली मागणी सूचना जारी करण्यात कालमर्यादेचा अभाव :-

१.१७ MVAT अधिनियमाच्या कलम ३२ नुसार अधिनियमातील तरतूदीच्या अंतर्गत पारित केलेल्या आदेशानुसार देय असणारा कर नोटीस जारी केल्यापासून ३० दिवसांच्या आत व्याज लागू असल्यास शास्तीसह भरणे अपेक्षित असते. परंतु निर्धारणा पूर्ण झाल्यावर ज्या कालमर्यादेत निर्धारणा प्राधिका-यांनी मागणी सूचना जारी करावयाच्या ती कामलर्यादा अधिनियमात विहित केलेली नाही. औरंगाबाद व मुंबई विभागातील RRA दस्तऐवजांच्या/चाचणी तपासणीत (सप्टेंबर, २०१३ ते जानेवारी, २०१४) असे आढळून आले की, ४० व्यापा-यांच्या ४६ निर्धारणाचे जून २०१२ ते मार्च, २०१३ दरम्यान एकूण १७.७४ कोटींचे निर्धारण करण्यात आले होते. परंतु निर्धारणा आदेश पारित झाल्यानंतर चार ते नऊ महिन्यांच्या विलंबाने व्यापा-यांकडून कराची मागणी केली होती त्यामुळे महसूल प्रलंबित राहिला. यासाठी कालमर्यादा विहित केली असती तर निर्धारणा प्राधिका-यांना मागणी सूचना वेळेवर जारी कराव्या लागल्या असत्या व विनाविलंब कराची वसूली होऊ शकली असती यासाठी शासनाने मागणी सूचना जारी करण्यासाठी कालमर्यादा निश्चित करणे आवश्यक आहे. सुधारित सिस्टीममध्ये याबाबत तरतूद करण्यात आली असून या त्रुटी टाळण्यात येणार आहेत. सदर प्रकरणी विभागाकडून कर निर्धारणा झाली असून मागणी आदेश पारित करण्यास विलंब झाला आहे. यावर समितीने सूचित केले की, सन २००६-०७ च्या यादीस खूप उशीर झाला आहे. त्यामुळे शसनाची फार मोठ्या प्रमाणात रक्कम अडकलेली आहे. विभागाने सदर ४६ प्रकरणातील प्रलंबित रक्कम तातडीने वसूल करुन शासन खाती जमा करावी. सदर रक्कम वसूलीस होणा-या विलंबास जबाबदार अधिकारी/कर्मचा-यांची चौकशी करुन दोषी अधिकारी/कर्मचा-यांवर कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल ३ महिन्यात समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

प्रलंबित रकमांची वसूली न होणे :-

१.१८ MVAT अधिनियमाच्या कलम ३२ अंतर्गत मागणीची सूचना जारी केल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत अदा केली नाही तर थकबाकीची वसूली जमिन महसूलाच्या थकबाकीच्या वसूलीच्या पध्दतीने करावी अशी तरतूद आहे.

१.१९ मुंबई विभागातील तपासणीत असे आढळून आले की, ४५ व्यापा-यांच्या बाबतीत वेगवेगळ्या कालावधीत (२००५-२००६ ते २००८-२००९) ४६ कालखंडात कलम २३ (२) अंतर्गत एकतर्फी निर्धारणा आदेश पारित करण्यात आले आणि ऑगस्ट, २०१२ ते जुलै, २०१३ दरम्यान एकूण रु.३३.२८ कोटीसाठी मागणी सूचना जारी करण्यात आल्या. परंतु व्यापा-यांनी कराचा भरणा केला नव्हता व रकमेच्या महसूलाच्या थकबाकी प्रमाणे वसुली करण्यासाठी कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. याबाबत विभागाने नमूद केले आहे की, काही प्रकरणात मागणीपत्र बजावण्यास झालेल्या विलंबाची अनेक कारणे आहेत जसे की, व्यापा-यांने धंद्याचे ठिकाण बदलले, परंतु कार्यालयास कळविले नाही. त्यामुळे त्याचा ठाव ठिकाणा लागत नाही. १४ प्रकरणांमध्ये एकतर्फी निर्धारणा आदेश रद्द होण्याकरिता नमूना ३१६ अन्वये अर्ज दाखल केले आहेत. एका प्रकरणांमध्ये वसुलीची कार्यवाही सुरु आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी साक्षीदरम्यान समितीस सादर केला. याबाबत विभागाने बोगस फॉर्मस्ची नोंद होऊ नये याकरिता उपययोजना करावी. सर्व नोंदणी संगणकीकृत असाव्यात, व्यापा-यांना पाठवावयाचे परिपत्रक, मागणीपत्र, सर्व प्रकारचे आदेश ई. मेलव्दारे पाठविण्याची तरतूद असावी व्यापा-यासोबतच्या कार्यवाहीमध्ये अधिकाअधिक पारदर्शकता आणावी जेणेकरुन अपिलांची संख्या कमी होईल व शासनाचा येणे असलेला कर वेळीच वसूल होईल. विभागाने शासकीय कर वसूलीकरिता आवश्यक असलेल्या पदांपैकी जी अधिकारी/कर्मचा-यांची पदे रिक्त आहेत ती तातडीने भरावी. सद्यःस्थितीत परिच्छेदात नमूद प्रलंबित सर्व अपिल लवकरात लवकर निकाली काढून शासनाचा येणे असलेला कर वसूल करावा व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल ३ महिन्यात समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

"शास्तीची आकारणी न करणे"

१.२० MVAT अधिनियमाच्या कलम २९ (४) नुसार जर एखाद्या विक्रेत्याने जाणुनबूजून बनावट देयक, रोख पावत्या, प्रमाणके इत्यादी सादर केल्याचे आढळून आले तर आयुक्त विक्रेत्याकडून देय कराराबरोबरच विक्रेत्याच्या अशा कृतीमुळे किंवा लोपनामुळे जो कर देय ठरेल त्या कराइतक्या रकमेची शास्ती आकारु शकतात. मुंबई, नाशिक, पुणे आणि ठाणे विभागात असे आढळून आले की, ११५ प्रकरणांमध्ये २००५-०६ ते २००९-१० या कालावधीसंबंधी व्यापा-यांनी सादर केलेल्या विवरणांत रु.१.२८ कोटी कर प्रभाव अंतर्भूत असलेल्या खरेदीवर व्यापा-याने दावा केलेला Set-off निर्धारण प्राधिका-यांनी नाकारला, कारण ही खरेदी विक्रेत्यांनी केलेले हवाला व्यवहार होते हे विक्रेते हवाला व्यापारी असल्याचे घोषित झाले होते व खरेदीच्या बाबतीतली खरेदीदारांची १.२८ कोटी इनपूट टॅक्स क्रेडीटची (ITC) मागणी विभागाने मान्य केली नव्हती व हवाला खरेदीवर मागणी केलेल्या Set-off च्या रकमेइतकी म्हणजेच १.२८ कोटी एवढी शास्ती आकारली नव्हती असा आक्षेप महालेखापालांनी नमूद केला.

१.२१ साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, ट्रायकेम-लॅब, ब्राम्बे प्रा.लि. मे. गढवी मेटल इंडिया अशा कंपन्यांच्या प्रकरणांमध्ये टक्केवारी बरीच कमी असल्याने त्यांना शास्ती नाही. परंतु मे.मेरु केम तसेच गढवी मेटल्स यांना शास्ती का लावण्यात आली नाही. त्याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, या प्रकरणी कर व व्याज वसूल झाले आहे त्यामुळे शास्ती आकारणे योग्य होणार नाही. समितीने सूचित केले की, आयटीसीने मान्य केलेले आहे व ज्या प्रकरणांमध्ये कर पाच टक्केच्यावर असेल अशा प्रकरणी निष्काळजीपणे न्याय देण्यात येऊ नये. त्यांना शास्ती लावण्यात यावी या दृष्टीने विचार करण्यात यावा. सदर सूचनेस विभागीय सचिवांनी सहमती दर्शविली. त्यानुसार विभागाने शास्ती आकारण्याबाबत कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा व वसूलीचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

१.२२ मुंबई, नाशिक, पुणे आणि ठाणे विभागातील ११५ प्रकरणांमधील ज्या प्रकरणांमध्ये इनपुट क्रेडीट टॅक्सची (ITC) मागणी विभागाने मान्य केली नव्हती परंतु कलम २९ (४) अंतर्गत हवाला खरेदीवर मागणी केलेल्या Set-off च्या रकमेइतकी शास्ती आकारण्यात आली नाही. यापैकी काही प्रकरणांमध्ये कराची टक्केवारी कमी आहे त्यांना शास्ती न आकारणे योग्य आहे. परंतु चार टक्क्यापेक्षा जास्त कर असेल अशा प्रकरणांमध्ये शास्ती आकारण्यात यावी व अशा प्रकरणांचा निपटारा करुन त्याबाबतचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

CST अधिनियमांतर्गत अंतिम प्रकरणांत आढळलेल्या विसंगती :-

चुकीच्या व अपूर्ण प्रपत्रांवर कर प्रदानातून दिलेली चुकीची सूट :-

१.२३ केंद्रीय विक्रीकर अधिनियम, १९५६ (CST अधिनियम) च्या कलम ५ (३) व (४) तसेच या अधिनियमांतर्गत तयार केलेल्या नियमानुसार भारताच्या सीमारेषेबाहेर मालाची प्रत्यक्ष निर्यात होण्याआधी त्या मालाची शेवटची विक्री किंवा खरेदी ही निर्यात असल्याचे गृहीत धरण्यात येऊन त्यावर कर माफ असतो. परंतु यासाठी कराराचे अनुपालन असावे. तसेच विक्रेत्याने पूर्णपणे भरलेले प्रपत्र निर्यातदाराच्या स्वाक्षरी व मालाच्या निर्यातीच्या पुराव्यासह सादर करणे आवश्यक आहे.

१.२४ मुंबई, पुणे व ठाणे विभागातील दस्तऐवजांच्या चाचणीत असे आढळून आले की, औषधी द्रव्ये व प्लास्टीक उद्योगासाठी लागणा-या यंत्राचे उत्पादन करणा-या तीन व्यापा-यांनी २००८-२००९ ते २०१०-२०११ दरम्यान केलेल्या रु.८८.७० लाखांच्या विक्रीस प्रपत्र 'H' वर कर प्रदानातून सूट देण्यात आली होती. परंतु या प्रकरणात निर्यातदारांनी खरेदीसाठी दिलेले आदेश हे परदेशातील खरेदीदारांकडून आयातीसाठी आदेश प्राप्त होण्याआधीच देण्यात आले होते. तसेच निर्यातदारांनी खरेदी करण्याआधी विदेशी खरेदीदाराबरोबर करार करण्यात आला नव्हता. अशाप्रकारे CST अधिनियमाच्या कलम ५ (३) आणि ५ (४) च्या तरतूदींचे उल्लंघन करुन या प्रकरणामध्ये व्यापा-याने कर प्रदानातून रु. ११.०९ लाखांची सूट प्राप्त केली होती. परिणामी अतिरिक्त परतावा देण्यात आला असा आक्षेप महालेखापालांनी नोदविला आहे.

१.२५ सदर आक्षेपातील तीन प्रकरणांपैकी एका प्रकरणात अधिका-याने व्यापा-यांकडून आवश्यक तपशील मिळवून त्याची पडताळणी केली असून सदर प्रकरणात नमुना 'H वरील देय केलेली विक्रीची वजावट योग्य असल्याचे विभागीय सचिवांनी स्पष्ट केले. अन्य दोन प्रकरणांमध्ये अनुक्रमे रु.६.५० लक्ष व रु.४.७९ लक्ष वसुलीबाबत व्यापा-यांनी न्यायाधिकरणाकडे अपिल दाखल केले आहे. सदर अपिल प्रकरणी अंतिम सुनावणी प्रलंबित आहे असा खुलासा सादर केला. विभागाने सदर दोन्ही प्रकरणांतील अंतिम सुनावणी लवकरात लवकर होऊन वसूल पात्र रक्कम वसूल करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल ३ महिन्यात समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

CST अधिनियमांतर्गत अंतिम केलेल्या प्रकरणांत आढळलेल्या विसंगती :- दस्तऐवजात्मक पुरावा उपलब्ध नसणे :-

१.२६ महालेखापालांनी आक्षेपात नमूद पाचही प्रकरणांबाबत खुलासा सादर करताना स्पष्ट केले की, हे सर्व निर्यातीच्या संदर्भातील प्रकरणे आहेत, या निर्यातीच्या संदर्भातील विभागाने एक चेकलिस्ट तयार केली आहे. या चेकलिस्टमधील कागदपत्रे उपलब्ध असतील तर तो व्यवहार निर्यात म्हणून ग्राह्य धरला जातो. या पाचही प्रकरणांमध्ये सर्व कागदपत्रांचे अभिलेखे आहेत व त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे नुकसान झालेले नाही असा खुलासा सादर केला. सदर खुलासा समितीने मान्य केला. तथापि, निर्यात व्यवहाराबाबतची सर्व प्रक्रिया १००% ऑनलाईन पध्दतीने सुरु करावीत, मध्यस्थाची (agent) ची आवश्यकता असू नये, सल्लागारांची सुध्दा आवश्यकता असू नये अशी पारदर्शक पध्दती असावी. याकरिता निर्यात व्यवस्था करणा-या व्यापा-याबाबत आवश्यक त्या मुद्यांवर चर्चा करावी. निर्यातीबाबतची कार्यवाही सुटसुटीत नसल्यास व्यापारी कंटाळून निर्यातीची ऑर्डर घेणे बंद करतात. व्यापा-यांची ही अडचण विभागाने दूर करावी. एक्सपोर्ट ओरीएंटेड युनिटबाबत लघुउद्योग किंवा मध्यम उद्योजक यांच्या सोबतही विभागाने सूसंवाद साधला पाहिजे व त्यांच्या अडचणी समजून घेतल्या पाहिजेत. जेणेकरुन देशातील निर्यातीच्या प्रमाणात वाढ होईल. विभागाने प्रचलित क्लिष्ट पध्दतीत वरीलप्रमाणे सुधारणा करावी व त्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

CSTअधिनियमांतर्गत अंतिम केलेल्या प्रकरणांत आढळलेल्या विसंगती :-

अपूर्ण प्रपत्रे :-

१.२७ औरंगाबाद, मुंबई, नाशिक, पुणे व ठाणे विभागांमधील ११ व्यापा-यांच्या प्रकरणांत २००५-२००६ ते २०१०-२०११ (११ कालखंड) मधील वेगवेगळ्या कालावधी संबंधित रु.६.२५ कोटी इतक्या निर्यातीपृष्ठर्थ सादर केलेले प्रपत्र 'H अपूर्ण होते. विदेशी खरेदीदारांकडून प्राप्त झालेले कराचे आदेश, स्थानिक खरेदीदारांकडून प्राप्त झालेले खरेदीचे आदेश इत्यादी आवश्यक बाबींचा तपशील त्यामध्ये देण्यात आला नव्हता. करातून अशा प्रकारची वजावट (रु.४२.५२ लाख) कोणत्या आधारावर देण्यात आली होती ते लेखापरिक्षेत पडताळता आले नाही असा आक्षेप महालेखापालांनी नमूद केला. सदरहू आक्षेपासंदर्भात साक्षीदरम्यान विभागीय सचिवांनी सादर केले की, औरंगाबाद, मुंबई, नाशिक, पुणे व ठाणे विभागातील ११ व्यापा-यांपैकी ९ प्रकरणांमध्ये कागदपत्रे मागवून घेतली आहेत व ते मिळाले देखील आहेत. सदर ९ प्रकरणांपैकी ८ प्रकरणांमध्ये पूर्तता झाली असून एक प्रकरण अपिलमध्ये आहे. याबाबत लवकरच निर्णय घेण्यात येईल. २ प्रकरणे अद्यापही प्रलंबित आहेत. विभागाने अपिलमधील १ प्रकरण व उर्वरित २ प्रकरणांवर तातडीने निर्णय घ्यावा व एक महिन्याच्या आत तीन्ही प्रकरणांचे पुनर्विलोकन करुन समितीला माहिती द्यावी असे सूचित केले होते. तथापि, सदरची माहिती अद्यापही प्राप्त झालेली नाही, ही बाब गंभीर आहे. विभागाने सदर विलंबास जबाबदार अधिका-यांवर कठोर कारवाई करावी. विभागाने समिती समोर आश्वासित केलेली माहिती सादर न करणे ही बाब समितीच्या वारंवार निदर्शनास येत आहे. याबाबत मुख्य सचिवांनी सर्व विभागांचा व आश्वासित माहिती सादर न करणा-या विभागावर कारवाई करावी व उपरोक्त समितीच्या निर्देशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल ३ महिन्यात समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

व्यापा-यांची नोंदणी करताना परतावा व लेखापरिक्षा शाखेमध्ये उपलब्ध असलेल्या माहितीचा वापर न करणे :-

१.२८ MVAT अधिनियमाच्या कलम ३ नुसार रु. ५ लाख किंवा अधिक वार्षिक उलाढाल असलेला प्रत्येक व्यापारी कर भरण्यास पात्र असतो. तसेच त्याने वैध नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असते. MVAT अधिनियमाच्या कलम ६६ (२) नुसार सर्वेक्षणासाठी आयुक्त सर्वसाधारण किंवा विशेष सूचनेव्दारे एखाद्या व्यापा-यांकडून किंवा व्यापा-याच्या प्रवर्गाकडून व्यापा-यांची नावे, पत्ते व इतर आवश्यक तपशील मागवू शकातात. त्यांनी सदर कालावधीत माल विकत घेतलेला असतो किवा विकलेला असतो.

१.२९ मुंबई, नाशिक, पुणे व ठाणे विभागातील RRA शाखेतील दस्तऐवजांच्या चाचणी तपासणीत असे आढळून आले की, २०८ प्रकरणात व्यापा-यांनी २००५-०६ ते २०१०-११ मधील वेगवेगळ्या कालावधीत त्यांच्या विवरणात/खरेदीपत्रात/प्रपत्र ७०४ मध्ये नोंदणी न झालेल्या व्यापा-यांकडून एकूण रु.११९.४३ कोटीची खरेदी केल्याचे दर्शविले होते. प्रत्येक व्यापा-यांकडून रु. पाच लाखापेक्षा अधिक रकमेएवढी खरेदी करण्यात आली होती. तरी या अनोंदणीकृत व्यापा-यांची नावे, पत्ते व इतर माहिती प्राप्त करण्यासाठी सर्वेक्षण शाखेने कोणतेही प्रयत्न केले नव्हते तसेच त्यांच्या नोंदणीसाठी RRA शाखेने सर्वेक्षण शाखेबरोबर संपर्कही साधला नव्हता. परिणामी अनोंदणीकृत व्यापा-यांनी कर बुडवला असल्याची शक्यता आहे असा आक्षेप महालेखापालांनी नोंदविला. याबाबत विभागीय सचिवांनी साक्षीदरम्यान खुलासा केला की, आक्षेपात नमूद केलेली २०८ प्रकरणे नसून प्रत्यक्षात

२०७ प्रकरणे आहेत. यापैकी १९४ प्रकरणांची विभागाने पडताळणी पूर्ण केलेली आहे. उर्वरीत १६ प्रकरणांमध्ये आंतरराज्यीय खरेदी आहे. त्यामध्ये ३६ युआरडी डीलर्स सामिल आहेत. जॉबवर्क लेबर चार्जेसची ५ प्रकरणे होती. ३७ प्रकरणांमध्ये करमुक्त खरेदी आहे. कमी उलाढालीची अशी ४४ प्रकरणे आहेत. त्यामध्ये २२३४ युआरडी डिलर्स आहेत. त्यांची उलाढाल मर्यादेपेक्षा कमी आहेत. सोन्याचे दागिने, वैयक्तिक जुने दागिने याची १५ प्रकरणे आहेत आणि एकूण ६८ प्रकरणे यूआरडी आहेत. आक्षेपात नमूद प्रकरणांपैकी २९ प्रकरणांमध्ये पडताळणीचे काम शिल्लक आहे. ज्यामध्ये २८४ व्यापारी समाविष्ट आहेत. त्याकरिता अजून तीन महिने कालावधी लागेल असा खुलासा विभागीय सचिवांनी सादर केला असता साक्षी दरम्यान समितीने निर्देश दिले की, प्रलंबित सर्व प्रकरणांबाबत विभागाने तातडीने कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्यात समितीस सादर करावा. तथापि, समितीस अहवाल अद्याप सादर केला नाही. अहवाल सादर करण्यास झालेल्या विलंबाच्या कारणांसह केलेल्या कार्यवाहीचा अहवाल एक महिन्यात समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

१.३० महालेखापालांनी लेखापरिक्षणाच्या निष्कर्ष व शिफारशीमध्ये असे नमूद केले की, विभागास परताव्याची १०० प्रकरणे पुर्ण करण्यास विलंब झाल्यामुळे विभागाला व्याजापोटी रुपये ८.१८ कोटीचे प्रदान करावे लागले होते, ते टाळता आले असते, निर्धारण अचूकपणे काळजीपुर्वक करण्यात आले नव्हते. अन्यथा रु.४.३८ कोटी चुकीचा, नियमबाह्य व अतिरिक्त परतावा देणे थांबविता आले असते, रु.८.८२ कोटी कर प्रभावाच्या आंतरराज्य व निर्यात व्यवहारामध्ये कर प्रदानात सूट प्राप्त करण्यासाठी सादर करावयाची काही कागदपत्रे अभिलेख्यात सापडली नाहीत व सापडलेली कागदपत्रे अपुर्ण होती मागणी करण्यात आलेल्या रकमेच्या वसुलीच्या वेळी संबंधित तरतुदीचे पालन करण्यात आले नव्हते. ज्यामुळे रु.३३.२८ कोटी रुपयाची वसुली होऊ शकली नव्हती तसेच रु.१७.७४ कोटीची मागणी करण्यात ४ ते ९ महिन्यांचा विलंब झाला होता. परिणामी त्या रकमेची वसुली करण्यास विलंब झाला. या निष्कर्षाबाबत समितीसमोर साक्षीदरम्यान विभागीय सचिवांनी खुलासा केला की, अधिकारी/कर्मचारी अपुरे आहेत. विभागाच्या पुनर्रचनेकरिता एक समिती तयार करण्यात आली आहे. सदर समितीचा अहवाल लवकरच अपेक्षित आहे. त्यामध्ये अंतर्गत लेखापरिक्षण शाखा आणखी बळकट करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात येणार आहे. त्यासोबतच अतिरिक्त मनुष्यबळाची मागणी करण्यात येणार आहे. विक्रीकर विभागामार्फत स्क्रॅनिंगची प्रक्रिया पुनःश्च सुरू करण्यात येणार आहे. याशिवाय विक्रीकर विभागामध्ये 'सॅप' यंत्रणा सुरू करण्यात येणार आहे. यामध्ये invoice wise return येणार आहे. त्यामुळे ८०% काम सोपे होणार आहे. या प्रणालीमुळे विक्रीकर विभागाच्या कामाचा बोजाही कमी होईल. महालेखापाल कार्यालयाला लेखापरिक्षणाच्या पद्धतीबाबत प्रशिक्षण देण्याची विनंतीही करण्यात येणार आहे.विभागीय सचिवांनी असेही स्पष्ट केले की, विक्रीकर आर्थिक बुद्धी संपदा कक्ष (Economic Intelligence Unit) गेल्या काही वर्षात कार्यरत केला आहे. त्यामध्ये डेटावेअर हॉऊसिंग आणि बिजनेस इनटेरिझन्स सॉफ्टवेअर घेतले आहे. त्यामध्ये प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार काम करीत आहे व त्यांच्या मदतीकरिता राज्यशासनाकडून तसेच सांख्यिकीय विभागाकडून काही अधिकारी प्रतिनियुक्तीवर आहेत.

१.३१ विभागीय सचिवांच्या खुलाश्याअंती समितीने निर्देश दिले की, महालेखापालांनी चाचणी लेखापरिक्षणात काही नमुना प्रकरणे बघितली आहेत. परंतु विभागातील सर्व प्रकरणांचे लेखा परिक्षण होणे आवश्यक आहे. त्याकरिता अंतर्गत लेखापरिक्षण कक्ष सक्षम करण्यात यावा. महाराष्ट्र राज्य तंत्रज्ञान वापरात अग्रेसर राज्य आहे. त्यादृष्टीने नवीन तंत्रज्ञानाचा विभागाने वापर करावा.मुंबई महापालिकेअंतर्गत सॅप प्रणाली कार्यरत आहे. सदर प्रणालीमध्ये येत असलेल्या अडचणींचा विभागाने बारकाईने अभ्यास करावा व सदर प्रणालीचा योग्य पद्धतीने वापर करावा. या प्रणालीसाठी अधिका-यांना आवश्यक ते प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे. विक्रीकर विभागाकडे कर परताव्याची सन २००२ ते २०१६ पर्यंत २३,३१८ प्रकरणे प्रलंबित असून रु.६,१७० कोटी रुपयांचा परतावा देणे प्रलंबित आहे. प्रलंबित प्रकरणांचा निपटारा विभागाने त्वरीत करावा. ज्या प्रकरणात विभागाकडून मागणी करण्यात विलंब झाला अशी प्रकरणे भविष्यात टाळण्यात यावीत. विभागाला भविष्यात व्याजापोटी प्रदान करावे लागणार नाही याची दक्षता घ्यावी. विभागाकडून सर्व प्रकरणांचे निर्धारण अचूकपणे व काळजीपुर्वक करण्यात यावे. जेणेकरुन यातील चुकांमुळे शासनास भुर्दंड सोसावा लागणार नाही. महालेखापालांच्या लेखापरीक्षणास आवश्यक असलेले सर्व दस्तऐवज लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध होतील त्याबाबतही विभागाने दक्षता घ्यावी. समितीच्या उपरोक्त निर्देशानुसार विभागाने ठोस उपाययोजना करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्यात समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

इतर लेखापरिक्षा अभिक्षणे

१.३२ मुंबई विक्रीकर अधिनियम १९५९ (BST अधिनियम) महाराष्ट्र मुल्यवर्धितकर अधिनिमय २००२ (MVAT अधिनियम) केंद्रीय विक्रीकर अधिनियम, १९५६, (CST अधिनियम) अंतर्गत विक्रीकर विभागात अंतिम करण्यात आलेल्या निर्धारण

दस्तऐवजांच्या तपासणीत ब-याच प्रकरणांमध्ये अधिनियम / नियमांचे पालन न होणे कराची आकारणी न / कमी होणे. सूटीचे नियमबाहय प्रदान आणि इतर प्रकरणे निदर्शनास आली होती. महालेखापालांकडून यापूर्वीही निर्धारणा प्राधिका-यांच्या चूका निर्दशनास आणल्या गेलेल्या आहेत. तथापि या अनियमितता सातत्याने घडत आहेत व लेखा परिक्षा करेपर्यंत त्याचा तपास लागत नाही. असा आक्षेप महालेखापालांनी नोंदविलेला आहे. याबाबत विभागीय सचिवांच्या साक्षीमध्ये चर्चेअंती समितीने सूचित केले की,विभागाच्या अधिका-यांकडून चूक झाली आहे असे निदर्शनास आल्यानंतर विभागाकडून त्यांचेवर कारवाई होणे आवश्यक आहे. जेणेकरून सदर अधिका-यांवर दडपण राहिल.

१.३३ C फॉर्म मध्ये अतिशय मोठया प्रमाणात घोळ होत आहेत. विभागाने याकरिता अंतर्गत लेखापरिक्षण कक्ष बळकट करणे आवश्यक आहे. या शिवाय विधी व न्याय विभागाचा सल्ला प्राप्त करुन त्रयस्थ लेखापरिक्षकाकडून लेखापरिक्षणाबाबत (Third Party Audit) कार्यवाही करता येईल काय याबाबत तपासणी करुन कार्यवाही करावी जेणे करुन अशा चूका वेळीच लक्षात येतील व त्या संदर्भात उचित कार्यवाही करणे तसेच अशा प्रकरणांतील शासकीय कराची वसूली त्या-त्या वेळीच करता येईल. विभागाच्या पुनर्रचनेसाठी गठीत समितीचा अहवाल प्राप्त करुन आवश्यक पदे भरणे उपरोक्त निर्देशाप्रमाणे करावयाच्या कार्यवाहीची ठोस उपाययोजना विभागाने करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महीन्यात समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

महाराष्ट्र मुल्यवर्धित कर २००२ (MVAT) अधिनियम अंतर्गत अंतिम केलेल्या प्रकरणांमध्ये निदर्शनास आलेल्या विसंगती

हवाला व्यापा-यांकडून केलेल्या खरेदीवर नियमबाह्यारितीने set off चे प्रदान.

१.३४ विक्रीकर उपायुक्त, LTU-E ६२६, माझगांव विभाग, मुंबई - विक्रीकर आयुक्तांनी जून २०१२ मध्ये जारी केलेल्या ८T क्रमांकाच्या व्यापार परिपत्रकात असे नमूद आहे की हवाला व्यापा-याकडून करण्यात आलेले खरेदीचे व्यवहार वैध व्यवहार नसल्याने, जरी अशा खरेदीवर हवाला व्यापा-याने अंशतः किंवा पूर्ण कर भरला असेल तरी अशा खरेदीवर ITC चा दावा धरु नये. अशा हवाला व्यापा-यांची यादी विक्रीकर विभागाच्या चौकशी शाखेने तयार केली. त्या यादीबरोबर निर्धारण दस्तऐवजांची प्रति पडताळणी केली असता असे आढळून आले की, २००८-०९ या कालावधीत लोहीय व अलोहीय धातूचा आयातदार व पूर्नविक्रेता असलेल्या व्यापा-याने तीन व्यापा-यांकडून केलेल्या खरेदीवर रु.१४.७३ लाख set-off ची मागणी केली. हे तीन व्यापारी हवाला व्यापारी असल्याचे घोषित केले होते. त्यामुळे उक्त जून, २०१२ च्या परिपत्रकानुसार व्यापा-यानेच set-off चा दावा फेटाळणे आवश्यक होते. अशा प्रकारे चुकीच्या पध्दतीने Set-off दिल्याने व्याज व शास्तीसह रु. ३८.१२ लाख कराचे निर्धारण कमी झाले. हे महालेखापालांनी २०१३ मध्ये निदर्शनास आणून दिल्यावर विभागाने आक्षेप मान्य करुन व्यापा-याने निर्धारण आदेशाविरुध्द अपिल दाखल केल्यामुळे सुधारात्मक कारवाई करण्यासाठी विक्रीकर सह आयुक्त (अपील) यांना ऑक्टोबर, २०१३ मध्ये कळविल्याचे नमूद केले आहे. याप्रकरणी सुधारित कार्यवाही करुन महसूल हानी संरक्षित करण्यात आल्याचे विभागाने नमूद केले आहे. विभागाने हवाला व्यापा-यांबाबत शून्य सहनशीलता हे धोरण अवलंबिलेले आहे. त्यानुसार सर्व हवाला व्यापा-यांविरुध्द एफ. आय. आर. (FIR) दाखल करण्यात आले आहेत. ज्या व्यापा-यांनी देय नसणा-या कर वजावटीचा लाभ हवाला बिलावर घेतला आहे. अशा व्यापा-यांवर सक्त कारवाई केली असून यामुळे हवाला व्यापा-यांची तसेच त्यांच्याकडील खरेदीपोटी घेण्यात येणा-या कर वजावटीच्या दाव्यांची संख्या कमी झाली आहे. यासंदर्भात साक्षीदरम्यान सचिवांनी माहिती दिली की, हवाला व्यापा-यांकडून रु.३७ लाख एवढया रकमेची वसुलीपोटी मागणी केली आहे. त्याविरुध्द व्यापा-यांनी अपील दाखल केले असून सदर अपिल प्राधिकरणाकडे निवाडयासाठी प्रलंबित आहे. विक्रीकर, आयकर यामध्ये "हवाला" शब्द वापरला जातो. खरेदीदाराला बिल दिल्यानंतर कर वसूल केला असे दाखविण्यात येते परंतु प्रत्यक्षात तो कर शासनाच्या तिजोरीत जमा होत नाही. यास "हवाला" संबोधण्यात येते. विभागाने आतापर्यंत २०६५ हवाला व्यापा-यांचा शोध घेतल्यानंतर त्यांच्याविरुध्द पोलीस स्टेशनमध्ये तक्रारी दाखल केलेल्या आहेत, व अशा प्रकारची कारवाई केल्यानंतर १०५१ कोटी रुपये वसूल करण्यात आले आहेत. यासाठी अशा प्रकारची प्रकरणे हाताळण्यासाठी विभागात आयपीएस अधिका-याची "मुख्य दक्ष अधिकारी" म्हणून नेमणुक करण्यात आलेली आहे. त्यांच्यामार्फत संबंधित प्रकरणी पोलीसांकडे पाठपुरावा करण्यात येतो. असा खुलासा विभागीय सचिवांनी सादर केला असता समितीने निर्देश दिले की, हवाला व्यापारी संदर्भात निदर्शनास आलेल्या २०६५ हवाला व्यापा-यांपैकी फक्त ३३ हवाला व्यापा-यांवर कारवाई करण्यात आलेली आहे. तथापि २०३२ हवाला व्यापा-यांवर अद्याप कारवाई झाल्याचे दिसून येते नाही. विभागाने या सर्व हवाला व्यापा-यांचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करावी व त्यांनी शासनाचा बुडविलेला कर वसुल करावा, तसेच भविष्यात अशी हवाला प्रकरणे उद्‌भवणार नाहीत, याकरिता निश्चित स्वरुपाची उपाययोजना करावी. समितीच्या उपरोक्त निर्देशांनुसार विभागाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्यांत समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

वित्त विभाग

२.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१३-२०१४ या वर्षाच्या "महसूली जमा" अहवालातील **परिच्छेद क्रमांक २.५.३ "सेवा करावर VAT ची आकारणी न करणे" तसेच परिच्छेद क्र. २.५.४ "व्यवहारांचे चुकीचे वर्गीकरण केल्याबाबत / व्यवहार दडविल्याबद्दल शास्ती न आकारणे"** यासंदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय व्यक्त केले.

परिच्छेद क्रमांक २.५.३' महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर अधिनियम, २००२ (MVAT अधिनियम) अंतर्गत अंतिम केलेल्या प्रकरणांमध्ये निदर्शनास आलेल्या विसंगती सेवाकरावर VAT ची आकारणी न करणे.

विक्रीकरावर उपायुक्त, E-००२, LTU नाशिक व विक्रीकर उपायुक्त E-८३३, व्यापार लेखा परिक्षा माझगांव, मुंबई.

MVAT अधिनियमाच्या कलम २(२५) नुसार, **"**विक्री किंमत**"** म्हणजे व्यापा-याला एखादया विक्रीसाठी देण्यात आलेली किंवा देय असलेली किंमत होय ज्यामध्ये विक्रेत्याने त्या मालासंबंधी त्याच्या पुरवठयादरम्यान किंवा पुरवठयाआधी केलेल्या कोणत्याही कृत्तीसाठी आकारलेले शुल्क समाविष्ट असते, परंतु, जर वाहतूक विमा किंवा मालाच्या प्रस्थापनेचा खर्च स्वतंत्रपणे आकारला गेला असेल तर तो विक्री किंमतीत समाविष्ट केला जात नाही. विक्रीकर आयुक्तांच्या धारणेप्रमाणे (जानेवारी २००२ चे DDQ) जी विक्री किंमत MAT अधिनियम २००२ अंतर्गत करपात्र असते त्यामध्ये व्यवहारावर देय असलेला किंवा प्रदान केलेला सेवा कर समाविष्ट असतो.

दोन व्यापा-यांच्या २००७-०८ ते २००८-०९ दरम्यानच्या तीन कालावधीच्या जुलै २०११ ते मार्च २०१२ दरम्यान पूर्ण झालेल्या निर्धारणा व इतर संबंधित दस्तऐवजांच्या चाचणी तपासणीत (सप्टेंबर २०१२ ते ऑक्टोबर २०१२) असे आढळून आले की, व्यापा-यांनी संकलित केलेला रु.१.०९ कोटी सेवाकर विक्रीच्या करपात्र उलाढालीत समाविष्ट केला नव्हता. परिणामी, व्याजासह रु.१२.८८ लाखाचे न्यून निर्धारण झाले.

ऑक्टोबर २०१२ व नोव्हेंबर २०१२ मध्ये ही प्रकरणे निर्दशनास आणून दिल्यावर एका प्रकरणाविषयी विभागाने उत्तरात सांगितले (जानेवारी २०१३) की, एका व्यापा-याने कर प्रदानाविरुध्द अपील दाखल केले असल्याने अपीलीय प्राधिका-यांना हे अभिक्षण कळविण्यात आले होते. दुस-या प्रकरणांत उत्तर प्राप्त झाले नाही.

जुलै २०१४ ला ही बाब शासनास कळविण्यात आली. त्यांचे उत्तर प्राप्त झाले नाही (डिसेंबर २०१४)

प्रकरणनिहाय अहवाल सोबत जोडला आहे.

ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात वित्त विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहेः—

व्यापा-याचे नांव	:-	मे.ॲलुप्रो बिल्डींग सिस्टीम प्रा.लि.(मुंबई)
नों.दा.क्र.	:-	२७७३००५१२४व्ही
कालावधी	:-	२००८-०९
निर्धारणा दिनांक	:-	१६.०७.२०११
अंतर्भुत आक्षेपित रक्कम	:-	रु.५८२२९७/-
वाढीव मागणी	:-	-
लेखा आक्षेप	:-	मान्य
दुरुस्ती कार्यवाही	:-	संबंधित मुद्दा विचारात घेवून वर्ष २००८-०९ करीता विउआ(अपिल) १ यांनी दि.५.२.२०१५ रोजी अपिल आदेश क्र.डीसी/एपीपी१/व्हॅट३४४/२०१२-१३/१६१ पारीत केला.
वसुली	:-	अपिल प्राधिकारी यांनी कलम ४२(३) अंतर्गत सेवाकराची रक्कम रु.५८४२०२६/- वर कर आकारलेला आहे.

विचारणा (Query) :- वसुलीचा तपशील लोकलेखा समितीस कळविण्यात यावा.

शेरा :- विक्रीकर उपायुक्तांच्या अपिल आदेशाविरुध्द व्यापा-याने मा.न्यायाधिकरणाकडे व्दितीय अपिल दाखल केले आहे. मा.न्यायधिकरणाकडे अंशतः भरणा शिवाय स्थगिती दिलेली आहे.

खात्याअंतर्गत लेखापरीक्षण करण्यात आले का? :- नाही.

व्यापा-याचे नांव :- मे.ॲपेक्स इंजि.सर्विसेस

नों.दा.क्र. :- २७९५०००१७०५व्ही/सी

कालावधी :- २००७-०८ & २००८-०९

निर्धारणा दिनांक :-

अंतर्भुत आक्षेपित रक्कम :- रु.७३८७४/-आणि रु.६३२३१३/-

वाढीव मागणी :- -

लेखा आक्षेप :- मान्य

दुरुस्ती कार्यवाही :- १) २००७-०८:- कलम २३(३) खाली निर्धारणा आदेश दि.१६.११.१३ रोजी पारीत करण्यात आला व त्यानंतर कलम २४ खाली चुक दुरुस्ती आदेश दि.४.७.१४ रोजी पारित करण्यात आला असून सेवाकराच्या एकूण रु.७३८७३९/- इतक्या रक्कमेवर रु.५९०९९/- इतका कर आकारण्यात आला आहे. निर्धारणा व त्यानंतरच्या चुक दुरुस्ती आदेशानुसार व्यापा-यास रु.१३०९७७६/- इतका परतावा आल्यामुळे कलम ३०(४) खाली व्याज आकारण्यात आलेले नाही.

२) २००८-०९ :- निर्धारणा आदेश व त्यानंतरचा चुक दुरुस्ती आदेश अनुक्रमे दि.२९.६.१३ व दि. ५.७.१४ रोजी पारित करण्यात आला असून सेवा कराच्या एकूण रु.४६८३८०२/- इतक्या रकमेवर रु.३७४७०४/- इतका कर आकारण्यात आला आहे. निर्धारणा व त्यानंतरच्या चुक दुरुस्ती आदेशानुसार व्यापा-यास रू.९२३४५३/- इतका परतावा आल्यामुळे कलम ३० (३) व ३० (४) खाली आकारण्यात आलेले नाही. या प्रकरणातील दोन्ही कालावधीसाठी व्यापा-याला चुक दुरुस्ती आदेशानंतर परतावा आलेला आहे. म्हणून कलम ३०(४) खाली व्याज आकारणी योग्य नाही. मा. महालेखापाल यांना अनुपालन अहवाल सादर करण्यात आला होता.मा.महालेखापालांकडून पुनर्विचारणा करण्यात आलेली नाही.

वसुली

खात्याअंतर्गत लेखापरीक्षण करण्यात आले का ? :- नाही.

परिच्छेद क्र/पृ.क्र २.५.४./३० महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर अधिनियम, २००२ (MVAT अधिनियम) अंतर्गत अंतिम केलेल्या प्रकरणांमध्ये निदर्शनास आलेल्या विसंगती व्यवहारांचे चुकीचे वर्गीकरण केल्याबद्दल /व्यवहार दडवल्याबद्दल शास्ती न आकारणे, या संदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय दिलेले आहेत.

विक्रीकर उपायुक्त, व्यापार लेखा परीक्षा- ४, ई-८२२, माझगांव, मुंबई.

MVAT अधिनियमाच्या कलम २९(३) अनुसार, जर एखादया व्यापा-याने करपात्र व्यवहार जाणून बुजून चूकीच्या लेख्यात वर्गीकृत केले किंवा व्यवहाराचा काही तपशील दडवला तर आयुक्त त्या व्यापा-याकडून देय असलेल्या कराव्यतिरिक्त, वरील चुकीप्रित्यर्थ देय ठरलेल्या कराइतकी शास्तीची रक्कम वसूल करु शकतात/आकारु शकतात. अनुसूचीतील नोंद क्रमांक इ-१ नुसार पॉवर इन्व्हर्टरवर १२.५ टक्के दराने VAT आकारणीय आहे.

ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात वित्त विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहेः

स्पष्टीकरणात्मक शेरा.

प्रकरणनिहाय अहवाल सोबत जोडला आहे.

परिच्छेद क्र.२.५.४.१ महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर अधिनियम, २००२ (MVAT अधिनियम) अंतर्गत अंतिम केलेल्या प्रकरणांमध्ये निदर्शनास आलेल्या विसंगती व्यवहारांचे चुकीचे वर्गीकरण केल्याबद्दल/व्यवहार दडवल्याबद्दल शास्ती न आकारणे :- या संदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय दिलेले आहेत.

पॉवर इन्व्हर्टरचा घाऊक व्यापारी व वितरक असलेल्या एका व्यापा-याच्या २००५-०६ च्या (मार्च २०११ मध्ये पूर्ण केलेल्या) निर्धारण दस्तऐवजांच्या चाचणी तपासणीत (सप्टेंबर, २०११) असे आढळून आले की, व्यापा-याने पॉवर इन्व्हर्टर हे अनुसूची च्या नोंद क-५६ खालील IT उत्पादन असल्याचे गृहीत धरुन त्याच्या रु.१.९३ कोटीच्या खरेदीवर १२.५ टक्के ऐवजी चार टक्के दराने कर संकलित करुन त्याचा भरणा केला होता. परंतु निर्धारण प्राधिका-यांनी AA त्यावर १२.५ टक्के दराने कर आकारला व रु.१६.४० लाख फरकाच्या अतिरिक्त रक्कमेची मागणी केली, परंतु ऑक्टोबर, २०११ मध्ये हे प्रकरण निदर्शनास आणून दिल्यावर विभागाने लेखापरिक्षा अभिक्षण मान्य केले व ऑगस्ट, २०१३ मध्ये वर्ष २००५-०६ साठी रु.१६.४० लाख शास्ती आकारली. वसूलीचा अहवाल प्राप्त झाला नाही.

मार्च, २०१४ मध्ये ही बाब शासनास कळविण्यात आली. त्याचे उत्तर प्राप्त झाले नाही. (डिसेंबर, २०१४)

ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात वित्त विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमुद केले आहे.

प्रकरणनिहाय अहवाल सोबत जोडला आहे.

व्यापा-याचे नाव	मे. सन सिस्टीम
नों.दा.क्र.	२७१४००१२६७५ व्ही
कालावधी	२००५-२००६
निर्धारणा दिनांक	३१.०३.२०११
अंतर्भुत आक्षेपित रक्कम	१६.४० लाख
वाढीव मागणी	१६.४० लाख
लेखा आक्षेप	अमान्य
दुरुस्ती कार्यवाही	व्यापा-याने विक्री केलेल्या पॉवर इन्व्हर्टरसाठी कराचा दर काय असावा यासाठी DDQ दाखल केला होता. सदर DDQ च्या निर्णयानुसार पॉवर इन्व्हर्टरसाठी कराचा दर १२.५% असा ठरविण्यात आला. व्यापा-याने या निर्णयाविरोधात मा.न्यायधिकरणाकडे अपिल दाखल केले. सदर अपिल आदेशामध्ये पॉवर इन्व्हर्टर हे IT प्रॉडक्ट असून त्यावर कराचा दर ४% आहे असा निर्णय दिला. मा.न्यायाधिकरणाचा व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी सदर प्रकरणात दिलेला निर्णय विभागाने मान्य केला आहे. या कायदेशीर परिस्थितीचा विचार करता कलम २९ (३) खालील शास्ती लावणे संयुक्तिक नाही.
वसुली :-	:-
खात्याअंतर्गत लेखापरिक्षण करण्यात आले का ?	:- नाही.

परिच्छेद क्र.२.५.४.२ महाराष्ट्र मूल्यवर्धीत कर अधिनियम, २००२ (MVAT अधिनियम) अंतर्गत अंतिम केलेल्या प्रकरणांमध्ये निदर्शनास आलेल्या विसंगती व्यवहारांचे चुकीचे वर्गीकरण केल्याबद्दल/व्यवहार दडवल्याबद्दल शास्ती न आकारणे :- या संदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय दिलेले आहेत.

पॉवर इन्व्हर्टरचा घाऊक व्यापारी व वितरक असलेल्या एका व्यापा-याच्या २००७-०८ कालावधीच्या (मार्च २०११ मध्ये पूर्ण केलेल्या) निर्धारण दस्तऐवजांच्या चाचणी तपासणी केली असता (सप्टेंबर, २०११) असे आढळून आले की, निर्धारणा अधिका-याने पॉवर इन्व्हर्टरच्या (अनुसूची नोंद इ-१) रु.७.९९ कोटी विक्रीवर १२.५ टक्के दराने कर आकारला होता व अतिरिक्त रु.६७.८९ लाख कराची अतिरिक्त मागणी केली होती. ज्यावर व्यापा-याने सदर वस्तू UPS व IT उत्पादन (अनुसूची नोंद क्र.५६) असल्याचे गृहित धरुन चार टक्के दराने कर संकलित करुन प्रदान केला होता. तसेच, व्यापा-याने वर्ष २००७-०८ साठी सादर केलेल्या विवरणात न दर्शविलेल्या परंतु MVAT अधिनियमाच्या कलम २२ अंतर्गत करण्यात आलेल्या व्यापार लेखापरीक्षेदरम्यान निर्धारीत केलेल्या रु.२२ लाख विक्रीच्या उलाढालीवर AA नी १२.५ टक्के दराने कर आकारला होता. म्हणजेच AA नी वर्ष २००७-२००८ साठी एकूण रु.७०.६४ लाख (रु.६७.८९ लाख + रु.२.७५ लाख) अतिरिक्त कर आकारला. परंतु मागणी केलेल्या अतिरिक्त कराएवढी रु. ७०.६४ लाख शास्ती AA नी आकारली नव्हती. निर्धारणा प्राधिका-यांनी निर्धारणा आदेशात शास्तीची आकारणी न करण्याविषयीची तरतूद असल्याचे दर्शविणारी कोणतीही नोंद दस्तऐवजात नव्हती.

ऑक्टोबर, २०११ मध्ये हे प्रकरण निदर्शनास आणून दिल्यावर विभागाने लेखापरीक्षा अभिक्षण मान्य केले आणि ऑगस्ट, २०१३ मध्ये वर्ष २००७-२००८ साठी रु.७०.६४ लाख शास्ती आकारली. वसुलीचा अहवाल प्राप्त झालेला नाही.

मार्च २०१४ मध्ये शासनाला ही बाब कळविण्यात आली. त्यांचे उत्तर प्राप्त झालेले नाही. (डिसेंबर, २०१४)

ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात वित्त विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमुद केले आहे.

प्रकरणनिहाय अहवाल सोबत जोडला आहे.

२.५.४.२ आक्षेपाचा मतितार्थ :- व्यवहारांचे चुकीचे वर्गीकरण केल्याबद्दल/ व्यवहार दडवल्याबद्दल शास्ती न आकारणे.

व्यापा-याचे नाव	: मे.सन सिस्टीम
नों.दा.क्र.	: २७१४००१२६७५ व्ही
कालावधी	: २००७-२००८
निर्धारणा दिनांक	: ३१.०३.२०११
अंतर्भुत आक्षेपित रक्कम	: ७०.६४ लाख
वाढीव मागणी	: ७०.६४ लाख
लेखा आक्षेप	: अमान्य
दुरुस्ती कार्यवाही	: व्यापा-याने विक्री केलेल्या पॉवर इन्व्हर्टरसाठी कराचा दर काय असावा यासाठी DDQ दाखल केला होता. सदर DDQ च्या निर्णयानुसार पॉवर इन्व्हर्टरसाठी कराचा दर १२.५% असा ठरविण्यात आला. व्यापा-याने या निर्णयाविरोधात मा. न्यायाधिकरणाकडे अपिल दाखल केले. सदर अपिल आदेशामध्ये पॉवर इन्व्हर्टर हे IT प्रॉडक्ट असून त्यावर कराचा दर ४% आहे असा निर्णय दिला. मा.न्यायधिकरणाचा व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी सदर प्रकरणात दिलेला निर्णय विभागाने मान्य केला आहे. या कायदेशीर परिस्थितीचा विचार करता कलम २९ (३) खालील शास्ती लावणे संयुक्तिक नाही.

वसुली :- :- ————————

खात्याअंतर्गत लेखापरिक्षण करण्यात आले का ? :- नाही.

साक्ष

२.२ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१३-१४ च्या महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्रमांक २.५.३ "सेवा करावर VAT ची आकारणी न करणे" तसेच परिच्छेद क्र. २.५.४ "व्यवहारांचे चुकीचे वर्गीकरण केल्याबाबत/व्यवहार दडविल्याबद्दल शास्ती न आकारणे" यासंदर्भात दिनांक २९ जून २०१६ रोजी समितीने सचिव, वित्त विभाग व विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली.

परिच्छेद क्रमांक २.५.३ "सेवा करावर VAT ची आकारणी न करणे"

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी विदित केले की, सेवा कराचा जो घटक आहे, तो ठोक उलाढालीमध्ये (Gross Turnover) घ्यावयाचा की नाही, हा यामध्ये मुद्दा आहे. यामध्ये एक ॲपेक्स इंजिनियरिंग सर्व्हिस म्हणून केस होती, त्या केसमध्ये निर्धारणा अधिका-यांनी निर्धारणा आदेश पारित केले होते. त्यांचेवर कर आकारला होता. पण संपूर्ण जे अंतिम आदेश होते, त्याच्यामध्ये परतावा होता. ॲपेक्स इंजिनियरिंगमध्ये व तत्सम केसेसमध्ये ज्याच्यामध्ये परतावा असतो, त्यामध्ये शास्ती लावता येत नाही, म्हणून त्यामध्ये शास्ती लावली नव्हती.

कराच्या मूळ रकमेबाबत समितीने विचारणा केली असता सेवा कर गृहित धरुन त्यावर अतिरिक्त कर बसवून तो वसूल केलेला आहे. एलुप्रो बिल्डींगच्या केसमध्ये पारित केलेला आदेश आणि विक्रीकर न्यायाधीकरणापुढे दिनांक २१.१२.२०१५ रोजी सुनावणी झाली आणि त्यांनी यामध्ये अंतिम स्थगिती दिलेली आहे. निखील कंफर्टमध्ये ट्रॅब्यूनलचे आदेश होते, सेवा कर जमा करुन कर घेता येतो. नोव्हेंबर, २०१५ मध्ये एका टेक्नो-क्राफ्ट इंडस्ट्रीजमध्ये एक दुसरा आदेश पारित केलेला आहे. निखिल कंफर्ट कंपनीचे प्रतिनिधी याकरिता उच्च न्यायालयामध्ये गेलेले आहेत. टेक्नो-क्राफ्टमध्ये शासन मा.उच्च न्यायालयात गेलेले असून मा.उच्च न्यायालय याचा निर्णय अंतिमतः एकत्र देईल, त्यावेळी अंतिम निर्णय होईल की, सेवा करावर वॅट घेता येणार नाही. अशा प्रकारे कायदेशीर गुंता सुरु राहणार असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

एलुप्रो बिल्डींग सिस्टममध्येही हीच पध्दत लागू होईल असे समितीने मत मांडले असता विभागीय सचिवांनी असे अवगत केले की, निखिल कंफर्ट कंपनीमध्ये केसचा निकाल शासनाच्या बाजूने लागलेला असून सेवा करावर कर लावलेला आहे तसेच विभागामध्ये या संदर्भातील कर लावणे प्रलंबित आहे.

परीच्छेद क्र. २.५.४ "व्यवहारांचे चुकीचे वर्गीकरण केल्याबाबत/व्यवहार दडविल्याबद्दल शास्ती न आकारणे" मधील २.५.४.१ व २.५.४.२ "महाराष्ट्र मूल्यवर्धीत कर अधिनियम, २००२ (MVAT अधिनियम) अंतर्गत अंतिम केलेल्या प्रकरणांमध्ये निदर्शनास आलेल्या विसंगती व्यवहारांचे चुकीचे वर्गीकरण केल्याबाबत/व्यवहार दडविल्याबद्दल शास्ती न आकारणे"

उपरोक्त मुद्यांबाबत समितीने माहिती विचारली असता विभागीय सचिवांनी असे विशद केले की, उपरोक्त मुद्दे मेसर्स सन सिस्टीमबाबत आहे जो व्यापारी पॉवर इन्व्हर्टर विकतो पॉवर इन्व्हर्टर यु.पी.एस.म्हणून आय.टी.उत्पादन आहे की नाही, तो आय.टी. उत्पादन असला असता तर त्या काळामध्ये त्याच्यावर चार टक्के कर होता आणि जर आयटी उत्पादन नसेल तर हेझिटयूअल एन्ट्री-ई मध्ये त्याला साडे बारा टक्के कर लागेल. याबाबत जर कमिशनरने एक डीडीक्यू पूर्वी दिला होता, त्या डीडीक्यूमध्ये दिले होते की, हे साडे-बारा टक्के कर लागेल, या मेसर्स सन सिस्टीमने डीडीक्यू मागितला होता, त्याच्या विरुध्द डीडीक्यू केला होता. ट्रिब्यूनलने दिनांक २६ फेब्रुवारी, २०१५ रोजी आदेश पारित केला की, याला चार टक्के कर लागणार आहे हा आयटी उत्पादन म्हणून आहे की युपीएस आहे विभाग या संदर्भात उच्च न्यायालयाच्या न्यायाधिकरणाच्या आदेशा विरुध्द गेले होते. नोव्हेंबर २०१५ मध्ये मा.उच्च न्यायालयाने आदेश दिले की, हे जे उत्पादन आहे, ते आयटी उत्पादन आहे, यामुळे यामध्ये चार टक्के कर अधिक लागणार आहे विभागाने तो आदेश स्वीकारलेला आहे. आता शासनाला निर्णय घ्यावा लागेल की, पॉवर इन्व्हर्टरला कोणते उत्पादन समजावे ? तसेच सद्यस्थितीत कराचा दर चार टक्क्यातच असल्याचा खुलासाही विभागीय सचिवांनी केला.

यावर समितीने असे मत मांडले की, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पॉवर इन्व्हर्टर हे आय.टी.सपोर्ट इन्स्ट्रुमेंट आहे. आयटी साधनाचा वापर हा मदतीचा भाग म्हणून वापरला जातो. तसेच इन्व्हर्टरचा व्यवसाय खूप मोठा आहे. राज्याने विचार केला तर या व्यवसायाने वर्षाला कमीत कमी चारशे पाचशे कोटी रुपयांची उलाढाल (Turnover) दिलेली आहे. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, पॉवर इन्व्हर्टर या प्रॉडक्टची वेगळया प्रकारे नोंद करुन त्याला आयटीमधून बाहेर काढून त्यावर जास्तीचे कर लावायचे की नाही हा विषय शासनासमोर प्रस्तावित करुन त्यावर निर्णय होणे आवश्यक आहे.

या अनुषंगाने डीडीक्यू म्हणजे काय आहे ? असा प्रश्न समितीने उपस्थित केला असता विभागाने समितीस अवगत केले की, डिटरमिनेशन ऑफ डिस्प्यूटेड क्वेश्चन्स आणि हे अधिकार आयुक्तांना प्राप्त आहेत.

DDQ व्यापारी लावतात काय अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी विदीत केले की, व्यापा-यांना डीडीक्यू लावण्याबाबत संदिग्धजता होती. महालेखाकारांनी काढलेल्या या प्रकरणामध्ये जी नोंद आहे, ती एकदम सुस्पष्ट नाही.

या अनुषंगाने महालेखाकारांनी सांगितले की, विभागाच्या कार्यपध्दतीबद्दल काही युपीएस आणि इतर साहित्यांच्या पुरवठयाबाबतचा हा विषय पॉवर सप्लाय सपोर्ट इन्स्ट्रुमेंटविषयीचा आहे.

शासनाकडे युपीएस आणि इन्व्हर्टरला वेगळा कर लावण्याची शिफारस करण्यात येणार आहे का आणि जर अशी शिफारस करण्यात येणार असेल तर ती पण केव्हापर्यत करण्यात येणार आहे व ही शिफारस विभागालाच करता येणार आहे का? अशी पृच्छा समितीने केली असता विभागीय सचिवांनी असे सांगितले की, याबाबत स्पष्ट उत्तर सद्यस्थितीत देता येणार नाही. अनुसूचीमध्ये हे सामील केलेले आहे असे वाद झालेले आहेत. त्यामध्ये काही मुद्दे लिगल साईट्समध्ये बसू शकले नसून यामध्ये मोठमोठे व्यवहार झालेले असल्याने त्यावरील कर प्रणाली (Taxation system) ठरविणे आवश्यक आहे.

हे इन्व्हर्टर जेथे संगणक वापरले जाते तेथे वापरले जातात तसेच पॉवर नसेल तेथे ही वापरले जातात. राज्यभरामध्ये शासन पूर्णवेळ विजपुरवठा देऊ शकत नसताना युपीएस आणि इन्व्हर्टरवर कर वाढवून लोकांच्या रोषाला सामोरे जायचे आहे का ? असे समितीने विभागास विचारले असता या विषयावर शासन स्तरावर विचार सुरु असून या इन्व्हर्टर्सचा ग्रामीण भागामध्ये मोठया प्रमाणामध्ये वापर होत असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

सगळीकडे वीज अखंडित राहिली तर याची गरज नसल्याचे मत समितीने व्यक्त केले असता, यास्तव यावर वेगळी नोंद करुन कर लावायचा की नाही यावर चर्चा चालू असल्याची माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

ऑनलाईन ज्या खरेदी होतात, त्यावर शासन कोणता कर लावत असून त्याच्यावर काय प्रतिबंध आहे, संबंधित विक्री करणारे कर भरत आहेत का ? ऑनलाईन जी खरेदी होते . त्या तत्सम कंपनीमध्ये स्वतःचे प्रॉडक्शन लिहिलेले नसते. तरीपण करोडो रुपयांचा व्यवसाय यातून होतो. करोडो रुपयांची ऑनलाईन विक्री होते, संबंधित विक्री करणा-यांवर शासन कर लावते का ? याबाबत समितीने विचारणा केली असता, ऑनलाईन असो किंवा ऑफलाईन असा जो माल आहे, आपल्या राज्यामधील माल विकला गेला असेल तर त्याच्यावर अनुसूचीप्रमाणे कर लागू होतो. त्यामुळे ई-कॉमर्स मधील ॲमॅझॉन साईट असेल किंवा फ्लिपकार्टमध्ये (Flipcart) विकला जाणारा माल राज्यातून गेला आणि राज्यातच सप्लाय झाला तर त्याच्या बिलामध्ये कराचा उल्लेख केलेला असतो. पण ई-कॉमर्समध्ये ज्यावेळी माल बाहेरील राज्यातून येतो, त्यावेळी तो माल थेट ग्राहकांना पुरविण्यात येतो , त्यावेळी बाहेरील राज्यामध्ये विक्री कर त्यावर लावलेला असतो. पण यामुळे बाहेर राज्यामधून येणा-या मालावर कर लावता येत नाही. गेल्या अर्थसंकल्पामध्ये गुजरात, उत्तर प्रदेश आणि कर्नाटक या तीन राज्यांनी ई-कॉमर्समधून प्रवेश कर आणलेला आहे. उत्तर प्रदेशमध्ये काही ठराविक किमतीच्या वर असेल तर कर लागू होणार अशा प्रकारे वेगवेगळया प्रकारे प्रवेश कर लागू करण्यात आलेला असून या प्रवेश कराला आता त्या त्या राज्यांमधील मा.उच्च न्यायालयामध्ये आव्हान दिले गेले असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

महाराष्ट्र राज्यात १८ वस्तूंवर प्रवेश कर लावला जातो आणि हा कर विक्रीकर विभाग गोळा करतो. हा वाद सर्वोच्च न्यायालयात सुरु असून सुनावणी चालू आहे यावरील निर्णय अद्याप प्रलंबित असल्याचेही विभागीय सचिवांनी विदीत केले. विभागीय सचिवांनी पुढे अशी माहिती दिली की, या अर्थसंकल्पामध्ये ई-कॉमर्स कंपन्यांसाठी अशी तरतूद आणली आहे की, अशा कंपन्यांनी विभागाकडे एक यादी द्यावयाची आहे त्यामध्ये त्यांनी महाराष्ट्रात किंवा महाराष्ट्राबाहेर जो माल विकला आहे त्यामध्ये कोणत्या व्यापा-याकडे कोणता माल विकला आहे याबाबतची माहिती घेण्याची तरतूद करीत आहोत. सध्या GST (वस्तू सेवा कर) कायद्याचा ड्राफ्ट पब्लीक डोमेनमध्ये आणला गेला आहे. त्यामध्ये या प्रकरणास वेगळे करण्याचा ड्राफ्ट आणलेला आहे. ई-कॉमर्स साईटवर माल विकला गेला तर कर कलेक्शन ॲट सोर्स म्हणजे टीसीएस म्हणून जीएसटी कायद्यामध्ये अंतर्भाव केलेला आहे. जीएसटी आल्यानंतर आंतरराज्यामध्ये दराचा फरक राहणार नाही. म्हणून दुस-या राज्याचा माल या राज्यात विकला तर फायदा होईल, महाराष्ट्रात मोबाईलवर १२.५ टक्के कर आहे. दक्षिणेकडील कर्नाटक, केरळ, तामिळनाडू, आंध्रप्रदेशमध्ये ५ टक्के कर आहे. यामुळे मोबाईलसारख्या लहान वस्तु खरेदीमध्ये ग्राहकांचा फायदा होतो व परवडतात तसेच याचा वाहतूक खर्च (Transportation cost) जास्त नाही. ई-कॉमर्स ही सनराईज इंडस्ट्री असल्याने मोठया प्रमाणावर रोजगार निर्मिती होत आहे आणि म्हणून अशा इंडस्ट्रीबाबत शासनाला महत्वाचा निर्णय घ्यावा लागणार आहे. म्हणून महाराष्ट्र शासनाने टप्याटप्याने जाण्याचे ठरविले असून शासन याबाबत अगोदर माहिती घेणार आहे व या माहितीचे पृथकरण केल्यानंतर लक्षात येईल की, कशामध्ये करचुकवेगिरी जास्त आहे.

ज्या कंपन्या ऑनलाईन माल विकत आहेत त्या परराज्यातील माल आपल्या राज्यात विकत आहेत. या कंपन्या केंद्र सरकारचा विहित कर तरी भरतात की नाही ? अशी विचारणा समितीने केली असता, त्या राज्यामध्ये तो कर भरला जातो. महाराष्ट्रातून बाहेर माल गेल्यास राज्याला कर मिळतो. असे विभागीय सचिव यांनी समितीस अवगत केले यावर समितीने असे मत व्यक्त केले की, यामध्ये एक सिस्टीम होऊ शकते की, वित्त विभागाने परिपत्रक काढून माहिती दिली पाहिजे की, महाराष्ट्रात ऑनलाईन जेथे कोठे माल विकला जाणार आहे, त्याचा खरेदी कर त्यांनी कोठे भरला आहे. याचा तपशील बिलामध्ये स्पष्ट झाला पाहिजे. समितीच्या उपरोक्त सूचनेच्या अनुषंगाने विभागीय सचिवांनी असे विदित केले की, हा नियम सर्वांनाच लागू आहे कायद्यान्वये कर इनव्हाईस दिले पाहिजे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, यामध्ये केवळ ॲमेझॉन व फ्लिपकार्ट कंपन्या आहेत असे नाही. अशा शेकडो-हजारो साईटस आहेत, त्यावर ऑनलाईन खरेदी होत आहे. त्यामुळे विभागाने याबाबत वेगळा तपास करुन माहिती गोळा केली पाहिजे की, त्यांनी खरेदी कर कोठे भरला आहे. हे स्पष्ट झाले पाहिजे. त्याने हा कर कोठे भरला आहे हे स्पष्ट झाले नाही तर तो महाराष्ट्रामधूनच महाराष्ट्रात माल पाठवेल. विभागाने कंपनीकडे यादी मागवावी की बाहेर कोणता माल पाठविणार आहे. बाहेर माल पाठविण्याबाबत व पुरवठा हा मालाच्या उपलब्धतेवर अवलंबून आहे अशा कंपन्यांचे मोठे गोडावून राज्याच्या सीमेवर आहेत. एका राज्याला माल कमी पडला तर सीमेवरील माल इकडे तिकडे फिरवितात व इकडचे बिल तिकडे पाठवितात त्यांना चोरी करावयाची म्हणून नाही तर त्यांना जोपर्यत विचारणार नाही तोपर्यत हे चालते. विभागाच्या पध्दतीप्रमाणे ही चोरी आहे पण त्यांच्या पध्दतीनेही हे सुरु राहणार आहे असे मत समितीने व्यक्त केले असता याबाबत अधिनियमामध्ये सुधारणा करुन यांच्याकडून माहिती घेण्याची तरतूद केलेली आहे. बजेटमध्ये तरतूद केलेली असल्यामुळे कंपन्याकडून माहिती घेतली जाणार आहे. अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

Many high profile shops do not have computers for billing, they still give hand written Bills. Many a times even the Bill is not given, they just collect the amount and settle the transaction. So, what is the system to ensure that they all file the returns correctly and declare their turn-over correctly? असा आक्षेप महालेखाकारांनी घेतला असता विभागीय सचिवांनी समितीस अशी माहीती दिली की, यावर्षी अर्थसंकल्पीय भाषणामध्ये आपण बिलींग कन्सेप्टबाबत लिहिले आहे त्यावर विभागाला अभ्यास करावयाचा आहे. आता डिजीटल बिलींग कन्सेप्ट आणावयाची आहे. काही देशामध्ये सध्या हे प्रयोग चालू असून एखादी व्यक्ती माल खरेदी करते तेव्हा काही देशामध्ये असे आहे की, क्रेडीट कार्डवरुन पेमेंट केले तर बँकेच्या सर्व्हरवर एंट्री जाते तशाच प्रकारे प्रत्येकाने खरेदी केल्यानंतर ती एंट्री डिपार्टमेंटच्या सर्व्हरवर येईल व डिपार्टमेंटला माहिती होईल की ही खरेदी झालेली आहे. ब्राझीलमध्ये अशी सिस्टीम आहे की, खरेदीदार त्याचा मोबाईल नंबर देतो. दुकानदार हा क्रमांक मोबाईल बिल सिस्टीमध्ये टाकतो, ही पध्दत विक्री कर विभागाच्या सर्व्हरला जोडलेली असते. तेथून पिन कोडचा एक एसएमएस खरेदीदाराच्या मोबाईलवर येतो तो पिन कोड सिस्टीममध्ये टाकल्यानंतर बिल बाहेर पडते असे काही ठिकाणी प्रयोग केले जात आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात डिजीटल बिलाचा कन्सेप्ट अग्रगामी तत्वावर (Pilot Basis) आणायचा प्रयत्न करण्यात येणार आहे. यामध्ये यश आले तर, नवीन ॲटोमेटशनमध्ये विभागाने नवीन बिलींग सॉफ्टवेअरसुध्दा सुरु केलेले आहे. ते बिलींग सॉफ्टवेअर सध्या व्यापा-यांसाठी ऐच्छिक ठेवले आहे कारण सध्या माहिती नाही की ते अंगिकारले जाणार आहे की नाही. जीएसटीमध्येसुध्दा बिलींग सॉफ्टवेअर तयार केले जात आहे. सरकारचे बिलींग सॉफ्टवेअर स्वीकारले गेले व त्याद्वारे व्यवसाय करण्याचा नियम झाला तर कर चोरीला मोठया प्रमाणावर आळा बसू शकेल. निश्चित असा मार्गदर्शक प्रकल्प हाती घेण्याचा प्रयत्न विभाग करणार आहे. Department will take opinion from the I.T. Companies regarding how to handle the issue of digital billing. Then, afterwards we will try to work it out.

Sometimes back you have mentioned about business intelligence. You must be having Survey teams, are they not able to spot these shops which are not giving any type of Hand Bills? What is being done to plug these kind of practices? महालेखाकारांनी असा प्रश्न उपस्थित केला असता विभागीय सचिवांनी समितीस असे अवगत केले की, Survey is a very sensitive concept comprising of human interference. We are sending some people to do the survey, but we do not know whether they are doing their job diligently and ethically. The survey is being done in piece-meal manner. Firstly, they have to collect some data and information. Problem is that the new software has not yet been started. In Delhi, they have started a scheme "बिल पाओ, इनाम लाओ" If the people get Bills, they can come into the system.

काही ठिकाणी देयके संगणकीकृत होतात व काही ठिकाणी संगणकाबरोबर पॅरलल हस्तलिखीत देयके सुध्दा करतात याची तपासणी केली पाहिजे. कारण मोठया आस्थापनामध्ये असे आढळले असल्याचे समितीने सूचित करुन पुढे असे सांगितले की एफडीआयने औषधांच्या दुकानाकरिता डिजीटल बिलींग केलेले आहे. अगोदर औषधांच्या दुकानावर बील दिले जात नव्हते आता ९९% औषधांच्या दुकानात बिले दिली जातात.

यावर विभागीय सचिवांनी उपरोक्त बाब निश्चितपणे तपासण्यात येईल डीजीटल बिलींग निश्चितपणे प्रायोगिक तत्वावर राबविण्याचा विचार करण्यात येत असल्याचे आश्वासीत करुन पुढे अशी माहिती दिली की, त्यामध्येही मोठे प्रश्न आहेत यात गोपनियतेचा मुद्दा आहे. कोणत्या दुकानातून कोणती वस्तु कधी घेतली हा डेटा शासनाकडे आला व त्याचा व्यवस्थित उपयोग झाला नाही तर वेगळा प्रश्न निर्माण होऊ शकतो अशी माहिती समितीस दिली.

केंद्रीय अर्थमंत्री यांनी जाहीर केले आहे की, कोणतीही वस्तु खरेदी केली तर ती बिलिंग करुन घ्यावी लागणार आहे तसेच आयकरमध्ये दाखवावी लागणार आहे अशी विचारणा समितीने केली आणि पुढे असे सुचविले की कोणता माल विकला जातो व कोणता माल खरेदी केला जातो हे ऑनलाईन सिस्टीमध्ये असेल तर ती सिस्टीम सार्वजनिकरित्या आहे ते गुपित राहणार नाही ओपन मार्केटही सार्वजनिक झाले आहे त्यामुळे असा कोणताही कायदा नाही की त्याला लागू होत नसेल . विभागाने कॉल सेंटर सुरु करावी, लोकांना कॉलसेंटरचा नंबर द्यावा. जेणेकरुन दुकानदाराने बील न दिल्यास तशी कॉल सेंटरवर त्याने तक्रार नोंदवावी म्हणजे ४-८ दिवसामध्ये त्या दुकानावर इंस्पेक्टर जाऊन पाहिल त्यामुळे हे सर्व नियंत्रणामध्ये येईल.

ब्रँडेड शॉपमध्ये मोठी खरेदी केली जाते किती रकमेच्या खरेदीवर विभागाकडून पॅन कार्डची मागणी केली जाते असा मुद्दा समितीने उपस्थित करून माहिती विचारली असता विक्रीकराच्या बाबतीत कायद्यामध्ये ही बाब अजून विभागाने अंतर्भूत केलेली नाही असे विभागीय सचिवांनी समितीस विदीत केले.

अभिप्राय व शिफारशी :-

२.३ राज्यात ऑनलाईन किंवा ऑफलाईन अशा दोन्ही प्रकारांनी राज्यातील किंवा इतर राज्यातील माल विकला गेला असेल तर त्यावर अनुसूचीप्रमाणे कर लागू होतो. ई-कॉमर्समधील अॅमॅझॉन, फ्लिपकार्ट अशा साईटसवर राज्यांतर्गत माल विकला तर त्याच्या बिलामध्ये कराचा उल्लेख केला असतो. परंतु राज्याबाहेरून माल आपल्या राज्यात ग्राहकांना थेट पुरविण्यात येतो त्यावेळी बाहेरच्या राज्याने विक्रीकर आकारलेला असतो. महाराष्ट्र राज्यास विक्रीकर मिळत नाही परिणामी ई-कॉमर्समध्ये राज्याबाहेरुन येणा-या मालावर महाराष्ट्र राज्यास कर न मिळाल्याने राज्यास महसूली करापासून वंचित रहावे लागते. विभागाने सदर कार्यपध्दतीबाबत सविस्तर अभ्यास करावा.महाराष्ट्रात ऑनलाईन पध्दतीने इतर राज्यातून माल प्राप्त झाला असेल तर त्याची खरेदी कोठे झाली, कर भरला आहे काय याचा तपशील प्राप्त करावा व महाराष्ट्र राज्यास अपेक्षित महसूल प्राप्त होईल याची दक्षता घ्यावी. केंद्राच्या नवीन GST कायद्यामुळे यात बरीच सुधारणा होण्याची पूर्ण शक्यता आहे. अॅमॅझॉन व फ्लिपकार्ट सारख्या अनेक कंपन्या ग्राहकांच्या खरेदी विक्रीचे व्यवहार करत असतात. सदर कंपन्यांच्या व्यवहारांवर विभागाचे नियंत्रण असणे आवश्यक आहे. यासंदर्भात गुजरात, उत्तरप्रदेश आणि कर्नाटक या राज्यानी ई-कॉमर्स प्रवेश कर पध्दती लागू केलेली आहे. विभागाने सदर कर पध्दतीचा अभ्यास करावा, ज्या खरेदी विक्री व्यवहारामध्ये माल कोठे खरेदी केलेला आहे, कर भरलेला आहे किंवा नाही याची नोंद नसेल तर सदर माल महाराष्ट्रामधूनच महाराष्ट्रात पाठविला असे गृहित धरुन कर आकारणी करावी. विविध कंपन्यांकडून माल खरेदी विक्रीचा तपशील मागविण्यात यावा ज्यामध्ये माल कोठून कोठे पाठविण्यात आला याचीही माहिती प्राप्त होईल. ज्या कंपन्यांचे गोडाऊन राज्याच्या सीमेवर आहे अशा कंपन्यांवर अधिक लक्ष देण्याची आवश्यकता आहे. जेणेकरुन सीमेवरील गोदामातील माल विक्री अथवा खरेदीवर राज्य शासनाचा महसूल बुडणार नाही.

उपरोक्त बाबी विचारात घेऊन कर चुकवेगीरीवर आळा घालण्यासाठी शासनाने तातडीने उपाययोजना करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्यात समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

२.४ व्यापा-यांनी मालाची विक्री करताना विक्री मालापोटी प्राप्त रकमेचे संगणकीकृत देयक ग्राहकांना देणे अपेक्षित असताना ब-याच व्यापा-यांकडून संगणकीकृत देयके दिली जात नाहीत अथवा ती हस्तलिखित स्वरुपात दिली जातात. त्यामुळे सदर व्यवहारांवर शासनास अपेक्षित कर प्राप्त न झाल्यामुळे परिणामी राज्य शासन व केंद्र शासनाचे महसुलाचे नुकसान होते. यासंदर्भात चर्चेअंती समितीने सुचित केले की, विभागाने सर्व खरेदी-विक्री व्यवहारांकरिता संगणकीकृत प्रणाली (Online system) सुरु करावी जेणेकरुन सर्व व्यवहारांची नोंद संगणकीकृत राहील. सदर कार्यपध्दतीबाबत आवश्यक ती प्रसिध्दी देण्यात यावी. ज्या कंपन्यांकडून अशा पध्दतीने देयके दिली जाणार नाहीत त्यांची तक्रार करण्यासाठी विभागाने कॉल सेंटर सुरु करावे. जे व्यापारी बिल देण्यास नाकारतील त्यांची तक्रार सदर कॉल सेंटरवर करणे ग्राहकांना शक्य होईल. कॉल सेंटरवर प्राप्त तक्रारींची तपासणी करण्यासाठी विभागाने तपासणी पथकाची नेमणूक करावी. ब्रँडेड वस्तूंच्या विक्रीकरिता खरेदीदाराचे पॅनकार्ड सक्तीचे करण्यासंदर्भात अथवा तत्सम अन्य उपाययोजना करण्यासाठी कायद्यात आवश्यक ती सुधारणा करण्यात यावी. अशाप्रकारे सर्व खरेदी-विक्रीचे व्यवहार नियंत्रणात राहतील याबाबत विभागाने तातडीने कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.

महसुल (मुद्रांक शुल्क व नोंदणी) विभाग

३.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१३-१४ या वर्षाच्या 'महसुली जमा' अहवालातील परिच्छेद क्रमांक ४.३ "अभिनिर्णय प्रकरणांत मुद्रांक शुल्क आकारणी व वसुली" यावर संपादणूक लेखापरिक्षण परिच्छेद क्र. ४.४.१ "मालमत्तेच्या न्यून मुल्यांकनामुळे मुद्रांक शुल्काची कमी आकारणी", परिच्छेद क्रमांक ४.४.२ "मुद्रांक शुल्काच्या अदायगीपासून अनियमित सूट" यासंदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय दिले आहेत.

अभिनिर्णय प्रकरणांत मुद्रांक शुल्क आकारणी व वसूली यावर संपादणूक लेखापरीक्षण ठळक वैशिष्टे-

- नोंदणी महानिरीक्षक पुणे यांचेकडून मिळविलेल्या माहितीच्या छाननीत असे निदर्शनास आले की रु. ७२६.८० कोटी महसूल अंतर्भूत असलेली १.२४ लाख प्रकरणे ३१ मार्च २०१४ पर्यंत विविध स्तरावर प्रलंबित होती.

(परिच्छेद ४.३.७)

- भाडे बांधकामकिंमत, दलाली इत्यादी घटकांवर विकासकाद्वारे करण्यात आलेली अदायगी चुकिने बंधनकारक मानण्यात आले आणि त्यास विकास कराराकरिता मोबदल्याचा भाग समजून त्यावर ५ टक्क्यांऐवजी ०.२ टक्के दराने मुद्रांक शुल्क आकारण्यात आले. परिणामी ३६ संलेखामध्ये रु. १३.०४ कोटी मुद्रांक शुल्क आणि शास्तीची कमी आकारणी झाली.

(परिच्छेद ४.३.८.१ व ४.३.८.२)

- संलेखात नमूद असले तरी,विकासक आणि जमिनमालक यांच्यातील महसूल भागीदारीवर आधारीत रु. ४२१.७५ कोटी मोबदला मुल्य मुद्रांकशुल्क आकारणाकरिता गृहीत धरण्यात आले नाही त्याऐवजी रु. ६६.८६ कोटी जमिनीच्या बाजारमुल्यावर मुद्रांक शुल्क आकारण्यात आले. परिणामी रु. २१.६९ कोठी मुद्रांक शुल्क आणि शास्तीची कमी आकारणी झाली.

(परिच्छेद ४.३.८.३)

- अतिरिक्त FSI आणि पाणी प्रभार याकरिता विकासकाद्वारे भुगतान करण्यात आलेले एकूण रु.१५.३५ कोटी हप्ता मुद्रांक शुल्क आकारणीकरिता गृहीत धरण्यात आला नाही. ज्यामुळे मुद्रांक जिल्हाधिकारी, कुर्ला येथे रु.७६.७४ लाख् मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली.

(परिच्छेद ४.३.८.४)

- ८३ प्रकरणांमध्ये, बाजारमुल्य ठरविताना भाडेकरुद्वारे व्यापण्यात आलेल्या क्षेत्राचे बांधकाम मुल्य वगळण्यात आले. ज्यामूळे रु. १६.५४ कोटी मुद्रांक शुल्क आणि शास्तिची कमी आकारणी झाली.

(परिच्छेद ४.३.९.१ व ४.३.९.४)

- अभिनिर्णय प्राधिका-यांनी "प्रवर्ग-अ अभ्यर्पित इमारतींना विना-अभ्यर्पित इमारती गृहीत धरुन त्यावर ३/२.५ ऐवजी १.३३ चुकिचे FSI गुण्णोत्तर अवलंबिले. ज्यामुळे सहा " अभिनिर्णय प्रकरणामध्ये शास्तिसह रु. ४.३७ कोटी मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली.

(परिच्छेद ४.३.१०)

- रु.११.२५ कोटी अंतर्भूत असलेल्या १.१५ लाख चौरस फुटाच्या विकासाधिकाराचे हस्तांतरण, मालमत्तेचे बाजारमुल्य ठरविताना गृहीत धरण्यात आले नाही. परिणामी, रु. ५६.२४ लाख मुद्रांक शुल्क आणि रु. ११.२५ लाख शास्तिची कमी आकारणी झाली.

(परिच्छेद क्र.४.३.११)

- एका संयुक्त विकास करारनाम्यास पुढे चालू ठेवण्यासाठी निष्पादीत एका पूरक करारनामा,ज्याद्वारे संयुक्त विकास करारनाम्याच्या स्वरुपात ठळक बदल करण्यात आले. त्यात वसुलीयोग्य रु. २३.८९ लाख मुद्रांक शुल्क आकारण्यात आले नाही. परिणामी, तेवढया महसूलाची कमी वसुली झाली.

(परिच्छेद ४.३.१२)

- कंपनी मालकाद्वारे प्राप्त रु. २०० कोटी रक्कम विकास करारनाम्यासाठी मोबदल्याऐवजी चुकीने असुरक्षित कर्ज/ बंधन इत्यादी म्हणून गृहीत धरण्यात आली. एकूण् मोबदला रु. २३५.६७ कोटी काढण्यात आले. विभागाने मोबदला मूल्य रु.९७.६२ कोटी यावर रु. ५.४६ कोटी मुद्रांक शुल्क आकारले. परिणामी रु. ६.३२ कोटी मुद्रांक शुल्क आकारणी होईल एवढे रु १३८.०५ कोटीचे न्यून मुल्यांकन झाले.

(परिच्छेद क्र.४.३.१३.१)

- तीन प्रकरणामध्ये विकासकरार आणि भाडेकराराचे बांधा, वापरा आणि हस्तांतरीत करा (BOT) असे चुकिचे वर्गीकरण करण्यात आले आणि मुद्रांक शुल्क कमी दराने आकारण्यात आले. संलेखाच्या अशा चुकिच्या वर्गीकरणामूळे तीन प्रकरणांमध्ये रु. ४.८१ कोटी मुद्रांक शुल्क कमी आकारणी झाली.

(परिच्छेद ४.३.१३.२)

- ASR मध्ये नमूद सूचनांचे समानतेने पालन झाले नाही. मालमत्तेचे बाजारमुल्य ठरविताना संलेखात नमूद FSI काही प्रकरणामध्ये गृहीत धरण्यात आले परंतु काही प्रकरणांमध्ये ते गृहीत धरण्यात आले नाही. परिणामी, जिथे दस्ताऐवजामध्ये नमूद FSI गृहीत धरण्यात आला नाही अशा ११ प्रकरणामध्ये मालमत्तेचे न्यून मुल्यांकन करण्यात आले ज्यात रु. २.३० कोटी मुद्रांक शुल्क अंतर्भूत आहे.

(परिच्छेद क्र. ४.३.१४)

- नोंदणी महानिरीक्षक (IGR) आंतरिक लेखापरिक्षण शाखाद्वारे करण्यात येणा-या लेखापरीक्षणात तूट होती. मुद्रांक जिल्हाधिकारी यांच्या लेखापरिक्षेसाठी नोंदणी महानिरीक्षकांनी विशिष्ट लक्ष्य निश्चीत केले नव्हते. याशिवाय, अतिरिक्त मुद्रांक नियंत्रक,मुंबई यांचेद्वारे त्यांच्या अधिपत्याखालील मुद्रांक जिल्हाधिकारी, जरी हे मोठया प्रमाणात महसूल वसुली करतात, तरी यांचे लेखापरीक्षण करण्यात आले नाही.

(परिच्छेद क्र. ४.३.१७)

यावर विभागाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

या परीच्छेदात प्रकरणांची ठळक वैशिष्टे नमुद आहेत. प्रकरणनिहाय अभिप्राय स्वतंत्ररीत्या सादर केलेले आहेत.

प्रस्तावना

मुद्रांक शुल्क व नोंदणी फी हा राज्याचा दुस-या क्रमांकावरील मोठया प्रमाणाचा कर महसूल आहे. मुद्रांक शुल्काची आकारणी व वसुली महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ व भारतीय मुद्रांक अधिनियम, १८९९ अनुसार, राज्यास जसे लागू होईल तसे, शासित करण्यात येते. अधिनियमांतर्गत निष्पादीत संलेखांवर आकारणीयोग्य मुद्रांक शुल्क दर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या अनुसूची-१ मध्ये नमूद केले आहेत.

नोंदणीकृत करावयाचे संलेख संबंधित दुय्यम निबंधक यांचेपुढे मांडण्यात येतात. महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम ३२A अंतर्गत, कुठल्याही दुय्यम निबंधकाकडे अभिनिर्णयासाठी संलेख आल्यास त्यातील स्थावर मालमत्तेचे बाजारमुल्य हे त्यामध्ये सत्यपणाने देण्यात आलेले नाही असे त्यास सकारण वाटेल तर, तो मालमत्तेचे वास्तव बाजारमूल्य निर्धारण करण्याच्या प्रयोजनार्थ, संलेख् मुद्रांक जिल्हाधिका-याकडे पाठवेल. एखादे दस्तऐवज अपूरे अथवा चुकीचे मुद्रांकित झाले आहे असे जर वाटत असेत तर प्रत्येक नोंदणी प्राधिका-यास कलम ३३ अंतर्गत असे अधिकार आहेत की तो/ती, त्या दस्तऐवजास अवरुद्ध करू शकतो आणि त्याचे वास्तव बाजारमुल्य निर्धारित करण्यासाठी मुद्रांक जिल्हाधिका-यांकडे पाठवू शकतो.

कलम ३९ मुद्रांक जिल्हाधिका-यास अवरुध्द संलेखावर आकारणयोग्य शुल्क, जर असेल तर, निर्धारीत करावयाची शक्ती प्रदान करतो. कलम ५३ मुख्य नियंत्रक महसूल प्राधिका-यास (CCRA), एखाद्या व्यक्तीने त्यांच्या निदर्शनास आणले असता, त्या प्रकरणांत मुद्रांक जिल्हाधिका-याने निर्धारीत केलेले शुल्क पुनःनिर्धारीत करावयाची शक्ती प्रदान करतो. मालमत्तेचे बाजारमुल्य मुंबई मुद्रांक (मालमत्तेचे वास्तव बाजारमूल्य निर्धारण)नियम,१९९५ आणि वार्षिक मुल्यदर तक्ता (ASR) यातील तरतुदीनुसार निर्धारीत करण्यात येते. याखेरीज महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम ९ प्रमाणे काही ठराविक संलेखावर आकारणीयोग्य मुद्रांक शुल्क कमी अथवा माफ करण्याचे अधिकार महाराष्ट्र शासनास आहे. महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम ३१ प्रमाणे, जेव्हा एखादा संलेख, मग तो निष्पादित करून दिलेला असो किंवा नसो, त्या संलेखांच्या पक्षकाराद्वारे जिल्हाधिका-याकडे आणला जाईल, अशी व्यक्ती त्या संलेखावर आकारणीयोग्य असलेल्या शुल्काबाबत त्या अधिका-याचे मत घेण्यासाठी अर्ज करील आणि रु. १०० इतके शुल्क देईल, त्याबाबतीत मुद्रांक जिल्हाधिकारी त्यांच्या निर्णयशक्तीनुसार त्या संलेखावर आकारणीयोग्य शुल्क निर्धारीत करील. जर अभिनिर्णित संलेखावरील मुद्रांक शुल्क मागणीपत्रक जारी करण्याच्या तारखेपासून साठ दिवसाच्या आत भरणा केले असेल तर जिल्हाधिकारी, कलम ३२ अंतर्गत अशा संलेखावर पृष्ठांकनाद्वारे संपूर्ण शुल्क अदा केली आहे असे प्रमाणित करेल. मुद्रांक जिल्हाधिकारी अनुसूचीचा संबंधित अनुच्छेद नमूद करून संलेखावरील आकारणी योग्य रक्कम नमूद करेल. मुद्रांक शुल्क निर्धारणाच्या या प्रकियेस " मुद्रांकाबाबत अभिनिर्णिय " असे म्हणतात आणि ते महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या प्रकरण III मध्ये विस्तृतपणे मांडले आहे.

यावर विभागाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

कायद्यातील तरतूदीची सविस्तर माहीती प्रस्तावनेमध्ये नमुद केलेली आहे. सबब अभिप्राय नाहीत.

४.३.२ अभिनिर्णय प्रकरणांतून झालेली वसूली

अभिनिर्णय प्रकरणांवर आकारण्यात आलेल्या मुद्रांक शुल्कातून झालेली २००९-१४ या कालावधीतील राज्यातील महसूल वसूली तक्ता ४.३.२ मध्ये दर्शविल्याप्रमाणे आहे.

(रुपये कोटी मध्ये)

वर्ष	अभिनिर्णीत प्रकरणांची संख्या V/S ३१, ३२ व ३३	अभिनिर्णीत संलेखावर वसूल झालेले मुद्रांक शुल्क	वाढ/घसरणाची टक्केवारी	
			मागील वर्षाच्या तुलनेत प्रकरणे	मागील वर्षाच्या तुलनेत मुद्रांक शुल्क
(१)	(२)	(३)	(४)	(५)
२००९-१०	९,५९४	१२१.०९		
२०१०-११	८५,२१८	१५६०.३२	७८८.२४	१,१८८.५६
२०११-१२	५८,९५३	१२४७.५५	(-) ३०.८२	(-) २०.०५
२०१२-१३	३३,३७६	९४५.७१	(-) ४३.३९	(-) २४.१९
२०१३-१४	२७,२१३	६७२.२०	(-) १८.४७	(-) २८.९२
एकूण	२,१४,३५४	४५४६.८७		

स्त्रोतः IGR कार्यालयाने सादर केलेली माहिती

वरील माहितीवरुन असे दिसून येते की २००९-१० च्या तुलनेत वर्ष २०१०-११ मध्ये अभिनिर्णीत प्रकरणांची संख्या आणि त्यात वसूल केलेले मुद्रांक शुल्क यात अनुक्रमे ७८८.२४ टक्के व १,१८८.५६ टक्के यांनी वाढ झाली.तथापी वर्ष २०११-१२ पासून अभिनिर्णय प्रकरणांची संख्या आणि त्यासोबतच मुद्रांक शुल्क यांत क्रमशः घसरण झाली.

निर्गमन परिषदेत (सप्टेंबर-२०१४) विभागाने नमूद केले की २०१२ पूर्वी ब-याच प्रकारचे करारनामे नोंदणी करावयाच्या आधी अभिनिर्णीत करणे अनिवार्य होते.ज्यामुळे मुद्रांक शुल्क वसूली मध्ये विलंब झाला आणि लोकांची गैरसोय झाली.२०१२ नंतर ही बंधने मागे घेण्यात आली.ज्यामुळे या संलेखाची थेट नोंदणी करण्यात आली.परिणामी, अभिनिर्णय प्रकरणांची संख्या कमी झाली.तथापी, प्रधान सचिवांनी नमूद केले की आकडेवारी पुनः तपासण्यात येईल व यांची पृष्टी लेखापरीक्षेस देण्यात येईल.

यावर विभागाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

आक्षेपात नमुद केल्याप्रमाणे सन २०१०-२०११ नंतर दाखल प्रकरणामध्ये घसरण झाली आहे ही वस्तुस्थिती आहे. याचे कारण असे की, सन २०१२ पूर्वी एमआयडीसी यांचेकडील होणारे भाडेकराराचे दस्त अभीनीर्णीत केल्याखेरीज नोंदणीस स्वीकारु नये असे बंधन घ्यालण्यात आले होते.मिळकतीचे खरे बाजार मुल्य नियम १९९५ मधील नियम ४ (६) नुसार शासनाने किंवा निमशासकीय संस्थांनी किंवा शासकीय उपक्रमाने किंवा स्थानिक प्राधिकरणाने मिळकतीचे मुल्यनिर्धारीत केलेले असेल तेच मुल्य खरे बाजार मुल्य ग्राहय धरता येईल अशी तरतुद आहे. ही बाब विचारात घेवून एमआयडीसी यांचे कडील भाडेपट्टा कराराचे दस्त अभिनिर्णीत करण्याची अट दि. ८ मे २०१२ रोजीचे परीपत्रकान्वये शिथील करण्यात आली. त्यामुळे अशा दस्तांची नोंदणी थेट दुय्यम निबंधक कार्यालयात होऊ लागली त्यामुळे अभिनिर्णयासाठी दाखल प्रकरणांमध्ये घट झाल्याचे दिसून येते. ही आकडेवारी संबधीत मुद्रांक जिल्हाधिकारी यांचे अभिलेखाशी पडताळणी करुन खात्री करण्यात आलेली आहे.

प्रकरणाची सद्यस्थिती खालील तक्त्यात नमुद केलेली आहे.

(रु.कोटी मध्ये)

मार्च १५ अखेरची शील्लक		मार्च १६ अखेर प्राप्त		मार्च १६ अखेर निकाली		मार्च १६ अखेर शील्लक	
संख्या (१)	रक्कम (२)	संख्या (३)	रक्कम (४)	संख्या (५)	रक्कम (६)	संख्या (७)	रक्कम (८)
१७८९	६४.००	१२४९६	८७८.३१	१३०१६	८५७.१२	१२६९	९२.२३

४.३.३ लेखा परीक्षेची व्याप्ती आणि कार्यपध्दती

जानेवारी २००९ ते डिसेंबर २०१३ दरम्यान विभागाने अंतिम केलेल्या अभिनिर्णय प्रकरणांचे जानेवारी २०१४ ते जुलै २०१४ दरम्यान संपादणूक लेखापरीक्षण करण्यात आले.या संपादणूक लेखापरीक्षणासाठी मुंबई विभागातील मुद्रांक जिल्हाधिकारी,कोकण विभागातील तीन मुद्रांक जिल्हाधिकारी,पुणे विभागातील दोन मुद्रांक जिल्हाधिकारी आणि नागपुर विभागातील दोन मुद्रांक जिल्हाधिकारी यांच्या अभिलेखांची निवड करण्यात आली.

विभागाने दिलेल्या माहितीनुसार (कॅलेंडर वर्ष निहाय) डिसेंबर २०१३ अखेर,रु.३,८७४.६७ कोटी रक्कम अंतर्भूत असलेली एकूण १,८७,१४१ प्रकरणे २००९ ते २०१३ या कालावधीत अभिनिर्णीत करण्यात आली होती. यापैकी रु.३,६३३.२७ कोटी अंतर्भूत असलेल्या पाच विभागातील अभिनिर्णय १,०४,२२० अभिनिर्णय प्रकरणे जी २००९ ते २०१३ या कालावधीत अंतिम करण्यात आली होती.त्यांचे आम्ही संपादणूक लेखापरीक्षण केले. संपादणूक लेखापरीक्षेसाठी निवडलेल्या पाच विभागातील अभिनिर्णय प्रकरणांची संख्या आणि अंतर्भूत रक्कम दर्शविणारे विवरण तक्ता ४.३.३ मध्ये मांडले आहे.

तक्ता क्रमांक ४.३.३ (रुपये कोटीमध्ये)

विभाग	एकूण घटक	एकूण प्रकरणे	अंतर्भूत महसूल	निवडलेले एकूण घटक	निवडलेल्या घटकातील प्रकरणे	निवडलेल्या घटकातील महसूल
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
मुंबई	७	६५,४९२	२८०९.४६	७	६५,४९२	२८०९.४६
कोकण	५	२३,८६१	६८५.८२	३	२०,९६४	६७३.८६
पुणे	६	१९,८८८	११३.३५	२	११,८५९	९१.०९
नागपुर	६	७,८६२	६७.६७	२	५,९०५	५८.८६
एकूण	२४	१,१७,१०३	३,६७६.३०	१४	१,०४,२२०	३,६३३.२७

अशा प्रकारे,प्रकरणांच्या संख्येच्या ५६ टक्के आणि वसूलीच्या रक्कमेच्या ९४ टक्के अशी लेखापरीक्षेची व्याप्ती होती.

संपादणूक लेखापरीक्षण करावयाची कारणे : व्यवहारांच्या लेखापरीक्षेत आम्हाला असे आढळले की एकाच/वेगवेगळया अभिनिर्णय प्राधीका-यांनी म्हणजेच मुद्रांक जिल्हाधिका-यांनी अवंलबविलेल्या सारख्याच प्रकारच्या संलेखाच्या अभिनिर्णय प्रक्रीयेत एकरुपता नव्हती.दस्तावेज अभिनिर्णीत करतेवेळी त्यांचे चुकीचे वर्गीकरण झालेले असल्याचे निदर्शनास आले.निरीक्षण प्रतिवेदनाव्दारे याचे नियतकालीन प्रतिवृत्त देण्यात आले होते. संलेखाची संख्या आणि रक्कम लक्षात घेता या विषयावर संपादणूक लेखापरीक्षण करावयाचे ठरविणयात आले.

ज्ञापन

या परीच्छेदात लेखा परीक्षेची व्याप्ती आणि कार्यपध्दती विषद आहे सबब अभिप्राय नाहीत.

४.३.४ लेखा परीक्षा उद्दीष्टे-

पुढील बाबींची खातरजमा करण्यासाठी लेखापरीक्षण करण्यात आलेः

शासनाव्दारे समुचित नियम व पध्दती विहीत करण्यात आली होती. आणि ते सर्व अभिनिर्णय प्रकरणांत एकसारखे लागू करण्यात आले.

संलेखाचे वर्गीकरण आणि बाजारमुल्य निर्धारण, अधिनियम व त्यातील नियमांतर्गत असलेल्या तरतुदीनूसार केले जाते.

अभिनिर्णय प्रकरणांचे समयोचित निकाली काढण्यासाठी कार्यक्षम आणि प्रभावी आंतरिक नियंत्रण होते.

ज्ञापन

या परीच्छेदात लेखा परीक्षेची उददीष्टे विषद कलेली आहे सबब अभिप्राय नाहीत.

४.३.५ लेखा परीक्षा कसोटी-

संपादणूक लेखापरीक्षेसाठी लेखापरीक्षा कसोटी पुढील केंद्रींय आणि राज्य कायदे अंतर्गत असलेल्या तरतूदीतून घेण्यात आलेल्या आहेत.

केंद्रीय कायदेः

भारतीय मुद्रांक अधिनियम १८९९

भारतीय नोंदणी अधिनियम १९०८

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम १९५८

मुंबई मुद्रांक (मालमत्तेच्या वास्तव बाजारमुल्याचे निर्धारण) नियम,१९९५

बृहन्मुंबई करीता विकास नियंत्रण विनियम,१९९१ (DCR)

मालमत्तेचे हस्तांतरण अधिनियम,१८८२

महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम,१९९९

महाराष्ट्र झोपडपट्टी वस्ती क्षेत्र (सुधारणा,समाशोधन आणि पुनर्विकास) अधिनियम,१९७१

महाराष्ट्र गृह निर्माण क्षेत्र विकास यंत्रणा अधिनियम,१९७६ (MHADA Act)

संबधित वर्षासाठी वार्षीक मुल्यदर तक्ता (ASR)

महाराष्ट्र शासन,नोंदणी महानिरीक्षक आणि मुद्रांक नियंत्रक,पुणे यांचे व्दारे वेळोवेळी निर्गमित अधिसुचना/निर्णय/ परिपत्रक.

ज्ञापन

या परीच्छेदात लेखा परीक्षेची कसोटी विषद कलेली आहे सबब अभिप्राय नाहीत.

४.३.६ अभिस्विकृती-

संपादणूक लेखापरीक्षणास प्रारंभ करण्याआधी नोंदणी महानिरीक्षक यांचेशी लेखापरीक्षेची व्याप्ती,कार्यपध्दती आणि उददीष्टे चर्चिले होते.प्रारुप संपादणूक प्रतिवेदन ऑगस्ट २०१४ मध्ये शासनास पाठवण्यात आले होते.सप्टेंबर-२०१४ मध्ये विभाग आणि शासन यांचेसोबत निर्गमन परिषद घेण्यात आली.प्रधान सचिव (मदत व पुर्नवसन)यांनी शासनाच्या बाजूने प्रतिनिधीत्व केले. निर्गमन परिषदेत शासनाने दिलेले आणि इतर कुठल्याही वेळी दिलेले उत्तर संबधित परिच्छेदांत समाविष्ट करण्यात आले आहे.

आम्ही मुद्रांक व नोंदणी विभागाने आवश्यक माहिती व दस्तावेज लेखापरीक्षेस पुरवण्यात केलेल्या सहाय्याची अभिस्वीकृती देत आहोत.

ज्ञापन

या परीच्छेदात लेखा परीक्षेची अभिस्विकृती विषद कलेली आहे सबब अभिप्राय नाहीत.

४.३.७ लेखापरीक्षा निरीक्षण-

संपादणूक लेखापरीक्षणात आम्हाला यंत्रणेत व अनुपालनात अनेक त्रुटी आढळल्या.त्यापैकी काही पुढील परिच्छेदात मांडल्या आहेत.

प्रकरणे निकाली काढण्यात झालेल्या विलंबामुळे महसूल अडवणूक –

नोंदणी महानिरीक्षक यांच्या कार्यालयातील माहितीच्या तपासणीत असे आढळले की ३१ मार्च २०१४ ला रु. ७२६.८० कोटी रक्कम अंतर्भुत असलेली १, २४, ३२५ प्रकरणे निरनिराळया स्तरांवर तक्ता ४.३.७.१ ते ४.३.७.४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे प्रलंबित होती.

ज्ञापन

प्रकरणाची सविस्तर माहीती पुढील परिच्छेदात नमूद आहे.

४.३.७.१

दुय्यम निबंधकाने मुद्रांक जिल्हाधिका-याकडे पाठविलेली अभिनिर्णय प्रकरणे-

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम ३२A मध्ये असे विनिर्दिष्ट आहे की नोंदणी करीता संलेख प्राप्त झालेल्या कोणत्याही नोदणी अधिका-यास संलेखाची विषयवस्तू असणा-या स्थावर मालमत्तेचे वास्तव बाजारमुल्य त्यामध्ये सत्यपणाने दिलेले

नाही.असे सकारण वाटत असेल तर असा अधिकारी,अशा मालमत्तेचे वास्तव बाजारमुल्य निर्धारीत करण्यासाठी तो संलेख मुद्रांक जिल्हाधिका-याकडे विनिर्दिष्ट करील. विभागाने दिलेल्या माहितीनुसार दुय्यम निबंधकाने मुद्रांक जिल्हाधिका-याकडे पाठविलेली रु.१२९.७६ कोटी मुद्रांक शुल्क अंतर्भूत असलेली १.१४ लाख अभिनिर्णय प्रकरणे तक्ता ४.३.७.१ मध्ये दर्शविल्यानुसार ३१ मार्च २०१४ ला प्रलंबित होती.

तक्ता क्रमांक ४.३.७.१ (रुपये कोटीमध्ये)

वर्ष	सुरुवातीची शिल्लक		प्राप्ति		उरक		अखेरची शिल्लक		टक्केवारी	
	प्रकरणे	रक्कम	प्रकरणे	रक्कम	प्रकरणे	रक्कम	प्रकरणे	रक्कम	(८) ते (२) + कॉलम (४)	(९) ते (३) + कॉलम (५)
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)	(११)
०९-१०	५१,०५६	३४.१३	४२	०.०७	३,५३१	०.०९	४७,५६७	३४.११	९३.०९	९९.७४
१०-११	१,५१,८०१	२०५.१६	३१४	०.३१	२२,३०४	५०.२६	१,२९,८११	१५५.२१	८५.३४	७५.५४
११-१२	१,२४,४०१	१५५.०७	२,०७१	१.२३	८,६५६	१२.९८	१,१७,८१६	१४३.३२	९३.१६	९१.७०
१२-१३	१,१७,८१६	१४३.२२	६८८	२.३९	२,४१६	९.१४	१,१६,०८८	१३६.४७	९७.९६	९३.७२
१३-१४	१,४५,०१५	२०२.३८	१,००१	३.५९	३१,७५७	७६.२१	१,१४,२५९	१२९.७६	७८.२५	६३.००

स्त्रोतः-नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाकडून मिळालेली आकडेवारी

प्रकरणे निकाली काढण्यात झालेला विलंब ७८.२५ ते ९७.९६ टक्के दरम्यान होता आणि या प्रलंबित प्रकरणात अंतर्भूत असलेल्या राशींची टक्केवारी ६३ ते ९९.७४ टक्के दरम्यान होती.

ज्ञापन

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसुल विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :-

एखाद्या दस्तऐवजातील मिळकतीचे बाजारमुल्य कमी नमुद करुन दस्त नोंदणी केली असल्यास अशी प्रकरणे निदर्शनास आल्यानंतर ही प्रकरणे महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम कलम ३२ अ मधील तरतुदीनुसार अवरुध्द करुन वसुली करीता संबधीत मुद्रांक जिल्हाधिकारी यांचेकडे पाठवण्यात येतात. अशी प्राप्त प्रकरणे त्या वर्षाच्या अहवालामध्ये नमुद करुन वसुलीची कार्यवाही करण्यात येते ज्या प्रकरणत वसुली पुर्ण होते अशी प्रकरणे अहवालातुन कमी करण्यात येतात. आणि जी प्रकरणे त्या आर्थिक वर्षामध्ये वसुलीसाठी प्रलंबित राहतात. अशी प्रकरणे पुढील वर्षाच्या अहवालामध्ये वसुलीसाठी घेण्यात येतात तसेच नव्याने दाखल होणारी प्रकरणे, अशा सर्व प्रकरणात कायद्यातील तरतुदीनुसार वसुली करण्यात येते ही प्रक्रीया नियमीतीपणे सुरु असते.

तपासणी पथकाने सदरचा परीच्छेद त्या त्या वर्षाच्या आर्थीक वर्षातील ३१ मार्चच्या अखेरच्या विरणपत्रावरुन घेतलेला आहे. म्हणून त्या त्या वर्षातील थकीत प्रकरणाची आकडेवारी सविस्तर नमुद केलेली आहे. वास्तविक पहाता मागील आर्थिक वर्षात वसुलीवर शिल्लक असलेले प्रकरणे ही पुढील आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस (सुरवातीची शिल्लक) नमुद करुन त्यामध्ये त्यावर्षात नव्याने दाखल होणा-या प्रकरणांचा समावेश करुन एकुण प्रकरणे वसुलीसाठी घेण्यात येतात. त्यामुळे आक्षेपाप्रमाणे मागील वर्षाची सविस्तर आकडेवारी वर्ष निहाय नमुद करणे शक्य नाही.

प्रकरणाची सद्य स्थिती खालील तक्त्यात नमुद केलेली आहे.

(रु.कोटी मध्ये)

मार्च १५ अखेरची . शील्लक		मार्च १६ अखेर प्राप्त		मार्च १६ अखेर निकाली		मार्च १६ अखेर शील्लक	
(१) संख्या	(२) रक्कम	(३) संख्या	(४) रक्कम	(५) संख्या	(६) रक्कम	(७) संख्या	(८) रक्कम
८८१९४	७७.०२	९९५	२.५७	७६३९	१४.३६	८१५५०	६५.२६

४.३.७.२ विभागाने अवरुध्द केलेली प्रकरणे-

कलम ३३ नोंदणीकृत अथवा विना नोंदणीकृत असे दोनही, यथोचितपणे मुद्रांकित न केलेले संलेख अवरुध्द करण्याबाबत आहे.मुद्रांक जिल्हाधिका-यास अवरुध्द केलेल्या संलेखावर आकारणीयोग्य मुद्रांक शुल्क, जर लागू असेल तर,निर्धारण करण्याचे अधिकार आहेत.

विभागाने दिलेल्या माहितीनुसार रु.७७.२४ कोटी मुद्रांक शुल्क अंतर्भूत असलेली ७,१२५ अभिनिर्णयासाठी आणलेली अवरुध्द प्रकरणे तक्ता क्रं.४.३.७.२ मध्ये दर्शविल्यानुसार ३१ मार्च २०१४ ला प्रलंबित होती.

तक्ता क्रं.४.३.७.२ (रु.कोटीमध्ये)

वर्ष	सुरुवातीची शिल्लक		प्राप्ति		उरक		अखेरची शिल्लक		टक्केवारी	
	प्रकरणे	रक्कम	प्रकरणे	रक्कम	प्रकरणे	रक्कम	प्रकरणे	रक्कम	(८) ते (२) + कॉलम (४)	(९) ते (३) + कॉलम (५)
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)	(११)
०९-१०	१४,७५९	७४.८७	१,४२९	९.९७	२,५५८	१०.७७	१३,६३०	७४.०७	८४.२०	८७.३१
१०-११	१३,६१५	७३.६६	२१,४७५	४८३.२६	२३,६६४	४९०.२१	११,४२६	६६.७१	३२.५६	११.९८
११-१२	१०,९९३	५७.१२	२३,९६१	२९६.५८	२४,३१६	३०७.५८	१०,६३८	४६.१२	३०.४३	१३.०४
१२-१३	९,५२८	४६.०२	१४,०९४	१२१.५३	१५,२९६	१४४.४९	८,३२६	२३.०६	३५.२५	१३.७६
१३-१४	७,१७०	४९.४१	११,२३५	११२.३३	११,२८०	८४.५०	७,१२५	७७.२४	३८.७१	४७.७६

स्त्रोतः-नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाकडून मिळालेली आकडेवारी

प्रकरणे निकाली काढण्यात झालेला विलंब ३०.४३ टक्के ते ८४.२० दरम्यान आणि या प्रलंबित प्रकरणात अंतर्भूत असलेल्या राशींची टक्केवारी ११.९८ टक्के ते ८७.३१ टक्के दरम्यान होती.

ज्ञापन

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसुल विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :-

एखाद्या दस्तऐवजातील मिळकतीचे बाजारमुल्य कमी नमुद करुन दस्त नोंदणी केली असल्यास अशी प्ररकणे तपासणीत निदर्शनास आल्यानंतर ही प्रकरणे महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम कलम ३३ व ३३अ मधील तरतुदीनुसार अवरुध्द करुन वसुली करीता संबधीत मुद्रांक जिल्हाधिकारी यांचेकडे पाठवण्यात येतात. अशी प्राप्त प्रकरणे त्या वर्षाच्या नोंदवहीमध्ये नमुद करुन अशा प्रकरणात वसुलीची कार्यवाही करुन वसुली पुर्ण झालेली प्रकरणे वगळून अहवाल पाठविण्यात येतो आणि जी प्रकरणे त्या आर्थिक वर्षामध्ये वसुलीसाठी प्रलंबित राहतात. अशी प्रकरणे पुढील वर्षाच्या अहवालामध्ये वसुलीसाठी घेण्यात येतात व त्यावर कायद्यातील तरतुदीनुसार वसुली करण्यात येते ही प्रक्रीया नियमितपणे सुरु असते.

सदरचा परीच्छेद त्या त्या वर्षाच्या आर्थीक वर्षातील ३१ मार्चच्या अखेरच्या विरणपत्रावरुन घेण्यात आलेला आहे. म्हणून त्या त्या वर्षाची प्रकरणाची आकडेवारी सविस्तर नमुद केलेली आहे वास्तविक पहाता मागील आर्थीक वर्षात वसुलीवर शिल्लक असलेले प्रकरणे ही पुढील आर्थीक वर्षाच्या सुरवातीस (सुरवातीची शिल्लक) नमुद करुन त्यामध्ये त्यावर्षात नव्याने दाखल होणा-या प्रकरणांचा समावेश करुन एकुण प्रकरणे वसुलीसाठी घेण्यात येतात त्यामुळे आक्षेपाप्रमाणे मागील वर्षाची सविस्तर आकडेवारी वर्ष निहाय नमुद करण्यात येत नाही. त्यामुळे अशी आकडेवारी उपलब्ध नाही.

प्रकरणाची सद्यःस्थिती खालील तक्त्यात दिली आहे.

(रु.कोटी मध्ये)

मार्च १५ अखेरची . शील्लक		मार्च १६ अखेर प्राप्त		मार्च १६ अखेर निकाली		मार्च १६ अखेर शील्लक	
(१) संख्या	(२) रक्कम	(३) संख्या	(४) रक्कम	(५) संख्या	(६) रक्कम	(७) संख्या	(८) रक्कम
५५८०	४७.८९	५५०८	४२.२६	५२७६	४४.१८	५८१२	४५.९७

यातील प्रकरणे म्हाडा, सीडको यांचे कडील अलॉटमेंट लेटर, मनपा यांचे कडील टिडीआर,विकसन करार व कार्यकंत्राट इ. प्रकरणाचा समावेश आहे. या प्रकरणावर यथोचीत मुद्रांक शुल्क वसुल करण्यासाठी मुद्रांक कायदयात कलम १० (ड) नव्याने समाविष्ट करुन शासनाचे सर्व विभाग, स्थानीक स्वराज्य संस्था, निमशासकीय संघटना व बँक व्यवसायी (खाजगी, सहकारी व इतर वित्तीय संस्था) यांचेवर मुद्रांक शुल्क वसुल करण्याची जबाबदारी टाकण्यात आलेली आहे.

४.३.७.३

मुद्रांक जिल्हाधिकारी यांचेकडे अभिनिर्णयासाठी आणलेली प्रकरणे-

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम ३१ मध्ये विहित आहे की जेव्हा एखादा संलेख निष्पादित करुन दिलेला असो किंवा नसो,त्या संलेखाच्या पक्षकारांपैकी एका पक्षकाराकडून मुद्रांक जिल्हाधिकारी यांचेकडे आणला जाईल आणि अशी व्यक्ती त्या संलेखावर आकारणीयोग्य असलेल्या शुल्काबाबत त्या अधिका-याचे मत घेण्यासाठी अर्ज करील आणि शंभर रुपये इतके शुल्क देईल त्याबाबतीत मुद्रांक जिल्हाधिकारी, त्या संलेखावर आकारणीयोग्य असलेले शुल्क निर्धारित करील आणि मागणी पत्रक निर्गमित करील.

विभागाने दिलेल्या माहितीनुसार मुद्रांक जिल्हाधिकारी यांचेकडे अभिनिर्णयासाठी आणलेली प्रकरणे रु.३९०.३२ कोटी अंतर्भूत असलेली १,९९० अभिनिर्णय प्रकरणे प्रलंबित होती (मार्च-२०१४) प्राप्त झालेली व उरकलेली प्रकरणे यांचा तपशील तक्ता ४.३.७.३ मध्ये दर्शविला आहे.

तक्ता क्रं.४.३.७.३ (रु.कोटीमध्ये)

वर्ष	सुरुवातीची शिल्लक		प्राप्ति		उरक		अखेरची शिल्लक		टक्केवारी	
	प्रकरणे	रक्कम	प्रकरणे	रक्कम	प्रकरणे	रक्कम	प्रकरणे	रक्कम	(८) ते (२) + कॉलम (४)	(९) ते (३) + कॉलम (५)
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)	(११)
०९-१०	३,५००	९९.७८	३,७३४	९९.०२	३,५०५	११०.२३	३,७२९	८८.५६	५१.५५	४४.५५
१०-११	३,७९८	९०.८५	३८,६४१	९७७.७१	३९,२५०	१०१९.८५	३,१८९	४८.७१	७.५१	४.५६
११-१२	२,५५५	४६.०४	२५,५६७	१,००७.०७	२५,९८१	९२६.९९	२,१४१	१२६.१२	७.६१	११.९८
१२-१३	२,१३६	१२८.५३	१५,७९६	८५८.८०	१५,६६४	७९२.०८	२,२६८	१९५.२५	१२.६५	१९.७८
१३-१४	२,१८९	१९१.९९	१३,९२०	७८२.४१	१४,११९	५८४.०८	१,९९०	३९०.३२	१२.३५	४०.०६

स्त्रोतः-नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाकडून मिळालेली आकडेवारी

वरील तक्त्यातील शिल्लक प्रकरणांच्या संख्येवरुन असे निर्देशित होते की प्रत्येक वर्षी जरी अभिनिर्णयासाठी प्रलंबित प्रकरणांची संख्या कमी होत असली तरीही या प्रकरणांत अंतर्भूत रक्कम वाढत आहे.२०१३-१४ मध्ये प्रलंबित प्रकरणांच्या रक्कमेत १०० टक्के वाढ होती.यावरुन असे निर्देशित होते की मोठया रक्कमेची प्रकरणे अभिनिर्णयासाठी प्रलंबित आहेत. महसूल जमेच्या हितासाठी मोठया रक्कमेची प्रकरणे लवकरात लवकर अभिनिर्णीत करण्यात येतील याची विभागाने खातरजमा करणे गरजेचे आहे.

ज्ञापन

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसुल विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :-

ज्या प्रकरणात मोठया प्रमाणावर महसूल वसुली होवू शकते अशा प्रकरणे अग्रक्रमांने हाताळून त्यावर प्रथम प्राधान्याने निर्णय देण्याबाबत संबधीत मुद्रांक जिल्हाधिकारी यांना मासीक सभेमध्ये व वेळोवेळी निर्देश दिलेले आहेत. कलम ३१ खाली प्रकरणे वीहीत कालावधीत निर्गत करण्यासाठी नागरीकांची सनद जाहीर केलेली आहे. त्याच प्रमाणे NIC यांचे मार्फत प्रकरण निर्गत करण्याबाबत संगणक प्रणाली तयार केलेली आहे. त्या प्रणालीचा वापर दिनांक ०१.०६.२०१६ पासून करण्याबाबत सर्व मुद्रांक जिल्हाधिकारी यांना निर्देश दिलेले आहेत.

प्रकरणाची सदय स्थिती खालील तक्त्यात नमुद केलेली आहे.

(रु.कोटी मध्ये)

सन २०१५-१६ मध्ये प्राप्त		सन २०१५-१६ मध्ये निकाली		मार्च २०१६ अखेर शिल्लक	
प्रकरण संख्या	रक्कम	प्रकरण संख्या	रक्कम	प्रकरण संख्या	रक्कम
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१४२८५	९४.२३	१३०१६	८५.७१	१२६९	९२.२३

४.३.७.४

नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाकडे प्रलंबित अभिनिर्णय प्रकरणे-

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम ५३ A अंतर्गत मुख्य नियंत्रण महसूल प्राधीकारी (CCRA) यांना मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी निर्धारित केलेल्या आकारणीयोग्य शुल्काचे पुनःनिर्धारण करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.जर एखादया संलेखावर चुकीने किंवा इतर कोणत्याही कारणाने मुद्रांक जिल्हाधिका-याव्दारे आकारणीयोग्य शुल्कापेक्षा कमी शुल्क आकारण्यात आले असेल तर CCRA अशा संलेखाची पडताळणी करुन संबधीत पक्षकाराकडून तुटीच्या मुद्रांक शुल्काची वसूली करण्याचे आदेश देऊ शकतात.

विभागाने दिलेल्या माहितीनुसार नोंदणी महानिरीक्षक यांचेकडे अभिनिर्णयासाठी प्रलंबित रु.१२९.४९ कोटी मुद्रांक शुल्क अंतर्भूत असलेली ९५१ अभिनिर्णय प्रकरणे तक्ता क्रं.४.३.७.४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे ३१ मार्च २०१४ ला प्रलंबित होती.

तक्ता क्रं.४.३.७.४ (रु.कोटीमध्ये)

वर्ष	सुरुवातीची शिल्लक		प्राप्ति		उरक		अखेरची शिल्लक	
	प्रकरणे	रक्कम	प्रकरणे	रक्कम	प्रकरणे	रक्कम	प्रकरणे	रक्कम
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)
२००९	३३१	१००.१३	५१	१७.९९	२१	३.३२	३६१	११४.८०
२०१०	३६१	११४.८०	४२	७.४१	१२	२.७४	३९१	११९.४७
२०११	३९७	११९.४७	२७	८१.५७	२२	७६.२५	४०२	१२४.७९
२०१२	४०१	१२४.७९	१५	५७.८५	८	५७.२३	४०८	१२५.४१
२०१३	४०८	१२५.४१	५५१	२३.६१	८	१९.५३	९५१	१२९.४९
	एकूण		६८६	१८८.४३	७१	१५९.०७		

कलम ५३ A अंतर्गत प्रलंबित प्रकरणांची संख्या आणि अंतर्भूत रक्कम हे दोन्ही वाढता कल दर्शवितात तरी २००९-१३ या कालावधीत नोंदणी महानिरीक्षकव्दारा प्राप्त ६८६ प्रकरणापैकी फक्त ७१ प्रकरणे (फक्त १० टक्के) निकाली काढण्यात आली.

अशाप्रकारे, वरील माहितीवरुन असे दिसून येते की नोंदणी विभागाच्या विभिन्न प्राधिका-यांव्दारे मोठया प्रमाणात अभिनिर्णय प्रकरणे अंतिम करण्यात आली नाही.या प्रकरणांत विचारणीय शासन महसूल अंतर्भूत असल्यामुळे अशी शिफारस करण्यात येते की या प्रकरणांना निकाली काढण्यासाठी वेळापत्रक निश्चित करावयास पाहिजे आणि या प्रकरणांचा वेळेत उरक व्हावा यासाठी शिखर स्तरावर त्यांचे संनियंत्रण करावयास पाहिजे.

निर्गमन परिषदेत,प्रधान सचिवांनी आकडेवारीची तपासणी करण्यात येईल आणि पडताळणी नंतर त्यांची पृष्टी करण्यात येईल,असे सांगितले.प्रकरणे निकाली काढण्याबाबत तसेच वर्षनिहाय विष्लेषण याबाबत प्रधान सचिवांनी तथ्यांच्या पडताळणीनंतर अभिप्राय देण्यात येईल,असे सांगितले.

तथापी, हे तथ्य तसेच रहाते की आकडेवारी विभागाने सादर केली होती आणि आकडेवारीचा अचूकपणा त्यांच्या संकलनाच्या वेळीच निश्चित करावयास पाहिजे होता.चुकीची आकडेवारी सादर करणे हे अभिलेखांना सुस्थितीत ठेवणेबाबत उणीव दर्शविते ज्यासाठी विभागाने सुधारात्मक कार्यवाही करावयास पाहिजे.

अभिनिर्णय प्रकरणांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी विभागाने अभिनिर्णय प्रकरणांचे योग्य व अचूक डेटाबेस ठेवावयास पाहिजे आणि त्यांना अंतिम रुप देण्याबाबत एक निश्चित वेळापत्रक करावयास पाहिजे,जेणेकरुन शासन महसूल अनावश्यक प्रकारे अडकून राहावयास नको.

ज्ञापन

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसुल विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :-

विभागाने सन २००२ पासून ई-गव्हर्नन्सचे वेगवेगळे उपक्रम राबविले आहेत. त्यामध्ये दस्त नोंदणी संगणकीय प्रणालीव्दारे करणे त्याचबरोबर काही महत्वपूर्ण ऑनलाईन सुविधा जनतेसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. हे उपक्रम सुरु करण्याकडे लक्ष वेधल्यामुळे अशा प्रकरणात पुरेसा वेळ देता आला नाही. त्यामुळे प्रलंबीत प्रकरणामध्ये थोडीफार वाढ दिसून येते. तसेच कलम ५३-अ नुसार प्रकरणाचे पुनर्विलोकन करतांना संबधीत पक्षकारांना आपले म्हणणे मांडण्यासाठी सुनावणीची संधी देणे आवश्यक आहे. काही वेळेस पक्षकाराना सुनावणीची संधी देवूनही कागदोपत्री पुरावा सादर करण्यासाठी विलंब होतो. प्रकरणाची पुर्ण छाननी केल्याखेरीज निर्णय घेणे योग्य नाही कारण अशा निर्णयाविरुध्द संबधीत पक्षकार मा.उच्च न्यायालयाकडे धाव घेतात. त्यासाठी त्यांना सुनावणीची पुरेपुर संधी देणे आवश्यक ठरते. या सर्व कारणास्तव प्रकरणात निर्णय घेण्यास काही कालावधी लागतो. ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही.

तसेच कलम ५३अ अंतर्गत दाखल होणा-या प्रकरणाचा निपटरा जलद गतीने होण्याच्या दृष्टीने सनियंत्रणाकरीता संगणकीय आज्ञावली (Case Monitaring System) तयार करण्यात आली असुन त्यामध्ये ज्या प्रकरणात मोठया रकमेचा महसूल समाविष्ठ आहे अशी प्रकरणे प्रथम प्राधान्याने सुनावणीसाठी घेण्यात येत आहेत.

शिंवाय या कामाकरीता कायेद सल्लागाराची आवश्यकता असल्याने विधी सहाय्यकाची पदे नव्याने निर्माण करण्यासाठी सुधारीत आकृतीबंध तयार केलेला असून तो शासनाच्या विचाराधीन आहे.

प्रकरणाची सदय स्थिती खालील तक्त्यात नमुद केलेली आहे.

(रक्कम कोटीत)

सु.शी.मार्च २०१४		मार्च २०१६ अखेर प्राप्त		मार्च २०१६ अखेर निकाली		मार्च २०१६ अखेर शील्लक	
प्र.क्र. संख्या	रक्कम	प्र.क्र. संख्या	रक्कम	प्र.क्र. संख्या	रक्कम	प्र.क्र. संख्या	रक्कम
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)
९५१	१२९.४९	४६२	१४४.३	९५	४३.२७	१३१८	२३०.५२

४.३.८ मोबदला मुल्याच्या निर्धारणात आढळलेल्या विसंगती-

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम,१९५८ च्या अनुसूची-१ मधील अनुच्छेद ५ (g-a) अनुसार एखादे संलेख कोणत्याही स्थावर मालमत्तेवरील बांधकाम,तिचा विकास तिची विक्री किंवा तिचे हस्तांतरण (मग ते कोणत्याही स्वरुपाचे असो) यासाठी प्रवर्तक किंवा विकासक,(मग तो कोणत्याही नावाने संबोधण्यात येत असो) यास प्राधीकार किंवा अधिकार देण्यासंबधात असेल तर मुद्रांक शुल्क अनुच्छेद २५ च्या खंड (a),(b),(c) अथवा (यथास्थिती) (d)अन्वये,मोबदला अथवा मालमत्तेचे बाजारमुल्य यापैकी जे जास्त असेल त्यावर आकारणी योग्य असेल.

लेखापरीक्षणात आम्हाला संलेखात नमूद मोबदला निर्धारणासाठी समान पध्दतीचा अभाव असल्याने लेखापरीक्षेच्या कालावधीत विकास करारनामे निष्पादीत करताना मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाल्याचे निदर्शनास आले.हे खालील परिच्छेदात मांडले आहे.

ज्ञापन

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसुल विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :-

या परीच्छेदामध्ये महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम अनुसूची-१ मधील अनुच्छेद ५ (g-a) व अनुच्छेद २५ च्या खंड (a),(b),(c) अथवा (यथास्थिती) (d) या तरतुदी नमुद करुन विकसन कराराच्या संलेखात नमूद मोबदला निर्धारणासाठी समान पध्दतीचा अभाव असल्याबाबत आक्षेप नोंदविलेला आहे.

४.३.८.१

करारनाम्यात नमूद मोबदला मुल्याच्या निर्धारणासाठी समान धोरणाचा अभाव-

मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता विकासक आणि संस्था यांच्यात सहकारी घरबांधणी संस्था अथवा महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ च्या अनुसूची-१ मधील अनुच्छेद ५ (g-a) अंतर्गत असलेले अस्तित्वातील इमारतींचे पुनर्विकास करारनामे निष्पादीत करण्यात आले.

आम्हाला असे आढळले की (मे-२०१४) पुनर्विकास करारनामा संलेख अभिनिर्णीत करताना मुंबई,अंधेरी,कुर्ला आणि बोरीवली येथील मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयात तात्पुरत्या निवास व्यवस्थेचे भाडे,हालअपेष्टा/निकाय निधि,दलाली खर्च, विकासकाने मालमत्तेच्या विकास अधिकारासाठी संस्थेस व संस्थेच्या सदस्यांना निवास बदलण्यासाठी दिलेला खर्च इत्यांदी बाबींसाठी केलेल्या भुगतानास मोबदला मुल्याचा भाग मानण्यात येतो.याशिवाय,मोबदला मुल्यात बिल्ट-अप क्षेत्राची बांधकाम किंमत,संस्थेचे कार्यालय,चौकीदाराचे कार्यालय इत्यांदीसह विकसकाने दिलेल्या पार्कींग जागेचाही समावेश आहे.तथापी,आम्हाला लक्षात आले की ३५ पुनर्विकास करारनामे अभिनिर्णीत करतेवेळी मुद्रांक जिल्हाधिकारी एन्फोर्समेंट-I व एन्फोर्समेंट-II मुंबई यांनी त्या बाबी मोबदला मूल्याचा भाग म्हणून ग्राहय धरल्या नाही.

काही स्पष्टीकरणात्मक प्रकरणे तक्ता ४.३.८.१ मध्ये दिली आहेत.

तक्ता क्रं.४.३.८.१ (रु.लाखामध्ये)

प्रकरण क्रं./दिनांक	एन्फोर्समेंट कार्यालया व्दारे मोबदला म्हणून ग्राहय न धरण्यात आलेल्या बाबी		प्रकरण क्रं./दिनांक	एन्फोर्समेंट कार्यालया व्दारे मोबदला म्हणून ग्राहय धरण्यात आलेल्या बाबी	
(१)	(२)		(३)	(४)	
एकाच मुद्रांक जिल्हाधिका-याने मुद्रांक शुल्क आकारणीसाठी वेगवेगळया संलेखाना वेगवेगळया पध्दतीने हाताळले					
COS एन्फोर्समेंट-II मुंबई SDE/NEW/१६३/१२ दि.०७/०३/१२ या प्रकरणात COS एन्फोर्समेंट-II यांनी या बाबींना बंधन समजून त्यावर ०.२ टक्के या दराने मुद्रांक शुल्क आकारले.	निकाय निधी	६६.६०	COS एन्फोर्समेंट-II मुंबई SDE/NEW/४०१/१२ दि. २१/५/१२ या प्रकरणात COS एन्फोर्समेंट-II यांनी या बाबींना मोबदल्याचा भाग समजून त्यावर ५ टक्के या दराने मुद्रांक शुल्क आकारले.	निकाय निधी	५५.२०
	भाडे	१२९.६०		भाडे	५३.१३
	स्थानांतरण	५.४०		स्थानांतरण	१.४४
	दलाली	५.४०		दलाली	२.५३
	एकूण	२०७.००		एकूण	११२.३०

अनुच्छेद ५ (g-a) अंतर्गत पुनर्विकास करारनाम्यांसाठी मोबदला निर्धारित करताना वरील बाबी समाविष्ट न केल्याने रु.१२.१९ लाख शासकीय महसूलाची कमी वसूली झाली.

COS एन्फोर्समेंट-II मुंबई SDE/NEW/४१/१२ दि.१८/०१/१२ या प्रकरणात COS एन्फोर्समेंट-II यांनी या बाबींना बंधन समजून त्यावर	निकाय निधी	१४०.००	COS एन्फोर्समेंट-II मुंबई SDE/NEW/४०२/१२ दि. २५/५/१२ या प्रकरणात COS एन्फोर्समेंट-II यांनी या बाबींना मोबदल्याचा भाग समजून त्यावर ५ टक्के या दराने	निकाय निधी	१००.००
	भाडे	९०.००		भाडे	८४.७६
	दलाली	५.००		स्थानांतरण	४.३२
	मु.शु. व	३.००		दलाली	३.३६

तक्ता क्रं.४.३.८.१

(१)	(२)		(३)	(४)	
०.२ टक्के या दराने मुद्रांक शुल्क आकारले.	नों. फी. खर्च एकूण	 २३८.००	मुद्रांक शुल्क आकारले.	सभासदांना देण्यात आलेल्या क्षेत्राची बांधकाम किंमत पार्किंग ची बांधकाम किंमत एकूण	१८२.२९ १२.८४ ३८७.५७

अनुच्छेद ५ (g-a) अंतर्गत पुनर्विकास करारनाम्यांसाठी मोबदला निर्धारित करताना वरील बाबी समाविष्ट न केल्याने रु.१०.७२ लाख शासकीय महसूलाची कमी वसूली झाली.

COS एन्फोर्समेंट-I मुंबई ENF-1/EVN/J/८२/१२ दि.१५/०६/१२ या प्रकरणात COS एन्फोर्समेंट-I यांनी या बाबींना बंधन समजून त्यावर ०.२ टक्के या दराने मुद्रांक शुल्क आकारले.	भाडे दलाली स्थानांतरण एकूण	२०९.८८ ७.२ ४.०० २२१.०८	COS एन्फोर्समेंट-I मुंबई ENF-1/EVN/J/१/१० दि. २२/६/१० या प्रकरणात COS एन्फोर्समेंट-I यांनी या बाबींना मोबदल्याचा भाग समजून त्यावर ५ टक्के या दराने मुद्रांक शुल्क आकारले.	निकाय निधी भाडे स्थानांतरण सभासदांना देण्यात आलेल्या क्षेत्राची बांधकाम किंमत एकूण	३८.७५ ६८.८२ १.६० १००.०२ २०९.१९

अनुच्छेद ५ (g-a) अंतर्गत पुनर्विकास करारनाम्यांसाठी मोबदला निर्धारित करताना वरील बाबी समाविष्ट न केल्याने रु.२८.४७ लाख शासकीय महसूलाची कमी वसूली झाली.

COS एन्फोर्समेंट-I मुंबई ENF-1/EVN/J/६१/१२ दि.१०/०४/१२ या प्रकरणात COS एन्फोर्समेंट-I यांनी या बाबींना बंधन समजून त्यावर ०.२ टक्के या दराने मुद्रांक शुल्क आकारले.	भाडें दलाली स्थानांतरण एकूण	७२.०० २.४० १.२० ७५.६०	COS एन्फोर्समेंट-I मुंबई ENF-1/EVN/J/५१/१० दि. ३०/१/१० या प्रकरणात COS एन्फोर्समेंट-I यांनी या बाबींना मोबदल्याचा भाग समजून त्यावर ५ टक्के या दराने मुद्रांक शुल्क आकारले.	सभासदांना देण्यात आलेल्या क्षेत्राची बांधकाम किंमत निकाय निधी भाडे स्थानांतरण आणि दलाली एकूण	८६.५४ ९२.८० ४६.८० २.५६ २२७.९८

अनुच्छेद ५ (g-a) अंतर्गत पुनर्विकास करारनाम्यांसाठी मोबदला निर्धारित करताना वरील बाबी समाविष्ट न केल्याने रु.७.९८ लाख शासकीय महसूलाची कमी वसूली झाली.

COS एन्फोर्समेंट (Enf)-II मुंबई आणि COS अंधेरी या दोन कार्यालयांमध्ये सारख्याच प्रकारच्या संलेखाना वेगवेगळया पध्दतीने हाताळले.

COS एन्फोर्समेंट-II मुंबई SDE-/NEW/३२५/१२ दि.२३/०४/१२ या प्रकरणात COS एन्फोर्समेंट-II यांनी या बाबींना बंधन समजून त्यावर ०.२ टक्के या दराने मुद्रांक शुल्क आकारले.	हालअपेष्टा नुकसान भरपाई	८१६.४८	COS मुंबई ADJ-1/M/4587/10 दि. ३/११/१० या प्रकरणात COS मुंबई यांनी या बाबींना मोबदल्याचा भाग समजून त्यावर ५ टक्के या दराने मुद्रांक शुल्क आकारले	हालअपेष्टा नुकसान भरपाई	९५२.००
	पर्यायी निवास व्यवस्थेचे भाडे	१.२५०.६४		पर्यायी निवास व्यवस्थेचे भाडे	५०९.६०
	एकूण	२,०६७.१२		एकूण	१,४६१.६०

अनुच्छेद ५ (g-a) अंतर्गत पुनर्विकास करारनाम्यांसाठी मोबदला निर्धारित करताना वरील बाबी समाविष्ट न केल्याने रु.२.९३ कोटी शासकीय महसूलाची कमी वसूली झाली.

COS एन्फोर्समेंट-II मुंबई SDE/NEW/४५०/१२ दि.०४/०५/१२ या प्रकरणात COS एन्फोर्समेंट-II यांनी या बाबींना बंधन समजून त्यावर ०.२ टक्के या दराने मुद्रांक शुल्क आकारले.	निकाय निधी	६०.००	COS मुंबई ADJ-M-5736-10 दि. २८/१२/१० या प्रकरणात COS मुंबई यांनी या बाबींना मोबदल्याचा भाग समजून त्यावर ५ टक्के या दराने मुद्रांक शुल्क आकारले	निकाय निधी	१००.००
	भाडे	४९२.४७		भाडे	१६०.२७
	दलाली	४१.०४		दलाली	निरंक
	परिवहन	९.१४		परिवइन	निरंक
	एकूण	६०२.६५		एकूण	२६०.२७

अनुच्छेद ५ (g-a) अंतर्गत पुनर्विकास करारनाम्यांसाठी मोबदला निर्धारित करताना वरील बाबी समाविष्ट न केल्याने रु.३०.६५ कोटी शासकीय महसूलाची कमी वसूली झाली.

COS एन्फोर्समेंट (Enf)-I मुंबई आणि COS अंधेरी या दोन कार्यालयांमध्ये सारख्याच प्रकारच्या संलेखाना वेगवेगळया पध्दतीने हाताळले.

COS एन्फोर्समेंट-I मुंबई ENF-1/EVN/J/७९/१२ दि.०६/०६/१२ या प्रकरणात COS एन्फोर्समेंट-I यांनी या बाबींना बंधन समजून त्यावर ०.२ टक्के या दराने मुद्रांक शुल्क आकारले.	भाडे	३४५.६०	COS अंधेरी ADJ-A-188-12 दि. १३/०३/१२ या प्रकरणात COS यांनी या बाबींना मोबदल्याचा भाग समजून त्यावर ५ टक्के या दराने मुद्रांक शुल्क आकारले	भाडे	२०१.६०
	दलाली	१४.४०		दलाली	१६.००
	स्थानांतरण	१४.४०		स्थानांतरण	१.६०
	एकूण	३७४.४०		एकूण	२१९.२०

अनुच्छेद ५ (g-a) अंतर्गत पुनर्विकास करारनाम्यांसाठी मोबदला निर्धारित करताना वरील बाबी समाविष्ट न केल्याने रु.५७.९७ लाख शासकीय महसूलाची कमी वसूली झाली.

COS एन्फोर्समेंट (Enf)-I मुंबई आणि COS मुंबई या दोन कार्यालयांमध्ये सारख्याच प्रकारच्या संलेखाना वेगवेगळया पध्दतीने हाताळले.

COS एन्फोर्समेंट-I मुंबई ENF-1/EVN/J/६८/१२ दि.१८/०५/१२ या प्रकरणात COS एन्फोर्समेंट-I यांनी या बाबींना बंधन समजून त्यावर ०.२ टक्के या दराने मुद्रांक शुल्क आकारले.	भाडे दलाली परिवहन एकूण	२३६.८३ ९.८७ ५.८५ २५२.५५	COS मुंबई ADJ-M-3987-11 दि. १६/११/११ या प्रकरणात COS यांनी या बाबींना मोबदल्याचा भाग समजून त्यावर ५ टक्के या दराने मुद्रांक शुल्क आकारले	भाडे दलाली परिवहन एकूण	८१२.१६ निरंक १३.५० ८२५.६६

अनुच्छेद ५ (g-a) अंतर्गत पुनर्विकास करारनाम्यांसाठी मोबदला निर्धारित करताना वरील बाबी समाविष्ट न केल्याने रु.३७.९९ लाख शासकीय महसूलाची कमी वसूली झाली.

अशा प्रकारची विसंगती म्हणजेच अदायगीचे घटक अनुच्छेद (g-a) अंतर्भूत पुनर्विकास करारनाम्याच्या मोबदल्यात समाविष्ट न करणे हे ३५ प्रकरणांत आढळले. ज्यामुळे ३५ अभिनिर्णीत प्रकरणांत रु.११.३९ कोटी मुद्रांक शुल्क व शास्तीची कमी आकारणी झाली.

निर्गमन परिषदेत प्रधान सचिवांनी तथ्य मान्य (सप्टेंबर २०१४) केले आणि याबाबतीत सर्व कार्यालयांस सुचना निर्गमित करण्यात येतील असे सांगितले आणि पुढे मुद्रांक शुल्काची तूट शास्तीसह वसूल करण्यात येईल. असेही सांगितले वसूलीचा अहवाल प्राप्त नाही. (डिसेंबर-२०१४)

ज्ञापन

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसुल विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :-

या परीच्छेदामध्ये मुद्रांक जिल्हाधिकारी अंमलबजावणी १ या कार्यालयातील अभिनिर्णीत २६ प्रकरणे व मुद्रांक जिल्हाधिकारी अंमलबजावणी २ मुंबई या कार्यालयातील अभिनिर्णीत ९ प्रकरणे अशी एकूण ३५ प्रकरणांचा समावेश आहे.

प्रकरणांतील दस्तऐवज हे पुनर्विकासाचे करारनाम्यांचे असून विकासकाने सोसायटी व सभासद यांना तात्पुरत्या स्वरुपात temporary accommodation hardship/corpus funds, brokerage charges, shifting charges इत्यादीबाबतच्या दिलेल्या रकमा, सोसायटीला बांधून दयावयांचे construction cost of the built up area society's office, watchman's office etc व पार्किग क्षेत्र यांचे बाजारमूल्य एकत्रित करुन त्यावर अनुच्छेद २५ (b) प्रमाणे मुद्रांक शुल्काची आकारणी करण्याऐवजी मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी अभिनिर्णय करतांना या रकमेस मोबदला न समजता विकासकांचे कर्तव्य Obligation समजून अनुच्छेद ५(h)(A)(iv)(b),, प्रमाणे ०.२% मुद्रांक शुल्क वसुल केले आहे. म्हणून शासनाचे रुपये १३.०४ कोटी मुद्रांक शुल्क व दंड कमी वसुल झाले आहे, असा आक्षेप उपस्थित केलेला आहे.

प्रकरणाची छाननी केली असता,दस्तातील मोबदल्याच्यापोटी दिलेल्या सर्व रकमा (वर नमुद केल्याप्रमाणे) एकत्रित करुन ही रक्कम मोबदला रक्कम समजून त्यावर अनुच्छेद ५(g-a) नुसार ५% मुद्रांक शुल्क वसुल करणे आवश्यक आहे.हा तपासणी पथकाचा आक्षेप योग्य असून प्रकरणातील दस्त ऐवज मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी अभिनिर्णीत केलेले असल्याने सदरची प्रकरणे कलम ५३अ अन्वये पुर्नविलोकनाकरीता घेण्यात आली असून यातील ९ प्रकरणांत मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी यांनी आदेश निर्गमित केले असून वसूलीची कार्यवाही संबधित मुद्रांक जिल्हाधिकारी यांचे स्तरावर सुरु आहे.

प्रकरणाची सद्यस्थीती खालील तक्त्यात नमुद केलेली आहे.

एकुण प्रकरणे	सुनावणी दिलेली प्रकरणे	निकाली प्रकरणे
(१)	(२)	(३)
३५	३५	०९

सर्व प्रकरणातील मुल्यांकनाबाबत एक सारखेपणा व समानता येण्यासाठी सविस्तर मार्गदर्शन सुचना सन २०१६ पासूनच्या बाजार मुल्य दर तक्त्यासोबत सुचना दिल्या आहेत.

४.३.८.२

पुर्नविकास करारावर मुद्रांक शुल्काची कमी आकारणी-

लेखापरिक्षेस आढळले की मुंबईच्या परेल शिवडी विभागातील ७,०९९.२१ चौ. मीटर जमीन व त्यावर उभारलेल्या इमारतीच्या पुनर्विकासाकरीता संस्था आणि विकासक यांच्यात निष्पादित करण्यात आलेला पुनर्विकास करारनामा मुद्रांक जिल्हाधिकारी एन्फोर्समेंट-I मुंबई यांनी जानेवारी २०१२ मध्ये अभिनिर्णित केला. करारनामा अभिनिर्णित करताना मुद्रांक जिल्हाधिका-यांनी संस्थेच्या सभासदांना देण्यात येणा-या रु.१८.८८ कोटी मूल्याच्या बिल्ट अप क्षेत्राची बांधकाम किंमत आणि पार्किंग स्थळ मोबदला मूल्यात विचारात घेतले नाही.

तसेच संस्थेच्या वतीने विकासकाने अदा केलेले रु.१६.८१ कोटीचे भाडे बंधन असे गृहीत धरले होते.आणि अनुच्छेद ५ (h)(A)(iv) अंतर्गत ०.२ टक्के दराने मुद्रांक शुल्क आकारण्यात आले.या दोन बाबी मोबदल्याच्या भाग होत्या आणि त्यावर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या अनुसूची-१ मधील अनुच्छेद-२५ अंतर्गत ५ टक्के दराने मुद्रांक शुल्क आकारणी योग्य असूनही आकारण्यात आले नाही.ज्यामुळे रु.१.६५ कोटी मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली.

आम्ही मुद्रांक शुल्काची कमी आकारणी निदर्शनास आणून दिल्यावर (डिसेंबर २०१३), निर्गमन परिषदेत प्रधान सचिवांनी लेखापरीक्षा निरीक्षण मान्य (सप्टेंबर-२०१४) केले आणि शास्तीसह मुद्रांक शुल्काची तूट वसूल करण्याची कार्यवाही सुरु करण्यात येईल असे सांगितले.

मुद्रांक शुल्क तुटीच्या आणि शास्तीच्या वसूलीचा अहवाल प्राप्त झाला नाही. (डिसेंबर २०१४)

ज्ञापन

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसुल विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :-

या परिच्छेदात मुद्रांक जिल्हाधिकारी अंमलबजावणी १ यांचे कार्यालयातील अभिनिर्णीत प्र.क्रं.ENF-1-EVN-J-7-2012 चा समावेश आहे.

विकसकाने सोसायटी व सभासद यांना तात्पुरत्या स्वरुपात temporary accommodation hardship/corpus funds, brokerage charges, shifting charges इत्यादी बाबतच्या दिलेल्या रकमा, सोसायटीला बांधून द्यावयांचे construction cost of the built up area societry's office, watchman's office etc व पार्किंग क्षेत्र यांचे बाजारमूल्य एकत्रित करुन त्यावर अनुच्छेद २५ (b) प्रमाणे मुद्रांक शुल्काची आकारणी करण्याऐवजी मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी अभिनिर्णय करतांना या रकमेस मोबदला न समजता विकासकांचे कर्तव्य Obligation समजून अनुच्छेद ५(h)(A)(iv)(b), प्रमाणे ०.२% मुद्रांक शुल्क वसुल केले आहे. म्हणून शासनाचे रुपये १.६५ कोटी मुद्रांक शुल्क कमी वसुल झाले आहे, हा तपासणी पथकाचा आक्षेप मान्य करुन प्रकरण कलम ५३ अ खाली पुनर्विलोकनासाठी घेण्यात आलेले आहे.

४.३.८.३

दस्तऐवजात नमूद महसूल भागीदारी बाबी विचारात न घेतल्याने मुद्रांक शुल्क आणि शास्तीची कमी आकारणी

मुद्रांक जिल्हाधिकारी नागपुर शहर यांच्या कार्यालयात आम्हाला असे निदर्शनास आले (एप्रील २०१४) की एका शुल्क चुकवणे प्रकरणात,जे विकास करारनाम्याशी संबधित होते,त्यात दस्तावेज जमीन मालक (गोल्डब्रीक्स इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.)आणि विकासक (गोदरेज प्रापर्टीज लि.)यांच्यात ३० सप्टेंबर २०११ ला १,४४०.१९ चौरस मीटर बांधकाम केलेल्या क्षेत्रासह ३६,७४४ चौरस मीटर क्षेत्रावर ११,९८,५०९ चौ.फूट FSI आणि विकण्यायोग्य १९,८४,५००/- चौरस फूट क्षेत्र, रहिवासी क्षेत्र II म्हणून संबोधण्यात येत असलेल्या, प्लॉटच्या विकासासाठी निष्पादित करण्यात आले.मुद्राक जिल्हाधिकारी,नागपूर (शहर) ने बांधकाम क्षेत्रासह जमिनिचे बाजार मूल्य रु. ६६.८६ कोटी निर्धारित केले आणि रु.३.३४ कोटी मुद्रांक शुल्क व दोन टक्के प्रति माह या दराने चार महिन्यांसाठी रु.२६.७४ लाख शास्तीची आकारणी केली.

दस्तावेजांच्या पठनावरुन आम्हाला असे निदर्शनास आले की गोदरेज यांना हा प्रकल्प गोल्डब्रीक्स सोबत महसूल भागीदारी तत्वावर विकसित करावयाचा होता आणि मोबदल्यात गोदरज, तक्ता ४.३.८.३ (I) मध्ये दर्शविल्याप्रमाणे एकूण विक्री महसूलात (Gross Sales Revenue)भागीदारी करेल.

तक्ता ४.३.८.३ (I)

प्लॅटची (गाळे) ची विक्री किंमत प्रति चौ.फु.	विक्रीयोग्य क्षेत्राच्या पहिल्या १० लाख चौरस फूट करीता महसूल भागीदारी गुणोत्तर		उर्वरित विक्रीयोग्य क्षेत्राकरिता महसूल भागीदारी गुणोत्तर	
	गोल्डब्रीक्सची हक्कदारी	गोदरेजची हक्कदारी	गोल्डब्रीक्सची हक्कदारी	गोदरेजची हक्कदारी
(१)	(२)	(३)	(४)	(५)
रु. ५,२५० प्रति चौ. फुट पर्यंत	एकूण विक्री महसूलाच्या (GSR) ३८ टक्के	एकूण विक्री महसूलाच्या ६२ टक्के	एकूण विक्री महसूलाच्या ४३ टक्के	एकूण विक्री महसूलाच्या ५७ टक्के
रु. ५,२५१ प्रति चौ. फुट पासून रु. ५,९९९ प्रति चौ. फुट पर्यंत	वाढीव एकूण विक्री महसूलाच्या ६० टक्के	वाढीव एकूण विक्री महसूलाच्या ४० टक्के	वाढीव एकूण विक्री महसूलाच्या ६० टक्के	वाढीव एकूण विक्री महसूलाच्या ४० टक्के
रु. ६,००० प्रति चौ. फुट पेक्षा अधिक	वाढीव एकूण विक्री महसूलाच्या ७० टक्के	वाढीव एकूण विक्री महसूलाच्या ३० टक्के	वाढीव एकूण विक्री महसूलाच्या ७० टक्के	वाढीव एकूण विक्री महसूलाच्या ३० टक्के

विभागाने बाजारमुल्य परिगणित करतांना दस्तावेजात नमूद केलेली वरील महसूल भागीदारीची बाब लक्षात घेतली नाही. अभिनिर्णिय प्राधिका-याने करारनाम्यात नमूद मोबदला रु.४२१.७५ कोटी ऐवजी रु.६६.८६ कोटी जमिनीच्या बाजारमुल्यावर रु.३.३४ कोटी मुद्रांक शुल्क आकारले.ज्यामुळे तक्ता ४.३.८.३ (२) मध्ये दर्शविल्याप्रमाणे रु.१७.७४ कोटी मुद्रांक शुल्क आणि रु.३.९५ कोटी शास्तीची कमी आकारणी झाली.

तक्ता ४.३.८.३(२)

मोबदला मुल्याची परिगणना (१)	रु.कोटीमध्ये (२)
पहिल्या १० लाख चौ.फु.विक्रीयोग्य क्षेत्राकरिता विचारात घेण्यात आलेला किमान दर रु.५,२५०/-प्रति चौ.फुट (१०,००,००० x ५,२५०) च्या ३८ टक्के	१९९.५०
उर्वरित ९,८४,५०० चौ.फु.विक्रीयोग्य क्षेत्राकरिता विचारात घेण्यात आलेला किमान दर रु.५,२५०/-प्रति चौ.फुट (९,८४,५०० x ५,२५०) च्या ४३ टक्के	२२२.२५
एकूण मोबदला	४२१.७५
मोबदला हा COS ने ठरवून दिलेले संपुर्ण जमिनीचे बाजारमुल्य रु.६६.८६ कोटीपेक्षा अधिक असल्याने मुद्रांक शुल्क हे मोबदल्यावर आकारणी योग्य आहे.	४२१.७५
आकारणी योग्य मुद्रांक शुल्क अनुच्छेद २५(ड) नुसार ५ टक्के दराने	२१.०८
आकारण्यात आलेले मुद्रांक शुल्क	३.३४
कमी आकारण्यात आलेले मुद्रांक शुल्क	१७.७४
दस्ताऐवज हे ३०.०९.२०११ ला निष्पादीत झाले असल्याने १० महिन्यांकरिता म्हणजेच जुलै २०१२ पर्यंत २ टक्के प्रति माह या दराने शास्तीची रक्कम आकारणी योग्य आहे.	४.२२
आकारण्यात आलेली शास्ती	०.२७
कमी आकारण्यात आलेली शास्ती	३.९५
कमी आकारण्यात आलेल्या मुद्रांक शुल्क आणि शास्तीची एकूण रक्कम	२१.६९

प्रधान सचिवांनी निर्गमन परिषदेत (सप्टेंबर २०१४)लेखापरीक्षा मान्य केले.मुद्रांक शुल्क तुटीच्या आणि शास्तीच्या वसूलीचा अहवाल प्राप्त झाला नाही. (डिसेंबर २०१४)

या परिच्छेदात मुद्रांक जिल्हाधिकारी, नागपूर शहर यांचेकडील प्रकरणांचा सामावेश आहे. महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम नियमातील कलम ३३ प्रमाणे दस्त अटकावून त्यावर प्रकरण क्र.EVN/CASE/ ७६४/ २०११-१२ अन्वये कार्यवाही केली असता असे दिसून आले की प्रस्तूत दस्त विकसन करारनाम्याचा असून विकासनाच्या मोबदल्यात मुळ मालकांस मिळकती मोबदल्यापोटी Revenue sharing पध्दतीने मोबदला दयावयांचा असून मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी सदरचा मोबदला विचारात न घेता बाजारमुल्य दर तक्त्यातील किंमतीप्रमाणे मुल्यांकन करुन त्यावर मुद्रांक शुल्क आकारणी केली आहे हा तपासणी पथकाचा आक्षेप योग्य असून प्रकरण अभिनिर्णीत असल्याने महसूल मुद्रांक नियंत्रक प्राधिकारी यांचेकडे पुनर्विलोकनासाठी घेवून संबधितांना सुनावणीची संधी देवून आदेश नीर्गमीत करण्यात येत आहेत.

४.३.८.४

अतिरिक्त FSI आणि प्रभाराशी संबधीत अधिमुल्याचा समावेश न केल्यामुळे मुद्रांक शुल्काची कमी आकारणी-

मुद्रांक जिल्हाधिकारी,कुर्ला,मुंबई यांच्या कार्यालयात चेंबूर गावातील १५,९०३.४६ चौ.मी.प्लॉट विकसीत करावयास मार्च २०१३ मध्ये संस्था संघ आणि विकासक यांच्यात विकास करारनामा निष्पादीत करण्यात आला. मुद्राक जिल्हाधिका-याने रु.११८.६१ कोटी मोबदला मुल्यावर रु.५.९३ कोटी मुद्रांक शुल्क आकारले. करारनाम्याचे पठन असे निर्देशित करते की विकासकाला संस्था संघाच्या वतीने रु.१५.३५ कोटी अतिरिक्त **FSI** हप्ता आणि पाणी प्रभार अदा करावे लागेल दस्तावेज

अभिनिर्णित करताना,विकसकाने केलेले भुगतान मुद्रांक जिल्हाधिका-याने गृहीत धरले नाही.ज्यामुळे रु.७६.७४ लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली.

प्रधान सचिवांनी निर्गमन परिषदेत लेखापरीक्षा निरीक्षण मान्य केले.(सप्टेंबर २०१४) आणि मुद्रांक शुल्क तुटीची वसूली करण्याकरिता कार्यवाही करण्यात येईल,असे सांगितले.मुद्रांक शुल्क तुटीच्या वसूलीचा अहवाल प्राप्त झाला नाही.(डिसेंबर २०१४) अशी शिफारस करण्यात येते की समानतेची खात्री करण्यासाठी विकास/पुनर्विकास करारांच्या बाबतीत मोबदला मूल्य ठरविताना समान धोरण अवलंबविण्याबाबत शासनाने विभागास सुचना निर्गमित कराव्या.

ज्ञापन

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसुल विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :-

या प्रकरणात मुद्रांक जिल्हाधिकारी कुर्ला मुंबई उपनगर कार्यालयातील अभिनिर्णय प्रकरण क्र.ADJ/३५१/K/२०१३ चा समावेश आहे. या मध्ये लिहून देणार यांना जागेच्या मोबदल्यात म्हाडा यांना सोसायटीच्या वतीने दयावयाची प्रीमियम रक्कम व पूर्वीचे थकीत असलेले पाणी वापर शुल्क व कर आणि भविष्यात म्हाडा सोबत निष्पादीत होणारे दस्तऐवज यावरील दयावयाचे मुद्रांक शुल्क ही रक्कम मोबदला रक्कम ठरत असल्याने ती मोबदल्यामध्ये समाविष्ट केलेली नाही. हा तपासणी पथकाचा आक्षेप मान्य करण्यात आला आहे.

प्रकरणातील दस्त अभिनिर्णीत असल्याने प्रकरण पुनर्विलोकनासाठी घेण्यात आलेले आहे. संबधितांना सुनावणीची संधी देण्यात आलेली आहे, त्यांचे म्हणणे विचारात घेऊन अंतिम निर्णय घेण्यात येत आहे.

४.३.९.

जुन्या इमारतींचे बाजारमुल्य निर्धारण-

बाजार मुल्य हे वार्षिक मूल्य दर तक्ता यातील सुचना आणि दर यानुसार निर्धारीत करावयास पाहीजे.भाडेकरुंसमवेत जुन्या मालमत्तेच्या मूल्यांकनाकरिता वार्षिक मूल्य दर तक्त्याच्या सूचना क्रं.१ प्रमाणे बाजार मुल्य बृहन्मुंबई,१९९१ च्या विकास नियंत्रण विनियमात नमूद केल्याप्रमाणे प्रचलित अनुज्ञेय **FSI** प्रमाणे त्या जागेवर बांधण्यात येणा-या मालमत्तेच्या क्षेत्राच्या आधारावर परिगणित करावयास पाहिजे.

सहाय्यक संचालक,नगररचना पुणे यांनी अतिरिक्त मुद्रांक नियंत्रक,मुंबई यांना लिहिलेल्या दिंनाकः-१४ जानेवारी २०११ च्या पत्रात असे नमूद केले होते की अभ्यर्पित (जुन्या) मालमत्तेवर,उपलब्ध **FSI** च्या बाजारमुल्यातून भाडेकरुस विनामूल्य दिलेल्या वास्तूंच्या बांधकामास येणारी किंमत वजा करण्यात यावी.या सुचनेमुळे काही प्रकरणांत मुद्राक जिल्हाधिकारी मुंबई आणि मुंबई उपनगर जिल्हयात सारख्याच संलेखास विभिन्न वागणूक दिली होती,जसे उपलब्ध **FSI** च्या बाजारमुल्यातून भाडेकरुव्दारे व्यापलेल्या जागेवरील बांधकामाचे खर्च वजा करण्यात आले होते.काही प्रकरणांमध्ये उपलब्ध **FSI** च्या बाजारमुल्यातून भाडेकरुंव्दारे व्यापलेल्या जागेवरील बांधकामाचा खर्च वजा केला नव्हता.आणि काही प्रकरणांमध्ये उपलब्ध **FSI** च्या बाजारमुल्यासोबत तुलना करण्यासाठी भाडेकरुंव्दारे व्यापलेल्या जागेच्या बांधकामाची किंमत मोबदल्याच्या किंमतीत जोडली होती.जसे खालील परिच्छेदात दर्शविले आहे.

ज्ञापन

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसुल विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :-

जुन्या इमारतीचे बाजारमुल्य निर्धारीत करण्यासंबंधी सुचनांचा अवलंब करुन भाडेकरु व्याप्त मिळकतीच्या किंमती निर्धारणाबाबत आक्षेप घेण्यात आलेला आहे त्याचा सविस्तर तपशील पुढील परीच्छेदात आहे.

जुन्या इमारतींचे बाजारमुल्य निर्धारीत करतांना भाडेकरुंव्दारे व्यापलेल्या क्षेत्रांच्या बांधकामाची किंमत वगळण्यात आली-

मुद्रांक जिल्हाधिकारी एन्फोर्समेंट-**I** आणि एन्फोर्समेंट-**II** , मुंबई यांनी अभिनिर्णित केलेल्या जानेवारी २०१० ते डिसेंबर २०१३ पर्यंत अंतिम रुप दिलेल्या ८१ अभिनिर्णिय प्रकरणांत लेखा परिक्षेस असे आढळले (फेब्रवारी व मे २०१४) की प्रवर्ग **A** च्या अभ्यर्पित इमारतींच्या बाजारमुल्याची परिगणना खरेदीदार/अभिहस्तांकिती/विकासक यांच्यासाठी उपलब्ध **FSI** च्या बाजार मुल्यातून भाडेकरुंना दयावयाच्या जागेच्या बांधकामाचा खर्च वजा करुन केली होती.अशाप्रकारे,भाडेकरुंना दिलेल्या जागेच्या

बांधकामाचा खर्च ८१ अभिनिर्णिय प्रकरणांत बंधनकारक समजून वजा केल्यामुळे रु.१२.९३ लाख शास्तीच्या रकमेसह रु.१६.३९ कोटी मुद्रांक शुल्काची कमी आकारणी करण्यात आली.

लेखा परिक्षेने निदर्शनास आणलेल्या ८१ प्रकरणांपैकी काही प्रकरणे,ज्यात मुद्राक जिल्हाधिकारी यांनी भाडेकरुंना दयावयाच्या जागेच्या बांधकामाचा खर्च वजा केला,अंकगणीतीय चुका केल्या आणि बाजारमुल्य काढताना चुकीचे दर लावले.उदाहरणार्थ तक्ता ४.३.९.१ मध्ये ठळकरीत्या दिली आहे.

तक्ता ४.३.९.१

अभिनिर्णिय प्रकरण क्रं. आणि दिनांक (१)	गैरप्रकाराचे स्वरुप (२)
ADJ-M-८४१/१३ दिनाक ०६/०५/१३	भुलेश्वर येथे असलेल्या ५,०४७.७० चौ.मी.ज्यांचे अनुज्ञेय **FSI** २०,८२८.३३ चौ.मी. होते.अशा मालमत्तेच्या अभिहस्तांतरणापत्र संलेखात भाडेकरुंना देण्यात आलेले १३,४३७.६३ चौ.मी. क्षेत्रफळ वजा केल्यानंतर विकासकास ७३९०.७० चौ.मी. **FSI** उपलब्ध होते.विकसकास उपलब्ध असलेल्या जागेचे बाजारमुल्य रु.३,५८९.०३ लाख होते. मुद्राक जिल्हाधिकारी मुंबई ने रु.१७,५००/- प्रति चौ.मी. दराने भाडेकरुंना दिलेल्या १३,४३७.६३ चौ.मी. जागेच्या बांधकामाचा खर्च म्हणून रु.२,३५१.५९ लाख वजा केले. मुद्राक जिल्हाधिकारी मुंबई ने आकारणीयोग्य बाजारमुल्य रु.३,५८९.०३ लाख ऐवजी बाजारमुल्य रु.१,१७३.४९ लाख वर रु.५८.६७ लाख मुद्रांक शुल्क आकारले यामुळे रु.१२०.७८ लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली.
ADJ-M-४४४९/११ दिनाक २०/१२/११	दादर नायगांव येथे असलेल्या ३,२७१ चौ.मी. ज्याचे अनुज्ञेय **FSI** ११,१९६.३५ चौ.मी.होते.अशा मालमत्तेचा करारनामा संलेखात भाडेकरुंना देण्यात आलेले ७,४६४.२३ चौ.मी. क्षेत्रफळ वजा केल्यानंतर विकसकास ३,७३२.१२ चौ.मी. **FSI** उपलब्ध होते. विकसकास उपलब्ध असलेल्या जागेचे बाजारमुल्य रु.१,८९४.०९ लाख मधून वजा केले.मुद्रांक जिल्हाधिकारी मुंबईने रु.१६,०००/- प्रति चौ.मी.दराने भाडेकरुंना दिलेल्या ७,४६४.२३ चौ.मी.जागेच्या बांधकामाचा खर्च म्हणून रु.१,१९४.२८ लक्ष,रु.१८९४.०९ लाख मधून वजा केले.याची तुलना खरेदीदाराने विक्रेत्यास दिलेल्या रु.७२५.०० लाख मोबदल्याशी केली गेली. आणि आकारणीयोग्य बाजारमुल्य रु.१,८९४.०९ लाख मोबदल्याची किंमत जास्त आहे.असे गृहीत धरुन रु.३६.२५ लाख मुद्रांक शुल्क आकारण्यात आले त्यामुळे रु.५८.४५ लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली.
ADJ-M-७५८/१२ दिनाक २३/०४/१२	माजगांव येथे असलंल्या १,६०५ चौ.मी.,ज्याचे अनुज्ञेय **FSI** ९९६८.२५ चौ.मी. होते.अशा मालमत्तेच्या अभिहस्तांतरण पत्र संलेखात भाडेकरुंना देण्यात आलेले ५,९७६.३५ चौ.मी.क्षेत्रफळ वजा केल्यानंतर विकसकास ३,३२२.७५ चौ.मी. **FSI** उपलब्ध होते.विकसकास उपलब्ध असलेल्या जागेचे बाजारमुल्य रु.१,२८६.६० लाख काढण्यात आले. मुद्रांक जिल्हाधिकारी मुंबईने रु.१७,५००/-प्रति चौ.मी.दराने भाडेकरुंना दिलेल्या ५,९७६.३५ चौ.मी जागेच्या बांधकामाचा खर्च म्हणून रु.१,०४५.८६ लक्ष,रु.१२८६.६० लाख मधून वजा केले.आणि याची तुलना खरेदीदाराने विक्रेत्यास दिलेल्या रु.२५०.०० लाख मोबदल्याशी केली गेला.आकारणीयोग्य बाजारमुल्य रु.१२८६.६० लाख मोबदल्याची किंमत जास्त आहे.असे गृहीत धरुन रु.१२.५० लाख मुद्रांक शुल्क आकारण्यात आले.त्यामुळे रु.५१.८३ लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली.

तक्ता क्रं.४.३.९.१

(१)	(२)	(३)	(४)
ADJ-M-४१८०/११ दिनाक २५/११/११	गिरगांव येथे असलेल्या ३,३४३.५७ चौ.मी.,ज्याचे अनुज्ञेय **FSI** ८,३५८.९३ चौ.मी.होते,अशा मालमत्तेच्या विकास करारनामा संलेखात भाडेकरुंना दंण्यात आलेले ५,२२४.४४ चौ.मी.आणि जमीन मालकास देण्यात आलेले ३७१.७५ चौ.मी. क्षेत्रफळ वजा केल्यानंतर विकसकास २,७६२.७४ चौ.मी. **FSI** उपलब्ध होते.विकसकास उपलब्ध असलेल्या जागेचे बाजारमुल्य रु.१,९३९.४४ लाख काढण्यात आले.मुद्रांक जिल्हाधिकारी मुंबईने रु.१६,०००/- प्रति चौ.मी.दराने भाडेकरुंना दिलेल्या ४,०१४.८७ चौ.मी.जागेच्या बांधकामाचा खर्च म्हणून रु.६४२.३८ आणि जमीन मालकास देण्यात आलेल्या ३७१.७५ चौ.मी.जागेच्या बांधकामाचा खर्च म्हणून रु.२६०.९७ लाख वजा केले. मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी रु.१,९३९.४४ लाख ऐवजी बाजारमुल्य रु.१,२९७.०६ लाखावर रु.६४.८५ लाख मुद्रांक शुल्क आकारले. त्यामुळे रु.३२.१२ लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली.

ज्ञापन

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसुल विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :-

या परीच्छेदामध्ये मुद्रांक जिल्हाधिकारी मुंबईची ७४, मुद्रांक जिल्हाधिकारी, अंमलबजावणी क्र-१ यांचे -०१, व मुद्रांक जिल्हाधिकारी अंमलबजावणी क्र-२ ची ०६ प्रकरणे अशा एकुण ८१ प्रकरणांचा समावेश आहे.

या परिच्छेदातील दस्तावर तपासणी पथकाने असा आक्षेप घेतला आहे की, मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी उपकर प्राप्त (सेस **A** च्या इमारतींच्या भाडेकरु असलेल्या इमारतीचे अभिनिर्णय करताना बा.मु. दर तक्त्यातील सुचना व विकास नियंत्रण नियमावली यांच्या तरतूदी विचारात न घेता बाजार मुल्य करताना भाडेकरु यांना मिळणारे बांधकाम क्षेत्राची किंमत ही घेणार / विकासक यास मिळणा-या शिल्लक **FSI** मुल्यांतून वजावट दिलेले आहे.तसेच बाजारमूल्याची निश्चिती करताना भाडेकरुना मोबदला म्हणून बांधून दयावयांचे क्षेत्र यांची गणना मोबदला रकमेत निश्चीत केलेली नाही.त्यामुळे शासनांचे रु.१६.३९ कोटी इतके मुद्रांक शुल्क व दंड कमी वसुल झाला आहे.

या बाबत मा.सचिव मदत व पुर्नवसन व महालेखापाल नागपुर यांच्या समवेत दिनांक-१८.०९.२०१४ रोजी झालेल्या निर्गमन परिषदेच्या (EXIT CONFERANCE) बैठकी मध्ये खालील प्रमणे अभिप्राय सादर करण्यात आले,

विभागाने सविस्तर मुंबई स्थित उपकर प्राप्त (सेस **A** च्या इमारतींच्या भाडेकरु असलेल्या इमारतींचे मुल्यांकन करणेबाबत सविस्तर सुचना निर्गमित केलेल्या आहेत. परीच्छेदातील सर्व दस्त भाडेकरुव्याप्त मिळकती संदर्भातील आहेत. भाडेकरुव्याप्त उपकर प्राप्त मिळकतींचा पुर्नविकास करताना विकासकास प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांक मिळतो. मात्र विकासकास या प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांकातून पुर्नवसनाचे बांधकामाचा खर्च व तद्नुषंगिक इतर खर्च सहन करावे लागतात. मूल्यांकन करताना विकसनकर्त्यास प्राप्त होणा-या प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांकाचे मूल्यांकन केले जाते. त्यामुळे पुर्नवसनाचे बांधकामाचा खर्च वजावट म्हणून विचारात घेणे आवश्यक असलेने अप्पर मुद्रांक नियंत्रक व मुद्रांक जिल्हाधिकारी यांना याप्रमाणे दि.१४/१/२०११च्या पत्रान्वये मार्गदर्शन केले आहे. सदर बाब दि.४/९/१२ व दि.२५/७/२०१४ च्या पत्रान्वये सिनिअर ऑडिट ऑफिसर यांना आक्षेपाच्या अनुषंगाने कळविले आहे.त्यामुळे मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी केलेली मूल्यांकनाची कार्यवाही योग्य आहे.सबब आक्षेप अमान्य करण्यात येत आहे.

तसेच सर्व प्रकरणातील मुल्यांकनाबाबत एक सारखेपणा व समानता येण्यासाठी सवीस्तर मार्गदर्शन सुचना सन २०१६ पासूनच्या बाजारम मुल्य दर तक्त्यासोबत सुचना दिल्या आहेत

४.३.९.२

मालमत्तेच्या बाजार मुल्यातून भाडेकरूंनी व्यापलेल्या क्षेत्राची बांधकाम किंमत वजा करण्यात आली आहे.-

वरील प्रकरणांत भाडेकरुना देऊ केलेल्या जागेच्या बांधकामाची किंमत वजा करून वास्तव बाजार मूल्य ठरविले होते. परंतु पुढे असे निदर्शनास आले की मुद्रांक जिल्हाधिकारी, मुंबई एन्फोर्समेंट नं **I** आणि **II** मुंबई यांनी अभिनिर्णित केलेल्या

अभिहस्तांतरण पत्र व विकास करारनाम्यात एक सारख्याच प्रकरणांत भ्राडेकरूंना देऊ केलेल्या जागेच्या बांधकामाची किंमत वजा न करता बाजार मूल्याची किंमत ठरविली. उदाहरणार्थ काही प्रकरणे, ज्यात मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी भाडेकरुंना देऊ केलेल्या जागेच्या बांधकामाचा खर्च वजा करण्यात आला नाही. तक्ता ४.३.९.२ मध्ये देण्यात आली नाही.

तक्ता ४.३.९.२

अनु क्रं. (१)	मुद्रांक जिल्हाधिका-याचे नांव (२)	अभिनिर्णय प्रकरण क्रं . आणि दिनांक (३)	मालमत्तेचे स्थान (४)	FSI (५)	भुखंडाचे एकुण क्षेत्र (६)	भाडेकरुना द्यावयाचे क्षेत्र (७)
१	मुंबई	५४७/२०११ दि. ०९.०२.२०११	परेल शेवडी	२.५	१,१६८,०७	१,३५५,०१
२	मुंबई	२७७/२०११ दि.०५.०२.२०११	लोअर परेल	३	२,३२१,९३	४,९५१,४९
३	मुंबई	३६५१/११ दि. ३०.४.२०११	भायखळा	१.५	७१६.५६	६९७.०२
४	मुंबई	२८६५/११ दि. ०६.०९.२०११	भुलेश्वर	४	७.७११.६१	१६,०२६,०२
५	एन्फोर्समेंट-२	SDE-New-२८/२०१२ दिनांक ०९.०१.१२	मांटुंगा	३	५४२,५६	२१०,२२

ज्ञापन

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसुल विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :-

या परीच्छेदामध्ये मुद्रांक जिल्हाधिकारी मुंबई, मुद्रांक जिल्हाधिकारी अंमलबजावणी क्र-१, व मुद्रांक जिल्हाधिकारी अंमलबजावणी क्र-२ या कार्यालयातील ५ अभीनीर्णीत प्रकरणाचा समावेश आहे.

या बाबत निर्गमन परिषदेत (EXIT CONFERANCE) मध्ये झालेल्या चर्चे मध्ये खालील कारणास्तव परीच्छेदावरील आक्षेप अमान्य करण्यात आलेला आहे.

उपकर प्राप्त इमारती या केवळ मुंबई शहरामध्ये असून, इतरत्र नाहीत. उपनगरांमध्ये भाडेकरु व्याप्त सोसायटींच्या इमारती आहेत. या इमारतींचा पुनर्विकास करताना प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांक मिळत नाही. त्यामुळे मुद्रांक जिल्हाधिकारी, कुर्ला यांचे कार्यालयाने व Enforcement I & II यांनी उपनगरातील भाडेकरु व्याप्त इमारतीच्या विकसन करारनामा/ खरेदीखताचे मूल्यांकनामध्ये बांधकाम खर्चाची वजावट दिली नसावी. अपर मुद्रांक नियंत्रक व मुद्रांक जिल्हाधिकारी यांना याप्रमाणे दि. १४/१/२०११ च्या पत्रान्वये मार्गदर्शन केले आहे. सदर बाब दि. ४/९/१२ व दि. २५/७/२०१४ च्या पत्रान्वये सिनिअर ऑडिट ऑफिसर यांना आक्षेपाच्या अनुषंगाने कळविले आहे. त्यामुळे मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी केलेली मूल्यांकनाची कार्यवाही योग्य आहे. सबब आक्षेप अमान्य करण्यात येत आहे. सर्व प्रकरणातील मुल्यांकनाबाबत एक सारखेपणा व समानता येण्यासाठी सवीस्तर मार्गदर्शन सुचना सन २०१६ पासूनच्या बाजारम मुल्य दर तक्त्यासोबत सुचना दिल्या आहेत.

४.३.९.३

मालमत्तेच्या बाजारमूल्यांत भाडेकरुनी व्यापलेल्या क्षेत्राची बांधकाम किंमत मिळविण्यात आली.

मुद्रांक जिल्हाधिकारी,कुर्ला व्दारे संलेख अभिनिर्णीत करतांना पाचसारख्याच प्रकरणांत भाडेकरुंना देऊ केलेल्या जागेच्या बांधकामाची किंमत मोबदल्यास सोडून मालमत्तेच्या बाजारमुल्याची किंमत ठरविली आहे.त्याचा तपशील तक्ता ४.३.९.३ मध्ये दिला आहे.

तक्ता ४.३.९.३

अनु क्रं.	अभिनिर्णय प्रकरण क्रं.आणि दिनांक	मालमत्तेचे स्थान	भुखंडाचे एकुण क्षेत्र	भाडेकरुना द्यावयाचे क्षेत्र	भाडेकरुना द्यावयाचे जागेच्या बांधकामाची किंमत मोबदल्यात समाविष्ट आहे
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१	ADJ-४९७/१३/K दि. २७.०५.१३	बोरला	१,२५१,४२	१,०७०,६३	१८८.४३
२	ADJ-३६४/१३/K दि. २३.०४.१३	कुर्ला-१	५०८.७	५४०	९५.०४
३	ADJ-१२५८/१३/K दि ०४.१२.१३	घाटकोपर	१,८१२,७	१,१५४,७८	२०३.२४
४	ADJ-१८२/१२/K दि. १९.०४.१२	कुर्ला-१	५०८	३६०	५७.६०
५	ADJ-११७२/११/K दि. ०२.०५.११	कुर्ला-१	५०८	३६०	५४.००

ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसुल विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :-

या परीच्छेदामध्ये मुद्रांक जिल्हाधिकारी, कुर्ला कार्यालयातील ५ अभिनिर्णीत प्रकरणांचा समावेश आहे.

या बाबत निर्गमन परिषदेत (EXIT CONFERANCE) मध्ये झालेल्या चर्चे मध्ये खालील कारणास्तव परीच्छेदावरील आक्षेप अमान्य करण्यात आलेला आहे.

उपकर प्राप्त इमारती या केवळ मुंबई शहरामध्ये असून, इतरत्र नाहीत. उपनगरांमध्ये भाडेकरु व्याप्त/ सोसायटींच्या इमारती आहेत. या इमारतींचा पुनर्विकास करताना प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांक मिळत नाही. त्यामुळे मुद्रांक जिल्हाधिकारी, कुर्ला यांनी उपनगरातील भाडेकरु व्याप्त इमारतीच्या विकसन करारनामा/ खरेदीखताचे मूल्यांकनामध्ये बांधकाम खर्चाची वजावट दिली नसावी. अपर मुद्रांक नियंत्रक व मुद्रांक जिल्हाधिकारी यांना याप्रमाणे दि.१४/१/२०११ च्या पत्रान्वये मार्गदर्शन केले आहे. सदर बाब दि.४/९/१२ व दि.२५/७/२०१४ च्या पत्रान्वये सिनिअर ऑडिट ऑफिसर यांना आक्षेपाच्या अनुषंगाने कळविले आहे.त्यामुळे मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी केलेली मूल्यांकनाची कार्यवाही योग्य आहे. सबब आक्षेप अमान्य करण्यात येत आहे. सर्व प्रकरणातील मुल्यांकनाबाबत एक सारखेपणा व समानता येण्यासाठी सविस्तर मार्गदर्शन सुचना सन २०१६ पासूनच्या बाजार मुल्य दर तक्त्यासोबत सुचना दिल्या आहेत

४.३.९.४

मुंबई उपनगरी जिल्हयात वसलेल्या मालमत्तेच्या मुल्यांकनासाठी वेगवेगळया पद्धती-

तसेच, मुद्रांक शुल्क चुकविणे प्रकरणांच्या नमुना चाचणीत मुद्रांक जिल्हाधिकारी, एन्फोर्समेंट-II, मुंबई कार्यालयात आम्हाला असे निदर्शनास (मे-२०१४) असे की मुंबई उपनगरी जिल्हयात वसलेल्या मालमत्तेचा विकास करारनामा/अभिहस्तांतरण पत्र संलेख अभिनिर्णयाच्या नऊ प्रकरणांपैकी, सात प्रकरणांत मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी मालमत्तेच्या बाजारमुल्याची परिगणना खरेदीदार/विकासक यांच्यासाठी उपलब्ध FSI च्या बाजारमुल्यातून भाडेकरूंना दयावयाच्या जागेवरील बांधकामाचा खर्च वजा न करता करण्यात आली. तथापि, उर्वरित दोन प्रकरणांत मालमत्तेची बाजारमुल्य परिगणना खरेदीदार/विकासक यांच्यासाठी उपलब्ध FSI च्या बाजारमुल्यातून भाडेकरुंना द्यावयाच्या जागेवरील बांधकामाचा खर्च वजा करून करण्यात आली. त्यामुळे रू. १५.२७ लाख मुद्रांकशुल्क आणि शास्तीची तक्ता ४.३९.४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे कमी आकारणी करण्यात आली.

तक्ता ४.३.९.४

अभिनिर्णय प्रकरण क्रं. (१)	गैरप्रकाराचे स्वरूप (२)
SDE-NEW-३५२/१२	अंधेरी येथे असलेल्या १.१०१.६४ चौ.मी. मालमत्तेच्या विकास करारनामा संलेखात मुद्रांक जिल्हाधिकारी एन्फोर्समेंट- II मुंबईने रू. १६,०००/- प्रति चौ.मी. दराने भाडेकरूंना दिलेल्या ९६५.९१ चौ.मी जागेच्या बांधकामाचा खर्च म्हणून रू. १.५५ कोटी वजा केले. तथापि बांधकाम किंमतीवर मुद्रांक शुल्क न आकारल्यामुळे रू. ८.७८ लाख शासकीय महसुल कमी आकारण्यात आले ज्यात रू. ०.३४ लाख शास्तीची रक्क्म अंतर्भुत होती
SDE-NEW-३८७/१२	वळनई येथे असलेल्या १.३३८.६० चौ.मी. मालमत्मेच्या विकास करारनामा संलेखात मुद्रांक जिल्हाधिकारी एन्फोर्समेंट- II मुंबईने रू.१६,०००/- प्रति चौ.मी. दराने जमिन मालकाला दिलेल्या ९३७.०२ चौ.मी. जागेच्या बांधकामाचा खर्च म्हणून रू.१४९.८२ लाख वजा केले तथापि बांधकाम किंमतीवर मुद्रांक शुल्क न आकारल्यामुळे रू.६.४९ लाख शासकीस महसूल कमी आकारण्यात आले. ज्यात रू.०.१३ लाख शास्तीची रक्कम अंतर्भुत होती.

अश्याप्रकारे भाडेदारीवर दिलेल्या मालमत्तेचा विकास प्रकरणांमध्ये वास्तव्य बाजारमुल्यांच्या मूल्यांकन पद्धतीस एकरूपता नसल्यामुळे मुद्रांक शुल्काची कमी आकारणी करण्यात आली.

निर्गमन परिषदेत (सप्टेंबर २०१४) प्रधान सचिव यांनी कार्यपद्धतीत एकरूपता आणण्याची आवश्यकता आहे हे तथ्य मान्य केले आणि पमुद केले की याबाबत व्यापक परिपत्रके/मार्गदर्शन तत्व निर्गमित करण्यात येईल.

प्रधान सचिवांनी पुढे नमूद केले की मुंबईतील मुद्रांक जिल्हाधिकारी एन्फोर्समेंट-I आणि II ची कार्यालये सह संचालक, नगररचना पुणे यांचे द्वारे निर्गमित, वर उल्लेखित दिनांक १४ जानेवारी २०११ च्या पत्रातील सुचनांचे योग्यतेबाबत मूक होते. सुचनांच्या योग्यतेच्या वैधतेची तपासणी करावयास पाहिजे आणि ते एकसमान करावयास पाहिजे.

अशी शिफारस करण्यात येते की विभागाने १४ जानेवारी २०११ च्या पत्राद्वारे निर्गमित सह संचालक, नगररचना पुणे यांच्या सुचनांची वैधता तपासवयास पाहिजे आणि त्यास समानतेने लागू करावयास पाहिजे. तथापि, महसूली जमेचे हित विचारात घेऊन मालमत्तेच्या बाजारमूल्यातून भाडेकरूंना दिलेल्या जागेवरील बांधकाम खर्च वजा करणेबाबत स्पष्टीकरण प्राप्त होईपर्यन्त हा खर्च वजा करावयास नको.

ज्ञापन

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसुल विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :-

या परीच्छेदामध्ये मुद्रांक जिल्हाधिकारी,अंमलबजावणी-२ यांचे कार्यालयातील ४ अभिनिर्णीत प्रकरणांचा समावेश आहे.

या बाबत निर्गमन परिषदेत (EXIT CONFERANCE) मध्ये झालेल्या चर्चे मध्ये खालील कारणास्तव परीच्छेदावरील आक्षेप अमान्य करण्यात आलेला आहे.

उपकर प्राप्त इमारती या केवळ मुंबई शहरामध्ये असून, इतरत्र नाहीत. उपनगरांमध्ये भाडेकरु व्याप्त/ सोसायटींच्या इमारती आहेत. या इमारतींचा पुनर्विकास करताना प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांक मिळत नाही. त्यामुळे मुद्रांक जिल्हाधिकारी, अंमलबजावणी २ यांनी उपनगरातील भाडेकरु व्याप्त इमारतीच्या विकसन करारनामा/ खरेदीखताचे मूल्यांकनामध्ये बांधकाम खर्चाची वजावट दिली नसावी. अपर मुद्रांक नियंत्रक व मुद्रांक जिल्हाधिकारी यांना याप्रमाणे दि.१४/१/२०११ च्या पत्रान्वये मार्गदर्शन केले आहे. सदर बाब दि.४/९/१२ व दि.२५/७/२०१४ च्या पत्रान्वये सिनिअर ऑडिट ऑफिसर यांना आक्षेपाच्या अनुषंगाने कळविले आहे.त्यामुळे मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी केलेली मूल्यांकनाची कार्यवाही योग्य आहे. सबब आक्षेप अमान्य करण्यात येत आहे.

अशा प्रकारच्या प्रकरणात एक सारखेपणा असावा यासाठी दिनांक ३०.१२.२०१४ व ३१.१२.२०१४ रोजी परीपत्रके निर्गमीत केलेले असून तशा सुचना सन २०१६ - २०१७ बाजार मुल्य दर तक्त्यामध्ये सुचना क्रमांक १, २३ व २७ समावीष्ट केलेली आहे. सर्व प्रकरणातील मुल्यांकनाबाबत एक सारखेपणा व समानता येण्यासाठी सवीस्तर मार्गदर्शन सुचना सन २०१६ पासूनच्या बाजार मुल्य दर तक्त्यासोबत सुचना दिल्या आहेत

४.३.९.५

ASR मधील निर्देशांचे पालन करणे यात एकरूपता नसल्यामुळे एक अभिहस्तांतरणपत्रात मुद्रांक शुल्काची कमी आकारणी

वार्षिकमूल्य दर तक्ता मधील सूचना ४ प्रमाणे जुन्या मालमत्तेचे मूल्य करतांना घसारा आकारल्यानंतर आलेले मूल्य विकसित जागेच्या मूल्यांपेक्षा कमी आले मर मूल्यांकन, जागा अधिक बांधकामकिंमत पद्धतीनुसार करावयास पाहिजे म्हणजे (जागेचे दर + बांधकाम किंमतीचे घसारा आकारल्यावरील दर) x १२० x घटकाचे क्षेत्रफळ

मुद्रांक जिल्हाधिकारी मुंबई ने अभिनिर्णित केलेल्या अभिहस्तांतरणपत्र अभिलेखात आम्हाला असे निदर्शनास आले की विक्रेत्याने खरेदीदारास संपुर्ण क्रय्क्ष सहीत ज्यात २,४५० चौ.मी. सेट बॅक (Set back) जमीनीचे FSI आणि ८३७.५३ चौ.मी. क्षत्रेफळावर असलेल्या सहा औद्योगिक घटकासह जमिनीवर उपलब्ध असलेले हस्तांतरण विकास क्षेत्र (TDR) समाविष्ट होते अशी ७,११६.४७ चौ.मी. जागा विकली त्या जागेचे मूल्य रू. १७.६० कोटी काढण्यात आले आणि त्यावर रू. ८८ लाख मुद्रांक शुल्क आकारण्यात आले. परिगणणा तकत्यावरून आम्हाला असे आढळले की, जुन्या औद्योगिक घटकांचे बाजारमुल्य निर्धारित करतांना जरी घसारा आकारल्यानंतर निघालेले मुल्य रू. (७१,६०० प्रती चौ.मी.) विकसीत जागेच्या मुल्यापेक्षा (रू. ८०,७०० प्रति चौ.मी.) कमी होते.तरीही तेथे जागा अधिक बांधकाम मूल्य पद्धतीचा वापर केला गेला नाही. याशिवाय विभागाने भाडेकरुंना द्यावयाचे जागेच्या बांधकामाचा खर्च मालमत्तेचा बाजारमूल्यांतून वजा केला आणि बाजारमूल्य २० टक्क्याने भाडेदारीची किंमत भाडेकरूंना देण्यात येणारी नुकसान भरपाई इत्यादीसाठी कमी केले.

रू.३६.१८ कोटी बाजारमुल्यांवर रू. १.८१ कोटी मुद्रांक शुल्क आकारणीयोग्य होते. परिगणणा करण्यासाठी योग्य पद्धतीचा उपयोग न केल्यामुळे आणि अनियमित वजावट केल्यामुळे परिशिष्ट II मध्ये दर्शविल्याप्रमाणे रू.९२.९१ लाख मुद्रांक शुल्क कमी आकारण्यात आले.

आम्ही निदर्शनास आणल्यानंतर (जानेवारी २०१४) निर्गमन परिषदेत प्रधान सचिव यांनी सांगितले (सप्टेंबर २०१४) की उपसंचालक नगररचना (DDTP) यांनी मालमत्तेचे बाजार मुल्यांकन प्रस्थापित तत्वानुंसार केले.

विभागाने दिलेले उत्तर मालमत्तेच्या मूल्यांकनासाठी जमिन अधिक बांधका किंमत पद्धती बाबतच्या वार्षिक मूल्य दर तक्त्यातील सूचना क्रं.४ विनिर्दिष्ट सूचनेच्या विरूद्ध होते. यावरून असे निर्देशित होते.

ज्ञापन

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसुल विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :-

या परीच्छेदामध्ये मुद्रांक जिल्हाधिकारी, मुंबई यांचे कार्यालयातील प्रकरण क्रमांक adj-m-२१०/२०१३ या अभिनिर्णीत प्रकरणाचा समावेश आहे.

या बाबत निर्गमन परिषदेत (EXIT CONFERANCE) मध्ये झालेल्या चर्चे मध्ये खालील कारणास्तव परीच्छेदावरील आक्षेप अमान्य करण्यात आलेला आहे.

उपकर प्राप्त इमारती या केवळ मुंबई शहरामध्ये असून, इतरत्र नाहीत. उपनगरांमध्ये भाडेकरु व्याप्त/ सोसायटींच्या इमारती आहेत. या इमारतींचा पुनर्विकास करताना प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांक मिळत नाही. त्यामुळे मुद्रांक जिल्हाधिकारी, मुंबई

शहर यांनी उपनगरातील भाडेकरु व्याप्त इमारतीच्या विकसन करारनामा/ खरेदीखताचे मूल्यांकनामध्ये बांधकाम खर्चाची वजावट दिली नसावी. अप्पर मुद्रांक नियंत्रक व मुद्रांक जिल्हाधिकारी यांना याप्रमाणे दि.१४/१/२०११ च्या पत्रान्वये मार्गदर्शन केले आहे. सदर बाब दि.४/९/१२ व दि.२५/७/२०१४ च्या पत्रान्वये सिनिअर ऑडिट ऑफिसर यांना आक्षेपाच्या अनुषंगाने कळविले आहे. त्यामुळे मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी केलेली मूल्यांकनाची कार्यवाही योग्य आहे. सबब आक्षेप अमान्य करण्यात येत आहे.

अशा प्रकारच्या प्रकरणात एक सारखेपणा असावा यासाठी दिनांक ४.११.२०१५ रोजी परीपत्रक नीर्गमीत केलेले असून तशा सुचना सन २०१६ च्या बाजार मुल्य दर तक्त्यामध्ये सुचना समावीष्ट केलेली आहे.

४.३.९.६

एकाविकास करारनाम्यास बाजारमूल्याची चुकीची परिगणणा केल्यामुळे मुद्रांक शुल्क आणि शास्तीची कमी आकारणी

मुद्रांक जिल्हाधिकारी एन्फोर्समेंट II मुंबई कार्यालयात आम्हाला असे आढळले (मे २०१४) की एका प्रकरणांत जे मुंबई उपनगरी जिल्हा येथील एक मोठया भुखंडावर असलेल्या ६.१६५ चौ.मी .विकास करारनामा बाबत होते. मुद्रांक जिल्हाधिका-याने जमिनमालकाच्या वतीने MCGM ला द्यावयाच्या जागेच्या बांधकामाची किंमत रू. ९७.९८ लाख बाजारमूल्य रू. १७.१४ कोटीतून वजा केले.मुद्रांक जिल्हाधिका-यांने रु.१३.९६ कोटी वास्तव बाजारमुल्य काढले.आणि रु.६९.७९ लाख मुद्रांक शुल्क आकारले. बाजारमुल्यातून बांधकाम किंमत वजा केल्याने तक्ता ४.३.९.६ मध्ये दर्शविल्याप्रमाणे रु.०.९५ लाख शास्तीसह रु.१६.८५ लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली.

तक्ता क्र.४.३.९.६

अभिनिर्णय क्र. (१)	SDE/NEW/०२/१३ (२)
जमीन मालकाने विकासासाठी दिलेले FSI चौरस मीटरमध्ये	६,१६५
विकासकाजवळ उपलब्ध असलेले विकणेयोग्य FSI चे बाजारमुल्य @ २७८००/- प्रति चौरसमिटर (६,१६५ x २७८००/-)	१,७१३.८७
रोख स्वरुपात मोबदला	१३९०.००
हस्तांतरण करावयाचे असणा-या ६१२४३ चौरसमीटर बिल्ट-अप जागेच्या बांधकामाची किंमत	९७.९९
एकूण मोबदला	१.४८७,९९
विकास करावयाचे असणा-या FSI चे बाजारमुल्य जास्त असल्यामूळे मुद्रांकशुल्क बाजारमुल्यावर आकारणीयोग्य	१,७१३.८७
अनुच्छेद २५(b) नुसार आकारणीयोग्य मुद्रांक शुल्क @ ५ टक्के	८५.६९
जमीन मालकाने विकासासाठी दिलेले FSI चौरस मीटरमध्ये	६,१६५
विकासकाजवळ उपलब्ध असलेले विकणेयोग्य FSI चे बाजारमुल्य @ २७८००/- प्रति चौरसमिटर (६,१६५ x २७८००/-)	१,७१३.८७
आकारलेले मुद्रांक शुल्क	६९.७९
कमी आकारलेले मुद्रांक शुल्क	१५.९०
३ महीण्यासाठी लावलेली शास्ती @ २ टक्के = ६ टक्के	०.९५
एकूण कमी आकारलेले मुद्रांक शुल्क आणि शास्ती	१६.८५

हे विभागाच्या निदर्शनास आणण्यात आले, त्याचे उत्तर प्राप्त झाले नाही (डिसेंबर २०१४)

अशी शिफारस करण्यात येते की मुद्रांक शुल्क आकारणीसाठी बाजारमुल्याचे निर्धारणासाठी समानता राखण्यासाठी संलेखाचे मोबदला/बाजारमुल्य परीगणीत करताना ज्या बाबी विचारात घ्यावयास पाहीजे त्यांच्या वर्गीकरणाबाबत उचीत मार्गदर्शक तत्व/ सूचना विनिर्दिष्ट करावयास पाहीजे आणी ते समानतेने लागू करावयास पाहीजे. याखेरीज, विभागामधून वा मुल्यदर तक्त्यात निर्गमीत केलेल्या सुचनांचे समानतेने पालन होण्याची शासनाने खातरजमा करावी.

ज्ञापन

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसुल विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :-

या परीच्छेदामध्ये मुद्रांक जिल्हाधिकारी,अंमलबजावणी-२ यांचे कार्यालयातील अभिनिर्णय प्रकरण क्र-SDE/NEW/०२/ १३ या प्रकरणांचा समावेश आहे.

या बाबत निर्गमन परिषदेत (EXIT CONFERANCE) मध्ये झालेल्या चर्चे मध्ये खालील कारणास्तव परीच्छेदावरील आक्षेप अमान्य करण्यात आलेला आहे.

उपकर प्राप्त इमारती या केवळ मुंबई शहरामध्ये असून, इतरत्र नाहीत.

उपनगरामध्ये भाडेकरु व्याप्त/सोसायटींच्या इमारती आहेत. या इमारतींचा पुनर्विकास करताना प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांक मिळत नाही. त्यामुळे मुद्रांक जिल्हाधिकारी, अंमलबजावणी २ यांनी उपनगरातील भाडेकरु व्याप्त इमारतीच्या विकसन करारनामा/ खरेदीखताचे मूल्यांकनामध्ये बांधकाम खर्चाची वजावट दिली नसावी. अप्पर मुद्रांक नियंत्रक व मुद्रांक जिल्हाधिकारी यांना याप्रमाणे दि.१४/१/२०११ च्या पत्रान्वये मार्गदर्शन केले आहे. सदर बाब दि.४/९/१२ व दि.२५/७/२०१४ च्या पत्रान्वये सिनिअर ऑडिट ऑफिसर यांना आक्षेपाच्या अनुषंगाने कळविले आहे. त्यामुळे मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी केलेली मूल्यांकनाची कार्यवाही योग्य आहे. सबब आक्षेप अमान्य करण्यात येत आहे.

अशा प्रकारच्या प्रकरणात एक सारखेपणा असावा यासाठी दिनांक ३०.१२.२०१४ व ३१.१२.२०१४ रोजी परीपत्रके नीर्गमीत केलेले असून तश्या सुचना सन २०१६ - २०१७ बाजार मुल्य दर तक्त्यामध्ये सुचना क्रमांक १, २३ व २७ समावीष्ट केलेली आहे.

४.३.१०

प्रवर्ग 'अ' च्या अभ्यर्पित विना इमारतीना असा चूकीचा दर्जा आणी बाजारमुल्याची चुकीची परिगणना

मुद्रांक जिल्हाधिकारी,मुंबई आणी मुद्रांक जिल्हाधिकारी एन्फोर्समेंट १ आणी २, मुंबई यांच्या कार्यालयातील अभिनिर्णय प्रकरणांच्या तपासणीत (फेब्रवारी आणी मे २०१४) आम्हाला असे दिसून आले की खालील दोन प्रकरणामध्ये जरी प्रवर्ग 'अ' अभ्यर्पित इमारती असल्या तरीही मुद्रांक जिल्हाधीका-याने वास्तव बाजारमुल्य निर्धारीत करतेवेळी हे तथ्य लक्षात घेतले नाही. परीणामी FSI ची चुकीची परिगणना करण्यात आली आणी पुढील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे बाजारमुल्याचे निर्धारण करण्यात आले.

ज्ञापन

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसुल विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :-

जुने इमारतीचे बाजारमुल्य निर्धारीत करण्यासंबंधी सुचनांचा अवलंबन करुन भाडेकरु व्याप्त मिळकतीच्या किंमती निर्धारणाबाबत आक्षेप घेण्यात आलेला आहे त्याचा सविस्तर तपशील पुढील परीच्छेदात आहे.

४.३.१०.१ DCR १९९१ प्रमाणे प्रवर्ग अ अभ्यर्पित इमारतींसाठी FSI ३/२.५ होता किंवा पुर्नवसन क्षेत्र अधिक या पुनर्वसन क्षेत्राच्या ५० टक्के प्रोत्साहन,यापैकी जे अधिक राहील आणि विना अभ्यर्पित मालमत्तेसाठी FSI १.३३ होता.-

मुंबई इमारती दुरूस्ती आणि पुनःबांधकाम मंडळाच्या अभ्यर्पित इमारती डेटाबेसच्या उलट तपासणीत असे आआळले की मालमत्ता प्रवर्ग अ ची होती परंतु इमारतीला विना अभ्यर्पित म्हणून चुकीचे गृहीत धरले होते. DCR १९९१ प्रमाणे प्रत्येक

प्रकरणात मालमत्तेचे एकूण FSI ३,३७१.७० चौरस मीटर होते,ज्यावेळी मुद्रांक जिल्हाधिकारी एन्फोर्समेंट १, मुबईने १,८८३.७३ चौरस मिटर गृहीत धरले होते. परिणामी, बाजारमुल्याचे निर्धारण करताना २,९७५.८२ चौरस मिटर क्षेत्र कमी घेण्यात आले, ज्याचे बाजारमुल्य रु. २२.९४ कोटी होते. तपशील खाली दर्शविला आहे

एका प्रकरणात मालमत्तेचे बाजारमुल्य रु.९.८३ कोटी होते.ज्यावर रु.९८.३९ लाख मुद्रांक शुल्क आकारणी योग्य होते,त्याऐवजी रु.१.६० लाख मुद्रांक शुल्क आकारण्यात आले.

दूस-या एका प्रकरणात मालमत्तेचे बाजारमुल्य रु.१३.११ कोटी होते.ज्यावर रु.६५.४९ लाख मुद्रांक शुल्क आकारणी योग्य होते,त्याऐवजी रु.०.३७ लाख मुद्रांक शुल्क आकारण्यात आले.

परीणामी रु. १.६२ कोटी मुद्रांक शुल्काची कमी वसुली झाली. याशिवाय रु. १.९८ कोटी शास्तीसुध्दा आकारणीयोग्य होती.

ज्ञापन

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसुल विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :-

या परीच्छेदामध्ये मुद्रांक जिल्हाधिकारी,अंमलबजावणी-१ यांचे कार्यालयातील अभिनिर्णीत प्रकरण क्र-ENF/१/EVN-३५२/०९ व ENF/१/EVN-३५४/०९ या दोन प्रकरणांचा समावेश आहे.

या बाबत निर्गमन परिषदेत (EXIT CONFERANCE) झालेल्या चर्चे मध्ये दोन्ही प्रकरणातील मीळकती या प्रत्यक्षात उपकर प्राप्त (सेस A कॅटेगीरी) मीळकती असून बाजार मुल्य निर्धारण करतांना सदरच्या इमारती उपकर प्राप्त नसलेल्या इमारती समजून बाजार मुल्य निर्धारीत केलेले आहे. थोडक्यात ५०% प्रोत्साहन एफएसआय समावीष्ट करुन बाजार मुल्य निश्चीत केले नाही. हा तपासणी पथकाचा आक्षेप मान्य करण्यात आलेला असून दस्त अभीनीर्णीत असल्याने प्रकरण ५३-अ खाली पुनर्विलोकनासाठी घेण्यात आलेले आहे. संबधीताना सुनावणीची संधी देवून अंतीम निर्णय घेण्यात येईल.

४.३.१०.२

याखेरीज, दुस-या चार प्रकरणामध्ये आम्हाला असे वाटत आले की मुद्रांक जिलहाधिका-याने मालमत्ता प्रवर्ग ' अ ' अभ्यर्पित इमारती म्हणून गृहीत धरली असली तरीही खरेदीदाराला DCR १९९१ च्या विनिमय क्र. ३३(७) अंतर्गत उपलब्ध आलेले प्रोत्साहनात्मक FSI ४,६५५.९ चौरस मीटर काढण्यात आले ज्याचे मुल्य रु. १९.४८ कोटी होते. याखेराज पठनावरुन असे निर्दशाीत होते की विकासकास ५६.४३ लाख भाडे प्राप्त झाले होते. अश्याप्रकारे खरेदीदारास उपलब्ध असलेले प्रोत्साहनात्मक FSI चे एकूण बाजारमुल्य रु.२०.०४ कोटी होते. ज्यावर १००.२२ लाख मुद्रांक शुल्क आकारणीयोग्य होते. विभागाने चुकीने विकासकास उपलब्ध असलेले क्षेत्र ४८६.९७ चौरस मीटर काढले आणि रु.२५.६० लाख मुद्रांक शुल्क आकारले, परिणामी,रु.७४.६२ लाख मुद्रांक शुल्क आणि त्यावर रु. २.६१ लाख शास्तीची कमी वसुली झाली.

अशाप्रकारे प्रवर्ग ' अ ' अभ्यार्पित चुकीची वागणूक दिल्यामूळे रु. २.३६ कोटी मुद्रांक शुल्क आणि रु. २.०१ कोटी शास्तीची कमी आकारणी झाली.

प्रधान सचिव यांनी र्निगमन परिषेदेत लेखापरीक्षा निरीक्षण मान्य केले (सप्टेंबर २०१४) आणि मुद्रांक शुल्क व शास्तीची तुट वसूल करण्यात येईल असे सांगितले, तथापी मुद्रांक शुल्क आणि शास्तीच्या तुटीच्या वसुलीचा अहवाल प्राप्त झाला नाही. (डिसेंबर २०१४)

ज्ञापन

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसुल विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :-

या परीच्छेदामध्ये मुद्रांक जिल्हाधिकारी,अंमलबजावणी-१ यांचे कार्यालयातील अभिनिर्णीत प्रकरण क्र-ENF/१/EVN-९४/१० व ENF/१/EVN-१७७/१० या दोन प्रकरणांचा समावेश आहे.

या बाबत निर्गमन परिषदेत (EXIT CONFERANCE) झालेल्या चर्चे मध्ये दोन्ही प्रकरणातील मीळकती या प्रत्यक्षात उपकर प्राप्त (सेस A कॅटेगीरी) मीळकती असून बाजार मुल्य निर्धारण करतांना सदरच्या इमारती उपकर प्राप्त नसलेल्या इमारती समजून बाजार मुल्य निर्धारीत केलेले आहे. थोडक्यात ५०% प्रोत्साहन एफएसआय समावीष्ट करुन बाजार मुल्य निश्चीत केले नाही. हा तपासणी पथकाचा आक्षेप मान्य करण्यात आलेला असून दस्त अभीनीर्णीत असल्याने प्रकरण ५३-अ खाली पुनर्विलोकनासाठी घेण्यात आलेले आहे. संबधीताना सुनावणीची संधी देवून अंतीम निर्णय घेण्यात येईल.

४.३.११

मुद्रांक शुल्काची कमी आकारणी

वार्षीक मुल्यदर तक्ता (ASR) २०११ च्या मार्गदर्शक तत्वामधील सूचना क्र. ३ अनुसार विकासाधिकाराचे हस्तांतरण (TDR) लादण्यासरठी पात्र् असलेल्या प्लॉटसच्या संदर्भात जमीन दराच्या ४० टक्के दर विचारात घ्यावयास पाहीजे.

वेगवेगळया पक्षकाराद्वारे एकाच मालमत्तेचे म्हणजेच मुंबई उपनगरी जिल्हयातील आकुर्ली गावातील ५,३४२.५० चौरस मीटर गावातील ५,३४२.५० मीटर भूखडाच्या भागासंबंधी निष्पादीत (डिसेंबर) आणि डिसेंबर २०१० दोन विकासाधिकार अभिहस्तांकन संलेखाच्या उलट तपासणीत (मे २०१४) असे आढळले की २ लाख चौरस फूटाचे (TDR) लादण्याबाबतचे सामर्थ्य अभिहस्ताकीतीच्या स्वाधीन करण्यात आले. परंतु मुद्रांक जिल्हाधिका-याने दुसरा संलेख अभिनिर्णीत करतेवेळी मुद्रांक शुल्काच्या आकारणीकरिता १.१५ लाख चौरस फुटाचा हा (TDR) ज्यात रु. ११.२५ कोटी अंतर्भुत आहे, विचारात घेतला नाही. परिणामी रु. ५६.२४ लाख मुद्रांक शुल्क आणि रु. ११.२५ लाख शास्तीची कमी आकारणी झाली.

आम्ही निदर्शनास आणल्यावर प्रधान सचिव यांनी र्निगमन परिषेदेत लेखापरिक्षा निरीक्षण मान्य केले (सप्टेंबर २०१४) आणि मुद्रांक शुल्क व शास्तीच्या वसुलीची प्रक्रीया सुरु करण्यात येईल असे सांगितले.

मुद्रांक शुल्क व शास्तीच्या वसुलीचा अहवाल प्राप्त झाला नाही (डिसेबर २०१४)

ज्ञापन

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसुल विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :-

या परीच्छेदामध्ये मुद्रांक जिल्हाधिकारी,अंमलबजावणी-१ यांचे कार्यालयातील अभिनिर्णीत प्र.क्र.SDE/NEW/६८५/२०११ या प्रकरणाचा समावेश आहे.

या बाबत निर्गमन परिषदेत (EXIT CONFERANCE) मध्ये झालेल्या चर्चे मध्ये मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी अभीनीर्णय करंताना दस्ताकींत मिळकतीमधील प्राप्त होणारा २ लाख चौ.फुट एफएसआय हा १,१५,००० चौ.फुट TDR लोड करण्याचे फायदयासह विचारात घेतला नाही हा परीच्छेदावरील आक्षेप मान्य करण्यात आलेला असून दस्त अभीनीर्णीत असल्याने प्रकरण ५३-अ खाली पुनर्विलोकनासाठी घेण्यात आलेले आहे. संबधीताना सुनावणीची संधी देवून अंतीम निर्णय घेण्यात येईल.

४.३.१२

पुरक करारनाम्यांवर मुद्रांक शुल्क न आकारणे

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम १९५८ च्या कलम १४ A अनुसार जेव्हा इतर पक्षकारांच्या संमतीने किंवा संमतीविना एखाद्या पक्षकाराने संलेखात महत्वाचे फेरफार केल्यामूळे संलेखाच्या स्वरुपात मोठा किंवा ठळक फेरफार होत असेल, त्याबाबतीत त्या संलेखाच्या फेरफार केलेल्या स्वरुपानुसार, त्यासाठी नवीन मुद्रांकीत कागदाचा वापर करणे आवश्यक आहे.

मुद्रांक जिल्हाधिकारी, मुंबईत एक करारनामा, जो एका नोंदणीकृत जोड विकास करारनाम्यापुढे चालू होता व जो "पुरक करारनामा पत्र" च्या शैलीत केला होता, विकासक-नि-मालक आणि संयुक्त विकासक यांच्यात लोअर परेल, मुंबई येथे स्थित जुन्या अभ्यर्पित इमारतीसह २५७८.४६ चौरस मीटर क्षेत्राच्या तीन प्लॉट पुनर्विकासासाठी निष्पादीत करण्यात आला.

आम्हाला असे लक्षात आले की या पुरक करानामा अंतर्गत मूळ करारनाम्याच्या स्वरूपात ठळक बदल करण्यात आले. मूळ करारनाम्यात सदर मालमत्तेचा विकास संयुक्तपणे करण्याचे आणि या प्रकल्पावरील खर्च वजा करुन त्यावरील नफा दोन्ही

पक्षकारामध्ये समान हिश्यात विभागण्याचे ठरले होते, तथापी पुरक करारनाम्या अंतर्गत दोन्ही पक्षकारामध्ये परस्पर सहमतीने ठरविणयात आले की या प्रकल्पाच्या निष्पादनावरील खर्च वजा केल्यानंतर, निव्वळ नफा विभागण्याऐवजी संयुक्त् विकासक एकटयाच बँक/वित्तीय संस्थाकडून निधीची व्यवस्था करेल आणि संयुक्त विकासक प्रकल्पाच्या निष्पादन आणि पुर्णतेसाठी लागणारा खर्च स्वतः सोसेल आणि करेल.

विकासक-नि-मालक पूरक करानामाच्या निष्पादनाच्या तारखेपासून या प्रकल्पाच्या निष्पादनासाठी कुठलीही गुंतवणूक करणार नाही. पुढे दोन्ही पक्षकाराने सहमतीने असे ठरविले की, प्रकल्पातील सदनिका विकासक-नि-मालक आणि संयफक्त विकासक यांच्या द्वारे आणि यांच्यात अनुक्रमे २७:७३ या गुणोत्तरात, प्रस्तावित इमारतीतील सर्व सदनिकांच्या एकूण क्षेत्रफळाच्या आधारावर विभागल्या जातील.

मूळ संयुक्त विकास करारनाम्याचे स्वरुप पूरक करारनाम्यात ठळकपणे बदलविण्यात आले असल्यामुळे बदलाच्या स्वरुपानुसार नवीन स्टँम्प पेपर करणे आवश्यक होते. तथापि, मुद्रांक जिल्हाधिका-याने अभिनिर्णयाच्या वेळी आणि आकारणीयोग्य मुद्रांक शुल्काची परिगणना करते वेळी, ही बाब विचारात घेतली नाही. परिणामी, तक्ता ४.३.१२ मध्ये दर्शविल्याप्रमाणे रु.२३.९८ लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी करण्यात आली.

तक्ता ४.३.१२

(रु.लाख मध्ये)

पुरक करारनाम्यात संयुक्त विकासकाला २३ टक्के अतिरिक्त क्षेत्राचे बाजार मूल्य देण्यात आले.	५३२.८६
पूरक करारनामा अनुसार संयुक्त विकासकाने मालकाला द्यावयाचा मोबदला	४०९.२५
बाजार मूल्य जास्त असल्यामुळे मुद्रांक शुल्क बाजार मूल्यावर आकारणीयोग्य राहील	५३२.८६
अनुच्छेद २५ (b) अनुसार @ ५ टक्के प्रमाणे आकारणीयोग्य मुद्रांक शुल्क	२६.६४
आकारलेले मुद्रांक शुल्क	२.७५
मुद्रांक शुल्काची कमी आकारणी	२३.८९

निर्गमन परिषदेत प्रधार सचिव यांनी लेखापरिक्षा निरीक्षण मान्य केले (सप्टेंबर २०१४) आणि मुद्रांक शुल्क तूटीच्या वसुलीची कार्यवाही करण्यात येईल, असे सांगितले. मुद्रांक शुल्क तुटीच्या वसुलीचा अहवाल प्राप्त झाला नाही.(डिसेंबर २०१४)

ज्ञापन

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसुल विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :-

या परीच्छेदामध्ये मुद्रांक जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे कार्यालयातील अभिनिर्णीत प्र.क्र..ADJ/M/५७/२०११ या प्रकरणाचा समावेश आहे.

या बाबत निर्गमन परिषदेत (EXIT CONFERANCE) मध्ये झालेल्या चर्चे मध्ये मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी अभीनीर्णय करंताना पुरवणी करारानाम्यात सहविकासक हे मुळ मालक तथा विकसक यांना ५०% पुनर्वीकास घटकाच्या बांधीव क्षेत्राच्या बदल्यात जादा बांधीव मीळकती पैकी खुल्या वीक्रीच्या क्षेत्रापैकी २३% क्षेत्र मिळणार आहे आणी करारातील मुळ अटीप्रमाणे २७% मोफत खुल्या वीक्रीचे क्षेत्राचे बांधकाम मीळणार आहे. हा बदल म्हणजे मुळ दस्तातील वर्णनात बदल करुन नवीन दस्त केल्या सारखा आहे त्यामुळे कलम १४-अ नुसार सदरचा दस्त हा नवीन दस्त समजून मुद्रांक शुल्काची आकारणी आवश्यक होते. ह परीच्छेदावरील आक्षेप मान्य करण्यात आलेला असून दस्त अभीनीर्णीत असल्याने प्रकरण ५३-अ खाली पुनर्विलोकनासाठी घेण्यात आलेले आहे. संबधीताना सुनावणीची संधी देवून अंतीम निर्णय घेण्यात येईल.

४.३.१३ (४.३.१३.१)

संलेखात मोबदल्याचे चुकीचे निर्धारण आणि चुकीचे वर्गीकरण

४.३.१३.१ पायलट कन्स्ट्रक्शन्स प्रायव्हेट लिमिटेड (पहिल्या भागातील पक्षकार, दस्तऐवजात कंपनी असे संबोधले आहे) आणि शेठ बिल्डवेल प्रायव्हेट लिमिटेड (दुसऱ्या भागातील पक्षकार, दस्तऐवजात SBPL असे संबोधले आहे) यांच्यात निष्पादीत (नोव्हेंबर २०१२) संयुक्त कार्य करारनामा पत्र (Joint Venture Agreement Deed) ६,००,००० चौरस फूट विक्री मुक्त घटकाच्या ६० टक्के म्हणजे १४,१२१ चौरस मिटर आणि १३,३८८.९० चौरस मिटर क्षेत्रातील ५५,७४१.३६ चौरस मिटर जमिनीवरील बिल्ट-अप क्षेत्राच्या आणि सायन (शिव) कोळीवाडा, मुंबई येथील कॅडस्ट्रल सर्वेक्र.६ (भाग)च्या एका भागाच्या विकास आणि विक्रीच्या अभिहस्तांकनासाठी जिल्हाधिकारी, मुंबई यांचे द्वारे प्रकरण क्र. ADJ/M/३८६१/११ अंतर्गत अभिनिर्णित करण्यात आला.

आम्हाला असे लक्षात आहे की, विभागाने SBPL द्वारे कंपनीला दिलेले रु.२०० कोटी मोबदल्यास असुरक्षित कर्ज/बंधन इत्यादि म्हणून चुकीचे गृहीत धरले. जरी दस्तऐवजांच्या पठनावरुन असे स्पष्ट होते की ते मालमत्तेचा मोबदला होते. पठनावरुन असे आढळले की वसुलीत कंपनीचा हिस्सा संयुक्त कार्याच्या (Joint Venture) वसुलीच्या ४० टक्के अधिक निश्चित हिस्सा रु.२०० कोटी असेल. वसुलीत SBPL चा हिस्सा वसुलीच्या ६० टक्के वजा रु.२०० कोटी रक्कम असेल.

वरील पठनावरुन असे स्पष्ट होते की, रु.२०० कोटी हे मालमत्तेच्या मोबदला मूल्याचा एक भाग आहे. परंतु यास असुरक्षित कर्ज आणि बंधन असे गृहीत धरण्यात आले होते. एकूण मोबदला रु.२३५.६७ कोटी काढण्यात आला ज्यावर रु.११.७८ कोटी मुद्रांक शुल्क आकारणीयोग्य होते. निष्पादकांनी करारनाम्यात नमूद केलेला आणि मुद्रांक जिल्हाधिकाऱ्याने मान्य केलेला मोबदला रु.९७.६२ कोटी होता ज्यावर रु.५.४६ कोटी मुद्रांक शुल्क (बंधनासह) आकारण्यात आले. परिणामी, रु.६.३२ कोटी मुद्रांक शुल्क कमी आकारण्यात आले.

निर्गमन परिषदेत प्रधान सचिव यांनी लेखापरिक्षा निरीक्षण मान्य केले (सप्टेंबर २०१४) आणि मुद्रांक शुल्कातील तूटीच्या वसुलीची कार्यवाही करण्यात येईल, असे सांगितले. मुद्रांक शुल्क तुटीच्या वसुलीचा अहवाल प्राप्त झाला नाही. (डिसेंबर २०१४)

ज्ञापन

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसुल विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :-

या परीच्छेदामध्ये मुद्रांक जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे कार्यालयातील अभिनिर्णीत प्र. क्र. ADJ/M/३८६१/२०११ या प्रकरणाचा समावेश आहे.

या बाबत निर्गमन परिषदेत (EXIT CONFERANCE) मध्ये झालेल्या चर्चे मध्ये मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी अभीनीर्णय करतांना २०० कोटी ही रक्कम मोबदला रक्कम न समजता निव्वळ (Obligation) समंजुन चुकीने अनुच्छेद ५(h)(a)(iv)(b) प्रमाणे आकारणी केली हा आक्षेप मान्य करण्यात आलेला असून दस्त अभीनीर्णीत असल्याने प्रकरण ५३-अ खाली पुनर्विलोकनासाठी घेण्यात आलेले आहे. संबंधीताना सुनावणीची संधी देवून अंतीम आदेश पारीत केले आहेत.

४.३.१३.२

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ च्या अनुच्छेद ५ (g-a) अनुसार विकास करारनाम्यावर बाजार मूल्याच्या पाच टक्के मुद्रांक शुल्क आकारणीयोग्य आहे, जसे अनुच्छेद २५ अंतर्गत अभिहस्तांरणावर आकारणीयोग्य आहे. तसेच, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ च्या अनुसूची-१ च्या अनुच्छेद ३६ (iv) प्रमाणे एखाद्या भाडेपट्टा संलेखात जेव्हा भाडेपट्टा २९ वर्षाहून अधिक कालावधीसाठी असेल तर शुल्काची आकारणी, अनुच्छेद २५ च्या खंड (a)(b)(c) अथवा यथास्थिती अंतर्गत अभिहस्तातरणाप्रमाणे आकारणीयोग्य असेल. अनुच्छेद ५ (h)(A)(vi) अनुसार बांधा, वापरा व हस्तांतरीत करा (BOT) पध्दती अंतर्गत प्रकल्पाच्या, मग ज्याला पथकर किंवा शुल्क वसूल करण्याचा हक्क असो किंवा नसो, संबंधात असेल तर, जर मान्य केलेली रक्कम १० लाख रुपयापेक्षा अधिक नसेल तर, मुद्रांक शुल्क मान्य केलेल्या रकमेच्या ०.१ टक्के आकारणीयोग्य असेल. महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ च्या कलम ६ अनुसार जर एखादा संलेख अनुसूची-१ मधील दोन किंवा जास्त वर्णनामध्ये अंतर्भाव असणारे असेल आणि आकारणीयोग्य असलेले शुल्क वेगवेगळे असेल तेव्हा त्यापैकी जे शुल्क सर्वात जास्त असेल तितके शुल्क

आकारणीयोग्य असेल. सह जिल्हा निबंधक/मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर आणि ठाणे शहर यांच्या अभिनिर्णित प्रकरणांच्या लेखापरिक्षा तपासणीत असे लक्षात आले की तीन संलेखाचे वर्गीकरण मुद्रांक जिल्हाधिकाऱ्यांनी अनुच्छेद ५ (g)(a) च्या ऐवजी ५ (h)(A)(vi) अंतर्गत केले. परिणामी तक्ता ४.३.१३.२ मध्ये दर्शविल्याप्रमाणे रु.४.८१ कोटी मुद्रांक शुल्काची कमी आकारणी करण्यात आली.

तक्ता ४.३.१३.२

अनु. क्र.	मुद्रांक जिल्हाधिकारीचे नाव/अभिनिर्णय प्रकरण क्र.	आकारणीयोग्य मुद्रांक शुल्क	आकारलेले मुद्रांक शुल्क	मुद्रांक शुल्काची कमी आकारणी
१.	मुद्रांक जिल्हाधिकारी पुणे शहर /३३६/२०१०	१.८२	०.१०	१.७२
२	मुद्रांक जिल्हाधिकारी पुणे शहर/१६१/२०११	२.७४	०.२१	२.५३

गैरप्रकाराचे स्वरुपः पुणे महानगर पालिका (पीएमसी) आणि मेसर्स पाटील कन्स्ट्रक्शन्स (डेव्हलपर्स) यांच्यात पुणे येथे स्थित ९६,३२४.६ चौरस मिटर च्या पाच/सहा प्लॉट च्या पुनर्विकासाकरीता दोन करारनामे निष्पादीत करण्यात आले. मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी या संलेखाला BOT करारनामा म्हणून ग्राह्य धरले आणि त्यावर ५ (h)(A)(vi) नुसार ०.२ टक्के दरा प्रमाणे रु.०.३१ कोटी मुद्रांक शुल्क आकारले. यास भाडेपट्टा संलेख किंवा विकास करारनामा म्हणून ग्राह्य धरावयास पाहीजे होते. कारण संलेखाच्या पठनावरुन असे लक्षात येते की, विकासकाने अस्तित्वात असलेली जीर्णावस्थेतील क्वार्टरं पुणे महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांकरीता पुनःविकास करुन नवीन गाळ्याच्या बांधकामाच्या बदल्यात विकासकाला ४१,४४६.५९ चौरस मीटर बिल्ट-अप क्षेत्राचे ९९ वर्षाकरीता भाडेपट्टा हक्क मिळणार होते.

अनुच्छेद ५ (g)(a) अनुसार PMC च्या घटकाची किंमत आणि अनुच्छेद ३६ प्रमाणे विकासकाच्या घटकाची किंमत अनुक्रमे रु.९१.२७ कोटी आणि रु.४७.८५ कोटी होती. संलेख अनुसूची-१ च्या दोन किंवा जास्त वर्णनातर्गत येत असल्यामुळे जास्त किंमतीवर मुद्रांक शुल्क आकारणीयोग्य होते. रु.९१.२७ कोटी वर पाच टक्के दराप्रमाणे रु.४.५६ कोटी मुद्रांक शुल्क आकारावयास पाहीजे होते. अशाप्रकारे, संलेखाच्या चुकीच्या वर्गीकरणामुळे मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली.

अभिप्रायः प्रधान सचिवांनी लेखापरिक्षा निरीक्षण मान्य केले (सप्टेंबर २०१४) आणि मुद्रांक शुल्क तुटीच्या वसुलीची कार्यवाही करण्यात येईल असे सांगितले.

३	मुद्रांक जिल्हाधिकारी ठाणे शहर	०.५८	०.०२	०.५६

गैरप्रकाराचे स्वरुपः- गणेशानंद डेव्हलपर्स (JV) आणि एस.पी.मोटेल्स (दुसरे पक्षकार)यांच्यात ठाणे महानगरपालिके कडून पहिल्या पक्षकाराला मालमत्तेच्या भाडेपट्टा करीता उपर्जित झालेली मालमत्ता पोट-भाडेपट्टयाने द्यावयासाठी करारनामा निष्पादीत करण्यात आला. मुद्रांक जिल्हाधिकारीच्या टिप्पणी अनुसार पोट-भाडेपट्टा कालावधी २० वर्षासाठी होता.पोट-भाडेपट्टयाच्या मोबदल्यात दुसऱ्या पक्षकाराने संयुक्त कार्य करारनामा (JV-पहिले पक्षकार) च्या रु.२३.२५ कोटीचे सर्व प्रलंबित कर्जे, दायीत्व,त्रुण इत्यादींचे भुगतान करण्याचे मान्य केले व ते अदा केले. अनुच्छेद ३६(ii) अनुसार पाच टक्के प्रमाणे २३.२५ कोटीच्या ५० टक्के वर रु.५८.११ लाख मुद्रांक शुल्क आकारणीयोग्य होते. तथापि, मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी संलेखाला BOT करारनमा म्हणून गृहीत धरले आणि अनुच्छेद ५(h)(A)(vi) नुसार पोट-भाडेपट्टयानुसार २० वर्षामध्ये प्राप्त होऊ असलेले एकुण भाडे रु. २३.७८ कोटी यावर ०.२ टक्के दराने रु.२.३८ लाख मुद्रांक शुल्क आकारण्यात आले. अशाप्रकारे, संलेखाच्या चुकीच्या वर्गीकरणामुळे मुद्रांक शुल्काची कमी आकारणी करण्यात आली.

अभिप्रायः प्रधान सचिवांनी लेखापरिक्षा निरीक्षण मान्य केले (सप्टेंबर २०१४) आणि मुद्रांक शुल्क तुटीच्या वसुलीची कार्यवाही करण्यात येईल असे सांगितले.

वरील प्रकरणांत मुद्रांक शुल्क तुटीच्या वसुलीचा अहवाल प्राप्त झाला नाही.(डिसेंबर २०१४)

ज्ञापन

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसुल विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :-

हा आक्षेप मान्य करुन सदर प्रकरणे अभीनीर्णीत असल्याने प्रकरण ५३-अ खाली पुनर्विलोकनासाठी घेण्यात आलेले आहे. संबधीतांना सुनावणीची संधी देवून अंतीम आदेश पारीत केलेले आहे.

या परीच्छेदामध्ये मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर यांचे कार्यालयातील अभिनिर्णीत प्र. क्र. ADJ/३३६/२०१० व ADJ/१६१/२०११ व मुद्रांक जिल्हाधिकारी, ठाणे शहर ADJ/१२०/२०१३ या प्रकरणांचा समावेश आहे.

या बाबत निर्गमन परिषदेत (EXIT CONFERANCE) मध्ये झालेल्या चर्चे मध्ये पुणे शहर येथील अभिनिर्णीत प्र. क्र. ADJ/३३६/२०१० व ADJ/१६१/२०११ या दस्तान्वये विकासक मे.पाटील कन्स्ट्रक्शन तर्फे एम.बी.पाटील यांनी मनपा मालकीचे जागेत कर्मचाऱ्यांच्या वसाहतीचे पुनर्विकसन करण्याचे कबूल केले असून त्याच्या बदल्यात मनपा यांनी सदर जागेवर विकसकास वाणीज्य क्षेत्र ९९ वर्ष मुदतीपर्यंत भाडेपट्ट्याने लीहून देणार आहेत. असा मुददा दस्तामध्ये नमुद केलेला आहे. या मुद्दाच्या अनुषंगाने सदरचा दस्तास अनु. ५ (ग)(अ), अनु. ३६ ला अनुलक्षून मुद्रांक शुल्काची आकारणी न करता अनु. ५ (h)(a)(iv)(b) या प्रमाणे (Obligation) आकारणी केली आहे. हा आक्षेप मान्य करण्यात आलेला आहे. तसेच ठाणे शहर येथील ADJ/१२०/२०१३ हा दस्त गणेश नंद डेव्हलपर्स व एस.पी. मोटल्स प्रो.प्रा.यांचे मधील असून मुळ मालक यांना भाडेकरु म्हणून असलेल्या ठाणे मनपा यांच्या मालकीचे पांचपाखाडी येथील जागेवर बांधण्यात आलेल्या जलतरण तलावासह असलेल्या क्रीडा संकुलाचे भाडेकराराचे अधीकार त्यांनी २५ वर्ष मुदतीपर्यंत सबलिज ने दिलेले आहे.

४.३.१३.३

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम ,१९५८ च्या अनुच्छेद ३६(iii) अनुसार, जेव्हा संभाव्य किंवा अन्य प्रकारच्या नुतनीकरण करण्यात येणाऱ्या खंडासह, भाडेपट्टाचा कालावधी दहा वर्षाहून अधिक पण एकोणतीस वर्षाहून अधिक नसेल, इतक्या कालावधीसाठी असल्याचे अभिप्रेत असेल त्याबाबतीत मुद्रांक शुल्काची आकारणी अनुच्छेद २५ अनुसार अभिहस्तांतरणाप्रमाणे मालमत्तेच्या बाजार मूल्याच्या ५० टक्क्यावर आकारणीयोग्य राहील. इतर कुठल्याही अनुच्छेदात अंतर्भाव न होणारे संलेख अनुच्छेद 5(h)(A)(vi) अंतर्गत येतात आणि त्यावर ०.२ टक्के दराने मुद्रांक शुल्क आकारणीयोग्य असते.

मुद्रांक जिल्हाधिकारी, मुंबई यांचे अभिनिर्णित दोन महसूल भागीदार करारनामा संलेखामध्ये आम्हाला असे लक्षात आले की, पट्टेदाराने १५ वर्षा करीता पट्टाकाराला परिसर भाडेपट्टयाने दिला.वरील दोन्ही संलेखात असे नमूद होते की, पट्टाकार पट्टेदाराला व्यवसाय करण्याकरीता सुरवातीला कमीत कमी नऊ वर्षासाठी परिसर देईल ज्याचेनंतर सहा वर्षाकरीता नूतनीकरण करण्यात येईल. पट्टेदाराने पट्टाकाराला पहिल्या संलेखासाठी प्रति महिन्याच्या निव्वळ उलाढालीच्या एक टक्का किंवा रु.सहा लाख प्रति माह आणि दुसऱ्या संलेखासाठी प्रति महिन्याच्या निव्वळ उलाढालीच्या एक टक्का अथवा रु.पाच लाख प्रति माह देण्याचे मान्य केले. पठनावरुन पुढे असेही निदर्शनास आले की उपरोक्त महसूल करारनामाच्या निष्पादनाच्या तारखेपासून दर तीन वर्षांनी १५ टक्यांनी वाढवावयाचा होता. वरील पठनावरुन असे स्पष्टपणे दिसून येते की, हे संलेख १५ वर्षांच्या कालावधीच्या भाडेपट्टा करारनामा अंतर्गत येतात. तथापि. मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी दस्तऐवज अभिनिर्णित करते वेळी चुकीचे वर्गीकरण केले आणि अनुच्छेद ५ (h)(A)(iv)(b), ज्यात इतर कुठल्याही अनुच्छेद अंतर्गत सामिल न होणारे संलेख येतात, अनुसार मुद्रांक शुल्काची आकारणी केली. यामुळे रु.१८.९८ लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली.

निर्गमन परिषदेत प्रधान सचिव यांनी लेखापरिक्षा निरीक्षण मान्य केले (सप्टेंबर २०१४) आणि मुद्रांक शुल्क तुटीच्या वसुली करीता कार्यवाही करण्यात येईल, असे सांगितले. मुद्रांक शुल्क तुटीच्या वसुलीचा अहवाल प्राप्त झाला नाही. (डिसेंबर २०१४)

ज्ञापन

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसुल विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :-

या परीच्छेदामध्ये मुद्रांक जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे कार्यालयातील अभिनिर्णीत प्र क. ADJ/M/१९४७/२०११ व ADJ/M १९४८/२०११ या प्रकरणांचा समावेश आहे.

या बाबत निर्गमन परिषदेत (EXIT CONFERANCE) मध्ये झालेल्या चर्चे मध्ये मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी मुद्रांक शुल्काची आकारणी करतांना अनु. ३६ ऐवजी ५ (h)(a)(iv)(b) या प्रमाणे (Obligation) आकारणी केली आहे. हा आक्षेप मान्य करण्यात आलेला असून दस्त अभीनीर्णीत असल्याने प्रकरण ५३-अ खाली पुनर्विलोकनासाठी घेण्यात आलेले आहे. संबधीतांना सुनावणीची संधी देवून अंतीम निर्णय घेण्यात येईल.

४.३.१४

ASR मधील सूचनांचे आणि IGR द्वारे निर्गमित सूचनांचे पालन करण्यात समानता नसणे.

चटई क्षेत्र निर्देशांक (Floor Space Index- FSI) ज्यास चटई क्षेत्र गुणोत्तर (Floor Area Ratio) असेही संबोधण्यात येते, हे एका ठराविक स्थानावर असलेल्या इमारतीचे एकूण चटई क्षेत्राचे त्या स्थानाच्या जागेचे आकारमानाशी असलेले गुणोत्तर होय. ठराविक भूखंडावरील इमारतींच्या सर्व मजल्यांचे एकूण क्षेत्रफळ = FSI X भूखंडाचे क्षेत्रफळ. ASR २०१३ मधील सूचना ३ अनुसार ज्या दस्तऐवजांमध्ये अनुज्ञेय FSI नमूद केले आहे, त्यात TDR लादणे म्हणजेच ASR मधील भूखंडाच्या दरामध्ये ४० टक्क्यांने वाढ करावयास नको.

विभागाचे स्पष्टीकरणात्क अभिप्राय निरंक

४.३.१४.१

चाचणी तपासणी केलेल्या मुद्रांक जिल्हाधिकारी, कुर्ला द्वारे अभिनिर्णित विकास/पुनर्विकास करारनामा संलेखाच्या २३ प्रकरणांपैकी १८ प्रकरणांत मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी बाजार मूल्याची परिगणना करताना अचूकपणे संलेखात नमूद FSI विचारात घेतले होते. उर्वरित पाच संलेखामध्ये मुद्रांक शुल्क दस्ताऐवजात नमूद FSI च्या आधारावर काढलेले बाजारमूल्याऐवजी संलेखात नमूद मोबदल्यावर चुकीने आकारण्यात आले. ज्यामुळे तक्ता ४.३.१४.१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे रु.५१.५७ लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली.

तक्ता ४.३.१४.१

अभि. प्रकरण क्र.	गैरप्रकाराचे स्वरुप
७३/K/१३	दस्तऐवजानुसार भूखंडावर TDR सह उपलब्ध एकूण FSI ३,०८२.३२ चौरस मीटर होते. संस्थेच्या सदस्यांना दिलेले १,५२२.३६ चौरस मीटर चे क्षेत्र वजा केल्यानंतर विकासकास उपलब्ध असलेले उर्वरित FSI १,५५९.९६ चौरस मीटर होते. ज्याचे मूल्य रु.५.३३ कोटी होते व ज्यावर रु.२६.६७ लाख मुद्रांक शुल्क आकारणीयोग्य होते. मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी जास्त असलेल्या बाजार मूल्यावर मुद्रांक शुल्क आकारण्याऐवजी दस्तऐवजात नमूद रु.२.७६ कोटी मोबदल्यावर रु.१३.७९ लाख मुद्रांक शुल्क आकारले होते. परिणामी, रु.१२.८८ लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली होती.
७२५/१३/K	दस्ताऐवजानुसार भूखंडावर TDR सह उपलब्ध एकूण FSI १,५११.१९ चौरस मीटर होते. संस्थेच्या सदस्यांना दिलेले ८१६.३५ चौरस मीटर चे क्षेत्र वजा केल्यानंतर विकासकास उपलब्ध असलेले उर्वरित FSI ६९४.८४ चौरस मीटर होते.ज्याचे मूल्य रु.४.०२ कोटी होते व ज्यावर रु.२०.०८ लाख मुद्रांक शुल्क आकारणी योग्य होते. मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी जास्त असलेल्या बाजार मूल्यावर मुद्रांक शुल्क आकारण्याऐवजी दस्तऐवजात नमूद रु.२.१६ कोटी मोबदल्यावर रु.१०.८१ लाख मुद्रांक शुल्क आकारले होते. परिणामी, रु.९.२७ लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली होती.
४०४/१२/K	दस्ताऐवजानुसार भूखंडावर TDR सह उपलब्ध एकूण FSI १०,१५६.७०६१ चौरस मीटर होते. संस्थेच्या सदस्यांना दिलेले ५९४७.०२ चौरस मीटर चे क्षेत्र वजा केल्यानंतर विकासकास उपलब्ध असलेले उर्वरित FSI ४,२०९.६९ चौरस मीटर होते.ज्याचे मूल्य रु.२२.१० कोटी होते. मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी दस्ताऐवजात नमूद रु.२०.२७ कोटी मोबदल्यावर रु.१.०१ कोटी मुद्रांक शुल्क आकारले. बाजारमूल्य रु.२२.१० कोटी जास्त होते. म्हणून मुद्रांक शुल्क रु.१.१० कोटी बाजार मूल्य रु.२२.१० कोटीवर आकारावयास पाहिजे होते. अशाप्रकारे रु.९.११ लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली होती.
९२७/१२/K	दस्ताऐवजानुसार एकूण FSI १,९७३.१६ चौरस मीटर होते. तथापि मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी चेंबूर गावात असलेल्या ७३०.८ चौरस मीटर भूखंड क्षेत्रास १.४ ने गुणीत करुन १,०२३.१२ चौरस मीटर विचारात घेतले होते. जमीनमालकाला द्यावयाचे असलेले ९३९.०३ चौरस मीटरचे क्षेत्र वजा केल्यानंतर उर्वरित FSI चे बाजारमूल्य रु.१.७९ कोटी होते. ह्याची तुलना रु.५.०७ कोटी मोबदला रकमेशी करुन मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी रु.५.०७ कोटी रक्कमेवर रु.२५.३७ लाख मुद्रांक शुल्क आकारले होते. तथापि, दर्शविलेले २.७ FSI विचारात घेतले असते तर उर्वरित FSI १,०३४.१३ चौरस मीटर असते ज्याची किंमत रु.६.४१ कोटी असती ज्यावर रु.३२.०६ लाख मुद्रांक शुल्क आकारणी योग्य होते. अशाप्रकारे, येथे रु.६.६९ लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली होती.

१६३१/१०/K दस्ताऐवजानुसार एकूण FSI २,२१४.६२ चौरस मीटर होते. तथापि मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी चेंबूर गावात असलेल्या ११०७.३१ चौरस मीटर भूखंड क्षेत्रास १.४ ने गुणीत करुन १,५५०.२३ चौरस मीटर विचारात घेतले होते. जमीनमालकाला द्यावयाचे असलेले २००.७४ चौरस मीटरचे क्षेत्र वजा केल्यानंतर उर्वरित FSI चे बाजारमूल्य रु.५.५३ कोटी होते. ह्याची तुलना रु.२२.०८ कोटी मोबदला रकमेशी करुन मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी रु.५.५३ कोटी रक्कमेवर रु.२७.६६ लाख मुद्रांक शुल्क आकारले होते. तथापि, दस्ताऐवजामध्ये दर्शविलेले २ FSI विचारात घेतले असते तर उर्वरित FSI २,०१३.८८ चौरस मीटर असते ज्याची किंमत रु.८.२६ कोटी असती ज्यावर रु.४१.२८ लाख मुद्रांक शुल्क आकारणी योग्य होते. अशाप्रकारे, येथे रु.१३.६२ लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली होती.

ज्ञापन

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :-

या परिच्छेदात समावीष्ट दस्त हे मुद्रांक जिल्हाधिकारी कुर्ला यांच्या कार्यालयात अभीनीर्णीत केलेल्या दस्तांपैकी ५ अभीनीर्णीत प्रकरणाचा समावेश आहे.

सदर आक्षेपातील दस्ताची पडताळणी केली असता, बाजारमूल्य दर तक्त्यातील मार्गदर्शक सूचना क्र.३ नुसार ज्या भूखंडावर टिडीआर अनुज्ञेय आहे अशा भूखंडांचे मूल्यांकन वार्षिक मूल्य दर तक्त्यातील दरात ४०% वाढ देऊन करावयाचे आहेत.

मुंबई उपनगरामध्ये कमाल १ टिडीआर अनुज्ञेय आहे. त्यामुळे मूळ चटई क्षेत्र निर्देशांक व १ टिडीआर असे २ चटई क्षेत्र निर्देशांकाचे मूल्य हे वार्षिक मूल्य दर तक्त्यातील दर x १.४० x जमिनीचे क्षेत्र या प्रमाणे काढणे अपेक्षित आहे. २ चटई क्षेत्र निर्देशांकावर ३५%प्रमाणे ०.७० फंजिबल चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय आहे. फंजिबल चटई क्षेत्र निर्देशांकाचा नियम दि. ६-१-२०१२ रोजी अस्तित्वात आला आहे व त्यानंतर या कार्यालयाचे दि. २३-१०-२०१२ चे पत्रान्वये उपसंचालक, नगर रचना,मुंबई प्रदेश, मूल्यांकन, मुंबई व मुंबई शहरातील सर्व मुद्रांक जिल्हाधिकारी यांना त्यांनी विचारणा केल्या नंतर वार्षिक मूल्य दर तक्त्यामध्ये ५% वाढ करणे योग्य ठरत असलेने सन २०१३ च्या वार्षिक मूल्य दर तक्त्यातील जमिनीच्या मूल्यात ५% वाढ करणेच्या सूचना दिलेल्या आहेत.

त्यामुळे सन २०१३ पासून वार्षिक मूल्य दर तक्त्यात जमिनीच्या दरात ५% वाढ अंतर्भुत असल्याने त्यापुढील नोंदविलेल्या दस्तांमध्ये मूल्यांकन करताना फंजिबल चटई क्षेत्र निर्देशांकासाठी वेगळी वाढ देण्याची आवश्यकता नाही. मात्र सन २०१२ च्या वार्षिक मूल्य दर तक्त्यातील जमीन दरात ५% वाढ अंतर्भुत नसलेने मार्गदर्शनानंतर नोंदविलेल्या दस्तांमध्ये मार्गदर्शनानुसार जमिनीचे मूल्यांकनामध्ये वार्षिक मूल्य दर तक्त्यातील जमीन दरास ५% वाढ देऊन मूल्यांकन करणे अभिप्रेत आहे. तसेच सदरची प्रकरणे नवीन सुचना प्राप्त होणेपूर्वी म्हणजेच सन २०१३ मध्ये अभिनिर्णीत झालेले असल्याने त्याप्रमाणे अभीनीर्णय प्रकरण क्रमांक ७३/२०१३, ७२५/२०१३, ४०४/२०१२, १६३१/२०१० तसेच ९२७/२०१२ या एका प्रकरणात अभीनिर्णय करतांना फंजीबल एफएसआय साठी जमीन दरास ५% वाढ देवून येणारे मुल्यविचार घेवून सह संचालक नगर रचना (मु.) पुणे यांनी केलेल्या मुल्यांकनानुसार ते रुपये ३.४४ कोटी इतके येते. आणि मालकास मिळणारा मोबदला हा ५.०७ कोटी इतका असल्याने त्यावर मुद्रांक शुल्क आकारणी झालेली आहे. अशा रीतीने या ५ ही प्रकरणातील आक्षेप अमान्य करण्यात आलेला आहे.

४.३.१४.२-

अंधेरी मध्ये मुद्रांक शुल्काची कमी आकारणी.

त्याचप्रमाणे मुद्रांक जिल्हाधिकारी, अंधेरी द्वारे अभिनिर्णित विकास/पुनर्विकास करारनामा संलेखाच्या नऊ प्रकरणांच्या चाचणी तपासणीत आम्हाला असे आढळले की जरी सर्व दस्तऐवजामध्ये अनुज्ञेय FSI स्पष्टपणे नमूद केला असला तरी मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी फक्त तीन संलेखामध्ये दस्ताऐवजात दर्शविलेला FSI विचारात घेतला. उर्वरित ६ संलेखामध्ये मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी बाजार मूल्याची परिगणना करताना १.४ असे चुकीचे FSI विचारात घेतले.

ज्याचा परिणाम तक्ता ४.३.१४.२ मध्ये दर्शविल्याप्रमाणे रु.१.७९ कोटी मुद्रांक शुल्काच्या कमी आकारणीत झाला.

तक्ता क्रमांक ४.३.१४.२

अभि.प्रकरण क्रमांक	गैरप्रकाराचे स्वरुप
१७७८/१३/ अंधेरी	दस्तावेजानुसार एकूण FSI ३०६१.२६ चौ.मी. होते, ज्याचे मुल्य रुपये २५.७० कोटी असून त्यावर रुपये १.२९ कोटी मुद्रांक शुल्क आकारणीयोग्य होते, तथापी निष्पादकांनी बांद्रा येथे असलेल्या ११३३.८० चौरस मीटर भुखंड क्षेत्रास २.७ ऐवजी १.४ ने गुणीत करुन १५८७.३२ चौ.मी. विचारात घेतले होते. दस्ताऐवजात नमुद मोबदला रक्कम रुपये १०.२० कोटी होती. आणि मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी १०.२० कोटी रकमेवर रुपये ५०.९८ लाख मुद्रांक शुल्क आकारले होते.अशा प्रकारे रुपये ७७.५२ लाख मु.शु.ची कमी आकारणी झाली होती.
७३८/१३/ अंधेरी	दस्ताऐवजानुसार एकूण FSI ९१४.२२ चौ.मी.होते. तथापी मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी बांद्रा गावात असलेल्या ३३८.६० चौ.मी. भूखंड क्षेत्रास २.७ ऐवजी १.४ ने गुणीत करुन ४७४.४ चौ.मी. विचारात घेतले होते. जमीन मालकाला दिलेले २१४.१३ चौ.मी.चे क्षेत्र वजा केल्यानंतर विकासकास दिलेले उर्वरित FSI ७००.०९ चौमीचे बाजारमुल्य ९.३२ कोटी होते.ज्यावर रुपये ४६लाख मुद्रांक शुल्क आकारणी योग्य होते. मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी रुपये ४.२० कोटी रकमेवर रुपये २०.९९लाख मुद्रांक शुल्क आकारलेले होते. परीणामी रुपये २५.६० लाख मुं.शु.ची कमी आकारणी झाली होती. ज्या आधारावर बाजार मुल्य काढले होते ते अभीलेखात आढळले नाही.
A/९०५/१२	दस्ताऐवजानुसार एकुण FSI ३९४१.६४९ चौ.मी.होते तथापी मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी बांद्रा गावात असलेल्या १४५९.८७ चौ.मी.भूखंड क्षेत्रास १.४ ने गुणित करुन त्यात ५४४.८३ चौ.मी.फंजीबल (Fungible) FSI मिळवून २५८८.६५ चौ.मी. विचारात घेतले होते. जमिनमालकाला दयावयाचे असलेले २१७९.४० चौ.मी.चे क्षेत्र वजा केल्यानंतर उर्वरित FSI चे बाजार मुल्य रुपये ७.५४ कोटी होते. हयाची तुलना रुपये १४.५७ कोटी मोबदला रकमेशी करुन मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी रुपये १४.५७ कोटी रकमेवर रुपये ७२.८४ लाख मुद्रांक शुल्क आकारले होते. तथापी, दस्तावेजामध्ये दर्शविलेले २.७ FSI विचारात घेतले असते तर उर्वरित FSI१५६२.३९९ चौ.मी.असते ज्याची किमंत रुपये १९.६४ कोटी असती आणि ज्यावर रुपये ९८.२० लाख मुद्रांक शुल्क आकारणी योग्य होते. अशाप्रकारे रुपये २५.३६ लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली होती.
A/८०३/१२	दस्ताऐवजानुसार एकुण FSI ५४१८.०९ चौ.मी.होते. तथापि मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी बांद्रा गावात असलेल्या २००६.७ चौ.मी.भूखंड क्षेत्रास १.४ ने गुणित करुन त्यात ७९९.४० चौ.मी.फंजीबल FSI मिळवून ३६०८.७८ चौ.मी.विचारात घेतले होते. जमिनमालकास दयावयाचे असलेले ३४३४.२४ चौ.मी.चे क्षेत्र वजा केल्यानंतर उर्वरित FSI चे बाजार मुल्य रुपये ५.४० कोटी होते. हयाची तुलना रुपये २२.३५ कोटी मोबदला रकमेशी करुन मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी रुपये २२.३५ कोटी रकमेवर रुपये १११.७७ लाख मुद्रांक शुल्क आकारले होते. तथापी, दस्तावेजांमध्ये दर्शविलेले २.७ FSI विचारात घेतले असते तर उर्वरित FSI १९९३.८५ चौ.मी.असते ज्याची किमंत रुपये २५.२२ कोटी असती आणि ज्यावर रुपये १२६.११ लाख मुद्रांक शुल्क आकारणीयोग्य होते. अशा प्रकारे रुपये १४.३४ लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली होती.
A/१२२/११	दस्ताऐवजानुसार एकुण FSI ४१२४.२ चौ.मी.होते. तथापि मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी ओशिवारा गावात असलेल्या २०६२.१० चौ.मी.भूखंड क्षेत्रास १.४ ने गुणित करुन २८८६.९४ चौ.मी.विचारात घेतले होते. जमिन मालकास दयावयाचे असलेले ६२३.५७ चौ.मी.चे क्षेत्र वजा केल्यानंतर उर्वरित FSI चे बाजार मुल्य रुपये १४.४९ कोटी होते. हयाची तुलना रुपये १३.३४ कोटी मोबदला रकमेशी करुन मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी रुपये १४.४९ कोटी रकमेवर रुपये ७२.४३ लाख मुद्रांक शुल्क आकारले होते. तथापी, दस्तावेजांमध्ये दर्शविलेले २ FSI विचारात घेतले असते तर उर्वरित FSI ३२३३.३८ चौ.मी.असते ज्याची किमंत रुपये २०.६९ कोटी असती आणि ज्यावर रुपये १०३.४७ लाख मुद्रांक शुल्क आकारणीयोग्य होते. अशा प्रकारे रुपये ३१.०४ लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली होती.
A/५७९/११	दस्ताऐवजानुसार एकुण FSI १२३८ चौ.मी.होते. तथापि मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी विले पार्ले पश्चिम गावात असलेल्या ९१६ चौ.मी.भूखंड क्षेत्रास १.४ ने गुणित करुन ८६६.६० चौ.मी.विचारात घेतले होते. जमीन मालकास दयावयाचे असलेले ७५३.९ चौ.मी.चे क्षेत्र वजा केल्यानंतर उर्वरित FSI चे बाजार मुल्य रुपये ७२.८० लाख होते.

हयाची तुलना रुपये २.०७ कोटी मोबदला रकमेशी करुन मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी रुपये २.०७ कोटी रकमेवर रुपये १०.३३ लाख मुद्रांक शुल्क आकारले होते. तथापी, दस्तावेजांमध्ये दर्शविलेले २ FSI विचारात घेतले असते तर उर्वरित FSI ४८४.१० चौ.मी.असते ज्याची किमंत रुपये ३.१३ कोटी असती आणि ज्यावर रुपये १५.६४ लाख मुद्रांक शुल्क आकारणीयोग्य होते. अशा प्रकारे, रुपये ५.३१ लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली होती. मुद्रांक जिल्हाधिकारी बोरीवलीमध्ये लेखापरीक्षेस आढळले की एकाच स्वरुपाच्या सर्व प्रकरणात मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी संलेख अभिनिर्णित करताना दस्तऐवजामध्ये नमूद केलेले FSI विचारात घेतले होते.

निर्गमन परिषेदेत (सप्टेंबर २०१४) प्रधान सचिव यांनी सांगितले की जमिनीवर TDR लादण्याच्या क्षमतेसाठी जमीनदर ४० टक्क्याने वाढविले आणि फंजीबल FSI ची बाबसुध्दा विचारात घेतली होती. म्हणून केलेले मुल्यांकन बरोबर होते.

अशाप्रकारे वरील तथ्यावरुन असे निदर्शनास येते की मालमत्तेचे मोबदला/बाजारमुल्य काढण्यासाठी शासनाने समान प्रणाली/पध्दती तयार केली नाही. काही मुद्रांक जिल्हाधिकारी ASR मधील सुचनांचे पालन करतात जसे मुद्रांक जिल्हाधिकारी बोरीवली यांनी दस्तऐवजात नमूद FSI एकूण घेऊन मोबदला परिगणीत केले, जेव्हा की काही मुद्रांक जिल्हाधिकारी, जसे कुर्ला व अंधेरी येथील, मुद्रांक जिल्हाधिका-यांनी एकरुपता राखली नाही, काही प्रकरणात त्यांनी दस्तऐवजात नमूद नसलेलस FSI अवलंबिला अथवा TDR लादला. अभिलेखात असे काहीही नोंदविलेले नाही ज्यामूळे हे निर्देशित होते की बाजारमुल्य निर्धारणासाठी वेगवेगळ्या पध्दती का अवलंबविण्यात आल्या.

अशी शिफारस करण्यात येते की शासनाने एक समान कर पध्दतीचा अवलंब व्हावा यासाठी विभागास FSI चे निर्धारण, विकास/पुनर्विकास करारनाम्यांवर TDR लादणे यासाठी समान कार्यपध्दती तयार करणे आणि त्या समानतेने लागू करण्यात येतात याची खातरजमा करणे आणि मुद्रांक शुल्क आकारणीसाठी वार्षीक मूल्य दर तक्त्यातील सूचनांचे पालन होणे याबाबत सूचना करावी.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसुल विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :-

या परिच्छेदात समावीष्ट दस्त हे मुद्रांक जिल्हाधीकारी अंधेरी यांच्या कार्यालयात अभीनीर्णीत केलेल्या दस्तांपैकी ६ अभीनीर्णीत प्रकरणाचा समावेश आहे.

या बाबत निर्गमन परिषदेत (EXIT CONFERANCE) मध्ये झालेल्या चर्चे मध्ये परीच्छेदावरील आक्षेप खालील कारणास्तव अमान्य करण्यात आलेला आहे.

सदर आक्षेपातील दस्ताची पडताळणी केली असता, बाजारमूल्य दर तक्त्यातील मार्गदर्शक सूचना क्र. ३ नुसार ज्या भूखंडावर टिडीआर अनुज्ञेय आहे अशा भूखंडांचे मूल्यांकन वार्षिक मूल्य दर तक्त्यातील दरात ४०% वाढ देऊन करावयाचे आहेत. मुंबई उपनगरामध्ये कमाल १ टिडीआर अनुज्ञेय आहे. त्यामुळे मुळ चटई क्षेत्र निर्देशांक व १ टिडीआर असे २ चटई क्षेत्र निर्देशांकाचे मूल्य हे वार्षिक मूल्य दर तक्त्यातील दर x १.४० x जमिनीचे क्षेत्र या प्रमाणे काढणे अपेक्षित आहे. २ चटई क्षेत्र निर्देशांकावर ३५% प्रमाणे ०.७० फंजिबल चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय आहे. फंजिबल चटई क्षेत्र निर्देशांकाचा नियम दि. ६-१-२०१२ रोजी अस्तित्वात आला आहे व त्यानंतर या कार्यालयाचे दि. २३-१०-२०१२ चे पत्रान्वये उपसंचालक, नगर रचना, मुंबई प्रदेश, मूल्यांकन, मुंबई व मुंबई शहरातील सर्व मुद्रांक जिल्हाधिकारी यांना त्यांनी विचारणा केल्या नंतर वार्षिक मूल्य दर तक्त्यामध्ये ५% वाढ करणे योग्य ठरत असलेने सन २०१३ च्या वार्षिक मूल्य दर तक्त्यातील जमिनीच्या मूल्यात ५% वाढ करणेच्या सूचना दिलेल्या आहेत.

त्यामुळे सन २०१३ पासून वार्षिक मूल्य दर तक्त्यात जमिनीच्या दरात ५% वाढ अंतर्भुत असल्याने त्यापुढील नोंदविलेल्या दस्तांमध्ये मूल्यांकन करताना फंजिबल चटई क्षेत्र निर्देशांकासाठी वेगळी वाढ देण्याची आवश्यकता नाही. मात्र सन २०१२ च्या वार्षिक मूल्य दर तक्त्यातील जमीन दरात ५% वाढ अंतर्भुत नसलेने मार्गदर्शनानंतर नोंदविलेल्या दस्तांमध्ये मार्गदर्शनानुसार जमिनीचे मूल्यांकनामध्ये वार्षिक मूल्य दर तक्त्यांतील जमीन दरास ५% वाढ देऊन मूल्यांकन करणे अभिप्रेत आहे.

४.३.१५-

मुद्रांक शुल्कात सूट देण्याबाबतच्या अटी व शर्तींच्या पालनाची खातरजमा करण्यासाठी यंत्रणा नसणे.

महाराष्ट्र शासनाने जून २००७ च्या अधिसूचने अंतर्गत काही संलेखावर(३४) पूर्ण सूट दिली आहे, यासाठी अशी अट आहे की एखादे घटक, जे काम सुरु करण्याकरीता सूट दिलेली आहे, ते कार्य सुरु करण्यास असमर्थ ठरल्यास किंवा त्याने प्रोत्साहन पॅकेज योजना,२००७ मधील अटींचे उल्लघंन केल्यास, त्या घटकास सुरवातीपासून कोणतीही सूट नसल्याप्रमाणे मुद्रांक शुल्क व शास्ती अदा करावी लागेल.

मुद्रांक जिल्हाधिकारी नागपूर ग्रामीण कार्यालयातील अभिनिर्णय दस्तऐवजांच्या छाननीत (मार्च २०१४) आम्हाला असे आढळले की वर्ष २००९ ते २०१२ मधील समविषयावरच्या अधिसूचने प्रमाणे ३५ भाडेपट्टे आणि विक्री करारात रु.३१८ कोटीची मुद्रांक शुल्कात सूट देण्यात आली. तथापि, अशी कोणतीही यंत्रणा अस्तित्वात नव्हती अथवा अधिसूचनेत किंवा पॅकेज प्रोत्साहन योजना, २००७ मध्ये विनिर्दिष्ट नव्हती ज्याद्वारे लाभार्थी घटकांनी कामे सुरु केली आणि प्रोत्साहन पॅकेज योजना २००७ च्या अटींचे उल्लंघन झाले नाही, याबाबत खातरजमा करता येईल.

आम्ही हे निदर्शनास आणल्यावर विभागाने नमुद केले की जिल्हा उद्योग केंद्र (DIC) नागपूर कडून त्या ३५ प्रकरणाबद्दल माहिती मागविणयात आली होती. त्यापैकी चार प्रकरणामध्ये ज्यात रू. ५४.९० लाख मुद्रांक शुल्क अंतर्गत आहे. सुट देण्याबाबातच्या अटी आणि नियमांचे उल्लघन करण्यात आले होते. तथपि, या प्रकरणांत केलेली कार्यवाही लेखा परीक्षेस कळविण्यात आली नाही. हे तथ्य आहे की लाभार्थी घटकांनी विहीत कालावधीत त्यांची कामे सुरु केली याची खातरजमा करण्यासाठी यंत्रणा अस्तित्वात नाही.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :-

या परिच्छेदात समावीष्ट ३५ दस्त हे मुद्रांक जिल्हाधीकारी नागपूर ग्रामीण यांच्या कार्यालयात अभिनीर्णीत केलेले आहेत.

या बाबत निर्गमन परिषदेत (EXIT CONFERANCE) मध्ये झालेल्या चर्चे मध्ये परीच्छेदावरील आक्षेप खालील कारणास्तव अमान्य करण्यात आलेला आहे.

शासनाने आदेश क्र. २००७/प्र.क्र. १९६(४)/म-१, दिनांक १२-६-२००७ नुसार सामुहीक प्रोत्साहन योजनेअंतर्गत उद्योगांना देण्यांत आलेल्या मुद्रांक शुल्काची माफी दिलेल्या ३५ दस्तऐवज असून सर्व दस्त हे भाडेपट्टयांचे व खरेदीखताचे आहेत. सदरचे सर्व दस्तांमध्ये सामुहीक प्रोत्साहन योजनेच्या अटी शर्तीप्रमाणे विहीत मुदतीत उद्योग सुरु झाले असल्याची पडताळणी मुद्रांक जिल्हाधिकारी नागपूर ग्रामीण यांनी केली असल्याने दिलेली माफी योग्य आहे. सबब आक्षेप अमान्य करण्यात येत आहे.

४.३.१६-

आंतरिक नियंत्रण कार्यतंत्र :

एक प्रभावी आंतरीक लेखापरीक्षा विभाग सदैव कोणतीही मोठी अनियमीतता घडणे यासाठी परावर्तक असतो. नोंदणी महानिरीक्षक यांनी जून २००१ मध्ये आंतरिक लेखापरीक्षणासाठी परिपत्रकाद्वारे मार्गदर्शक तत्वे निर्गमित केली. ह्या मार्गदर्शक तत्वानुसार, नोंदणी महानिरीक्षक कार्यालयातील आंतरिक लेखापरीक्षा विभागाच्या दोन शाखांना (डेस्क-१० आणि डेस्क-११) तीन कार्यालयाचे लेखापरीक्षण करण्याचे मासिक लक्ष्य दिले होते. आणि विभागाच्या प्रत्येक DIG ने प्रत्येक महिन्यात प्रत्येकी दोन कार्यालयांचे लेखापरीक्षण करावयाचे होते. तथापि, नोंदणी महानिरीक्षकांनी मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या लेखापरीक्षणासाठी निश्चित लक्ष्य ठरविलेले नव्हते. नोंदणी महानिरीक्षकाच्या आंतरिक लेखापरीक्षा विभागाद्वारे घेण्यात आलेल्या लेखापरीक्षणाचा सविस्तर तपशील तक्ता ४.३.१६ मध्ये दर्शविला आहे.

तक्ता ४.३.१६

वर्ष	एकूण लक्ष्य	लेखापरीक्षण झालेले कार्यालये			
		उप - IGR	COS + SOS	संयुक्त SR/SR	एकूण
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
२००९	७२	निरंक	निरंक	निरंक	निरंक
२०१०	७२	निरंक	निरंक	७	७
२०११	७२	निरंक	१	२८	२९
२०१२	७२	१	११	३२	४४
२०१३	७२	निरंक	४	३२	३६
एकूण	३६०	१	१६	९९	११६

स्त्रोत : IGR कडून संग्रहीत केलेली माहिती -

वरील तक्त्यावरुन असे सिद्ध होते की, नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाच्या आंतरिक लेखापरीक्षा विभागाने २००९ ते २०१० वर्ष दरम्यान ३९ मुद्रांक जिल्हाधिकारी/मुद्रांक अधीक्षक (COC/SOS) कार्यालयापैकी कोणत्याही कार्यालयाचे लेखापरीक्षण केलेले नव्हते. वर्ष २०११, २०१२ आणि २०१३ मध्ये फक्त एक, ११ आणि चार मुद्रांक जिल्हाधिकारी / मुद्रांक अधीक्षक कार्यालयाचे लेखापरीक्षण केले होते. नोंदणी महानिरीक्षक च्या अंतरीक लेखापरिक्षा विभागाद्वारे लेखापरीक्षण केलेल्या १६ मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयापैकी १५ मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयात लेखापरीक्षण निरीक्षणाची संख्या आणि निदर्शनास आणलेल्या मुद्रांक शुल्काच्या कमी आकारणीची आकडेवारी तक्ता ४.३.१६.१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे होती.–

तक्ता ४.३.१६.१ (रुपये लक्षमध्ये)

वर्ष	मुद्रांक जिल्हाधिकारी यांचे नांव	समाविष्ट असलेला कालावधी	निदर्शनास आणलेली प्रकरणाची संख्या	मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झालेली रक्कम
(१)	(२)	(३)	(४)	(५)
२०११-१२	कुर्ला	जानेवारी २०११ ते मार्च २०११	१४	६९.२८
	सिंधुदुर्ग	एप्रिल २०१० ते मार्च २०११	५	१०.८३
	नागपूर शहर	एप्रिल २०१० ते मार्च २०११	१५	१७२.४३
२०१२-१३	मुंबई	एप्रिल २०१० ते मार्च २०११	१३	३५२.०७
	अंधेरी	एप्रिल २०१० ते मार्च २०११	७	२,५६५.५८
	बोरीवली	एप्रिल २०११ ते डिसेंबर २०११	११	१,१३८.६६
	एन्फोर्समेंट - १	एप्रिल २०१० ते मार्च २०११	२४	१,५५४.२४
	ठाणे ग्रामीण	एप्रिल २०१० ते सप्टेंबर २०१०	७	१३८.१०
	पुणे शहर	जानेवारी २०११ ते डिसेंबर २०११	७	२४९.५४
	पुणे ग्रामीण	एप्रिल २०१० ते मार्च २०११	२४	१७०.४०
	सातारा	एप्रिल २०१० ते मार्च २०११	६	५.००

तक्ता ४.३.१६.१—चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)
	सांगली	एप्रिल २०१० ते मार्च २०११	२	२१.१४
	नाशिक	एप्रिल २०१० ते मार्च २०११	४	२४१.४६
	नागपूर ग्रामीण	एप्रिल २०१० ते मार्च २०११	५	२.४०
२०१३-१४	एन्फोर्समेंट - २	एप्रिल २०१० ते मार्च २०११	१५	४६५.४७
		एकूण . .	१५९	७,१५६.६०

वरील माहितीवरुन असे दिसते की २०११-१३ दरम्यान लेखापरीक्षण केलेल्या १५ मुद्राक जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये नोंदणी महानिरीक्षकाच्या आंतरिक लेखापरीक्षा विभागाने रु. ७१.५७ कोटी किंमतीची मुद्रांक शुल्क कमी आकारणीची १५९ प्रकरणे दर्शविली. जर नोंदणी महानिरीक्षकांच्या आंतरीक लेखापरीक्षा विभागाद्वारे मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या लेखा परीक्षणासाठी जर निश्चित लक्ष्य ठरवले असते आणि त्यांनी जास्त मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयाचे लेखापरीक्षण केले असते तर मुद्रांक शुल्काच्या कमी आकारणीच्या जास्त प्रकरणांचा तपास लागण्याची संभावना होती. आम्ही हे निदर्शनास आणुन दिल्यानंतर (जून २०१४) नोंदणी महानिरीक्षक यांनी असे आश्वासित केले की प्रत्येक वर्षी कमीत कमी १० ते १२ मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयाचे लेखापरीक्षण त्यांच्या कार्यालयाच्या आंतरिक लेखापरीक्षा विभागाद्वारे केल्या जाईल.

असेही आढळून आले होते की, मुंबई शिवाय इतर विभागांमध्ये मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयाचे द्वी-स्तरीय लेखापरीक्षण होते म्हणजेच एक नोंदणी महानिरीक्षकाद्वारे आणि एक DIG द्वारे तथापि, असे आढळले होते की ACOS, मुंबईच्या नियंत्रणाखाली असलेल्या कोणत्याही मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयाचे लेखापरीक्षण त्यांच्याद्वारे करण्यात आले नाही. जरी मुंबई विभागाच्या मुद्रांक जिल्हाधिकाऱ्याद्वारे प्रमाणावर महसूल वसुली होते.

आम्ही हे निदर्शनास आणुन दिल्यानंतर (जुलै - २०१४) नोंदणी महानिरीक्षकांनी मुद्दा मान्य केला आणि ऑगस्ट २०१४ मध्ये एक परिपत्रक निर्गमित केले ज्यात ACOS मुंबईला त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयांचे लेखापरीक्षण करण्याबाबत सुचना दिल्या आहेत. अशी शिफारस करण्यात येते की विभागाने आंतरीक नियंत्रण शाखेस आंतरिक नियंत्रण सशक्त करावयास पाहिजे, ज्यामुळे संबंधीत प्राधिकाऱ्यांकडे प्रकरणे तत्परतेने पाठविली जातील व दोषनिरसन कार्यवाही होऊन, महसूल हानी टाळता येईल.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

अप्पर मुद्रांकनियंत्रक मुंबई यांनी मुंबई शहर व मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयाची दर महा एक तपासण्णी करणे बाबतचे उद्दीष्ट ठरवून देण्यात आले असून याबाबत या कार्यालयाने दिनांक ७-८-२०१४ रोजी परिपत्रक निर्गमीत केलेले आहे. त्या अनुषंगाने.—

१. मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी दुय्यमनिबंधक कार्यालयाच्या आता पर्यंत २४ इतक्या तपासण्या केलेल्या आहेत.

२. अपर मुद्रांकनियंत्रक यांनी मुद्रांक जिल्हाधिकारी यांच्या आतापर्यंत १४ इतक्या तपासण्या केलेल्या आहेत.

४.३.१७ निष्कर्ष :

अभिनिर्णयासाठी चिन्हांकित दस्तऐवजामध्ये सामान्यतः मोठी रक्कम अंतर्भुत असते. तथापि, गेल्या पाच वर्षांत दस्ताऐवजांच्या प्रलंबनात वाढ झाली आहे, ज्याचा परिणाम महसुलाच्या अडवणुकीत झाला आहे. नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाने सादर केलेल्या अभिनिर्णीत प्रकरणांच्या माहितीत काही त्रुटी आढळून आल्या ज्यावरुन विविध स्तरावर संनियंत्रणाचा अभाव दिसतो. विकासक विकासकासाठी दिलेल्यया मालमत्तेचे वास्तव बाजारमुल्य निश्चित करण्यासाठी आणि विकासकाने संस्थेला आणि संस्थेच्या सदस्यांना दिलेल्या मोबदल्याबाबत स्पष्ट निर्देश नाही. ज्यामुळे समान दस्तावेजांच्या अभिनिर्णयात एकरुपतेचा

अभाव आहे. पुढे पर्याप्त मार्गदर्शक तत्वांच्या अभावामुहे मुंबई आणि मुंबई उप-नगरी जिल्ह्यातील प्रवर्ग 'अ' च्या अभ्यर्पित मालमत्तेचे आणि भाड्याने दिलेल्या मालमत्तेचे बाजारमुल्य निर्धारणात एकरुपतेचा अभाव होते. सर्व तथ्यांचा आणि परिस्थितीचा विचार न केल्यामुळे संलखाचे चुकीचे वर्गीकरण आणि चुकीचा अर्थ लावण्याची प्रकरणे आढळून आली. ज्याचा परिणाम मुद्रांक शुल्काची कमी आकारणी होण्यात झाला. वार्षिक मुल्य दर तक्ता आणि नोंदणी महानिरीक्षक यांच्या सुचनांची अभिनिर्णय प्राधिकाऱ्यांनी दखल न घेण्याची उदाहरणे आम्हाला आढळली. नोंदणी महानिरीक्षकाच्या आंतरिक लेखापरीक्षा विभागाद्वारे घेण्यात येणाऱ्या लेखापरीक्षणात तुट होती. नोंदणी महानिरीक्षकाद्वारे मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयांचे लेखापरीक्षण करण्यासाठी ठराविक लक्ष्य नेमुन दिले नव्हते. आणि अतिरिक्त मुद्रांक नियंत्रक, मुंबई यांनी त्यांच्या अंतर्गत असलेल्या कोणत्याही मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयाचे जे मोठ्या प्रमाणात महसूल वसूली करतात, लेखापरीक्षण केलेले नव्हते.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

तपासणी पथकाच्या निष्कर्षाच्या अनुषंगाने विभागामार्फत योग्य त्या सुधारणा निर्गमीत करण्यात आलेल्या असून व येत आहेत.

१. अभिनिर्णय प्रकरणे दाखल करुन त्यावर जाहीर केलेल्या नागरीकाच्या सनदीप्रमाणे वेळेत प्रकरणे निर्गत व्हावी म्हणून एनआसी पुणे यांचेकडून सॉप्टवेअर विकसीत करण्यात आलेले असून त्याची अंमलबजावणी १ जून २०१६ पासून प्रभावी पणे करण्याबाबत अधिकाऱ्यांच्या घेतलेल्या कार्यशाळेत सुचना देण्यात आलेल्या आहेत.

२. अभिनिर्णयासाठी दाखल एकसारख्या प्रकरणात समान कार्यपद्धतीचा अवलंब करुन वार्षिक दर तक्त्यातील सुचनांचे पालन करणे याबाबत सर्व मुद्रांक जिल्हाधिकारी यांना दिनांक ३०-१२-२०१४ रोजीच्या पत्रान्वये सुचना देण्यात आलेल्या आहेत.

३. अभिनिर्णय प्रकरणे व इतर कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी विभागाने पद निर्मितीसाठी नवीन आकृतीबंध तयार करुन शासनास सादर केलेला आहे. तो शासनाच्या विचारीधीन आहे.

सर्व प्रकरणातील मुल्यांकनाबाबत एक सारखेपणा व समानता येण्यासाठी सविस्तर मार्गदर्शन सुचना सन २०१५ पासूनच्या बाजारमुल्य दर तक्त्यासोबत सुचना दिल्या आहेत.

४.३.१८–

शिफारशींचा सारांश :

शासनाने / विभागाने विचारात घ्यावे.–

• प्रकरणांच्या प्रभावी सनियंत्रणासाठी विभागाने अभिनिर्णय प्रकरणांचे एक योग्य व अचूक डेटाबेस तयार करणे आणि त्या प्रकरणांना अंतिम करण्यासाठी एक ठराविक वेळापत्रक तयार करणे, जेणे करुन शासकीय महसुलाची अनावश्यक अडवणूक होणार नाही.

• समान कर पद्धतीचा अवलंब होण्यासाठी FSI चे निर्धारण, विकास/पुनर्विकास करारनाम्यांवर TDR लादणें यासाठी समान कार्यपद्धती तयार करणे आणि त्या समानतेने लागू करण्यात येतात याची खातरजमा करणे आणि मुद्रांक शुल्क आकारणीसाठी वार्षिक मुल्य दर तक्त्यातील सुचनांचे पालन होणे याबाबत सूचना करावी.

• विभागाने आंतरीक नियंत्रण शाखेसह आंतरीक नियंत्रण सशक्त करावयास पाहिजे, ज्यामुळे संबंधित प्राधिकाऱ्यांकडे प्रकरणे तत्परतेने पाठविली जातील व दोषनिरसन कार्यवाही होऊन महसूल हानि टाळता येईल.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

या परिच्छेदामध्ये तपासणी पथकाने केलेल्या शिफारसी विचारात घेण्यात आलेल्या असुन खाली नमूद केल्याप्रमाणे सुचना निर्गमीत करण्यात आलेल्या आहेत.–

१. अभिनिर्णय प्रकरणे दाखल करुन त्यावर जाहीर केलेल्या नागरीकाच्या सनदीप्रमाणे वेळेत प्रकरणे निर्गत व्हावी म्हणून एनआयसी पुणे यांचेकडून सॉपवेअर विकसीत करण्यात आलेले असून त्याची अंमलबजावणी १ जून २०१६ पासून प्रभावीपणे करण्याबाबत अधिकाऱ्यांनी घेतलेल्या कार्यशाळेत सुचना देण्यात आलेल्या आहेत.

२. अभिनिर्णयासाठी दाखल एकसारख्या प्रकरणात समान कार्यपद्धतीचा अवलंब करुन वार्षिक दर तक्त्यातील सुचनांचे पालन करणे याबाबत सर्व मुद्रांक जिल्हाधिकारी यांना दिनांक ३०-१२-२०१४ रोजीच्या पत्रान्वये सुचना देण्यात आलेल्या आहेत.

३. अभिनिर्णय प्रकरणे व इतर कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी विभागाने पद निर्मितीसाठी नवीन आकृतीबंध तयार करुन शासनास सादर केलेला आहे. तो शासनाच्या विचाराधीन आहे.

४. सर्व प्रकरणातील मुल्यांकनाबाबत एक सारखेपणा व समानता येण्यासाठी सवीस्तर मार्गदर्शन सुचना सन २०१६ पासूनच्या बाजार मुल्य दर तक्त्यासोबत सुचना दिल्या आहेत.

४.४-

इतर लेखापरीक्षा निरीक्षणे :

विविध नोंदणी कार्यालयाच्या अभिलेखांच्या छाननीत आम्हाला महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ च्या तरतुदींचे शासनाच्या अधिसूचना आणि अनुदेश यांचे अनुपालन न होण्याची अनेक प्रकरणे आणि या प्रकरणाच्या अनुवर्ती परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे इतर प्रकरणे आढळून आली. ही प्रकरणे निदर्शी आहेत आणि ती अभिलेख्यांच्या चाचणी तपासणीवर आधारलेली आहेत. शासन/विभाग यांनी आंतरीक नियंत्रण कार्यतंत्र सुधारण्याची आवश्यकता आहे. म्हणजेच अशी प्रकरणे टाळता येऊ शकतील, त्यांचा तपास लागू शकेल आणि ती दुरुस्त करता येतील.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

विभागामध्ये कामाच्या प्रमाणात मंजूर कर्मचारी वृंद अपूरा आहे त्यामुळे काही प्रमाणामध्ये काही प्रकरणे प्रलंबीत राहतात ही बाब विचारात घेवून प्रकरणे कामकाज अधीक प्रभावीपणे व अचूक निर्गत होण्यासाठी नवीन आकृतबंध तयार करुन शासनास सादर केलेला आहे. तो शासनाच्या विचाराधीन आहे.

४.४.१–

मालमत्तेच्या न्युन मुल्यांकनामुळे मुद्रांक शुल्काची कमी आकारणी :

महराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ च्या अनुसूची-१ मधील अनुच्छेद 25(a)(b)(c)(d) अनुसार अभिहस्तांतरणावरील मुद्रांक शुल्क हे मालमत्तेचे वास्तव बाजार मुल्य किंवा संलेखात नमूद मोबदला, यापैकी जे अधिक असेल त्यावर आकारणी योग्य आहे. वास्तव बाजार मुल्य वार्षिक मुल्य दर तक्ता (ASR) मधील विहीत दर गृहीत धरुन ठरविण्यात येते.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

सविस्तर अभिप्राय खालीलप्रमाणे.–

४.४.१.१

दस्ताऐवजांच्या/संलेखांच्या चाचणी पडताळीत आम्हाला असे आढळले की विभागाने मालमत्तेचे बाजार मूल्य चुकीचे ठरविले.

संयुक्त दुय्यम निबंधक - XII हवेली पुणे कार्यालयातील दस्तावेजांच्या छाननीत (नोव्हेंबर २०१२) असे उघडकीस आले की सर्वेक्षण क्रमांक १०० आणि १०१ असलेली मालमत्ता वरजे गावांत आहे. जमिनीचे क्षेत्रफळ अनुक्रमे ४२,००० चौरस मीटर

व ३१,४६३ चौरस मीटर होते. ASR चे दर अनुक्रमे रु. १०,४०० प्रती चौरस मीटर आणि रु. ७०० प्रती चौरस मीटर होते. आणि दस्तावेजात नमुद रु. ४.८३ कोटी ऐवजी योग्य बाजार मूल्य रु. २८.६३ कोटी इतके होते. परिणामी रु. १.१९ कोटीची मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली होती. दस्ताऐवजात रु. ४.८३ कोटीचा मोबदला ज्या आधारे नमूद केला होता तो लेखापरीक्षेदरम्यान सादर केला नाही.

आम्ही निदर्शनास आणुन दिल्यावर (नोव्हेंबर २०१२) संयुक्त जिल्हा निबंधक आणि मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे यांनी लेखापरीक्षा निरीक्षण मान्य केले (मे २०१३) आणि संयुक्त दुय्यम निबंधक यांना लेखापरीक्षेने दर्शविलेली संपूर्ण रकमेच्या वसुलीचे आदेश दिले. मागणीच्या वसुलीची पुढील प्रगती प्राप्त झाली नाही. (डिसेंबर २०१४)

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

या परिच्छेदामध्ये दुय्यम निबंधक हवेली क्रमांक १२ कार्यालयातील दस्त क्रमांक १६४५/२०११ चा समावेश आहे. सदर परिच्छेदातील आक्षेप मुद्रांक जिल्हाधिकारी पुणे शहर यानी मान्य करुन संबंधीत पक्षकारांना वसुलीची नोटीस बजावली असता दस्तातील मिळकतीचे केलेल्या बाजारमुल्याबाबत आक्षेप घेतलेला आहे. परंतु आक्षेपाच्या अनुषंगाने आवश्यक ते कागदोपत्री पुरावे त्यांनी दाखल केलेले नाहीत म्हणून तसे पुरावे दाखल करण्यास त्याना कळविण्यात आलेले आहेत. त्यांचेकडून कागदपत्र दाखल होताच वसुलीबाबत पुढील निर्णय घेण्यात येईल.

४.४.१.२ दुय्यम निबंधक खामगांव येथे नोव्हेंबर २०१० आणि डिसेंबर २०११ मध्ये दोन करार निष्पादीत झाले. विभागाने मालमत्तेचे बाजारमुन्य रु. ७५.८५ लाख ठरविले. ज्या आधारावर ही परिगणना करण्यात आली ते दस्तावेज लेखापरीक्षेला उपलब्ध करून देण्यात आले नाही तथापि, एएसआर-२०१० आणि २०११ प्रमो मालमत्तेचे योग्य बाजारमुल्य रु. ३.८२ कोटी आहे. अशाप्रकारे रु. १३.२७ लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली. आम्ही निदर्शालास आणुन दिल्यावर (मार्च २०१३) संयुक्त जिल्हा निबंधक आणि मुद्रांक जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी निरीक्षण मान्य केले (अनुक्रमे जून २०१३ आणि सप्टेंबर २०१३) वसुलीबाबत पुढील प्रगती प्राप्त झाली नाही. (डिसेंबर २०१४)

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.-

या परीच्छेदामध्ये दुय्यम निबंधक खामगांव कार्यालयातील दस्त क्रमांक ५८३२/२०१० व ९५१७/२०११ या दस्तांचा समावेश आहे. सदर परच्छेतील आक्षेप मान्य केलेला असून पक्षकार यांना कलम ३२-अ खाली वसुलीची नोटीस देण्यात आली होती. पंरतु त्यांनी कमी पडलेला मुद्रांक शुल्क भरणा न केल्याने महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम चे कलम ४६ नुसार कार्यवाही करुन पक्षकारांने दस्तात नमूद मिळकतीचे ७/१२ वर महसूल प्रमाणपत्र बोजा दाखल करण्यात आलेला आहे. सोबत ७/१२ ची प्रत सादर.

४.४.१.३ भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८ च्या कलम २३ मध्ये असे विहीत आहे कि मृत्युपत्रा व्यतीरिक्त इतर कोणतेही दस्तावे नोंदणीसाठी निष्पादनाच्या तारखेपासून चार महिन्यांच्या आत प्रस्तुत करण्यात आले नाही. तर ते स्वीकारण्यात येणार नाही. लेखापरीक्षेस असे निदर्शनास आले की दुय्यम निबंधक राजगुरूनगर, खेड, पुणे येथे विक्रीचा करारनामा शिर्षक असलेलसे दोन दस्तावेज जानेवारी १९९२ मध्ये निष्पादीत करण्यात आले परंतु त्यांची नोंदणी डिसेंबर २०११ मध्ये करण्यात आली. चार महिन्यांचा विहीत कालावधी संपल्यामुळे ते नोंदणीसाठी अमान्य करावयास पाहिजे होते आंणि २०११ च्या एएसआर वर आधारीत नवीन दस्तावेज निष्पादित करावयास पाहिजे होते. तथापि, विभागाने अधिनियमांच्या तरतुदी विरुद्ध १९९२ चे जुने करार अनुचित प्रकारे नोंदणीसाठी स्वीकार केले. २०११ च्या एएसआर प्रमाणे मालमत्ताचें एकूण बाजार मुल्य रु. ५.६८ कोटी होते. ज्यावर रु. २२.७४ लाख मुद्रांक शुल्क आणि रु. ०.६० लाख नोंदणी फी आकारणीयोग्य होती. तथापि, विभागाने रु. १.८८ लाख मुद्रांक शुल्क आणि रु. ०.५४ लाख नोंदणी फी आकारले या अनियमिततेचा परिणाम नोंदणी शुल्का समवेत रु. २०.९२ लाख मुद्रांक शुल्काच्या कमी वसुलीत झाला.

आम्ही निदर्शनास आणून दिल्यावर (ऑक्टोबर २०१३) सह जिल्हा निबंधक वर्ग-१ आणि मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे (ग्रामीण) यांनी निरीक्षण मान्य केले (मार्च २०१४) वसुलीची पुढील प्रगति प्राप्त झाली नाही. (डिसेंबर २०१४).

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.-

या परीच्छेदामध्ये दुय्यम निबंधक खेड कार्यालयात नोंदणी झालेले दस्त क्रमांक ९१४१/२०११ व ९१४२/२०११ या दस्तांचा समावेश आहे.

दस्त क्रमांक ९१४१/२०११ व दस्त क्रमांक ९१४२/२०११ हे खरेदीखताचे असून ते दिनांक १४-१२-२०११ रोजी निष्पादीत केलेले आहे. त्या दस्तांसोबत म. सहदिवासी न्यायाधीश यांचेकडील दिनांक २९-१-२०११ रोजी प्रमाणित केलेली डिक्रीची प्रत परीशिष्ट म्हणून दोन्ही दस्तासोबत जोडलेली आहे.

तपासणी पथकाने आक्षेपा मध्ये विक्रीचा करारनामा शीर्षक असलेले दोन दस्तऐवज जानेवारी १९९२ मध्ये निष्पादीत करण्यात आलेले आहे. परंतु त्यांची नोंदणी डिसेंबर २०११ मध्ये पुर्ण करण्यात आलेली आहे. आठ महिन्यांचा विहीत कालावधी संपल्यामुळे ते नोंदणीसाठी अमान्य करावयास पाहिजे होते. असा आक्षेप आहे. तथापि, वर नमूद केल्याप्रमाणे सदरचे दस्त खरेदीखताचे असून ते दिनांक १४-१२-२०११ रोजीनिष्पादीत केलेले असून ते विहित मुदतीत नोंदणीस सादर केलेले आहेत. व याच दस्ताची नोंदणी दुय्यम निबंधक यांनी पूर्ण केलेली आहे. मात्र दस्तासोबत परिशिष्ट म्हणून जोडलेल्या दस्ताची नोंदणी केलेली नाही (Exn. Not to be Registered) अशा शेरा नोदणी प्रमाणपत्रामध्ये देणे आवश्यक होते. तसे केलेले दिसून येत नाही.

तपासणी पथकाने चार महिन्यांचा विहीत कालावधी संपल्यामुळे ते दस्त नोंदणीसाठी अमान्य करावयास पाहिजे होते हे म्हणणे वरील कारणास्तव योग्य वाटत नाही. तथापि, तपासणी पथकाने बाजार मुल्याबाबत घेतलेला आक्षेप मान्य करण्यात येवून सदरचे दस्तऐवजमध्ये मुद्रांक जिल्हाधिकारी यांचे स्तरावर वसूलीची कार्यवाही सुरु केलेली आहे.

४.४.२ मुद्रांक शुल्काच्या अदायगी पासून अनियमीत सूट

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ च्या अनुसूची-१ मधील अनुच्छेद २५ (बी) (४) अनुसार मालमत्ता, जी अभिहस्तांतरणाची विषय वस्तू आहे. तिच्या वास्तव बाजारमुल्याच्या अथवा संलेखात नमुद मोबदला, यापैकी जे जास्त असेल त्याच्या पाच टक्के प्रमाणे मुदांक शुल्क आकारणी योग्य आहे. हे दर वार्षिक मुल्य दर तक्ता एएसआर मध्ये विहीत आहेत तसेच ASR चे च्या सूचना २.३ (ए) अनुसार जर मालमत्ताभाडेकरूं ताब्यात असेल, तर वर सांगितल्या प्रमाणे भाडेदारीचे नोंदणी दस्तावेजासोबत जोडलेले कोणती दोन दाखले प्रस्तुत केल्यावरच सवलत दयावयास पाहिजे आणि ते दाखले दस्तावेजाचा भाग असेल.

दुय्यम निबंधक अंधेरी ।। मुंबई यांच्या कार्यालयात नोंदणी केलेल्या संलेखांच्या चाचणी तपासणी (मे, २०१३) आम्हाला असे निदर्शनास आले की मुंबई उपनगर जिल्हाच्या महानगर पालिकेच्या हद्दीतील २,०९८.९० चौरस मीटर जमिनीच्या विक्रीकरीता २३ डिसेंबर २०११ ला अभिहस्तांकन करार निष्पादीत करण्यात आला होता. हे दस्तावेज निष्पादित करण्यात आले परंतु नोंदणीकृत करण्यात आले नाही. मुद्रांक जिल्हाधिकारी (एन्फोर्समेंट-२) मुंबई यांनी एका तक्रारीच्या आधारावर (जानेवरी २०१२) दस्तावे अवरुद्र केले (मार्च २०१२) आणि मालमत्तेचे बाजारमुल्य रु. ७५.६६ लाख इतकेक परिगणित केले. तथापि, दस्तावेजामध्ये नमुद रु. १.०० कोटीच्या विक्री मोबदल्यावर रु. ५.०० लाख मुद्रांक शुल्क आकारण्यात आले.

आम्हाला पुढे असेली लक्षात आले की रु. १६.४० कोटी मुल्य असलेल्या जमिनीवर २,९३८..४६^{३५} चौरस मीटर FSI उपलब्ध होते. ज्यावर रु. ८१.९८ लाख मुद्रांक शुल्क आकारणी योग्य होते. परंतु २८०६.६९ चौ. मी. क्षेत्र भाडेकरुनी व्यापलेले असल्यामुळे विभागाने त्यावर मुद्रांक शुल्क आकारणीची सुट दिली. तथापि, दस्तावेजा सोबत भाडेदारीबाबत कोणताही पुरावा नव्हता आणि तसेच भाडेदारी बद्दल दस्तावेजात काहीही नमूद केले नव्हते. अशा प्रकारे भाडेदारीच्या पुराव्या शिवाय आणि दस्तावेजात अंतभुर्त असल्या शिवाय सवलत देणे अनियमित होते. ही वस्तुस्थिती मुद्रांक जिल्हाधिकारी यांच्या निदर्शनास (मे २०१३) आणुन दिल्यावर त्यांनी लेखापरीक्षा निरीक्षण मान्य केले (डिसेंबर २०१३) आणि दुय्यम निबंधक, अंधेरी-२ यांना रु. ७६.९८ लाख इतक्या मुद्रांक शुल्काची सुट वसूल करण्याचे आदेश दिले वसूलीबाबत प्रगतीचा पुढील अहवाल प्राप्त झाला नाही. (डिसेंबर २०१४).

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.-

या परीच्छेदामध्ये दुय्यम निबंधक अंधेरी क्रमांक २ या कार्यालयात नोंदणी झालेले दस्त क्रमांक १९८३/२०११ या दस्तांचा समावेश आहे. या दस्तातील एकूण क्षेत्रापैकी २९३८.४६ चौ. मी. यापैकी २८०६.६९ चौ. मी. क्षेत्र भाडेकरुव्याप्त असल्याचे मान्य करुन मुद्रांक शुल्क आकारणीची सुटदिली तथापि, दस्तासोबत भाडेकरु असल्याबाबतचे कोणतेही पुरावे जोडून घेतले नाही. शिवाय या मिळकतीत भाडेकरु असल्याबाबतचे कोणतेही पुरावे जोडून घेतले नाही. शिवाय या मिळकतीत भाडेकरुन आहे असा दस्तामध्ये उल्लेख केलेला नाही. तरी देखील भाडेकरु असल्याचे दर्शवून बाजार मुल्यामध्ये सवलत देण्यात आली. परीणामी ७६.९८ लाख इतक्या महसूलाची तूट झाली. सदरचा आक्षेप मान्य करण्यात आलेला आहे परंतु दस्त अभीनीर्णीत असल्याने सदरचे प्रकरणे कलम ५३-अ खाली पुनर्वीलोकनासाठी घेण्यात आलेले आहे. सदर प्रकरणात पक्षकारांना सुनावणीची संधी देण्यात आलेली आहे.

४.४.८ मुद्रांक जिल्हाधिकाऱ्या द्वारे मुद्रांक शुल्काची कमी आकारणी :

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम २ (एनए) अनुसार एखाद्या संलेखाची विषयवस्तु असणाऱ्या मालमत्तेच्या संदर्भात बाजार मुल्य म्हणजे असा संलेख ज्या तारखेस निष्पादित करण्यात आला असेल त्या तारखेस ती मालमत्ता खुल्या बाजारात विकली असता जी किंमत आली असती ती किंमत किंवा संलेखात नमुद करण्यात आलेली मोबदल्याची रक्कम यापैकी जे अधिक असेल ते असा आहे. तसेच, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या अनुसूची-१ मधील अनुच्छेद २५(बी) (४) अनुसार अभिहस्तांतरणाची विषयवस्तु असलेल्या मालमत्तेच्या वास्तव मुल्यावर पाच टक्के दराने अथवा संलेखात नमुद मोबदला यापैकी जे अधिक असेल त्यावर मुद्रांक शुल्क आकारणीयोग्य आहे. वार्षिक मुल्य दर तक्त्यात हे दर विहीत केले आहेत.

मुद्रांक जिल्हाधिकारी, मुंबई यांच्या कार्यालयात नोंदणीकृत दस्तावेज/ संलेखांच्या चाचणी तपासणीत मे २०११ मध्ये आम्हाला असे निदर्शनास आहे की १०,३१२.१० चौरस मीटर जमिनीकरीता १२ एप्रिल २००८ रोजी मालक आणि खरेदीदार यांच्यात अभिहस्तांतरण करार निष्पादित करण्यात आला. करारावर देय मुद्रांक शुल्क निर्धारीत करण्यासाठी बाजार मुल्य ठरवीणे यासाठी खरेदीदाराने दस्तावेज अभिनिर्णया करीता सादर केले, मुद्रांक जिल्हाधिकारी मुंबई यांनी मालमत्तेचे बाजार मुल्य रु. ६३.७७ कोटी ठरविले. तथापि, आदेश जारी करतांना मुद्रांक जिल्हाधिकारी मुंबई यांनी ज्यात रु. ३.१८ कोटी मुद्रांक शुल्क आकारणी अभिप्रेत आहे. अशा रु. ६३.७७ कोटी बाजार मुल्याऐवजी दस्तावेजात नमुद रु.४.७७ कोटी मोबदला मुल्यावर अयोग्यरित्या रु. २३.८५ लाख मुद्रांक शुल्क आणि रु. २.३९ लाख शास्तीची आकारणी केली. ज्याचा परिणाम रु.२.९५ कोटी मुद्रांक शुल्काच्या कमी आकारणीत झाला.

आम्ही निदर्शनास आणुन दिल्यावर (मे २०११) मुख्य नियंत्रक महसुल अधिकारी (सीसीआरए) पुणे यांनी लेखापरीक्षा निरीक्षण मान्य केले (फेब्रुवारी २०१४) आणि रु. २७.१२ लाख शास्ती शिवाय रु. २.९५ कोटी रक्कमेच्या वसुलीचे आदेश निर्गमित केले.

वसुली बाबत पुढीत प्रगतिचा अहवाल प्राप्त झाला नाही. (डिसेंबर २०१४) वरील लेखापरीक्षा निरीक्षणे शासनास कळविण्यात आली (मे २०१४ दरम्यान) उत्तर प्राप्त झाले नाही. (डिसेंबर २०१४)

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.-

या परीच्छेदामध्ये मुद्रांक जिल्हाधिकारी मुंबई शहर यांचे कडील अभि. प्रकरण क्रमांक २३४२/२००८ चा समावेश आहे.

या प्रकरणावरील तपासणी पथकाचा आक्षेप मान्य करण्यात आलेला असून दस्त अभिनिर्णीत असल्याने प्रकरण ५३-अ खाली पुनर्विलोकनासाठी घेण्यात आलेले होते. संबंधीताना सुनावणीची संधी देवून दिलेल्या निर्णयामध्ये रुपये २.९५ कोटी मुद्रांक शुल्क वसूल करण्याबाबत मुद्रांक जिल्हाधिकारी यांना निर्देश दिलेले होते.

त्याअनुषंगाने मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी संबंधित पक्षकार यांना वसुलीची नोटीस बजावली असता पक्षकार यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई येथे रिट पीटीशन क्रमांक २७८४/२०१४ ने दावा दाखल केलेला आहे. सदर प्रकरणात मा. न्यायालयाने दिनांक १-४-२०१४ रोजीच्या आदेशान्वये वसुलीबाबत स्थगीती दिलेली आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

साक्ष :

३.२ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने दिनांक २६ जून २०१६ रोजी मुद्रांक शुल्क विभागाच्या विभागीय सचिवांची व प्रतिनिधींची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अभिनिर्णय प्रकरणात मुद्रांक शुल्क आकारणी व वसुली यामधील परिच्छेद क्र. ४.३.१७ मध्ये महालेखाकारांनी काढलेले निष्कर्ष या संदर्भात अशी विचारणा केली की, अभिनिर्णयांकित दस्तऐवजामध्ये मोठी रक्कम अंतर्भूत असते. तथापि, गेल्या पाच वर्षाच्या दस्तऐवजांच्या प्रलंबनात वाढ झाली. याचा परिणाम महसुलाच्या अडवणूकीत झाला आहे. नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाने सादर केलेल्या अभिनिर्णीत प्रकरणाच्या माहितीत काही त्रुटी आढळून आल्या ज्यावरुन विविध स्तरावर सनियंत्रणाचा अभाव दिसतो. विकासकासाठी दिलेल्या मालमत्तेचे वास्तव बाजारमुल्य निश्चित करण्यासाठी आणि विकासकाने संस्थेला आणि संस्थेच्या सदस्यांना दिलेल्या मोबदल्यात स्पष्ट निर्देश नाहीत. ज्यामुळे समान दस्ताऐवजांच्या अभिनिर्णयात एकरुपतेचा अभाव आहे. अशाप्रकारची अनेक अवलोकने या परिच्छेदात निष्कर्षाप्रत आलेली आहेत. मागच्या पाच वर्षाची मोठ्या प्रमाणातील आकडेवारी समितीकडे आलेली असून विभागाचे अंतर्गत लेखापरिक्षण कुठेही नाही. महालेखाकारांनी जे काही आक्षेप दाखल केले ते विभागाने मान्य केले, त्याच्या वसूली केलेल्या कामाची एकही केस समितीकडे आलेली नाही. याबाबत विभागाने थोडक्यात माहिती द्यावी असे समितीने सांगितले.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने विभागीय सचिवांनी समितीस असे अवगत केले की, मुद्रांक आणि नोंदणी विभागामध्ये संगणकीकरणाला सन २००२ मध्ये सुरुवात झाली. सदर दोन वर्षाचे मुद्रांक शुल्क आणि नोंदणी फी चा विचार केला तर साधारणपणे दोन ते अडीच हजार कोटीच्या आसपास वसुली होती. तेव्हापासून सन २०१५-२०१६ पर्यंत विभाग २१ हजार ७०० कोटी पर्यंत गेलेला आहे. गेल्या १४-१५ वर्षामध्ये एक्सपॉन्सीअल वॉर्ड दाखविलेले असून सन २००२ मध्ये अडीच हजारापर्यंत होते ते आता २१ हजारावर गेलेले आहे तसेच पुढे जर आपल्याला महसुल वाढवायचा असेल तर विजेलिंग विंगस्ची नितांत आवश्यकता आहे. ४६८ स्टाफ असलेला विजेलिंग विंगस् तयार करण्याचा प्रस्ताव ठेवलेला आहे. सदर प्रस्तावाला लवकरच मंजूरी मिळेल अशी अपेक्षा आहे. या व्यतिरिक्त आताच्या लेखापरिक्षणात आलेले जे मुद्दे आहेत त्याला दूर करण्यासाठी काही सूचना सुध्दा नोंदणी महानिरिक्षकांनी (एजीआरने) गेल्या दोन वर्षात देण्यात आलेल्या आहेत. दोन महत्वाच्या अमेंडमेंट स्टँप ॲक्टमध्ये गेल्या वर्षी केलेल्या आहेत. यामध्ये जे सार्वजनिक उपक्रम असतील किंवा स्थानिक संस्था, जिल्हा परिषदा, बीसीसीआय सारख्या संस्था असतील या सर्वांवर बंधन आणलेले आहे की, त्यांनी कोणतेही दस्त प्रायव्हेट पार्टीसोबत केला तर ते रजिस्टर होणे आवश्यक नसले तरी त्याची माहिती विभागाला देणे बंधनकारक केलेले आहे आणि येणे बाकी असलेले नोंदणी शुल्क वसूल करण्याची जबाबदारी त्यांच्यावर टाकलेली आहे. त्याशिवाय मुद्रांक जिल्हाधिकारी म्हणून जे अधिकारी आहेत त्यांना कोणत्याही प्रिमायसेसला जाणे आणि त्यांचे डाक्युमेंटस् सर्च आणि सिजर करण्याचे अधिकार दिलेले आहेत. जेणेकरुन यामध्ये जास्त अधिकार यंत्रणेला प्राप्त होतील तसेच याकरिता साडेचारशे लोकांची आवश्यकता असून पारदर्शकतेच्या उपक्रमातून जेवढे वॉर्ड होऊ शकले तेवढे केलेले आहेत.

महाराष्ट्रात खरेदी-विक्रीचा व्यवहार हा एजन्टकडे गेलो तरच ७०० रुपयांमध्ये रजिस्ट्री होते, नाही तर एक हजार रुपये लागतात. ज्यावेळेस एखादी व्यक्ती नोंदणी करण्यासाठी त्याठिकाणी जाते. तेव्हा त्याला सांगितले जाते की, एक हजार रुपये लागतात. जे वेंडर असतात त्यांना सांगितले तर ते ७०० रुपयांमध्ये करुन आणतात. यासर्व विषयासाठी शासनाकडे ऑडिट असले पाहिजे. सर्व उपनिबंधकाच्या मालमत्ता बघितल्या तर या राज्याचे एक वर्षाचे बजेट चालेल यासाठी प्रत्येक गोष्टीचे लेखापरिक्षण करण्याची आवश्यकता आहे. जे नोंदणी केलेले आहे ते योग्य आणि नियमानुसार केलेले आहे किंवा नाही हे पाहण्याची गरज आहे. महालेखाकार जसे लेखापरिक्षण करतात त्याप्रमाणे लेखापरिक्षण व्हायला पाहिजे तरच राज्याला वर्षाला २-५ कोटी रुपये वाढवून मिळतील. एवढ्या मोठ्या प्रमाणात यामध्ये भ्रष्टाचार आहे येणा-या भविष्यात हा सर्व भ्रष्टाचार थांबविण्यासाठी याचे ऑडिट करायला पाहिजे. जेणेकरुन महाराष्ट्राचे उत्पन्न वाढेल. याविषयी विभागाची काय भूमिका आहे अशी विचारणा समितीने केली असता या वर्षी अधिका-यांना दरवर्षी तपासणी करण्याचे जे इष्टांक दिलेले आहेत. त्यानुसार त्यांना तपासणी करता येत नाही अशी परिस्थिती निदर्शनास आलेली आहे. कार्यबाहुल्याचा अभाव असल्याने यामध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. प्रत्येक महिन्याला प्रत्येक अधिका-याने त्याला ठरवून दिलेल्या इष्टांकानुसार तपासणी केली पाहिजे यावर भर देण्यात येणार आहे. तसेच नव्याने दिलेल्या अधिकाराचा वापर अधिका-यांनी केला पाहिजे. अशा प्रकारच्या सक्त सूचना गेल्या १५ दिवसापूर्वी झालेल्या कार्यशाळेमध्ये दिलेल्या असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, अकृषक जागेची खरेदी करायचे दर वेगळे आहेत जर अशा जागेची खरेदी करायची असेल आणि त्याचा दर १० लाख रुपये एकर असेल तर पूर्वीच्या दोन लाख रुपये दराप्रमाणे कागदपत्रे लावून टाकायची आणि कृषक शेतीची खरेदी करुन द्यायची. उत्पन्न यामध्ये दुप्पट झाले तर आश्चर्य होणार नाही. समजा ती जागा अकृषक आहे आणि कृषक दराप्रमाणे खरेदी केली अशी एक केस नाही तर ९० टक्के केस अशा प्रकारच्या आहेत. म्हणून विभागाने १०० पैकी १० किंवा ५ तपासून चालणार नाही याचे १०० टक्के लेखापरिक्षण झाले पाहिजे. खरेदी केल्यानंतर कोणती कागदपत्रे लावण्यात आलेली आहेत आणि ते कोणत्या दिवशी लावली आहेत. सदर कागदपत्रे कृषक होती का अकृषक होती, का त्याचे प्लॉटिंग होते या सर्व गोष्टींची विभागामार्फत पाहणी करणार आहात काय अशी समितीने विचारणा केली. तसेच वरिष्ठ अधिका-यांना काही दर कमी करण्याचे अधिकार दिलेले आहेत त्याचे डिस्क्रीशन चुकीचे वापरले जाते की काय हा एक प्रश्न आहे, टेक्नॉलॉजी हे यावरील फार मोठे सोल्युशन आहे रिक्त जागांचा प्रश्न आहे, प्रमोशन होत नाहीत अशा अनेक गोष्टी असतात. जे प्रॅक्टीकली शक्य होत नाही त्याला टेक्नॉलॉजी हेच उत्तर असायला पाहिजे आणि हे उत्तर शोधण्याचे काम विभागामार्फत करणार आहात काय ? वरिष्ठ अधिका-यांना डिस्क्रीशन वापरण्याचा हक्क असतो. त्याच ब-याचदा दर कमी करुन देतात असे प्रकार नेहमीच आढळून येतात यावर कसे नियंत्रण करता येईल अशीही समितीने विचारणा केली.

यामध्ये जास्तीत जास्त आयसरिता सॉप्टवेअर व्हॅल्युएशन मॉड्युलमध्ये स्वयंचलित (Automatic) करण्यामध्ये भर दिलेला आहे. जवळपास ६० टक्के गाईडलाईन ॲटोमॅटिक केलेले आहे. मूल्यांकन करताना मॉड्युलमध्ये करण्यात आले असून दस्तऐवजामध्ये मूल्यांकन अनिवार्य करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. दुस-यामध्ये टेक्नॉलॉजीबाबत सूचना केलेल्या आहेत याबाबत एमआरसॅक्स सोबत मागच्या वर्षी एक प्रकल्प केला होता. त्यामध्ये अनेक ठिकाणचे हायवे दिसत नव्हते. स्टेट हायवे, नॅशनल हायवे असेल किंवा आता विस्तार गावठाण झालेले आहे. अकृषक झाले तरी कृषकच दाखवित होते. एमआरसॅक्स सोबत प्रोजेक्ट करुन संपूर्ण स्टेट हायवे, नॅशनल हायवेच्या बाजूला असलेला सर्वे नंबर सिस्टममध्ये टाकून घेतलेला आहे. प्रत्येक सर्वे नंबरचा तपशिल प्रत्येक कार्यालयाला दिलेला आहे त्यामुळे आता उत्पन्न नक्की वाढेल. यावर्षी गावठाण विस्तार एरियाचे प्रोजेक्ट घेऊन त्याची कारवाई सुरु केलेली आहे. जेणेकरुन जास्तीत जास्त या टेक्नॉलॉजीचा डेटा उपलब्ध आहे त्याचा वापर करण्याचा प्रयत्न करीत असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

या अनुषंगाने समितीने पुढे अशी विचारणा केली की, विभागाच्या वेबसाईटवर त्या त्या एरियामध्ये त्या त्या प्रमाणात जे दर आहेत ते नमूद आहेत तर मग त्या एरियाचा जो रजिस्ट्रार आहे त्याला अधिकारच नाहीत. समजा, या विधिमंडळाचे व्हॅल्यूएशन विभागाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे. त्यामुळे सर्वसामान्य माणसाला त्या कार्यालयात जाण्याऐवजी हे घरी बसूनही समजणार आहे की, नाही असा समितीचा प्रश्न आहे. आपला एरिया निश्चित असतो आणि आता वेबसाईटमुळे त्या एरियाचे व्हॅल्यूएशन निश्चित झालेले आहे असे असले तरी त्या त्या क्षेत्राचे मूल्यांकन संबंधित नोंदणी अधिकारी करीत असतो आणि असे जर तो मूल्यांकन करीत असेल तर तो किती मोठा आहे याचा विचार केला पाहिजे. समिती महालेखापालांना विनंती करेल की, प्रणालीमध्ये आपण त्यास मूल्यांकन ठरविण्याचा अधिकार का देत आहात. दस्तावेज नोंदविताना तो इतक्या थाटात बसतो त्याबद्दल येथे बसलेल्या कोणत्याही लोकप्रतिनिधींना आपण विचारु शकता त्याला आज शुन्य अधिकार आहेत. ते मूल्यांकन करताना पदाचा गैरवापर करतात. ज्या ज्या जमिनीची नोंदणी होईल त्या त्या जमिनीचा दर्जा समजला पाहिजे की, ती जमीन अकृषिक आहे किंवा कृषक आहे आणि त्यासाठी आपण ती ॲटोमॅटिक वेबसाईटवर लोड होईल अशा पध्दतीने प्रणाली केली पाहिजे, जेणेकरुन सर्वांना माहिती मिळू शकेल. समजा एखाद्याची जमीन आहे पण ती कृषक आहे किंवा अकृषक आहे हे समजले पाहिजे. रजिस्ट्रार ऑफिसमध्ये सांगतात की, त्यांनी जमीन रजिस्ट्रर करुन टाकली आहे कोणाचीही जमीन कोणीही रजिस्टर करायची असे करता येऊ शकत नाही जे येईल ते दस्तऐवज रजिस्टर करणार असे चालणार नाही जमीन नोंदणीसंबंधी बंधने आली पाहिजेत असे समितीचे म्हणणे आहे. याबद्दल विभागाने जर बंधन आणले तरच त्यामधील भ्रष्टाचार थांबणार आहे अन्यथा कोणीही कोणते दस्तऐवज आणले आणि ते रजिस्ट्रर होणार असेल तर योग्य नाही. याबद्दल समितीला अधिका-यांकडून उत्तर पाहिजे आणि त्यामध्ये तरतूद आहे, परंतु त्याचा वापर करीत नाहीत त्यामुळे आता आपण हे वेबसाईटला जोडणार आहात की नाही याबाबत समितीने विचारणा केली तसेच महालेखाकारांनी आता सांगितले आहे की, त्यांनी आता वेबसाईट तयार केलेली आहे आणि त्या सॉफ्टवेअरवर मूल्यांकनाचे अपडेट्स नाहीत. बाकी कृषक आणि अकृषक वगैरे केले आहे पण पूर्णपणे सक्षम असे वेबसाईट करुन २०१५ पर्यंतचे ऑडीट केले आहे असे म्हटले आहे. परंतु त्यामध्ये मूल्यांकनाचा जो भाग आहे तो अजूनही सक्षम नाही आणि तो सक्षम करण्याची अत्यंत गरज आहे, असे महालेखाकारांचे म्हणणे आहे आणि मुल्यांकन ठरविण्यासाठी नोंदणी अधिका-याच्या हातात काही अधिकार असू नयेत. संबंधितांनी थेट सॉफ्टवेअरवर ते पाहिल्यावर त्याला त्या क्षेत्राची किंमत स्पष्टपणे दिसली पाहिजे आणि ही भूमिका जोपर्यंत सॉफ्टवेअर सक्षम होणार नाही तोपर्यंत त्या सॉफ्टवेअरचा काय उपयोग आहे.

एखाद्या जमिनीचे मुल्याकंन निश्चित असावे आणि त्यानुसार एखाद्या जमिनीचे मुल्यांकन निश्चित केलेले असेल तर ते कमी जास्त करण्याचे अधिकार वरिष्ठ अधिका-यांना का देण्यात आले आहे. त्यांना साधारणपणे २५ टक्क्यापर्यंत कमी जास्त मुल्यांकन करण्याचा अधिकार अधिकृतपणे दिलेला आहे. असे डिस्क्रीएशन ब-याच केसेसमध्ये सातत्याने वापरले जाते. सब रजिस्ट्रारला मुल्यांकन कमी करण्याचा अधिकार आहे किंवा नाही हे विभागाने सांगावे आणि असेल तर तो कमीत कमी आणि योग्य ठिकाणीच वापरावा सरसकट ब-यापैकी वापरला जात असेल तर तो का वापरला जातो हेही कळत नाही. समजा एखाद्या जमिनीचा मुल्यांकन दर १० लाख रुपये असेल तर वरिष्ठ पातळीवर जाऊन तो ७.५० लाख रुपये करण्याचा त्यांना अधिकार आहे आणि अपिल केले तर २५ टक्क्यांपर्यंत मुल्यांकन कमी करण्याचे त्यांना डिस्क्रीशनरी अधिकार आहेत.

समितीने व्यक्त केलेल्या मताच्या अनुषंगाने विभागीय सचिवांनी असे विदित केले की, ऑनलाईन किंवा वेबसाईटवरुन गणना करण्याची पध्दत आहे. ८० टक्के दस्तांचे मुल्यांकन त्यावरच ठरते व्हॅल्यूएशन काढण्यासाठी कॅल्क्यूलेटर पण उपलब्ध आहे. सर्व्हे नंबर, गट नंबर आणि गावाचे नाव फिड केल्यानंतर एएसआर मधून म्हणजे रेडीरेकनरमधून रेट पिकअप करुन आपल्याला व्हॅल्यूएशन देण्याची तरतूद आहे आणि याचा वापर ८० टक्के ठिकाणी होतो. ज्या ठिकाणी दस्त आणणा-याने सांगितलेला दर आणि रेडीरेकनरचा दर यामध्ये फरक दिसून येतो किंवा एखाद्या दस्तामध्ये जास्त मोठा दस्त असेल आणि काय काय हस्तांतरीत होत आहे आणि कन्शीडरेशन अमाऊंट किती आहे ठरत नाही. उदा. काही प्रकरणात संयुक्त उपक्रम असेल किंवा संयुक्त विकास करार असेल अशा बाबींमध्ये सविस्तर अप्लिकेशन ऑफ माईन्ड करुन ते ठरविण्याची गरज असते. अशा ठिकाणी फक्त ॲडज्यूकेशनच्या केसेस आपण घेतो आणि त्यामध्ये पक्षकारांपेक्षा जास्त मुल्यांकन दर लावण्याचा प्रयत्न आपला अधिकारी करीत असतो. तरी सुध्दा त्यामध्ये काही प्रमाणात डिस्क्रीएशनचा वापर होतो हे सुध्दा आपण नाकारुन चालणार नाही. परंतु शिफारस ८० टक्के दस्त आपला रेडीरेकनर मल्टीप्लाएड बाय एरिया डिपेंन्डींग ऑन द प्रॉपर्टी लोकेडेट असे करीत असतो.

उपरोक्त संदर्भात खुलासा करताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, कोणताही दस्त नोंदणीसाठी नेल्यानंतर नोंदणी करुन टाकतात हा मुद्दा वारंवार समोर येत असतो यासंबंधी विभाग सुध्दा हतबल आहे कारण यामध्ये केंद्राचा कायदा आहे आणि या कायद्यामध्ये उप निबंधकाला असे कोणतेही अधिकार दिले नाहीत की, विभागाने मालकी तपासावी आणि त्याची खात्री पटल्यावरच दस्ताची नोंदणी करण्यात यावी. कारण कोणताही अधिकार दिलेला नसताना त्या नसलेल्या अधिकाराचा गैरवापर होतो असे सुध्दा आरोप होत असतात. असे असताना मालकी तपासून दस्त रजिस्ट्रर करा असा जर अधिकार दिला तर त्याचा जास्त प्रमाणात गैरवापर होऊन लोकांना जास्त त्रास होईल.

आता जो विषय झाला की, मालमत्ता बघितली पाहिजे. त्या संबंधाने आज जेवढी अनधिकृत बांधकामे झालेली आहेत त्यांना आळा बसवायचा असेल तर त्याचा जोपर्यंत ओ.सी. आणि सी.सी. पूर्ण मिळत नाही तोपर्यंत त्याची रजिस्ट्री केली नाही तर अनधिकृत बांधकामे होणार नाहीत. कशाचीही नोंदणी करुन घेण्यात येते आणि मग ५ ते १० वर्षानंतर हायकोर्ट सांगते की ते अनधिकृत बांधकाम तोडण्यात यावे. जर विभागाने अनधिकृत इमारतींच्या आणि बांधकामांच्या रजिस्ट्री करुन दिल्या नाहीत तर अनधिकृत बांधकामे होणार नाहीत. मग कोणीतरी कोर्टात जातो आणि त्यानंतर ती बांधकामे तोडली जातात त्यामध्ये ते लोक फसतात कारण त्यांनी नोंदणी केलेली असते आणि पैसे दिलेले असतात. पण ती इमारत अनधिकृत असताना विभागातर्फे त्यांना पण रजिस्ट्री करुन देता मग आपण महानगरपालिकेचे उद्योग प्रमाणपत्र का घेत नाही (OC) अशी विचारणा समितीने केली.

यांसदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, यामध्ये विभागाला जर रजिस्ट्री नाकारायची असेल तर सेक्शन ४४ खाली ते निगेटीव्ह लिस्टखाली टाकावी लागते आणि एमआरटीपी खाली तशी तरतूद करावी अशी नगरविकास विभागाला विनंती केली होती त्यानुसार अशी दुरुस्ती केली तर मुद्रांक शुल्क विभाग प्रकार थांबवू शकतो. मध्यंतरी डीम्ड कन्व्हेशनच्या बाबतीत ओसीचा आग्रह धरुन या विभागाने परिपत्रक काढले होते. हे परिपत्रक संबंधित सोसायट्यांनी कोर्टासमोर चॅलेन्ज केले आणि त्यानंतर कोर्टाने सांगितले की, विभागाला अधिकारच नाही. आता यासंबंधी गृहनिर्माण विभागाने त्यांचे परिपत्रक काढले आहे आणि त्यांच्या म्हणण्यानुसार ओ.सी. मागणे हा रजिस्ट्रेशन विभागाचा अधिकार नाही. त्या विभागाने संबंधित एमआरटीपी ॲक्ट किंवा संबंधित ॲक्टमध्ये दुरुस्ती करुन दिली तर मुद्रांक शुल्क विभागाला अंमलबजावणी करण्यासाठी ते सोपे होईल.

याअनुषंगाने विभागीय प्रतिनिधींनी अधिक माहिती देताना असे विदित केले की एमआरटीपी ॲक्टमध्ये रिस्ट्रीक्शन आणले पाहिजे. जसे आता कूळ वहिवाटीच्या जागांचे व्यवहार करु नये अशी प्रेरेन्ट ॲक्टमध्ये तरतूद असेल तर आपल्याला तसे करता येईल. आदिवासींच्या जमिनीच्या बाबतीतही ॲक्टमध्ये तसे रिस्ट्रीक्शन आहे.

यावर मुद्रांक शुल्क विभागाने अशा प्रकारचे शिफारस पत्र नगरविकास विभागाला पाठवावे आणि त्याची एक प्रत समितीकडे पाठविण्यात यावी असे निदेश समितीने विभागास दिले.

टायटल क्लिअर नसेल तर आपल्याला नोंदणी करता येते काय, कारण एखाद्या मालमत्तेमध्ये खटला सुरु असता तरी प्लॉटिंग करण्यात येते आणि ते प्लॉट विकले जातात व लोक त्यामध्ये फसतात. प्लॉट विकणारा विकून रिकामा होतो आणि त्याचे आपण रजिस्ट्रेशन करता. तर त्यासंबंधी काही तरतूद करावयाची असेल तर तसे विभागाने समितीस अवगत करावे त्यानुसार समिती शिफारस करेल असे समितीने विभागीय सचिवांना सांगितले.

अशाप्रकारच्या काही प्रकरणात माननीय उच्च न्यायालयाचे देखील आदेश झालेले आहेत. श्री. क्षिरसागर नावाचे एक सब रजिस्ट्रार होते त्या केसमध्ये सुध्दा असे म्हटले आहे की, व्यवहार तपासण्याचे अधिकार नोंदणी विभागाला नाहीत. असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

यावर समितीने शासनाला समितीमार्फत तशी शिफारस करण्यात येईल असे मत व्यक्त केले तसेच मुद्रांक शुल्क विभाग महार वतन किंवा आदिवासी जमिनी रजिस्टर करीत नाही, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले आहे हे बरोबर आहे काय, अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी होय असे उत्तर समितीस दिले.

सभागृहामध्ये ज्यावेळी विधेयक आणले होते की, महसूल विभागाचे संगणकीकरण करावे त्यावेळी तलाठ्यांनी विरोध करुन संप केला होता. तलाठ्यांनी सहा महिने संप केला होता की, हे आम्हाला जमत नाही, कळत नाही म्हणून आपण हे करु नका. विभागाकडे सुविधा असताना विभाग तसे का करीत नाही. या ठिकाणी समिती गंभीरपणाने नोंदवित आहे की, विभागाकडे मालमत्ता तपासण्याची सुविधा असताना विभाग जाणीवपूर्वक तसे करीत नाहीत सुविधा तर विभागाकडे आहे. दिवसाला एका तालुक्याच्या ठिकाणी सरासरी किती दस्त नोंदविले जातात तर ८०, ९० किंवा १०० असा एव्हरेज आहे. आता मालमत्ता तपासताना त्यामध्ये १० ने संख्या कमी होईल. आवश्यकता असेल तर त्यासाठी कर्मचारी वर्ग वाढवावा ही वेगळी बाब आहे. यामुळे विभागाचा विकास महसूल किती प्रमाणात वाढेल ते विचारात घ्यावे सुमारे दहापट महसूल वाढेल असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले.

विभागाने आता सर्व कार्यालयामध्ये ई म्युटेशन सुरू केलेले आहे. ज्या ठिकाणी ७/१२ आहे त्या ठिकाणी दस्तऐवज नोंदविताना महसूल विभागाच्या वेबसाईटवरुन ७/१२ प्राप्त करुन घेतो व त्यानंतर दस्तऐवज नोंदविला जातो. ज्या ठिकाणी तांत्रिक अडचण आली म्हणून विभागाने त्यासाठी सूट दिली होती. मुख्य अडचण तर शहरी भागामध्ये येते त्यामध्ये आता संपूर्ण संगणकीकरण झालेले आहे. परंतु प्रॉपर्टी कार्ड संगणकीकृत नसल्यामुळे अर्बन प्रॉपर्टी थेट प्राप्त करता येत नाही. परंतु सर्व ७/१२ उप निबंधक कार्यालये तहसिल कार्यालयांसोबत जोडली आहेत ज्या ठिकाणी ७/१२ अपडेट आहे. उदा. सोलापूर जिल्ह्यामध्ये ९० टक्क्यांपेक्षा जास्त यशस्वी झालेले असून विभाग ७/१२ नोंदणी व म्युटेशनसाठी पाठवितो. ज्या ठिकाणी ७/१२ ला अडचण आहे त्या ठिकाणी विभागाला थोडी अडचण येते. शहरी भागातील प्रॉपर्टी कार्डस् डिझिटायझेशन झालेले नसल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाकडील ७/१२ अद्यापही अद्ययावत झालेले नसुन पुण्यामध्ये सुध्दा अद्याप झालेले नाहीत अजूनही हाताने ७/१२ दिले जातात. ग्रामीण भागामध्ये सुध्दा ह्या अडचणी आहेत. ७/१२ झाले आहेत पण अद्यापही फेरफार झालेले नाहीत. स्टॅम्प ड्यूटीमध्ये सुध्दा फेरफार असला तरच नोंदणी होऊ शकते. एकदा दस्त नोंदविल्यानंतर त्याची फेरफारमध्ये नोंद होते आणि त्यानंतर ७/१२ तयार होतो असे समितीने विभागास अवगत केले असता ७/१२ चा विषय हा महसूल विभागाचा विषय आहे. नवीन नमुना असा आहे की, एकदा संगणकावरुन ७/१२ प्राप्त करुन खात्री करुन नोंदणी झाल्यानंतर नवीन मालकाच्या नावाने आपोआप नवीन बदलाची नोंद होण्याची तरतूद आहे. तलाठ्यांकडे ते पाठवितो आणि त्यानुसार तलाठी संबंधितांना नोटीस देऊन त्यानंतर संगणकामध्ये नवीन बदलाची नोंद तलाठी करतो. मुद्रांक शुल्क विभागाची अडचण आहे ती शहरी मालमत्तामध्ये आहे. राज्यात ग्रामीण भागातील ७/१२ चे डिजिटायझेशन झालेले आहे तसे शहरी भागातील प्रॉपर्टी कार्डचे अद्यापही डिजिटायझेशन झालेले नाही असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

नियंत्रित सत्ता प्रकारासंबंधी विभागाचे नेमके काय धोरण आहे अशा प्रकरणांमध्ये नेमकी कशाची तपासणी होते अशी विचारणा समितीने केली असता नियम ४४ अन्वये बंदी असेल तर ते थांबविण्यात येते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

आरक्षण म्हणजे जिल्हाधिकारी किंवा अन्य भूसंपादन अधिका-यांनी एखादी जमीन सूचित केली असेल की, ती जमीन त्यांना शासकीय कामासाठी आवश्यक आहे तरच त्याची नोंदणी थांबविता येते. बाकी काहीही असो, मग ती जमीन आरक्षित असो रजिस्ट्री करता येते. नियंत्रित सत्ता प्रकार हा सुध्दा एक आरक्षणाचाच भाग असल्याचे समितीने विदित केले असता विभाग परवानगीसाठी आग्रह धरु शकतो असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

यावर समितीने ती जमीन त्यांना परवानगीशिवाय विकता येत नाही अशा जमिनींची नोंदणी केली जाते असे विभागास अवगत केले असता प्रत्यक्षात अशा नियंत्रित सत्ता प्रकाराच्या जमिनींबाबत सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र जोडल्याशिवाय अशा जमिनी विकता येत नाहीत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.तसेच अशा केसेस झालेल्या आहेत आणि त्यासंबंधी तक्रारी सुध्दा आहेत. त्यासंबंधी विभागातर्फे तपासणी करुन घेऊ असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

यासंबंधीचे धोरण काय आहे, तसेच जर ती जमीन नियंत्रित सत्ता प्रकारामधील असेल तर ती त्यांना विना परवानगी नोंदणी करता येत नाही. आता त्याचे तंतोतंत पालन होत नाही असे विभागाचे म्हणणे आहे. अशा प्रकरणांच्या तक्रारी झालेल्या आहेत. आता अशा प्रकरणांमध्ये विभागाने रितसर तक्रार केली तर त्यासंबंधी निर्णय घेण्यासंदर्भात आपल्याला सूचना करता येतील. असे समितीने मत व्यक्त केले. तसेच यामध्ये नियम असा आहे की, रितसर परवानगीशिवाय त्यांची नोंदणी करु नये त्यामुळे अशा प्रकरणांमध्ये विभागाने संबंधित सर्व जिल्हा मुख्यालय प्रमुखांना सक्त आदेश द्यावेत असे सुचविले असता विभागीय सचिवांनी सकारात्मक उत्तर दिले.

विभाग म्हणून यामध्ये काय सुधारणा केल्या पाहिजेत मग त्यामध्ये नगरविकास विभागाची कोणती मदत पाहिजे किंवा अन्य कोणत्या विभागाची कोणती मदत पाहिजे याबद्दलची एक टिपणी विभागाने समितीला तयार करुन द्यावी. त्यामुळे समितीच्या ज्या शिफारशी असतील त्यामध्ये आपल्याकडून विभागाकडून ज्या बाबी सूचविण्यात येतील त्यांचा देखील समावेश करता येईल काय, याचा विचार समितीला करता येईल व जेणेकरुन या राज्याचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल आणि लोकांना त्रास होणार नाही. तसेच यामध्ये होणारे गैरव्यवहार सुध्दा कमी होतील. म्हणून विभागाने या दृष्टीकोनातून समितीला एक टिपणी तयार करुन द्यावी, जेणेकरुन शासनास शिफारस करीत असताना त्या सूचनांचा विचार करता येईल असे समितीने विभागास सांगितले.

'दुय्यम निबंधकाने मुद्रांक जिल्हाधिका-यांकडे पाठविलेली अभिनिर्णय प्रकरणे

विभागाने मुद्रांक जिल्हाधिकारी यांच्याकडे निर्णयाकरिता (Adjudication) जे प्रस्ताव पाठविले आहेत त्या केसेसमध्ये मोठ्या प्रमाणात पेन्डन्सी खूप आहे. विभागाने समितीला जो सन २०१६ पर्यंतचा तक्ता दिलेला आहे. त्यामध्ये सुध्दा दि. ३१ मार्च २०१६ पर्यंत ८१५५० इतकी प्रकरणे प्रलंबित आहेत. जोपर्यंत निर्णय होत नाही तोपर्यंत स्टॅम्प ड्यूटी पेंडींगच राहील. तसेच दस्ताऐवज देखील प्रलंबित राहतील. त्यामुळे ही प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढली पाहिजेत या दृष्टीने विभागाची यंत्रणा कशाप्रकारे काम करीत आहे अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी असे विदित केले की, यामध्ये बहूतांशी केसेस २००२ पूर्वीच्या असून विभागामध्ये पूर्वी अशी प्रथा होती की, स्टॅम्प ड्यूटी कमी असेल किंवा कागदपत्रे अपुरी असली तरी ते स्वीकारले जात होते त्यामुळे त्यावेळी विभागाकडे खूप मोठ्या प्रमाणात दस्तावेज साठलेले होते. सन २००२ पासून जेव्हा आपण संगणकीकरणाचे काम सुरू केले तेव्हापासून अपूर्ण प्रस्ताव किंवा अपूर्ण कागदपत्रे असलेली प्रकरणे स्वीकारण्याचे बंद केलेले आहे. सन २०१३-१४ मध्ये जवळपास १ लाख १४ हजार २५९ दस्तावेज होते. आता सन २०१५-१६ पर्यंत हा आकडा ८१ हजार ५५० पर्यंत आणलेला आहे. या प्रकरणांमध्ये प्रमुख अडचण अशी आहे की, या मालमत्तांचे ब-याचवेळा व्यवहार झालेले आहे. आधीचे दस्तावेज असल्यामुळे विभागाने आधीच्या लोकांचा ड्राईव्ह घेऊनही त्यांचे पत्ते मिळत नाहीत आणि पत्ते मिळाले तरी ते प्रतिसाद देत नाहीत. दुसरे म्हणजे ही बरीचशी करारनामा स्वरुपाची दस्तावेज आहेत. त्यामुळे त्यांच्या ७/१२ वर बोजा सुध्दा चढविता आलेला नाही. या संदर्भात विभागीय स्तरावर झालेल्या चर्चेतून असा विचार पुढे आला की, किमान १० हजार रुपयांपर्यंतची स्टॅम्पड्यूटीची जी छोटी छोटी प्रकरणे आहेत, त्यांचे प्रस्ताव शासनाकडे पाठवून त्यांच्या बाबतीत माफी देण्याची मंजूरी घेण्यात यावी. कारण ती बरीच जुनी प्रकरणे आहेत आणि सद्यस्थितीत जी प्रकरणे आहेत ती वारंवार निकाली काढण्याचा विभाग प्रयत्न करीत आहे.

ही प्रकरणे फार जुनी आहेत असे विभागाचे म्हणणे आहे, परंतु सन २००९-१० मध्ये अशा प्रकरणांचा आकडा ५१ हजार आहे आणि आजचा आकडा ८१ हजारावर आहे. त्यामुळे ३० हजार प्रकरणे तर मागच्या ४-५ वर्षातील आहेत. सन २००९-१० मधील प्रलंबित प्रकरणांचा आकडा ५१ हजार दर्शविला होता, सद्यःस्थितीत तो ८१ हजार असून ३० हजार मागील ५-६ वर्षातील तो आकडा आहे. विभागाकडून सद्यःस्थितीतील प्रकरणे हाताळण्यात येतात त्यामुळे जुनी प्रकरणे प्रलंबित आहेत, असे विभागाच्या अधिका-यांनी सांगितले असून ते योग्य नाही. मुंबई येथील जागे संबंधिच्या ॲडज्युडिकेशनच्या (Adjudication) ५ केस सन २०१५-१६ मध्ये जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविण्यात आल्या असून त्यापैकी एकाही केसवर त्यांनी निर्णय घेतला नाही. विभागाने सादर केलेल्या स्पष्टीकरणामध्ये ३१ मार्च, २०१५ मध्ये ५ केस प्रलंबित दाखविण्यात आल्या असून सन २०१५-१६ या वर्षामध्ये एकाही केसवर निर्णय घेण्यात आला नाही, अशा प्रकारे कामकाज सुरु आहे. महालेखापरिक्षकांनी काढलेल्या लेखाआक्षेपाचे उत्तर समाधानकारक दिसून येत नसल्याबाबत समितीने नाराजी व्यक्त केली असता जुन्या वर्षातील अखेरची प्रकरणे ५ दर्शविण्यात आली असून त्यावर निर्णय झाला नसल्याचे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

केवळ ५ प्रकरणे असून त्यावर एक वर्षाच्या कालावधीत निर्णय घेण्यात आला नाही. सदरची प्रकरणे सन २००२ मधील आहेत काय ? सन २०१५-१६ या वर्षामधील ५ प्रकरणावर एक वर्षाच्या कालावधीत निर्णय देण्यात येत नसेल तर पूर्वीची प्रलंबित प्रकरणे कधी निकाली काढण्यात येणार अशी विचारणा समितीने केली, तसेच सदरहू प्रकरणे कोणत्या विषयाशी संबंधित आहेत असेही विचारले. जुन्या प्रलंबित ५१ हजार प्रकरणाबाबत समिती समजू शकते आणि त्यानंतरची ३० हजार प्रकरणे सन २०१० नंतरची आहेत, असे समितीला गृहीत धरावे लागेल असे मत समितीने व्यक्त केले.

उपरोक्तच्या अनुषंगाने विभागीय सचिवांनी असे विदित केले की, सन २००९-१० मधील सुरुवातीची शिल्लक प्रकरणे ५१ हजार दर्शविण्यात आली असून त्याबाबत विभागाला खात्री करुन घ्यावी लागेल. कारण सुरुवातीची शिल्लक असलेली ५१ हजार प्रकरणे व त्यावर्षात प्राप्त ४२ हजार प्रकरणे अशी एकूण प्रलंबित प्रकरणांची संख्या १ लाख ५१ हजार होत नाही. त्यामुळे सादर केलेल्या सदरहू आकडेवारी संदर्भात विभागामार्फत खात्री करुन घेऊ असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

सदरहू १ लाख ५१ हजार प्रकरणे सन २००९-१० नंतरची आहेत की अगोदरची आहेत या समितीच्या प्रश्नाला सदरहू प्रकरणे अगोदरच्या वर्षातून पुढील वर्षात गेलेली आहेत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

सदरहू १ लाख ५४ हजार प्रकरणांच्या आकडेवारीचा काही ताळमेळ लागत नाही, महालेखापरिक्षक कार्यालयासही याबाबत ताळमेळ लागू शकला नाही. जुन्या प्रकरणांचा निकाल लावला तर मोठ्या प्रमाणात वसुली होईल. जवळपास ६५ कोटी २६ लक्ष रुपयांच्या वसुलीची प्रकरणे प्रलंबित आहेत. याप्रकरणी वेगळा निर्णय घेतला तर सदरहू रकमेत अधिक वाढ होऊ शकते. प्रलंबित प्रकरणावर निर्णय न दिल्याने सर्व वसुली थांबलेली आहे. सदरहू प्रलंबित प्रकरणी निर्णय दिला तर संबंधिताना वसुलीचे पैसे भरता येतील असे समितीने विभागास सांगितले.

" विभागाने अवरुध्द केलेली प्रकरणे "

सदरहू लेखाआक्षेपाबाबत विभागाने स्पष्टीकरण द्यावे असे समितीने विभागास सांगितले असता सदरहू प्रकरणामध्ये म्हाडा, सिडको अशा संस्थांकडील अलॉटमेंट लेटर, महानगरपालिकेकडील टीडीआर, विकसन करार, वर्क कॉन्ट्रॅक्ट अशा प्रकारच्या प्रकरणांचा समावेश आहे. तसेच माहे मार्च अखेर प्रलंबित प्रकरणांची संख्या ५,८१२ पर्यंत आणली असून यामध्ये प्रामुख्याने म्हाडाकडील कागदपत्रांची संख्या अधिक आहे. मुद्रांक शुल्क देय होते किंवा नाही, याबाबत खूप वर्षे वाद सुरु होता व त्यानंतर सदरहू रक्कम भरण्याबाबत निर्णय देण्यात आला. त्यानंतर विभागाने अनलेसची स्कीम आणली होती परंतु मालक बदलल्यामुळे त्यास अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. अशाच प्रकारची अडचण टीडीआर प्रकरणीही होती. आता माहे एप्रिल, २०१५ मध्ये स्टॅम्प ॲक्ट मध्ये सुधारणा करण्यात आली असून त्यानुसार बँका किंवा संस्था किंवा शासकीय कार्यालयांवर आता जबाबदारी टाकण्यात आली आहे. सदरहू प्रकरणी संबंधितानी रक्कम भरली नसेल तर जबाबदार संस्थांनी ती भरावयाची आहे. असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

जर अशा प्रकारे संस्थांवर जबाबदारी टाकली तर वसुली होणार नाही अशी शंका समितीने उपस्थित केली असता सदरहू ॲक्टनुसार संबंधित संस्थांनी योग्य मुद्रांक शुल्क भरली असे असल्याची खात्री आहे. संबंधित संस्थांनी इन्शुअर केले नाही तर स्टॅम्प ड्युटी भरण्यास संबंधित संस्थेस जबाबदार धरुन त्यांच्याकडून ती रक्कम वसूल करण्यात येईल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.तसेच मागील महिन्यामध्ये अधिसूचना (प्रत विवरणपत्र १ वरील पृष्ठ १८ वर) काढून सदरहू कायद्याचे अंमलबजावणी झाली असल्याची बाब समितीच्या निदर्शनास आणली.

" मुद्रांक जिल्हाधिकारी यांचेकडे अभिनिर्णयासाठी आणलेली प्रकरणे "

उपरोक्त परिच्छेदासंर्भात चर्चा करताना समितीने विभागाच्या असे निदर्शनास आणले की, सदरहू लेखाआक्षेपाबाबत विभागाने स्पष्टीकरण दिले आहे की, संगणक प्रणाली तयार करुन त्याद्वारे प्रकरणे निर्गत करण्याबाबत सर्व मुद्रांक जिल्हाधिकारी यांना सांगण्यात आले आहे. उक्त प्रकरणी प्रकरणांची संख्या कमी झाली आहे परंतु रक्कम वाढलेली दिसून येत आहे. कारण सदरहू किमतीमध्ये दरवर्षी १०० टक्के वाढ होत आहे. त्यामुळे सदरहू प्रकरणी अभिनिर्णयाची प्रक्रिया जलदगतीने करणे आवश्यक आहे, याबद्दल विभागाचे काय म्हणणे आहे अशी विचारणा समितीने केली.

उक्त प्रकरणी नागरिकांच्या सनद जाहिर करण्यात आल्या आहेत. त्यानुसार कोणत्याही अभिनिर्णयाची कागदपत्रे ४५ दिवसामध्ये पूर्ण करण्याचे विभागाचे नियोजन असून एनआयसीच्या मदतीने त्याकरिता सॉफ्टवेअर तयार करण्यात आले आहे. फस्ट इन फस्ट आऊट यापध्दतीने जे डॉक्युमेंट प्राप्त होतील त्यांची १ जून पासून सॉफ्टवेअरमध्ये माहिती भरण्यास सुरुवात करण्यात आली आहे. तसेच जी प्रकरणे प्रलंबित असतील ती लवकरात लवकर पूर्ण करण्यात येतील असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

" नोंदणी महानिरीक्षक यांचेकडे प्रलंबित अभिनिर्णय प्रकरणे "

सदरहू लेखाआक्षेप प्रकरणी नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाकडे प्रलंबित अभिनिर्णय प्रकरणांची निर्णय प्रक्रिया अतिशय संथगतीने सुरु असल्याचे दिसून येत असल्याबाबत समितीने विचारणा केली असता सदरहू प्रकरणी प्रलंबित प्रकरणांची संख्या खरी असून याप्रकरणी संगणक शाखेमार्फत अधिक विलंब होत असल्याची माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

माहे मार्च, २०१६ मधील प्रलंबित प्रकरणांची संख्या किती आहे ? सन २०१५-१६ मध्ये किती होती ? या समितीच्या प्रश्नाला विभागीय सचिवांनी माहे मार्च, २०१६ मधील प्रलंबित प्रकरणांची संख्या १,३१८ असून सन २०१५-२०१६ मध्ये ४६२ होती असा खुलासा केला.

विभागाकडून प्रकरणे निकाली काढण्यात येत नसल्याचे, विभागाने दिलेल्या माहितीवरुन दिसून येत असल्याचे समितीने नमूद केले तसेच सन २००९ मध्ये प्रलंबित प्रकरणांची संख्या ३३१ होती त्यापैकी २१ प्रकरणे निकाली काढली आहेत. सन २०१० मध्ये ३६१ पैकी १२ प्रकरणे निकाली काढली, सन २०११ मध्ये ३९७ पैकी २२ प्रकरणे निकाली काढली, सन २०१२ मध्ये ४०१ पैकी ८ प्रकरणे निकाली काढली, सन २०१३ मध्ये ४०१ पैकी ८ प्रकरणे निकाली काढली आहेत. अशा प्रकारे संथगतीने प्रकरणे निकाली काढली तर प्रलंबित प्रकरणांची संख्या दिवसेंदिवस वाढत जाईल, ती कधीच संपणार नाही. जी प्रकरणे अधिक रकमेची आहेत त्यांच्या संदर्भातील निर्णय अगोदर घेणे गरजेचे असून मुद्रांक शुल्क अंतर्भूत असलेली १० लाख रुपयांपेक्षा अधिक रकमेची किती प्रकरणे आहेत ? सदरहू प्रकरणांचा निकाल प्राधान्याने लावण्यात यावा असे निदेश विभागास समितीने दिले.

रिव्हीशन, अपिल, परतावा प्रकरणांची संख्या २,५०० होती. त्यासंदर्भातील माहिती संगणकामध्ये डिसेंडिंग ऑर्डरनुसार फिड करुन घेतली आहे. त्यामध्ये १० लाख रुपये व त्यापेक्षा अधिक रकमांची प्रकरणे वेगळी दर्शविण्यात आली असून सदरहू प्रकरणे वसुलीची असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

राज्याचा विकास करण्यासाठी वसुली करणे गरजेचे आहे. वसुलीची प्रकरणे आपल्या विभागाकडे अधिक प्रमाणात प्रलंबित आहेत. १० लाख रुपयांपेक्षा अधिक रकमांची १ व २ टक्के प्रकरणे निकाली काढण्यात येत असतील तर त्याला काही अर्थ नाही असे समितीने मत व्यक्त केले असता ज्या प्रकरणांमध्ये १० लाख रुपयांपेक्षा अधिक वसुली अपेक्षित आहे अशा प्रकरणांचा पाठपुरावा करुन ती लवकरात लवकर निकाली काढण्यासाठी सुरुवात करण्यात आली असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

शासनाच्या तिजोरीत जमा करावची रक्कम वेळेत वसुल न झाल्याने त्याचा परिणाम विकास कामांवर होतो असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले.

आयजीआर म्हणून सर्व अपिल व रिव्हीशनची प्रकरणे सचिव स्तरावर हाताळण्यात येऊ शकतात. सदरहू अधिकार खालच्या स्तरावरील अधिका-यांकडे सुपूर्द करण्यात आलेले नाहीत. सदरहू प्रकरणी १० लाख रुपयांपेक्षा कमी वसुलीच्या रकमांच्या प्रकरणांसंदर्भातील अधिकार खालील स्तरावरील डीआयजीआर अधिका-यांना सुपूर्द करण्याची बाब विचाराधीन आहे.

यामुळे लहान रकमांच्या वसुली संदर्भातील वसुलीची प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढता येणे शक्य आहे. लिगल सेक्शनमध्ये एकच विधी अधिकारी असून प्रत्येक केस उच्च न्यायालयात जात असल्याने सदरहू पदाची व्याप्ती वाढविण्याकरिता प्रस्ताव सादर करण्यात आला आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस अवगत केली.

विक्रीकर विभागानंतर मुद्रांक शुल्क विभागाचा दुसरा क्रमांक वसुलीच्या संदर्भात लागतो. विक्रीकर विभागाचे अधिकारी कर्मचारी वर्ग कमी असल्याची तक्रार करीत नाहीत. वसुली प्रकरणे निकाली काढण्यासाठी कर्मचारी वर्ग नाही, डेलिगेशन पावर नाही, वेळ नाही, अशा बाबी मुद्रांक शुल्क विभागाचे अधिकारी समितीस सांगत असल्याची खंत समितीने व्यक्त केली असता राज्यातील आयजीआर विभागाचा नवीन आकृतिबंध तयार करुन शासनास सादर करण्याचा विचार सुरु असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले यावर समितीने सदरहू प्रस्ताव कधी सादर केला आहे अशी विचारणा केली असता सन २०१४ पासून सदरहू प्रकरणी विचारविनिमय सुरु आहे. सदरहू प्रकरणी दोन वेळा बैठक घेऊन चर्चा करण्यात आली आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

राजस्वच्या वसुलीचा प्रश्न असल्याने वित्त विभागाकडून उक्त प्रस्तावास नकार दिला जाणार नाही, असे समितीचे मत आहे. परंतु सदरहू प्रस्ताव सादर करण्याकरिता दोन-दोन वर्षांचा कालावधी लागत असेल तर विभागाच्या सक्षमीकरणाचे काम पूर्ण होऊच शकणार नाही. याप्रकरणी विभागाने आग्रही भूमिका घेण्याची आवश्यकता आहे. सन २०१६ पर्यंतची १० लाख रुपयांपेक्षा कमी रकमेची प्रकरणे हाताळण्याचे अधिकार खालील स्तरावर देण्यासंबंधिच्या प्रस्तावावर सकारात्मक निर्णय घेऊन सन २०१६ पर्यंतची सर्व प्रकरणे निकाली काढण्याच्या दृष्टीने विभागाकडून तातडीने कार्यवाही करण्यात येणार आहे काय ? यावर्षी सर्व प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात येतील असे आश्वासन विभागाकडून देण्यात येईल काय ? अशी विचारणा समितीने केली.

अनेक वेळा पक्षकार वेळ मागतात, त्यांना नोटीस पोहोचत नाही. यासर्व बाबीवरील कार्यवाही न्यायालयीन प्रकरणांप्रमाणेच करावी लागते. नैसर्गिक न्याय तत्वाचे उल्लंघन झाले तर पक्षकारास त्या मुद्द्यावर न्यायालयाकडून स्थगिती मिळते त्यामुळे कधीही वसुलीची रक्कम वसूल करणे शक्य होणार नाही. त्यामुळे त्यांना लॉंग रोप देऊन निर्णय घ्यावा लागतो. आयजीआर यांनी विभाग प्रमुख या नात्याने संगणकीकरणावर मागील १५ वर्षामध्ये भर देण्याची आवश्यकता होती. सदरहू कारणास्तव प्रलंबित प्रकरणांची सुनावणी घेऊन जास्तीत जास्त प्रकरणे निकाली काढण्यावर त्यांना भर देता आला नाही, ही बाब मान्य करावी लागेल. आता प्राधान्याने संगणकीकरणावर अधिक भर देण्यात येत आहे. तसेच, आयजीआर यांचे अधिकार खालील स्तरावर सुपूर्द करण्याबाबतचा निर्णय झाल्यानंतर प्रलंबित प्रकरणांचे प्रमाण कमी होईल, असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीस दिले.

विभागाच्या अधिका-यांनी दिलेल्या स्पष्टीकरणावर समिती समाधानी नाही सर्व प्रलंबित प्रकरणे निकाली काढली पाहिजेत. त्याकरिता आवश्यक मनुष्यबळ किंवा इतर सोयीसुविधा बाबत विभागाने आग्रही भूमिका घेऊन त्या उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. सदरहू प्रकरणी विभागाच्या अधिका-यांनी दाखविलेली हतबलता योग्य वाटत नाही असे समितीने विभागास सांगितले.

विभागाच्या कामकाजासाठी शासनाकडून अधिक मनुष्य बळ मिळविण्याकरिता प्रयत्न सुरु असून लवकरात लवकर सदरहू प्रकरणी निर्णय होईल, अशी विभागाला अपेक्षा असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

" कारारनाम्यात नमूद मोबदला मूल्याच्या निर्धारणासाठी समान धोरणाचा अभाव "

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात सद्यस्थिती अवगत करावी असे समितीने विभागास सांगितले असता यामध्ये ३५ प्रकरणे होती. त्यापैकी ९ प्रकरणांची ऑर्डर पास केलेली आहे. उर्वरित प्रकरणांना कॅम्पेन मोडमध्ये तारीख दिलेली असून येत्या तीन महिन्याच्या आत सर्व ३५ प्रकरणे निकाली काढण्यात येतील.तसेच ऑर्डर पास केलेल्या ९ प्रकरणांची अजून वसुली होणे बाकी असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

त्यांनी अपील केले आहे किंवा कसे, ९ केसेसबाबत निर्णय केव्हा घेण्यात आला आहे ? विचारणा समितीने केली असता त्यामध्ये विसंगती आहेत त्यानुसार त्याच्या युनिफार्म गाईडलाईनसाठी दिनांक ३१.१२.२०१५ रोजी यासंदर्भात स्पष्टीकरण करुन परिपत्रक काढले आहे. तसेच मुद्रांकनाच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये हा मुद्दा समाविष्ट केलेला आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

विभागाने मार्गदर्शक तत्वे जारी केली आहेत. It means, henceforth it will be corrected. परंतू ज्या केसेस यामध्ये अडकलेल्या असतील त्यांचे काय ? असा प्रश्न समितीने विचारला असता ३५ केसेस पैकी ९ केसेसमध्ये निकाल दिलेला आहे. म्हणजेच वसुलीसाठी ऑर्डर दिलेली आहे. उर्वरित २६ केसेस सुनावणीकरिता अंतिम स्थितीत असून त्यामध्ये २८ जून ही तारीख दिलेली आहे. या सर्व एसआरएच्या केसेस असून सर्व केसेसमध्ये निकाल देऊन वसुली करणार आहोत. वसुली होत नसेल तर बोजा चढविणार असून हे तातडीने करण्यात येणार असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

वसुलीची प्रक्रिया फारच संथ आहे याचे कारण म्हणजे २०१४ मध्ये एक्झीट कॉन्फरन्स झाली होती. सचिव महोदयांनी सांगितले की, तत्काळ वसुली करण्यात येईल. याचे कारण म्हणजे यातील आक्षेप तुम्हाला मान्य आहे. आता २०१६ हे वर्ष सुरु आहे. आज विभागाकडून सांगण्यात येत आहे की, आम्ही हे करतो. परंतु विभागाने एका रुपयाचीही वसुली केलेली नाही याबद्दल जबाबदार असलेल्या संबंधितांवर काय कारवाई केली की, ज्या संदर्भात सचिव महोदयांनी आश्वासन दिले होते म्हणजेच सीओएस इन्फोर्समेंट १, २ अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी असे सांगितले की सदरहू अपील सुनावणी चालू आहे ५३ अकालीच्या सुनावणीचे अधिकार केवळ आयजीआर यांना दिलेले आहेत.

विभागाने सांगितले की ९ केसेसबाबत निर्णय घेण्यात आला आहे. परंतु त्याची देखील वसुली झालेली नाही. उर्वरित केसेससंदर्भात पुढील तीन महिन्यात निर्णय घेणार आहात. सन २०१४ मध्ये दिलेल्या आश्वासनाची पुर्तता न करण्याची कारणे काय आहे आणि त्याकरिता जबाबदार अधिकारी कोण आहेत व त्या अधिका-यावर कोणती कारवाई केली आहे यामध्ये चुका झाल्यामुळे एकाही व्यक्तीवर कारवाई केल्याचे या परिच्छेदामध्ये दिसत नाही. यामध्ये आर्थिक बाबी समाविष्ट आहे यामुळे राज्याचा महसूल बुडत आहे. यासंदर्भात विभाग गंभीर नसल्याचे मत समितीने व्यक्त केले.

जबाबदारी निश्चित करण्यासंदर्भात या सर्व प्रकरणी विभाग अर्ध-न्यायिक (क्वासी ज्युडीशिअल) पध्दत म्हणून धरतो असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

समितीने पुढे असे सांगितले की आपण वरील लेव्हलवर ॲडज्युडीकेशनवर सांगत नाही. परंतु उप निबंधक पातळीवर जो गोंधळ होतो, त्याला आळा बसायला पाहिजे. शासनाचे जे निर्देश आहेत, त्याला ते कुठे ०.२ लावतात, तर कुठे ५% लावतात. त्यांच्या मर्जीप्रमाणे करतात त्यानंतर अपीलमध्ये जातो व ही सर्व प्रक्रिया किचकट होते. त्यामुळे यासंदर्भात कारवाई केली नाही, तर असेच चालू रहाणार आहे तसेच वेळेवर वसुली होणार नाही.

एखाद्या जुन्या प्रकरणामध्ये देखील अधिका-यांनी चुकीचे मुल्यांकन केल्याची बाब निदर्शनास आल्यानंतर त्यांच्यावर त्यांनी कारवाई केलेली असून ८ अधिका-यांवर कारवाई केल्याची माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

विभाग तीन महिन्यामध्ये निर्णय करणार आहे परंतु वसुलीची कारवाई किती दिवसांमध्ये पूर्ण करणार ? अशी विचारणा समितीने केली असता निकाल लागल्याच्या दिवसापासून तीन महिन्याच्या आत वसुलीची कार्यवाही पूर्ण करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस अश्वासित केले.

सदरहू ९ केसेसचा निर्णय कधी झालेला आहे ? या समितीच्या प्रश्नाला सदरहू ९ केसेसचे निर्णय मागील २ महिन्यामध्ये झालेले आहेत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला. तसेच निर्णय घेतल्यानंतर जिल्हा सह निबंधक यांच्याकडे पाठविले जाते. त्यांच्याकडून वसुलीची कार्यवाही केली जाते. वसुलीमध्ये अडचण आली तर ७/१२ वर बोजा चढविण्यापर्यंतची सर्व कार्यवाही जेडीआर यांच्याकडून केली जाते अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

" पुनर्विकास करारावर मुद्रांक शुल्काची कमी आकारणी "

तसेच परिच्छेद क्र. ४.३.८.३ " दस्ताऐवजात नमूद महसूल भागीदारी बाबी विचारात न घेतल्यामुळे मुद्रांक शुल्क आणि शास्तीची कमी आकारणी " या संदर्भात दोन्ही आक्षेप मान्य केले, परंतु वसुली काहीच केलेली नाही याबाबत समितीने विचारणा केली असता परिच्छेद क्र. ४.३.८.२ मध्ये सुनावणी अंतिम स्थितीत आहे आणि परिच्छेद क्र. ४.३.८.३ ही केस फार मोठी होती त्यामध्ये जास्त अडचणी होत्या यासंदर्भात ऑर्डरसाठी क्लोज केलेले आहे. एका आठवड्यामध्ये आदेश पारीत करण्यात येईल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

या अनुषंगाने समितीने अशी विचारणा केली परिच्छेद क्र. ४.३.८.२ बाबत डिसेंबर २०१४ ला देण्यात येईल, असे पूर्वी सांगण्यात आलेले आहे. Report on realization of deficit and stamp duty has not been received. The same case is in Audit Para 4.3.8.4 also. यामध्ये फार उशिर झाल्याचे दिसून येत आहे. पूर्वी एक्झीट कॉन्फरन्समध्ये देखील सातत्याने सांगितले होते की, with penalty वसूल करण्यात येईल. ते Short levy of Stamp Duty संदर्भात आहे.

शॉर्ट लेव्हीच्या तीन, चार केसेस समान आहेत त्या ५३ खाली अपिलमध्ये असून ते शेवटच्या स्थितीत आहे येत्या दि. २० जून पर्यंत ऑर्डरसाठी क्लोज होईल. ४.३. ८.३ चे ऑलरेडी क्लोज केलेले आहे ते अजून सुनावणीमध्ये असून त्याची उद्या तारीख आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

या अनुषंगाने समितीने या तीनही केसेसमध्ये लवकरात लवकर निर्णय करुन वसुलीची प्रक्रिया तत्काळ करण्यात यावी असे निदेश विभागास दिले.

" जुन्या इमारतींचे बाजार मूल्य निर्धारित करताना भाडेकरुव्दारे व्यापलेल्या क्षेत्राच्या बांधकामाची किंमत वगळण्यात आली. "

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी असे विदित केले ??, सेस बिल्डींग म्हणजेच उपकर प्राप्त इमारती मुंबई आयलँड सीटीमध्ये आहेत. टेनेन्टेड प्रॉपर्टीसाठी विभागाने सेस गोळा केला होता. यामध्ये विकासक इमारतीच्या मालकाशी विकास करार करीत असतो ते करीत असताना तेथील भाडेकरुला निःशुल्क बांधकाम करुन द्यावे लागते. करारनामा नोंदणी हे विकासक आणि मालक यांच्यामध्ये असते त्यामुळे यामध्ये दोघांना काय फायदा झाला ते त्या पद्धतीने मूल्यांकन करतो. तसेच भाडेकरुला बांधून दिल्या जाणा-या बाबीचा मालकाला काही फायदा होत नाही. समजा एखाद्या प्रॉपर्टीची किंमत १० कोटी रुपये देणार, तर टेनेंट रिहॅबीटेशन करायला मला २ कोटी रुपये खर्च येत आहे, त्यामुळे मी तुम्हाला ८ कोटी रुपयेच देणार असे ते होते हा व्हॅल्युएशन प्रिन्सीपल प्रमाणे आहे त्यामुळे तो खर्च वजाच करावा, अशा सूचना विभागाने सन २०११ मध्ये दिल्या होत्या त्यांनी या सुचनेप्रमाणेच केलेले आहे. त्यामध्ये देखील बरेचसे काही कमी येत होते, त्यामुळे त्यामध्ये आणखी दोन, तीन रायडर घातले आहे. याप्रमाणे वजा करुन येणारी किंमत किंवा जमीन मालकाला रोख मोबदला किंवा इतर अप्रत्यक्ष मिळणारे फायदे, म्हणजेच करुन मिळणारे बांधकाम किंवा जमिनीच्या ५० टक्के यापैकी जी जास्त रक्कम असेल ती घ्यावी.

याअनुषंगाने समितीने अशी पृच्छा केली की, जमिनीचे ५० टक्के म्हणजे नेमके काय ? यावर विभागीय सचिवांनी समितीस अशी माहिती दिली की, टेनेंटेड प्रॉपर्टी असेल, जर जमिनीची किंमत १० कोटी रुपये असेल तर त्याच्या मिनिमम ५ कोटी रुपये तरी घेतले पाहिजे. म्हणजे लॅण्ड इनकंम्बंट असेल, जमिनीवर बोजा असेल तर नॅसर्गिकरित्या त्याची किंमत कमीच असते. त्याकरिता आपण रायडर ठेवला की, कमीतकमी ५० टक्के तरी असला पाहिजे म्हणजे बांधकाम खर्च वजा करुन, समजा एखाद्या प्रॉपर्टीची किंमत १ कोटी रुपये आली, परंतु या प्रमाणे ५ कोटी रुपये किंमत आली तर ५ कोटी रुपये लावायचे, अशा सूचना विभागाने दिलेल्या आहेत.

विभागाने हे सर्व निर्णय इस्टीमलेट केलेले आहेत काय ? जेणेकरुन या परिच्छेदामध्ये जो गोंधळ दिसतो, तो होणार नाही. यावर विभागीय सचिवांनी हे केलेले असून गाईड लाईन समाविष्ट केलेल्या आहेत असा खुलासा केला.

याअनुषंगाने समितीने हे सर्व नगरविकास विभागाने केलेले आहे काय ? तसेच हे परिपत्रक कोणत्या विभागाचे आहे अशी पृच्छा केली असता हे आयजीआर यांनी केलेले आहे असे सांगितले तसेच परिपत्रक जारी करुन वेबसाईटवर टाकलेले असून सर्वांना गाईड लाईन्स दिलेल्या आहेत. हे परिपत्रक (प्रत विवरणपत्र क्र. १ पृ. ५२ वर) सन २०१४ मध्ये एक्झीट कॉन्फरन्स झाल्यावर लगेच वेबसाईटवर टाकले असून ते त्या दिवसापासून परिणामकारक झाले असल्याचा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला. तसेच त्यापूर्वी जो खर्च वजा करायचा होता, तो करण्यात आला आहे. आता लेटेस्ट मार्केट व्हॅल्युच्या ५० टक्के मिनिमम घेणार आहोत. खर्च वजा करुन येणारी किंमत १ कोटी रुपये आली आणि ५० टक्के प्रमाणे ५ कोटी रुपये किंमत आली तर विभाग ५ कोटी रुपयांवर मुद्रांक घेणार आहे अशी माहिती समितीस अवगत केली.

याचा अर्थ जी जास्त रक्कम येणार ती विभाग ग्राह्य धरणार का अशी पृच्छा समितीने केली तसेच एखाद्या प्रकल्पाच्या जमिनीचे मुल्यांकन १०० कोटी रुपये दाखविले जाते आणि रजिस्टरला रिडॅक्टर हा १० कोटी रुपयांचा असतो. १० कोटी रुपयांवर रजिस्टर करताना त्याच्यावर मुद्रांक शुल्क घेतले जाते. परंतु त्याने बँकेला प्रोजेक्ट रिपोर्ट १०० कोटी रुपयांचा

दाखविलेला असेल तर १०० कोटी रुपयांवरच स्टॅम्प डयुटी घेतली पाहिजे. ज्यावेळी एखाद्या प्रोजेक्ट करिता जमीन घेतली जाते, त्यावेळी विभागामार्फत त्याचे व्हेरीफिकेशन करण्यात येते का नसेल तर येथून पुढे त्याचे व्हेरिफिकेशन विभाग करणार आहे आहे काय ? रेडीरेकनर व्हॅल्यु आणि मार्केट व्हॅल्यु म्हणजेच बँकेकडे प्रोजेक्टसाठी फायनान्स करण्यासाठी दाखविलेली व्हॅल्यु असल्याचे समितीने विभागास सांगितले तसेच फायनान्स करण्याकरिता दाखविलेली व्हॅल्यु चुकीची असते. ज्या प्रमाणे गृहकर्ज घेताना फ्लॅटची किंमत ४ लाख रुपये दाखविली जाते. परंतु घरपट्टी ३ हजार रुपयेच लावली जाते. याकडे लक्ष दिले तर त्यावर देखील उत्पन्न वाढेल. त्यांना कर्ज घ्यायचे असेल तर व्हॅल्युऐशन वाढवावे लागते असेही समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले.

याअनुषंगाने विभागीय सचिवांनी असे विदित केले की, कन्सीडरेशन किंवा रेडीरेकनर व्हॅल्यु त्यापेक्षा जो जास्त आहे, तो मुद्रांक शुल्कासाठी घेतला जातो तसा नियमच आहे.

" मालमत्तेच्या बाजार मूल्यातून भाडेकरुंनी व्यापलेल्या क्षेत्राची बांधकाम किंमत वजा करण्यात आली नाही "

यासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी समितीस असे विदित केले की, या अगोदर जो परिच्छेद चर्चेला घेतला त्यातील प्रकरण हे आयलँड सीटीबाबत होते. त्यामध्ये उपकरप्राप्त इमारती आहेत, त्याला इन्सेंटीव्ह एफएसआय मिळतो. परंतु उपनगरामध्ये पाहिले तर टेनेंटेड प्रॉपर्टीला अजुनही इन्सेंटीव्ह एफएसआय नगरविकास विभागामार्फत किंवा डीसी रेग्युलेशनमार्फत दिला जात नाही त्यामुळे बांधकामाचा खर्च त्यामध्ये ॲड करतो. ऑडीटचा पॅरा होता की, वजा न करता किंमत ठरविली. वजा न करता ठरविलेली किंमत ही कार्यवाही बरोबर आहे याचे कारण म्हणजे आयलँड सिटीमध्ये वजा करावे लागेल. कारण ही थर्ड एन्टीटी आहे त्याला इन्सेंटीव्ह एफएसआय मिळतो, म्हणून आपण त्यातून बांधकाम मूल्य वजा करतो. परंतु उपनगरामध्ये इन्सेंटीव्ह एफएसआय मिळत नाही ती पूर्णपणे त्याच्यावर लायबीलीटी असते. उपनगरामध्ये असेल तर मालक आहे मालकाला बांधुनच द्यायला पाहिजे, परंतु येथे मालकाला बांधून दिले तर त्यास इन्सेंटीव्ह एफएसआय मिळतो.

येथे वजा केली किंवा कसे ? असा प्रश्न समितीने केला असता उपनगरामध्ये बांधकाम मुल्य ॲड करतो असे उत्तर विभागीय सचिवांनी समितीस दिले.

परिच्छेद ४.३.९.२ च्या प्रॉपर्टीचे ऑडीट रिपोर्टमध्ये लोकेशन दिलेले आहे ते आयलँड सिटीच्या बाहेरचे असल्याचे विभाग कसे काय सांगत आहे ? मांटुंगा, भायखळा, लोअर परळ, हे आयलँड सिटीच्या बाहेरचे आहेत काय हे लोकेशन त्यातीलच आहे अशी समितीने विचारणा केली असता सदर परिच्छेदामधील प्रॉपर्टीज ह्या परळ, शिवडी, लोअर परळ, भायखळा, भुलेश्वर, माटुंगा येथील असून त्या आयलँड सिटी मधीलच आहेत. वास्तविक तेथेही बांधकाम खर्च वजा करायला पाहिजे होता, परंतु त्यांनी ॲड केलेला आहे विभागाने त्याचे कारण देखील तपासले. ॲड केले नसते तर ती व्हॅल्यु निगेटीव्हमध्ये गेली असती त्यामुळे त्यांनी ॲड केलेले आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला. तसेच ज्यावेळेस कन्स्ट्रक्शन कॉस्ट वजा करतो तेव्हा जमिनीची किंमत समजा २० हजार रुपये प्रती स्क्वेअर मिटर असेल आणि बांधकाम मूल्य २५ हजार रुपये असेल तर २० आर मधून २५ आर केले तर ती मायनस येते. याकरिता नंतर परिपत्रक काढताना विभागाने रायडर टाकला की, जमिन मुल्याच्या मिनिमम ५० टक्के तरी बाजार मुल्य असली पाहिजे. अशाप्रकारे निगेटिव्ह येऊ नये याकरिता काही ॲड करण्याचाही प्रकार झालेला आहे. परंतु, त्यामध्ये विभागाचे काही नुकसान नाही विभागाकडे मुद्रांक शुल्क जादाच वसूल झालेली असल्याचेही विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

शासनाचे नुकसान होऊ नये हा एक मुद्दा झाला. परंतु, यामध्ये रजिस्ट्री करणा-याचे नुकसान झालेलेच आहे याबाबत समितीने विचारणा केली असता त्याचे नुकसान झाले असते तर तो अपिलात गेला असता किंवा त्याने ॲडज्युडिकेशन केले असते त्याला ती व्हॅल्यू मान्यच आहे. कारण तेथे ती मायनस केली असती तर त्या नेगेटिव्हमध्ये गेल्या असत्या.

विभागाने ज्यांची रक्कम वजा केली, त्यांचा तोटा झाला असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले असता तोटा झालेला नाही, तोटा झाला असता तर त्यांनी अपिल केले असते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

यावर समितीने निगेटिव्ह गेले तरच विभागाने हे करावे नाहीतर जे काही नियमानुकुल असेल तेच केले पाहिजे समिती येथे दोन्ही बाजू पाहण्यासाठीच आहे. समिती केवळ शासनाची बाजू पाहते असे नाही. विभागाकडून सांगण्यात येत आहे की फायदा झाला त्यांनी काही म्हटले नाही त्यामुळे जाऊ द्या परंतु असे होत नाही. त्यांनी अपिल न करण्याची कारणे वेगळी असू शकतात विभागाकडून चुकीला समर्थन कसे काय करता ? अशीही विचारणा समितीने केली तसेच विभागाने असे सांगितले

की, जर त्यांनी अपिल केले तर आम्ही याला कमी करु किंवा तुम्ही चुकीने लावले आहे, ते योग्य आहे काय ? अर्थ आपण वजा केले ते चूक होते काय ? तसेच हे ॲडज्युडिकेशन केल्यानंतर झालेले आहे. डीडीआरने करुन टाकले असे हे नाही. ॲडज्युडिकेशनवर बसलेले अधिकारी योग्य निर्णय देत नाहीत, हे देखील योग्य नसल्याचे मत समितीने व्यक्त केले.

याअनुषंगाने विभागीय सचिवांनी समितीसमोर असा खुलासा केला की, सन २०११ मध्ये त्यांना फक्त बांधकाम कर्ज वजा करण्याबाबत कळविले होते. त्यामुळे त्यांनी ते वजा करण्याचा प्रयत्न केला ते निगेटिव्ह यायला लागले म्हणून त्यांनी ते ॲड केले असे काही तरी त्यांच्या लक्षात आले. नंतर इन्स्ट्रक्शन टाकताना विभागाने असे केले की, निगेटिव्ह येवो की काही येवो पण जमिनीची मिनिमम ५० टक्के किंमत घेतलीच पाहिजे.

It is applicable after 2014. पूर्वीच्या केसेसमध्ये जी काही वसुली केली ती चुकीने ॲडज्युडिकेशन केल्यानंतर केली, हे योग्य नसल्याचे समितीने नमूद केले असता काही Collector of Stamps यांना सूचना नव्हत्या जशा सूचना असतील त्याप्रमाणे करणार अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

सन २०१४ नंतर विभागाने स्पष्टता आणली. सन २०१४ च्या अगोदर ज्या केसेस झाल्या त्यामध्ये शासन व पक्षकाराचेही नुकसान होता कामा नये. त्यात काही खोटे झाले असल्यास विभागाने पुनर्पडताळणी करुन परत करावेत तसेच परताव्याबाबतही विभागाने पाहिले पाहिजे असे समितीने नमूद केले.

" मालमत्तेच्या बाजार मूल्यात भाडेकरुंनी व्यापलेल्या क्षेत्राची बांधकाम किंमत मिळविण्यात आली. "

सदरहू परिच्छेदाबाबतची माहिती नमूद करावी असे समितीने विभागास सांगितले असता सदरहू परिच्छेद उपनगराबाबतचे असून बोर्ला, कुर्ला, घाटकोपर येथील आहेत. तेथे इन्सेटिव्ह एफएसआय मिळत नाही व उपकर इमारती नाहीत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

यावर समितीने अशी विचारणा केली की, यामध्ये विभागाने "reply for addition of Construction Cost of the tenant occupied area in the market value of the property furnished" असे म्हटले आहे. याबाबत विभागाचे काय म्हणणे आहे ? महालेखाकारांकडून तपासणी करुन आलेले जे उत्तर आहे, त्यामध्ये महालेखाकारांनी असे म्हटले आहे की, कन्स्ट्रक्शन कॉस्टला जे ॲड करायचे होते त्यामध्ये टेनंट ऑक्युपाईड एरियाला मार्केट व्हॅल्यूच्या प्रॉपर्टीबाबत विभागाने काही सांगितले नाही. "reply for addition of Construction Cost of the tenant occupied area in the market value of the property furnished".

मुंबई उपनगरामध्ये याचा इन्सेटिव्ह नसल्यामुळे वजावट देण्याची आवश्यकता नाही तेथे विभागाकडून इन्सेटिव्ह देत नाही व कन्स्ट्रक्शन कॉस्टमध्ये सूटही देत नाही. उपकरप्राप्त इमारती या केवळ मुंबई शहरात असून इतरत्र नाहीत. उपनगरात भाडेकरुव्याप्त सोसायटीच्या इमारती आहेत. या इमारतींचा पुनर्विकास करताना प्रोत्साहनात्मक म्हणजे इन्सेटिव्ह एफएसआय मिळत नाही. त्यामुळे ते त्यामध्ये ॲड केलेले आहे म्हणजे वजावट दिलेली नाही हा रिप्लाय विभागाने दिलेला आहे.

" मुंबई उपनगरी जिल्हयात वसलेल्या मालमत्तेच्या मुल्यांकनासाठी वेगवेगळया पध्दती "

उपरोक्त परिच्छेदाच्या अनुषंगाने माहिती देण्यास समितीने सांगितले असता विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, या परिच्छेदामध्ये उल्लेख केलेल्या इमारती देखील उपनगरातील आहेत. त्यामुळे त्यामध्ये बांधकाम मूल्य वजा न करता करण्यात आलेली आहे, म्हणजे खर्च ॲड केलेला आहे याचा अर्थ कार्यवाही बरोबर आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, विभागातर्फे एका ठिकाणी खर्च वजा करता, एका ठिकाणी ॲड करीत आहात याचा अर्थ तुम्ही प्रत्येकाला वेगवेगळा न्याय लावलेला आहे. त्यामुळे अन्याय होत नाही काय, हे ठरविण्याचा अधिकार काय आहे ?

यामध्ये जमिनीची किंमत ही डेव्हलपमेंट कंट्रोल रेग्युलेशन्सवर असते किंवा लँड युजवर असते. उदाहरणार्थ समजा एखादी जागा हरित पट्टयात असेल तर तिची किंमत कमी असते, निवासी पट्टयात असेल तर तिची किंमत कमी असते. स्वतःच्या जागेवर १ किंवा २ एफएसआय मिळणार असेल तर तिची व्हॅल्यू कमी असते. मुंबईच्या उपनगर एरियात गेले तर तेथे तुम्हाला भाडेकरुप्राप्त इमारतीच्या पुनर्विकासाला इन्सेटिव्ह एफएसआय मिळत नाही, जो आपल्याला आयलँड सिटीमध्ये मिळतो अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस अवगत केली.तसेच आयलँड सिटीमध्ये आपण वजा करतो आणि उपनगरामध्ये ॲड करतो

असेही नमूद केले.तसा नियम डीसी रेग्युलेशनमध्ये आहे इन्सेटिव्ह एफएसआय आयलँड सिटीमध्ये मिळतो. त्यामुळे घेतानाच प्रॉपर्टीचा एफएसआय ३ विचार करुन व्हॅल्यू काढतो म्हणजे जमिनीची व्हॅल्यू १ कोटी रुपये असेल तर, ३ कोटी रुपये करतो. त्या ३ कोटी रुपयांमधून बांधकाम खर्च वजा करतो.

रेडीरेकनरची व्हॅल्यू धरतो की, बाजारमूल्याची धरतो या समितीच्या प्रश्नाला विभाग रेडीरेकनरची व्हॅल्यू धरतो त्या रेडीरेकनरमध्ये १ एफएसआयची व्हॅल्यू असते. एफएसआय ३ असेल तर ३ मल्टिप्लाय होते. आयलँड सिटीमध्ये जमिनीची व्हॅल्यू रेडिरेकनरप्रमाणे १ कोटी रुपये आली व एफसआय ३ असेल तर आपण ३ कोटी रुपये धरतो त्यातून कन्स्ट्रक्शन कॉस्ट १ कोटी रुपये मायनस करतो. मग ती २ कोटी रुपये येते. उपनगरामध्ये गेले तर १ कोटी रुपयांची व्हॅल्यू १ कोटी रुपयेच असते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

दिनांक १४ जानेवारी, २०११ रोजी जेडीटीपी पुणे यांनी विभागाकडे पत्र पाठविले होते व काही सूचना दिल्या होत्या त्यामध्ये महसुलाच्या व्याजाबाबत महालेखाकारांनी सांगितले होते की, It may not deduct the cost of construction area given to the tenant from the market value of the property. त्याबाबत विभागाने काही निर्णय घेतला काय अशी समितीने विचारणा केली असता त्यावेळेस विभागाने सर्वांना " Collector of Stamps " ना गाईडलाईन्स दिल्या होत्या त्याच्या आधारेच ही कारवाई होते आणि त्याच्या आधारेच विभागाने लेखा परिच्छेदाला उत्तर दिलेले आहे आणि त्यामध्ये जे स्पष्टीकरण दिले होते ते त्यांनी आयलँड सिटीमधील उपकरप्राप्त इमारतींसाठीच दिलेले होते. सन २०१४ मध्ये विभागाने बदल करुन ही पॉलिसी नव्याने केलेली असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

" ASR मधील निर्देशांचे पालन करणे यात एकरुपता नसल्यामुळे एक अभिहस्तांतरण पत्रात मुद्रांक शुल्काची कमी आकारणी "

उपरोक्त दोन्ही परिच्छेदाच्या अनुषंगाने अधिक माहिती समितीस द्यावी असे समितीने विभागास सांगितले असता उपकरप्राप्त इमारती केवळ मुंबई शहरामध्ये, उपनगरात आहेत वास्तविक पाहता ही केस उपनगरातीलच होती त्यामध्येही हा वजा केला होता. परंतु, त्यामध्ये तपासणी करण्यात येईल कारण महालोखाकारांकडून वेटिंगमध्ये असे आले की, Reply given same reply given.... आले असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

समितीने, Reply given is not relevant with paragraph. असे सांगितले असता सदर परिच्छेद अवमूल्यनाबाबत आहे. इमारतीचे वय जसे होईल त्याप्रमाणे आपण डेप्रिसिएशन व्हॅल्यू काढतो. पूर्वीचे परिपत्रक असे होते की, समजा जमिनीवरील फ्लॅटची किंमत १ लाख रुपये आहे व इमारतीला ४० वर्षे झाली असतील तर त्याची व्हॅल्यू आपण ६० टक्के धरतो. त्यामुळे १ लाख रुपयांची व्हॅल्यू आपण ६० हजार रुपये धरतो. जर फ्लॅटची किंमत पाहिली तर तिच्यामध्ये लँड व्हॅल्यू आलेली असते आणि कन्स्ट्रक्शन कॉस्टही आलेली असते. याचा अर्थ इनडायरेक्टली लँड व्हॅल्यूला डेप्रिसिएशन मिळत होते. वास्तविक ते देणे आवश्यकता नाही कारण लँडची व्हॅल्यू ॲप्रिशिएट होते फक्त कन्स्ट्रक्शन डेप्रिशिएट होतो. विभागाने तो फॉर्म्युला रिवाईज केला. त्यापूर्वी सबरजिस्ट्रार किंवा पक्षकार काय करीत होते तर, समजा १ लाख रुपयांचा विभागाचा दर आहे आणि त्याप्रमाणे ५० टक्के डेप्रिसिएशन देऊन ५० हजार रुपयांची आपली व्हॅल्यू आली तर त्यामध्ये आमचा फॉर्म्युला असा होता की, ५० हजार रुपये व्हॅल्यू आली आणि तेथील लँड व्हॅल्यू ५० हजार रुपये असेल तर त्यामध्ये कन्स्ट्रक्शन कॉस्ट ॲड करावी. मग ५० + २५ अशाप्रकारे ७५ होत होते. परंतु, ते इमारतीचे वय कमी दाखवायचे व घसारा कमी दाखवायचे. अशी त्यातून पळवाट काढली जात होती. याकरिता विभागाने तो सर्व फॉर्म्युला आता रिवाईज केला आहे. त्यामध्ये लँड कॉम्पोनंट वेगळा ठेवला आहे आणि कन्स्ट्रक्शनचा वेगळा ठेवला आहे. कन्स्ट्रक्शनला डेप्रिसिएशनची व्हॅल्यू ॲड केली. लँडमध्ये व्हॅल्यू केली हे सर्क्युलर (विवरण पत्र १ पृ. ५७ व ५८) काढल्यानंतर यामध्ये विभागाचे उत्पन्न प्रचंड वाढलेले आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला तसेच दरवर्षी ते साधारणपणे २०० कोटी रुपयांच्या वर असते. या निर्णयामुळे त्या उत्पन्नात वाढ होईल अशी अपेक्षा आहे मागच्या वर्षी तसे उत्पन्न वाढलेलेही आहे असेही समितीस अवगत केले.

" एका विकास करारनाम्यात बाजार मूल्याची चुकीची परिगणना केल्यामुळे मुद्रांक शुल्क आणि शास्तीची कमी आकारणी "

या परिच्छेदाबाबत विभागाने माहिती द्यावी ? The reply given is not relevant with paragraph, the correct reply may furnish. असे समितीने सांगितले असता यापरिच्छेदामध्ये तपासणी करतो त्यामध्ये जरा तथ्य वाटते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

परंतु, विभागाने एक्झिट कॉन्फरन्सनंतर उत्तर दिले असून आक्षेप अमान्य केला असल्याबाबत समितीने विचारणा केली असता आक्षेप अमान्य केला विभागाने त्यावेळेस प्रायमाफॅसी पाहिले. वेटिंगनंतर विभागाचे उत्तर महालेखाकारांनी स्विकारले नाही त्यानुसार विभागाकडून आता तपासणी करीत आहोत. विभागाने तपासणी करुन या परिच्छेदाबाबतचा निर्णय समितीला एका महिन्याच्या आत कळवावा असे समितीने विभागास सांगितले असता विभागाने माहिती देण्याचे समितीस आश्वासित केले.

परिच्छेद क्र. ४.३.१०.१ या परिच्छेदाबाबत अधिक माहिती देताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, सदरहू परिच्छेद मान्य केलेला असून तो सुनावणीच्या अंतिम स्थितीत असून दिनांक २८ जून रोजी त्यांना अंतिम तारीख दिलेली आहे. यावर समितीने ३ महिन्यांच्या आत याची वसुली करावी असे विभागास सांगितले.

परिच्छेद ४.३.१०.२ या परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती सांगावी तसेच याची सुनावणी कधी आहे याबाबत समितीला माहिती द्यावी असे समितीने सांगितले असता याची सुनावणी दिनांक २८ रोजी असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

परिच्छेद क्रमांक ४.३.११ , ४.३.१२ संदर्भातही एजीआर यांचा सुनावणीसाठी एक दिवस ठरलेला असतो त्यामुळे सर्व प्रकरणांना एकच दिनांक दिलेला असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

परिच्छेद क्रमांक ४.३.१३.१ ,४.३.१३.२ ,४.३.१३.३ बाबत माहिती देण्याबाबत समितीने सांगितले असता परिच्छेद क्रमांक ४.३.१३.२ मध्ये ३ केसेस होत्या त्या तिन्ही केसमध्ये आदेश पारीत केले असल्याचे विभागीय सचिवांनी नमूद केले. तसेच अडीच हजार इतक्या केसेस असल्याने विभागाला प्रत्येक सुनावणीच्यावेळी साधारणपणे ४० -४५ केसेस घ्याव्या लागतात असेही समितीस अवगत केले.

विभागाकडे आता केसेस प्रलंबित असल्याबाबत सांगितले आहे. त्यावर कधी निर्णय झाला, कधी निर्णय अपेक्षित आहे व किती दिवसांत निर्णय घेऊन सर्व वसुली पूर्ण होणार आहे हे ४.३.१०.१, ४.३.१०.२ , ४.३.११, ४.३.१२, ४.३.१३.१, ४.३.१३.२, ४.३.१३.३ या सर्व परिच्छेदांच्या बाबतीत सांगावे. हे सर्व निर्णय कोणत्या स्थितीत आहेत, ते सर्व समितीला कळवावे असे समितीने विभागास सांगितले असता विभागाने माहिती देण्याचे समितीस आश्वासित केले तथापि माहिती प्राप्त झाली असून सर्व परिच्छेदाबाबतची माहिती (एकत्रितरित्या विवरण १ मध्ये)

" कुर्ला येथे मुद्रांक शुल्काची कमी आकारणी "

सदरहू परिच्छेदाबाबतची अधिक माहिती सांगावी असे समितीने विभागास सांगितले असता विभागीय सचिवांनी असे विदित केले की, सदरहू परिच्छेद हा फंजिबल एफएसआयबाबत होता. मुंबईच्या डीसी रेग्युलेशनमध्ये ०.३५ इतका फंजिबल एफएसआय मिळतो. It is subject to the payment of premium. म्हणजे त्यामध्ये प्रिमियमही भरावा लागतो. त्यावेळेस फंजिबल एफएसआयची कन्सेप्ट प्रथमच आली होती. टीडीआर जसा १ मिळतो तरीही टीडीआर हा मार्केट मधून खरेदी करावा लागतो. बिल्डरला त्याकरिता काही किंमत खर्च करावी लागत नाही. त्यामुळे टीडीआरचे जे पोटेन्शिअल असते तसे प्लॅटफॉर्म व्हॅल्यू म्हणून आपण ४० टक्के वाढ घेण्याच्या सूचना त्यावेळेस दिल्यान होत्या. तसा फंजीबल एफएसआय ०.३५ आल्यानंतर जमिनीच्या किंमतीत किती वाढ झाली असेल त्याचा त्यावेळेस सर्वसाधारणपणे अभ्यास केला होता. पूर्वी या ज्या काही गोष्टी फंजीबल एफएसआयच्या पण विदाऊट पेमंट ऑफ प्रिमियम मिळत होत्या. एफएसआय एक्झम्पशन मध्येच मिळत होत्या. श्री. सुबोध कुमार साहेब असताना त्यांनी फंजीबल एफएसआय आणला आणि त्यामध्ये बरेच व्हायोलेशन्स होत होते. त्यामुळे त्यांनी सांगितले की, तुम्ही हा ०.३५ घ्या. त्यावर तुमचे काही व्हायोलेशन असेल तरीही ०.३५ च्या मर्यादेमध्ये तुम्ही करा. अगोदर हा सर्व घेऊन ०.८ पर्यंत जात होता. यामुळे जमिनीवर काय इम्पॅक्ट होतो त्याचा अभ्यास केला होता. त्यानुसार जर फंजिबल एफएसआय मिळाला तर जमिनीच्या किंमतीमध्ये साधारणपणे ५ टक्के वाढ होईल. पूर्वी जो फ्लॉवर बेड वगैरे मिळत नव्हता तो फंजिबल एफएसआयमध्ये मिळू लागला म्हणजे ०.३५ मधील २५ ऑलरेडी मिळत होता फक्त १० ॲडिशनल होता. त्या १० ची व्हॅल्यू काढून त्यावेळेस ५ टक्क्यांची पॉलिसी ठरविली होती. त्यामुळे असे ठरले की, जेव्हा सन २०१३ मध्ये रेडिरेकनरचे दर करु त्यावेळेस इन्डिव्हीज्युअल केसमध्ये प्रत्येक वेळी व्हॅल्युएशनमध्ये याचा विचार न करता जमिनीच्या किंमतीत सरसकट ५ टक्के वाढ करु अशा सूचना त्यावेळेस नोंदणी महानिरिक्षकांनी (एजीआरनी) दिल्या होत्या. सन २०१३ मध्ये या सूचनांचे इम्प्लिमेंटेशन करणार होतो मात्र इन द मिन टाईम एखादे व्हॅल्युएशनला प्रकरण आले तर त्यामध्ये लँड व्हॅल्यूमध्ये ५ टक्के वाढ करा असे म्हटले होते. यामध्ये ऑडिटने जे पॉईंट आऊट केले होते त्यामध्ये त्या ५ टक्क्यांप्रमाणे आपण व्हेरिएशन

बघीतले परंतु, जे कन्सीडरेशन होते ते ऑलरेडी जास्त होते आणि ९९ टक्के प्रकरणांमध्ये ही कन्सीडरेशनची अमाऊंट लँड व्हॅल्यूपेक्षा जास्त असते. अजूनही लँड व्हॅल्यू आपल्या ब-याचशा रिअलिस्टीक नाहीत. कारण मुंबई शहरात लँड व्हॅल्यूचे ट्रॅन्झॅक्शन होतच नाही. आता रिकामी जागा नाही, प्लॉट वगैरे विकला जात नाही असे व्यवहार होत नाहीत. जमिनीचे डेव्हलपमेंट ॲग्रिमेंट असतात, जॉईंट व्हेंचरच असतात त्यामुळे इन्डायरेक्टली किंमत डिराईव्ह करतो त्यामुळे फंजीबल एफएसआय ०.३५ चे मुल्य जरी विचारात घेतले एका बाजूला व दुस-या बाजूला जमीन मालकाला जे मिळणार असते त्याला कन्स्ट्रक्शन कॉस्ट मिळते नंतर समजा त्या सोसायटीचे ट्रान्झिट अकोमोडेशन ही अमाऊंट अलवेज हायरच असते. ०.३५ ची जरी व्हॅल्यू घेतली तरीही याचा इम्पॅक्ट एवढा फार मोठा होत नाही तरीही विभागाने त्यानंतर थोडीफार युनिफॉर्म पॉलिसी केली. त्यामध्ये असे केले की, ०.३५ एफएसआयची व्हॅल्यु आपण १०० टक्के घ्यायची आणि त्यातून प्रिमियम ॲवॉर्ड वजा करायचे. दिनांक १.११.२०१४ रोजी विभागाने परिपत्रक काढले आणि त्यानंतर मार्गदर्शक सूचना दिल्या. (परिपत्रकाची प्रत विवरण १ मध्ये पृ. ६१ वर)

सन २०१२ मधील केसेसबाबत काय केले जाणार आहे ? या समितीच्या प्रश्नाला त्यावेळेस विभागाची पॉलिसी तयार व्हायची होती. त्यावेळेस विभागाने सांगितले होते की, ५ टक्के प्रमाणे घेण्यात यावे त्यावेळी बाकीच्या लोकांनी ५ टक्क्यांप्रमाणे केलेले आहे. आता विभागाने युनिफॉर्म केले आहे आपण १०० टक्के प्रमाणे धरतो फक्त प्रिमियम अमाऊंट वजा करतो. असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

" मुद्रांक शुल्कात सूट देण्याबाबत अटी व शर्तीच्या पालनाची खातरजमा करण्यासाठी यंत्रणा नसणे "

सदरहू परिच्छेदासंदर्भात माहिती देण्यास समितीने सांगितले असता विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, नागपूर मधील स्मॉल स्केल इंडस्ट्रीजबद्दलचा हा मुद्दा होता. रजिस्ट्रेशन केल्यानंतर सूट दिली होती त्याचे खरोखर इम्प्लीमेंटेशन झाले की नाही याबाबत सांगावयाचे झाले तर संबंधित विभाग जो दाखला देते त्यांनी तपासून माहिती दिली तर मुद्रांक शुल्क विभाग लगेच त्याची वसुली काढू शकतो. हे प्रकरण तपासून मुद्रांक शुल्क विभागाने जेडीआरकडून अहवाल घेतले होते त्यामध्ये ३५ प्रकरणामध्ये संबंधित उद्योग सुरु केले आहेत काही प्रमाणात काही ठिकाणी विलंब झालेला आहेत, याबाबतचा त्यांनी रिपोर्ट दिलेला आहे.

ज्यावेळेस एक्झिट कॉन्फरन्स झाली होती तेव्हा विभागानेच हे मान्य केले की, ४ केसेसमध्ये उल्लंघन झालेले आहे. आता All is well असे सांगण्यात येत आहे विभागाने हे कोणत्या आधारावर व कशाला मान्य केले आहे तसा रिपोर्ट मुद्रांक जिल्हाधिकारी नागपूर यांचेकडून आलेला आहे काय अशी विचारणा समितीने केली असता मुद्रांक जिल्हाधिकारी नागपूर यांचेकडून तसा रिपोर्ट आलेला असल्याचे विभागीय सचिवांनी नमूद केले.

डीआयसी नागपूर यांच्या ३५ प्रकरणांबाबत माहिती मागविण्यात आली होती. त्यापैकी चार प्रकरणांमध्ये ५४.९० लक्ष रुपये मुद्रांक शुल्क अंतर्गत सुट देण्याबाबतच्या अटी व नियमाचे उल्लंघन करण्यात आले होते, असे विभागाने मान्य केले आहे, परंतु आता विभागाकडून वेगळे सांगण्यात येत असल्याचे समितीने सांगितले असता चार प्रकरणांमध्ये वसुलीच्या नोटीस दिलेल्या असून तसा जेडीआर यांचा रिपोर्ट आलेला असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

या चार प्रकरणांची वसुली कधी होणार आहे ? या समितीच्या प्रश्नाला या चारही प्रकरणी नोटिसेस दिलेल्या असून वसुली तीन महिन्यात पूर्ण करु असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले.

" आंतरिक नियंत्रण कार्यतंत्र "

आंतरिक नियंत्रण कार्यक्रमामध्ये मोठ्या प्रमाणात अकार्यक्षमता दिसत आहे. एका वर्षामध्ये ३६० इन्स्पेक्शन होणे आवश्यक होते. आपण ७२ पैकी ३६, ४४, २७, ७ एवढेच एका एका वर्षात इन्स्पेक्शन केलेले आहे. सन २००९ ते २०१३ या पाच वर्षात इन्स्पेक्शनची टक्केवारी फक्त २९ टक्के आहे. आपण जे निकष ठरवून दिलेले आहेत त्या निकषाचे तंतोतंत पालन का होत नाही, यामध्ये काय अडचणी आहेत निकष ठरवितांना विभागाने सर्व बाबींचा विचार केला नव्हता काय ? दिनांक ७ ऑगस्ट २०१४ रोजी आपण एक परिपत्रक काढले आहे, (परिपत्रकाची प्रत विवरण पत्र क्र. १ वर पृ. ६७ वर) त्यानुसार इन्स्पेक्शनची आकडेवारी आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता दिनांक ७ ऑगस्ट २०१४ पूर्वी मुद्रांक जिल्हाधिकारी यांना टारगेट ठरवून दिलेले नव्हते. ऑडिटमध्ये निदर्शनास आल्यानंतर दिनांक ७ ऑगस्ट २०१४ रोजी एक परिपत्रक निर्गमित केले होते. त्यानुसार मुद्रांक जिल्हाधिकारी यांना इन्स्पेक्शनचे एक शेड्यूल बनवून देण्यात आले होते. त्यांनी आतापर्यंत २४ इन्स्पेक्शन्स केलेले आहे. अप्पर मुद्रांक जिल्हाधिकारी यांचेकडे टारगेट दिलेले नव्हते त्यांनी आतापर्यंत १४ इन्स्पेक्शन्स पूर्ण केलेली असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

विभागाने दिनांक ७ ऑगस्ट २०१४ रोजी नव्याने परिपत्रक काढलेले आहे यानुसार यामध्ये काही सुधारणा झालेली आहे का ? एकट्या मुंबई शहरातील पैशांची वसुली कमी झाली असल्याचे महालेखाकारांच्या निदर्शनास आले आहे. विभागाने इन्स्पेक्शन केले असते तर हा प्रकार कमी झाला असता. परंतु विभागाच्या लक्षात जेव्हा ही बाब आली त्यानंतर दिनांक ७ ऑगस्ट २०१४ रोजी एक परिपत्रक विभागाने काढले या परिपत्रकानुसार किती टक्के पालन झाले आहे याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, या परिपत्रकाचा मोठ्या प्रमाणात परिणाम झालेला असून बोरिवली येथील एका कार्यालयात ५५ कोटी रुपयांचे इव्हेशन काढलेले आहे.

विभागाने इन्स्पेक्शनचे निकष कधी ठरवून दिले अशी विचारणा समितीने केली असता अप्पर जिल्हाधिकारी मुद्रांक यांना यापूर्वी महिन्यातून किमान एक सांगितले होते, परंतु नवीन निकषानुसार अप्पर मुद्रांक जिल्हाधिकारी आल्यापासून त्यांनी त्यांचे टारगेट पूर्ण केलेले आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

सन २०१३ पर्यंत एकूण ७२ इन्स्पेक्शन होते, विभागाने ते वाढवून दिलेले आहे का ? अशी पृच्छा समितीने केली असता ७२ चे टारगेट पूर्ण राज्यासाठी असून उत्तरामध्ये दिलेली आकडेवारी मुंबईसाठीची आहे. मुंबई मध्ये २१ इन्स्पेक्शन जिल्हाधिकारी मुद्रांक यांनी करावयाचे होते, त्यांनी २४ केलेले आहे. अप्पर जिल्हाधिकारी मुद्रांक यांनी १२ इन्स्पेक्शन करायचे होते त्यांनी १४ केलेले आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीला अवगत केली. (विवरण पत्र १ पृ. ७०)

दिनांक ७ ऑगस्ट २०१४ रोजीचे परिपत्रक फक्त मुंबईसाठी काढले होते का ? या समितीच्या प्रश्नाला उत्तर देताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, इतरांना महिन्यातून दोन ऑफिसेस जेडीआरसाठी उद्दीष्ट असून या संदर्भातील माहिती समितीस सादर करण्यात येईल असेही आश्वासित केले. या अनुषंगाने अतिरिक्त माहिती देताना विभागीय सचिवांनी असे अवगत केले की, तपासणी झाल्यानंतर विभागाच्या असे निदर्शनास आले की, या प्रकरणांमध्ये ब-यापैकी इव्हेशन होत आहे. ब-याच नॉन ज्युडिशियल केसमध्ये डॉक्युमेंट रजिस्टर करुन घ्यावयाचे आणि ज्युरिडिक्शन करुन घेत नव्हते ही बाब लक्षात आल्यानंतर पूर्वीच्या आयजीआर यांनी तत्काळ तपासणीचे काम सुरु केले त्यामध्ये पाच महत्वाचे डॉक्युमेंट होते. त्यात सेल डीड, हाय व्हॅल्यू असलेले कोठलेही डॉक्युमेंट कोठल्याही सब रजिस्टारने रजिष्टर केले असेल तर एक महिन्याच्या आत जिल्हाधिकारी मुद्रांक यांना ते डॉक्युमेंट देणे, त्याची तपासणी जिल्हाधिकारी मुद्रांक यांचेकडून करुन घेणे, या सर्व बाबींचे काटेकोरपणे पालन केले जाते यामध्ये इव्हेशनचे प्रमाण बरेच कमी झालेले आहे.

या प्रकरणांमध्ये खूप मोठ्या प्रमाणात वसुली व्हायची आहे. पूर्ण राज्यात किती रकमेची वसुली प्रलंबित आहे याबाबतची माहिती समितीला सादर करावी असे सांगितले असता सदरची माहिती समितीला सादर करण्याबाबत विभागीय सचिवांनी आश्वासित केले.

वसुलीबद्दल आपण ठोस अशी उपाययोजना करणे आवश्यक आहे फक्त ॲसेसमेंट करुन चालणार नसून ज्यांनी कमी व्हॅल्युऐशन दाखविले, त्यांचेकडून रिकव्हरी केली अशा अधिका-यांवर विभागाने काय कारवाई केलेली आहे ? त्यांच्या सी.आर. मध्ये नोंद घेतली आहे काय, हा एकप्रकारे पैशांचा अपहार केलेला आहे असे समितीने सांगितले असता आतापर्यंत अधिका-यांच्या विभागीय चौकशीच्या अधीन राहून प्रमोशन देण्यात येत होते, परंतु आता ज्या अधिका-यांविरुध्द विभागीय चौकशी सुरु होती त्या अधिका-यांचे प्रमोशन्स रोखून ठेवलेले आहे. अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस अवगत केली. तसेच यापूर्वी ज्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु होती त्यांना विभागीय चौकशीच्या अधीन राहून पदोन्नती दिली जात होती. परंतु या वर्षापासून असा निर्णय घेतला की, ज्यांच्यावर गंभीर आरोप आहेत अशा अधिका-यांना पदोन्नती द्यावयाची नाही. ज्यांच्याविरुध्द आरोप सिध्द झाले आहेत अशा अधिका-यांना निलंबित केलेले असून पुढील कारवाई आयजीआर यांनी केलेली आहे. असे वर्ग-२ चे ८ अधिकारी निलंबित केले आहेत आणि ३ अधिका-यांचे प्रमोशन्स थांबवून ठेवलेले आहे असेही समितीस सांगितले.

विभागाने जे सॉफ्टवेअर तयार केलेले आहे त्यामध्ये महालेखाकारांच्या आक्षेपानुसार मूल्यांकन अंतर्भूत नाही. विभाग आतापर्यंत ६० टक्क्यापर्यंत पोहोचला असून विभागाला अजून १०० टक्क्यापर्यंत पोहोचवयाचे असेल तर व्हॅल्यू या सॉफ्टवेअरमध्ये अंतर्भुत केली पाहिजे असे समितीने मत व्यक्त केले असता विभागाने एनआयसी सोबत प्रयत्न केले होते, आता विभागाने ६० टक्क्यापर्यंत ॲटोमॅटिक करुन घेतलेले असून १०० टक्के ॲटोमॅटिक करण्यासाठी प्रयत्न करीत आहोत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

" मालमत्तेच्या न्यून मूल्यांकनामुळे मुद्रांक शुल्काची कमी आकारणी "

या परिच्छेदा संदर्भात विभागीय सचिवांनी असे विदित केले की, पुणे जेडीआर यांनी वसुलीची नोटीस देऊन कारवाई सुरु केलेली आहे. आता जेडीआर समोर सुनावणीची कार्यवाही सुरु असून लवकरात लवकर ऑर्डर पारित करण्यासाठी प्रयत्न चालू आहेत.

यावर समितीने १.१९ कोटी रुपये जाईंट रजिस्टारने मान्य केले होते, परंतु अद्यापपर्यंत वसुली झालेली नाही अशी विचारणा केली असता डीआरची सुनावणी अंतिम स्थितीत असून आरआरसीची नोटीस दिलेली आहे संबंधितांच्या सात बाराच्या उता-यावर बोजा चढवित आहोत असेही विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

उपरोक्त परिच्छेदामध्ये कारवाई पूर्ण झालेली असून बोजा चढविलेला असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला यामध्ये वसुलीची कारवाई सुरु असून सुनावणी चालू आहे नियम ५३ खाली सुनावणी चालू आहे. तीन महिन्याच्या आत सदरची कारवाई पूर्ण करण्यात येईल त्यानंतर पुढील तीन महिन्यात वसुलीचे काम पूर्ण करण्यात येईल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

मुद्रांक शुल्काच्या अदायगीपासून अनियमित सूट

या परिच्छेदाच्या अनुषंगाने यामध्ये सुनावणी चालू असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला असता समितीने यामध्ये मोठी रक्कम गुंतलेली असून सुनावणीची प्रक्रिया कोठपर्यंत पोहोचलेली आहे ? विचारणा केली असता सुनावणी अंतिम स्थितीत असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

कोणतेही कागदपत्र भाडेकरुकडे नसताना आपण भाडेकरु म्हणून ग्राह्य धरले म्हणून त्या अधिका-यावर कारवाई केली पाहिजे अद्यापपर्यंत त्या अधिका-यावर कारवाई का केली नाही ? भाडेकरुने एकही कागदपत्र सादर केलेले नाही, परंतु आता संबंधित अधिका-याविरुध्द कारवाई करुन ३० दिवसाच्या आत समितीला अहवाल सादर करावा.

असे समितीने विभागास निदेश दिले असता विभागीय सचिवांनी कारवाई करण्याचे समितीस आश्वासित केले. यावर विभागीय सचिवांनी तीन महिन्याच्या आत वसुली करण्यात येईल असेही समितीस अवगत केले.

अशा प्रकारची अनेक प्रकरणे प्रलंबित असून ही प्रकरणे कोणत्या स्थितीत आहे, त्याची वसुली कधी होणार आहे, याबद्दलची माहिती समितीला सादर करावी असे समितीने सांगितले असता विभागीय सचिवांनी वसुली बाबतची माहिती समितीस आश्वासित केले.

" मुद्रांक जिल्हाधिका-याव्दारे मुद्रांक शुल्काची कमी आकारणी "

यामध्ये पक्षकाराने मा.उच्च न्यायालयामध्ये रिट पिटीशन दाखल केलेले आहे यासंदर्भात समितीने विचारणा केली असता (प्रत विवरणपत्र १ मध्ये पृ. ९६ वर) या प्रकरणात ऑर्डर पारित केली होती, परंतु पक्षकाराने याविरोधात मा. उच्च न्यायालयाकडून स्थगिती आणली असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

रुपये २.९५ कोटी इतकी वसुली प्रलंबित आहेत त्यांनी मा.उच्च न्यायालयातून तीन वर्षापूर्वी स्थगिती आणली आहे. त्यानंतर शासनातर्फे सदरची स्थगिती उठविण्याकरिता कोणती कार्यवाही करण्यात आली अशी किती प्रकरणे प्रलंबित आहेत तसेच ही स्थगिती उठविण्यासाठी विभाग प्रयत्न करणार आहे काय या समितीच्या प्रश्नाला या प्रकरणी स्थगिती दिल्यानंतर मा. उच्च न्यायालयाने तारीख दिलेली नाही. विभागालाच प्रयत्न करुन तारीख लावावी लागेल असे विभागीय सचिवांनी समितीस सागितले.

अशा प्रकारच्या किती केसेस आहेत ? मा. उच्च न्यायालयाची स्थगिती असल्यामुळे कोणकोणत्या केसेसमध्ये किती पैसे अडकलेले आहेत ? १० लाखाच्या केसेसच्यावरील माहिती समिती आपल्याला देऊ शकणार आहे. उर्वरित केसेसच्या बाबतीत विभागाने योग्य ती कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे. १० लाखाच्या वरील किती केसेस आहेत ? माननीय उच्च न्यायालयाच्या स्थगितीमुळे पैसे वसुल करता येत नाहीत याबाबत विभागाकडून कोणती कार्यवाही केली जाणार आहे. यासंदर्भात विभागाने माननीय उच्च न्यायालयाकडून उचित निर्णय घेऊन पुढील कार्यवाही करावी असे समितीस वाटते. दोन ते पाच

वर्षापासून पैसे अडकून पडलेले आहेत परिणामी तो पैसा विभागाला मिळत नाही त्यामुळे त्याचा कोणताही उपयोग होत नाही असे समितीने मत व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी समितीस असे विदित केले की, रिलायन्सची एक मोठी केस होती यासंदर्भात योग्य तो पाठपुरावा केल्यानंतर विभागाच्या बाजूने निकाल लागलेला आहे या माध्यमातून ९० कोटी रुपये मिळणार आहे. तसेच प्रत्येक प्रकरण महत्वाचे असल्याने विभागाकडून प्रत्येक प्रकरणाबाबत योग्य तो पाठपुरावा केला जाणार आहे असा खुलासाही विभागीय सचिवांनी केला.

व्यवहार झाल्यानंतर नोंदणी शुल्क भरले गेले पण तो व्यवहार काही कारणामुळे रद्द झाला तर अशा वेळी ती परत दिली जाते काय ? नोंदणी शुल्क परत देण्याचा अधिकार कोणाला आहे अशी समितीने विचारणा केली असता करारनामा रद्द झाल्यापासून ६ महिन्याच्या आत त्यांना अर्ज करावा लागतो. अर्ज केल्यानंतर तीन टप्प्यात परतावा दिला जातो रुपये ५ लाखापर्यंत परतावा देण्याचा अधिकार जेडीआरला आहे आणि रुपये २० लाखापर्यंत परतावा देण्याचा अधिकार डेप्युटी आयजीआरला आहे. रुपये २० लाखाच्या वरील परताव्यासाठी विभागाकडे अर्ज करावा लागतो असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

परतावा मिळविण्यासाठी ६ महिन्याच्या आत अर्ज करावा लागतो. सदरहू अर्ज ऑन लाईन करायचा किंवा ऑफिसला द्यावा लागतो काय ? अशी विचारणा समितीने केली असता अर्ज ऑन लाईन अर्ज करावा लागतो हार्डकॉपी नंतर द्यावी लागते. पूर्वी मॅन्युअल रेकॉर्डमध्ये खाडाखोड झाल्याचे दिसून येत होते. त्यामुळे सद्यःस्थितीत ऑन लाईन अर्ज देण्याबाबत सक्तीचे केलेले आहे ऑन लाईन अर्ज केलेला असेल तरच तो स्वीकारला जातो ऑन लाईन अर्जामध्ये जी तारीख असते तीच ग्राह्य धरली जाते अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

समितीच्या शिफारशी :–

३.३ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१३-२०१४ या वर्षाच्या महसूली जमा अहवालातील आक्षेपाबाबत विभागीय सचिवांच्या साक्षी दरम्यान समितीने विहित केल्याप्रमाणे अकृषक जागेची व कृषक जागेच्या खरेदी दरामध्ये फरक आहे जर अशा जागेची खरेदी करावयाची असेल आणि त्याचा दर १० लाख रु. एकर असेल तर पूर्वीच्या २ लाख रुपये दराप्रमाणे कागदपत्रे लावून कृषक शेती दर्शवून खरेदी करण्यात येते. अशा जवळपास ९० टक्के केसेस आहेत त्यामुळे विभागाने १०० प्रकरणांपैकी १० किंवा ५ प्रकरणे तपासून चालणार नाही तर अशा १०० टक्के प्रकरणांची तपासणी करण्यात यावी. खरेदी केल्यानंतर कोणती कागदपत्रे लावण्यात आली. आणि ती कोणत्या दिवशी लावण्यात आली त्यावेळी सदर जमिन कृषक होती की अकृषक होती, त्याचे प्लाटिंग होते काय या सर्व बाबींची विभागामार्फत तपासणी करण्यात यावी. याशिवाय वरिष्ठ अधिका-यांना काही दर कमी करण्याचे अधिकार दिलेले आहेत. सदर अधिकारांचा दुरुपयोग होत नाही याचीही खात्री करणे आवश्यक आहे. विभागाने मनुष्यबळाअभावी जी कामे करणे शक्य नाही त्याबाबत नविन टेक्नॉलॉजीचा वापर करावा व त्याव्दारे कृषक व अकृषक जमिनीबाबतची माहिती सर्व्हे नंबरसह System मध्ये असावी. प्रत्येक सर्व्हे नंबरचे डीटेल्स प्रत्येक कार्यालयाला उपलब्ध करुन देण्यात यावे. १०० टक्के प्रकरणांत यापध्दतीने अत्याधुनिक टेक्नॉलॉजीचा वापर करुन संबंधितांना डायरेक्ट सॉफ्टवेअरवर त्या क्षेत्राची किंमत व त्याप्रमाणे येणारा कर स्पष्टपणे दिसला पाहिजे. ही संपूर्ण यंत्रणा अधिक स्पष्ट व पारदर्शक करण्यात यावी व त्यानंतर सब रजिस्ट्रारचे कर आकारणी बाबतचे २५% पर्यंतचे अधिकार कमी करण्यात यावेत विभागाने उपरोक्त सूचनेनुसार कार्यवाही करावी व मुद्रांक शुल्क उत्पन्नामध्ये वाढ करण्यात यावी. यासंदर्भात विभागाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल ३ महिन्यात समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे

३.४ अनधिकृत बांधकामाच्या नोंदणी संदर्भात चर्चा करताना समितीने सुचित केले की, आज जेवढी अनधिकृत बांधकामे झालेली आहेत त्यांना आळा घालावयाचा असेल तर जोपर्यंत ओ.सी. आणि सी.सी. पूर्ण मिळत नाही तोपर्यंत त्यांची नोंदणी केली नाही तरच अनधिकृत बांधकामे होणार नाहीत. नोंदणी विभागामार्फत ही बाब तपासली जात नाही. परिणामी ओ.सी. किंवा सी.सी. न मिळालेल्या बांधकामाची नोंदणी झाली तर सदर अनधिकृत बांधकामे तोडताना न्यायालयीन प्रकरणे उद्भवतात. जनतेने अशा बांधकामाची खरेदी करताना पैसे देवून नोंदणी केलेली असते त्यामुळे त्यांची फसगत होते. ही बाब टाळण्यासाठी नोंदणी विभागाने आवश्यक तो प्रस्ताव नगरविकास विभागाला सादर करुन MRTP Act. मध्ये आवश्यक ती सुधारणा करावी. अनधिकृत प्लॉट विक्री किंवा ओ.सी. व सी.सी. नसलेल्या इमारतींची नोंदणी होऊन जनतेची फसगत होणार नाही याची विभागाने दक्षता घ्यावी. यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्यात समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

३.५ नियंत्रित सत्ता प्रकारा संबंधी धोरणावर चर्चा करताना अशा प्रकरणांमध्ये

नियम ४४ अन्वये बंदी असेल तर याबाबत नोंदणी थांबविण्यात येते असा खुलासा विभागीय सचिवांनी सादर केला. यावर समितीने स्पष्ट केले की, नियंत्रित सत्ता प्रकारासंबंधीच्या जमिनी परवानगी न घेताच नोंदणी केल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. प्रत्यक्षात अशा नियंत्रित सत्ता प्रकाराच्या जमिनीबाबत सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र जोडल्याशिवाय त्याची नोंदणी करु नये. याप्रकरणी विभागाने सर्व मुख्यालय प्रमुखांना सक्त आदेश द्यावेत व सदर आदेशाचे तंतोतंत पालन होईल याची दक्षता घ्यावी. विभागाने याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

३.६ परिच्छेद क्र. ४.३.२ मध्ये सन २०१०-२०११ या वर्षात अभिनिर्णित प्रकरणांची संख्या आणि त्यात वसूल केलेल्या मुद्रांक शुल्कात वाढ झाली. तथापि, सन २०११-२०१२ पासून अभिनिर्णय प्रकरणांची संख्या व त्यासोबतच मुद्रांक शुल्क या क्रमशः घसरण झाल्याचा आक्षेप महालेखाकारांकडून घेण्यात आला. उपरोक्त आक्षेपासंबंधी विभागाने सन २०१२ पुर्वी एमआयडीसी यांचेकडील भाडेकराचे दस्त अभिनिर्णित केल्याखेरीज नोंदणीस स्वीकारू नये अशी बंधने घालण्यात आली होती. तथापि, एमआयडीसी यांच्याकडील भाडेपट्टा कराराचे दस्त अभिनिर्णित करण्याची अट दिनांक ८ मे, २०१२ रोजीच्या परिपत्रकान्वये शिथिल करण्यात आल्यामुळे अशा दस्तांची नोंदणी दुय्यम निबंधक कार्यालयाकडे होऊ लागली त्यामुळे अभिनिर्णयासाठी दाखल प्रकरणांमध्ये घट झाली असल्याचे विभागाने उत्तरात म्हटले आहे. परंतु प्रकरणांची सद्यःस्थिती पाहता मार्च, २०१६ अखेर शिल्लक प्रकरणांची संख्या १२६९ इतकी असून ९२२३.१३५ लाख इतकी रक्कम शिल्लक असल्याचे दिसून येत आहे. अतः उपरोक्त प्रकरणे सहा महिन्यात निकाली काढून शिल्लक रक्कम वसूल करण्यात यावी व याची माहिती त्वरीत समितीस सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.

" दुय्यम निबंधकाने मुद्रांक जिल्हाधिका-याकडे पाठविलेली अभिनिर्णय प्रकरणे "

३.७ विभागाने मुद्रांक जिल्हाधिकारी यांचेकडे निर्णयाकरिता जो प्रस्ताव पाठविला आहे ती प्रकरणे मोठ्या प्रमाणावर प्रलंबित आहेत. याबाबत विभागीय सचिवांनी विदित केले की, दि.३१/३/२०१६ पर्यंत ८१,५५० इतकी प्रकरणे प्रलंबित आहेत. यामध्ये बहुतांश केसेस सन २००२ पर्यंतच्या असून विभागामध्ये पूर्वी अशी पध्दत होती की, स्टॅम्प ड्युटी कमी असेल तर किंवा कागदपत्रे अपूरी असली तर ती स्विकारली जात नाहीत. त्यामुळे विभागाकडे खुप मोठ्या प्रमाणावर दस्तऐवज झालेले होते. सन २००२ पासून जेव्हा संगणकीकरणाचे काम सुरु झाले तेव्हापासून अपूर्ण प्रस्ताव किंवा अपूरी कागदपत्रे असलेली प्रकरणे स्विकारण्याचे बंद केलेले आहे. सन २०१३-१४ मध्ये जवळपास १,१४,२५९ दस्तऐवज होते. आता सन २०१५-१६ पर्यंत हा आकडा ८१,५५० पर्यंत आलेला आहे. प्रलंबित दस्तऐवजातील ब-याच मालमत्तेचे व्यवहार झालेले आहेत. त्यामुळे सदर दस्तऐवज निकाली काढण्यासाठी ड्राईव घेवूनही संबंधितांचे पत्ते मिळत नाहीत आणि पत्ते मिळाले तरी प्रतिसाद मिळत नाही यातील बरेचसे दस्तऐवज करारनामा स्वरुपाचे आहेत. त्यामुळे सातबा-यावर बोजा सुध्दा चढविता आलेला नाही. याबाबत किमान रु.१०,०००/- पर्यंतची जी छोटी छोटी प्रकरणे आहेत त्याबाबतचे प्रस्ताव शासनाकडे पाठवून त्यांच्याबाबत माफी देण्याची मंजूरी घेवून निकाली काढण्यासाठी विभाग प्रयत्नशील आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी सादर केला. तथापि, सन २००९-१० मध्ये अशा प्रकरणांचा आकडा ५१,००० आहे आणि आजचा आकडा ८१,००० वर आहे. त्यामुळे मागच्या ५-६ वर्षात ३०,००० प्रकरणांची वाढ झालेली आहे. मुंबई येथील जागेसंबंधीची ॲडज्युडीकेशनच्या ५ केसेस सन २०१५-१६ मध्ये जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविण्यात आल्या असून त्यापैकी एकाही केसवर त्यांनी निर्णय घेतलेला नाही. अशापध्दतीने सुरु असलेल्या कामकाजावर समितीने नाराजी व्यक्त केली. केवळ ५ प्रकरणे असून त्यावर १ वर्षाच्या कालावधीत निर्णय देता येत नसेल तर पूर्वीची प्रकरणे कधी निकाली काढण्यात येणार ? अशी विचारणा समितीने केली. याशिवाय विभागाने प्रलंबित प्रकरणांबाबत सादर केलेल्या आकडेवारीमध्येही तफावत दिसून येते. सदर आकडेवारी संदर्भात विभागाने पुनःश्च खात्री करावी. सदर १,५४,००० प्रकरणांच्या आकडेवारीचा ताळमेळ घेणे आवश्यक आहे. मुद्रांक जिल्हाधिका-यांकडे प्रलंबित असलेल्या सर्व प्रकरणांचा आढावा घेण्यात यावा, प्रलंबित प्रकरणांची संख्या निश्चित करण्यात यावी, सदर प्रकरणांवर तातडीने निर्णय घेवून प्रलंबित प्रकरणांमध्ये वसुली होवू न शकलेली जवळपास ६५ कोटी २६ लाख रकमेची तातडीने वसुली करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस ३ महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

" विभागाने अवरुध्द केलेली प्रकरणे "

३.८ कलम ३३ नोंदणीकृत अथवा विना नोंदणीकृत असे दोनही यथोचितपणे मुद्रांकीत न केलेले संलेख अवरुध्द करण्याबाबत आहे. मुद्रांक जिल्हाधिका-यास अवरुध्द केलेल्या सलेखांवर आकारणी योग्य मुद्रांक शुल्क जर लागू असेल तर, निर्धारण करण्याचे अधिकार आहेत. दि.३१/३/२०१४ पर्यंत विभागाकडे ७,१२५ अभिनिर्णयासाठी आणलेली अवरुध्द प्रकरणे असून त्यामध्ये रु.७७.२४ कोटी मुद्रांक शुल्काचे अंतर्भुत असल्याचा आक्षेप महालेखापालांनी नोंदविला. याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, सदर प्रकरणांमध्ये म्हाडा, सिडको अशा संस्थांमधील ॲलॉटमेंट लेटर, महानगरपालिकेकडील टीडीआर, विकसन करार, वर्क कॉन्ट्रक्ट अशाप्रकारच्या प्रकरणांचा समावेश आहे. माहे मार्च, २०१६ अखेर सदर प्रकरणांची संख्या कमी करुन ५,८१२ पर्यंत आणलेली आहे. यामध्ये प्रामुख्याने म्हाडाकडील कागदपत्रांची संख्या अधिक आहे. मुद्रांक शुल्क देय होते किंवा नाही याबाबत खुप वर्ष वाद सुरु होता व त्यानंतर सदरहू रक्कम भरण्याबाबत निर्णय देण्यात आला. यानंतर विभागाने अनलेस स्कीम आणली होती. परंतू मालक बदलल्यामुळे तसे अपेक्षित प्रस्ताव मिळाले नाहीत, अशाप्रकारची अडचण टीडीआर प्रकरणीही होती. माहे एप्रिल, २०१६ मध्ये स्टॅम्प ड्युटीमध्ये सुधारणा करण्यात आली असून त्यानुसार बँक किंवा संस्था किंवा शासकीय कार्यालयावर आता जबाबदारी टाकण्यात आली आहे. सदरहू प्रकरणी संबंधितांनी रक्कम भरली नसेल तर जबाबदार संस्थांनी ती भरावयाची आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी साक्षी दरम्यान सादर केला. याबाबत जर अशाप्रकारच्या संस्थांवर जबाबदारी टाकली तरी वसुली होणार नाही अशी शंका समितीने उपस्थित केली व विभागाने स्टॅम्प ड्युटी मधील सुधारणा प्रकरणी कार्यवाही करुन प्रलंबित सर्व प्रकरणे निकाली काढावीत व प्रलंबित प्रकरणांतील मुद्रांक शुल्काची रक्कम वसुल करुन याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस ३ महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

" नोंदणी महानिरिक्षक यांच्याकडे प्रलंबित अभिनिर्णय प्रकरणे "

३.९ प्रलंबित प्रकरणांची माहिती सादर करताना विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, माहे मार्च, २०१६ मधील प्रलंबित प्रकरणांची संख्या १३१८ असून सन २०१५-१६ मध्ये ४६२ होती. सदर खुलाशानंतर समितीने स्पष्ट केले की, विभागाकडून प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याबाबत योग्य कार्यवाही केली जात नाही. सन २००९ मध्ये प्रलंबित प्रकरणांची संख्या ३३१ होती. त्यापैकी २१ प्रकरणे निकाली काढली आहेत. सन २०१० मध्ये ३६१ पैकी १२ प्रकरणे निकाली काढली आहेत. सन २०११ मध्ये ३९७ पैकी २२ प्रकरणे निकाली काढली आहेत. सन २०१२ मध्ये ४०१ पैकी ८ प्रकरणे निकाली काढली आहेत. तर सन २०१३ मध्ये ४०१ पैकी फक्त ८ प्रकरणे निकाली काढली आहेत. अशाप्रकारे संथ गतीने प्रकरणे निकाली काढली तर प्रलंबित प्रकरणांची संख्या दिवसें-दिवस वाढत जाईल, ती कधीच संपणार नाही. याबाबत समितीने नाराजी व्यक्त केली व सन २०१६ पर्यंत रु.१० लाख पेक्षा कमी रकमेची प्रकरणे हाताळण्याचे अधिकार क्षेत्रीय स्तरावर देण्यासंबंधी विभागाने योग्य तो प्रस्ताव तयार करावा व त्यास सक्षम अधिका-याची मंजूरी घ्यावी. तसेच विभागाकरिता आवश्यक मनुष्यबळ किंवा इतर सेवासुविधांबाबत विभागाने आग्रही भूमिका घेवून त्या उपलब्ध करुन घेण्यात याव्यात. सदरहू प्रकरणी विभागाने सादर केलेले स्पष्टीकरण व दाखविलेली हतबलता योग्य वाटत नाही समिती याबाबत समाधानी नाही. विभागाने उपरोक्त सूचनेप्रमाणे कार्यवाही करुन प्रलंबित प्रकरणे त्या-त्या वर्षात निकाली काढावीत. जेणेकरुन प्रलंबित प्रकरणांच्या संख्येत वाढ होणार नाही याबाबत विभागाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस ३ महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

" करारनाम्यात नमूद मोबदला मुल्यांच्या निर्धारणासाठी समान धोरणाचा अभाव "

३.१० महालेखापालांनी सदर आक्षेपात नमूद केल्याप्रमाणे मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता विकासक आणि संस्था यांच्यात सहकार घरबांधणी संस्था अथवा महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ च्या अनुसूची १ मधील अनुच्छेद ५ (g - a) अंतर्गत असलेल्या अस्तित्वातील इमारतींचे पुनर्विकास करारनामे निष्पादित करण्यात आले आहेत. पुनर्विकास करारनामा संलेख अभिनिर्णीत करताना मुंबई, अंधेरी, कुर्ला आणि बोरिवली येथील मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयात तात्पुरती निवास व्यवस्थेचे भाडे, हालअपेष्टा/निवास निधी, दलाली खर्च, विकासकाने मालमत्तेच्या विकास अधिकारासाठी संस्थेस व संस्थेच्या सदस्यांना निवासाबद्दलसाठी दलाली खर्च इ. बाबींसाठी केलेला भुगतनामा मोबदला मुल्याचा भार मानण्यात येतो. याशिवाय मोबदला मुल्यात बिल्टअप क्षेत्राची बांधकाम किंमत, संस्थेचे कार्यालय, चौकीदाराचे कार्यालय इ.सह विकासकाने दिलेल्या पार्कींग जागेचाही समावेश आहे. तथापि, ३५ पुनर्विकास करारनामे अभिनिर्णीत करतेवेळी मुद्रांक जिल्हाधिकारी इन्फोसमेंट - १ व २, मुंबई यांनी त्या बाबी मोबदला मुल्याचा भाग म्हणून ग्राह्य धरल्या नाहीत. परिणामी ३५ अभिनिर्णीत प्रकरणांत रु.११.३९ कोटी मुद्रांक शुल्क व शास्तीची कमी वसुली आकारण्यात आली असा आक्षेप महालेखापालांनी नोंदविला. महालेखापालांच्या आक्षेपाशी

सहमती दर्शवून विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी अभिनिर्णीत केलेले असल्याने सदरहू प्रकरण कलम ५३ (अ) अन्वये पुनर्विलोकनाकरिता घेण्यात आलेले असून ९ प्रकरणांत मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी यांनी आदेश निर्गमित केलेले असून वसुलीची कार्यवाही संबंधित मुद्रांक जिल्हाधिकारी यांचे स्तरावर सुरु आहे असा खुलासा समितीस सादर केला. उर्वरित २६ प्रकरणे सुनावणीच्या अंतिम टप्प्यात असून दि.२८/६/२०१६ रोजी अंतिम सुनावणी प्रस्तावित आहे. या संदर्भात समितीने विचारणा केली की, ज्या ९ प्रकरणांत निकाल देण्यात आलेला आहे त्याबाबतची वसुली अद्यापही झालेली नाही. २६ प्रकरणे अजूनही सुनावणीच्या प्रक्रियेत आहेत. या संपूर्ण प्रकरणावरील कार्यवाहीस झालेल्या विलंबास जबाबदार व्यक्तीवर कोणतीही कार्यवाही अद्याप केलेली दिसून येत नाही. राज्याचा महसूल बुडत आहे. या संदर्भात विभाग गंभीर नाही असे मत समितीने व्यक्त केले. विभागाने यापूर्वी निकाली काढलेल्या ९ प्रकरणांची वसुली तातडीने करावी व उर्वरित २६ प्रकरणी दि. २८/६/२०१६ रोजी झालेल्या अंतिम सुनावणीतील निर्णयानुसार वसुलपात्र रकमेची वसुली तातडीने करावी व सर्व ३५ प्रकरणामधील वसुलपात्र रकमेच्या वसुलीचा अहवाल समितीस ३ महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

" पुनर्विकास करारावर मुद्रांक शुल्क कमी आकारणी " " दस्तऐवजात नमूद महसूल भागीदार बाबी विचारात न घेतल्याने मुद्रांक शुल्क आणि शास्तीची कमी आकारणी "

३.११ मुंबईच्या परळ, शिवडी विभागातील ७०९९.२१ चौ.मी. जमिन व त्यावर व्यापलेल्या इमारतींच्या पुनर्विकासाकरिता संस्था आणि विकासक यांच्यात निष्पादित करण्यात आलेला पुनर्विकास करारनामा मुद्रांक जिल्हाधिकारी इन्फोर्समेंट- १, मुंबई यांनी माहे जानेवारी, २०१२ मध्ये अभिनिर्णित केलेला करारनामा अभिनिर्णित करताना मुद्रांक जिल्हाधिका-यांनी संस्थेच्या सभासदांना देण्यात येणा-या रुपये १८.८८ कोटी मुल्याच्या बिल्टअप क्षेत्राची बांधकाम किंमत आणि पार्कींग स्थळ मोबदला मुल्यात विचारात घेतले नाही. तसेच संस्थेच्या वतीने विकासकाने अदा केलेले रु. १६.८१ कोटीचे भाडे बंधन असे गृहीत धरले होते आणि अनुच्छेद ५ (h) (A) (IV) अंतर्गत ०.२ टक्के दराने मुद्रांक शुल्क आकारण्यात आले. या दोन्ही बाबी मोबदल्याचा भाग होत्या आणि त्यावर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या अनुसूची १ मधील अनुच्छेद २५ अंतर्गत ५% दराने मुद्रांक शुल्क आकारणी योग्य असूनही आकारण्यात आली नाही. त्यामुळे १.६५ कोटी मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली. तसेच मुद्रांक जिल्हाधिकारी, नागपूर (शहर) यांचे कार्यालयात महालेखापालांच्या असे निदर्शनास आले की, जे विकास करारनाम्याशी संबंधित होते त्यात दस्तऐवज जमिन मालक (Gold Bricks Infrastructure Pvt. Ltd. आणि विकासक Godrej Parties Ltd.) यांच्यात दि.३०/९/२०११ रोजी १४४०.१९ चौ.मी. बांधकाम केलेल्या क्षेत्रासह ३६७४४ चौ.मी. क्षेत्रावर ११,९८,५०९ चौ.फु. एफएसआय आणि विकण्यायोग्य १९,८४,५०० चौ.फु. क्षेत्र रहिवासी क्षेत्र-२ म्हणून संबोधण्यात येत असलेल्या प्लॉटच्या विकासासाठी निष्पादित करण्यात आले. मुद्रांक जिल्हाधिकारी, नागपूर (शहर) यांनी बांधकाम क्षेत्रासह जमिनीचे बाजारमुल्य रु.६६.८६/- कोटी निर्धारित केले आणि रु.३.३४ कोटी मुद्रांक शुल्क व २% प्रतिमहा या दराने चार महिन्यासाठी रु.२६.७४ लक्ष शास्तीची आकारणी केली. विभागाने बाजारमुल्य परिगणित करताना दस्तऐवजात नमूद केलेली महसूल भागीदारीची बाब लक्षात घेतली नाही. परिणामी १७.७४ कोटी मुद्रांक शुल्क आणि ३.९५ कोटी शास्तीची कमी आकारणी झाली. या दोन्ही आक्षेपाबाबत समितीसमोर साक्ष देताना विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, परिच्छेद क्र.४.३.८.२ मध्ये सुनावणी अंतिम स्थितीत आहे आणि परिच्छेद क्र.४.३.८.३ ही केस फार मोठी होती आणि त्यामध्येही जास्त अडचणी होत्या सदर केस ऑर्डरसाठी क्लोज केलेल्या आहेत. एका आठवड्यात आदेश पारीत करण्यात येईल असा खुलासा सादर केला. याअनुषंगाने समितीने दोन्ही प्रकरणांमध्ये लवकरात लवकर निर्णय करुन वसुलीची प्रक्रिया तात्काळ करण्यात यावी असे निर्देश दि.२१/६/२०१६ रोजीच्या बैठकीत दिले होते. विभागाने सदर प्रकरणे निकाली काढणे व वसुलपात्र रक्कम वसुल करणे तसेच दोषी अधिका-यांविरोधात कारवाई करून याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस ३ महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

" मालमत्तेच्या बाजारमुल्यातून भाडेकरुंनी व्यापलेल्या क्षेत्राची बांधकाम किंमत वजा करण्यात आली नाही "

३.१२ महालेखापालांच्या चाचणी लेखापरिक्षणात असे निदर्शनास आले की, भाडेकरुना देवू केलेल्या जागेच्या बांधकामाची किंमत वजा करुन वास्तव बाजारमुल्य ठरविले होते. परंतु पुढे असे निदर्शनास आले की, मुद्रांक जिल्हाधिकारी, मुंबई इन्फोर्समेंट - I आणि II यांनी अधिनिर्णीत केलेल्या अभिहस्तांतरण पत्र व विकास करारनाम्यात एक सारख्याच प्रमाणात भाडेकरुंना देवू केलेल्या जागेच्या बांधकामाची किंमत वजा न करता बाजारमुल्यांची किंमत ठरविली. काही प्रकरणांमध्ये मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी भाडेकरुंना देवू केलेल्या जागेच्या बांधकामाचा खर्च वजा करण्यात आला नाही. या संदर्भात विभागीय सचिवांकडून साक्षी

दरम्यान खुलासा करण्यात आला की, सन २०११ मध्ये क्षेत्रीय कार्यालयांना फक्त बांधकाम खर्च वजा करण्याबाबत कळविलेले होते. त्यामुळे त्यांनी ते वजा करण्याचा प्रयत्न केला. तर ते निगेटीव्ह (negative) येत होते. त्यामुळे त्यांनी ते ॲड (add) केले. याबाबत विभागाने सुधारीत सूचना निर्गमित केल्या. त्यानुसार एकूण रक्कम negative येवो किंवा नाही पण जमिनीच्या minimum ५०% किंमत घेतली पाहिजे अशा सूचना सन २०१४ मध्ये देण्यात आल्या. याबाबत समितीने सूचित केले की, सन २०१४ नंतर विभागाने स्पष्टता आणली आहे. शासन किंवा पक्षकाराचे नुकसान होवू नये या दृष्टीने सन २०१४ पूर्वीच्या सर्व प्रकरणांची विभागाने पुनर्पडताळणी करुन शासनास येणे असलेली रक्कम वसूल करावी व पक्षकारांना देय रक्कम त्यांना परत करावी असे निर्देश साक्षी दरम्यान दिले होते. याबाबत विभागाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस १ महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

" एका विकास करारनाम्यात बाजारमुल्याच्या जागेचे परिगणन न केल्यामुळे मुद्रांक शुल्क व शास्तीची कमी आकारणी "

३.१३ महालेखांपालांनी चाचणी लेखापरिक्षणामध्ये मुद्रांक जिल्हाधिकारी इन्फोर्समेंट- II,मुंबई कार्यालयाचे लेखापरिक्षणात एका प्रकरणामध्ये जे मुंबई उपनगर येथील एका मोठ्या भूखंडावर असलेल्या ६.१६५ चौ.मी. विकास करारनाम्याबाबत होते. मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी जमिन मालकाच्या वतीने बृहन्मुंबई महानगरपालिकेला द्यावयाच्या जागेच्या बांधकामाची किंमत रु.९७.९८ लक्ष बाजारमुल्य रु.१७.१४ कोटीतून वजा केले. मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी रु.१३.९६ कोटी वास्तव बाजारमुल्य घेतले आणि रु.६९.७९ लक्ष मुद्रांक शुल्क आकारले. बाजारमुल्यातून बांधकाम किंमत वजा करुन ०.९५ लक्ष शास्तीसह १६.८५ लक्ष मुद्रांक शुल्क कमी आकारणी झाली. सदर आक्षेपासंदर्भात निर्गमन परिषदेमध्ये विभागाने मुद्रांक शुल्काची कमी आकारणी हा आक्षेप अमान्य केला. तथापि, साक्षी दरम्यान महालेखापालांनी नमूद केलेला आक्षेप मान्य करुन विभागाकडून याबाबत तपासणी करण्यात येत आहे, असा खुलासा सादर केला. याबाबत समितीने साक्षी दरम्यान तपासणी करुन १ महिन्याच्या आत अहवाल सादर करण्याबाबत निर्देश दिले होते. तथापि, विभागाने अद्याप अहवाल सादर केलेला नाही. या संदर्भात विभागाने तातडीने कार्यवाही करुन व १ महिन्याच्या आत तपासणी अहवाल व त्यानुसार वसुलपात्र रक्कम वसुलीचा अहवाल समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

३.१४ महालेखाकारांनी परिच्छेद क्रमांक ४.३.१०.१ मध्ये मालमत्तेचे बाजारमुल्यावर आकारणी करण्यात आलेले मुद्रांक शुल्क कमी आकारण्यात आल्याचा आक्षेप नोंदविला आहे. यासंदर्भात विभागीय सचिवांनी आक्षेपातील मुद्दा मान्य केलेला असून तो सुनावणीच्या अंतिम स्थितीत असून दिनांक २८ जून २०१६ रोजी अंतिम तारीख दिलेली आहे असे साक्षी दरम्यान स्पष्ट केले त्यावर समितीने तीन महिन्याच्या आत वसुली करावी असे निर्देश दिले होते. परिच्छेद क्रमांक ४.३.१०.२ मध्ये महालेखाकारांनी नमूद केलेला आक्षेपही विभागाने मान्य केला असून दस्त अभिनिर्णित असल्याने प्रकरण ५३ (अ) खाली पुनर्विलोकनासाठी घेण्यात आलेले आहे. संबंधितांना सुनावणीची संधी देऊन अंतिम निर्णय घेण्यात येईल.याप्रकरणी सुनावणीचा दिनांक २८ जून २०१६ निश्चित करण्यात आल्याचे समितीला अवगत केले. त्याचप्रमाणे परिच्छेद क्रमांक ४.३.११, ४.३.१२ यासंदर्भातही सुनावणीसाठी २८ जून, २०१६ ही तारीख निश्चित करण्यात आली आहे. परिच्छेद क्र.४.३.१३.१, ४.३.१३.२, ४.३.१३.३ याबाबत खुलासा करताना परिच्छेद क्र. ४.३.१२.२ मध्ये तीन केसेस होत्या त्या तिनही केसेसमध्ये आदेश पारित केले असल्याचे विभागीय सचिवांनी स्पष्ट केले. तसेच अशा अडीच हजार केसेस प्रलंबित असल्याने प्रत्येक सुनावणीच्यावेळी साधारणपणे ४०-५० केसेस घ्याव्या लागतात असे समितीस अवगत केले.याबाबत समितीने निर्देश दिले की, परिच्छेद क्र. ४.३.१०.११, ४.३.१०.२, ४.३.११, ४.३.१२, ४.३.१३.१, ४.३.१३.२, ४.३.१३.३ या सर्व परिच्छेदांबाबत प्रलंबित प्रकरणातील वसुलीची अद्ययावत स्थिती समितीला सादर करण्याबाबत दिनांक २१ जून २०१६ रोजीच्या बैठकीत समितीने निर्देश दिले होते तथापि विभागाने सदर माहिती सादर केलेली नाही.समितीच्या निर्देशानंतरही समितीने विचारणा केलेली माहिती सादर न करणे ही अतिशय गंभीर बाब आहे.आक्षेपाधीन प्रकरणाबाबत दिनांक २८ जून २०१६ रोजी झालेल्या अंतिम सुनावणीतील निकालानुसार वसुलपात्र रकमेच्या वसुलीचा तपशील व समितीने विचारणा केलेली माहिती सादर करण्यास झालेल्या विलंबास जबाबदार अधिका-यांवर कारवाई करुन त्याबाबतचा अहवाल समितीस एक महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

" मुद्रांक शुल्काची सुट देण्याबाबत अटी व शर्तींच्या पालनाची खातरजमा करण्यासाठी यंत्रणा नसणे "

३.१५ महाराष्ट्र शासन माहे जून, २००७ च्या अधिसूचने अंतर्गत काही संलेखांवर पूर्ण सूट दिली आहे. यासाठी अशी अट आहे की, एखाद्या घटकास जे काम करण्यासाठी सूट दिलेली आहे ते कार्य सुरु करण्यास असमर्थ ठरल्यास किंवा त्यांने प्रोत्साहन पॅकेज योजना २००७ मधील अटींचे उल्लंघन केल्यास त्या घटकास सुरुवातीपासून कोणतीही सूट नसल्याप्रमाणे मुद्रांक शुल्क व शास्ती अदायगी करावी लागेल. मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे ग्रामीण कार्यालयातील अभिनिर्णय दस्तऐवजाच्या छाननीत महालेखापालांच्या असे निदर्शनास आले की, सन २००९ ते २०१२ मधील संबंधित विषयावरच्या अटी सूचनाप्रमाणे ३५ भाडेपटटी आणि विक्री करारात रु.३१८ कोटीची मुद्रांक शुल्कात सूट देण्यात आली. कार्यालयाकडे अशी कोणतीही यंत्रणा अस्तित्वात नाही अथवा अटी सूचनेत किंवा पॅकेज प्रोत्साहन योजना २००७ मध्ये विनिर्दीष्ट नाही. ज्या दुस-या लाभार्थी घटकांनी काम सुरु केले आणि प्रोत्साहन पॅकेज योजना २००७ च्या अटींचे उल्लंघन झाले नाही याबाबत खातरजमा करता येईल. त्यामुळे अशी खातरजमा न केल्यामुळे मुद्रांक शुल्क वसुल झाले नाही. या संदर्भात विभागीय साक्षी दरम्यान असे स्पष्ट केले की, DIC नागपूर यांच्या ३५ प्रकरणांबाबत माहिती मागविण्यात आली होती त्यापैकी ४ प्रकरणांमध्ये ५४.९० लक्ष रुपये मुद्रांक शुल्क अंतर्गत सुट देण्याबाबतची अट व नियमांचे उल्लंघन करण्यात आले होते. अशा ४ प्रकरणांमध्ये वसुलीचा निर्देश दिलेला असून त्याबाबत JDR यांचा रिपोर्ट प्राप्त झाल्याचे विभागीय सचिवांनी स्पष्ट केले. तसेच या चारही प्रकरणांची वसुली ३ महिन्यात करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस आाश्वासित केले होते. विभागीय सचिवांनी आश्वासित केल्याप्रमाणे सदर ४ प्रकरणांतील वसुलपात्र रक्कम ५४.९० लक्ष रकमेच्या वसुलीचा अहवाल समितीस १ महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

" मालमत्तेच्या न्युन्य मुल्यांकनामुळे मुद्रांक शुल्काची कमी आकारणी "

३.१६ महालेखापालांच्या परिच्छेद क्र.४.४.१ अंतर्गत संयुक्त दुय्यम निबंधक हवेली, पुणे कार्यालयाचे दस्तऐवजाच्या छाननीत असे निदर्शनास आले की, सर्वेक्षण क्र.१०० आणि १०१ असलेली मालमत्ता वरजे गावात आहे. जमिनीचे क्षेत्रफळ अनुक्रमे ४२००० चौ.मी. व ३१४३७ चौ.मी. होते. ASR चे दर अनुक्रमे १०४००/- प्रति चौ.मी. आणि ७०० प्रति चौ.मी. होती आणि दस्तऐवजात नमूद रु.४.८३ कोटी ऐवजी योग्य बाजारमुल्य रु.२८.६३ कोटी अधिक होते. परिणामी रु.१.१९ कोटी मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली. या संदर्भात विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, १.१९ कोटी मुद्रांक शुल्क Joint Registrar यांनी मान्य केले. तथापि, अद्यापही वसुली झालेली नाही. या संदर्भात RRC ची नोटीस दिलेली आहे. संबंधितांच्या सातबारा उता-यावर बोजा चढविण्यात येत आहे. तसेच परिच्छेद क्रमांक ४.४.१.२ संदर्भात खुलासा करतानाही सचिवांनी स्पष्ट केले की, सदर आक्षेपाबाबत कार्यवाही पूर्ण झालेली असून सातबारा उता-यावर बोजा चढविण्यात आलेला आहे. सदर प्रकरणी नियम ५३ खाली सुनावणी झाली आहे व ३ महिन्यात सदरची कार्यवाही पूर्ण करण्यात येईल व त्या पुढील ३ महिन्यात वसुलीचे काम पूर्ण करण्यात येईल असा खुलासा करण्यात आला.

उपरोक्त दोन्ही प्रकरणी कार्यवाही पूर्ण करुन वसुली अहवाल समितीस सादर करण्याबाबत विभागीय सचिवांनी साक्षी दरम्यान आश्वासित केले होते. तथापि, अद्यापही अहवाल अप्राप्त आहे. विभागाने उपरोक्त दोन्ही प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा व वसुलीचा अहवाल समितीस १ महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

" मुद्रांक शुल्काच्या अदायगीपासून अनियमित सूट "

३.१७ महालेखापालांनी चाचणी लेखापरिक्षणात नोंदविलेल्या आक्षेपावर खुलासा करताना स्पष्ट केले की, दुय्यम निबंधक, अंधेरी क्र.२ या कार्यालयात नोंदणी झालेला दस्त क्र.१९८३/२०११ या दस्तामधील क्षेत्र २९३८.४६ चौ.मी. असून यापैकी २८०६.६९ चौ.मी. क्षेत्र भाडेकरु व्याप्त असल्याचे मान्य करुन मुद्रांक शुल्क आकारण्याची सूट दिली. तथापि, दस्तऐवजासोबत भाडेकरु असल्याबाबतचे कोणतेही पुरावे जोडून घेतले नाहीत. शिवाय भाडेकरु आहे असा दस्ताऐवजामध्ये उल्लेख केलेला नाही. तरी देखील भाडेकरु असल्याचे दर्शवून बाजारमुल्यात मोठी सवलत देण्यात आली. परिणामी ७६.९८ लक्ष अधिक महसूलाची तुट झाली. सदरचा आक्षेप विभागाने मान्य केला परंतु दस्त अभिनिर्णित असल्याने सदरचे प्रकरण कलम ५३ (अ) खाली पुनर्विलोकनासाठी घेण्यात आले असा खुलासा विभागाने सादर केला. याबाबत समितीने सूचित केले की, कोणतीही कागदपत्रे भाडेकरुकडे नसताना आपण भाडेकरु म्हणून ग्राह्य धरले त्याकरिता संबंधित अधिका-यांवर कार्यवाही केली पाहिजे. तथापि, विभागाने अशी कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. विभागाने संबंधित अधिका-यावर कार्यवाही करुन कार्यवाहीचा अहवाल समितीस ३० दिवसात सादर करावा तसेच अशाप्रकारची अन्य प्रकरणे प्रलंबित आहेत. त्याबाबतही आढावा घेण्यात यावा व सर्व प्रकरणांतील वसुलपात्र रक्कम वसुल करुन याबाबतचा अहवाल समितीस ३ महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

वित्त विभाग

४.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१३-२०१४ या वर्षाच्या महसुली जमा अहवालातील प्रकरण क्रमांक VII" शासकीय जमा लेखाकन पध्दतीची IT लेखापरीक्षा " यावरील संपादणूक लेखापरीक्षा यासंदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय दिले आहेत.—

७.१ प्रस्तावना–महाराष्ट्र शासनाने "आभासी कोषागार" या नावाच्या एका नवीन कोषागाराची निर्मिती करावयाचे ठरविले होते (मे २००८) त्यानुसार वित्त विभागाने (FD) एक ऑनलाईन शासकीय जमा लेखांकन प्रणाली (GRAS) विकसित करुन अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली. (फेब्रु. २००९) या प्रणालीमुळे करदात्यांना/इतर महसूल दात्यांना सहभागी बँकांच्या इंटरनेट बँकींग सुविधेद्वारे शासनाच्या संकेतस्थळावर ई-चलनद्वारे प्रदाने करणे शक्य होणार होते. सुरक्षित, बळकट, कार्यक्षम आणि सुलभ प्रणाली विकसित करुन त्याद्वारे राज्याच्या जमा व्यवहारांच्या हस्तलिखित पध्दतीत बदल करुन त्या ऐवजी ते इलेक्ट्रॉनिक पध्दतीने करण्याच्या उद्देशाने जून २०१० मध्ये अशी माहिती तंत्रज्ञानाची GRAS प्रणाली पुरःस्थापित करण्यात आली. ई-प्रदाने ही महाराष्ट्र शासनाच्या पारंपरिक पध्दती व्यतिरिक्त प्रदानासाठी दिलेली अतिरिक्त व्यवस्था होय. GRAS प्रणाली कार्यरत आणि सुस्थितीत ठेवण्याचे काम "आभाषी कोषागार" करते. "आभाषी कोषागार" प्रणाली ही कोषागार संगणकीकरण प्रकल्पाचे मोड्यूल (मोड्यूल = स्वतंत्र विभाग) असून राष्ट्रीय ई-सुशासन योजनेंतर्गत (NEGP) मिशन मोड प्रोजेक्ट (MMP) आहे. कोषागार संगणकीकरण प्रकल्पातून अर्थसंकल्पीय कार्यपध्दती अधिक कार्यक्षम करणे, रोख रक्कमांच्या ओघाच्या व्यवस्थापनात सुधार आणणे, लेख्यांचे ताळमेळ योग्य वेळेत पूर्ण करण्यासाठी चालना देणे, व्यवस्थापन सूचना प्रणाली (MIS) बळकट करते, लेखे वेळेत आणि अचूकतेने तयार करणे, सार्वजनिक वितरण व्यवस्थेत पारदर्शकता आणि कार्यक्षमता आणणे आणि चांगल्या वित्तीय व्यवस्थापनाबरोबरच राज्यात सुशासन आणणे अपेक्षित आहे. GRAS प्रणालीद्वारे महसुलाचे वर्षनिहाय संकलन खालील तक्ता ७.१ मध्ये दर्शविले आहे.—

(रुपये कोटीत)

वर्ष (१)	चलनांची संख्या (२)	रक्कम (३)
२०१०-११	३०,५४७	४५७
२०११-१२	१,२३,३५२	१०,३६५
२०१२-१३	३,८३,१४७	२२,६१२
२०१३-१४	१७,६५,१४३	२७,०४४

स्त्रोत विभागाने सादर केलेली माहिती :

GRAS हे वेबवर आधारीत उपयोजन असून त्यावरील व्यवहार हे *https://gras.mahakosh.gov.in* या वेबपोर्टलद्वारे होत असतात.

या संदर्भात वित्त विभाग व महालेखाकार कार्यालय यांचे कोणतेही अभिप्राय नाहीत.

७.२ प्रक्रिया :-

उपयोगकर्ता



"आभासी कोषागार" लेख्यामध्ये जमा झालेली रक्कम ही शासनाच्या रिझर्व्ह बँकेत असलेल्या खात्यात इलेक्ट्रॉनिक पध्दतीने किंवा RBI च्या मार्गदर्शक सुचनांनुसार प्रेषित केली जाते. हे सॉफ्टवेअर उपयोजन राष्ट्रीय माहिती केंद्र पुणे यांचेकडून बनविले आणि विकसित केले गेले होते. आणि प्रणाली टाटा कम्युनिकेशन डेंटा सेंटर मध्ये प्रस्थापित केली गेलेली आहे. याचे आपातकालिन पुनःप्राप्ती संकेतस्थळही उपलब्ध आहे.

या संदर्भात वित्त विभाग व महालेखाकार कार्यालय यांचे कोणतेही अभिप्राय नाहीत.

७.३ वापरकर्ते विभाग :-

ग्रासचे प्रमुख वापरकर्ते विभाग

(१) नोंदणी महानिरीक्षकांच्या अधिपत्याखालील मुद्रांक शुल्क आणि नोंदणी फी प्रदान करण्यासाठीची कार्यालये

(२) उत्पादन शुल्क आणि इतर करांच्या प्रदानासाठी उत्पादन शुल्क विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालये

(३) विक्रेत्यांद्वारे वाहन नोंदणी शुल्क प्रदान करण्यासाठी, परिवहन आयुक्तांच्या अधिपत्याखाली प्रादेशिक परिवहन कार्यालये हे आहेत.

या संदर्भात वित्त विभाग व महालेखाकार कार्यालय यांचे कोणतेही अभिप्राय नाहीत.

७.४ संघटनात्मक संरचना :–

वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

लेखा व कोषागारे संचालनालय

आभासी कोषागार

आभासी कोषागार अधिकारी (VTO), GRAS उपयोजनांच्या सर्वसाधारण कामकाजाची व्यवस्था पाहतात.

या संदर्भात वित्त विभाग व महालेखाकार कार्यालय यांचे कोणतेही अभिप्राय नाहीत

७.५ लेखापरीक्षेची उद्दीष्टे :

खालील गोष्टींचे मुल्यमापन करणे हे लेखापरीक्षेचे उद्दीष्टे आहे.—

• शासकीय जमांच्या संगणकीकरणाचे उद्दीष्टे पूर्ण करण्यासाठी प्रणालीचे नियोजन आणि अंमलबजावणी योग्य होती.

• प्रणालीच्या विश्वासार्हतेची खात्री करण्यासाठी इनपूट, प्रक्रिया आणि आऊटपूट नियंत्रणे पर्याप्त होती आणि ती नियम आणि पध्दतींना अनुसरुन होती.

• माहितीच्या सुरक्षिततेसाठी विश्वासार्ह नियंत्रके योग्य ठिकाणी योजलेली होती आणि प्रणालीमध्ये लेखापरीक्षेसाठी आवश्यक असलेले मार्ग अंतर्भूत केले होते.

• कोषागार/वापरकर्ता विभागाच्या प्रणालीबरोबरच ग्रासमधील माहितीचे एकत्रिकरण आणि त्याचा ताळमेळ विहित कार्यपध्दतीनुसार घेण्यात आला होता आणि अंतर्गत लेखापरीक्षेसाठी आवश्यक असलेल्या सर्व गरजा प्रणालीद्वारे पूर्ण केल्या जात होत्या. या संदर्भात वित्त विभाग व महालेखाकार कार्यालय यांचे कोणतेही अभिप्राय नाहीत. १६ मे २०१४ रोजी सचिव, वित्त विभाग, (लेखा कोषागारे) यांच्याबरोबर प्रारंभिक बैठक घेण्यात आली. ५ नोव्हेंबर २०१४ रोजी घेण्यात आलेल्या अंतिम बैठकीत लेखापरिक्षेच्या निष्पत्ती व शिफारशी यावर चर्चा करण्यात आली. सचिव (लेखा व कोषागारे) व लेखा संचालनालय यांचे काही अधिकारी.

७.६ लेखापरीक्षेची व्याप्ती आणि कार्यपध्दती :–

लेखापरीक्षेत संगणक सहाय्यित लेखापरीक्षक तंत्राच्या (CAAT) मदतीने GRAS शी संबंधित माहिती आणि अभिलेख्यांचे विश्लेषण केले होते. वर्ष २०१०-११ ते २०१३-१४ या कालावधीसंबंधीच्या माहितीचे विश्लेषण केले गेले.

लेखापरीक्षेसाठी आभासी कोषागार कार्यालये, अधिदान व लेखा कार्यालये (PAO) मुंबई आणि प्रमुख उपयोगकर्त्या विभागांपैकी नऊ कार्यालये निवडण्यात आली. यादृच्छिक नमुना पध्दतीने नऊ कार्यालयांची निवड करण्यात आली जसे नोंदणी महानिरीक्षकांची तीन अधिनस्त कार्यालये, उत्पादन शुल्क विभागाची चार कार्यालये आणि परिवहन आयुक्तांची दोन अधिनस्त प्रादेशीत परिवहन कार्यालये. बैठकीला उपस्थित होते. अंतिम बैठकी दरम्यान आणि इतर वेळी प्राप्त झालेली उत्तरे संबंधित परिच्छेदामध्ये यथायोग्यपणे समाविष्ट करण्यात आली आहे.

या संदर्भात वित्त विभाग व महालेखाकार कार्यालय यांचे कोणतेही अभिप्राय नाहीत.

७.७ लेखापरिक्षेचे निकष :–

GRAS चे नियोजन आणि अंमलबजावणी, माहिती व्यवस्थापन आणि संनियंत्रण यांचा आढावा घेण्यासाठी खालील संदर्भ विचारात घेतले गेले.—

• महाराष्ट्र राज्य ई-सुशासन धोरण २०११

• महाराष्ट्र कोषागार नियम १९६८

• महाराष्ट्र कोषागार नियमपुस्तिका

• शासन निर्णय

• संचालक, लेखा व कोषागारे यांनी जारी केलेली मार्गदर्शक तत्वे आणि सर्व संमत अशा माहिती तंत्रज्ञानाच्या पद्धती.

या संदर्भात वित्त विभाग व महालेखाकार कार्यालय यांचे कोणतेही अभिप्राय नाहीत.

७.८ अभिस्विकृती :—

FD, VTO आणि इतर नऊ वापरकर्त्या लेखापरिक्षेला आवश्यक असणारी माहिती आणि दस्तऐवज सादर करताना दिलेल्या सहकार्याबद्दल आम्ही आभारी आहोत.

लेखापरीक्षेची अभिक्षणे :

या संदर्भात वित्त विभाग व महालेखाकार कार्यालय यांचे कोणतेही अभिप्राय नाहीत.

७.९ सर्वसाधारण नियंत्रणे आम्ही, प्रणाली विकास कृतीयोजना आणि धोरणे, दस्तऐवजीकरण :—

IT प्रणालीशी निगडीत प्रकल्पांच्या सनियंत्रणासंबंधीत सर्वसाधारण नियंत्रके तपासली. लेखापरीक्षेत दिसून आलेल्या त्रूटींची चर्चा खाली केली आहे. या संदर्भात वित्त विभाग व महालेखाकार कार्यालय यांचे कोणतेही अभिप्राय नाहीत.

७.९.१ अपर्याप्त प्रकल्प व्यवस्थापनः—

केंद्र शासनाने (GOL) जुलै २०१० मध्ये मिशन मोड प्रोजेक्ट (MMP) अंतर्गत राज्य कोषागारांचे संगणकीकरण छ या योजनेच्या अंमलबजावणीला मान्यता दिली. GRAS सह कोषागार संगणकीकरणाच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र शासनाला २०११-१२ आणि २०१२-१३ या कालावधीसाठी ९९० लाख प्राप्त झाले.

केंद्र शासनाच्या जुलै २०१० च्या MMP मार्गदर्शक सूचनांनुसार, लेखा व कोषागार संचालनालय (DAT) यांनी सप्टेंबर २०१० मध्ये प्रकल्प व्यवस्थापनासाठी संस्थात्मक कार्यतंत्राचा समावेश असलेला एक सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार केला.

सुशासन आणि कार्यक्रम व्यवस्थापनासाठी DPR च्या परिच्छेद १३ नुसार, खाली दिलेली संस्थात्मक संरचना प्रस्तावित केली होती.

व्यवस्थापनास सहाय्य व्हावे यासाठी, सूत्रबद्ध कृतीयोजना तयार करण्यासाठी आणि प्रगती, ठराव व निर्णय प्रक्रियेस चालना देण्यासाठी उच्च स्तरीय कार्यकारी अधिका-यांचा समावेश असलेली शिखर संस्था.

• प्रकल्पाच्या सर्वसामान्य अंमलबजावणीसाठी एक विभागीय मध्यवर्ती गट, जो शिखर संस्था आणि वापरकर्त्यांमधे मध्यस्थ म्हणून काम करेल.

• RBI आणि एजन्सी बँका, महालेखाकार (लेखे), महालेखाकार (लेखापरीक्षा) असे हितसंबंधी समाविष्ट असलेल्या बाह्यवापरकर्त्यांचा एक गट जो आवश्यकतेनुसार माहिती उपलब्ध करून देईल.

• अंतर्गत वापरकर्त्यांचा गट ज्यामध्ये अशा अंतीम टप्प्यातील वापरकर्ते असतील ज्यांच्या दैनंदिन कामावर या प्रकल्पाच्या अंमलबजावणीने परिणाम होणार आहे आणि जो आवश्यकतेनुसार व उपयोगकर्ता स्वीकृती चाचणीस सहाय्य करण्यासाठी माहिती पुरवेल.

लेखापरीक्षेला असे आढळून आले की, आवश्यकतेनुसार आणि उपयोगकर्ता स्वीकृती चाचणीसाठी माहिती पुरविण्यासाठी बाह्य तसेच अंतर्गत वापरकर्ते गट तयार केले नव्हते. अशाप्रकारे, FD कडे आवश्यक प्रकल्प व्यवस्थापन संरचना उपलब्ध नव्हती ज्यामुळे वापरकर्त्याच्या गरजा पूर्ण न होण्याचा धोका निर्माण झाला होता.

हे निदर्शनास आणून दिल्यानंतर (ऑगस्ट २०१४), सह संचालक (संगणक आणि राज्य अभिलेखे अभिकरण), (DAT) यांनी सांगितले की, महाराष्ट्र शासनाने MMP निधीच्या मंजुरीसाठी उच्चाधिकार समिती (HPC) आणि प्रकल्प अंमलबजावणी समिती गठीत केल्या होत्या आणि उच्चधिकार समितीने जानेवारी २०१२ मधे सर्व प्रणालींसाठी निधी मंजूर केला होता.

विभागाने, संस्थात्मक रचना, जसे शिखर संस्था, विभागीय मध्यवर्ती गट, बाह्यवापरकर्ते गट, अंतवापरकर्ते गट स्थापित करण्याबाबत कोणतेही भाष्य केले नाही. वापरकर्त्यांचा पर्याप्त सहभाग नसल्यामुळे, प्रणालीत त्रूटी आढळून आल्या, ज्या अहवालाच्या पुढील परिच्छेदात वर्णिल्या आहेत.

अंतीम बैठकीत, सचिव वित्त विभाग यांनी लेखापरीक्षा अभिक्षणे मान्य केली.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात वित्त विभागाने पुरविलेल्या लेखी स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात असे नमूद करण्यात आले की, महाराष्ट्र राज्य शासनाकरवी या करीता उच्चाधिकार समिती तथा प्रकल्प कार्यान्वयन समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. ट्रेझरीनेटसह ग्रास प्रणाली ही संपूर्ण प्रकल्पाचा एक भाग असून कोषागार कार्यपद्धतीसाठी मुलभूतस्वरुपाच्या प्रणाली आहेत. ग्रास करीता विशेष कार्यान्वयन समिती गठीत करण्यात आलेली नाही. विभागीय निष्कर्ष समिती (Core Team) उभारण्यात आली ज्यांनी विकसनाचे कार्य एनआयसी करवी करवून घेतले आहे. सद्यस्थितीत ग्रासमधील मुलभूत कार्यप्रणाली पुर्णपणे विकसीत करण्यात आलेली असून व्हर्च्युअल ट्रेझरी कार्यालयाची निर्मिती करण्यात आलेली असल्यामुळे (सदर कार्यालय गरजेनुसारविकसनाचे कार्य करवून घेण्याचे दायीत्वही पार पाडते) विभागीय निष्कर्ष समितीचा (Core Team) विलय करण्यात आला आहे. तथापि कालानुरूप संचालनालय वेळो वेळी आवश्यक उपाय योजना करीत आहे. त्याचप्रमाणे एनआयसीतर्फेही तज्ञाचे सहाय्य लाभत आहे.

महालेखापालांचे अभिप्राय :-

अंतर्गत व बाह्य वापरकर्त्यांबाबत उत्तरांत उल्लेख नाही.

अनुपालन :–

शासकीय जमा लेखांकन प्रणाली - ग्रास प्रकल्पाचे नियोजन आराखड्यानुसार काम पुर्ण झालेले आहे. ग्रास प्रणालीचे संपुर्णतः विकसन झालेले आहे. वापरकर्त्या करदाता व विभागाच्या आवश्यकतेनुसार ग्रास प्रणालीत पुढील सुधारणा करण्यात येत आहेत. वित्त विभाग जमा अर्थसंकल्पाचे संचालनालय, लेखा व कोषागारे यांचेमार्फत पुर्णतः नियंत्रण करित आहे. ग्रास प्रणाली आजमितीस जवळपास ३७ विभागांच्या गरजा भागवत आहे. वित्त विभाग संचालनालय, लेखा व कोषागारे अंतर्गत जमा अर्थसंकल्पाचे नियंत्रण करित आहे. जून २०१४ पासून महालेखापाल, मुंबई यांचेकडे स्वतंत्ररित्या मासिक लेखे सादर केले जात आहेत. आरबीआयकडील व्यवस्थाही पुर्णत्वास गेलेल्या असून दैनिक ई-स्क्रोल ई-कुबेर संकेतस्थळावर अपलोड केल्या जातात. सहभागी बँकांतर्फे ई-स्क्रोलचे अपलोडींग एकाच वेळेस ग्रास तथा ई-कुबेरमध्ये केले जाते.

७.९.२ इ-जमांसाठी ठेवलेल्या रोकड वही देखभालीच्या कार्यपध्दतीचे अनुसरण न करणे

ऑक्टोबर २०११ मध्ये समाविष्ट केलेल्या MTR च्या नियम १०८ अनुसार, इलेक्ट्रॉनिक माध्यमांतून कोषागारात प्रदाने करण्याची तरतूद आहे आणि अशा इलेक्ट्रॉनिक प्रदानांचे लेखे हे आभासी कोषागारात ठेवले जातात. GRAS च्या इ-जमांच्या लेखा आणि ताळमेळच्या पध्दती बाबत महाराष्ट्र शासनाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार (डिसेंबर २०११) GRAS मधून संबंधीत कार्यलयाने इ-जमा डाऊनलोड कराव्या आणि त्याची नोंद रोकड वहीत घ्यावी आणि नियंत्रक अधिका-याला लेख्यांचे मासिक विवरण पाठवावे. नऊ कार्यालयांच्या अभिलेख्यांच्या तपासणीत असे आढळून आले की, संबंधीत IGR आणि उत्पादन शुल्क यांच्या अनुक्रमे चार व तीन कार्यालयामधे इ-जमांसाठी रोकड वही ठेवली गेली नव्हती. दोन RTO कार्यालयांत असे आढळून आले की, RTO प्रणालीत GRAS वरील डेटा हा नियमीतपणे डाऊनलोड केला होता आणि संबंधीत सेवा त्यांच्या प्रणालीतून आदात्याला पुरविली गेली होती. या दोन RTO च्या लेख्यांसंबंधीत भाष्यावर चर्चा परिच्छेद ७.१०.३ मधे केली आहे.

पुढे असेही आढळून आले की, इ-जमा ताळमेळासाठी प्रत्येक कार्यालय/विभाग यांच्या संपूर्ण वर्गीकरण तपशीलासह दैनंदिन रोकड लेखे यासारखे संबंधीत कार्यालयासाठी आवश्यक असलेले अहवाल उपलब्ध होण्यासाठी GRAS मध्ये वैशिष्ठपूर्ण आराखडे तयार करण्यात आले नव्हते.

अशाप्रकारे, विभागांनी म्हणूनच आभासी कोषागारासाठी विहीत केलेली सुधारीत पध्दत न अनुसरता हस्तलिखित पध्दतीने लेखांकन करण्याची पध्दती पुढे चालू ठेवली.

हे संबंधित कार्यालयांच्या लक्षात आणून दिल्यानंतर कार्यालयांनी लेखापरीक्षा अभिक्षण मान्य केले आणि इ-जमांसाठी अशा पध्दतीची कुठलिही रोकड वही ठेवली जात नसल्याचे सांगितले. तसेच, GSO मुंबईने GRAS पध्दतीमुळे इ-जमांकरीता स्वतंत्र

रोकड वही ठेवण्याची आवश्यकता असते हे माहित नसल्याचे सांगितले. VTO ने पुढे असेही नमूद केले की, GRAS संकल्पनेची माहिती नसल्यामुळे कदाचित असे घडले असावे, तसेच वापरकर्त्या विभागाला याबाबत प्रशिक्षण दिले जाईल.

वापरकर्त्या विभागात GRAS संबंधीत विहीत केलेल्या कार्यपध्दतीची अंमलबजावणी झाल्यावर, VTO/FD कडून त्याचे संनियंत्रण झाले नाही ही वस्तुस्थिती कायम राहाते. इ-जमांसाठी रोकड वही न ठेवण्याच्या त्रूटींमुळे, इ-जमांच्या संनियंत्रणावर आणि आदात्याला दिल्या जाणा-या सेवांवरील नियंत्रणात कमतरता येऊ शकते. अंतिम बैठकीत, FD यांनी लेखा परीक्षा अभिक्षणे मान्य केली आणि सांगितले की आवश्यक ती कारवाई केली जाईल.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात वित्त विभागाने पुरविलेल्या लेखी स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात असे नमूद करण्यात आले की,

ग्रास मार्फत रोख वही अद्यवतीकरण तथा ई-जमेचा ताळमेळ याबाबत महाराष्ट्र शासनाकडून सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत शासन निर्णय वित्त विभाग परिपत्रक क्र. संकीर्ण/१००९ॅप्र. क्र. ३२/कोषा प्र. ५, दि. १६-१२-२०११ अनुसार जमेचा ताळमेळ व रोख नोंद घेणेबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. विभागाच्या लॉगईनमध्ये दैनिक / मासिक कॅश बुक उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

(i) रोख लेखा - मुख्य लेखाशिर्ष निहाय विवरण.

(ii) जोड विवरण - योजना सांकेतांक निहाय ई जमा.

(iii) दैनिक रोख वही - चलन निहाय ई-जमा.

(iv) दैनिक गोषवारा - दिनांक निहाय ई-जमा गोषवारा.

(v) ताळमेळ नमुना - व्यवहार निहाय ई-चलनांचे मासिक विवरण जे संबंधीत जमा अधिका-यांस उपलब्ध आहे तथा महालेखाकार, मुंबई यांचे पुस्तकात नोंदविले जांतात.

प्रत्येक चलनाचे चलन निहाय विवरण उपलब्ध व्हावे अशी सुविधा शासकीय कार्यालयास पुरविण्यात आली आहे. त्यामुळे अशा कार्यालयांस महालेखापाल कार्यालयासोबत ताळमळाचे काम सोपे झाले आहे.

महालेखापालांचे अभिप्राय :-

सद्य सूचनानंतरही रोख वही ठेवण्यात येत नाही याबाबत उत्तरात उल्लेख नाही.

अनुपालन :-

सचिव वित्त विभाग यांनी अंतीम बैठकीच्या चर्चेची दखल घेतली असून, ग्रास प्रणालीत खालील विकसन करण्यात आले आहे.

जे विभाग ग्रासमध्ये सहभागी झालेले आहेत ते त्याचा महसूल ईलेक्ट्रॉनिक चलनाने जमा करत आहेत. म्हणजेच केवळ शासकीय जमेचे माध्यम हे पारंपारीक मनुष्यवळाऐवजी ईलेक्ट्रॉनिक असे परिवर्तीत झाले आहे. शासनाने या संबंधाने रोख वही जतनाविषयी कोण्यत्याही नियमात परिवर्तन/ सुधारणा केलेली नाही. ही बाब नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, परिवहन तथा राज्य उत्पादन शुल्क या विभागांस विहीत पत्र क्र. व्ह. ट्रे.ःन. क्र. १२२अ/२०१६/७२. दि. ०१.०६.२०१६ व ०९.०६.२०१६ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. संबंधीत पत्रांची प्रत सोबत संलग्न करण्यात आली आहे.(संबंधीत पत्रांची प्रत सोबत संलग्न करण्यात आली आहे.) (विवरण पत्र १) संबंधीत वापरकर्त्या विभागाने प्रणालीचे योग्य जतन तथा नियंत्रण करणे आवश्यक आहे. संबंधीत आहरण व संवितरण अधिकारी रोख वही अद्ययावत राखणेबाबत उत्तरदायी आहेत. या संबंधी रोख वही अद्ययावत ठेवणे व ग्रासमधील ई-जमेचा ताळमेळ घेण्याच्या सूचना वित्त विभागाकडून शासनस्तरावर परिपत्रक क्र. संकिर्ण/ १००९८/प्र.क्र./कोषा.प्र.५ दि. १६.१२.११ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. लेखा विषयक ई-जमेचे अहवाल जमाकर्त्या अधिका-यांस त्यांच्या लॉगईनमध्ये यापूर्वीच उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. शिवाय ई-जमा वा ई-जमेचा ताळमेळ संबंधी ई-जमेच्या रोखवहीचे जतनासंदर्भात सर्व शासन परिपत्रक तथा आदेश ग्रास प्रणालीवर उपलब्ध आहेत.

७.९.३ इ-जमांचा ताळमेळ न घालणे

महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिकेतील, नियम १५७ परिशिष्ट ३ च्या परिच्छेद ३ नुसार, नियंत्रण अधिका-याने प्रधान महालेखाकार (लेखे व अनुज्ञेयता) [(प्रमले/ (ले.व.अ)] बरोबर ताळमेळ घालायचा असतो. तसेच, महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकानुसार (डिसेंबर २०११), इ-जमांसाठीसुध्दा ताळमेळाची कार्यपध्दती अनुसरणे आवश्यक होते. वर्ष २०१०-११ ते २०१३-१४ पर्यंत इ-जमेच्या पध्दतीव्दारे प्रदानांत लक्षणीय वाढ झाली आहे. लेखापरीक्षेसाठी निवडण्यात आलेल्या नऊ कार्यालयांच्या दस्तऐवज तपासणीत असे आढळून आले की, जरी इ-जमांच्याव्दारे करण्यात येणा-या प्रदानांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली होती तरी, प्रमले (ले व अ) च्या मासिक लेख्यांबरोबर इ-जमांव्यतिरिक्त इतर जमा रक्कमांचाच ताळमेळ घातलेला होता. पुढे असेही आढळून आले की, ताळमेळ घालण्यासाठी आवश्यक असलेले वर्गीकरणाचे तपशीलासह अहवाल वापरकर्त्या विभागाकडे उपलब्ध नव्हते.

ही बाब लक्षात आणून दिल्यानंतर, संबंधीत कार्यालयांनी लेखापरीक्षा अभिक्षण मान्य केले आणि असे नमूद केले की, प्रमले (ले व अ) च्या लेख्यांबरोबर इ-जमांचा ताळमेळ घेतला गेला नव्हता. VTO ने असेही नमूद केले की, वापरकर्त्या विभागाला आवश्यक असलेले MIS अहवाल उपलब्ध करून दिले जातील.

इ-जमांच्या रक्कमांमध्ये २०१०-११ पासून लक्षणीयरित्या वाढ होऊनसुध्दा ताळमेळ न घातल्यामुळे, नव्याने प्रस्तावित केलेल्या इ-जमांबाबत पुन्हा पुन्हा उदभवणा-या अडचणी ओळखणे, शोधणे आणि सोडविणे यात अपयश येण्याचा धोका होऊ शकतो, परिणामी, भविष्यात या अडचणी पुन्हा येऊ शकतात.

अंतिम बैठकीत, सचिव, FD यांनी लेखापरीक्षा अभिक्षणे मान्य केली आणि सांगितले की, सर्व विभागांना इ - जमांची पडताळणी करण्याबाबत निर्देश दिले जातील.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात वित्त विभागाने पुरविलेल्या लेखी स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात असे नमूद करण्यात आले की,

ग्रासमध्ये सहभागी विभाग त्यांची महसूली जमा ईलेक्ट्रॉनिकली जमा करतात. म्हणजेच केवळ जमा करण्याचा प्रकार मन्युष्य बळाऐवजी ई-जमा असा बदलला आहे.

शासनाने महालेखापाल कार्यालयासोबतच्या ताळमेळ घेण्याच्या नियमांत कोणताही बदल/सुधारणा केलेली नाही. ग्रास ताळमेळा संबंधी महाराष्ट्र शासनाने सूचना परिपत्रक क्र. संकिर्ण/१००९/प्र. क्र. ३२/ कोषा. प्र. ५, दि. १६.१२.२०११. निर्गमित केले आहे. संबंधीत जमा अधिका-यांस त्यांचे विभागाशी संबंधीत व्यवहार जे महालेखापाल, मुंबई यांचे लेख्यात नोंदविले जातात मासिक विवरणात उपलब्ध होण्या करीता ग्रास मध्ये आवश्यक सुधारणा करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

महालेखापालांचे अभिप्राय :-

स्पष्टीकरण ज्ञापनात याबाबत पुढील प्रगती अंतर्भूत असावी.

अनुपालन :-

सचिव वित्त विभाग यांनी अंतीम बैठकीच्या चर्चेची दखल घेतली असून, ग्रास प्रणालीत खालील विकसन करण्यात आले आहे. मासिक लेख्यांची माहिती महालेखापाल, मुंबई यांना सादर केल्यानंतर नवीन विकसीत करण्यात आलेल्या नमुन्यान्वये विभागनिहाय, मुख्य लेखाशिर्ष निहाय ई-जमा माहिती / आकडे व्हर्च्युअल ट्रेझरीद्वारे गोठविण्यात येतात. ग्रास मधील एकूण जमेचा नमुनाही सुधारीत करण्यात आला आहे. सदर नमुन्याद्वारे नियंत्रण अधिका-यांस विभागनिहाय, जिल्हानिहाय, योजनासांकेतांकनिहाय ई-जमा विवरणपत्र (आरबीआयकडे सत्यापित) उपलब्ध आहेत. नियंत्रण अधिकारी त्यांचे कडील जमेची महालेखापाल, मुंबई यांचे सोबत ताळमेळ घेऊ शकतात. नमुन्यादाखल एका महिन्याच्या एकूण जमेचे विवरणपत्र सोबत जोडण्यात आले आहे. महालेखापाल, मुंबई यांस त्यांचे पोर्टलमध्ये ई-जमेची आकडेवारी (ग्रासमधील) उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर सुविधेद्वारे नियंत्रण अधिकारी देखिल महालेखापाल, मुंबई यांचे पुस्तकात समाविष्ट मुख्य लेखाशिर्षनिहाय आकडेवारी तपासू शकतात.

उदा. :-आयुक्त राज्य उत्पादन शुल्क यांचे कार्यालय अशाप्रकारे ग्रास प्रणालीतील आकडेवारी व महालेखापाल यांचाकडील आकडेवारीचा ताळमेळ घेत आहे.

या संबंधीचे प्रमाणपत्र सोबत जोडण्यात आले आहे. (विवरण पत्र क्र २)

७.९.४ दस्तऐवजीकरण

IT प्रणालीच्या सिस्टीम रिक्वायरमेंट स्पेसीफिकेशन (SRS) सिस्टीम डिझाइन डॉक्यूमेंट (SDD) आणि एन्टीटी रिलेशन डायग्राम (ERD), डेटा डिक्शनरी (DD) इत्यादींचे दस्तऐवजीकरण करणे हे नियमीत कामकाजासाठी आणि भविष्यातील देखभालीसाठी आवश्यक आहे.

SRS आणि डेटा डिक्शनरी (माहिती कोष) संबंधीत दस्तऐवजीकरण लेखापरीक्षेला सादर करण्यात आले होते आणि आम्हाला असे आढळून आले की,

- डेटा फिल्डचा उगम समजण्यासाठी आवश्यक असलेल्या फिल्डचे वर्णन माहिती कोषात नमूद केलेले नव्हते.
- सिस्टीम डिझाइन डॉक्युमेंट (SDD) आणि एन्टीटी रिलेशन डायग्राम (ERD), जे कार्य ओघाची माहिती देतात आणि विविध तक्यांमधे भरलेल्या माहितीचा संबंध दर्शवितात, ते उपलब्ध नव्हते.
- व्यवस्थापन प्रक्रियेतील बदलांचे दस्तऐवज उपलब्ध नव्हते.

अपर्याप्त तांत्रिक दस्तऐवजीकरणाच्या परिणाम फक्त बाह्य स्त्रोतांकडून प्राप्त केलेल्या कर्मचा-यांवर अति विश्वासार्हता आणि अंवलंबित्वच इतकाच असणार नाही तर भविष्यात उपयोजन प्रणालीची देखभाल, सुधारणा आणि त्यातील माहितीचा वापर इतर अभिकरणांकडून करण्याचा धोका संभवतो.

अंतिम बैठकीत सचिव FD यांनी प्रणालितील दस्तऐवजीकरणातील उणीवा मान्य केल्या आणि सह संचालक (सुधारणा) यांनी सांगितले की, भविष्यात दस्तऐवजीकरण हे विनिर्दिष्ट प्रारुपात ठेवले जाईल.

प्रणालितील दस्तऐवजीकरण अपर्याप्त होते आणि ते दुरुस्त करण्याची आवश्यकता आहे ही वस्तुस्थिती कायम राहते.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात वित्त विभागाने पुरविलेल्या लेखी स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात असे नमूद करण्यात आले की,

१. सिस्टीम रिक्वायर्ड स्पेसिफीकेशन (SRS)

२. डेटा डिक्शनरी

३. साईट टु साईट इंटीग्रेशन गॅदरिंग डॉक्युमेंट

४. आरएफपी फॉर ई-एसबीटीआर

५. डॉक्युमेंट ऑफ व्हेरि फीकेशन ॲन्ड डिफेसमेंट ऑफ चलान

सद्यस्थितीत सिस्टीम डिझाईन डॉक्युमेंट तथा एनटीटी रिलेशन डायग्राम उपलब्ध नाहीत. एनआयसी टीमला याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

व्यवस्थापन सुधारणे करीता पद्धती म्हणून यापूर्वी आमचे कडून ई-मेल मार्फत एनआयसी अधिका-यांसोबत पत्रव्यवहार होतोय. तथापि या बाबत कोणतेही दस्त राखण्यात आलेले नाहीत.

तथापि आता व्यवस्थापन सुधारणा पद्धती करीता एनआयसी अधिका-यांसोबत एक विशिष्ट नमुना पद्धतीत म्हणजेच सुधारणा विनंती अर्जाच्या स्वरुपात कळविण्यात येते.

महालेखापालांचे अभिप्राय :-

स्पष्टीकरण ज्ञापनात याबाबत पुढील प्रगती अंतर्भूत असावी.

अनुपालन :-

प्रणाली रचनेचा SDD तथा प्रणाली संबंधांचा आकृतीबंध-ERD राष्ट्रीय सुचनत्त केंद्र, पुणे यांनी तयार केलेला आहे. सदर दस्तांची प्रत सोबत जोडण्यात आली आहे. (विवरण पत्र क्र. ३)

७.१० उपयोजित नियंत्रणे

प्रत्येक संगणकातील उपयोजितांसाठी विशिष्ट उपयोजित नियंत्रणे असतात. उपयोजितांमध्ये इनपूट, आऊटपूट आणि प्रोसेसिंग नियंत्रकांचा समावेश असतो आणि नियम आखण्यासाठी, योग्य वैधतेसाठी, परिपूर्णतेसाठी, अचूकतेसाठी आणि व्यवहारांच्या वैधतेची खात्री करण्यासाठी ह्या उपयोजितांची मदत होते.

इनपुट नियंत्रके

प्रणालीत प्रविष्ट केलेली माहिती (डेटा) ही पूर्ण आणि अचूक असल्याची खात्री इनपुट नियंत्रके करतात. संगणकीय वैधता तपासणी सक्तीची करून प्रणालीतील प्रविष्ट केलेल्या माहितीच्या अचूकतेवर नियंत्रण ठेवता येते. लेखापरीक्षेत इनपुट नियंत्रकांमधील आढळून आलेल्या कमतरता खाली चर्चिल्या आहेत.

७.१०.१ अनिवार्य पॅन माहिती प्राप्त न करणे.

महाराष्ट्र कोषागार नियमातील, नियम ११२ नुसार, जर एखादी व्यक्ति शासकीय खात्यात, कोषागार अथवा बँकेव्दारे पैसे भरत असेल तर त्याने प्रपत्र MTR ६ सादर करावे. ऑक्टोबर २००८ मध्ये, महाराष्ट्र शासनाने जमेसाठी वापरण्यात येणारे चलान प्रपत्र (MTR प्रपत्र ६) सुधारित करून हस्तलिखित अथवा इ-प्रदानासाठीही वापरता येईल असे प्रपत्र तयार केले आणि या प्रपत्रात जो वापरकर्ता इ-चलनाद्वारे १०,०००/-. च्या वरील रक्कम भरणार असेल त्याचा PAN क्रमांक नमूद करणे अनिवार्य केले. GRAS प्रणालीत विभागाचे नाव, प्रदानाचा प्रकार, कार्यालयाचे नाव, स्थान, प्राप्तकर्त्यांचे नाव, पॅन क्रमांक, लेखाशीर्षाचा तपशील इत्यादी इ-चलानांत पॅन भरावयाचे असते. GRAS माहितीची तपासणी केली असता असे आढळून आले की, मोठयाप्रमाणात इ-चलनांवर पॅन क्रमांकाची नोंद झाली नव्हती.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात वित्त विभागाने पुरविलेल्या लेखी स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात असे नमूद करण्यात आले की, शासनाच्या मंजूरी नंतर सदर नियम ग्रास प्रणाली मध्ये लागू करण्यात येईल.

महालेखापालांचे अभिप्राय :-

स्पष्टीकरण ज्ञापनात याबाबत पुढील प्रगती अंतर्भूत असावी.

अनुपालन :-

यापुर्वी नोंदणीकृत वापर कर्त्यांस पॅनबाबत माहिती पुरविणे अनिवार्य होते तथा अनोंदणीकृत वापर कर्त्यांस पर्यायी होते. तथापि डिसेंबर २०१३ मध्ये वापरकर्त्यांकडून प्राप्त प्रतिसादांवरुन दोनही वापरकर्त्यास सदर माहिती देणे अनिवार्य नाही.

प्रथमतः पॅन क्रमांकाची माहिती न देण्या करीता रु. १,०००० पर्यंत किमान मर्यादा होती. तथापि अशा अनिवार्य तरतूदीमुळे वापर कर्त्यास अडचणींचा सामना करावा लागला. ज्यामुळे ग्रासच्या उपयोगिता तथा प्रचारावर मर्यादा येऊ लागल्या त्यामुळे शासनाकरवी सदर नियम शिथिल करण्यात आला. तथापि सद्यास्थितीत आरबीआयच्या नियमानुसार रु. ५,०००० तथा वरील व्यवहारांकरीता पॅन क्रमांक अनिवार्य करण्यात आला आहे व हाच नियम शासन निर्णयानंतर प्रणाली करीता लागू होईल.

वित्त विभाग अधिसूचना क्र. संकिर्ण १००८/प्र.क्र. ८/कोषा.प्रशा. ५ दि. १३.०१.२०१६ अन्वये पॅन संबंधी माहिती देणे हा विकल्प दोनही वापरकर्त्यांस म्हणजेच रजिस्टर्ड तथा गेस्ट युजरर्स दोहोंसाठी पर्यायी ठेवण्यात आलेला आहे. संबंधीत शासन निर्णयाची प्रत सोबत संलग्न करण्यात आली आहे. प्रणालीत समाविष्ट करण्यात येणा-या माहितीच्या अचूकतेकरीता प्रणालीत परिक्षण किंवा कसोटया लावण्यात आल्या आहेत.

ग्रासमध्ये सहभागी प्रत्येक बँक प्रत्येक कार्यालयीन दिवशी ग्रासमध्ये ई-स्क्रोल अपलोड करते व सदर स्क्रोलची रक्कम रिझर्व्ह बँकेत भरणा करते. तसेच रिझर्व्ह बँक देखिल व्हर्च्युअल ट्रेझरीस ई-स्क्रोल देते ज्यात बँकनिहाय भरणा करण्यात आलेल्या रकमेची आकडेवारी असते.

बँक ई-स्क्रोलमध्ये चलन निहाय माहिती, चलनाचा क्रमांक, चलनांची संख्या तथा चलनांची एकूण रक्कम या माहितीचा समावेश असतो. बँक तथा रिझर्व्ह बँकेंच्या स्क्रोल प्रक्रीयेच्या वेळेस प्रणालीत उपलब्ध माहिती तथा बँकेने स्क्रोलमध्ये उपलब्ध करुन दिलेली माहिती यांची पडताळणी होते. जर चलानसंबंधी माहिती किंवा बँक तथा आर. बी. आय. स्क्रोलची आकडेवारी यात काही विसंगती आढळल्यास प्रणाली तसा त्रुटी अहवाल देते.

(विवरण पत्र क्र. ४)

अंतिम बैठकीत, सह संचालक (सुधारणा) यांनी असे सांगितले की, उर्वरीत माहिती GRAS मध्ये अपलोड करण्यासाठी PAO ला आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात वित्त विभागाने पुरविलेल्या लेखी स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात असे नमूद करण्यात आले की,

ई-चलनांचा नोंदणीकृत लेखा ग्रास प्रणालीत एप्रिल २०१२ पासून ते मे २०१४ या कालावधीपर्यंत अपलोड करण्यात आला आहे. एकूण २५ महिन्यांपैकी एप्रिल २०१२ ते मे २०१४ पर्यंत जवळपास सर्व माहिती अपलोड करण्यात आली आहे. तांत्रिक अडचणींमुळे केवळ काही महिन्यांची माहिती अपलोड करण्यात आलेली नाही. सदर अडचण एनआयसी तांत्रिक टीमला कळविण्यात आलेली असून त्यांचे करवी सदर अडचणीचे लवकरात लवकर निराकरण करण्यात येईल.

महालेखापालांचे अभिप्राय :-

७.१०.२ अधिदान व लेखा कार्यालयामध्ये लेखांकीत झालेली माहिती अपलोड न होणे

आभासी कोषागाराला स्वतंत्र कोषागार सांकेतांक मिळण्यास विलंब झाल्यामुळे मे २०१४ पर्यंत VTO अधिदान व लेखा कार्यालय (PAO) मुंबईच्या नियंत्रणाखाली होते. GRAS मधील दैनंदिन व्यवहार हे PAO च्या प्रणालीत डाऊनलोड केले जात आणि त्यानुसार मासिक लेखे तयार केले जात. महाराष्ट्र शासनाच्या जुलै २०१३ च्या परिपत्रकानुसार, वापरकर्त्या विभागांना ई-जमा पडताळणीसाठी शक्य व्हावे यासाठी PAO लेख्यात लेखांकित केलेली सर्व GRAS चलान प्रणालीत प्रत्यक्षरितीने अपलोड करणे गरजेचे होते.

PAO मध्ये लेखांकीत केलेल्या ज्या इ-जमा GRAS प्रणालीत अपलोड केल्या होत्या त्याचे विश्लेषण करतांना असे आढळून आले की, २०१२-१३ या कालावधीतील PAO प्रणालीत लेखांकित केलेल्या अशा ई-जमा GRAS च्या वेबसाईटवर अंशतः अपलोड केल्या होत्या. यावरून असे दिसून येते की, PAO कडे लेखांकीत केलेल्या ई-जमा या वापरकर्त्या विभागाला उपलब्ध होऊ शकत नव्हत्या. लेखांकीत केलेल्या GRAS चलान्सचे अंशतः अपलोडींग होणे/अपलोडींग न होणे यामुळे वापरकर्त्या विभागाला शासनाने लेखांकीत केलेल्या इ-जमांची पडताळणी करणे शक्य व्हावे हा उद्देश सफल झाला नव्हता. हे निदर्शनास आणून दिल्यानंतर (मे २०१४) VTO ने नमूद केले की, PAO प्रणालीतील माहितीच्या रचनेशी GRAS च्या माहितीची रचना मिळती जुळती नसल्यामुळे PAO ने लेखांकीत केलेली माहिती अंशतः अपलोड केली गेली. अंतिम बैठकीत सह संचालक (सुधारणा) यांनी असे सांगितले की, उर्वरित माहिती GRAS मध्ये अपलोड करण्यासाठी PAO ला आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत.

ज्ञापन :

स्पष्टीकरण ज्ञापनात याबाबत पुढील प्रगती अंतर्भूत असावी.

अनुपालन :-

ई-जमेच्या संबंधी अधिदान व लेखा कार्यालयाची सर्व माहिती जी यापुर्वी ग्रास प्रणालीत समाविष्ट करण्यात आलेली नव्हती ती आजमितीस समाविष्ट करण्यात आली आहे.

माहे २०१४ पासून व्हर्च्युअल ट्रेझरी स्वतंत्ररित्या मासिक लेखे महालेखापाल, मुंबई यांस सादर करते. (विवरण पत्र क्र. ५)

७.१०.३ ई-जमांचे रोकड पुस्तिकेत लेखांकन

महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकानुसार (डिसेंबर २०११) संबंधीत कार्यालयाने GRAS मधून इ-जमा डाऊनलोड कराव्या आणि त्याच दिवशी रोकड पुस्तिकेत जमेच्या बाजूला त्याची नोंद घ्यावी आणि आभासी कोषागारात तेवढीच रक्कम खर्चाच्या बाजूला दाखवावी.

प्रत्येक RTO कार्यालयात वाहन नोंदणीसाठी Vahan प्रणाली वापरण्यात येते आणि संबंधित RTO कार्यालयाकडून GRAS मधून इ-जमा नियमीतपणे डाऊनलोड केल्या जातात. Vahan प्रणालीत जेव्हा सेवा पुरविल्या जातात त्यावेळी अशा इ-जमांना नियमीतपणे डाऊनलोड या वर्गाखाली वर्गीकृत केले जाते आणि जेथे सेवा पुरविल्या जात नाहीत तेव्हा या इ-जमांना न वापरलेली चलाने म्हणून वर्गीकृत केले जाते. RTO मुंबई (पश्चिम) आणि RTO पुणे येथे अनुसरण्यात येणा-या कार्यपध्दतीची छाननी केली असता असे आढळून आले की, ज्या दिवशी प्रत्यक्षात ऑनलाईन प्रणालीव्दारे इ-जमा होते त्या तारखेपेक्षा नंतरच्या तारखेला म्हणजे ज्या दिवशी ग्राहकाला सेवा पुरविली जाते त्या तारखेला त्या जमांची नोंद रोकड पुस्तिकेत घेतली जाते. खालील प्रकरणांवरून असे दिसून येते की, GRAS आणि VAHAN या दोन वेगवेगळ्या प्रणालीचे अयोग्य एकत्रीकरण केल्यामुळे इ-जमांच्या लेखांकनात विलंब झाला होता.

(i) **इ-जमांचे रोकड पुस्तिकेत लेखांकन न करणे**

ऑक्टोबर २०१० ते मार्च २०१४ या दरम्यान विविध कालावधीतील GRAS माहितीचे विश्लेषण करता असे आढळून आले की, RTO, मुंबई (प) आणि पुणे यांचे अनुक्रमे १३४.६ लाख आणि २.१८ लाख एवढया जमेचे रोकड पुस्तिकेत लेखांकन केले नव्हते आणि ते "वापर न झालेले चलान" म्हणून दाखविले होते. हे वित्तीय विभागाच्या डिसेंबर २०११ च्या परिपत्रकाशी विसंगत आहे.

(ii) **इ-जमांचे लेखांकन पुढील वित्तिय वर्षात करणे.**

GRAS चा डेटाबेस आणि RTO अंधेरीच्या रोकड पुस्तिकेसंबंधीत इ-जमांची तपासणी केली असता असे आढळून आले की, इ-जमा ज्या वित्तीय वर्षाच्या होत्या त्यांचे त्याच वित्तीय वर्षात लेखांकन न करता पुढील वित्तीय वर्षात लेखांकन केले होते.

(iii) **विभागीय प्रणालीत इ-जमा उपलब्ध नसणे.**

RTO, मुंबई ९*(पश्चिम) यांनी सादर केलेल्या दस्तऐवजांच्या तपासणीत असे आढळून आले की, मे २०११ आणि जून २०१२ दरम्यानच्या कालावधीत ११.१२ लाख रक्कमेच्या चार इ-जमा रोकड पुस्तिका तसेच VAHAN प्रणालीच्या 'वापर आणि विनावापर यादीत' उपलब्ध नव्हत्या. जे वित्त विभागाच्या डिसेंबर २०११ च्या परिपत्रकाशी विसंगत आहे.

RTO मुंबई (पश्चिम) यांनी आपल्या उत्तरात सांगितले की, जेव्हा विक्रेता पैसे दिलेल्या तारखेपासून सात दिवसांच्या आत वाहनाची नोंदणी करतो तेव्हा Vahan प्रणालीत GRAS जमा डाऊनलोड केल्या जातात. सात दिवसांच्यावर प्रलंबित नोंदणीच्या प्रकरणात GRAS जमा डाऊनलोड करीत नसल्यामुळे वापर तथा विनावापर यादीत त्या प्रतिबिंबित होत नाही. यावरून असे लक्षात येते की, रोकड पुस्तिका ठेवण्यासाठी विहीत कार्यपध्दती अवलंबिली जात नाही त्यामुळे ताळमेळ घालते वेळी विभागाच्या रक्कमा महाराष्ट्र शासनाच्या लेख्यांशी जुळणार नाहीत.

अंतिम बैठकीत सचिव, FD यांनी लेखापरीक्षा अभिक्षणे मान्य केली आणि सांगितले की, ही बाब संबधीत विभागांकडे पाठविली जाईल.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात वित्त विभागाने पुरविलेल्या लेखी स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात असे नमूद करण्यात आले की,

महालेखापाल, मुंबई यांचे पुस्तकात व्हर्च्युअल ट्रेझरी, मुंबई यांच्या मासिक लेख्याचे यशस्वीपणे समायोजन झाल्यावर संबंधीत विभागांना सदर विवरणे उपलब्ध होत आहेत. माहे जून २०१४ पासूनची माहिती विभागांना उपलब्ध आहे.

आरबीआयकडून मान्य झालेले दैनिक/मासिक व्यवहारांचे विवरण विभागांच्या पावती जमा अधिका-यांस त्यांच्या लॉग ईनमध्ये ई-कॅश बुक (ई-रोख वही) पर्यायात उपलब्ध आहे. विभागांच्या लॉग ईन मध्ये उपलब्ध असलेले फॉर्म्स खालील प्रमाणे आहेत.

i) रोख लेखा-मुख्य लेखाशिर्ष निहाय विवरण.

ii) बाह्य परिशिष्ट - योजना सांकेतांक निहाय ई-जमा.

iii) दैनिक रोख वही - चलन निहाय ई-जमा.

iv) दैनिक गोषवारा - दिनांक निहाय ई-जमा गोषवारा

v) ताळमेळ नमुना - व्यवहार निहाय ई-चलनांचे मासिक विवरण जे संबंधीत जमा अधिका-यांस उपलब्ध आहे तथा महालेखापाल, मुंबई यांचे पुस्तकात नोंदविले जातात.

महालेखापालांचे अभिप्राय :-

स्पष्टीकरण ज्ञापनात याबाबत पुढील प्रगती अंतर्भूत असावी.

अनुपालन :-

सचिव वित्त विभाग यांनी अंतीम बैठकीच्या चर्चेची दखल घेतली असून, ग्रास प्रणालीत खालील विकसन करण्यात आले आहे.

ग्रास प्रणालीतील सर्व कार्यालयांना ई-जमेसंबंधी लेखा अहवाल यापुर्वीच त्यांच्या लॉगईनमध्ये उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

उदाहरणादाखल खालील अहवाल सोबत जोडण्यात आले आहेत.

१. रोख लेखा

२. बाहय परिशिष्ट

३. दैनिक रोख वही

४. एकूण जमा

(विवरण पत्र क्र. ६)

७.१०.४ इ-जमांचे चुकीचे वर्गीकरण

लेखांकन वर्गीकरणाचे संकेतांक हे संबंधीत विभागाशी अनुसरून योजावे जेणेकरून ही माहिती GRAS प्रणालीव्दारे रक्कमांचा भरणा करतांना वापरकर्त्यांना उपलब्ध होईल.

(i) साकेतांक वर्गीकरण मास्टर डेटात उपलब्ध नसणे.

कार्यालयाशी संबंधीत सर्व प्रदानांचे लेखांकन वर्गीकरण सांकेतांक GRAS प्रणालीत उपलब्ध असावेत. वर्गीकरण सांकेतांक जोडणीसंबंधी असलेल्या मास्टर टेबलची तपासणी केली असता असे आढळून आले की निवृती वेतन अंशदानाचा सांकेतांक उत्पादन शुल्क विभागाशी जोडला गेला नव्हता त्यामुळे निवृत्ती वेतन अंशदानाच्या प्रदानासाठी तो उपलब्ध नव्हता. अधिक्षक, उत्पादन शुल्क, कोल्हापूर यांचेकडील माहितीची तपासणी केली असता असे आढळून आले की, इ जमांच्या १३२ प्रकरणांत ४३.०३ लाख निवृत्ती वेतन अंशदानाच्या रक्कमेचे उत्पादन शुल्क जमेमध्ये चुकीचे वर्गीकरण झाले होते.

(ii) वर्गीकरण सांकेतांक कार्यालयांशी योग्य रितीने जोडलेले नसणे.

सामान्य मुद्रांक कार्यालय (GSO) आणि नोंदणी महानिरीक्षकांना (IGR) महसुली जमेवर संनियंत्रण ठेवण्यासाठी एक

स्वतंत्र लेखा वर्गीकरण सांकेतांक विहीत केला आहे. लेखापरीक्षेला असे आढळून आले की, GSO आणि IGR शी संबंधीत लेखावर्गीकरण सांकेतांक हे GRAS मधील संबंधीत कार्यालयांशी जोडले नव्हते. परिणामी, संबंधीत कार्यालयांच्या वर्गीकरण सांकेतांकांव्यतिरिक्त इतर सांकेतांकही ड्रॉप डाऊन बॉक्सच्या सूचीत दाखविले गेले होते ज्यामुळे ?-???? भरताना चुकीच्या वर्गीकरण सांकेतांकाची निवड केली जात होती.

परिणामी, GSO शी संबंधीत विविध लेखा शिर्षांखाली वर्ष २०१२-१३ दरम्यान ९.७० कोटी आणि वर्ष २०१३-१४ दरम्यान २५.२५ कोटीचे चुकीचे वर्गीकरण होऊन रक्कम कमी दर्शविण्यात आली होती तर IGR शी संबंधीत विविध लेखाशिर्षाखाली ही रक्कम अधिक दाखविली गेली. तसेच, IGR शी संबंधीत विविध लेखाशीर्षांखाली वर्ष २०१२-१३ दरम्यान ४.७८ कोटी आणि वर्ष २०१३-१४ दरम्यान ७.२८ कोटी कमी दर्शविले गेले आणि GSO च्या विविध लेखाशीर्षांखाली रक्कम अधिक दाखविली गेली होती.

(iii) चुकीचे वर्गीकरण.

अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापूर यांचेकडील माहितीची तपासणी केली असता असे आढळून आले की, वर्ष २०११-१२ दरम्यान २७५.९२ लाखाच्या १९ प्रकरणांत आणि वर्ष २०१२-१३ दरम्यान ४८.२१ लाखाच्या दोन प्रकरणांत अनुक्रमे आयातशुल्क व अनुज्ञप्ती शुल्काच्या रक्कमेचे IMFL वरील उत्पादन शुल्क याखाली चुकीचे वर्गीकरण झाले होते.

विभागाने, लेखा वर्गीकरणाशी परिचित नसलेल्या बाह्य-वारकर्त्याकडून होऊ शकणा-या चुकीच्या वर्गीकरणाची शक्यता टाळण्यासाठी प्रणालीतील कच्च्या दुव्यांवर तोडगा काढण्याची आवश्यकता आहे.

GSO मुंबईने असे नमूद केले की, चुकीचे वर्गीकरण दुरूस्त करण्याची आवश्यकता आहे आणि VTO ने याबाबत असे सांगितले की, GRAS मधे चुकीचे वर्गीकरण दुरूस्त करण्यासाठी सुविधा उपलब्ध नाही.

अंतिम बैठकीत सचिव FD यांनी लेखापरीक्षा अभिक्षणे मान्य केली आणि असे सांगितले की, चुकीच्या वर्गीकरणाची दुरूस्ती करण्यासाठी आवश्यक असणारे मोडयुल्स प्रणालीत तयार केले जातील.

इ-जमांच्या ताळमेळाच्या अपर्याप्त प्रक्रीयेमुळे प्रणालीत चुकीचे वर्गीकरण झाले आहे. चुकीचे वर्गीकरणाचे प्रमाण कमीत कमी होण्यासाठी प्रणालीव्दारे ताळमेळ घालण्याची पध्दत विकसीत करणे गरजेचे आहे.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात वित्त विभागाने पुरविलेल्या लेखी स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात असे नमूद करण्यात आले आहे की,

चुकीचे वर्गीकरण झालेल्या योजना सांकेतांकांत महालेखापाल यांना सादर होणा-या मासिक लेख्यांपुर्वी सुधार करण्या-करीता योजना सांकेतांकात सुधारणा करण्यासाठीचा पर्याय विकसीत करणे विचाराधीन आहे.

सुधारणा पर्यायाचे विकसन झाल्यावर सुधार करणे शक्य आहे. तथापि, नियमानुसार यापुर्वीच्या चुकीचे वर्गीकरण झालेल्या नोंदीमध्ये सुधार करणे शक्य नाही कारण आर्थिक वर्ष बदलले असून या कालावधीच्या लेख्यांचा महालेखापाल यांनी त्यांचे पुस्तकांत समावेश करुन लेखे अंतिम केलेले आहेत.

महालेखापालांचे अभिप्राय :

स्पष्टीकरण ज्ञापनात याबाबत पुढील प्रगती अंतर्भूत असावी.

अनुपालन :

करदात्यांस त्याचप्रमाणे कार्यालयीन वापरकर्त्यांसही प्रणाली नवीन असल्यामुळे चुकीचे वर्गीकरण होते. नमुद आर्थिक वर्षा करिता लेख्यांचा ताळेबंद करण्यात आला आहे. त्यामुळे महालेखापालांकडील दुरुस्ती शक्य नाही. ही बाब राज्य उत्पादन शुल्क तथा प्रधान मुद्रांक कार्यालय, मुंबई यांस विहीत पत्रांन्वये अनुक्रमे दि. १०.०६.२०१६ व ०९.०६.२०१६ रोजी कळविण्यात आले आहे. पत्रांची प्रत सोबत संलग्न करण्यात आली आहे.

चुकीच्या योजना सांकेतांकांत दुरुस्ती करण्याकरीता नवीन नमुन्याचे विकसन करुन अवलंबन करण्यात आले आहे. विभागांच्या लॉगईनमध्ये सदर नमुना उपलब्ध केला असून चुकीच्या वर्गीकरण झालेल्या सांकेतांकाची दुरूस्ती करणे शक्य झाले आहे.

उदा. :- चलनाची प्रत या सोबत जोडण्यात आली आहे. ज्यात प्रणालीद्वारे चुकीच्या वर्गीकरण झालेल्या योजना सांकेतांकाची

दुरूस्ती करण्यात आली आहे. चुकीचा योजना सांकेतांक योग्य योजना सांकेतांकाने बदलून चुकीचा योजना सांकेतांक चलनाच्या खालील बाजूस नमूद झाला आहे. वापरकर्त्या विभागांना जमेच्या ताळमेळासाठी आवश्यक अहवाल त्यांच्या लॉगईनमध्ये यापुर्वीच उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. विभागांच्या महालेखापाल कार्यालया- सोबतच्या ई-जमेच्या ताळमेळासाठी महालेखापालांकडून व्हर्च्युअल ट्रेझरीद्वारेच्या जमांसाठी स्वतंत्र नमुना उपलब्ध करुन देण्यात आला आहे. (विवरण पत्र क्र. ७)

अंतिम बैठकीत, सचिव FD यांनी, लेखापरीक्षा अभिक्षणे मान्य केली आणि असे सांगितले की, आवश्यक कार्यपध्दतीचे काटेकोरपणे पालन केले जाईल.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात वित्त विभागाने पुरविलेल्या लेखी स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात असे नमूद करण्यात आले की,

चलन विरुपण ही संबंधीत विभाग अथवा जमा अधिकारी ज्यांचे करवी सेवा पुरविण्यात येणे त्यांचे उत्तरदायित्व आहे. शासन निर्णय क्र. संकिर्ण/१००८/प्र.क्र.८/कोषा.प्र.५, दि. ३१-१०-२००८ अन्वये जर विभागाद्वारे ?

७.१०.५ आदात्याला सेवा पुरविल्यानंतर GRAS मधील इ-पावत्याचे विरूपीकरण

विरूपीकरण ही अशी प्रक्रीया आहे ज्यामध्ये GRAS मधील इ-पावत्या, ज्यासाठी विभागाने सेवा पुरविल्या आहेत, त्यांच्या पडताळणीनंतर या इ-पावत्यांवर 'विरुपीत' असे चिन्हांकित केले जाते. विरूपीत केल्यानंतर त्यावर 'विरुपीत' असे जलचिन्ह दिसू लागते.

वित्त विभागाच्या डिसेंबर २०११ च्या परिपत्रकानुसार, आदात्याला सेवा दिल्यानंतर GRAS मधील इ-पावत्यांना विरूपीत करणे संबंधीत विभागावर बंधनकारक आहे. इ-पावत्या विरूपीत करण्याची जबाबदारी विभागप्रमुखाची आहे.

चलान विरूपीत न केल्यामुळे, अवैध इ-पावत्यावर सेवा प्राप्त करणे, इ-पावत्याद्वारे दिलेल्या सेवांवर कमकुवत नियंत्रण राहणे तसेच शासकीय महसुलाची हानी होणे याचा धोका निर्माण होऊ शकतो.

GRAS माहिती संचाची तपासणी केली असता असे आढळून आले की, विभागाने एकुण १४,५०३.९५ कोटी रक्कमेच्या इ-पावत्याचे विरूपीकरण केले नव्हते. यावरून असे दिसून येते की, सेवा पुरविल्यावर इ-पावत्याचे विरूपीकरण आणि पडताळणी करण्याची विहित असलेली कार्यपध्दती अनुसरली नव्हती ज्यामुळे इ-पावत्यांचा गैरवापर होण्याची शक्यता होती. सेवा पुरविल्यानंतर विभागाने, आदात्याकडून सादर केलेल्या इ-पावत्यांची पडताळणी करावी आणि त्यांच्या वैधतेची खात्री पटल्यावर त्यांना विरूपीत करावे.

महाराष्ट्र शासन, वित्त विभागाने परिपत्रक क्र. संकिर्ण/१००९/प्र.क्र.३२/कोषा.प्र.५, दि. १६-१२-११ द्वारे ज्या चलनांवर सेवा पुरविण्यात आलेली आहे अशा चलनांचे विरुपिकरण करण्याबाबत सूचना निर्गमित केल्या आहेत.

सूचनांचे पालन होत असेल तर व्हर्च्युअल ट्रेझरीद्वारे सर्व विभागांना आवश्यक सूचना निर्गमित करण्यात येतील. तथापि संचालनालय, लेखा व कोषागारे यांचे स्तरावरून अशा गोष्टींचे नियमन करणे अत्यंत कठीण बाब आहे.

महालेखापालांचे अभिप्राय :-

स्पष्टीकरण ज्ञापनात याबाबत पुढील प्रगती अंतर्भूत असावी.

अनुपालन :

अंतिम बैठकीनंतर मा. सचिव महोदयांनी पुनरावलोकन करुन संबंधीत उच्च अधिका-यांस एक अहवाल उपलब्ध करुन देण्यास निर्देशीत केले. ज्यायोगे ते विरुपण प्रक्रीयेची देखरेख करु शकतात. त्या अनुषंगाने सध्या नियंत्रण अधिकारी (विभाग प्रमुख) त्याचप्रमाणे प्रादेशिक व कार्यालय प्रमुख देखिल दैनंदीन चलन विरुपणाची परिस्थिती पाहू शकतात. (विवरण पत्र क्र. ८)

ज्ञापन :

७.१०.६ उत्पादन शुल्क प्रदानाच्या बटवडा आदेशांच्या बनावट इ-पावत्या आढळून आल्या

उरण येथील एका एजन्सीमध्ये, बटवडा आदेशांवर प्रदान केलेल्या मुद्रांक शुल्कांशी संबंधित इ-पावत्यांच्या दस्तऐवजांच्या चाचणी तपासणीत असे आढळून आले की, जानेवारी २०१४ पूर्वीच्या दोन प्रकरणांमध्ये, GRAS माहितीसंचामध्ये दोन इ-पावत्यांचे GRN क्रमांक नोंदले नसल्याने सकृत दर्शनी त्या बनावट होत्या. आयात मालाच्या बटवडा आदेशांच्या आधारावर प्रदान केलेल्या मुद्रांक शुल्काचा पुरावा म्हणून या इ-पावत्या वापरल्या गेल्या होत्या. हे निदर्शनास आणून दिल्यानंतर (जुलै २०१४) VTO ने सांगितले की, अशा प्रकारच्या इ-पावत्या GRAS प्रणालीत उपलब्ध नव्हत्या. नोंदणी उपमहानिरीक्षक, ठाणे यांनी असे नमूद केले की, याबाबत पडताळणी करून त्यानुसार कारवाई करण्यात येईल. पुढे असेही नमूद केले की, जानेवारी २०१४ ला सगळ्या CFSs नां बटवडा आदेशांवर सेवा पुरविण्याच्या वेळी इ पावत्यांची पडताळणी करून विरूपीत करण्याचे आवश्यक ते निर्देश देण्यात आले आहेत.

अंतिम बैठकीत, सचिव, FD यांनी सांगितले की शासनाने हा मुद्दा गंभीरपणे घेतला आहे.

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात संदर्भात वित्त विभागाने पुरविलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात असे नमूद करण्यात आले आहे की,

शासनाने सदर बाब गांभिर्याने घेतलेली असून तातडीचे उपाय योजन्यात आलेले आहेत ज्यायोगे संबंधीत अधिका-यांना विरुपणाकरीता युजर आयडी व पासवर्ड निर्गमित करण्यात आलेले आहेत.

महालेखापालांचे अभिप्राय.

स्पष्टीकरण ज्ञापनात याबाबत पुढील प्रगती अंतर्भूत असावी.

अनुपालन :

सचिव, वित्त विभाग यांनी अंतीम बैठकीच्या चर्चेची दखल घेतली असून, ग्रास प्रणालीत खालील विकसन करण्यात आले आहे.

शासनाने सदर घटना गांभिर्याने घेतली असून बनावट पावत्यांबाबत नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाद्वारे तात्काळ कारवाई करण्यात आली. नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाद्वारे संबंधीत कस्टम हाऊस एजंट विरोधात एफआयआर क्र. ७, दिनांक ०६.०१.२०१४ अन्वये उरण पोलिस ठाणे, ता. उरण, जि. रायगड यांचेकडे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाद्वारे सबंधीत अधिका-यांस ग्रास युजर आयडी व पासवर्ड केवळ पडताळणी व विरुपणाकरिता देण्याची विनंती करण्यात आली होती. नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाद्वारे करण्यात आलेल्या विनंतीनुसार व शासनाच्या मंजुरीने संबंधीत कंटेनर फ्रेट सर्विस एजन्सीजना ग्रास युजर आयडी व पासवर्ड वितरीत करण्यात आले आहेत. उपनोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, कोकण विभाग, ठाणे यांनी दि. २७/०१/२०१४ च्या पत्रान्वये सर्व संबंधीत कन्टेनर फ्रेट स्टेशन्स (CFS) व (CHA) यांना सूचना निर्गमित केलेल्या आहेत. (विवरण पत्र क्र. ९)

७.१०.७ परतावा प्रक्रिया अनुसरली गेली नाही.

महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने दि. १६ डिसेंबर २०११ रोजी जारी केलेल्या परिपत्रकामध्ये कोषागारासाठी इ-जमांच्या परताव्याची प्रक्रिया विहित केली आहे. त्यानुसार, विभागाव्दारे प्रक्रिया करण्यात आलेल्या परतावा आवेदनाच्या स्वीकृतीसाठी, कोषागार अधिका-याने मूळ चलानाची सत्यता पडताळण्यासाठी लॉग इन आयडी आणि पासवर्डचा वापर करून GRAS मध्ये त्यांच्या स्तरावर परताव्याची आवश्यक ती नोंद घेऊन रक्कमेचे प्रदान करावे.

नोंदणी सहसंचालक, ठाणे शहर कार्यालयातील मार्च २०१३ मधील इ-जमांच्या इ-परताव्यासंबंधीच्या दस्तऐवजांची आणि GRAS मधील माहितीची तपासणी केली असता, एकूण ४१.७२ लाखांचा परतावा अंतर्भूत असलेल्या चाचणी तपासणी केलेल्या २९ प्रकरणांत कोषागार कार्यालयाने GRAS मध्ये आवश्यक नोंद न घेता परताव्याचे प्रदान केले होते. यावरून कोषागार अधिकारी, ठाणे यांनी विहीत कार्यपद्धतीचा अवलंब केला नसल्याचे आढळून आले. अशाप्रकारे परताव्याची नोंद घेण्याची पद्धती न अनुसरल्यामुळे कोषागाराने परतावे दिले आहेत अथवा नाही हे न कळण्याचा धोका उदभवू शकतो.

अंतिम बैठकीत, सहसंचालक (सुधारणा) यांनी सांगीतले की, आवश्यक कार्यवाहीस सुरुवात केली गेली आहे.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात वित्त विभागाने पुरविलेल्या लेखी स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात असे नमूद करण्यात आले की,

ई-जमेच्या परताव्याकरीता विभागाने ग्रासद्वारेच परतावा मागणी सादर करावी. ग्रासद्वारे परतावा मागणी शिवाय ई-चलनाचे विवरण ट्रेझरीनेट लॉगईन मध्ये परावर्तीत होणार नाही. जर विभागांनी दिनांक १६.१२.२०११ च्या शासन निर्णयाद्वारे निर्गमित सूचनांचे पालन केले नाही तर व्हर्च्युअल ट्रेझरीद्वारे सर्व विभागांकरीता परतावा प्रक्रियेच्या नवीन सूचना निर्गमित करण्यात येतील.

ठाणे कोषागाराने ई-चलनांवरील सर्व २९ परतावा नोंदी घेतलेल्या आहेत. सद्यस्थितीत ठाणे कोषागार शासनाने निर्गमित केलेल्या सूचनांचे पालन करीत आहे.

महालेखापालांचे अभिप्राय :

स्पष्टीकरण ज्ञापनात याबाबत पुढील प्रगती अंतर्भूत असावी.

अनुपालन :

ई-चलनाच्या परताव्या करिता संबंधीत विभागाने ग्रासद्वारे रिफंड क्लेम सादर करणे आवश्यक आहे. रिफंड क्लेम विना ई-चलनाचे विवरण कोषागाराच्या लॉगईनमध्ये उपलब्ध होणार नाही. त्यामुळे एकदा कोषागार अधिका-यांनी परताव्याची नोंद चलनावर घेतल्यास पुन्हा त्याच चलनाचे पुनर्सादरीकरण होऊ शकत नाही. सध्या सर्व कोषागार विहीत पद्धतीचे पालन करित आहेत. ठाणे कोषागार कार्यालयाने सर्व २९ परतावा नोंदी संबंधीत ई-चलनांवर घेतल्या आहेत. उदाहरणा दाखल परताव्याचे चलन या सोबत संलग्न करण्यात आले आहे. (विवरण पत्र क्र. १०)

अंतिम बैठकीत, सचिव, FD यांनी लेखापरीक्षा अभिक्षणे मान्य केली आणि IT सुरक्षा धोरण प्रस्थापित केले जाईल असे सांगितले.

७.११ सुचना प्रणाली सुरक्षा

७.११.१ IT सुरक्षा धोरण

संघटनेने निर्माण केलेल्या आणि जतन केलेल्या माहितीच्या सुरक्षेसाठी परिणामकारक IT सुरक्षा धोरण असणे महत्वाचे आहे.

IT साठी निश्चित सुरक्षा धोरण आखून त्याव्दारे व्यवसायासंबंधी महत्वाची माहिती आणि त्यावरील कार्यप्रक्रियांचे हानी, नुकसान आणि दुरूपयोग यापासून समर्थपणे संरक्षण करण्याची क्षमता संघटना दर्शविते. तसेच संघटनांमध्ये, व्यावसायिक भागीदारांमधे आणि बाह्य अभिकरणसंस्था त्याचप्रमाणे संघटनेंतर्गत विश्वास वृद्धिंगत करते.

असे आढळून आले की, महाराष्ट्र शासनाकडे मान्यताप्राप्त असे सुरक्षा धोरण नव्हते आणि वित्त विभागाने GRAS साठी कुठलीही सुरक्षा मार्गदर्शक तत्वे जारी केली नव्हती. अंतिम बैठकीत, सचिव FD यांनी लेखापरीक्षा अभिक्षणे मान्य केली आणि IT सुरक्षा धोरण प्रस्थापित केले जाईल असे सांगितले.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात वित्त विभागाने पुरविलेल्या लेखी स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात असे नमूद केले आहे की,

ग्रासद्वारे योग्य सुरक्षा उपाय योजण्यात आलेले आहेत. अलीकडेच सुरक्षा परिक्षण पुर्ण करण्यात आले आहे. प्रमाणपत्राची प्रत यासोबत शीघ्र संदर्भाकरीता सलग्न करण्यात आली आहे.

महालेखापालांचे अभिप्राय :-

उत्तरात ग्रास बाबत सुरक्षा धोरण व सुरक्षाविषयक मार्गदर्शक तत्वांचा उल्लेख नाही.

अनुपालन :

प्रणाली विकसनाचे वेळेस राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र-NIC यांनी जी.आय.जी.डब्ल्यू.-GIGW (भारत शासन शासकीय संकेतस्थळ मार्गदर्शकतत्त्वे) यांच्या मार्गदर्शक तत्वाचे अनुसरण केलेले आहे.

संचालनालय, माहिती व तंत्रज्ञान यांनी बंधनकारक केल्याप्रमाणे ग्रास प्रणालीचे वेळोवेळी सुरक्षा परिक्षण भारत शासनाच्या पॅनलवर असलेल्या सेवापुरवठादार एस.टी.क्यु.सी.-STQC व मे. सायबर-क्यु Cyber-Q यांचेद्वारे करण्यात आलेले आहे. ग्रास प्रणालीस ईव्ही-एस.एस.एल. EV-SSL प्रमाणपत्र देखिल वितरीत करण्यात आलेले आहे.

डब्ल्यू ३ सी W3C वेब प्रमाणके तथा सुरक्षितता मार्गदर्शकतत्वे यांचे अनुपालन करण्यात आलेले आहे. ग्रासच्या होम पेजवर W3C लोगो असलेले प्रिंट माहितीस्तव सोबत जोडले आहे.

सचिव, माहिती व तंत्रज्ञान, सा.प्र.वि. यांनी माहिती तंत्रज्ञानाच्या सुरक्षितता तथा स्थापना विषयक सूचना दिनांक ३०.०९.२०१३ च्या अर्धशासकीय पत्रान्वये दिल्या आहेत. पत्राची प्रत सोबत सलग्न करण्यात आली आहे. (विवरण पत्र क्र.११)

७.११.२ बाह्य स्त्रोतांकडून माहिती स्थापत्य सेवा

मुंबई येथील टाटा टेलिकम्युनिकेशन लिमिटेड च्या डेटा सेंटरमधे वित्त विभागाच्या इतर प्रणालींबरोबर GRAS स्थापित करण्यात आली आहे. TCL बरोबर झालेल्या करारानुसार, प्रणालीच्या सुरक्षेबाबत खालील अटी विहीत करण्यात आल्या होत्या.

TCL ने ना-प्रकटन करार स्वाक्षांकीत करावा.

महाराष्ट्र शासनाने विकसीत केलेल्या माहिती सुरक्षा धोरणाचे TCL कडून पालन केले जावे.

ना-प्रकटन करार लेखापरीक्षेसाठी उपलब्ध होऊ शकला नाही. महाराष्ट्र शासनाने माहिती सुरक्षा धोरण विकसीत केले नसल्यामुळे करारात नमूद केलेल्या अटीचे पालन करण्याची TCL वर सक्ती करणे शक्य झाले नाही. अंतिम बैठकीत सचिव, FD यांनी आवश्यक ते करार करण्याचे मान्य केले.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात वित्त विभागाने पुरविलेल्या लेखी स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात असे नमूद करण्यात आले की,

ग्रासचा सर्व्हर प्रभादेवी, मुंबई येथे टीसीएलच्या डेटा सेंटरमध्ये स्थित आहे. टीसीएलचे आपत्ती पुनर्प्राप्ती केंद्र हैद्राबाद येथे स्थित आहे. माहितीचा संग्रह नियमित तत्वावर सॅन स्टोरेज आणि संग्रह फीतीद्वारे घेण्यात येतो. त्याच प्रमाणे संग्रहाची प्रत प्रत्येक आठवड्यास राज्य माहिती केंद्राच्या सर्व्हरवर प्रतिकृती करुन जतन केली जाते. याशिवाय आपत्ती पुनर्प्राप्ती चाचणीचा त्रैमासिक सराव आयोजीत करण्यात येतो. यासर्व मुद्यांचा टीसीएल सोबत करण्यात आलेल्या करारात समावेश आहे. ग्रास करीता निराळी व्यवसाय सातत्य योजना अथवा आपत्ती पुनर्प्राप्ती योजना नाही.

महालेखापालांचे अभिप्राय :

उत्तरात कराराबाबत गोपनियता तथा महाराष्ट्र शासनाच्या माहिती सुरक्षा धोरणांबाबत उल्लेख नाही. सदरच्या गोष्टींचा स्पष्टीकरण ज्ञापनात समावेश असावा.

अनुपालन :

कराराची गुप्तता ही करारातीलच अंतर्भुत बाब असून महाराष्ट्र शासनाच्या ई-शासन E-Governance धोरणांतर्गत, माहिती सुरक्षिततेच्या धोरणाचाही त्यात अंतर्भाव आहे (विवरण पत्र क्र. १२).

७.११.३ जेनेरिक युजर्स

GRAS प्रणालीतील माहितीचा वापर विविध वर्गांकडून जसे की, वापरकर्ते विभाग, VTO आणि नागरिकांकडून करण्यात येतो. संगणकीय प्रणालीत, माहितीचा वापर अधिकृत वैयक्तिक वापरकर्त्यांपर्यंतच सिमीत करणे गरजेचे होते. तथापि असे लक्षात आले की, वैयक्तिक वापरकर्त्याऐवजी, युजर ID हे वापरकर्त्या कार्यालयाच्या सांकेतिक नावांना दिले होते आणि ते वेगवेगळ्या व्यक्तिंकडून वापरले जात होते. अशाप्रकारे, प्रणालीत व्यवहार करण्यास प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तींची नोंद प्रणालीत घेतलेली नाही. पुढे असेही लक्षात आले की, IGR, उत्पादन शुल्क आणि RTOs शी संबंधीत ३६९ वापरकर्त्यांपैकी ३०० वापरकर्त्यांनी त्यांना सुरूवातीला जारी केलेला पासवर्ड बदलला देखील नव्हता आणि ४३ वापरकर्त्यांनी त्यांचा पासवर्ड १०० दिवसांपेक्षा जास्त दिवस उलटूनही बदलला नव्हता.

यावरून प्रणालीतील माहितीच्या वापरावर कमकुवत नियंत्रण असल्याचे दिसून येते आणि त्यामुळे तिचा गैरवापर होण्याचा धोका होता. तसेच माहिती सुरक्षेच्या धोक्यांबद्दल वापरकर्ते सजग नव्हते.

GRAS प्रणालीच्या वापराविषयीच्या व्यवस्थापनामध्ये सुधारणा करून ती बळकट करण्याची आवश्यकता आहे आणि माहिती अधिक सुरक्षित ठेवण्यासाठी पासवर्ड देण्याविषयीचे धोरण आखण्याची आवश्यकता आहे.

अंतिम बैठकीत सचिव, FD यांनी सांगितले की पासवर्ड धोरण आखून त्याची अंमलबजावणी केली जाईल.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात वित्त विभागाने पुरविलेल्या लेखी स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात असे नमूद करण्यात आले की,

विविध विभागांस त्यांचे आवश्यकतेनुसार युजर आयडी व पासवर्ड निर्गमित केलेले आहेत. सद्यस्थितीत युजर आयडी व पासवर्डबाबत गोपनियता बाळगणे हे त्या त्या विभागांचे उत्तरदायित्व आहे.

पासवर्ड धोरण निश्चित करण्यात आलेले आहे - ९० दिवसांनंतर वापरकर्त्यांस त्याचा पासवर्ड बदलावाच लागेल. त्याकरीता आवश्यक बदल करण्यात आलेले आहेत व चाचण्याच्या यशस्वीतेनंतर त्या प्रणालीत लागू करण्यात येतील.

महालेखापालांचे अभिप्राय :

स्पष्टीकरण ज्ञापनात पासवर्ड धोरणांच्या अंमलबजावणीबाबत पुढील प्रगतीचा समावेश असावा.

अनुपालन :

युजर आयडी वाटप करतांना वापरकर्ते कार्यालय हा एक घटक मानून करण्यात आलेले आहेत सद्यस्थितीत ग्रासमध्ये या अनुषंगाने १. विभाग प्रमुख, २. प्रादेशिक प्रमुख, ३. जिल्हा कार्यालय प्रमुख, ४. कार्यालय प्रमुख यांचे स्तरावर युजर आयडी देण्यात येतात. त्याचप्रमाणे संबंधीत विभागांच्या मागणीनुसार व्हर्च्युअल ट्रेझरी कार्यालयाकडून अधिक युजर आयडी देण्यात येतात.

त्याचप्रमाणे पासवर्ड धोरण निश्चित करण्यात आले असून ९० दिवसांनतर पासवर्ड वापरकर्त्यांस त्यांचा पासवर्ड बदलणे अनिवार्य करण्यात आलेले आहे अन्यथा त्यांना प्रणालीचा उपयोग करता येणार नाही.

७.११.४ व्यवसाय सातत्य आणि आपत्कालीन पुनःप्राप्ती योजना.

एखादया आपत्तीमुळे संगणकाच्या सुविधा आणि माहितीची तात्पुरती अथवा कायमची हानी झाल्यास अशा परिस्थितीतही संघटनेला उद्दीष्ट् गाठता येईल आणि माहितीचे संस्करण, पुनःप्राप्ती आणि संरक्षण करण्याची संघटनेची क्षमता कमी होणार नाही याची खात्री करण्यासाठी संघटनेकडे आवश्यक नियंत्रकांसह व्यवसाय सातत्य व आपत्कालीन पुनःप्राप्ती योजना असणे आवश्यक आहे.

TCL च्या माहिती केंद्रामध्ये GRAS सर्व्हर्स स्थापित करण्यात आले आहेत. असे सांगितले गेले होते की, आपत्कालीन पुनःप्राप्ती यंत्रणेची चाचणी करण्यासाठी दर तीन महिन्यांनी अभिरूप कार्यक्रम घेण्यात येतो. लेखापरीक्षेला असे आढळून आले की, GRAS करिता व्यवसाय सातत्य व आपत्कालीन पुनःप्राप्ती योजनेसंबंधी कोणतेही निश्चित आराखडे VTO कडे उपलब्ध नव्हते. GRAS मधून होणा-या व्यवहारांची वाढती संख्या लक्षात घेऊन वित्त विभागाने व्यवसाय सातत्य योजनेचा आराखडा तयार करावा.

हे निदर्शनास आणून दिल्यानंतर (जुलै २०१४), VTO ने सांगितले की, माहितीचे बॅक अप नियमीतपणे घेतले जाते.

GRAS प्रणालीतील व्यवसाय सातत्य आणि आपत्कालीन पुनःप्राप्ती योजनेबाबत विभागाने मौन बाळगले आहे.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात वित्त विभागाने पुरविलेल्या लेखी स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात असे नमूद करण्यात आले की, या संदर्भात कृपया मुद्दा क्रमांक १२ पहावा. ग्रास करीता निराळी व्यवसाय सातत्य योजना अथवा आपत्ती पुनर्प्राप्ती योजना नाही. सर्वसाधारण धोरणानुसार त्याचे नियमन केले जाते.

महालेखापालांचे अभिप्राय :

व्यवसाय सातत्य राखण्याबाबत उल्लेख आढळत नाही. सर्वसाधारण धोरण म्हणून ग्रास सर्व्हरचे कामकाज चालू रहाण्याबाबत तसेच आपत्कालीन परिस्थितीत माहिती पुनःप्राप्त करणेबाबतच्या माहितीचा स्पष्टीकरण ज्ञापनात समावेश असावा.

अनुपालन :-

आपात्कालिन कालावधीत सातत्य राखण्यासाठी खालील उपायांची योजना करण्यात आली आहे.

१. साप्ताहीक पातळीवर टेपद्वारे बॅकअप घेतला जातो.

२. हैद्राबादस्थित आपातकालिन पुनर्प्राप्ती केंद्रात त्याची प्रत जतन करण्यात येते.

३. सर्वच व्यवस्था अपयशी ठरल्यास शासन नियमास अनुसरून पुन्हा मनुष्यबळाचा उपयोग करुन चलन बनवण्याचा पर्याय उपयोगात येऊ शकतो.

७.११.५ GRAS मधे सहभागी बँकाव्दारे लेखपट (Scroll) अपलोड करणे

संचालक, लेखे आणि कोषागारे (DAT), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी फेब्रुवारी २००९ मधे असे विहीत केले की GRAS मधील सहभागी बँकांनी दिवसाच्या अखेरीस सर्व जमा कुठल्याही प्रदान पध्दतीद्वारे/RBI ला मान्य असलेल्या कोणत्याही पध्दतीव्दारे RBI कडे वर्ग करावे. सहभागी बँकांनी त्याच वेळी शासनाने वेळोवेळी निर्धारित केलेल्या नमुन्यात इलेक्ट्रॉनिक लेखपट आणि त्याची प्रत्यक्ष प्रत VTO ला पाठवावी.

लेखापरीक्षेला लक्षात आले की, १६ सहभागी बँकांपैकी फक्त दोन बँकां (भारतीय औद्योगिक विकास बँक आणि इंडियन ओवरसीज बँक) डिजीटली स्वाक्षांकित केलेले लेखपट अपलोड करत होत्या आणि कुठल्याही सहभागी बँकेकडून इलेक्ट्रॉनिक लेखपटाची प्रत्यक्ष प्रत VTO ला सादर केली जात नव्हती.

डिजीटली स्वाक्षांकीत केलेले लेखपट सादर न करण्यामुळे बँकेव्दारा पारेषित केलेल्या माहितीचे अनधिकृतपणे रोधन करणे, त्यात बदल करणे, तिची नक्कल करणे आणि अवैध हस्तांतरण होणे याचा धोका संभावतो.

सहभागी बँकांच्या जबाबदार अधिका-याकडून डिजीटली स्वाक्षांकन केले न जाणे व हस्ताक्षरीत प्रत्यक्ष प्रत उपलब्ध नसणे हे लेखांकनाच्या दस्तऐवजांचे जतन करण्यातील कमतरता दर्शविते. अंतिम बैठकीत सचिवांनी, FD प्रणाली जास्त सुरक्षित केली जाईल अशी पाऊले उचलण्याचे आश्वासन दिले.

ज्ञापन :

उपरोक्त अभ्रिप्रायासंदर्भात वित्त विभागाने पुरविलेल्या लेखी स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात असे नमूद केले आहे की, डिजीटल स्वाक्षरी नसल्यास १८ बँकांपैकी केवळ २ बँका डिजीटल स्वाक्षांकीत स्क्रोल ग्रास प्रणालीत अपलोड करतात. व्हर्च्युअल ट्रेझरी कार्यालय नियमितपणे बँकांना डिजीटली स्वाक्षांकीत स्क्रोल अपलोड करण्याबाबत सुचित करण्यात येते. तथापि अडचणीची बाब अशी आहे की, ग्रास प्रणालीत स्क्रोल अपलोडच्या कामी बँकेकडून नेमण्यात आलेल्या व्यक्तीची वारंवार बदली होते व अशा नव्याने नेमलेल्या व्यक्ती करता प्रत्येकवेळेस बँकेस नवीन डिजीटल सिग्नेचर खरेदी करावे लागेल. या परिस्थितीवर मात करण्याकरीता उपाय योजनेसाठी चर्चेचे आयोजन करण्यात आले आहे.

महालेखापालांचे अभिप्राय.

स्पष्टीकरण ज्ञापनात पुढील प्रगतीचा समावेश असावा.

अनुपालन :

सहभागी २० बँकांपैकी २ बँका या डिजीटली साईन्ड स्क्रोल ग्रास मध्ये अपलोड करित आहेत. व्हर्च्युअल ट्रेझरीकडून सर्व सहभागी बँकांस डिजीटली साईन्ड स्क्रोल अपलोड करण्याविषयी वारंवार सांगण्यात येत आहे. तथापि, बँकेत स्क्रोल अपलोडींगचे काम करण्यासाठी नेमण्यात आलेल्या व्यक्तिंची वारंवार बदली होत असते व त्यामुळे बँकांना प्रत्येक वेळेस नव्याने नेमण्यात आलेल्या व्यक्तिंसाठी डि. एस. सी. - DSC खरेदी करवी लागते.

सदर बाबीचा सहभागी बँकांसोबत दिनांक १६ ते १८ फेबुवारी २०१६ दरम्यान पार पडलेल्या त्रैमासिक बैठकीत पाठपुरावा करण्यात आला आहे. व्हर्च्युअल ट्रेझरी कडून याचा पाठपुरावा करण्यात आला आहे (विवरण पत्र क्र. १३).

७.११.६ लेखापरीक्षेचे माग

लेखापरीक्षेचे भाग हे व्यवहारांची पार्श्वभूमी, माहितीतील बदल/दुरुस्त्या, प्रणाली ठप्प होणे, चुकीचे व्यवहार इत्यादी आढावा घेण्यात मदत करतात. प्रणालीमध्ये, एक विशिष्ठ ओळख क्रमांक किंवा व्यवहार सांकेतांक याव्दारे प्रत्येक व्यवहार योग्य उपयोजन आराखडयाकडे संस्करणासाठी पाठविला जाईल अशाप्रकारे जर एखादी लेखापरीक्षा नोंद काढण्यात आली तर क्रमवारीत मोकळी जागा दिसून येईल आणि झालेला बदल शोधता येऊ शकेल.

संगणकीय माहिती संचाच्या तपासणीत खालील त्रुटी आढळून आल्या—

संगणकीय माहिती संचातील तक्त्यामधील प्रविष्टींना/व्यवहारांना विशिष्ठ ओळख क्रमांक किंवा व्यवहार सांकेतांक दिले गेले नव्हते.

DB2 माहिती संचामधे लेखापरीक्षा माग कार्यान्वीत करण्यात आला नव्हता.

या विसंगतींवरून लेखापरीक्षेचे माग तसेच यंत्रणेतील माहितीमध्ये बदल करण्यावर किंवा ती नष्ट करण्यावरील नियंत्रण अपर्याप्त असल्याचे दिसून येते.

व्यवहाराची ओळख पटविण्यासाठी क्रमवार क्रमांकाच्या वापरामुळे लेखापरीक्षेचा माग घेण्याची पद्धती अधिक कार्यक्षम होईल.

हे निदर्शनास आणून दिल्यानंतर (जुलै २०१४) VTO नी मान्य केले की, माहितीसंचामध्ये बॅकएंडला केलेल्या दुरुस्त्या/ बदल नोंदण्यासाठी लेखापरीक्षा लॉगची रचना सक्षम नव्हती.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात वित्त विभागाने पुरविलेल्या लेखी स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात असे नमूद करण्यात आले की, आयटी परिक्षण टीमने शिफारस केल्याप्रमाणे एनआयसी टीमतर्फे महत्वाच्या तक्त्यांचे परिक्षण नोंदी राखण्यास सुरवात करण्यात आली आहे. सखोल परिक्षण नोंदी तयार करण्यात येतील.

महालेखापालांचे अभिप्राय :

स्पष्टीकरण ज्ञापनात याबाबत पुढील प्रगतीचा समावेश असावा.

अनुपालन :

आय. टी. ऑडीट परिक्षण गटाकडून शिफारस करण्यात आल्याप्रमाणे राष्ट्रीय सूचना केंद्र, पुणे (NIC, Pune) यांनी महत्वाच्या तक्त्यांमधील बदलांच्या नोंदीसाठी लेखा परिक्षा माग तयार केलेले आहेत. संबंधीत लेखा परिक्षा मागांचा महत्वाच्या तत्क्यांचे अनुक्रमिक विवरण या सोबत संलग्न करण्यात आले आहे.

(विवरण पत्र क्र. १४)

यावरुन असे निदर्शनास येते की, कोषागार प्रणालीच्या कार्यपध्दतीबाबत आश्वस्त करणारा लेखापरीक्षा हा जरी अविभाज्य भाग असला तरी आभासी कोषागाराच्या आणि GRAS च्या दष्टीकोनातून लेखापरीक्षा सुलभ होईल.

७.१२ अंतर्गत लेखापरीक्षा

प्रत्यक्ष तसेच संगणकीय पद्धतीने केल्या जाणा-या अंतर्गत लेखापरीक्षा प्रणालीव्दारे आवश्यक नियंत्रके योग्य प्रकारे कार्यरत असल्याची सुनिश्चिती केली जाते. महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ च्या नियम ७४ आणि ७५ अन्वये, कोषागारे/ उपकोषागारे/अधिदान आणि लेखा कार्यालयांच्या कामकाजाची, प्रत्यक्ष भेटीव्दारे वार्षिक तपासणी करायची असते. ज्यावेळी रोकड पुस्तिका, रोख शिलका, खातेवहीतील शिलका आणि नोंदवहयांची तपासणी केली जाते.

सिस्टीम रिक्वायरमेंट स्पेसीफीकेशन (SRS) आणि उपयोजन सॉफ्टवेअरची तपासणी केली असता असे आढळून आले की, लेखापरीक्षा/अंतर्गत लेखापरीक्षेच्या आवश्यकता विचारात घेतल्या नव्हत्या आणि लेखापरीक्षा मोडयूल तयार होण्यासाठी आवश्यक असणा-या सुविधा प्रणालीत उपलब्ध होण्याची शक्यता पडताळून त्यांचा प्रणालीत समावेश केला नव्हता.

अंतिम बैठकीत सचिव, FD यांनी आवश्यक ती कारवाई करण्याचे मान्य केले.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात वित्त विभागाने पुरविलेल्या लेखी स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात असे नमूद करण्यात आले की, एनआयसी टीम सोबत चर्चेनंतर आवश्यक सुधारणा करण्यात येतील.

महालेखापालांचे अभिप्राय :

स्पष्टीकरण ज्ञापनात याबाबत पुढील प्रगतीचा समावेश असावा.

अनुपालन :

या संदर्भात राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्रांच्या अधिका-यांसोबत दि. ०७.०६.२०१६ रोजी बैठक घेऊन आवश्यक उपाय योजनांबाबत निर्णय घेण्यात आला.

राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्राद्वारे अंतर्गत परिक्षणाचे मोडयुल निर्माण करुन सहा आठवड्यात त्याचे परिक्षण करण्यात येईल.

अंतिम बैठकीत सचिव, FD यांनी आवश्यक MIS अहवाल प्रणालित सम्मिलित करण्याचे मान्य केले.

७.१३ व्यवस्थापन सूचना प्रणाली

उपयोजन प्रणालीमध्ये व्यवस्थापन सूचना प्रणालीचे वेगवेगळे अहवाल उपलब्ध होण्याची व्यवस्था असावी. जे अहवाल, वापरकर्ता विभाग, लेखापरीक्षक आणि कोषागार यासारख्या वेगवेगळ्या उपभोक्त्यांना त्यांच्या जमा, लेख्याचे वर्गीकरण, ई-जमांची पडताळणी आणि ताळमेळ यावर संनियंत्रण ठेवण्यासाठी साधन ठरू शकतील.

आम्हाला असे आढळून आले की, कुठल्याही कालावधीकरीता योजना सांकेतांकनिहाय जमा, इ-जमांची वापरकर्तेनिहाय सूची, विरूपीत न केलेल्या इ-पावत्यांची सूची, कोषागाराकडून संमत केलेल्या परताव्याची सूची यासारखे महत्वपूर्ण MIS अहवाल उपलब्ध नव्हते. याबाबतची माहिती उपलब्ध नसल्यामुळे वापरकर्ते, चुकीच्या पध्दतीने वर्गीकरण झालेल्या जमा, इ-पावत्यांचे विरूपीकरण आणि ताळमेळ यावर नियंत्रण ठेऊ शकले नाही.

विविध वापरकर्त्या गटांना आवश्यक त्या संनियंत्रणासाठी उपयुक्त असे MIS अहवाल विभागाने निश्चित करावेत.

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात वित्त विभागाने पुरविलेल्या लेखी स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात असे नमूद करण्यात आले की, हा एक आवश्यक सुधारणांचा भाग असून एनआयसी ग्रास टीम सोबत चर्चेनंतर ग्रासमध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यात येतील.

महालेखापालांचे अभिप्राय :

स्पष्टीकरण ज्ञापनात याबाबत पुढील प्रगतीचा समावेश असावा.

अनुपालन :

आवश्यक सुधारणा ग्रास मध्ये करण्यात आल्या आहेत. विभागांना त्यांच्या लॉगईनमध्ये व्यवस्थापकीय सूचना प्रणाली Management Information System (MIS) चे अहवाल उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. सदर व्यवस्थापकीय सूचना प्रणालीच्या खालील अहवालांचे नमुने सोबत अवलोकनार्थ संलग्न करण्यात आलेले आहेत.

१. रोख लेखा - सदर अहवालात मुख्य लेखाशिर्षनिहाय विवरण देण्यात आले आहे.

२. बाहय परिशिष्ट - सदर अहवालात मुख्य लेखाशिर्षनिहाय योजना सांकेतांकनिहाय विवरण देण्यात आले आहे.

३. दैनिक रोखवही - सदर अहवालात रोख वहीतील आरबीआयसोबत दैनंदिन ताळमेळ घेण्यात आलेल्या यशस्वी व्यवहारांचे विवरण देण्यात आले आहे.

४. एकूण जमा - सदर अहवालात वापरकर्त्यांच्या गरजेनुसार एकुण जमेचे विवरण देण्यात आले आहे. जसे बँक निहाय, मुख्य लेखाशिर्षनिहाय, जिल्हानिहाय, प्रदान प्रकारनिहाय इत्यादी.

५. विरुपण अहवाल - सदर अहवालात विरुपीत तथा अ-विरुपीत चलनांचे विवरण देण्यात आले आहे.

६. निर्माण झालेले तथापि स्क्रोलमध्ये समाविष्ट नसलेले सी.आय.एन. (CIN) सदर अहवाल प्रलंबित व्यवहार जे ई-स्क्रोलमध्ये समाविष्ट नाही त्यांचे विवरण देण्यात आलेले आहे.

७. ई-जमेची मागिल आर्थिक वर्षासोबत तुलना.

८. अवेटेड स्क्रोल - सदर अहवालात जी चलन स्क्रोलमध्ये समाविष्ट नाही अशा चलनांचे विवरण देण्यात आलेले आहे.

९. रिव्होक अहवाल - सदर अहवालात रिव्होक चलनांचे विवरण देण्यात आलेले आहे.

१० परतावा अहवाल - सदर अहवालात परतावा चलनांचे विवरण देण्यात आलेले आहे.

११ महालेखापालांकडे सादर केलेले लेखे.

१२ (विभागप्रमुखांच्या लॉगईनमध्ये लेखाशिर्षनिहाय अहवाल उपलब्ध सदर अहवाल हा विभागांच्या महालेखापाल कार्यालयासोबतच्या ताळमेळासाठी आहे.) (विवरण पत्र क्र. १५)

साक्ष : -

४.२ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात दिनांक ४ जुलै २०१६ रोजी प्रधान सचिव वित्त विभाग व इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेण्यात आली साक्षीच्या सुरुवातील शासकिय जमा लेखांकन प्रणाली (ग्रास)चे सादरीकरण करण्यात आले व समितीला या प्रणालीची माहिती देण्यात आली.

ग्रास कार्यप्रणालीचे सादरीकरण करण्यापूर्वी या संदर्भात महालेखाकारांनी जे आक्षेप घेतले होते त्या संदर्भात बहुतांश दुरुस्त्या केल्या आहेत. परंतु जे आक्षेप प्रलंबित आहेत त्या संदर्भात सादरीकरणाच्या दरम्यान चर्चा करु. एनआयसीकडून जो ड्राफ्ट आला आहे त्याला मान्यता देऊन त्याची अंमलबजावणी कधी करणार आहात याबद्दल आपण समितीला माहिती दिल्यास आज साक्ष पूर्ण होऊ शकेल. आपण या संदर्भात सुरुवातीला दुरुस्त्या का केल्या नाहीत. तसेच त्यानंतर महालेखाकारांचे आक्षेप व आपण सुमोटो काही दुरुस्त्या केल्या आहेत का, याबाबत आपण सादरीकरणाच्या वेळी समितीला माहिती द्यावी जेणेकरुन समितीची कन्सेप्ट क्लिअर होईल असे समितीने विभागास सांगितले.

या प्रणालीच्या संदर्भात माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी असे विदित केले की, शासकीय जमेच्या प्रणालीला "शासकीय जमा लेखांकन प्रणाली " (ग्राम) असे नाव दिलेले आहे. या प्रणालीमार्फत जनता आणि शासनासाठी सुविधा उपलब्ध केली आहे. जनतेला उपलब्ध करुन दिलेल्या सुविधेत त्यांना घरबसल्या २४ तासांत कधीही शासनाची देय रक्कम देणे शक्य होते. राज्य उत्पादन शुल्क विभाग, एक्ससाईज विभाग, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक शुल्क विभाग, तसेच मोटार विभाग या प्रणालीचा मोठ्या प्रमाणात वापर करीत आहेत. त्यांनी वापर केलेल्या प्रणालीसंबंधी जमा झालेली आकडेवारी सादरीकरणात दिलेली आहे. सन २०१० ते २०१६ पर्यंत यात प्रगती झाली आहे. सन २०१५-१६ मध्ये ३५ विभागांनी ग्रास कार्यप्रणालीचा उपयोग करुन एकूण ७१,१९९४८ चलनांद्वारे ४६,०८२ कोटी रुपयांचा महसूल भरणा केला आहे.

४६ हजार कोटी रुपये ३५ विभागांकडून महसुलापोटी जमा झाले आहेत. जुन्या सिस्टीमचा वापर करुन महसुलापोटी किती रक्कम जमा झाली या समितीच्या प्रश्नाला मागील वर्षी विक्रीकर विभागाचा त्यांच्या पोर्टलमार्फत ७४ कोटी रुपयांचा महसूल जमा झालेला असल्याची माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिली.

४६ हजार कोटी रुपयांव्यतिरिक्त किती रक्कम जमा झाली आहे यावर माहिती देताना विभागीय सचिवांनी ४६ हजार कोटी रुपयांव्यतिरिक्त अंदाजे १ लक्ष ६५ हजार कोटी रुपयांची रक्कम जमा झाली असल्याचे समितीस अवगत केले.

ग्रास प्रणाली व्यतिरिक्त ३५ विभागांकडून एकूण जमा झालेल्या महसुलाची रक्कम किती आहे ? विभागाने सन २०१५-२०१६ ची मूळ आकडेवारी सांगावी अशी सूचना समितीने केली असता प्रामुख्याने रेव्हन्यु रिसीप्टच्या संदर्भात मुद्दा आहे सन २०१५-१६ मध्ये रिव्हाईज रेव्हन्यु रिसिप्टचे बजेट १ लाख ५८ हजार ६४० कोटी रुपयांचे दर्शविले आहे. त्यापैकी ७४ हजार कोटी रुपये विक्रीकर विभाग आणि ४६ हजार कोटी रुपये ग्रास प्रणालीचे आहे. ही रक्कम वजा केल्यास उर्वरित रक्कम मॅन्युएल सिस्टीमने कोषागारात जमा झाली आहे अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिली.

३५ विभागांपैकी किती विभागांनी अपेक्षित प्रतिसाद दिला नाही अशी विचारणा समितीने केली असता आम्ही सर्व विभागांसाठी या प्रणालीची सुविधा उपलब्ध केलेली आहे. प्रणालीमध्ये विभागाच्या रिसीप्टचे हेड भरावे लागतात. राज्य उत्पादन शुल्क विभागाने सन २०१४-१५ मध्ये या प्रणालीचा वापर करण्याचे ठरविले त्यानुसार त्यांना प्रशिक्षण दिले. यामुळे त्या विभागामार्फत १०० टक्के महसूल ग्रास प्रणालीमार्फत येऊ लागला. त्याचप्रमाणे नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक विभागाकडून १०० टक्के ग्रास प्रणालीचा वापर केला जातो. कामगार विभागात बॉयलर, जनरल आणि इंडस्ट्री असे ३ विभाग आहेत. त्या विभागांपैकी बॉयलर विभागाला ग्रास प्रणाली सोईस्कर वाटते. इंडस्ट्रीज लोक या प्रणालीत मोठ्या प्रमाणावर आले आहेत परंतु लहान करदाते या प्रणालीत अद्याप आलेले नाहीत असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

एकूण आकडेवारीचा विचार केल्यास एकूण रेव्हन्यु रिसीप्टपैकी ३० टक्के ग्रास प्रणालीतून व ५१ टक्के महसूल सेल्स टॅक्सद्वारे जमा होतो. एकूण ८० टक्के कोणत्या तरी माध्यमातून संगणकीय प्रणालीतून येतो आता २० टक्के राहिला असल्याची माहितीही विभागीय सचिवांनी समितीस दिली.

रुपयांमध्ये रकमेचा विचार केल्यास विभागाकडे ८० ते ८१ टक्के रक्कम या सिस्टीममधून येत आहेत. परंतु टॅक्स भरणा-यांच्या संख्येचा विचार केल्यास ती ८० टक्के संख्या नाही. फक्त मोठे टॅक्स पे करणारे लोक या सिस्टीममध्ये समाविष्ट

होत आहेत. परंतु लहान टॅक्स पे करणारे लोक ते या सिस्टीममध्ये समाविष्ट होत नाही. लहान टॅक्स पे करणारे लोक या सिस्टीममध्ये समाविष्ट करण्यासाठी विभागाचे काय नियोजन आहे ? या समितीच्या प्रश्नाला मागील वर्षी विभागाने लहान टॅक्स पे करणा-या लोकांसाठी या प्रणालीसोबत स्टेट बँक ऑफ इंडियाची ई-पेमेंट गेटवे प्रणाली इंटिग्रेटेड केली आहे. ई-पेमेंट गेटवे प्रणालीमध्ये जवळपास ४० बँका आहेत. त्यात नेट बँकेची गरज पडत नाही. कोणीही डेबीट कार्ड , क्रेडिट कार्ड किंवा ई-वॉलेटने पैसे भरु शकतो अशा प्रकारे लहान करदात्यांना या प्रणालीमध्ये आणण्यासाठी विभागाचे प्रयत्न सुरु असल्याची माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

विभागाने ज्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या हा प्रणालीचा भाग आहे. परंतु समितीचे असे म्हणणे आहे की, विभागाने सदर प्रणालीची अंमलबजावणी करण्यासाठी खालच्या स्तरावर प्रयत्न करणे अत्यावश्यक आहे. याकरिता विभागाने धोरण स्वीकारले पाहिजे. कार्पोरेटसारख्या मोठ्या करदात्यांकडे अकांऊट असतात यामुळे ते या गोष्टींना नकार देतात. चलनाद्वारे रक्कम भरणारा मोठा वर्ग आहे. यात लहान करदात्यांचा समावेश असतो. ही सिस्टीम एजंटमार्फत सुरु असते तेथे ऑनलाईन पध्दत नसते. ही सिस्टीम ज्या ठिकाणी आहे तेथे चलनाचा उपयोग मोठ्या प्रमाणात आहे. ग्रास प्रणालीची अंमलबजावणी करण्यासाठी आपण ठोस धोरण आखल्यास एजंट व दलालाची पध्दत कमी होऊ शकते यादृष्टीने विभागाने कोणते प्रयत्न केले आहेत याबाबत समितीने पृच्छा केली असता विभागीय सचिवांनी असे विदित केले की, सर्वसामान्य लोकांकरिता दोन पर्याय असून इंटरनेट तसेच बॅकांमध्ये काऊंटरवर आपल्या लोकांची नेमणूक केली आहे. तेथे त्यांनी रक्कम जमा केल्यास तो ग्रास प्रणालीत येऊ शकतो. आजमितीला प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये कोणत्या न कोणत्या बँकांची शाखा आहे. बँकाचे व्यवहार जेवढा वाढेल तेवढा तो येणे शक्य आहे. आपण ही गोष्ट सर्वांना बांधील करु शकत नाही की, तुम्ही सर्व व्यवहार बँकेमार्फत किंवा ऑनलाईन केले पाहिजेत परंतु ते प्रमाण कमी करु शकतो.

ही गोष्ट सर्वांना बांधील करु शकत नाही असा उल्लेख केला परंतु समिती विभागाच्या भूमिकेशी सहमत नसल्याचे सांगत युझर फ्रेंडली केल्यास ग्रास प्रणालीच्या वापर प्रमाणात वाढ करु शकतो असे मत समितीने व्यक्त केले.तसेच विभागाच्या यंत्रणेने प्रयत्न केल्यास ही सिस्टीम आपोआप चांगली होईल. याकरिता खालच्या यंत्रणेने प्रयत्न करणे अत्यावश्यक आहे. जे लोक पैसे भरतात त्यापैकी ९९ टक्के लोकांचे बँकेत अकांऊट असते. आपण सिस्टीममध्ये लोकांना मोठ्या प्रमाणात आणणे आवश्यक आहे याकरिता आपण प्लॅनिंग केल्यास २ वर्षात १०० टक्के लोकांना या प्रणालीत आणू शकाल. याकरिता आपण काही नियोजन केले आहे का याबाबत समितीने विचारणा केली असता यावर खुलासा करताना विभागीय सचिवांनी असे सांगितले की, संबंधित खात्याच्या रिसिप्टसंबंधी त्या खात्याचा सामान्य लोकांशी इंटरफेस असतो आपण थेट सर्वांशी संपर्क करु शकत नाही. आपली तशी भूमिका सुध्दा नाही. परंतु ही कार्यवाही केल्यास त्यांची अकाऊंटकिंपिंग व ताळमेळ पध्दत सोपी होते. अलीकडे आपण पाहिल्यास अनेक पॉईंटमध्ये एजींनी असा मुद्दा घेतला आहे की, यात ई-लेखा असले तरी त्याचा ताळमेळ करणे बंधनकारक आहे. यामुळे खात्यांनी त्या पध्दतीचा अवलंब केल्यास खात्याकरिता ही बाब सुलभ होईल. आपण विभागाला ही बाब सांगू शकतो. वित्त विभागाने सर्व विभागांना सांगितले आहे की, तुम्ही ग्रास प्रणालीशी इंटरफेस स्थापन करावे. वित्त विभाग ते इंटरफेस कसे सोप करता येईल त्याकरिता प्रयत्नशील आहोत.

राज्य उत्पादन शुल्क विभागाने १०० टक्क ग्रास प्रणालीचा वापर केला त्याप्रमाणे सर्व विभागांकडून तशी कार्यवाही केली जाऊ शकते. या अनुषंगाने जे जे विभाग ग्रास प्रणालीमध्ये समाविष्ट होण्यास प्रतिसाद देत नाही त्यांना या सिस्टीमध्ये आणण्याकरिता कोणती कार्यवाही करणार आहात तसेच ग्रास प्रणालीकरिता प्रत्येक कोषागारात एक सुविधा केंद्र उपलब्ध करुन तेथे सदर प्रणालीच्या वापरासंबंधी माहिती दिली जाते. ही बाब आपल्या रेकॉर्डवर आहे. परंतु ऑन रेकॉर्ड तशी व्यवस्था कोषागारामध्ये असल्याचे निदर्शनास आले नाही. विभागाने ग्रास प्रणाली युझर फ्रेंडली करीत असताना ती प्रत्यक्षात असावी कागदोपत्री नसावी अशी सूचना समितीने केली असता विभागीय सचिवांनी याची नोंद घेतली.

ग्रास प्रणालीमुळे शासनाला कोणते फायदे झाले याची समितीला माहिती दिली. मॅन्युएल सिस्टीममध्ये जमा झालेली रक्कम ३ दिवसांनी शासकीय खजिन्यात म्हणजे रिझर्व्ह बँकेच्या शासन खाती जमा होते. परंतु आपण या प्रणालीच्या माध्यमातून ऑनलाईन पध्दतीने डायरेक्ट रिझर्व्ह बँकेशी कनेक्टेड असल्यामुळे जमेची रक्कम दुस-या दिवशी रिझर्व्ह बँकेत शासनाच्या खाती जमा होते. आपण ही रक्कम एका क्षणात घेऊ शकतो. परंतु आम्ही व्हर्च्युएल ट्रेझरी स्थापन केली आहे. ती यावर संपूर्ण नियंत्रण ठेवते. ही रक्कम आल्यानंतर सिस्टीममध्ये केलेल्या सुविधेनुसार सिस्टीम ही सर्व रक्कम चेक करते. या प्रणालीशी २० ते २१ बँका इंटिग्रेटेड केलेल्या आहेत. ग्राहक त्या बँकामध्ये सदर व्यवहार करतात व त्या बँकेतून रिझर्व्ह

बँकेत पाठविले जातात. त्या बँकेतील चलनांची यादी त्याला आपण "स्क्रोल" असे म्हणतो ती यादी आम्हाला प्राप्त होत असते. ते स्क्रोल रिझर्व्ह बँकेकडे सुध्दा पाठविले जाते. रिझर्व्ह बँकेकडून आम्हाला सदर स्क्रोल प्राप्त होतात, आम्ही त्याचा मेळ घेतो. त्यात अनेक वेळा असे निदर्शनास येते की, दुस-या दिवशी काही एन्ट्री येत असतात. आम्ही त्यानंतर रेक्टीफिकेशन एन्टी करतो व त्यानंतर रिझर्व्ह बँकेकडे फायनल स्क्रोल मंजुरीसाठी पाठवितो. जमेचे लेखांकन अत्यंत सुलभ झाले आहे. आपोआप होणा-या जमेच्या रकमेसंबंधी चलन आयडेंटीफिकशन नंबर आणि गव्हर्नमेंट चलन नंबर असे दोन नंबर पडतात. प्रत्येक चलन आपल्या प्रणालीमध्ये उपलब्ध असून त्यावर व्हर्च्युएल ट्रेझरी ऑफिसरची डिजीटल साईन होत असते. अशा प्रकारे या माध्यमातून जमा झालेली रक्कम निश्चितपणे शासन खाती जमा झाल्याचे आपण सांगू शकतो. त्याचे प्रिंटआऊट कॅशबुकच्या रिसिप्ट साईडला घेतल्यास त्याचे लेखांकन झाले आहे असे आपण समजतो. अन्यथा कॅशियरला प्रत्येक नोंद घ्यावी लागते. तसेच जमेचे लेखाशिर्षनिहाय ताळमेळ घेणे सुध्दा सुलभ झालेले आहे. ग्रास प्रणालीमध्ये हेडनिहाय लेखांकन होत असते. यामुळे महालेखांकारासमवेत रिकन्सीलिएशन घ्यावे लागते ते सुध्दा संबंधित विभाग यातून डाऊनलोड करुन महालेखांकारांशी त्यांचे रिकन्सीलिएशन करु शकतात. प्रणालीमध्ये पुढे कशा प्रकारे कार्यवाही करावी याबद्दल त्यात माहिती दिली आहे. तसेच आम्ही त्यांना वेळोवेळी प्रशिक्षण देतो. तसेच आपण प्रत्येक कोषागारात एक सुविधा केंद्र सुरु केले आहे यावर विभागाची ही मार्गदर्शनाची प्रक्रिया फक्त कागदोपत्री आहे परंतु ती प्रत्यक्षात उपलब्ध नाही असे मत समितीने नोंदविले

ऑनलाईन पध्दतीने मोठ्या प्रमाणात रक्कम जमा असल्यामुळे त्याकरिता सिक्युरिटी आवश्यक असते विभागाकडून यावर्षापर्यंत त्याचे सिक्युरिटी ऑडिट सातत्याने केले जाते. प्रणालीचे सर्व्हर मॅनेज होस्टींग तत्वावर ठेवलेले आहे. यात टाटा कम्युनिकेशन्स लिमिटेडसमवेत करार केलेला आहे. ती सुविधा अतिशय सुरक्षित आहे. इतर मोठ्या कंपन्यांचा तेथून व्यवहार चालतो. त्याकरिता सुविधा उपलब्ध केलेली आहे. आपल्या निविदेची तशी अट होती. ती अट त्यांनी पूर्ण केली आहे. २०१० मध्ये सदर निविदा काढली होती. टाटा कम्युनिकेशन्स लिमिटेडचा डेटा सेंटर आहे त्याकरिता त्यांनी हैद्राबाद येथे एक डिझास्टर रिकव्हरी सेंटर ठेवलेले आहे. तेथे सातत्याने डेटा रेप्लिकेशन करीत असतो अशी माहिती विभागीय प्रतिनिधींची समितीस दिली. टीसीएस बरोबर जो करार झालेला आहे त्याचा कालावधी किती आहे यावर विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, या वर्षाच्या सप्टेंबरपर्यंत टीसीएस बरोबर करार असून आता नवीन टेंडर मागविण्यात आले आहे.

यासंदर्भात समितीने सुरक्षिततेच्या बाबतीत काय व्यवस्था केली आहे व टीसीएसचा करार या वर्षापर्यंत आहे, हे काम दुस-या कंपनीला देण्यात येईल. टेंडर काढल्यावर जे लोक येतील ते येतील, डिझास्टर मॅनेजमेंटच्या दृष्टीने हा सर्व्हर सेव्ह करुन ठेवला आहे, त्याचे काय होणार आहे. ते टीसीएस विभागाला तो डाटा ट्रान्सफर करणार आहेत काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी होकारार्थी उत्तर दिले व हार्डवेअर ट्रान्सफर करावे लागेल, पूर्ण नवीन नेटवर्किंग करावे लागेल तसेच यामध्ये दोन भाग आहेत, संगणक प्रणाली व सिस्टीम कोड एनआयसीच्या ताब्यात आहे अशी माहिती समितीला दिली.

Whether the NIC belongs to the Government of India? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी होकारर्थी उत्तर दिले व पुढे अशी माहिती दिली की, त्यावर टीसीएस फक्त त्याला होस्ट करतो. त्याला हार्डवेअर देतो, त्याचा संगणकीय कोड व डाटा विभागाच्या ताब्यात असून विभागाला कोणाकडून घेण्याची आवश्यकता नाही तसेच हा डाटा एन आय सी कडे सुरक्षित आहे.

समितीने पुढे सूचना केली की, आता पुन्हा निविदा काढण्यात येणार आहेत, या निविदांसाठी स्पर्धा झाली पाहिजे व ते कमी भावात मिळाले पाहिजे हे मान्य आहे. यामध्ये ISO २७००१ हे रेटींग ठेवून निविदेमध्ये अशा अटी व शर्ती टाकाव्या की याचे उल्लंघन होणार नाही व त्याचा दर्जा कायम राहील.

याअनुषंगाने विभागीय प्रतिनिधींनी असे विदित केले की, या ग्रास प्रणाली मध्ये एक सुविधा देण्यात आली की, जे सेवा पुरविणारे विभाग आहेत, उदाहरणार्थ आरटीओ येथे मोटर व्हेईकीलचे रजिस्ट्रेशन करण्यात येते. त्या सेवा पुरविल्यानंतर जे चलन येते त्याला विभाग विरुपीत करतो त्याची सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे.

रजिस्ट्रेशन हे दोन किंवा चार दिवसानंतर होते, याबाबत विभागाचा परिच्छेद असून त्यानंतर विभाग विरुपीकरण करतो त्यामध्ये किती विलंब मान्य आहे. यामध्ये जे आक्षेप आहेत ते क्लिअर झाले आहे काय हा महत्वाचा भाग आहे. पावत्यांच्या संदर्भात त्या पावत्या डिस्पोजल केल्या नाहीत तर त्याबाबत विभागाचे काय म्हणणे आहे अशी विचारणा समितीने केली असता एकदा डिलरने पैसे भरले की, तो केव्हांही येऊ शकतो व सेवा घेऊ शकतो असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

त्या पावत्यांचा गैरवापर खालच्या स्तरावर केला जाईल काय काय अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी असे विदित केले की, त्यासाठी डिलरने जेव्हा १० पावत्यांचे पैसे भरले व जेव्हा तो यांच्याकडे गाडयांची नोंदणी करण्यासाठी आला तेव्हा यांच्या माणसांनी १० पावत्यांचे विरुपण करणे क्रमप्राप्त आहे, याचा गैरवापर होऊ नये म्हणून नियमात अशी तरतूद करण्यात आली आहे.

काही प्रकरणांत गैरवापर झालेला असल्याचे समितीने विभागास अवगत केले तसेच आता विभागाने यामध्ये दुरुस्ती केलेली आसून त्यांनी ही बाब बंधनकारक केलेली असल्याचे विभागाचे म्हणणे असल्याचे विदित केले. पूर्ण सिस्टीममध्ये टप्प्याटप्प्याने दुरुस्ती झालेली असून ग्रास ही सिस्टीम राज्य शासनाने अवलंबिली आहे. यामध्ये ज्या चुका आढळून आल्या त्या विभागाने टप्प्या टप्प्याने दुरुस्त केल्या आहेत. आणखी काही दुरुस्त्या करायच्या आहेत व काही दुरुस्त्या यांनी सुमोटो करायला पाहिजेत पण तसे विभागाने केले नसल्याचे समितीने विदित केले. तसेच ३५ विभागातून एकत्रित महसूल शासकीय तिजोरित गोळा केला जातो. ३५ विभागांचा परफार्मन्स काय आहे, विभागाने त्यांना एक मर्यादा आखून दिली पाहिजे व अमुक इतका महसूल यायला पाहिजे. किती लोकांनी फार चांगले काम केले हे विभागाच्या रेकॉर्डवर येणे आवश्यक असून त्यासंदर्भातील काही स्टेटमेंट विभागाची असायला पाहिजेत. ज्यांनी काही केले नाही किंवा मागील तीन वर्षात ज्यांच्याकडून महसूल गोळा झाला नाही, त्यासंदर्भात काही कारणे असतील तर ते समजू शकतो परंतु काही कारण नसताना त्यांचा परफार्मन्स काहीच नसेल तर त्यांच्यावर समितीमार्फत देखील काही ताशेरे गेले पाहिजेत किंवा विभागाकडून सांगण्यात आले पाहिजे की, या विभागाने आणखी काळजी घेण्याची गरज आहे. परंतु बरेचसे असे विभाग आहेत की, महसूल मिळतो किंवा नाही त्यामुळे या ३५ विभागाकडून गेल्या तीन वर्षात महसूल एकत्रित येत होता. दरवर्षी किती टक्के महसूल वाढला पाहिजे होता, दरवर्षी ५ किंवा १० टक्के महसूल वाढायला पाहिजे होता. मागील दोन वर्षात हा महसूल कोणत्या विभागांकडून वाढलेला नाही यासंदर्भातील माहिती समितीला उपलब्ध करुन दिली तर ते उपयुक्त होईल असेही मत समितीने व्यक्त केले असता समितीने जो मुददा उपस्थित केला तो अतिरिक्त रिसोर्स व साधन निर्मितीचा आहे. हा लेखा व कोषागरे या विभागाचा भाग नाही त्यासाठी मुख्यमंत्री महोदयांच्या स्तरावर यासंदर्भातील पर्यवेक्षण चार ते पाच महिन्यांतून करण्यात येते. वेगवेगळया खात्यांना टार्गेट देण्यात आले आहे. अमुक इतका महसूल वाढायला पाहिजे. विक्रीकर विभागाला नेहमी आपण उदटदिष्ट ठरवून देत असतो. अमुक वर्षात सात ते आठ टक्के महसुलात वाढ झाली पाहिजे. आयजीआर मुद्रांक शुल्क यांचे आकडे पाहिले तर त्यांची आकडेवारी अत्यंत चांगली आहे. विक्रीकर विभाग व मुद्रांक शुल्क हे दोन्ही विभाग उत्पन्नाचे मेजर स्त्रोत आहेत. या विभागांना दिलेल्या टार्गेटप्रमाणे त्यांचे काम झालेले आहे. महसूल विभाग व इतर काही खात्यांमध्ये थोडे प्रमाण कमी आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

यामध्ये आता किती खाते ॲड करण्यात आले आहेत ? रोजगार हमी विभाग, असे काही विभाग यात ॲड केले आहेत काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी This system is only concerned with Receipts and not for payment असा खुलासा केला.

आपणाकडे ३५ विभाग आहेत, त्यापैकी किती विभाग या सिस्टीमला प्रतिसाद देत नाहीत ही माहिती समितीस दिली तर त्या विभागांच्या सचिवांना समितीला साक्षीसाठी बोलविता येईल.यामध्ये कोणता विभाग जास्त दुर्लक्ष आहेत, जास्तीत जास्त त्यांचे पेमेंट चलनाद्वारे होत आहे, असे किती विभाग आहेत. विभागाने सांगितले की, ८० टक्के रक्कम या प्रणालीद्वारे गोळा करण्यात येते व २० टक्के रक्कम मॅन्युअली जमा केली जाते. एखादा विभाग ९० टक्के या सिस्टीमचा फायदा घेत असावा याबाबत देखील विभागाने दक्षता घेतली पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता याबाबत मदत करण्यासाठी चार महिन्यापूर्वी प्रत्येक खात्याला त्या सिस्टिमची एमआयएस प्रणाली जनरेट करता येईल, त्यामध्ये ई रिसिप्ट व युझर वाईज डिस्ट्रीब्युशन पाहण्याची सिस्टीम त्यांना दिलेली आहे. पूर्वी ती पध्दत नव्हती. आता त्यांना तशी मुभा आहे तसे ते करु शकतात अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

समितीला याबाबत माहिती नसल्यामुळे विभागाने अशी माहिती दयावी की, ३५ विभागांपैकी मेरिटवाईज एक्साईज विभाग वसुलीबाबत क्रमांक एक वर आहे, अमुक खात्यांनी चांगली कामे केली व अमुक खात्यांनी चांगली कामे केली नाहीत. जर अशी माहिती समितीला दिली तर त्या खात्यांबाबत समितीला अहवालात शिफारस करता येईल. असे समितीने विदित केले असता विभागीय सचिवांनी माहिती देण्याबाबत आश्वासित केले तथापि अदयाप माहिती अप्राप्त आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, एकूण कलेक्शन किती व ग्रास सिस्टीमच्या माध्यमातून किती कलेक्शन झाले आहे याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, यामध्ये पैसे भरण्याची सोय केली आहे त्याचे तीन पर्याय ठेवले असून त्यामध्ये एक नेट बँकिंग आहे, दुसरे अ-क्रास द बँक काऊंट आणि तिसरे ई-पेमेंट गेट वे.

ई-पेमेंट गेट वे फक्त एसबीआयमार्फत आहे काय ? क्रेडीट व डेबिट कार्डच्या माध्यमातून पेमेंट होईल परंतु ते फक्त एसबीआयचे पाहिजे यासाठी दुस-या बँकेचे कार्ड चालणार नाही काय ? अशी विचारणा समितीने केली असता फक्त एसबीआय बँकेचेच कार्ड चालेल मागील काळात म्हणजे सन २०१३ मध्ये आयडीबीआय सोबत चर्चा सुरु केली होती, परंतु फेल्ड पेमेंटबाबत ते जबाबदारी घेण्यास तयार नव्हते. त्यांचे असे म्हणणे होते की, कोणी पैसे भरले व त्यांचे पैसे गेले तर आम्ही जबाबदारी घेणार नाही. त्यामुळे त्यांच्याशी पुढील चर्चा करण्यात आली नाही. एसबीआय हे आपले बँकर आहेत, पूर्ण व्यवहार एसबीआय सोबत होतात, मराठवाडयात एसबीएच ही बँक आहे, स्टेट बँक ऑफ हैदराबाद यांना पेमेंटचे पूर्ण अधिकार आहेत, जमा रकमेचे मॅन्युअल चलन तेथेच भरण्यात येते. त्यांनी एसबीआय ॲग्रीगेटर सर्व्हीसेस आणली आहे, एसबीआय ही आपली बँकर असल्यामुळे त्यांच्यावर जास्त भरवसा असल्याचा खुलासा विभागीय प्रतिनिधींची केला.

समिती आपल्या मताशी सहमत नाही, ते आपले बँकर आहेत म्हणून त्यांच्यावर आपला भरवसा आहे, असे म्हणता येणार नाही. रिझर्व्ह बँकेच्या अंडर सर्व बँका काम करीत असतात एसबीआय बँक गॅरेन्टेड आहे व इतर बँका गॅरेंटेड नाहीत असे बोलणे योग्य होणार नाही. ज्या गावात एसबीआय नाही, त्या गावात इतर राष्ट्रीय कृत बँका आहेत, त्यामुळे याची व्याप्ती आपण वाढविली पाहिजे असे समितीने विभागास अवगत केले असता पेमेंट गेटवेचा ४० बँकाशी करार करण्यात आलेला आहे. पेमेंट गेटवे वर ते कोणत्याही बँकेत जाऊ शकतात हा फक्त गेटवे आहे त्याच्याशी निगडीत ४० बँका असून, त्यांच्यासोबत ते व्यवहार करु शकतात अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिली.

ई-पेमेंट एसबीआय बँकेचे डेबीट किंवा क्रेडिट कार्ड असेल तरच होईल, दुस-या बँकेच्या कार्डवरुन पेमेंट होऊ शकते काय ? या समितीच्या प्रश्नाला कोणत्याही बँकेचे कार्ड असले तरी ते या पेमेंटशी निगडीत आहे असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.तसेच यामध्ये असे आहे की, मला जर पेमेंट करावयाचे असेल तर मी बँकेमार्फत पेमेंट करु शकते. गेट वे हे फक्त महाराष्ट्र शासनाचे आहे, गेट वे हे मायासाठी नाही माझी बँक व एसबीआय यामध्ये करार असेल तर ती बँक त्या गेटवे मार्फत शासनाकडे पेमेंट करु शकते. यामध्ये फक्त राष्ट्रीयकृत बँकाच नाहीत तर प्रायव्हेट बँक म्हणजे ॲक्सीस बँक व इतर तीन ते चार बँकांनी एसबीआय सोबत करार केलेला असल्याचा खुलासाही विभागीय सचिवांनी समितीसमोर केला.

जिल्हा मध्यवर्ती बँकेला वित्त विभागाने बाजूला ठेवले आहे, जिल्हा मध्यवर्ती बँक म्हणजे काय ? ती सेंटर बँक आहे ती कधीच बुडत नाही, ज्या बँका प्राब्लेममध्ये येतात त्यांना केंद्र व राज्य शासन मदत करते. वित्त विभाग याचा अर्थ वेगळा लावते, central, बँक व स्टेट बँक कधीही बुडणार नाही. तशीच जिल्हा मध्यवर्ती बँक व राज्य बँक कधीच बुडणार नाही. म्हणजे कधीही या बँकेतील डिपॉझीटची रक्कम बुडणार नाही. या बँका उदया प्राब्लेममध्ये आल्या तर जसे नागपूर व नांदेड जिल्हा बँक प्राब्लेममध्ये आली होती, तेव्हा त्यांना केंद्र व राज्य शासनाने मदत करुन त्यांचा व्यवहार सुरळित केला होता.असे समितीने विभागास अवगत केले तसेच या ग्रास प्रणालीमध्ये ज्या ४० बँका ठेवण्यात आल्या त्याबाबत काय निकष होते. यामध्ये ज्या चांगल्या बँका आहेत त्यांचा समावेश केला पाहिजे हा विषय अनेक वेळा सभागृहात उपस्थित केलेला आहे त्याची दखल घेतली जात नाही. बँकामध्ये एबीसीडी असे ग्रेडेशन करावे, ए-बँक, बी-बँक व सी-बँक असे ग्रेडेशन करावे, जी सी-बँक असेल तिला व्यवहार करण्यास देऊ नका. ज्यांचे चांगले ग्रेडेशन आहे त्यांना व्यवहार करण्यास दयावे. ज्या बँका चांगल्या आहेत, त्यांना ग्रेडेशन दया. ज्या बँका ए क्लॉस मध्ये आहेत ज्यांचे वर्किंग चांगले आहे, शून्य एनपीए आहे, ज्यांचा ग्रॉस शून्य एनपीए होऊ मागतो आहे, अशा १५-२० बँका आहेत, कारण हे करंट अकाऊंटमध्ये फुकट पैसे वापरतात. याबाबत वित्त विभाग गांभीर्याने विचार करणार आहे किंवा नाही. शासनाच्या धोरणापासून हे कामे लांब जात आहेत, शासनाने ठरविले आहे की, शेतक-यांची उन्नती झाली पाहिजे. ज्या बँका चांगल्या आहेत त्या केंद्र व राज्य सरकारचा निधी वापरीत आहेत, आता जिल्हा परिषदेचा निधी देखील जिल्हा बँकेकडून काढून टाकत आहात करंट अकाऊंटचा पैसा बिनव्याजी बँका वापरीत आहेत. याचा फायदा जिल्हा मध्यवर्ती बँकेला देणार काय ? आवश्यकता भासली तर त्याबाबत आपण नॉर्मस ठरवावेत याबाबत विचार करण्यात यावा, याबाबत समितीने शासनाला शिफारस केली पाहिजे असे समितीने विभागास सूचित केले .

पैसे कोठे ठेवावे हे त्या त्या खात्याने ठरविले पाहिजे, याबाबत वित्त विभाग काही करु शकत नाही, विभाग असे म्हणतो की, ई-पेमेंट गेटवे आहे, एसबीआय प्रणालीची काही मानके आहेत एसबीआय ई-पेमेंट गेट वे चालविते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

सहकार विभागाने असे सर्क्युलर काढले आहे की, जिल्हा व सहकारी बँकेत लोकांना जो पैसा अडकला आहे, अशा संदर्भातील सर्क्युलरचा विषय त्यांनी उपस्थित केला आहे. हे पेमेंट सरकारला होणार आहे, जे पेमेंट सरकारला होणार आहे,

ते आतापर्यंत तलाठी, जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन करावे लागत होते, हे आता ऑनलाईन करण्यात आले आहे, यासाठी स्टेट बँक सोबत ते निगडीत करुन ठेवले आहे. या संदर्भातील मास्टर सर्व्हर स्टेट बँकेच्या ताब्यात राहणार आहे, कोठे तरी एका ठिकाणी त्याचा कंट्रोल दिसला पाहिजे. सर्व राष्ट्रीयकृत बँका, खाजगी बँका, सहकार बँका या स्टेट बँकेच्या ई-पेमेंटमध्ये इन्व्हॉल होतील याचा त्यांना लाभ मिळेल. हा निधी स्टेट बँकेकडे ट्रान्सफर होणार नाही. पैसे त्याच बँकेत भरले जाणार आहेत, त्याचे स्टेट बँकेशी कनेक्शन असेल तर त्याचे रेकॉर्ड स्टेट बँकेकडे व पैसे संबंधित बँकेकडे जाणार आहेत असे समितीने विदित केले तसेच यामध्ये ज्या त्रुटी आहेत त्याबाबत समिती चर्चा करीत असून एसबीआय बरोबर जिल्हा बँकांना देखील कनेक्टिव्हिटी वाढविण्याबाबत सूचना द्याव्यात. आपल्याला ८० टक्क्यांपासून ९५ ते १०० टक्के करावयाचे असेल तर एसबीआयने जिल्हा बँकांना सुद्धा यामध्ये जोडले तर याची व्याप्ती वाढेल आणि ते लोकांसाठी साईचे होईल लोकांना ते गावातच भरता येईल असेही मत समितीने व्यक्त केले.

सन २०१०-११ मध्ये ग्रास प्रणाली मार्फत जमा झालेला एकूण महसूल ४५७ कोटी रुपये होते आता १०,४०५ कोटी रुपये असल्याचे समितीने विभागास अवगत केले तेसच ही रक्कम ६ महिन्यांची आहे का एका वर्षाची आहे आहे ? विचारणा समितीने केली असता ही रक्कम एप्रिल, मे आणि जून अशी ३ महिन्यांची आहे असल्याचे विभागीय सचिवांनी विदित केले.

सन २०१६-१७ मधील चलान संख्या १९,०१,८३६ इतकी आहे आणि रक्कम १०,४०५ कोटी आहे ही ३ महिन्यांची रक्कम आहे यामध्ये आणखी वाढ होईल. सन २०१५-१६ मधील चलान संख्या १७,१९,९४८ आहे आणि रक्कम ४६,०८२ कोटी रुपये आहे. सन २०१०-११ मध्ये चलान संख्या फक्त ३०,५४७ होती. सन २०१०-११ पासून सन २०१५-१६ पर्यंत म्हणजे मागील ५-६ वर्षात यामध्ये चांगल्या प्रकारे वाढ झालेली आहे असे समितीने मत व्यक्त केले तसेच याबाबतचा तुलनात्मक तक्ता समितीस देण्याबाबत सांगितले असता विभागाने तक्ता देण्याबाबत आश्वासित केले. तथापि माहिती अप्राप्त आहे.

Directorate of Medical Education and Research चे ६७४ चलान, Co-op., Marketing And Textiles Department (Mantralaya) चे २१० चलान आलेले आहेत. Directorate Of Industrial Safety and Health चे फक्त ४ चलान आलेले आहेत. Registrar of Firms चे २०३ चलान, State Commission and District Consumer Redressal Forum चे १६३ चलान आलेले आहेत. त्यानंतर खूपच कमी चलान आलेले आहेत. यांच्या ज्या रिसिप्ट आहेत त्या तुलनेत काय परिस्थिती आहे हे देखील पहावे असे समितीने सूचित केले.

महाकोश संदर्भात समितीला थोडक्यात माहिती द्यावी असे समितीने विभागास सांगितले असता विभागाने याबाबत समितीसमोर सादरी केले व सादरी करणाच्यावेळी महाकोष या वेबसाईटवरुन सर्व लिंक्स दिलेल्या असून सादरीकरणामध्ये डाव्या बाजूला पोर्टल आहेत सध्या या पोर्टलचा वापर करीत असून सुरुवातीला बजेट, त्यानंतर बिल पोर्टल आहे. आम्ही याद्वारे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने बिले तयार करतो त्यानंतर रिसीप्टचा ग्रास आहे. शासकीय कर्मचारी व आमदार महोदयांचे पगार सेवार्थद्वारे होतात. त्यानंतर निवृत्ती वेतन पेन्शन, पे-व्हेरिफिकेशनसाठी केलेले आहे. त्यानंतर शेवटचे पोर्टल डेटा डम्ससाठी आहे. यामध्ये जेवढे व्यवहार होतात त्याचा डेटा अर्थवाहिनीमध्ये साठविला जातो आणि आपल्याला तेथून क्वेरी दिल्यानंतर किती खर्च झाला, कोणत्या विभागाचा कोणत्या संवर्गासाठी किती खर्च झालेला आहे, याबाबतची माहिती मिळू शकते सचिव महोदयांना जी माहिती लागते ती आपण याद्वारे उपलब्ध करुन देण्यात येते असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

रिसिप्ट आणि एक्सपेंडिचरची आकडेवारी आपल्याकडे अपडेट असते आणि त्या आधारावर आपल्याला फंड फ्लो निश्चित करता येतो अशी पृच्छा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी होय असे सकारात्मक उत्तर समितीस दिले.

यामध्ये पेमेंटसाठी पोर्टल दिलेला आहे पोलिसांचे टी. ए., डी.ए. चे बिल असते. परंतु, अकाऊन्टंट शंभर रुपये घेतल्याशिवाय त्यांचे टी. ए., डी.ए. चे बिल काढत नाही तो विभागाचाच कर्मचारी आहे. परंतु, त्या बाबूला १०० रुपये दिले नाही तर टी.ए., डी.ए. चे बिल निघत नाही. विभागाने या प्रणालीत आणखी थोड्या अपडेट करण्याची आवश्यकता आहे. नगर विकास विभाग, गृह विभागामध्ये अशी जी बिले निघतात त्यासाठी आपण हे फास्ट केले पाहिजे. कारण, अजूनही त्या लेव्हलवर लोकांना खूप त्रास असल्याचे समितीने मत व्यक्त केले.

सेवार्थ आणि पेन्शनची जी सिस्टीम आहे त्यामध्ये आपण पगार आणि पेन्शन ॲटोमेशन केले आहे. आपण टी.ए., डी.ए. च्या बिलाचा मुद्दा मांडलेला आहे. त्यासाठी सुरुवातीच्या काळात मॅन्युअली बिल काढणे अभिप्रेत आहे. कारण, ज्या कर्मचा-याने प्रवास केलेला आहे तो प्रवासाचा तपशील बघून ऑर्डर काढली जाते ती ॲटोमेशन होऊ शकत नाही फार झाले तर त्यासाठी

संगणक प्रणालीमध्ये सुधारणा करु शकतो. शेवटी संबंधित अधिकारी त्याबाबत निर्णय घेतील आणि ऑर्डर काढतील असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

टी.ए., डी.ए. चे बिल सबमिट केल्यानंतर मला पेमेंट घेण्यासाठी कार्यालयात येण्याची गरज पडू नये ते बिल माझ्या बँक खात्यात जमा झाले पाहिजे. मी कोणत्या तारखेला बिल सादर केले त्याची एन्ट्री होईल आणि सिक्वेन्सने त्याचे पेमेंट झाले पाहिजे. परंतु, आज त्या डिपार्टमेंटमध्ये तसे होत नाही म्हणून ते करता येईल काय ते बघावे असे समितीने सूचित केले.

विभागाकडे जी आवेदने येतात त्याचा हिशोब ठेवण्याकरिता ई-ऑफिस आहे. कोणत्या डेस्कमध्ये कोणते निवेदन कोणत्या तारखेपासून प्रलंबित आहे हे आपल्याला त्या माध्यमातून कळू शकेल आपल्याला ती माहिती काढता येईल. परंतु, तरीही त्या माहितीचा आढावा कोणी तरी घेणे अपेक्षित राहील असा खुलासा विभागीय सचिवांनी समितीसमोर केला.

त्याबद्दल समितीचे काही म्हणणे नसून जे मॅन्युअली करावयाचे आहे ते आपल्याला करावेच लागेल. समजा माझ्याकडे ५०० लोकांचे टी.ए., डी.ए. चे बिल आले आणि मी त्याचे व्हाऊचर सबमिट करुन सिस्टीमध्ये अपडेट केल्यानंतर संबंधितांच्या खात्यात पैसे जमा झाले पाहिजेत त्यांनी पैसे घेण्यासाठी पुन्हा माझ्याकडे यावे हे अपेक्षित नसले पाहिजे असे समितीने विभागास अवगत केले. यावर उपरोक्त समितीची सूचना योग्य असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

समितीने पुढे अशी सूचना केली की, विभागाने टी.ए., डी.ए. संदर्भात सांगितले परंतु, खरे म्हणजे आता मॅन्युअली बिल तपासण्याची वेळ संपलेली आहे आता स्कॅनिंग केले जाते. त्या कर्मचा-याने एखादी गोष्ट वाढवून सांगितली आणि आपण त्याप्रमाणे पेमेंट करणार ही सिस्टीम शासनामध्ये नाही. त्याने जे व्हाऊचर सादर केले असेल, बिल आर केले असेल त्या प्रमाणे पेमेंट केले जाते. टी.ए., डी.ए. चे बिल सादर करण्यासाठी त्याचे आठवड्यातील एक दिवस किंवा कामाचे काही तास वेस्ट होतात. आपल्याला भविष्यात याचा सुद्धा विचार करावा लागेल. तसेच समजा कॉन्ट्रॅक्टरचे बिल आहे काही लोकांनी ऑनलाईन केले. आपण ती सिस्टीम डेव्हलप करुन घ्यावी की, त्या कॉन्ट्रॅक्टरने कोणत्या तारखेला बिल सादर केले, त्याने बिल सादर केल्यानंतर त्याला येथे येण्याची आवश्यकता नाही. ऑनलाईन त्याच्या बँक खात्यात पेमेंट जमा झाले पाहिजे. जिल्हा परिषद असेल, नगरपालिका असेल यांनी अजूनही सिस्टीमची अंमलबजावणी केलेली नाही.

वित्त विभागाकडे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पत्र आले होते त्यांनी तशी सिस्टीम विकसित केलेली आहे आणि आता आम्ही त्याला आमच्या बिम्ज बरोबर इंटिग्रेट करीत आहोत. त्यामध्ये समितीने सांगितल्याप्रमाणेच सिस्टीम आहे कॉन्ट्रॅक्टरने कोणत्या तारखेला बिल सादर केले, कोणत्या तारखेपासून बिल प्रलंबित आहे, कोणत्या रस्त्याचे बिल आहे हे सर्व सार्वजनिक बांधकाम विभागाने केले आहे. इतर विभागांनी देखील तसा पुढाकार घ्यावयास पाहिजे विभागामार्फत याबबात त्यांना माहिती देतोच असा खुलासा विभागीय सचिवांनी केला

इतर विभागाने ते आपल्या सिस्टीममध्ये समाविष्ट केले पाहिजे तसेच विशेष करुन लोकल सेल्फ गर्व्हनमेंटसाठी करावे असे मत समितीने व्यक्त केले. तसेच ही सिस्टीम नसल्यामुळे ते लोक डिस्क्रीशनरी झालेले आहेत म्हणजे त्या बाबूला वाटले तरच ते होते, नाही तर होतच नाही. आपण ती सिस्टीम थोडी फास्ट केली तर त्यावर कन्ट्रोल येईल. सचिव महोदयांनी सांगितले की, प्रत्येक विभागाने हे केले पाहिजे परंतु, त्यांना सूचना कोण देणार आहे ? समितीने नगरपालिका, जिल्हापरिषद या संस्थांबाबत सूचना केलेली आहे त्यांना सूचना कोण देणार आहे ? अशी पृच्छा ही समितीने केली असता वित्त विभाग त्यांना सूचना देऊ शकते परंतु, ग्राम विकास विभाग आणि नगर विकास विभाग अंमलबजावणी करु शकतात. ती वित्त विभागाच्या अखत्यारीतील बाब नाही कारण, त्या स्वायत्त संस्था आहेत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

आपल्याकडे वित्तीय सुधारणा विभाग असल्यामुळे संबंधित विभागाने तशा सुधारणा करुन घेण्याबाबत त्यांना सूचना देऊ शकता. केंद्र शासनाकडून जेएनएनयुआरएमचे पैसे आणण्यासाठी आयुक्त होते ज्या राज्यांनी, महानगरपालिकांनी अटींची पूर्तता केली त्यांना निधी प्राप्त होतो. आपण त्यांना तशी सक्ती करावी. विभागाने वेळेत कार्यवाही केली नाही तर पुढील पेमेंट केले जाणार नाही, असे त्यांना सांगता येईल आपण त्यांना यासाठी वेळ द्यावा आपल्या अधिकाराचा वापर करावा असे मत समितीने व्यक्त केले.

परिच्छेद क्र.७.१०.६ " मुद्रांक शुल्क प्रदानाच्या बटवडा आदेशांच्या बनावट इ-पावत्या आढळून आल्या "

उरण येथील एका एजन्सीमध्ये बटवडा प्रदान केलेल्या मुद्रांक शुल्काशी संबंधित बनावट पावत्या दाखविल्या आणि विभागाने त्याबाबत एफआयआर दाखल केलेला आहे. याला आळा घालण्यासाठी विभागाने कोणती कार्यवाही केली आहे अशी विचारणा समितीने केली असता याला आळा घालण्यासाठी जेवढ्या कंटेनर फ्रेट सर्व्हिस एजन्सीज आहेत त्यांना ग्रास सिस्टीममध्ये लॉगिन होऊन आणि ई-रिसिप्ट व्हेरिफाय करुन त्याचे विरुपन करण्याची सुविधा दिलेली आहे ती सुविधा पूर्वी त्यांच्याकडे नव्हती आता त्या एजन्सी स्पेसिफिक पावती बघून विरुपन करु शकतात असा खुलासा विभागीय सचिवानी समितीसमोर केला.

शासनाच्या मंजुरीने संबंधित कंटेनर फ्रेट सर्व्हिस एजन्सीजना ग्रास युजर आयडी व पासवर्ड वितरीत करण्यात आले आहेत. असे विभागाच्या उत्तरात नमूद करण्यात आले आहे तर यापूर्वी त्यांना युजर आयडी व पासवर्ड वितरीत करण्यात आले नव्हते काय ? अशी पृच्छा समितीने केली असता यापूर्वी त्यांना पासवर्ड वितरीत करण्यात आला नव्हता असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

जेवढ्या कंटेनर फ्रेट सर्व्हिस एजन्सीज आहेत यांचे पासवर्ड इतर विभागाप्रमाणे ९० दिवसानंतर बदलते जातात काय ? या समितीच्या प्रश्नाला विभागाने तशा सूचना दिलेल्या असल्याचे विभागीय सचिवांनी विदित केले तसेच त्यांनी १०० दिवसापर्यंत पासवर्ड बदलला नाही तर तो पासवर्ड चालणार नाही, अशी सिस्टीममध्ये प्रोव्हिजन असल्याचेही समितीस अवगत केले.

कंटेनर फ्रेट सर्व्हिस एजन्सीजना मुद्रांक शुल्क भरावे लागते ते जी डिलिव्हरी घेतात त्या प्रत्येक कंटेनरसाठी त्यांना पैसे भरावे लागतात असे समितीने नमूद केले असता इन्स्पेक्टर जनरल ऑफ रजिस्ट्रेशन मार्फत स्टॅम्प ड्युटी आकारली जाते आपण पॉईंट १ पर्सेंट डिलिव्हरी नोट्सवर वसूल करतो आणि त्या माध्यमातून शासनाला वार्षिक ३०० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळते. पूर्वी ते ड्युटी भरल्याच्या चलानचे प्रिंट काढायचे आणि तिच प्रिंट दाखवून पुढील माल सोडवून घेत होते. हे लक्षात आल्यानंतर शासनाने लगेच डिफेससाठी मंजुरी दिली. आता आपण त्यांना युझर आयडी आणि पासवर्ड दिलेला आहे. ते लोक डिलिव्हरी ऑर्डरचे चलान भरतात त्यावर ते लोक डिफेस करतात आणि त्यावर संबंधित दुय्यम रजिस्ट्रार यांचे नियंत्रण असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

सन २०१४ मध्ये एफआयआर दाखल केलेला आहे, त्याबद्दल काय झालेले आहे अशी विचारणा समितीने केली असता यासंदर्भात ४ लोकांना अटक करण्यात आली असून ती केस सध्या न्यायप्रविष्ट असल्याची माहिती समितीस अवगत केली.

सीएचए हे काम करतात तेथे डायरेक्ट कस्टमर येत नाहीत. आयात किंवा निर्यात करणारा माणूस कमीत कमी रिस्क घेतो कारण, त्याचे पैसे आयदर ॲडव्हान्समध्ये दिलेले असतात यामध्ये जे सीएचए आहेत हे त्यांचे काम आहे. आपण इतर पार्टीवर एफआयआर दाखल केले किंवा कसे याची समितीला माहिती नाही. फ्रेट एजन्सीवर एफआयआर दाखल केलेला आहे याची समितीस माहिती आहे. त्यांना कायम स्वरुपी काळया यादीत टाकायला पाहिजे. जे प्रॅक्टीस करणारे लोक आहेत, आता आपण दंडात्मक शिक्षा करुन चालविणार असाल तर त्यांना ते मोडस आपॅरेंडी आहे. त्यांना काळया यादीत टाकले पाहिजे. आपण त्यांना ब्लॅकलिस्ट करण्याची कारवाई केलेली आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता ती कार्यवाही त्या विभागाने केली पाहिजे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

वित्त विभागाने या संदर्भात शिफारस केली पाहिजे जोपर्यंत त्यांना सूचनाच देणार नाही तोपर्यंत ते विभाग त्यांना काळयायादीत कसे टाकणार अशी विचारणा समितीने केली असता We will inform them to blacklist concerned persons. असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

त्यांना प्रत्येक वेळी मुद्रांक शुल्क भरावे लागते काय, कंटेनरसाठी मुद्रांक शुल्क कसे आकारले जाते, एकदा रजिस्टर केले की मुद्रांक शुल्क आहे का प्रत्येक वेळी आयात निर्यातीसाठी मुद्रांक शुल्क आहे याबाबत समितीने विचारणा केली असता त्या विभागाने तसे नियम केलेले आहेत प्रत्येक कंटेनरच्या डिलिव्हरीवर काही तरी शुल्क आकारले जाते आणि ते त्यांनी ग्रास सिस्टीममध्ये भरावयाचे असते आयजीआर मुद्रांक शुल्क भरुन घेतात अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

ज्यावेळी कंटेनर रजिस्टर होते त्यावेळी मुद्रांक शुल्क घेतात का प्रत्येक कंटेनरच्या कन्साईनमेंटवर मुद्रांक शुल्क घेतात या समितीच्या प्रश्नाला कन्साइनमेंटवर मुद्रांक शुल्क घेण्यात येते असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले तसेच

डिलिव्हरी ऑर्डर्स असतात आयात होणारा माल असतो त्यावर मुद्रांक शुल्काची तरतूद महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अधिनियमामध्ये आहे. त्या मालाची व्हॅल्यू अधिक कस्टम ड्यूटी या एकत्रित मूल्यावर ०.१ टक्क्यानी स्टॅम्प ड्यूटी आकारण्याची तरतूद आपल्या कायद्यामध्ये आहे. आम्ही त्या दस्ताला किंवा संलेखाला डिलिव्हरी ऑर्डर असे म्हणतो. माल येतो त्यावेळी कन्साईनमेंट येत असतांना, त्याचा आधी इम्पोर्ट आयजीएम जनरेट होतो. त्यामध्ये कोणता माल येत आहे, कोणाचा माल येत आहे याची माहिती असते. त्यामध्ये डील करणारे कस्टम हाऊस एजंट असतात की, जे भारतातील इम्पोर्टर असतात, त्यांच्यासाठी काम करीत असतात. कस्टम हाऊस एजंट ती सर्व प्रोसेस करतात, बिल ऑफ एंट्री आणि डिलिव्हरी ऑर्डर्स हे कस्टम हाऊस एजंट तयार करून ते माल सोडविण्यासाठी कंटेनर फ्रेट स्टेशन्सला जातात. उदा. जेएनपीटीमध्ये असे ३२ कंटेनर फ्रेट स्टेशन्स आहेत की, जे केंद्र सरकारने नेमलेल्या एजन्सीज आहेत. कंपनी अशा त्या एजन्सीज आहेत त्यांच्याकडे जाऊन त्यांना तो माल सोडवावा लागतो त्या पॉईंटला कस्टम ड्यूटी देखील वसूल केली जाते आणि त्याच ठिकाणी मुद्रांक शुल्क हा ऑनलाईन अगोदर ग्रासवर कस्टम हाऊस एजंट भरतात आणि मग ते चलन घेऊन डिलिव्हरी ऑर्डर सोबत तेथे जातात. मग कंटेनर फ्रेट स्टेशन्स हे सर्व मुद्रांक शुल्क जे भरले आहे ते बरोबर आहे की नाही हे तपासतात. आम्ही ग्रासला युजर आयडी व पासवर्ड दिलेला आहे, ते लॉग-ईन करतात, तो जीआरएन नंबर व्हेरिफाय करतात आणि बरोबर असेल तर ते डिफेस करतात आणि मग त्यानंतर तो माल आऊट ऑफ चार्ज होऊन बाहेर सोडला जातो अशी अतिरिक्त माहिती ही विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिली.

विभागाने ही कार्यपध्दती एकदम सोपी करावी. कन्साईनमेंट तेथे आल्यानंतर या सर्व प्रोसिजरला ८ ते १० दिवस लावतात, त्यांना डॅमरेज पडतो, तेथे कॉंट्रॅक्टर ठेवला आहे, त्याचे भाडे पडते, प्रोडक्शन उशिरा होते, त्या कन्साईनमेंटसाठी कंटेनर हायर केला की, त्याचे चार्जेस लागतात. जेव्हा इम्पोर्ट ड्यूटी लागू होते तेव्हा त्याच कॉस्टिंगमध्ये त्याच विभागाने हे कलेक्ट केले पाहिजे. काही तरी याला कार्यपध्दती असेल, विभागाला ही सुरुवात करावी लागणार आहे. कन्साईनमेंटच्या ॲक्च्युअल कॉस्टवर ०.१ टक्क्याचे कलेक्शन असते, त्याचे पैसे भरले जातात, ते तेथेच कलेक्ट केले आणि आपल्या खात्यात ट्रान्सफर केले तर त्यांचे दिवस वाचतात. विभागाकडे त्यासाठी काय व्यवस्था आहे ? आता बटवाडयाचा प्रॉब्लेम आला आहे आदेशांच्या बनावट कॉपीजसंबंधीचा हा प्रॉब्लेम आहे. विभागाची व्यवस्थित कार्यपध्दती असेल तर हा प्रॉब्लेम येणारच नाही. कन्साईनमेंट डाऊनलोड होतो, त्याचे आयात शुल्क भरले जाते, त्याच्याच किंमतीवर ०.१ टक्का घेतो. विभागाने कन्साईनमेंट वेगळे न करता, त्याच विभागाने कलेक्शन करून पैसे आपल्याकडे ट्रान्सफर करायचे आहेत. केंद्रीय विभागाबरोबर चर्चा करून हे केले पाहीजे . एकाच पॉईंटवर दोन्ही टॅक्सेस वसूल करावेत असे मत समितीने व्यक्त केले.

कस्टम ड्यूटी आहे ते केंद्र सरकारच्या अखत्यारित येते. आपण महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाखाली स्टॅम्प ड्यूटी आकारत आहोत, त्यामुळे हे होत आहे असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

आपला टॅक्स त्यांना भरावाच लागेल. केंद्र सरकारचा असेल तरी त्यांना आपला टॅक्स भरावाच लागतो. जेएनपीटीमध्ये गत वर्षीचा मुद्रांक शुल्क किती मिळाला ? मागच्या वर्षी मुद्रांक शुल्क किती मिळाले ? कंटेनरमधून मिळालेला माल बल्क कार्गो ने आला तर त्याला सुध्दा मुद्रांक शुल्क आहे का म्हणजेच काही कंटेनरने माल आला आणि काही ओपन बल्क कार्गोने आला तर त्याला मुद्रांक शुल्क आहे का ? अशी पृच्छा समितीने केली असता रजिस्ट्रेशन ॲक्टमध्ये फरक जाणवत नाही की, कंटेनराईज्डवर लावायचे की, नॉन कंटेनराईज्डवर लावायचे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

मुद्रांक शुल्क घेताना ज्या अडचणी येतात त्या विभागाला सांगताना समितीने असे नमूद केले की, कॉस्टवर इम्पोर्ट ड्यूटी भरली आहे, त्याचे इन्व्हॉईस येतात. आपले मुद्रांक शुल्क ०.१ टक्का घेतात. ०.१ टक्क्यासाठी डॅमरेज आणि कंटेनर चार्जेस येतात. मुद्रांक शुल्क घेण्यास आपल्या विभागाचे कर्मचारी बसतात, रेसिडेन्शिअल व कमर्शिअलचे मुद्रांक शुल्काचे केंद्र आहेत. आपण करार किंमत दाखविली, रेडिरेकनर फिक्स केले नाही, तेथे रेडिरेकनर होत नाही, कारण सर्वच वस्तू इम्पोर्ट होणार आहेत. मग आपल्याकडे काय माहिती राहणार आहे ? आपण हे अंडरइन्व्हाईस इम्पोर्ट केले आहे, कमी इम्पोर्ट ड्यूटी भरली आहे, त्यामुळे आमच्या रेव्हेन्यूमध्ये बदल होत आहे, त्यामुळे पुन्हा सुधारित करून घेऊन या असे होते. मात्र येथे सुधारित काहीही होत नाही. त्यामध्ये ४-६ दिवस काढतात, हे तेथेच केले पाहिजे. अधिकारी हे इच्छा दाखवतील की नाही हे माहीत नाही. आपले सुध्दा काऊंटर एक्साईजबरोबर असले पाहिजे, जेणेकरून त्यामध्ये विसंगती होऊ नये किंवा अंडरइन्व्हॉईस होऊ नये बिलिंग

डिलिव्हरी ऑडर, पावत्या त्यांना देणे शक्य होणार नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता याअनुषंगाने विभागीय प्रतिनिधींनी असे विदित केले की, यामध्ये हा विचार झाला होता परंतु तेथील संख्या पाहिली तर हे शक्य नाही. एमबीपीटीपेक्षा जेएनपीटीमध्येच सध्या सर्वात जास्त माल येत असतो आणि तेथील व्यवहारांची संख्या आणि रोजच्या इनवर्ड होणा-या डिलिव्हरी ऑर्डर्स यांची संख्या जर विचारात घेतली तर ३२ वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळा स्टाफ ठेवणे शक्य होत नव्हते. परत आता ऑनलाईन पेमेंटची सुविधा उपलब्ध झाली असल्यामुळे तशी गरज नाही. भरणा केल्यानंतर फक्त डिफेस करणे एवढेच एक काम असल्यामुळे आणि कस्टम ड्यूटी आणि अदर चार्जेस हे फेज वसूल करीत असल्यामुळे ते तयार झाले आहेत. आम्ही ते करू शकतो असे ते म्हटले आहेत, त्यानंतर ही सिस्टिम व्यवस्थित चालली आहे आणि वसुली देखील होत आहे.

जेएनपीटीमध्ये वेगळा रजिस्ट्रार ठेवला आहे का ? तेथे इन-चार्ज कोण आहे, तेथे उरण रजिस्ट्रार आहे की, जेएनपीटीला वेगळा रजिस्ट्रार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता त्यांचे अकाऊंटिंग वेगळे असून हे सहजिल्हा निबंधक, रायगड यांच्या अखत्यारित येते. त्यांचे पथक दर महिन्याला ३२ ठिकाणी जाऊन व्हेरिफाय करीत असते की, डिफेसमेंट बरोबर होत आहे की नाही हे रॅण्डमली चेक करीत असतात.

एक सिस्टिम येऊ शकते का की, जेथे कस्टम ड्यूटीचे पेमेंट होते, त्याचे इन्व्हॉईस किंवा चलन असेल त्यावर ई-मेल करून किंवा स्कॅन करून आपल्या साईटवर टाकले तर आपल्या ग्रास रूट प्रणालीवर तो पैसे भरू शकतो. पण प्रत्यक्षात सीएजीला ५० वेळा यावे लागते. तेथेच कस्टम ड्यूटीचे पेमेंट झाले की, त्याच चलनावर ०.१ टक्का मोजून त्यांनी पेमेंट डायरेक्ट करायचे, आपल्या ऑफिसमध्ये येण्याची गरज नाही. आपला संगणक त्याला रिसिट देईल, ती रिसिट तुम्ही गेटवर चेक करायची, तेथेच ते क्लिअर होईल. तुमच्या कार्यालयाला येण्याची गरज लागणार नाही. त्यांना लाखो रूपये डॅम्रेजचे लागतात आणि वर अधिकारी हैराण करतात. समितीचे असे म्हणणे आहे की, कस्टम ड्यूटी भरली की त्या पावत्यांच्या, कागदपत्रांच्या आधारे ई-पेमेंट देऊन लगेच पावती दयावी, जेणेकरून वेळ वाचेल. ते करता येईल का किंवा सध्या ते सुरू आहे का अशी विचारणा समितीने केली असता या संदर्भात अधिक माहिती देताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, विभाग याचा अभ्यास करीत असून बहुतांश डॅम्रेज हे कस्टम आणि एक्साईज यामुळे लागते. वेळ आणि डॅम्रेज आपल्यामुळे लागत नाही आणि कस्टमपुरतेही लागत नाही एक्साईजमुळे डॅम्रेज लागते. कस्टमला त्यांना लगेच द्यावे लागते. अंडरइन्व्हाईसिंग होते की कसे याबाबत आपण कस्टमशी सांगड घातली तर आपले अंडरइन्व्हाईसिंग होणार नाही. दोन्ही मुद्यांवर अभ्यास सुरु असल्याचेही विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

ज्या कंपनीने अशा प्रकारच्या बनावट पावत्या दिल्या, त्या कंपन्यांवर आपण एफआयआर दाखल करून थांबलात. समितीची भूमिका अशी राहणार आहे की, केंद्र सरकारने त्या कंपन्यांना नियुक्त केले आहे, त्यांना काळया यादीत टाकण्याची शिफारस विभागाने करावी असे समितीने विभागास सांगितले.

"GRAS मध्ये सहभागी बँकाव्दारे लेखपट (Scroll) अपलोड करणे "

विभागाने दिलेल्या माहितीमध्ये महालेखापालांनी आपल्या अभिप्रायामध्ये २० बँकांपैकी फक्त २ बँका डिजिटली साईन्ड स्क्रोल ग्रासमध्ये अपलोड करीत असल्याचे नमूद केले आहे. बाकी उर्वरित १८ बँकांचे काय होणार आहे अशी पृच्छा समितीने केली असता आता ही संख्या ११ वर आणली असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

विभागाने याची सिस्टिम समितीस सांगावी त्यांची स्वाक्षरी किंवा सांक्षाकन डिजिटली होत नाही, याचा अर्थ काय आहे, याची कार्यपध्दती काय आहे ? अशी समितीने विचारणा केली असता हे दिवसभर व्यवहार होतात त्याची यादी तयार करतात, त्याला आपण बँक स्क्रोल म्हणतो, ते ऑनलाईन सिस्टिमच्या मार्फत आपल्याला ग्रासमध्ये पाठवितात, त्याच्या खाली त्यांनी डिजिटल स्वाक्षरी करावी असे अपेक्षित आहे याबाबत सातत्याने पाठपुरावा करीत आहोत. २ बँकांवरून आता ११ बँकांनी हे केले असल्याची माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केली. .

बँकेत स्क्रोल अपलोडिंगचे काम करण्यासाठी नेमण्यात आलेल्या व्यक्तींची वारंवार बदली होत असते असे कारण बँकांनी दिले असल्याचे विभागाने त्यांच्या उत्तरात नमूद केले आहे कसे शक्य आहे ? बाकी २ बँकांमध्ये होत नाही का किंवा ११ बँकांत

होत नाही का, ९ बँकांतच वारंवार बदली होते का ? विभागाने दिलेले कारण न पटण्यासारखे असल्याचे समितीने नमूद केले. बँकांनी कारण पण हे विभाग मान्य करीत आहे, हे त्यापेक्षाही गंभीर असल्याचे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी याबाबत समितीसमोर दिलगिरी व्यक्त केली.

विभागाने माहितीमध्ये लिहिले आहे की, डिजिटली स्वाक्षांकित केलेले लेखपट सादर न करण्यामुळे बँकेद्वारा पारेषित केलेल्या माहितीचे अनधिकृतपणे रोधन करणे, त्यांत बदल करणे, तिची नक्कल करणे आणि अवैध हस्तांतरण होणे याचा धोका संभवतो. तर विभागाकडून बाकीचे किती दिवसांत करणार आहात ते सांगावे. असे समितीने विचारले असता माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये या संदर्भात बैठक झाली होती. सर्व बँकांना हे करण्याकरिता बाध्य करण्यात आले आहे ते करतील असा त्यांनी होकार दिला असल्याचे विभागीय सचिवांनी नमूद केले.

बँका कधी करतील किंवा त्यांनी केले नाही तर विभागाकडून या संदर्भात काय ॲक्शन घेण्यात येणार आहे ? या समितीच्या प्रश्नाला विभागाकडून एवढीच कारवाई करू शकतो की, ज्या बँका हे करणार नाहीत, त्यांना या सिस्टिममधून वगळावे परंतु ती आपली गरज आहे. जास्तीत जास्त बँकांनी यामध्ये सहभागी व्हावे असे आपल्याला वाटत आहे.

आपल्याकडे एक सिस्टिम आहे, खालच्या बँकांनी काम केले नाही तर आपण वरच्या लेव्हलला कळवितो. यासंदर्भातही असे करण्यात यावे ज्या बँकांनी केले नाही त्यांच्या जिएमला, रिजिनल लेव्हलला कळवावे असे मत समितीने व्यक्त केले असता आम्ही पर्स्यु करून करतो असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

विभाग या संदर्भात किती गंभीर आहेत हे समितीला माहीत नाही. सन २०१४ ला ऑडिटने पॅरा काढला आता सन २०१६ आले आहे आरबीआयला लिहू शकता. बँक नकार देऊ शकत नाही. आरबीआयच्या गाईडलाईन्समध्ये त्यांनी काय केले पाहिजे. आपण त्या बँकांच्या वरिष्ठ अधिका-यांना सांगावे, तसेच आरबीआयला देखील सांगावे की, ते नॉर्म्स फॉलो करीत नाहीत. हे नॉर्म्स आपले नाहीत ते एनआयसीचे असतील असे समितीने नमूद केले असता आपण त्यांना युटिलिटी बनवून दिली असल्याचे विभागीय सचिवांनी नमूद केले.

समितीने पुढे असे मत व्यक्त केले की विभागाच्या कनिष्ठ पातळीवरील लोकांना हे व्हावे असे वाटत नाही. एजींनी शंका उपस्थित केली की, यामुळे मॅनिप्युलेशन होत आहे, हे मॅनिप्युलेशन होऊ नये म्हणून हे झाले पाहिजे असे महालेखाकारांचे म्हणणे आहे. आपला विभाग हे करीत नाही याचा अर्थ समितीने असा घ्यावा काय का की, विभागातील अधिका-यांना ही सिस्टिम त्यांच्या फायद्याची आहे म्हणून हे करायचे नाही, त्यामुळे ते प्रयत्न करीत नाहीत असे समितीने नमूद केले असता विभागाने यासंदर्भात पाठपुरावा केला असून आपल्या सूचना आहेत, त्या नोंदविल्या आहेत, यावर्षी ते पूर्ण करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

"लेखापरीक्षेचे भाग"

उपरोक्त परिच्छेदामध्ये असे सांगितले आहे की, आयटी ऑडिट परिक्षण गटाकडून शिफारस करण्यात आल्याप्रमाणे राष्ट्रीय सूचना केंद्र, पुणे (एनआयसी, पुणे) यांनी महत्त्वाच्या तक्त्यांमधील बदलांच्या नोंदीसाठी लेखापरीक्षा भाग तयार केलेले आहेत. अंमलबजावणी कधी करणार आहात अशी समितीने विचारणा केली असता अंमलबजावणी केली असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले यासंदर्भात दीड वर्षे झाली असून आपले ऑडिट झाल्याबरोबर ते काम सुरू केले असल्याचा खुलासा केला.

"अंतर्गत लेखापरीक्षा"

मॉड्यूल ने-आण करून ६ आठवड्यांत त्याचे परिक्षण करण्यात येईल. अधिका-यांसोबत दिनांक ०७.०७.२०१२ ला बैठक झाली की सन २०१६ ला झाली ? विभागाने सांगितले आहे की, या संदर्भात एनआयसीबरोबर बैठक झाली अशी समितीने विचारणा केली असता सन २०१६ ला बैठक झाली असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

सन २०१२ मध्ये बैठक झाली. आता ६ आठवड्यांत हे मॉड्यूल तयार होणार आहे असे समितीने विचारले असता या संदर्भात महालेखाकारांच्या लोकांशी चर्चा करून घेऊन ६ आठवड्यांत मॉडयुल करून घेतो असे समितीस सांगितले.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, सन १९६८ चा नियम आहे, कलम ७४-७५ अन्वये काय केले पाहिजे ते सांगितले आहे. आज विभागाकडून सांगण्यात येत आहे की आम्ही करून घेऊ.

उपरोक्त च्या अनुषंगाने विभागीय सचिवांनी असे विदित केले की, यामध्ये मुद्दा असा आहे की, अंतर्गत लेखापरिक्षण त्यांनी करायचे आहे ही सर्व संगणकीय प्रणाली आहे. कोणत्या पध्दतीने करून पाहिजे ते महालेखाकार यांच्या कार्यालयाकडून स्पष्ट झाले पाहिजे, तसे आम्ही महालेखाकारांच्या लोकांसमवेत बसून बघू.

सदरहू काम शासनाचे आहे त्यांनी करायचे आहे.सन १९६८ च्या नियमाप्रमाणे लेखापरीक्षण मेंडेटरी असल्याची बाब समितीने नमूद केली असता सॉफ्टवेअर सिस्टिमचे ऑडिट होईल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

28.	**विकसन करारनाम्याच्या अनुषंगाने विकसक स्वत:साठी राखून ठेवत असलेल्या सदनिका / दुकाने / कार्यालये इ. तो स्वत:साठी खरेदी करीत असलेल्या दस्त प्रकरणी मूल्यांकन :-** विकसक करारनाम्याच्या अनुषंगाने स्वत:साठी राखून ठेवलेल्या सदनिका / दुकाने / कार्यालये इ. विकसक स्वत:साठी खरेदी करीत असलेल्या दस्तांबाबत वार्षिक मूल्य दर तक्त्यातील सदनिका / दुकाने / कार्यालये इ.साठीच्या मूल्य दरातून बांधकाम वर्गीकरणानुसार नवीन बांधकामाचा दर वजा करुन येणा-या मूल्य दरानुसार परिगणित होणा-या मूल्यावर मुद्रांक शुल्क आकारावे.
29.	उपरोक्त मार्गदर्शन सूचनांनुसार वजावट / घट / सवलत देण्यापूर्वी त्या पृष्ठर्थ आवश्यक कागदपत्रे / नकाशाची सत्यप्रत दस्तासोबत जोडून दस्ताचा भाग करणे आवश्यक राहील. एकच सर्व्हे नंबर दोन मूल्य विभागात असल्यास दोन्हीपैकी जास्तीच्या दराने मूल्यांकन करण्यात यावे. सदर दर मान्य नसल्यास संबंधित विभागीय उपसंचालक नगर रचना (मूल्यांकन) यांचेकडून त्यापृष्ठयर्थ आवश्यक कागदपत्रे सादर करुन मूल्य विभाग निश्चित करुन घ्यावे.

जा.क्र.का.15/मूल्यांकन/अभि.प्रकरणे/
फंजिबल घ.क्षे.नि./परिपत्रक/ 822
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे-1
दि. 1 /११/2014.
11

विषय :- मुंबई शहर व उपनगरांमध्ये होणा-या विकसन करारनामा / बांधकाम क्षेत्र विभागणी अशा दस्तांचे बाबतीत मूल्यांकन करताना फंजिबल चटई क्षेत्र निर्देशांकाचे मूल्य विचारात घेणेबाबत.

परिपत्रक :-

मुंबई शहर व उपनगरामध्ये मूळ अनुज्ञेय चटईक्षेत्र निर्देशांकाच्या 35% रहिवास वापरासाठी व 20% औद्योगिक / वाणिज्य वापरासाठी अनुक्रमे 60%, 80% व 100% प्रिमीयम भरण्याच्या अटीस अधीन राहून मूळ अनुज्ञेय चटई क्षेत्राच्यावर जास्तीचा फंजिबल चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय आहे. मात्र नियम क्र.33 (7), 33 (9) व 33 (10) अन्वये पुर्नविकास प्रकल्पामध्ये प्रिमिअम भरण्यापासून सूट दिली आहे.

विकसन करारनामा प्रकरणी मूल्यांकन करताना जमीन मालकास मिळणाऱ्या बांधकाम क्षेत्राचे वार्षिक मूल्य दर तक्त्यातील बांधकाम दराने येणारे मूल्य व विकसकास त्या बदल्यात मिळणाऱ्या चटई क्षेत्राचे वार्षिक मूल्य दर तक्त्यातील जमीन दराने येणारे मूल्य यापैकी अधिकची रक्कम मोबदला म्हणून विचारात घेऊन त्यावर मुद्रांक शुल्क आकारणी केली जाते. उपरोक्त नियमान्वये फंजिबल चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय केला जात असल्याने त्याचा विचार जमीन मालकास मिळणा-या बांधकाम क्षेत्राचे मूल्यात करणे तसेच विकासकास मिळणा-या चटई क्षेत्राच्या मूल्यात फंजिबल चटई क्षेत्र निर्देशाकाचे मूल्य समाविष्ट करणे आवश्यक आहे. ज्या प्रकरणी फंजिबल चटई क्षेत्र निर्देशांकासाठी प्रिमीयम भरावे लागणार आहे ती रक्कम तेवढया चटई क्षेत्राच्या मूल्यातूनही वजा करणे आवश्यक आहे.

जमीन मालकास बांधून दयावयाच्या बांधकाम क्षेत्राबाबत महानगरपालिकेस विकासकाकडून विकास शुल्क भरले जाते. मात्र काही प्रकरणी सदर रकमेचा विचार केला जात नसलेचे आढळून आले आहे. सदर रक्कम जमीन मालकाचे लाभात असल्यामुळे सदर रक्कम बांधकाम दरानुसार येणाऱ्या बांधकाम क्षेत्राचे मूल्यात समाविष्ट करणेही आवश्यक आहे.

तरी सदर विषयाबाबत अभिनिर्णयांतर्गत प्रकरणी उपरोक्त बाबींचा विचार करुन मूल्यांकन करावे.

सदर परिपत्रकाची प्रत नोंदणी व मुद्रांक विभागाच्या www.igrmaharshtra.gov.in या संकेतस्थळावर publication या सदराखाली circulars या ठिकाणी उपलब्ध आहे.

(श्रीकर परदेशी)
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत माहितीसाठी सादर :-

1) मा.सचिव, (मदत व पुनर्वसन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-32.
2) मा.महालेखाकार (लेखापरिक्षा) - II, महाराष्ट्र, नागपूर.

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी :-

3) सहनोंदणी महानिरीक्षक, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.
4) उपसंचालक, नगर रचना, मुंबई प्रदेश मूल्यांकन मुंबई.
5) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, (मुख्यालय), पुणे.
6) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक मुंबई.

-/ सदर परिपत्रकाची प्रत आपले अधिनस्त सर्व नोंदणी कार्यालयांना पुरविणेत यावी तसेच सदर परिपत्रक त्यांना प्राप्त झाले असून, ते वाचलेबाबत (Read & acknowledge) त्यांच्या कार्यालयाचा अहवाल प्राप्त करुन घेऊन या कार्यालयास पाठविणेत यावा.

जा.क्र.का-१५/सोसा-विकासक दस्त/टीडीआर क्षमता/५६३
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय,
दि.३.११.२०१२.

परिपत्रक

विषय :- गृहनिर्माण संस्थेस विकासकाकडून बांधकाम पुर्ण झाल्यानंतर करण्यात येत असलेल्या हस्तांतरण दस्तामध्ये टी.डी.आर.वापरण्याची क्षमता विचारात घेण्याबाबत.

विकास कर्त्यांकडून गृहनिर्माण योजनेतील बांधकाम पूर्ण झाल्यानंतर, विकासक गृहनिर्माण संस्थेस हस्तांतरणाचा दस्तऐवज (Deed of Conveyance) करुन देतात. अशा प्रकरणी वार्षिक मूल्यदर तक्त्यातील अंमलबजावणी सूचना क्र.३ नुसार टी.डी.आर. क्षमतेसाठी मूल्यदरात ४०% वाढ देण्यात यावी किंवा कसे याबाबत मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी मुद्दा उपस्थित केला असून त्यासंबधाने या कार्यालयास संदर्भ सुध्दा प्राप्त आहे.

प्रस्तुत विषयासंबधाने मुख्यत्वे खालील बाबी विचारात घेणे आवश्यक आहेत.

अ) वार्षिक मूल्यदर तक्त्यातील अंमलबजावणी सूचना क्र.३ ही, जेव्हा एखादी मिळकत विकासक यांचेकडे विकासासाठी हस्तांतरित होत आहे, पुनर्विकास करण्यासाठी / बांधकामासाठी खरेदी होत आहे, अशा स्वरुपाच्या दस्तांकरिता वापरणे अभिप्रेत आहे.

ब) विकासकाकडुन भूखंडावर अनुज्ञेय चटई क्षेत्र वापरुन बांधकाम केल्यानंतर सदनिका धारकांसाठी जे करारनामे होतात त्यावेळी सदनिका धारकांचा सदर भूखंडात सदनिकेच्या क्षेत्राचे प्रमाणात हक्क निर्माण झालेला असतो व त्यानुषंगानेच हस्तांतरणाचा दस्त होत असतो.

उपरोक्त बाबी व या संबंधाने इतरही मुद्दे विचारात घेता, खालील प्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१) ज्या प्रकरणात नियोजन प्राधिकरणाकडून मंजूर करण्यात आलेल्या बांधकाम नकाशा नुसार किंवा सुधारीत मंजूर नकाशानुसार (जे नंतर असेल ते) बांधकाम पुर्ण झाले असेल व मंजूर नकाशानुसार चटईक्षेत्र निर्देशांक शिल्लक नसेल अशा प्रकरणात वार्षिक मूल्यदर तक्त्यातील सूचना क्र.३ नुसार. टीडीआर क्षमतेसाठी मूल्यदरात ४०% वाढ देण्याची आवश्यकता नाही. मंजूर नकाशानुसार संपुर्ण बांधकाम पुर्ण झाले आहे याबबात नियोजन प्राधिकरणाचा बांधकाम पूर्णत्वाचा दाखला (संपूर्ण बांधकामासाठी) प्राप्त करुन घेण्यात यावा. फार पुर्वीच्या प्रकरणात असा दाखला उपलब्ध नसल्यास, बांधकाम पूर्ण झाल्याची खातरजमा अधिका-यांनी करावी.

२) ज्या प्रकरणात मंजूर नकाशानुसार काही बांधकाम अपुर्ण असेल अशा प्रकरणात शिल्लक चटई क्षेत्र निर्देशांकाचे प्रचलीत दराने मूल्यांकन करण्यात यावे व त्यास वार्षिक मूल्यदर तक्त्यातील सूचना क्र. ३ नुसार वाढ देण्यात यावी.

३) ज्या प्रकरणात मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम पूर्ण झाले असुनही चटईक्षेत्र निर्देशांक शिल्लक आहे अशी परिस्थिती असेल त्या प्रकरणात उपरोक्त अ.क्र. २ प्रमाणे कार्यवाही करावी.

४. उपरोक्त नमूद परिस्थिती पेक्षा वेगळी परिस्थिती असल्यास, अशा दस्ताचे बाबतीत स्वतंत्रपणे अभिप्राय घेणे आवश्यक राहील.

५. सदर सुचना गृहनिर्माण संस्थेस, महाराष्ट्र ओनरशिप फलॅट्स ॲक्ट अंतर्गत कलम ११ (३) नुसार देण्यात येणा-या deemed conveyance साठी सुध्दा लागू राहतील. तसेच या बाबतीत सा कार्यालयाचे परिपत्रक क्र. का.५/मुद्रांक-१२/प्र.क्र.४४/११/५०१/१२, दि.१२.४.२०१२ मधील सुचना लागू राहतील.

६. सदर परिपत्रक हे मुंबई जिल्हा व उपनगर जिल्हयासाठी लागू आहे.

सही/-xxxxx
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी -
१) उपसंचालक नगर रचना, मुंबई प्रदेश, मूल्यांकन, मुंबई.
२) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, मुंबई
३) मुद्रांक जिल्हाधिकारी, मुंबई/अंधेरी/कुर्ला/बोरीवली.

निर्गमित,
सहनोंदणी महानिरीक्षक तथा
मुद्रांक अधिक्षक (मुख्यालय), म.रा. पुणे.

असा. क्र. १२०

रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

बुधवार, जून १३, २००७/ज्येष्ठ २३, शके १९२९

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

भाग चार-ब

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

महसूल व वन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १२ जून २००७

आदेश

मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८.

क्रमांक मुद्रांक-२००७/प्र.क्र.-१९६(१)/म-१.—मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ (१९५८ चा मुंबई ६०) याच्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि याबाबतीत काढलेले सर्व आधीचे आदेश, अधिसूचना किंवा संलेख यांचे अधिक्रमण करून, लोकहितास्तव पुढील कार्यवाही करणे आवश्यक असल्याबद्दल महाराष्ट्र शासनाची खात्री पटली असल्याने, ते याद्वारे, शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक पीएसआय. १७०७/(सीआर-५०)/आयएनडी-८, दिनांक ३० मार्च २००७ याअन्वये सुरू करण्यात आलेल्या सामूहिक प्रोत्साहन

[किंमत : रुपये ३.००]

योजना, २००७ अंतर्गत गट "क", ड आणि ड + असे वर्गीकरण केलेल्या क्षेत्रात आणि "ना उद्योग जिल्हा" म्हणून वर्गीकृत करण्यात आलेल्या जिल्ह्यात एक नवीन औद्योगिक युनिट सुरू करण्यासाठी किंवा कोणत्याही विद्यमान औद्योगिक युनीटाचा विस्तार करण्यासाठी, तो वाढविण्यासाठी किंवा त्याचे विकेंद्रीकरण करण्यासाठी कोणत्याही व्यक्तीने निष्पादित केलेल्या, उक्त अधिनियमाच्या अनुसूचीतील (अनुच्छेद ६ खालील) तारणगहाण, तारण, हडप, हक्कनिक्षेप ठेव संलेख, (अनुच्छेद २५ खालील) अभिहस्तांतरणपत्र, (अनुच्छेद ३३ खालील) गहाण मालमत्तेवर अधिक भार लादणारा संलेख, (अनुच्छेद ३६ खालील) भाडेपट्टा आणि (अनुच्छेद ४० खालील) गहाण विलेख यांवर आकारणीयोग्य असलेले मुद्रांक शुल्क, १ एप्रिल २००७ रोजी सुरू होणाऱ्या व ३१ मार्च २०११ रोजी संपणाऱ्या कालावधीसाठी पुढील शर्तींवर पुर्णतः माफ करीत आहेत :—

शर्त.—ज्या कामांसाठी माफी देण्यात आली आहे ती कामे सूरू करण्यात कसूर करणारे किंवा सामुहिक प्रोत्साहन योजना, २००७ याच्या कोणत्याही शर्तीचा भंग करणारे कोणतेही युनिट, जणू काही सुरूवातीपासूनच माफी देण्यात आली नसल्याप्रमाणे, मुद्रांक शुल्क व दंड भरण्यास पात्र ठरेल.

स्पष्टीकरण.—या आदेशाच्या प्रयोजनासाठी "नवीन औद्योगिक युनिट" कोणत्याही विद्यमान औद्योगिक युनिटाचा "विस्तार, वृद्धी किंवा विकेंद्रीकरण करणे" याचा अर्थ, सामुहिक प्रोत्साहन योजना, २००७ याच्या खंड २ अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या अंमलबजावणी अभिकरणाने किंवा या बाबतीत त्याने प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याने असे युनिट म्हणून प्रमाणित केले असेल असे औद्योगिक युनिट, असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

द. रा. माळी,
शासनाचे सहसचिव.

परि: क्रमांक ४.३.१६

4.3.16

क्र.का ११/नोंमनि/ तपासणी /मु.जि/५९२/२०१४
नोंदणी महानिरीक्षक मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य,यांचे कार्यालय पुणे.
दिनांक- ०७/०८/२०१४

परिपत्रक

विषय:- मुंबई विभागातील मुद्रांक जिल्हाधिकारी व नोंदणी अधिकारी यांचे तपासणी बाबत.

संदर्भ - 1) क्र.का११/तपासणी/प्र.क्र.३६२/२०००-२००१/४३६ दि. १४/०६/२००१
2) शासन निर्णय क्र. आरथापना २००४/४०१३/प्र.क्र. ६८७/म-१ दिनांक ३०/१२/२००५

या कार्यालयाचे संदर्भिय १ चे परिपत्रकान्वये, विभागातील नोंदणी उपमहानिरीक्षक व जिल्हा स्तरावरील सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी करावयाच्या तपासणीचे परिमाण उद्दिष्ट निश्चित केलेली आहेत. मुंबई विभागाचे नोंदणी उपमहानिरीक्षक वगळता उर्वरीत विभागाती नोंदणी उपमहानिरीक्षक हे त्यांचे विभागातील सर्व सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी नोंदणी अधिकारी यांच्या तपासण्या करतात. तर जिल्हयाचे सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी व त्यांच्या जिल्हयातील नोंदणी अधिकारी यांच्या दिलेल्या उद्दिष्टाप्रमाणे तपासण्या करतात.

नोंदणी व मुद्रांक विभागातील मुंबई हा विभाग, विभागास सर्वात अधिक महसुली उत्पन्न मिळवून देणा असलेने या विभागातील मुद्रांक जिल्हाधिकारी व नोंदणी अधिकारी यांच्या नियमित व गुणात्मक तपासण्या हा आवश्यक आहे. संदर्भिय क्र २ चे शासन निर्णयान्वये मुंबई विभागातील कार्यालयांची पुर्नरचना व कामकाजा फेरवाटप करताना मुंबई विभागातील मुंबई, अंधेरी, बोरीवली, व कुर्ला या प्रत्येक तालुकयासाठी मुद्रां जिल्हाधिकारी या पदाची नव्याने निर्मीती केलेली आहे. त्याचवेळी चुकविलेल्या मुद्रांक शुल्काच्या शोधासाठी वसुलीसाठी मुद्रांक जिल्हाधिकारी अंमलबजावणी क्र.-१ व अंमलबजावणी क्र.-२ या एकूण सहा मुद्रां जिल्हाधिकारी कार्यालये नव्याने निर्माण करणेत आलेली आहेत.

महाराष्ट्रातील मुंबई विभाग वगळता इतर सर्व विभागातील मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयाची अंतर्ग तपासणी विभागस्तरावर होते. जसे नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाकडून व विभाग निहाय, संबंधीत उपनोंदण महानिरीक्षक व मुद्रांक उपनियत्रक यांचेकडून केली जाते परंतु मुंबई विभागातील मुद्रांक जिल्हाधिकारी यां कार्यालयाची तपासणी नोंदणी उपमहानिरीक्षक मुंबई यांचे कडून केली जात नाही. व याबाबत सदर पदा निर्मिती पासून आजपर्यंत त्यांचे तपासणीचे अनुषंगाने विभागाकडून कोणतेही परीपत्रक निर्गमीत करण्य आलेले नाही.उर्वरीत महाराष्ट्रातील अन्य विभागात मुद्रांक जिल्हाधिकारी यांचे तपासणीबाबत अंतर्गत विदस्तरी पध्दत अंमलात असतांना मुंबई विभागातील मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयाची तपासणी फक्त या कार्यात मार्फत करण्यात येते वास्तव त्यांच्या नियमित तपासण्या त्याचे नियंत्रण अधिकारी अपर मुद्रांक नियंत्र कार्यालयाने होणे उचित आहे.

तसेच मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा वगळता उर्वरीत महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हयातील सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी हे आपले अखत्यारीतील सर्व नोंदणी अधिकारी याच्या नियमित व वर्षातुन प्रत्येकी दोन तपासण्या करतात. परंतु मुंबई व मुंबई उपनगर जिल्हयातील सह जिल्हा निबंधक याना महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाचे कलम ३२ व ३३ चे अनुषंगाने कोणतेही अधिकार प्रदान केलेले नसल्याने या जिल्हयातील प्रत्येक तालुक्यातील नोंदणी अधिकारी यांच्या नियमित तपासण्या त्या त्या तालुक्याचे मुद्रांक जिल्हाधिकारी यांनीच करणे उचित आहे. कारण सदर मुद्रांक जिल्हाधिकारी यांना त्या त्या तालुक्यासाठी महाराष्ट्र मुंबई मुद्रांक अधिनियमा अंतर्गत मुद्रांक जिल्हाधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहे.

या परिपत्रकाव्दारे असेही आदेशीत करण्यात येते की, सर्व तपासणी अधिका-यामध्ये तपासणी करावयाच्या कार्यालयाच्या निवडीबाबत समन्वय असावा. अपर मुद्रांक नियंत्रक व मुद्रांक जिल्हाधिकारी मुंबई,अंधेरी,बोरीवली व कुर्ला यांचा इष्टांक, दौ-याचे दिवस, तपासणीसाठी मार्गदर्शक सुचना व त्यानी सादर करावयाचा अहवाल यांचा तपशिल सोबतच्या परिशिष्ट १ व २ मध्ये जोडणेत आलेला आहे.

सही/- (श्रीकर परदेशी)
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य ,पुणे.

प्रति,

१) अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई
२) नोंदणी उपमहानिरीक्षक, मुंबई विभाग, मुंबई
३) मुद्रांक जिल्हाधिकारी मुंबई/अंधेरी /बोरीवली /कुर्ला अमलबजावणी क्र.१ व २
४) सह जिल्हा निबंधक मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा
/- यांनी आपले अखत्यारीतील सह दुय्यम निबंधक यांना सदर परिपत्रकाची प्रत देऊन पोच घ्यावी.
५) सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय पुणे.

निर्गमित

सह नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक अधिक्षक
महाराष्ट्र राज्य, पुणे

परिशिष्ट -१

तपासणी अधिका-यांनी करावयाचे दौरे व तपासणी उद्दीष्टे

तपासणी अधिका-यांचे पद	दौरा निश्चिती व मंजुर अधिकारी	दौ-याचे दरमहा दिवस	तपासणीसाठी दरमहा उद्दीष्टे	अंतिम अपिलिय अधिकारी
[illegible]	[illegible]	प्रत्येकी ३ आठवडे	२ सह दुय्यम निबंधक कार्यालये व १ मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय	नोंदणी महानिरिक्षक
[illegible]	[illegible]	४ आठवडे	मुंबई विभागातील १ मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय	नोंदणी महानिरिक्षक
[illegible] मुंबई	नोंदणी महानिरिक्षक	२ आठवडे	२ सह दुय्यम निबंधक कार्यालये	नोंदणी महानिरिक्षक
[illegible] कुर्ला, अमलदारवाडी क्र. १ व २	नोंदणी महानिरिक्षक	१ आठवडा	१ सह दुय्यम निबंधक कार्यालय	नोंदणी महानिरिक्षक

परिशिष्ट -२

तपासणीसाठी मार्गदर्शक सूचना

१. [illegible] मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी मुद्रांक जिल्हाधिकारी यांचे कार्यालयातील खालील बाबी तपासणी करणे, अहवाल तयार करणे, व त्यांचे वाचन करणे, व अंतिम आदेश निर्गमित करणे.

अ) अपिलिय प्रकरणे

ब) पुनरावलोकन प्रकरणे

क) कलम ३३ नुसार पाठविलेली प्रकरणे

ड) [illegible] प्रकरणांचा आढावा.

२. [illegible] मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे व कुर्ला यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील नोंदणी अधिकारी यांचे कार्यालयातील सर्व नोंदणी महानिरिक्षक यांचेकडील दप्तराची तपासणी करणे, तपासण्यांचे अहवाल करणे, अहवालाचे वाचन करणे, आदेश निर्गमित करणे. तसेच कार्यक्षेत्रातील नोंदणी अधिकारी यांचे कार्यालयाच्या [illegible] यांचे मार्फत नोंदणी महानिरिक्षक कार्यालयाने केलेल्या तपासणीतील परिच्छेदांबाबत अंतिम आदेश निर्गमित करणे व आवश्यक त्या प्रकरणांत ३२ (अ), ३३ (अ) ची कार्यवाही करणे इत्यादी.

परि० ८.३.16

अपर मुद्रांक नियंत्रक मुंबई यांच्या अधिपत्याखालील मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी दिनांक ०१/०४/२०१६ पासून ते मे २०१६ अखेर केलेल्या तपासण्यांचे विवरण पत्र

अ.नं.	कार्यालयाचे नांव	करावयाच्या तपासण्या	केलेल्या तपासण्या	शिल्लक तपासण्या
१	मुद्रांक जिल्हाधिकारी मुंबई	२२	६	१६
२	मुद्रांक जिल्हाधिकारी अंधेरी	२२	६	१६
३	मुद्रांक जिल्हाधिकारी बोरीवली	२२	3	१९
४	मुद्रांक जिल्हाधिकारी कुर्ला	२२	९	१३
	एकूण-	८८	२४	६४

सहायक नोंदणी महानिरीक्षक
तथा कार्यासन अधिकारी क्र.११

नोंदणी व मुद्रांक विभाग

बृहन्मुंबई (मुंबई शहर व उपनगर जिल्हयातील) महानगरपालिका क्षेत्रातील मिळकतींचे वार्षिक मूल्यदर तक्त्यानुसार सन 2016-17 करिता मुद्रांक शुल्क आकारणीकामी मूल्यांकन करण्यासाठी अद्ययावत व सुधारणेसह सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना

(परिपत्रक क्र.का.15/सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना/मूल्यांकन/परिपत्रक/३०१, दि.31/03/2016 चे सहपत्र)

अ.क्र	मार्गदर्शक सूचनेचा तपशील
1.	**भाडेकरु असलेल्या जुन्या इमारतीचे अभिहस्तांतरण / खरेदी दस्त प्रकरणी मूल्यांकन :-** भाडेकरु असलेल्या मालमत्तांचे मूल्यांकन करताना खालील बाबी विचारात घेणे आवश्यक आहे. अ) सदर मालमत्तेमध्ये सर्व मजल्यावर मिळून एकूण किती बांधकाम करता येईल म्हणजेच नियमाप्रमाणे एकूण अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र किती आहे ते पाहाणे. ब) भाडेकरुच्या ताब्यात असलेले एकूण क्षेत्र परिगणित करणे. क) भाडेकरुंकडून प्राप्त होणारे एकूण मासिक भाडे परिगणित करणे. ड) भाडेकरुव्याप्त बांधकाम क्षेत्राखेरीज मालकाच्या ताब्यातील बांधकामाचे स्वरुप, क्षेत्र, वय इत्यादी पाहाणे. समजा 1) भूखंडाचे एकूण क्षेत्र = क्ष चौ.मी 2) एकूण अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक (एफ.एस.आय) = य 3) मालमत्तेवर एकूण अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र = क्ष x य चौ.मी 4) मालमत्तेचे भाडेकरुंच्या ताब्यात असलेले एकूण क्षेत्र = ज चौ. मी 5) मालमत्तेचे मालकाच्या ताब्यात असलेले बांधकाम क्षेत्र = ह 6) भाडेकरुंकडून मिळणारे एकूण मासिक भाडे = भ रुपये उदा-1:- भाडेकरुंच्या ताब्यात असलेले एकूण क्षेत्र हे त्या मालमत्तेमध्ये नियमाप्रमाणे एकूण अनुज्ञेय बांधकाम क्षेत्रापेक्षा जास्त, म्हणजेच जर ज क्षेत्र हे क्ष x य पेक्षा जास्त असेल तर मालमत्तेचे मूल्य खालीलप्रमाणे परिगणित करण्यात यावे. महानगरपालिका क्षेत्रासाठी मूल्य = 16 x 7 x भ = रु.112 x 'भ' किंवा जमिनीच्या मूळ अनुज्ञेय चटई क्षेत्राचे जमीन दराने होणा-या मूल्याच्या 25% मूल्य यापैकी जास्तीचे मूल्य

उदा-2:- भाडेकरुंच्या ताब्यात असलेले एकूण क्षेत्र है त्या मालमत्तेमध्ये नियमाप्रमाणे एकूण अनुज्ञेय बांधकाम क्षेत्रापेक्षा कमी म्हणजेच जर ज्ञ क्षेत्र हे क्ष x य पेक्षा कमी असेल तर त्या मालमत्तेचे मूल्य खालीलप्रमाणे परिगणित करण्यात यावे.

= 112 भ + {[(क्ष x य) - ज्ञ - ह] x (वार्षिक मूल्य दर तक्त्याप्रमाणे जमिनीचा दर) } + (ह x संबंधित वापराचा, घसारा वजावटीनंतर येणारा विक्री दर) किंवा जमिनीच्या मूळ अनुज्ञेय चटई क्षेत्राचे जमीन दराने होणा-या मूल्याच्या 40% मूल्य यापैकी आस्तीचे मूल्य

टीप :-

1. मुंबई शहर व उपनगरातील भाडेकरु असलेल्या जुन्या इमारतीचे तसेच मुंबई शहरातील उपकरप्राप्त मिळकतीचे (cessed properties) मूल्यांकन निश्चित करताना प्रोत्साहनात्मक / अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांकासह एकूण अनुज्ञेय चटई क्षेत्राबाबत संबंधित सक्षम प्राधिकरणाचे उदा.महानगरपालिका / विशेष नियोजन प्राधिकरण इ.अथवा त्यांचेकडील नोंदणीकृत आर्किटेक्ट / इंजिनिअर यांचे प्रमाणपत्र घेणे बंधनकारक असेल. असे प्रमाणपत्र सादर केल्यास, त्यानुसार एकूण अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक विचारात घेण्यात यावा. प्रमाणपत्र सादर न केल्यास 33 (7) खालील उपकरप्राप्त इमारतीसाठी किमान 3.00 व उपनगरातील भाडेकरुव्याप्त इमारतीसाठी किमान 1.40 चटई क्षेत्र निर्देशांक विचारात घ्यावा.

   जमिनीचे मूळ अनुज्ञेय चटई क्षेत्राचे मूल्य काढणेसाठी असे प्रमाणपत्र सादर न केल्यास मुंबई शहरासाठी किमान 1.33 व उपनगरासाठी किमान 1.00 चटई क्षेत्र निर्देशांक विचारात घ्यावा.

2. भाडेकरुव्याप्त असलेल्या जुन्या इमारतीचा पुनर्विकास विकसन करारनाम्याद्वारे करण्यात येणार असल्यास महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 31 अन्वये अभिनिर्णयांतर्गत सविस्तर मूल्यांकन करुन घ्यावे.

2. 2.1) जुन्या इमारतीतील भाडेकरुस नवीन इमारतीत जागा देताना करावयाचे मूल्यांकन :-

अ) भाडेकरुच्या ताब्यात असलेले जुन्या इमारतीतील निवासी क्षेत्र लक्षात घेऊन 35% फंजीबल एफ.एस.आय.सह जेव्हा कमीत कमी 37.665 चौ.मी. (405 चौ.फूट) कार्पेट क्षेत्र त्याच इमारतीत भाडेकरुंना देण्यात येते, त्यावेळेस नवीन जागेवर मुद्रांक शुल्क आकारताना भाडेकरुंना लागू असलेल्या फक्त भाड्याच्या 112 पट रकमेवर मुद्रांक शुल्क आकारण्यात यावे.

ब) जुन्या इमारतीतील भाडेकरुंच्या ताब्यात असलेले निवासी क्षेत्र लक्षात घेऊन जेव्हा 37.665 चौ.मी. (405 चौ.फूट) कार्पेट क्षेत्रापेक्षा जास्त परंतु ताब्यात होते तितकेच क्षेत्र 94.50 चौ.मी. (1017.19 चौ.फूट) कार्पेट क्षेत्राच्या मर्यादेत जेव्हा त्याच भूखंडावर नवीन इमारतीत भाडेकरुस देण्यात येते, त्यावेळी 2 (अ) प्रमाणे 37.665 चौ.मी. (405 चौ.फूट) कार्पेट क्षेत्र वगळता उर्वरीत क्षेत्राचे वर्गीकरणानुसार नवीन बांधकामाचा दर (construction rate) विचारात घेऊन येणारे मूल्यांकन वरील क्र. 2 (अ) नुसार भाड्याच्या 112 पट रकमेत समाविष्ट करुन मूल्यांकन करावे.

क) भाडेकरुस जुन्या इमारतीतील त्याच्या ताब्यातील निवासी क्षेत्र लक्षात घेऊन उपरोक्त नियमानुसार 37.665 चौमी (405 चौ.फूट) कार्पेट क्षेत्र व जास्तीत जास्त 94.50 चौ.मी. (1017.19 चौ.फूट) कार्पेट क्षेत्र त्यामधील अनुज्ञेय क्षेत्र त्याच भूखंडावर नवीन इमारतीत देतांना जर भाडेकरु त्यास मिळणा-या क्षेत्राव्यतिरिक्त जास्तीचे क्षेत्र खरेदी करु इच्छित असेल अथवा त्यास दिले जात असेल तर, भाडेकरुला द्यावयाच्या अनुज्ञेय क्षेत्रांचे मुल्यांकन वरील नियम क्र.2 (अ) आणि (ब) प्रमाणे करुन त्यामध्ये जास्तीच्या क्षेत्राचे वार्षिक मूल्य दर तक्त्यातील दराने (निवासी) मूल्य काढून ते त्यात समाविष्ट करुन मूल्यांकन करावे.

ड) भाडेकरुच्या ताब्यात असलेले जुन्या इमारतीतील वाणिज्य क्षेत्र लक्षात घेऊन 20% फंजीबल एफ.एस.आय.सह जेव्हा कमीत कमी 33.48 चौ.मी. (360 चौ.फूट) कार्पेट क्षेत्र त्याच इमारतीत भाडेकरुंना देण्यात येते, त्यावेळेस नवीन जागेवर मुद्रांक शुल्क आकारताना भाडेकरुंना लागू असलेल्या फक्त भाडयाच्या 112 पट रकमेवर मुद्रांक शुल्क आकारण्यात यावे.

इ) जुन्या इमारतीतील भाडेकरुंच्या ताब्यात असलेले वाणिज्य क्षेत्र लक्षात घेऊन जेव्हा 33.48 चौ.मी.(360 चौ.फूट) कार्पेट क्षेत्रापेक्षा जास्त परंतु ताब्यात होते तितकेच क्षेत्र 84.00 चौ.मी.(903 चौ.फूट) कार्पेट क्षेत्राच्या मर्यादेत जेव्हा त्याच भूखंडावर नवीन इमारतीत भाडेकरुस देण्यात येते, त्यावेळी 2 (ड) प्रमाणे 33.48 चौ.मी. (360 चौ.फूट) कार्पेट क्षेत्र वगळता उर्वरीत क्षेत्राचे वर्गीकरणानुसार नवीन बांधकामाचा दर (construction rate) विचारांत घेऊन येणारे मूल्यांकन वरील क्र. 2 (ड) नुसार भाडयाच्या 112 पट रकमेत समाविष्ट करुन मूल्यांकन करावे.

फ) भाडेकरुस जुन्या इमारतीतील त्याच्या ताब्यातील वाणिज्य क्षेत्र लक्षात घेऊन उपरोक्त नियमानुसार 33.48 चौमी (360 चौ.फूट) कार्पेट क्षेत्र व जास्तीत जास्त 84 चौ.मी. (903 चौ.फूट) कार्पेट क्षेत्र ह्यामधील अनुज्ञेय क्षेत्र त्याच भूखंडावर नवीन इमारतीत देतांना जर भाडेकरु त्यास मिळणा-या क्षेत्राव्यतिरिक्त जास्तीचे क्षेत्र खरेदी करु इच्छित असेल अथवा त्यास दिले जात असेल तर, भाडेकरुला द्यावयाच्या अनुज्ञेय क्षेत्रांचे मूल्यांकन वरील नियम क्र.2 (ड) आणि (इ) प्रमाणे करुन त्यामध्ये जास्तीच्या क्षेत्राचे वार्षिक मूल्य दर तक्त्यातील सदनिका / दुकाने / कार्यालये / औद्योगिक दराने मूल्य काढून ते त्यात समाविष्ट करुन मूल्यांकन करावे.

2.2) भाडेकरु व्याप्त मिळकत भाडेकरुच खरेदी करीत असल्यास अशा प्रकरणी व्याप्त क्षेत्राचे येणाऱ्या बाजारमूल्याचे 40% मूल्य विचारात घ्यावे. भाडेकरु व्याप्त क्षेत्राव्यतिरिक्त जमीन मालकाची अतिरिक्त जागा खरेदी करीत असल्यास सदर क्षेत्राचे अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांकानुसार मूल्य विचारात घेऊन त्या रक्कमेवर मुद्रांक शुल्क आकारणी करावी.

2.3) सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या जुन्या इमारतीच्या पुनर्विकास प्रकल्पामध्ये नवीन इमारतीत सभासदांना जागा देताना करावयाचे मूल्यांकन

सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पुनर्विकास प्रकल्पात, गृहनिर्माण संस्था (मूळ मालक) व विकासक यांच्यात विकसन करारनामा झाला असल्यास सदर करारनाम्याच्या पूर्ततेच्या अनुषंगाने गृहनिर्माण संस्थेच्या लाभात करण्यात येणा-या अनुषंगिक दस्तऐवजावर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम 4 नुसार मुद्रांक शुल्क आकारणी करावी.

मात्र केवळ गृहनिर्माण संस्था व विकसक यांच्यात विकसन करारनामा झाला असल्यास, गृहनिर्माण संस्थेच्या मूळ सभासदाचे वैयक्तिक लाभात सदनिका / गाळा हस्तांतरण करण्याचा दस्तऐवज हा मूळ विकसन करारनाम्याच्या पूर्ततेच्या अनुषंगिक दस्तऐवज म्हणून समजता येणारा नसून तो स्वतंत्र दस्तऐवज आहे. त्यामुळे अशा दस्तऐवजान्वये हस्तांतरीत होणा-या सदनिका / गाळयांसाठी गृहनिर्माण संस्थेने मान्यता दिलेल्या क्षेत्रासाठी बांधकाम खर्चावर (construction cost) मुद्रांक शुल्क आकारणी करण्यात यावी. त्यापेक्षा वाढीव क्षेत्र वैयक्तिकरित्या घेत असल्यास त्यास वार्षिक मूल्य दर तक्त्यातील दराने (सदनिका / दुकानगाळा / कार्यालय / औद्योगिक) मुद्रांक शुल्क आकारणी करण्यात यावी.

मार्गदर्शक सूचना क्र. 1 व 2 साठी टिपा :-

अ) निरसित मुंबई भाडे नियंत्रण अधिनियम 1947 मधील तरतुदीच्या आधारे तसेच महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम 1999 चे कलम 7 (15)(क) अन्वये जो भाडेकरु असल्याचे मानण्यात येईल केवळ अशा भाडेकरु व त्याच्या ताब्यातील क्षेत्रासाठीच उपरोक्त सूचना क्र.1 व 2 लागू आहेत. भाडेकरु असलेल्या मिळकतीमध्ये वरीलप्रमाणे सवलत देताना संबंधितांनी त्या इमारतीत भाडेकरु दि.30 मार्च 2000 रोजी पासून वास्तव्य करीत असलेबाबत अथवा तदनंतर रितसर नोंदणीकृत व्यवहाराव्दारे भाडेकरुच्यावतीने दस्ताव्दारे हक्क प्राप्त केला असलेली व्यक्ती गेले पाच वर्षे भाडेकरु म्हणून वास्तव्य करीत असल्याबाबतचा पुरावा देणे आवश्यक आहे. उदा.महानगरपालिकेकडील भाडेकरुची नोंद असलेला मिळकत

	कर दाखला, भाडेकरुच्या नावे असलेले वीजदेयक, दूरध्वनी देयक, भाडेपावत्या, रेशनकार्ड, महापालिकेचा व्यापारी परवाना, 1995 च्या मतदार यादीतील नॉंद यापैकी किमान तीन पुरावे अथवा शासनाच्या गृहनिर्माण विभागाचा निर्णय क्र.लोकआ-2007/प्र.क्र.120(अ)/दुवपु-1, दि.16/8/2010 मध्ये नमूद पुराव्यापैकी कोणतेही तीन पुरावे दिल्यानंतरच सवलत देता येईल. दस्त नॉंदणीसाठी सादर करताना भाडेकरुच्या ताब्यात असलेल्या क्षेत्राचा सविस्तर तपशील व घेण्यात येणारे भाडे दस्तामध्ये नमूद करुन पुराव्यासह किमान आठ दिवस अगोदर दुय्यम निबंधक कार्यालयास सादर करावे. उपरोक्त सर्व पुरावा कागदपत्रांच्या सत्यप्रती दस्ताचा एक भाग म्हणून राहतील. दुय्यम निबंधकांनी पुराव्यासाठी दिलेल्या कागदपत्रांची पडताळणी करुन भाडेकरु असल्याची त्यांची खात्री पटल्यास अशा दस्ताची नॉंदणी करावी. लिव्ह ॲन्ड लायसन्सचे दस्तऐवजान्वये मिळणारे हक्क या सवलतीसाठी पात्र असणार नाहीत. ब) या मिळकतीतील अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र निश्चित करताना विकास नियंत्रण नियमावलीनुसार अनुज्ञेय असलेला प्रोत्साहनात्मक वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक (Incentive F.S.I.) देखील विचारात घेणे आवश्यक आहे.
3.	टी.डी.आर वापरणेची क्षमता असलेल्या भूखंडाचे मूल्यांकन :- मुंबई उपनगरातील हस्तांतरणीय विकास हक्क (टी.डी.आर.) वापरणेची क्षमता असलेल्या भूखंडाचे मूल्यांकन करताना, वार्षिक मूल्य दर तक्त्यात नमूद (1.00 चटई क्षेत्र निर्देशांकानुसारच्या) जमीन दरामध्ये 40% वाढ देऊन येणारा दर मूल्यांकनासाठी विचारात घेण्यात यावा. वरीलप्रमाणे वाढ दिल्यानंतर टी.डी.आर.वापर क्षमतेचा पुन्हा स्वतंत्र विचार करण्याची आवश्यकता नाही. ज्या दस्तांच्या बाबतीत उदा.उपकर प्राप्त इमारती, शैक्षणिक, तारांकित हॉटेल, म्हाडा, झोपडपट्टी पुनर्विकास इ.साठी दस्तात नमूद मिळकतीत प्रोत्साहनात्मक / अतिरिक्त चटई क्षेत्र (अनुज्ञेय चटई क्षेत्रामध्ये त्या भूखंडाच्या संपूर्ण टी.डी.आर.क्षमतेचा विचार केलेला असतो) लक्षात घेऊन सविस्तर मूल्यांकन केले जाते, त्यावेळी या सूचनेत नमूदनुसार दरात 40% वाढ देण्याचा प्रश्न उपस्थित होत नाही.
4.	घसारा :- जुन्या इमारतीच्या पूर्वायुष्यमानानुसार घसारा वजावटीनंतर विचारात घ्यावयाचा मूल्यांकन दर खालीलप्रमाणे परिगणित करावा. परिगणना 1) वार्षिक मूल्य दर तक्त्यातील निवासी इमारत / कार्यालय / व्यावसायिक / दुकान यांचा अन्य मार्गदर्शक सूचनानुसार अनुज्ञेय वाढ / घट देऊन येणारा मूल्य दर - (अ) 2) वार्षिक मूल्यदर तक्त्यातील खुल्या जमिनीचा मूल्यदर ------ (ब) 3) जमीन व बांधीव इमारत दरातील फरक ------ (क) = (अ - ब) 4) वार्षिक मूल्यदर तक्त्यानुसार टक्केवारी ------ (ड) 5) घसारा वजावटीनंतर विचारात घ्यावयाचा मूल्यदर = ब + (क x ड)

इमारतीचे पूर्वायुष्य (वर्षामध्ये)	घसारा वजावटीनंतर विचारात घ्यावयाची टक्केवारी - (ड)	
	आर.सी.सी./ इतर पक्के बांधकाम	अर्धे पक्के व कच्चे बांधकाम
0 ते 2	100%	100%
2 पेक्षा जास्त व 5 वर्षापर्यंत	95%	95%
5 पेक्षा जास्त व 10 वर्षापर्यंत	90%	85%
10 पेक्षा जास्त व 20 वर्षापर्यंत	80%	75%
20 पेक्षा जास्त व 30 वर्षापर्यंत	70%	60%
30 पेक्षा जास्त व 40 वर्षापर्यंत	60%	45%
40 पेक्षा जास्त व 50 वर्षापर्यंत	50%	30%
50 पेक्षा जास्त व 60 वर्षापर्यंत	40%	20%
60 वर्षापेक्षा जास्त	30%	15%

टीप :-

1) घसारा निश्चित करतेवेळी भोगवटा प्रमाणपत्र (occupancy certificate) उपलब्ध नसल्यास अन्य पुरावे उदा.महानगरपालिकेकडे भोगवटा प्रमाणपत्रासाठी केलेल्या अर्जाच्या पोचपावतीसह प्रत, महानगरपालिकाकडील कर भरणा दाखला किंवा इमारत पूर्णत्वाचा / ताब्यात असल्याबाबतचा इतर पुरावा जसे विद्युत देयक, दूरध्वनी देयक आणि सोसायटीचे प्रमाणपत्र यापैकी एक विचारात घ्यावे. सदर इमारत पुनर्विकसीत झाली असल्यास इतर पुराव्याबाबत सखोल पडताळणी करावी.
2) मूल्यदर तक्त्यात बांधीव निवासी इमारत / कार्यालय / व्यावसायिक / दुकाने / औद्योगिक इमारतींचे स्वतंत्र दर दिले नसल्यास मिळकतीचे मूल्यांकन सूचना क्र.7 प्रमाणे करणेत यावे.
3) स्थूल जमिनीसाठी, जमिनीचे मूल्य, सूचना क्र.17 नुसार परिगणित करावे.

5. **कार्पेट एरिया / बिल्ट-अप एरिया :-**

वार्षिक मूल्यदर तक्त्यामध्ये नमुद दर हे बिल्ट-अप क्षेत्राचे आहेत. दस्तामध्ये कार्पेट एरियाचा उल्लेख असल्यास, पुढीलप्रमाणे बिल्ट-अप एरिया काढून मूल्यांकन करावे. परंतु कार्पेट एरियाव्यतिरिक्त दस्तामध्ये बांधकाम क्षेत्राबाबत कोणताही अन्य उल्लेख असला तर, दस्तात नमूद क्षेत्र विचारात घेऊन मूल्यांकन करावे. मात्र खुले वाहनतळ (open parking) व गच्ची (Terrace) याबाबत फक्त नमूद क्षेत्र विचारात घ्यावे.

बिल्ट-अप एरिया = 1.2 x कार्पेट एरिया अथवा कार्पेट एरिया = बिल्टअप एरिया / 1.2

6. समूह गृहबांधणी प्रकल्पांतर्गत रो-हाऊस / पॅट हाऊस / डयुप्लेक्स / बंगला / सदनिका अथवा स्वतंत्र भूखंडावरील रो-हाऊस / बंगला / वाणिज्य / औद्योगिक वापराच्या इमारती :-

(अ) i) समूह गृहबांधणी प्रकल्पांतर्गत असलेल्या केवळ निवासी सदनिकेचे मूल्यांकन वार्षिक मूल्य दर तक्त्यातील संबंधित मूल्य विभागातील निवासी सदनिकेच्या मूल्य दराने करावे.

ii) मुंबई शहर व उपनगर जिल्हा क्षेत्रामधील भूखंडावर समूह गृहबांधणी प्रकल्पांतर्गत रो-हाऊस / पॅट हाऊस / डयुप्लेक्स / बंगल्याचे मूल्यांकन करताना त्याचे बांधकाम क्षेत्र 120 चौ.मी.पेक्षा जास्त असल्यास संबंधित विभागातील निवासी सदनिकेच्या मूल्य दराच्या 25% जास्त दर विचारात घ्यावा. मात्र जर या रो-हाऊस / पॅट हाऊस / डयुप्लेक्स / बंगल्यावर आर.सी.सी.चे स्लॅब नसेल आणि इतर पक्के अथवा अर्धपक्के स्वरुपाचे बांधकाम असेल तर, त्या मिळकतीचे मूल्यांकन करताना निवासी सदनिकेच्या दराच्या केवळ 10% जास्त दर विचारात घ्यावा.

iii) मुंबई शहर व उपनगर जिल्हा क्षेत्रामधील समूह गृहबांधणी प्रकल्पांतर्गत 120 चौ.मी.पेक्षा कमी क्षेत्राच्या रो-हाऊस / पॅट हाऊस / डयुप्लेक्स / बंगल्यांचे मूल्यांकन संबंधित विभागातील निवासी सदनिकेच्या मूल्य दराप्रमाणे करावे.

iv) समूह गृहबांधणी प्रकल्पाच्या क्षेत्राव्यतिरिक्त इतर सहकारी गृहनिर्माण संस्थेमधील अथवा स्वतंत्र रेखांकन मंजूर असलेल्या अथवा स्वतंत्र भूखंडावर बांधण्यात आलेल्या रो-हाऊस / बंगल्याचे / वाणिज्य / औद्योगिक वापराच्या इमारती बाबतीत मूल्य दर दिला नसल्यास सूचना क्र.7 नुसार मूल्यांकन करावे. मात्र मूल्य दर दिला असल्यास अशा वापराच्या बांधकाम क्षेत्राचे वार्षिक मूल्य दर तक्त्यातील सदनिका / कार्यालय / दुकाने / औद्योगिक दराने येणारे मूल्य परिगणित करुन शिल्लक चटई क्षेत्राचे (एकूण अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र - अस्तित्वातील बांधकाम क्षेत्र) जमीन दराने येणारे मूल्य समाविष्ट करुन येणारे एकत्रित मूल्य विचारात घ्यावे.

v) समूह गृहबांधणी प्रकल्प / स्वतंत्र भूखंडातील इमारतीमध्ये रहिवास व्यतिरिक्त अन्य वापर जसे तळमजल्यावरील दुकान गाळे / कार्यालय / व्यावसाईक / वाणिज्य इ. कोणत्याही अन्य वापरासाठीचे मूल्यांकन, वार्षिक मूल्य दर तक्त्यातील तळमजल्यावरील दुकाने / व्यावसायीक साठीच्या दराने करण्यात यावे.

(ब) मुंबई शहर व उपनगर जिल्हा क्षेत्रामधील 2 ते 10 हेक्टरच्या मोठया निवासी प्रकल्पासाठी वार्षिक मूल्य दर तक्त्यात दस्तात नमूद गृह प्रकल्पाकरिता स्वतंत्र मूल्यविभाग नसल्यास सदर प्रकल्प ज्या मूल्यविभागात आहे त्या मूल्यविभागातील सदनिका / दुकाने / कार्यालये दराच्या 105% दर व 10 हेक्टरपेक्षा जास्तीच्या क्षेत्रातील प्रकल्पासाठी 110% दर त्या प्रकल्पातील सदनिका / दुकाने / कार्यालयाचे मूल्यासाठी विचारात घ्यावा. सदर प्रकल्पातील 120 चौ.मी.पेक्षा जास्त क्षेत्राच्या रो-हाऊस / पॅट हाऊस / डयुप्लेक्स / बंगल्याचे मूल्यांकनासाठी उपरोक्त प्रमाणे वाढ देऊन येणा-या सदनिकांच्या मूल्य दराच्या अनुक्रमे 20% व 15% जास्त दर विचारात घ्यावा. सदर प्रकल्पातील 120 चौ.मी.पेक्षा कमी क्षेत्राच्या रो-हाऊस / पॅट हाऊस / डयुप्लेक्स / बंगल्यांचे मूल्यांकनासाठी त्या मूल्य विभागातील सदनिका दराच्या उपरोक्त प्रकल्पाच्या क्षेत्राच्या मर्यादेप्रमाणे 105% व 110% दर विचारात घ्यावा.

(क) अतिविशिष्ट बंगला / इमारत ज्यामध्ये हेलीपॅड, जिम्नॉशियम, स्वीमींग पूल इ. सुविधा आहे, काही मजल्याची उंची दुप्पट आहे तसेच इतर अत्याधुनिक सोई सुविधा आहेत अशा बंगल्यासाठी त्या मूल्यविभागातील बंगल्याच्या दराच्या दुप्पट अथवा दर दिला नसल्यास सूचना क्र.7 प्रमाणे येणाऱ्या दराच्या दुप्पट अथवा संबंधित मूल्यविभागातील सदनिका विक्री दराच्या दुप्पट यापैकी येणाऱ्या जास्तीच्या दरानुसार मूल्यांकन करावे.

7.	मूल्य दर तक्त्यात स्वतंत्र दर दिलेले नसल्यास विविध वापरासाठीच्या मिळकतींचे मूल्यांकन :- निवासी मिळकत, वरच्या मजल्यावरील कार्यालय / व्यावसायिक, तळमजल्यावरील दुकाने / व्यावसायिक तसेच औद्योगिक वापरासाठीच्या मिळकतींचे मूल्यांकन, संबंधित जमिनीच्या दरावरुन व बांधकाम वर्गीकरणानुसारच्या नवीन बांधकामाचे (परिशिष्ट - ब) दरावरुन खालीलप्रमाणे करावे. (i) निवासी मिळकत - अ) स्वतंत्र भूखंडावरील निवासी इमारत / बंगला = जमिनीचे मूल्य + घसा-यानुसार बांधकामाचे मूल्य ब) निवासी सदनिका = (जमिनीचा दर + घसा-यानुसार बांधकामाचा दर) x 1.15 x सदनिकेचे क्षेत्र सदनिकेच्या क्षेत्राबाबत उपरोक्त क्र.5 च्या सूचना लागू राहतील. सदनिका कोणत्या मजल्यावर आहे या अनुषंगाने त्यापुढील सूचना क्र.18 व 19 लागू राहतील (ii) वाणिज्य मिळकत - अ) स्वतंत्र भूखंडावरील वाणिज्य इमारत = (जमिनीचे क्षेत्र x जमिनीचा दर) + (बांधीव क्षेत्र x घसा-यानुसार बांधकामाचा दर) x 1.5 ब) तळमजला दुकानगाळा / व्यावसायिक / वाणिज्य गाळा / कार्यालये किंवा इमारत = (जमिनीचा दर + घसा-यानुसार बांधकामाचा दर) x 1.50 x गाळ्याचे क्षेत्र क) तळमजल्याखेरीज वरील मजल्यावरील व्यावसायिक / कार्यालये इ. = (जमिनीचा दर + घसा-यानुसार बांधकामाचा दर) x 1.25 x गाळ्याचे क्षेत्र (iii) औद्योगिक मिळकत - अ) स्वतंत्र भूखंडावरील औद्योगिक इमारत = जमिनीचे मूल्य + घसा-यानुसार बांधकामाचे मूल्य ब) औद्योगिक गाळा = (जमिनीचा दर + घसा-यानुसार बांधकामाचा दर) x 1.20 x गाळ्याचे क्षेत्र (iv) ना विकास विभागातील कोणत्याही वापराच्या मिळकतीचे मूल्यांकन :- मिळकतीचे मूल्य = सूचना क्र.17 (क) नुसार जमिनीचे मूल्य + घसा-यानुसार बांधकामाचे मूल्य
8.	दवाखाना, बँक, गोडाऊन, माहिती तंत्रज्ञान पार्कमधील नोंदणीकृत माहिती तंत्रज्ञान (IT) / माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा (ITES) करिताचे गाळे (Units), शाळा व धार्मिक इमारतीचे मूल्यांकन :- अ) तळमजल्यावरील रस्त्यासन्मुख गोडाऊन, खाजगी दवाखाने व बँकांचे मूल्यांकन वार्षिक मूल्य दर तक्त्यातील संबंधित मूल्यविभागातील दुकानांसाठीच्या दराने करण्यात यावे व रस्त्यासन्मुख नसल्यास मूल्यांकन दुकान दराच्या 80% दराने करण्यात यावे. सदर दोन्ही मूल्यांकनासाठी सूचना क्र. 9 (क) नुसार क्षेत्रासाठी वजावट अनुज्ञेय राहील. ब) वरच्या मजल्यावरील दवाखाना / रुग्णालय / बँकेचे मूल्यांकन मार्गदर्शक सूचना क्र.9 मधील क) व ड) नुसार करावे. क) माहिती तंत्रज्ञान पार्कमधील नोंदणीकृत माहिती तंत्रज्ञान / माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा करिताच्या गाळ्यांचे मूल्यांकन वार्षिक मूल्य दर तक्त्यातील वाणिज्य दराने न करता औद्योगिक दराने करावे. औद्योगिक दर दिला नसल्यास निवासी इमारत / सदनिका दराच्या 110% दर विचारात घेऊन मूल्यांकन करावे.

ड) बालवाडी, प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा व धार्मिक इमारतींचे मूल्यांकन वार्षिक मूल्य दर तक्त्यामध्ये निवासी इमारतीचा दर दिला असल्यास बांधकाम क्षेत्राचे मूल्य_वार्षिक मूल्य दर तक्त्यामधील संबंधित मूल्य विभागातील निवासी इमारत दराने परिगणित करुन शिल्लक चटई क्षेत्राचे (एकूण अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र - अस्तित्वातील बांधकाम क्षेत्र) जमीन दराने येणारे मूल्य समाविष्ट करुन एकत्रित मूल्यावर मुद्रांक शुल्क आकारणी करावी. मात्र मूल्य दर दिला नसल्यास सूचना क्र. 7 (i) (अ) नुसार मूल्यांकन करावे.

सर्व महाविद्यालयांच्या (अभियांत्रिकी / वैद्यकीय / व्यवस्थापन इ.) इमारतींचे मूल्यांकन वार्षिक मूल्य दर तक्त्यामधील वरील मजल्यावरील व्यावसायिक / कार्यालयासाठी मूल्य दर दिला असल्यास बांधकाम क्षेत्राचे मूल्य संबंधित मूल्य विभागातील वरील मजल्यावरील व्यावसायिक / कार्यालयासाठीच्या दराने परिगणित करुन शिल्लक चटई क्षेत्राचे (एकूण अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र - अस्तित्वातील बांधकाम क्षेत्र) जमीन दराने येणारे मूल्य समाविष्ट करुन एकत्रित मूल्यावर मुद्रांक शुल्क आकारणी करावी. मात्र मूल्य दर दिला नसल्यास सूचना क्र. 7 (ii) (क) नुसार मूल्यांकन करावे.

9. दुकानगाळ्याचे मूल्यांकन :-

अ) रस्ते सन्मुख असलेली दुकाने : वार्षिक मूल्य दर तक्त्यातील दुकानाच्या दराने मूल्यांकन करावे.

ब) रस्ते सन्मुख नसलेली दुकाने : वार्षिक मूल्यदर तक्त्यातील दुकान दराच्या 80% दराने मूल्यांकन करावे. तथापि यानुसार येणारा दर वरच्या मजल्यावरील कार्यालय / व्यावसायिक गाळ्यांच्या दरापेक्षा कमी असू नये. सदर सवलत ही रस्त्यासन्मुख नसणा-या केवळ तळमजला / लोअर ग्राऊंड फलोअर / अप्पर ग्राऊंड फलोअर मधील केवळ दुकानगाळ्यांसच अनुज्ञेय राहील. दस्तात नमूद इमारतीचा बांधकाम नकाशा अवलोकन करुन संबंधित दुय्यम निबंधक यांनी दुकान गाळा रस्त्यासन्मुख आहे किंवा कसे याची खात्री करावी व मंजूर नकाशाची प्रत दस्ताचा भाग म्हणून जोडण्यात यावी.

क) 450 चौ.मी बांधकाम क्षेत्रापेक्षा जास्त क्षेत्रांची दुकाने / कार्यालये : -

450 चौ.मी. बांधकाम क्षेत्रापेक्षा जास्त क्षेत्राच्या दुकानांचे / कार्यालयांचे मूल्यांकन करताना वार्षिक मूल्य दर तक्त्यातील संबंधित मूल्य विभागातील दुकान / कार्यालये दरामध्ये खालीलप्रमाणे वजावट देण्यात यावी.

दुकानाचे / कार्यालयाचे बांधकाम क्षेत्रफळ	मूल्य दरामध्ये द्यावयाची वजावट
450 चौ.मी.पेक्षा जास्त व 700 चौ.मी.पर्यंत	5%
700 चौ.मी.पेक्षा जास्त व 900 चौ.मी.पर्यंत	10%
900 चौ.मी.पेक्षा जास्त व 2300 चौ.मी.पर्यंत	15%
2300 चौ.मी.पेक्षा जास्त	20%

टीप :-

1) रस्त्यासन्मुख नसलेल्या मोठ्या क्षेत्राच्या दुकानासाठी सूचना क्र.9 (ब) प्रमाणे येणारा दर विचारात घेऊन सदर वजावट अनुज्ञेय राहील. मात्र अशी वजावट रस्ते सन्मुख नसलेल्या मोठ्या क्षेत्राच्या कार्यालयास अनुज्ञेय असणार नाही.

2) वरीलप्रमाणे मूल्यांकन करताना टप्प्यानुसार मूल्यांकन न करता त्या क्षेत्रासाठी थेट अनुषंगिक वजावट विचारात घ्यावी.

ड) मॉल्स व्यतिरिक्त इतर मोठे दुकान संकुल असलेल्या इमारतीतील दुकानांचे मूल्यांकन :-

अ.क्र.	दुकान असलेला मजला	वार्षिक मूल्य दर तक्त्यातील दुकानासाठीच्या दराची विचारात घ्यावयाची टक्केवारी
1)	तळघर (Basement)	70%
2)	खालच्या पातळीवरील तळमजला (Lower Ground floor)	90%
3)	तळमजला (Ground floor) / वरच्या पातळीवरील तळमजला (Upper Ground Floor)	100%
4)	पहिला मजला (तळ मजल्यावरील अथवा स्टील्ट मजल्यावरील)	90%
5)	दुसरा व त्यावरील मजले	80%

टीप :-

1) वरीलप्रमाणे येणारा दर वरच्या मजल्यावरील कार्यालय / व्यावसायिक गाळ्याच्या दरापेक्षा कमी येत असल्यास कार्यालय / व्यावसायिक गाळ्याचा दर विचारात घ्यावा.

2) उपरोक्त संकुलातील रस्त्यासन्मुख नसलेल्या दुकानासाठी सूचना क्र.9 (ब) प्रमाणे येणारा दर विचारात घेऊन सदर वजावट अनुज्ञेय राहील.

10. बंदिस्त खरेदी क्षेत्र दालनाचे संकुल (Malls) / डिपार्टमेंटल स्टोअर्स :-

अशा इमारतीस स्वतंत्र मूल्य विभाग / दर नमूद नसल्यास त्यामधील खरेदी क्षेत्र दालनातील गाळा / दुकानांचे मूल्य खालीलप्रमाणे ठरविण्यात यावे.

अ.क्र.	दुकान असलेला मजला	वार्षिक मूल्य दर तक्त्यातील संबंधीत मूल्यविभागातील दुकानांच्या दराचे विचारात घ्यावयाची टक्केवारी
1.	तळघर (Basement)	80%
2.	खालच्या पातळीवरील तळमजला (Lower Ground floor)	100%
3.	तळमजला (Ground floor) / वरच्या पातळीवरील तळमजला (Upper Ground Floor)	120%
4.	पहिला मजला	100%
5.	दुसरा मजला व त्यावरील मजले	80%

	टीप :- मॉल्स / डिपार्टमेंटल स्टोअर्ससाठी वार्षिक मूल्य दर तक्त्यात स्वतंत्र मूल्यविभाग करुन दर दिला असल्यास, ही सूचना विचारात घेऊ नये. दस्तात नमूद खरेदी क्षेत्र दालनातील गाळे / दुकाने मॉल्समधील / डिपार्टमेंटल स्टोअर्समधील आहे किंवा कसे याची खात्री करण्यासाठी दस्तासोबत महानगरपालिकेने मंजूर केलेल्या बांधकाम नकाशाची प्रत दस्तासोबत जोडणे आवश्यक राहील. वरीलप्रमाणे येणारा दर वार्षिक मूल्य दर तक्त्यातील संबंधित मूल्य विभागातील वरच्या मजल्यावरील कार्यालय / व्यावसायीक गाळ्याच्या दरापेक्षा कमी येत असल्यास कार्यालय / व्यावसायिक गाळ्याचा दर विचारात घ्यावा. वरीलप्रमाणे येणा-या दरास पुन्हा उपरोक्त 9 (ब) येथील सूचनेप्रमाणे घट देण्यात येऊ नये.
11.	वाणिज्य / रहिवास, सार्वजनिक-निम-सार्वजनिक / वाणिज्य / रहिवास व औद्योगिक / वाणिज्य अशा संमिश्र वापराच्या इमारतीमधील लोअर ग्राउंड फ्लोअर वरील दुकाने [मोठे दुकान संकुल / बंदिस्त खरेदी क्षेत्र दालनांचे संकुल (Malls) वगळून] :- लोअर ग्राउंड फ्लोअर दुकानाचे मूल्यांकन संबंधित विभागातील दुकान दराच्या 80% दर विचारात घेऊन करावे. अप्पर ग्राउंड फ्लोअर दुकानाचे मूल्यांकन तळमजल्याप्रमाणे वार्षिक मूल्य दर तक्त्यातील संबंधित मूल्य विभागातील दुकानदराच्या 100% दर विचारात घेऊन करावे.
12.	तळघर (Basement) :- तळघर (Basement) वाहनतळाव्यतिरिक्त दुकानासाठी / गोडाऊन / स्टोरेजसाठी वापरण्यांत येत असल्यास संबंधित मूल्य विभागातील दुकानाच्या दराच्या 70% दराने मूल्यांकन करावे.
13.	पोट मजला (Mezzalnine floor) :- पोटमजल्याचे मूल्यांकन वार्षिक मूल्य दर तक्त्यातील त्या त्या मजल्याच्या संबंधित वापराच्या दराच्या 70% दराने करावे. मात्र पोटमाळा (loft) चे क्षेत्र मूल्यांकनासाठी विचारात घेऊ नये.
14.	इमारतीचे तळमजल्याभोवती असलेली जागा :- मंजूर बांधकाम नकाशातील सदनिका / कार्यालये / दुकान यांना लागून असलेल्या जमिनीचे, पार्किंग अथवा अन्य कारणासाठी हक्क देण्यात येत असतील तर अशा जमिनीचे मूल्यांकन वार्षिक मूल्य दर तक्त्यातील संबंधित मूल्य विभागाच्या जमीनदराच्या 40% दराने करावे.
15.	गच्ची (Terrace) :- अ) स्वतंत्र भूखंडावरील बंगला वगळता अन्य बांधीव (सदनिका / कार्यालये / दुकाने / औद्योगिक) मिळकतीलगतच्या (सदनिका / कार्यालये / दुकाने / औद्योगिक) गच्ची (Terrace) च्या मूल्यांकनासाठी वार्षिक मूल्य दर तक्त्यातील संबंधित वापराच्या मूल्य दराच्या 40% दर विचारात घेऊन मूल्यांकन करावे. सदनिकेच्या वरच्या मजल्यावरील गच्ची (Terrace), सदनिकेसह विक्री होत असल्यास, अशा गच्चीचे मूल्यांकन वार्षिक मूल्य दर तक्त्यातील सदनिकेच्या दराच्या 25% दराने करावे. तथापि, कार्यालयाच्या / दुकानाच्या वरील मजल्यावरील गच्ची (Terrace) चे मूल्यांकन वार्षिक मूल्य दर तक्त्यातील कार्यालयाच्या / दुकानाच्या दराच्या 40% दरानेच करावे. ब) स्वतंत्र भुखंडावरील बंगल्याचे टेरेसवरील बांधकामाचे हक्क हस्तांतरण / विक्री करण्यात येणारा दस्त असल्यास सदर टेरेस क्षेत्रासाठी जमिन दराने मूल्य परिगणित करुन त्यामध्ये नविन बांधकाम दराच्या 15% बांधकाम खर्च समाविष्ट करुन मूल्य निश्चित करावे.

16. **वाहनतळ (Parking) :-**

स्वतंत्र भूखंडावरील बंगला वगळता, अन्य बांधीव (सदनिका / कार्यालये / दुकाने / औद्योगिक) मिळकतीस आच्छादित वाहनतळाची (Covered Parking) उदा. पार्किंग गॅरेज, स्टील्ट पार्किंग व बहुविध मजल्यावरील पार्किंग सुविधा उपलब्ध असल्यास आच्छादित वाहनतळाच्या बांधकाम क्षेत्राचे मूल्यांकन वार्षिक मूल्य दर तक्त्यातील संबंधित (सदनिका / कार्यालये / दुकाने / औद्योगिक) वापराच्या दरात अनुज्ञेय वजावट / वाढ देऊन आलेल्या दराच्या 25% दराने मूल्यांकन करावे. मात्र, खुल्या जमिनीवरील वाहनतळाचे मूल्यांकन हे संबंधित मूल्य विभागातील जमिनदराच्या 40% दराने करावे. दस्तामध्ये वाहनतळाचा उल्लेख नसल्यास सदनिका / कार्यालये / दुकाने / औद्योगिक यासाठी आच्छादित अथवा खुले वाहनतळ (Parking) देण्यात आले नसल्याचे हमीपत्र घेऊन ते दस्ताचा भाग करण्यात यावे.

17. **स्थूल जमिनीचे मुल्यांकन :-**

अ) भूखंडाचे क्षेत्र 2125 चौ.मी.पर्यंत असल्यास पूर्ण दराने मूल्यांकन करावे.

ब) भूखंडाचे क्षेत्र 2125 चौ.मी.पेक्षा जास्त व 2500 चौ.मी.पेक्षा कमी असल्यास कमाल 2125 चौ.मी.क्षेत्रावर पूर्ण जमीन दराने मूल्यांकन करण्यात यावे. 2500 चौ.मी.पेक्षा जास्त क्षेत्र असल्यास टप्प्यानुसार मूल्यांकन न करता सरसकट 15% वजावट देऊन मूल्यांकन करण्यात यावे.

क) ना विकास विभागातील जमिनींसाठी स्वतंत्र मूल्य विभाग / दर दिले नसल्यास सदर जमीन ज्या मूल्य विभागात समाविष्ट आहे त्या मूल्य विभागाच्या जमीनदराच्या 40% दर विचारात घेऊन मूल्यांकन करण्यात यावे. जमिनीच्या क्षेत्राच्या अनुषंगाने उपरोक्तप्रमाणे 15% वजावट देण्यात येऊ नये. या नियमाचा वापर करण्यापूर्वी ती जागा ना-विकास विभागात समाविष्ट असल्याचा मुंबई महानगरपालिकेकडील अद्ययावत दाखला (D.P.Remarks) व नकाशा घेऊन तो दस्तासोबत जोडणे आवश्यक राहील.

18. **उदवाहन सुविधा नसलेल्या इमारती :-**

उदवाहन सुविधा नसलेल्या निवासी इमारती / सदनिका / इमारतीतील वरच्या मजल्यावरील कार्यालयाचे मूल्यांकन खालीलप्रमाणे मूल्य दराची टक्केवारी विचारात घेण्यात यावी.

अ.क्र.	इमारतीचा मजला	विचारात घ्यावयाची संबंधित मूल्यदराची टक्केवारी
1)	तळ मजला / स्टिल्ट फ्लोअर	100%
2)	पहिला	100%
3)	दुसरा	95%
4)	तिसरा	90%
5)	चौथा व त्यावरील सर्व मजल्यांसाठी	80%

19. **उद्वाहन सुविधा असलेल्या बहुमजली इमारती :-**

बहुमजली निवासी इमारती / सदनिका / इमारतीतील वरच्या मजल्यावरील कार्यालयाचे मूल्यांकन करताना संबंधित मूल्य विभागातील दरामध्ये पुढीलप्रमाणे वाढ विचारात घ्यावी.

अ.क्र.	इमारतीचा मजला	वार्षिक मूल्य दरामध्ये करावयाची वाढ
1	स्टील्ट मजला अथवा तळमजला ते 4 थ्या मजल्यापर्यंत	वार्षिक मूल्य दराप्रमाणे
2	5 वा मजला ते 10 व्या मजल्यापर्यंत	5%
3	11 वा मजला ते 20 व्या मजल्यापर्यंत	10%
4	21 वा मजला ते 30 व्या मजल्यापर्यंत	15%
5	31 वा मजला व त्यावरील मजले	20%

मजल्यांची संख्या मोजतांना स्टील्ट अथवा तळमजला सोडून त्यावरील सर्व मजले एकसलग मोजावेत. बहुमजली इमारतीमधील दुकानगाळा व आय.टी.वापरासाठी वाढ देण्यात येऊ नये.

20. **बहुमजली औद्योगिक गाळयांचे मूल्यांकन :-**

बहुमजली औद्योगिक गाळयासाठीच्या दरामध्ये पहिल्या ते चौथ्या मजल्यापर्यंत प्रत्येक मजल्यासाठी 5% वजावट देऊन मूल्यांकन करावे. त्यावरील सर्व मजल्यांना 20% इतकी कमाल वजावट अनुज्ञेय राहील. या मार्गदर्शक सूचनेचा लाभ माहिती व तंत्रज्ञान पार्कमधील गाळयांना अनुज्ञेय राहणार नाही. वार्षिक मूल्य दर तक्त्यात औद्योगिक क्षेत्र / वापरासाठी स्वतंत्र दर दिला नसल्यास निवासी इमारत दराच्या 110% दर विचारात घ्यावा. निवासी इमारतीचाही दर दिला नसल्यास सूचना क्र.7 (iii) नुसार मूल्यांकन करावे.

21. **सहकारी गृहनिर्माण संस्थाच्या पुनर्विकासाचे प्रस्ताव :-**

सहकारी गृहनिर्माण संस्थाच्या पुनर्विकास प्रस्तावामधील समाविष्ट मिळकतींचे दस्तांबाबत वार्षिक मूल्य दर तक्त्यानुसार येणारे मूल्यांकन संबंधितांना मान्य नसलेस महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, 1958 च्या कलम 31 अन्वये अभिनिर्णयाद्वारे सविस्तर मूल्यांकन करुन घेण्यात यावे.

22. **मंजूर विकास योजनेनुसारच्या आरक्षित (Reserved for public purpose) जमिनींचे मूल्यांकन :-**

दस्तात नमूद क्षेत्रापैकी फक्त मंजूर विकास योजनेनुसारच्या आरक्षित / बाधीत क्षेत्राचे मूल्यांकन वार्षिक मूल्य दर तक्त्यातील नमूद दराच्या 80% दराने करण्यात यावे. सी.आर.झोड.क्षेत्रातील ज्या आरक्षणांना टी.डी.आर.अनुज्ञेय नाही अशा आरक्षित / बाधित क्षेत्राचे मूल्यांकन वार्षिक मूल्य दर तक्त्यातील नमूद दराच्या 80% दराने व सूचना क्र. 17 विचारात घेऊन मूल्यांकन करावे.

23.	विकसन करारनामा - बांधकाम क्षेत्र विभागणी प्रकरणी मूल्यांकन :- अ) जमीन मालकास मिळणाऱ्या हिश्याचे मोबदल्याचे मूल्य I) जमीन मालकाच्या हिश्याचे क्षेत्राचे बांधकाम दरानुसार येणारे मूल्य + II) जमीनमालकास बांधकामाव्यतिरिक्त मिळणारा रोख मोबदला, डिपॉझिटवरील व्याज, विकास शुल्क इ. दस्तामधील नमूद बाबी विचारात घेऊन येणारे मूल्य (डिपॉझिटसाठी दस्तामध्ये 10% पेक्षा जास्त व्याजदर नमूद असल्यास तो दर अथवा व्याजदर नमूद नसल्यास 10% व्याजदराने येणारे सरळव्याज विचारात घ्यावे) ब) विकसनकर्त्याला मिळणाऱ्या हिश्याचे मूल्य विकसनकर्त्याच्या हिश्याच्या जागेचे क्षेत्र x जमिनीचा दर उपरोक्त (अ) व (ब) पैकी जास्तीचे मूल्य बाजारमूल्य म्हणून विचारात घ्यावे.
24.	विकसन करारनामा उत्पन्न विभागणी (Revenue sharing) प्रकरणी मूल्यांकन खालीलप्रमाणे करावे :- अ) जमीन मालकास मिळणा-या हिश्याचे मोबदल्याचे मूल्य I) मालकाचे हिश्याचे क्षेत्राचे अनुज्ञेय वापर विचारात घेऊन त्याचे विक्री दरानुसार येणारे आजचे मूल्य x 0.85 + II) जमीन मालकास त्याव्यतिरिक्त मिळणारा मोबदला, डिपॉझिटवरील व्याज इ. दस्तामधील नमूद बाबी विचारात घेऊन येणारे मूल्य (डिपॉझिटसाठी दस्तामध्ये 10% पेक्षा जास्त व्याजदर नमूद असल्यास तो दर अथवा 10% व्याजदराने येणारे सरळव्याज विचारात घ्यावे). ब) संपूर्ण जमिनीचे वार्षिक मूल्य दर तक्त्यातील जमीन दराने येणारे मूल्यांकन :- वरील अ) व ब) पैकी जास्तीचे मूल्य विचारात घ्यावे.
25.	विकसन करारनामा - बांधकाम क्षेत्र विभागणी दस्त नोंदणी / अभिनिर्णय प्रकरणी मूल्यांकनासाठी विचारात घ्याव्याच्या बाबी :- अ) फंजिबल चटई क्षेत्र निर्देशांकाचे मूल्य :- विकास नियंत्रण नियम क्र.35(4) अन्वये फंजिबल चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय केला जात असल्याने त्याचा विचार विकसन करारनाम्याद्वारे जमिनमालकास मिळणा-या बांधकाम क्षेत्राचे मूल्यामध्ये करावा. विकसकासही फंजिबल चटई क्षेत्र निर्देशांक मिळत असल्याने, त्यास मिळणा-या चटई क्षेत्राच्या मूल्यात फंजिबल चटई निर्देशांकचे मूल्य समाविष्ट करावे. मात्र विकसकास फंजिबल चटई निर्देशांक प्रिमियम अरुन अनुज्ञेय असल्याने सदर प्रिमियमची रक्कम चटई क्षेत्राच्या मूल्यातून वजा करावी. ब) विकास शुल्काचे मूल्य :- जमिनमालकास जे बांधीव क्षेत्र मिळणार आहे त्या क्षेत्राचे महानगरपालिकेस भरावे लागणारे विकास शुल्क विकसकाकडून भरण्यात येत असल्याने ती सदर रक्कम जमिनमालकाचे लाभात असलेने सदर रक्कम नवीन बांधकाम दरानुसार येणा-या बांधकाम क्षेत्राचे मूल्यात समाविष्ट करावी.

26.	**झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्प विकसन करारनामा दस्त नोंदणी / अभिनिर्णय प्रकरणी मूल्यांकनासाठी विचारात घ्यावयाच्या बाबी :-** अ) जमिनमालकास मिळणारे बांधकाम क्षेत्राचे वार्षिक मूल्य दर तक्त्यातील नवीन बांधकाम दरानुसार येणारे मूल्य + रोख व इतर स्वरुपात देण्यात येणारा मोबदला असे एकूण मूल्य ब) विकसक यांना मिळणारे बांधकाम / चटई क्षेत्राचे मूल्य जमीनदराने काढून त्यामध्ये झोपडपट्टी पुनर्वसनाचा बांधकाम खर्च वजा करुन येणारे मूल्य अथवा संपूर्ण जमिनीचे जमीन दराने येणा-या मूल्याच्या 50% रक्कम यापैकी जी रक्कम जास्त असेल ती विचारात घ्यावी. उपरोक्त (अ) व (ब) प्रमाणे येणा-या रक्कमेपैकी जी रक्कम जास्त असेल ती बाजार मूल्य म्हणून मुद्रांक शुल्क आकारणीसाठी विचारात घ्यावी.
27.	**उपकर प्राप्त इमारतींचा पुनर्विकास प्रकल्प विकसन करारनामा दस्त नोंदणी / अभिनिर्णय प्रकरणी मूल्यांकनासाठी विचारात घ्यावयाच्या बाबी :-** अ) जमिनमालकास मिळणारे बांधकाम क्षेत्राचे वार्षिक मूल्य दर तक्त्यातील नवीन बांधकाम दरानुसार येणारे मूल्य + रोख व इतर स्वरुपात देण्यात येणारा मोबदला असे एकूण मूल्य ब) विकसक यांना मिळणारे बांधकाम / चटई क्षेत्राचे मूल्य जमीन दराने काढून त्यामध्ये भाडेकरुंच्या पुनर्वसनाचा बांधकाम खर्च वजा करुन येणारे मूल्य अथवा संपूर्ण जमिनीचे जमीन दराने येणा-या मूल्याच्या 50% रक्कम यापैकी जी रक्कम जास्त असेल ती विचारात घ्यावी. उपरोक्त (अ) व (ब) प्रमाणे येणा-या रक्कमेपैकी जी रक्कम जास्त असेल ती बाजार मूल्य म्हणून मुद्रांक शुल्क आकारणीसाठी विचारात घ्यावी.
28.	**विकसन करारनाम्याच्या अनुषंगाने विकसक स्वत:साठी राखून ठेवत असलेल्या सदनिका / दुकाने / कार्यालये इ. तो स्वत:साठी खरेदी करीत असलेल्या दस्त प्रकरणी मूल्यांकन :-** विकसक करारनाम्याच्या अनुषंगाने स्वत:साठी राखून ठेवलेल्या सदनिका / दुकाने / कार्यालये इ. विकसक स्वत:साठी खरेदी करीत असलेल्या दस्तांबाबत वार्षिक मूल्य दर तक्यातील 'सदनिका / दुकाने / कार्यालये इ.साठीच्या मूल्य दरातून बांधकाम वर्गीकरणानुसार नवीन बांधकामाचा दर वजा करुन येणा-या मूल्य दरानुसार परिगणित होणा-या मूल्यावर मुद्रांक शुल्क आकारावे.
29.	उपरोक्त सर्व मार्गदर्शन सूचनांनुसार वजावट / घट / सवलत देण्यापूर्वी त्या पृष्ठर्थ आवश्यक कागदपत्रे / नकाशाची सत्यप्रत दस्तासोबत जोडून दस्ताचा भाग करणे आवश्यक राहील.
30.	एकच सर्व्हे नंबर दोन मूल्य विभागात असल्यास दोन्हीपैकी जास्तीच्या दराने मूल्यांकन करण्यात यावे. सदर दर मान्य नसल्यास विभागीय उपसंचालक नगर रचना (मूल्यांकन) यांचेकडून त्यापृष्ठयर्थ आवश्यक कागदपत्रे सादर करुन मूल्य विभाग निश्चित करुन घ्यावे.
31.	**इमारतीच्या टेरेसवरील क्षेत्र मोबाईल टॉवर उभारणीसाठी हस्तांतरीत होत असल्यास अथवा भाडेपट्टयाने देण्यात येत असल्यास करावयाचे मूल्यांकन :-** सदरचा वापर "वाणिज्य" म्हणून विचारात घेऊन अशा अभिहस्तांतरण (conveyance) साठी वार्षिक मूल्य दर तक्त्यातील संबंधित मूल्य विभागातील वाणिज्य वापर (तळमजल्यातील दुकाने / व्यावसायिक) दराच्या 40% दराने मूल्य परिगणित करावे. सदर क्षेत्र भाडेपट्टयाने (lease) हस्तांतरीत होत असल्यास महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 3 अनुसूची क्र.1 मधील अनुच्छेद 36 नुसार मूल्यांची टक्केवारी विचारात घ्यावी. सदर सूचना अनुच्छेद 36 अ मधील 5 वर्षापेक्षा कमी कालावधीच्या लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनाम्यासाठी लागू नाही 5 वर्षापेक्षा जास्त कालावधीच्या लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनाम्यासाठी अथवा या प्रकारचा दस्त भाडेपट्टा या स्वरुपाचा असल्यास त्यास ही सूचना लागू राहील.

